# कादंबरीसार.

म. ग्रं. सं. ठाणें

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक

पुस्तकाचें नांव

सन

... ग्रंथोत्तेजक ... कामेट.

# कादंबरीसार.

पांडुरंग गोविंद शास्त्री पारखी,

मित्रचंद्र, षड्ऋतुवर्णन, कृष्णाकुमारी, बोधामृत, हंसिका,

इत्यादि पुस्तकांचे कर्ते

यांनीं केलें.

पुणें,

चित्रशाळा छापखान्याचे व्यवस्थापक यांनीं स्वामित्वाच्या सर्व हक्कासुद्धां खरेदी करून

अंबाप्रसाद छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

सन १८९१.

हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें रजिष्टर केलें आहे.

किंमत १॥ रुपया.

# प्रस्तावना.

बाणभट्टकृत कादंबरीचें हें मराठींत भाषांतर केलें आहे. मूळग्रंथ जसा एकाच्याच हातून शेवटास गेला नाहीं, त्याचप्रमाणें समग्र ग्रंथाचें—ह्मणजे दोन्ही भागांचें—मराठी भाषांतर देखील एकाच्याच हातून तडीस जाऊन प्रसिद्ध झाल्याबद्दल कोठें ऐकण्यांत आलें नाहीं. तेव्हां आपण प्रयत्न करून पहावा, असें मनांत येऊन मीं ह्या भाषांतरास आरंभ केला. त्यावेळीं मी वऱ्हाडांतील शाळाखात्यांत होतों. मीं केलेलें कादंबरीचें कांहीं भाषांतर कित्येक ग्रहस्थांच्या दृष्टीस पडलें तेव्हां त्यांनीं मला समग्र ग्रंथाचें भाषांतर करण्याविषयीं उत्तेजन दिलें. पुढें बरेच दिवस या ग्रंथाच्या दोन्ही भागांचें यथामति भाषांतर करून तें वऱ्हाडांतील ग्रंथोत्तेजक कमिटीकडे पाठविलें. त्या कमिटीनें त्याचें परीक्षण करून पसंत केल्यावर रा. ब. **श्रीराम भिकाजी जठार** वऱ्हाड प्रांताचे डायरेक्टर यांनीं या ग्रंथास पूर्ण बक्षीस मिळण्याकरितां शिफारस केली, व त्यावरून या ग्रंथास चांगलें बक्षीस मिळालें. पुढें अनेक अडचणीमुळें हा ग्रंथ प्रसिद्ध करण्याचें मागें पडलें होतें; परंतु रा. रा. **वासुदेवराव जोशी पुणें येथील चित्रशाळेचे मालक** यांनीं ग्रंथकारापासून या ग्रंथाचा हक्क घेऊन हा छापून प्रसिद्ध केला आहे. मीं हा ग्रंथ रचला त्यावेळीं उत्तरार्धाचें भाषांतर प्रसिद्ध झालें नव्हतें, तें पुढें वऱ्हाडग्रंथोत्तेजक कमिटीकडे या पुस्तकाचें परीक्षण चाललें होतें त्यावेळीं प्रसिद्ध झालें. या पूर्वीं दोन्ही भाग छापून प्रसिद्ध झाले आहेतच तेव्हां आतां हें पुस्तक छापून प्रसिद्ध करण्यांत काय विशेष? असें कित्येकांस वाटण्यासारखें आहे. तर विशेष ह्मणून इतकाच आहे कीं, प्रसिद्ध झालेल्या दोन्ही भा-

गांचें निराळेपण केले असल्यामुळें प्रथम भागाची सारसंग्रहाची व भाषेची पद्धति निराळ्या प्रकारची, व दुसऱ्या भागाची निराळ्या तऱ्हेची, यामुळें दोन्ही भागांत जो चमत्कारिक फरक दिसतो आहे, तसा यांत दिसणार नाहीं व त्यांपेक्षां हे दोन्ही भाग कमी किंमतींत वाचकांस मिळण्याची योजना केली असल्यामुळें लोकांस अल्प किंमतींत मोठाच फायदा होण्यासारखा आहे. आतां हें भाषांतर ह्मणजे पदशःच केलें आहे असें नाहीं, तर मराठींत जितकें बरेंसें दिसेल असें वाटलें तितकें घेतलें आहे. त्यांतही आह्मीं ज्या गृहस्थांस या ग्रंथाचा हक्क दिला, त्यांच्या सूचनेप्रमाणेंही यांत फेरफार केले आहेत. ह्मणजे लांबलचक वर्णनें कमी केलीं आहेत व मराठी वाचणाऱ्यास मनोरंजक वाटावें ह्मणून अधिक उणे शब्द घालूनें रचना केली आहे.

अगोदर संस्कृतभाषा रसाळ, त्यांत **बाणभट्टा**सारख्या कल्पक व सहृदय कवीशीं तिची गांठ ! मग तिच्या रमणीयतेस काय पाहिलें पाहिजे ! तसा रस मराठींत कोठून उतरणार ! तथापि या ग्रंथांत **बाण**कवीच्या विलक्षण कवित्वाची छाया तरी दृष्टीस पडून वाचकांचें मनोरंजन झाल्याखेरीज रहाणार नाहीं.

आतां ह्या कवीची माहिती जी उपलब्ध आहे ती येथें दिली असतां प्रसंगास अननुरूप होणार नाहीं असें समजून ती येथें देतों.

संस्कृत गद्यग्रन्थ करणारांत **बाणभट्ट** हा अग्रगण्य होय, असें ह्मटलें असतां हरकत नाहीं. ह्या कवीनें गद्यग्रन्थांत चांगलीच भर पाडिली यांत कांहीं संशय नाहीं. आरंभीं पद्यग्रंथांचें प्राबल्य असतें व पुढें गद्यग्रंथ सुरू होऊन वाग्देवीच्या स्वाभाविक सौंदर्याचा विकास होतो, असा प्रकार सर्वराष्ट्रांत आढळून येतो. त्याप्रमाणें इकडे ही गद्यरचनेचा प्रचार सुरू झाला तथापि कवितेंतील थाटमाट गद्यांत राहिला तो राहिलाच. **बाण**भट्टानें कादंबरीच्या आरंभीं आपल्या कांहीं पूर्वजांचा मात्र नामनिर्देश केला आहे, परंतु त्यानें कादंबरीचेपूर्वी रचलेल्या **हर्ष**चरितांत आपल्या वंशाची, स्वताविषयींची व ज्याच्या पदरीं तो होता त्या हर्षराजाची, बरीच माहिती दिली

आहे. त्यानें हर्षचरिताच्या प्रथम उच्छ्वासांत आपल्या कुळाची एक आख्यायिका दिली आहे ती येणेंप्रमाणें:—

## बाणकवीच्या कुलाविषयीं दंतकथा.

कोणे एकेकाळीं ब्रह्मलोकाचेठायीं ब्रह्मदेव, इंद्रादिकदेव व वसिष्ठादिक ऋषि आणि सावित्री व सरस्वती यांच्याशीं सहवर्तमान शास्त्रज्ञानाच्या गोष्टी सांगत बसले असतां त्या ठिकाणीं अत्रिऋषीचा पुत्र दुर्वासऋषि हा मंडपालमुनींशीं वादविवाद करीत असतां,आपल्या तापटवृत्तीच्या भरांत स्वरोच्चारणांत चुकला. त्यावेळीं तेथें असलेल्या देवर्षीनीं शापभितीमुळें मौनव्रत धारण केलें परंतु सरस्वतीस हसूं आवरलें नाहीं. तेव्हां दुर्वासऋषीस अत्यंत क्रोध येऊन, हातांत उदक घेऊन, तो तीस शाप देण्यास प्रवृत्त झाला. त्यावेळीं इतर सभासद भयभीत होऊन आपापल्या आसनांवरून उठून दुर्वास ऋषीची प्रार्थना करते झाले. त्याचा पिता अत्रिऋषि यानेंही असें करूं नको ह्मणून सांगितलें. तथापि त्याचा रोष त्यास आवरला नाहीं. मग तो सरस्वतीस ह्मणाला, हे "दुर्विनीते! तूं मृत्युलोकीं जाऊन वास कर, तुला विद्येचा जो गर्व झाला आहे तो मी नाहींसा करून टाकतों!" तेव्हां सावित्री दुर्वासऋषीस उलट शाप देण्यास प्रवृत्त झाली, परंतु सरस्वतीनें तिचा निषेध केला. मग ब्रह्मदेव दुर्वासऋषीस अनुलक्षून ह्मणाले, "साधुजनांनीं सेवन केलेला हा मार्ग नव्हे. विचारी असतात ते आपल्या उद्दाम मनोवृत्तीचें आकलन करितात. क्षमाच काय ती तपश्चर्येचें मुख्य तत्व आहे. क्रोधावेशामुळें स्वतःचे दोष कोणास दिसत नाहींत व कर्तव्याकर्तव्य समजत नाहीं. इतका क्रोध ज्याला आवरत नाहीं तो कां तपस्वी? अशानें खरें हित कसें साधणार?" मग तो सरस्वतीकडे वळून ह्मणाला, "वत्से सरस्वती! तूं खिन्न होऊं नको? माझ्या वियोगाचें दुःख तुला होऊं नये ह्मणून स्वतः सावित्री तुज समागमें मृत्युलोकीं वास करण्याकरितां येईल भूलोकीं असतां

पुत्राचें मुखकमळ तुझ्या दृष्टीस पडलें कीं, शापापासून मुक्त होऊन तूं स्वर्गलोकीं पुनः परत येशील." नंतर सावित्री व **सरस्वती** ह्या दोघींजणी स्वर्गाहून भूलोकीं येत असतां हिरण्यबाहु नावाची ( जीस शोण असें ह्मणतात ) मोठी नदी त्यांचे दृष्टीस पडली. त्या नदीचे तीरावर कित्येक पक्षी मधुर शब्द करीत आहेत आणि वृक्ष व वल्ली पुष्पभारानें वांकल्या आहेत, त्यांवर भ्रमर मकरन्द प्राशन करून धुंद होऊन गुंजारव शब्द करीत फिरत आहेत, व मंद सुगंध आणि शितल असा वायु वाहत आहे. अशा प्रकारची तेथील शोभा पाहून **सरस्वतीस** तें ठिकाण स्वर्गंगेचे तीराप्रमाणें भासलें. मग त्या दोघींनीं त्या नदीचें पश्चिमतीरावर उतरून त्या ठिकाणीं पर्णकुटिका तयार केली आणि त्या स्थळीं वास करण्याचा निश्चय केला व एक शिवलिंग स्थापून त्याची पूजाअर्चा करून कालक्रमणा करूं लागल्या.

एके दिवशीं पुष्कळ स्वार, शिपाई व सेवक यां सहवर्तमान एक सुंदर तरुण पुरुष तेथील मार्गानें जात आहे व त्याचे बरोबर पांढरा वेष धारण केलेला एक वयातीत मनुष्य आहे, असें त्यांच्या दृष्टीस पडलें.

ह्या ठिकाणीं कोणी दोन सुंदर स्त्रिया राहत आहेत, असें सेवकांकडून त्या तरुण पुरुषास समजल्यावरून, ह्या कोण? हें जाणण्याकरितां तो आपल्या घोड्यावरून खालीं उतरला व आपल्या अनुयायांना बरेच अंतरावर उभें करून त्या वृद्ध मनुष्यासह तो त्या पर्णकुटिकेजवळ आला. तेव्हां त्या दोघींनीं त्यांचे सन्मानपूर्वक आगतस्वागत केलें. मग त्या तरुण पुरुषाचें अप्रतिम सौंदर्य व तेज पाहून, त्याचा वृत्तांत सांगण्याविषयीं त्या दोघींनीं त्या वृद्ध मनुष्याची प्रार्थना केली.

तेव्हां तो ह्मणाला, "हा तरुण पुरुष, महामुनि **च्यवन** याचा **शर्यातिराजाची** कन्या **सुकन्या** इजपासून झालेला, पुत्र होय. हा भृगुवंशाचा तिलक व **च्यवन**ऋषीचा जीवकींप्राण आहे. ह्याचें नांव **दधीच**. **सुकन्या** गरोदर असतां तिचे दिवस भरत आले तेव्हां

तिचे बापानें तिला आपले घरीं आणिलें. तेथें **सुकन्या** प्रसूत होऊन तिला हा पुत्र झाला. पुढें कांहीं दिवस गेल्यावर **शर्यातीनें सुकन्येस** आपले पतीचे घरीं पोहोंचतें केलें व आपले नातवास परमस्नेहानें आपलेपाशीं ठेवून घेऊन अनेक विद्यांत प्रवीण केलें. सांप्रत हा तारुण्याप्रत प्राप्त झाल्यामुळें याच्या पितरांस पुत्रसुख प्राप्त व्हावें ह्मणून यास त्यांजकडे पाठविलें आहे." इतकें सांगितल्यावर त्या वृद्ध मनुष्यानें आपल्याविषयीं थोडिशी हकीकत सांगितली. तो म्हणाला, "राजा **शर्याती** याचा मी सेवक आहे. माझें नांव **विकुक्षी**. मला राजानें **दधीचाच्या** सेवेस अर्पिलें आहे. यास **च्यवन**ऋषीचे आश्रमीं पोंहचविण्याची मला धन्याची आज्ञा आहे. आम्हीं दोघे मार्ग क्रमीत असतां ह्या स्थळीं येऊन पोहोंचलों. येथून **च्यवनाचा** आश्रम शोणनदीच्या पलीकडे जवळच आहे." नंतर **विकुक्षीनें सावित्रीस** "आपण कोण? कोठून आला? येथें येण्याचें प्रयोजन काय?" हें सांगण्याची प्रार्थना केली. परंतु **सावित्रीनें** "आमचा वृत्तांत पुढें कधीं समजण्यांत येईल. आपण कांहीं काळ येथें घालविण्याचें करावें. सहवासानें स्नेह वाढतो." असें ह्मटलें. मग **दधीच विकुक्षीस** म्हणाला, "पुढें कधीं त्या सांगण्याची कृपा करतील, ऊठ आतां पित्याच्या भेटीस जाऊं." मग ते त्यांस विचारून घोड्यावर बसून चालते झाले. त्या दिवसापासून **सरस्वती** व **दधीच** ह्या दोघांचें एकमेकावर प्रेम जडलें. **सरस्वतीस** तर कामदेवानें अगदीं वेडें करून सोडिलें. कांहीं दिवस गेल्यावर **विकुक्षी** परत जात असतां त्या ठिकाणीं आला आणि म्हणाला, "**दधीचास** आपणा दोघींचा विसर पडला नाहीं. त्याची स्वतःची अवस्था कशी काय झाली आहे, हें तुह्मास कळविण्याकरितां **मालती** नावाच्या दासीस तो तुह्माकडे लवकरच धाडणार आहे." असें सांगून तो गेला. दुसरे दिवशीं **मालती दधीचाचें** वर्तमान सांगण्याकरितां त्या ठिकाणीं आली.

मग **सावित्री शोण** नदीवर स्नान करण्याकरितां गेल्यावर तिनें **सरस्वतीस दधीचाची** अवस्था सांगितली. तेव्हां **सरस्वती** म्हणाली,

"मी सर्वस्वी आपले प्राण **दधीचास** अर्पण केले आहेत, यांत काय तें समजावें." मग तिच्या उत्कंठेप्रमाणें **मालती** लागलीच **दधीचाकडे** गेली आणि तिची अवस्था सांगून त्यास तेथें घेऊन आली. कांहीं काळानें **सरस्वतीस** पुत्र झाला तेव्हां तिनें त्यास "सर्व विद्यांचें ज्ञान तुला प्राप्त होईल असा वर दिला." पुढें कांहीं दिवस गेल्यानंतर **ब्रह्मदेवाचें** बोलावण्यावरून **सरस्वती सावित्रीसह** स्वर्गलोकास गेली. तेव्हां **दधीचास सरस्वतीचे** वियोगाचें दुःख होऊन त्यानें तपश्चर्या करण्याचा निश्चय केला. व आपले पुत्रास आपली भावजय **अक्षमाला** हिचे स्वाधिन केलें. ज्या दिवशीं **सरस्वतीस** पुत्र झाला होता, त्याच दिवशीं अक्षमालेसही पुत्र झाला होता. **सरस्वतीचे** पुत्राचें नांव **सारस्वत** ठेविलें होतें व **अक्षमालेचे** पुत्राचें नांव **वत्स** असें ठेविलें होतें. **अक्षमालेनें** दोघांचेंहि समभावानें लालनपालन केलें. **सारस्वत** ह्यानें **वत्सास** आपणास अवगत असलेल्या सर्व विद्या शिकवून त्यास **प्रीतिकूट** या गांवीं ठेवून आपण आपले पित्यासह तपश्चर्या करण्यास गेला. हाच **वत्स** पुढें एका मोठ्या विस्तृत वंशाचा आदिपुरुष झाला व याच वात्स्यायन कुलांत **बाण**कवि उत्पन्न झाला. अशी कथा **हर्षचरितांतील 'वात्स्यायनवंशवर्णनं'** नावाच्या प्रथम उच्छ्वासांत आहे.

**बाणाचा** निपणजा **कुबेर** हा यजुर्वेद व सामवेद यांत मोठा प्रवीण होता. गुप्तवंशांतील राजे त्याचा मोठा सन्मान ठेवीत असत. त्याला चार पुत्र होते. त्यांत **पाशुपत*** नांवाचा एक होता, तो विद्वान् व कुलदीपक होता. हा **बाणाचा** पणजा. याचा पुत्र **अर्थपति**, हाही मोठा विद्वान् होता यानें पुष्कळ शिष्य

* संस्कृत छापील कादंबरीवरून सर्व मराठी ग्रंथ तयार केला व तो तसाच छापला गेला. नंतर प्रस्तावना लिहितेवेळीं बाणकवीची माहिती देण्याकरितां हर्षचरित वाचीत असतां कुबेराच्या पुत्राचीं नांवें दृष्टीस पडलीं, तेव्हां मनांत शंका येऊन कादंबरी व हर्षचरित हीं ताडून पाहिलीं तों कादंबरींत याबद्दल मुळींच उल्लेख नाहीं. तेव्हां या संबंधाचें पद्य कादंबरींत अजीबात चुकून राहिलें असावें! इतक्या छापील आवृत्ति संस्कृत प्रोफेसराच्या हातून निघाल्या असून या बद्दल कांहींच उल्लेख नाहीं, हें मोठेंच आश्चर्य आहे.

तयार केले व यज्ञयागादिक कृत्यें करून मोठी कीर्ति संपादिली अर्थपतीस वेदशास्त्रपारंगत असे भृगुप्रमुख अकरा पुत्र होते, त्यांत चित्रभानु हा विद्येच्या तेजानें प्रतिसूर्यासारखा होता. त्याला बाण हा पुत्र झाला. बाणाच्या आईचें नांव राज्यदेवी असें होतें, ती बाण लहान असतांच वारली. त्याचा बापही त्याच्या वयाचे चवदावे ५.. वारला. बाणाचा गुरु भर्वू* या नांवाचा होता. शोणनदीचे पश्चिमेस प्रीतिकूट ह्या गांवीं बाणाचें राहणें असे.

बाण हा लहानपणापासूनच स्वच्छंदी होता असें त्याचे चरित्रावरून दिसतें. त्यांत त्याचे आईबाप लहानपणींच वारले होते. पुढें लागलींच त्याचे अंगीं तारुण्याचा उदय झाला. ह्या सर्व गोष्टी त्याच्या स्वच्छंदवृत्तीस उत्तेजकच झाल्या. यांमुळें तो प्रथमतः मोठमोठ्यांच्या उपहासास पात्र झाला. परंतु पुढें तो विद्वान् गुरूंच्या सहवासानें व मोठमोठ्या राजदरबारीं फिरून आल्यानें मोठमोठ्या राजांच्याही सन्मानास पात्र झाला.

## श्रीहर्षाचें दरबारीं बाणाचें गमन व सन्मान.

प्रीतिकूट या गांवापासून कांहीं अंतरांवर श्रीकंठ नांवाचा देश होता; व त्यांत स्थाण्वीश्वर+ नांवाचा देश होता. त्या ठिकाणीं, त्यावेळीं श्रीहर्ष नांवाचा राजा राज्य करीत होता,त्याचा बाणकवीस चांगला आश्रय होता. बाणकवि हा आपल्या शिष्यवर्गासह प्रवास करण्यास जात असे. तो मोठमोठ्या राजांच्याही भेटीं घेत असे. श्रीहर्ष राजाचीही त्यानें एकदां भेट घेतली होती. श्रीहर्ष राजाचा बंधु कृष्ण याचा आणि बाणकवीचा चांगला स्नेह जमला होता. एके दिवशीं दोन प्रहरीं बाणकवि भोजनोत्तर आपले घरीं बसला असतां चंद्रसेन ( बाणाचा बंधु ) येऊन म्हणाला, महाराजाधीराज हर्ष याचा बंधू कृष्णराज यानें आपणाकडे मेखलक नांवाचा एक

---

* जल्हण याच्या सूक्तिमुक्तावलींत भर्वूचीं कांहीं पद्यें आढळतात.

† स्थानेश्वर ही हर्षवर्द्धन याची राजधानी होती. असें व्हेनसँग यानें लिहिलें आहे.

जासूद पाठविला आहे व तो बाहेरच्या दारापाशीं उभा आहे. मग त्यास लौकर घेऊन येण्यास **बाणानें** सांगितलें. तेव्हां तो त्यास **बाणा**जवळ घेऊन आला. मग **बाणानें** त्यास तिकडील कुशल विचारल्यावर त्या जासूदानें **कृष्णराज** यानें दिलेलें पत्र **बाणास** दिलें. तें वाचून पाहिल्यावर तो ह्मणाला, "**कृष्णराज** ह्यानें **हर्ष**राजाच्या दरबारीं आपणास बोलाविलें आहे. परंतु पूर्वी राजानें आपला जसा मान ठेवावा तसा ठेविला नाहीं. तेव्हां कसें करावें?" मग पुष्कळ वेळ विचार केल्यानंतर बऱ्याच वेळानें राजदरबारीं जाण्याचा त्यानें निश्चय केला. दुसरे दिवशीं सकाळीं **बाणानें** स्नान-संध्या, जप, होम, दान वगैरे पुण्य कर्में केलीं व प्रयाणोचित मंगलकर्म करून तो आलेल्या जासुदाबरोबर निघाला. नंतर मार्गक्रमण करीत चालला असतां **चंडिकावनाचें** आक्रमण करून तो **मल्लकूट** या गावीं गेला. तेथें त्याचा आप्त जगत्पति यानें त्याचें चांगलें आदरातिथ्य केलें. दुसरे दिवशीं भागीरथी उतरून तो **यष्टिगृह** नांवाचे गांवीं गेला व तेथें त्यानें रात्र घालविली. नंतर तेथून निघून तो **अजिरवती** नदीच्या कांठीं **मणितार** नगरासवळ हत्ती, घोडे, रथ, पायदळ यांनीं शोभायमान असें राजाचें ठाणें होतें त्या ठिकाणीं गेला. राजास **बाण**कवि आल्याचें कळल्यावर त्यानें त्यास भेटण्याची परवानगी दिली. मग **बाण हर्ष**राजाचें वैभव पहात पहात त्याच्या छावणींत शिरला. त्या ठिकाणीं हत्ती, घोडे इत्यादिकांनीं रमणीय असें राजाचें देवेन्द्रासारखें वैभव पाहून **बाणास** फारच आनंद झाला. मग **बाणानें** जवळ जाऊन राजास आशिर्वाद दिला. त्यावेळींही **हर्षानें बाणाचें** प्रथमतः जसें आगतस्वागत करावें तसें केलें नाहीं. मग त्यानें आपला वंश, आपले पूर्वज व आपली विद्या यांविषयींची माहिती राजास सांगितली. पुढें **हर्षराजास बाणाची** योग्यता कळून आल्यावर त्यानें प्रसन्नतेचीं चिन्हें दाखविलीं व उत्तरोत्तर त्याचा मोठा सन्मान करून त्यास आपले जवळ राहून घेतलें.

कांहीं दिवस तेथें राहिल्यावर शरदृतूचे दिवसांत **बाण** स्वजनास भेटण्याकरितां परत आपले घरीं आला. तेव्हां त्यांच्या आप्तमि[illegible]ास

ग्रंथा . . .

हर्षराजानें बाणाचा मोठा सन्मान केला ह्मणून फार आनंद झाला. व त्यांनीं मोठ्या प्रेमानें बाणाचें फारच अभिनंदन केलें. पुढें बाणाच्या मुखावाटें हर्षराजाचे गुण ऐकण्यांत आल्यापासून त्याचें सर्व चरित्र ऐकावें असें बाणाच्या चुलत भावांस वाटलें. मग त्यांनीं बाणाच्या प्रेमांतला आपला धाकटा भाऊ शामल यास याबद्दल सुचविलें. तेव्हां त्यानें हर्षराजाचें सर्व चरित्र सांगण्याविषयीं आग्रह धरिला. नंतर बाणानें त्यांस हर्षाचें चरित्र सांगितलें आहे. असा हर्षचरिताच्या द्वितीय उच्छ्वासांत कथाभाग आहे.

ह्या प्रमाणें बाणकवीच्या कुळाची, स्थळाची व त्याच्या चरित्राची बरीच माहिती हर्षचरितांत सांपडते. परंतु काळाची माहिती त्याच्या कोणत्याच ग्रंथांत मिळत नाहीं. कालज्ञानाच्या संबंधानें ह्या ठिकाणींच अशी शोचनीय स्थिति आहे असें नाहीं, तर आपल्या ग्रन्थांत प्रायः सर्वत्र असाच प्रकार आढळतो. ह्यामुळें आपलें किती नुकसान झालें तें सांगतां येत नाहीं! आपल्या लोकांत पूर्वी कालनिर्देशास फारसें महत्त्व नव्हतें असें दिसतें. मग याचें कारण काय असेल तें असो!

बाणकवीच्या अस्तित्वाचा काळनिर्णय एका चिनी ग्रंथकाराच्या माहितीवरून करण्यांत आला आहे. ही एक मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे. आतां बाणकवि आणि चिनी ग्रंथकार यांचा संबंध कसा? याबद्दल येथें थोडें एतिहासिक वृत्त देणें आवश्यक आहे.

पूर्वी वैदिकधर्माचा सर्वत्र प्रसार असतां बुद्ध यानें निराळाच मतभेद काढला. तेव्हां त्या पंथाच्या लोकांचें बरेंच प्राबल्य झालें. पुढें शंकराचार्यांनीं त्या पक्षाच्या लोकांचा वाद करून पराभव केला, त्यामुळें ह्मणा, किंवा दुसऱ्या कांहीं कारणांनीं ह्मणा, त्या लोकांपैकीं कांहीं तिबेटांत, कांहीं चिनांत व कांहीं सिंहलद्वीपांत जाऊन राहिले. पुढें त्यांलोकांपैकीं कांहीं आपल्या धर्मस्थापकाचीं व पूर्वजांचीं स्थानें पाहण्याकरितां हिंदुस्थानांत येत असत. त्यांतीलच एक चिनी यात्रेकरू व्हेनसँग हा इ० स० ६२९ त हिंदुस्थानांत आला होता.

तो प्रथम काश्मीराकडून प्रवास करीत इ० स० ६३३–३४ त नालंद* येथें आला. त्या ठिकाणीं पांच वर्षे राहून तो इ० स० ६३८–३९ त दक्षिणेकडे प्रवास करण्यास गेला. दोन वर्षे प्रवास करून तो इ० स० ६४०–४१ त फिरून नालन्द येथें आला. नंतर इ० स० ६४२–४३ च्या सुमारास तो **प्रयाग** येथें गेला. आणि त्या नंतर तो सुमारें ६४९ त चीन देशास परत गेला.

व्हेन्सँगच्या हिंदुस्थानांतील प्रवासावर त्याच्या शिष्यांनीं चिनी भाषेंत दोन ग्रंथ केले आहेत व त्यांचें फ्रेंच भाषेंत स्टानिस्लासज्युलेन या फ्रेंच विद्वानानें भाषांतर केलें आहे. व अलीकडे इंग्रजी भाषेंत ही त्यांचें भाषांतर झालें आहे. व्हेन्सँग यानें पाहिलेल्या प्रदेशाची व त्यावेळीं असलेल्या इकडील राजांची जी माहिती दिली आहे ती फारच उत्कृष्ट आहे, असें युरोपियन पंडित ह्मणतात. असो, त्यांत त्यानें त्यावेळीं **हर्षवर्धन**† हा **कान्यकुब्ज** देशच्या गादीवर असून उत्तर हिंदुस्थानचा मुख्य राजा होता. त्याचा वडील भाऊ **राजवर्धन** यास शत्रूंनीं मारल्यावर **हर्षवर्धन**‡ हा त्याचे मागून गादीवर बसला. याच्या बापाचें नांव **प्रभाकरवर्धन** असें होतें इत्यादि प्रकारें सविस्तर माहिती दिली आहे. व्हेन्सँग यानें सांगितलेलीं नांवें व वृत्तांत हीं **हर्षचरितां**तील **बाण**कवीनें दिलेल्या नांवांशीं व वृत्तांशीं जमतात. यावरून **बाणास** आश्रय देणारा जो **हर्ष** तो हाच, असें सिद्ध होतें.

या सर्व गोष्टीवरून इसवी सनाच्या सातव्या शतकाच्या पहिल्या अर्धांत **बाण**कवि होता असें ह्मणण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं.

---

* हें बौद्धधर्मीलोकांचें स्थान गयेजवळ ईशान्येस बारगावापासून सात मैलावर व बुद्धगयेपासून पन्नास मैलावर आहे.

† हर्षचरितांत हर्ष असेंच नांव आहे. परंतु व्हेन्सँग यानें हर्षाच्या बापाच्या व भावाच्या नावाप्रमाणें यासही 'वर्द्धन' हें उपपद लावलें.

‡ हर्षवर्द्धन हा इ० स० ६४८–५० त वारला. त्यानें सुमारें ३०–३५ वर्षे राज्य केलें. असें जनरल कानिंग्हॅम याच्या 'एनशंट जाग्रफी ऑफ् इंडिया' यांत आहे.

दुसरें, बाणभट्टानें हर्षचरितांत आपल्या पूर्वी होऊन गेलेल्या कवींचे नामनिर्देश केले आहेत ते असे :—

वासवदत्ता ( कर्ता सुबन्धु ), भट्टारहरिचंद्र, शातवाहन, प्रवरसेन, भास, कालिदास, बृहत्कथा ( कर्ता गुणाढ्य. )

या नामावलीत **भवभूतीचें** नांव नाहीं. **भवभूति** हा वैदर्भ ( वऱ्हाड ) देशचा राहणारा होता, तथापि तो विद्वज्जनास आश्रय देणारे जे **कान्यकुब्ज** देशचे राजे त्यांपैकीं **यशोवर्म*** राजाच्या पदरीं होता व त्याचा काळनिर्णय इ. स. ६७९ तें ७२९ पर्यंत विद्वज्जनांनीं राजतरंगिणींतील वगैरे आधारानें ठरविला आहे. यावरून सातव्या शतकाच्या पूर्वार्धांत **बाण** व उत्तरार्धांत **भवभूति** असावा, असें ह्मणण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं.

---

*यशोवर्मा यास काश्मीरचा राजा ललितादित्य यानें जिंकलें. ललितादित्य हा इ० स० ६९३–७२९ पर्यंत गादीवर होता.

जल्हण याच्या सूक्तिमुक्तावलींत शेंकडों कवींच्या निवडक पद्यांचा संग्रह त्या त्या कवींच्या नांवांनीं केला आहे, त्यांत 'यशोवर्मणः' 'राजपुत्र यशोवर्मणः' ह्या नांवावर कांहीं पद्यें आहेत. तेव्हां भवभूतीला आश्रय देणारा जो यशोवर्मा तोच हा असावा. यानें केलेलें एकादें काव्यही असलें पाहिजे. मग तें आतां उपलब्ध आहे किंवा नाहीं, हें कांहीं सांगतां येत नाहीं. कारण, अनेक राज्यक्रांतीमुळें आपले पुष्कळ ग्रंथ नाहींतसे झाले व त्यामुळें जी हानि झाली ती सांगतां येत नाहीं. श्रीहर्षाच्या रत्नावलीविषयीं जसा बाणकवीचा संबंध झट्दिशीं लक्षांत येतो, त्याप्रमाणें भवभूतीचा आश्रयदाता जो कनोज देशचा राजा यशोवर्मा याच्याही नावावर एकादें काव्य असणें कांहीं असंभवनीय नाहीं. आतां कनोज देशचे राजे ज्या अर्थी विद्वानांचे शोकी होते त्या अर्थी ते स्वतःही विद्वान् असतीलच, परंतु त्यांना उत्तम कवींचें साहाय्य होतें असें ह्मणण्यास कांहीं चिंता नाहीं.

यशोवर्मा याच्या नावावर जे श्लोक सूक्तिमुक्तावलींत सांपडतात त्यांत हा ही एक आहे :—

यत्त्वन्नेत्रसमानकांति सलिले मग्नं तदिन्दीवरं
मेघैरन्तरितः प्रिये तव मुखच्छायानुकारी शशी ।
येपि त्वद्गमनानुसारिगतयस्ते राजहंसा गता
स्त्वत्साद‍ृश्यविनोदमात्रमपि मे दैवेन न क्षम्यते ॥

कुवलयानन्दांत प्रतीपालंकाराचें हें एक उदाहरण घेतलें आहे.

ह्या कवीचे उत्तम ग्रंथ **कादंबरी** व **हर्षचरित** हे होत. हे दोन्ही ही गद्यात्मक असून बरेच मोठे आहेत. **पार्वतीपरिणयन** हें नाटक ही **बाण**कवीच्या नावानें प्रसिद्ध आहे, परंतु ह्याविषयीं कित्येकांस शंका आहे. **रत्नावली** या नाटकाचा कर्ता **श्रीहर्ष** जरी ह्मटला आहे, तथापि **बाण**कवीच्या ग्रंथांतील पद्यांशीं रत्नावलींतील कांहीं पद्यें जुळतात, यावरून **बाण**कवीनें हें नाटक **श्रीहर्ष** राजास करून दिलें असावें, असें अनुमान करण्यास जागा आहे. चंडिकाशतक ह्मणून आणखीही एक काव्य **बाणा**च्या नांवानें प्रसिद्ध आहे. याविषयीं-ची अशी एक दंतकथा* प्रसिद्ध आहे कीं, **बाणाचा** मित्र **मयूर** हा एक कवि होता. त्याच्या अंगावर महारोग उत्पन्न झाला तेव्हां त्यानें **सूर्यशतक** नावाचें काव्य करून त्यांत सूर्याचें वर्णन केलें, आणि त्या योगानें त्याचा महारोग दूर झाला. तेव्हां **बाणास** वाटलें कीं, आपल्या मित्रास देवता प्रसन्न झाली तशी आपणही करावी; व याकरितां त्यानें आपले हातपाय तोडून घेतले आणि **चंडिकाशतक** ह्या नांवाचें काव्य करून **चंडिकेस** प्रसन्न केलें व त्यामुळें त्यास पुनः हातपाय आले.

प्रस्तावनेंत कादंबरींतील कथा संक्षेपानें द्यावी, असा विचार केला होता. परंतु किती जरी संक्षेपानें ती दिली तरी बरीच लांबेल असें वाटून ती येथें दिली नाहीं.

**बाण**भट्टानें कादंबरींत मधुरवर्णरचना, श्लेषादिअलंकार, हुबेहूब विचित्र वर्णनें, खुबीदार संभाषणें व मनास थक्क करणारें संविधानक; इत्यादि प्रकार इतके सुरेख घातले आहेत कीं, ते वाचतांना रसिक विद्वज्जन आनंदरसांत गर्क होऊन जातात. आर्यलोकांच्या संस्कृत भाषेची खुबी, कल्पकपणाचे मासले, पदलालित्य, वर्णनाचे भिन्न भिन्न प्रकार व श्लेषादिअलंकार वगैरे गोष्टी ज्या कोणास पहावयाच्या असतील, त्यांनीं **बाण**भट्टाची कृति पहावी, ह्मणजे त्यांची खातरी

*प्रत्येक महाकवीविषयीं अशा प्रकारची कांहींना कांहीं दंतकथा प्रसिद्ध आहे. यावरून त्यांच्यांत कांहीं लोकविलक्षण गुण असल्याचें व्यक्त होतें.

झाल्यावांचून राहणार नाहीं. ह्या ग्रंथांत शृंगार करुण व अद्भुत हे रस जिकडे तिकडे अगदीं ओतप्रोत भरले आहेत.

बाणकवीच्या हातून कादंबरीचा सुमारें अर्धा ग्रंथ पुरा झाला तों मृत्यूनें त्यावर झडप घातली हें फारच वाईट झालें. सर्व ग्रंथ त्यानें मनांत आणलेल्या विचाराप्रमाणें त्याचे हातूनच शेवटास गेला असता तर किती मौज झाली असती ? असो, परंतु ही मोठ्या आनंदाची गोष्ट मानली पाहिजे कीं, त्याचा पुत्र भूषणभट्ट यानें त्याप्रमाणेंच उत्तरभाग करून आपल्या पित्याच्या कृतीस शोभण्यासारखी भर घालून बरीच पूर्णता आणिली. अशी देखील दुसऱ्याचे हातून झाली नसती ! बाणभट्टाची मोठमोठ्या संस्कृतकवींनीं फारच तारीफ केली आहे. खालीं थोडीं पद्यें दिलीं आहेत त्यावरून हें लक्षांत येईल.

जाता शिखंडिनी प्राक् यथा शिखंडी तथावगच्छामि ।
प्रागल्भ्यमधिकमाप्तुं वाणी बाणो बभूवेति ॥

गोवर्द्धनाचार्य.

रुचिरस्वरवर्णपदा रसभाववती जगन्मनो हरति ।
तत्किं तरुणी ? नहि नहि वाणी बाणस्य मधुरशीलस्य ॥

धर्मदास.

शब्दार्थयोः समो गुंफः पांचाली रीति रुच्यते ।
शीलाभट्टारिकावाचि बाणोक्तिषु च सा यदि ॥

सु. शार्ङ्गधर.

श्लेषे केचन शब्दगुम्फविषये केचिद्रसे चापरे
लंकारे कतिचित्सदर्थविषये चान्ये कथावर्णके ।
आसर्वत्र गभीरधीरकविताविन्ध्याटवीचातुरी-
संचारी कविकुम्भिकुम्भभिदुरो बाणस्तु पंचाननः

श्रीचन्द्रदेव.

एका कवीनें तर ‘ बाणोच्छिष्टं जगत्सर्वं ’ असें ह्मटलें आहे.

अशा सहृदय विद्वान् कवींनीं जर बाणभट्टाची तारीफ केली आहे तर परकीयांच्या ह्मणण्याकडे आह्मांस मुळींच लक्ष द्यावयास नको. काठिण्याच्या वगैरे संबंधानें त्यांनीं कांहीं ही ह्मटलें तरी त्यापासून त्यांचे अज्ञान मात्र व्यक्त होणार आहे. बाणभट्टाचे काव्यांत जागजागीं श्लेष व लांब लांब समास जरी आहेत तरी सर्वत्र प्रसाद गुण असल्यामुळें नीरसता वाटत नाहीं.

**कादंबरीरसभरेण समग्र एव मत्तो न किंचिदपि चेतयते जनोयं।** असें भूषणभट्टानें उत्तरार्धांत ह्मटलें आहे तें यथार्थ आहे.

बाणभट्टानें या ग्रंथांतील मुख्य नायिका जी कादंबरी हिचेंच नांव या ग्रंथास दिलें आहे.

सुभाषितशार्ङ्गधरपद्धतींत व जल्हणदेव याच्या सूक्तिमुक्तावलींत बाणभट्टाच्या २०—२९ पद्यांचे उतारे घेतले आहेत. त्यापैकीं ६—७ पद्यें हर्षचरितांतलीं आहेत. दोन तीन चण्डिका शतकांतलीं आहेत व इतर त्याच्या कोणत्या पुस्तकांतलीं आहेत हें समजत नाहीं. यावरून आणखी त्याचीं एक दोन काव्यें तरी असावीं असें वाटतें. बाणभट्ट हा गद्यरचनेंत जसा प्रवीण होता तसाच तो पद्य रचनेंतही होता, असें त्याच्या पद्यांवरून दिसून येतें. बाणभट्टाच्या पद्यांत देखील शब्दार्थालंकार चांगले साधले आहेत. पुढें थोडीं पद्यें दिलीं आहेत त्यावरून याची यथार्थता कळून येईल.

विद्राणे रुद्रवृन्दे सवितरि तरले वज्रिणि ध्वस्तवज्रे
जाताशंके शशांके विरमति मरुति त्यक्तवैरे कुबेरे ।
वैकुण्ठे कुण्ठितास्त्रे महिषमतिरुषं पौरुषोपघ्ननिघ्नं
निर्विघ्नं निघ्नती वः शमयतु दुरितं भूरिभावा भवानी ॥

बाणभट्ट.

ऋतूंचीं स्वाभाविक वर्णनें बाणभट्टाच्या पद्यांतून आढळतात.

सर्वाशारुधि दग्धवीरुधि सदा सारङ्गबद्धक्रुधि
क्षामक्ष्मारुहि मन्दमुन्मधुलिहि स्वच्छन्दकुन्दद्रुहि ।

शुष्यत्स्रोतसि तप्तभूरिरजसि ज्वालायमानार्णसि
ज्येष्ठे मासि खरार्कतेजसि कथं पान्थ व्रजन् जीवसि ॥
बाणभट्ट.

नृत्यद्बर्हिणि दर्दुरारवमुषि प्रक्षीणपान्थायुषि
श्रोतद्विमुषि चन्द्ररुङ्मुषि सखे हंसद्विषि मावृषि ।
मा मुञ्चोच्चकुचाग्रसंततपतद्बाष्पाकुलां बालिकां
काले कालकरालनीलजलदव्याप्ताभास्वत्त्विषि ॥
बाणभट्ट.

अन्योन्याहतिदन्तनादमुखरं मन्दं मुखं कुर्वता
नेत्रे साश्रुकणे निमील्य पुलकव्यासङ्गि कण्डूयता ।
हा हा हेति सुनिष्ठुरं विवदता बाहू प्रसार्य क्षणं
पुण्याग्निः पथिकेन पीयतइव ज्वालाहतश्मश्रुणा ॥
बाणभट्ट.

साहित्यशास्त्रकर्ता मम्मटभट्ट यानें देखील काव्यप्रकाशांत स्वभावोक्ति अलंकाराचें बाणभट्टाच्या ग्रंथांतलेंच उदाहरण घेतलें आहे. तें हें:—

* पश्चादङ्घ्री प्रसार्य त्रिकनतिविततं द्राघयित्वाङ्गमुच्चै
रासज्याभुग्नकण्ठो मुखमुरसि सटां धूलिधूम्रां विधूय ।
घासग्रासाभिलाषादनवरतचलत्प्रोथतुण्डस्तुरङ्गो
मन्दं शब्दायमानो विलिखति शयनादुत्थितः क्ष्मां खुरेण ॥

अर्थान्तरन्यासालंकाराचें एक उदाहरण कुवलयानन्दांत घेतलें आहे. तें हें:—

× विश्रब्धघातदोषः स्ववधाय खलस्य वीरकोपकरः ।
नवतरुभङ्गध्वनिरिव हरिनिद्रातस्करः करिणः ।

आणखी त्याचीं दुसरीं पद्येंही खुबीदार आहेत.

---

* हर्षचरिताच्या तृतीय उच्छ्वासांत हें पद्य आहे.
× हर्षचरितांतील षष्ठोच्छ्वासांत हा श्लोक आहे.

* हरकण्ठग्रहानन्दमीलिताक्षीं नमाम्युमां ।
कालकूटविषस्पर्शजातमूर्च्छागमामिव ॥
मृत्युः शरीरगोप्तारं वसुरक्षं वसुंधरा ।
दुश्चारिणी च हसति स्वपतिं पुत्रवत्सलं ॥ बाणभट्ट.
* धृतधनुषि शौर्यशालिनि शैला न नमन्ति यत्तदाश्चर्यं ।
रिपुसंज्ञकेषु गणना कैव वराकेषु काकेषु ॥
* नियतिर्विधाय पुंसां प्रथमं सुखमुपरि दारुणं दुःखं ।
कृतालोकं तरला तडिदिव वज्रं निपातयति ॥
दुःखानि संदिशन्त्यास्तस्याः कण्ठं मुहुर्मुहुर्बाष्पः ।
स्वल्पावशेषजीवितनिर्वाणभियेव निरुणद्धि ॥ बाणभट्ट.
सन्मार्गे तावदास्ते प्रभवति पुरुषस्तावदेवेन्द्रियाणां
लज्जां तावद्विधत्ते विनयमपि समालम्बते तावदेव ।
भ्रूचापाकृष्टमुक्ताः श्रवणपथजुषो नीलपक्ष्माण एते
यावल्लीलावतीनां हृदि न धृतिमुषो दृष्टिबाणाः पतन्ति ॥
बाणभट्ट.

समस्यापूरणाचें एक उदाहरण बाणभट्टाच्या नावावर आहे तें हें:—
दामोदरकराघातविह्वलीकृतचेतसा
दृष्टं चाणूरमल्लेन शतचन्द्रं नभस्तलम् ॥ बाणभट्ट.

बाणभट्टाच्या पद्यांचे मासले दुर्लभ असल्यामुळें थोडे येथें दिले आहेत. कादम्बरी छापून सर्वत्र प्रसिद्ध असल्यामुळें गद्यांचे मासले सर्वांना माहीत आहेतच, ह्मणून ते येथें दिले नाहींत. वरील पद्यांतरून बाणभट्टाची पद्यरचनाही उत्तम कवितेंत गणण्यासारखी आहे असें कळून येईल व त्याचीं काव्येंही आणखी असावीं, असेंही लक्षांत येईल.

पुणें १।६।९१. पां. गो. शा. पा.

* हीं पद्यें हर्षचरिततलीं आहेत.

# कादंबरीसार.

## पूर्वार्ध.

मालवदेशांत वेत्रवती नदीनें वेष्टिलेली विदिशा नांवाची एक राजधानी होती. त्या ठिकाणीं शूद्रक नांवाचा राजा राज्य करीत होता. त्याची सत्ता सर्व पृथ्वीवर असल्यामुळें सर्व राजे त्याची आज्ञा शिरसामान्य करीत असत. तो भूलोकचा इंद्रच आहे असें सर्व लोकांस वाटत असे. त्यानें आपल्या प्रतापाच्या योगानें व प्रेमाच्या योगानें सर्व मांडलिक राजे आपल्या अगदीं हातांत ठेविले होते. सार्वभौम राजाच्या अंगीं जीं लक्षणें असावीं, तीं सर्व त्याचे ठिकाणीं होतीं. विष्णूप्रमाणें त्याच्याही हातीं चक्र होतें. शंकराप्रमाणें त्यानेंही मदनास जिंकिलें होतें. ब्रह्मदेवाप्रमाणें त्यानेंही राजहंसास[1] पादाक्रांत केलें होतें. समुद्राप्रमाणें त्यानेंही लक्ष्मीस वाढविलें होतें. सूर्याप्रमाणें त्याचाही दररोज उदय होत असे. दिग्गजाप्रमाणें त्याचाही कर[2] दानोदकानें नेहमीं भिजलेला असे. गरुडाप्रमाणें तोही विनतानंद[3] करणारा होता. त्या राजाचीं विलक्षण कर्में पाहून सर्वांस मोठें आश्चर्य वाटत असे. तो अनेक प्रकारच्या यज्ञयागादि क्रिया करीत असे. अनेक शास्त्रें व कला यांमध्यें तो मोठा प्रवीण असे. तो सद्गुणांचें राहण्याचें ठिकाणच, काव्यरूप अमृतरसाचा जणूं उगमच, मित्रमंडलाचा उदय करणारा, शत्रुमंडळास केवळ धूमकेतूच, रसिकजनांस आधारभूत, धनुर्धरांमध्यें श्रेष्ठ, साहसकर्में करणारांत पुढारी, चतुर पुरुषांत अग्रगण्य, दुष्ट शत्रूंचा समूळ नाश करण्यांत पटाईत, असा तो राजा होता.

---

१ पक्षिविशेष, थोर राजे. २ हात, सोंड. ३ विनता=गरुडमाता, तीस आनंद देणारा, विनत=नम्र त्यांस आनंद करणारा.

त्याचें नांव ऐकूनच शत्रूंचीं उरें फाटून जात, यामुळें एक्या शत्रूचें उर विदारण्याकरितां नरसिंहावताराचा खटाटोप करणाऱ्या विष्णूचें त्याला मोठें हसूं येई! त्यानें एक्या विक्रमानेंच[1] त्रैलोक्य व्यापून टाकिलें होतें, त्यामुळें तीन विक्रम करणाऱ्या त्रिविक्रमाचें[2] त्याला मोठें नवल वाटे! दुष्ट राजांच्या सहवासानें मलीन झालेली राज्यलक्ष्मी त्याच्या निर्मळशस्त्रांच्या धारातीर्थांत स्नान करून शुद्ध होऊन त्याजवळ चिरकाल येऊन राहिली होती! खड्गरूप हस्ताच्या संज्ञेनें बोलावतांच शत्रूंची राज्यलक्ष्मी त्याच्याजवळ धांवून येत असे! त्याचा प्रतापाग्नि इतका प्रखर होता, कीं दुष्ट शत्रूंस जाळून टाकून त्यांच्या विरहिणीस्त्रियांच्या हृदयांत असणाऱ्या त्यांच्या पतींचें देखील भस्म करण्यास तो तेथें प्रदीप्त राहत असे!

त्याच्या राज्यांत, चित्रें रंगविण्याच्या कामांत मात्र वर्णसंकर,[3] कवितेमध्यें मात्र बंध,[4] शास्त्राचीच काय ती चिंता,[5] छत्रास मात्र सुवर्णाचा दंड, धनुष्याचा मात्र गुणच्छेद,[6] व चंद्रास मात्र कलंक असे; सोंगट्या, बुदबळें यांच्या पटांतीलच मात्र घरें रिकामीं दिसत; स्त्रियांच्या कुरळ्या केशास मात्र वक्रता असे; त्याच्या पादभूषणास मात्र वाचालपणा असे; विवाहकालींच काय तें करग्रहण[7] होत असे; होमाच्या धुरानें मात्र अश्रुपात होत असे; घोड्यांनाच काय ते फटके बसत; मदनधनुष्याचे मात्र टणत्कार होत असत; शत्रूंचा अभाव झाल्यामुळें त्यांच्या धनुष्यांचा ठणत्कार होत नसे!

त्या राजाची **विदिशा** नांवाची राजधानी होती. ती इतकी विस्तीर्ण होती, कीं सर्व त्रैलोक्य तिजपासूनच उत्पन्न झालें आहे काय असें वाटत असे! त्या राजधानीला **वेत्रवती** नांवाची नदी होती. मालव देशांतील सुंदर स्त्रिया **वेत्रवती** नदींत स्नानें करण्याकरितां जात असत व त्या, त्या ठिकाणीं डुबत असल्यामुळें त्यांच्या स्तनांच्या ताडनानें त्या नदींत तरंगावर तरंग चालत असत! राजाचे

---

1 पराक्रम, पाऊल टाकणें. २ विष्णु. ३ जाति, रंग. ४ बांधणें, चित्रबंधादि. ५ विचार. ६ दोरीचा छेद. ७ हात धरणें, करभार घेणें.

रंगविलेले हत्ती त्या नदींत पोहण्याकरितां जात असत, व त्यांच्या अंगावरचे रंग धुतले जाऊन नदींत पसरत, त्यांमुळें संध्याकालाप्रमाणें नदीची शोभा दिसत असे. नदीच्या तीरावर राजहंस पक्ष्यांचे कळप फिरत असल्यामुळें त्यांचे शब्द त्या ठिकाणीं घुमत असत. राजानें सर्व पृथ्वी जिंकून वश केली असल्यामुळें त्यास राज्यांतील बिलकूल काळजी उरली नव्हती. परद्वीपांहून देखील राजे येऊन त्याच्या सेवेस तत्पर राहत.

त्या राजाचे प्रधान बृहस्पतीहून देखील बुद्धिमान्, पिढ्यानुपिढ्या नौकरी करणारे, नीतिशास्त्र जाणणारे, लोभास वश न होणारे, मायाळू व प्रौढ असे होते. ज्या राजपुत्रांच्या सहवासानें तो कालक्रमणा करीत असे, ते वयानें व विद्येनें त्याच्या बरोबरीचे, मोठ्या कुळांत उत्पन्न झालेले, सर्व कलाकौशल्यांत प्रवीण, प्रौढपणानें वागणारे, वेळ पाहून वर्तन करणारे, खऱ्या प्रेमानें वागणूक ठेवणारे, करमणूक करणारे, आकारावरून मनोगत जाणणारे, काव्य, नाटकें, चित्रकला, शस्त्रविद्या इत्यादिकांत कुशल, शरिरानें बळकट व सिंहाप्रमाणें पराक्रमी असे असूनही नम्रपणानें वागणारे असे होते.

तो राजा तरुण व रूपसंपन्न होता, परंतु त्याला संतति नव्हती. राजाला संतति केव्हां होते ह्मणून प्रधानादिकांचें लक्ष तिकडे अगदीं लागून राहिलें होतें. राजाचें लक्ष शत्रूंचा पराभव करण्याकडे व शरीरसंपत्ति चांगली राहण्याकडे होतें, यामुळें आपलें सौंदर्य व विलास यांनीं रतीचा उपहास करणाऱ्या, नम्रपणानें वागणाऱ्या, मोठ्या कुळांत उत्पन्न झालेल्या, व सौंदर्यानें मोहित करणाऱ्या अशा जरी त्याच्या तरुण स्त्रिया होत्या, तरी त्यांजवरच तो आसक्त रहात नसे. आपले प्रियमित्र राजपुत्र यांजबराबर कधीं गायनांत, कधीं वाद्यें वाजविण्यांत, कधीं चित्रें काढण्यांत, कधीं कविजन जमवून त्यांजबरोबर कविता करण्यांत, कधीं शास्त्रीय विषयांच्या विवेचनांत, कधीं इतिहास, पुराणें व सुरस ग्रंथ यांच्या श्रवणांत, कधीं अरण्यांत जाऊन मृगया करण्यांत, कधीं आपल्या घरीं आलेल्या अतिथींचा सत्कार

करण्यांत, आणि कधीं मित्रमंडळी बरोबर विनोद करण्यांत, तो आपला वेळ आनंदानें घालवीत असे.

एके दिवशीं कमलास प्रफुल्लित करीत व आपल्या मोंवतालचा आरक्तवर्ण दूर करीत भगवान् सूर्य उदय पावून आकाशावर चढूं लागला आहे. अशा वेळीं शूद्रक राजा आपल्या सभामंडपांत येऊन बसला. तों इतक्यांत एक द्वारपालिका राजाजवळ आली. तिच्या डाव्या हातांत खड्ग होता; त्यामुळें सर्पयुक्त चंदनलता जशी दिसते, तशी ती दिसत होती. तिच्या दुसऱ्या हातांत काठी होती. तिनें आपल्या अंगास चंदनाची उटी लाविली होती व शुभ्र वस्त्र धारण केलें होतें. त्या ठिकाणीं बसलेल्या राजांच्या मुकुटा वरील रत्नांत तिचीं प्रतिबिंबें पडल्यामुळें, त्यांनीं ही मूर्तिमंत राजाज्ञाच मस्तकावर धारण केली आहे काय, असें दिसत होतें! मग ती दासी जमिनी-वर गुडघे टेंकून व हात जोडून म्हणाली, "स्वर्ग लोकाहून परतलेली लक्ष्मीच काय, अशी एक चांडालकन्या बरोबर राघूचा पिंजरा घेऊन आली आहे व बाहेर उभी आहे. तिची अशी विनंती आहे, कीं महाराज समुद्राप्रमाणें सर्व रत्नांचें पात्र आहेत, या करितां आश्चर्य उत्पन्न करणारें हें पक्षिरत्नही त्यांच्या संग्रहीं असावें, म्हणून ह्यास घेऊन मी येथें आलें आहे; आणि महाराजाचें दर्शनसुख घ्यावें, अशी माझी फार उत्कंठा आहे." इतकें बोलून ती उगीच राहिली. याप्रमाणें तिचें भाषण ऐकून शूद्रक राजास मोठें आश्चर्य वाटलें. मग सर्व राजांच्या तोंडाकडे पहात "ती चांडाळकन्या आंत आली म्हणून काय होतें!" असें बोलून त्यानें तिला घेऊन यावें, असें दासीस सांगितलें. अशी आज्ञा होतांच द्वारपालिकेनें जाऊन त्या चांडाळकन्येस आणिलें. आंत आल्यावर तिनें राजाकडे पाहिलें, तों सभेच्या मध्यभागीं राजा बसला आहे, व सभोंवतीं पुष्कळ राजे बसले आहेत, व यामुळें कुलपर्वतांच्या मध्यभागीं सुव-र्णाचा मेरु जसा शोभतो, त्याप्रमाणें तो सुशोभित दिसत होता! राजाचें शरीर वस्त्रालंकारांनीं फारच तेजस्वी दिसत होतें. अलं-कारांवरील नवरत्नांच्या अनेक रंगाच्या प्रभा एकमेकांत मिसळ

त्यामुळें त्या ठिकाणीं जिकडे तिकडे इंद्रधनुष्येंच पडलीं आहेत काय असें भासत होतें! त्या मंडपास शुभ्र छत लावलेलें होतें व त्यास मोत्यांच्या झालरी लावल्या होत्या. तेथील खांब रत्नखचित होते व त्यांवर सोन्याच्या साखळ्या लोंबत होत्या. राजाचें सिंहासन चंद्रकांतमण्याचें होतें व त्यावर तो बसला होता. त्याच्या मस्तकावर सुवर्णदंडाच्या चवऱ्या ढळत होत्या. स्फटिकाच्या वाटोळ्या चौरंगावर राजानें आपले पाय ठेविले होते, त्यामुळें राजाच्या मुखशोभेनें पराभूत झाल्यामुळें हा मूर्तिमंत चंद्र येऊन त्याची पादसेवाच करीत आहे काय, असें भासत होतें! त्या सभामंडपाची फरसबंदी इंद्रनीळमण्याची केलेली होती. सिंहासनास लाल माणकें लावलेलीं होतीं, त्यांचें किरण मंडपावर झळकत होतें. राजानें आपल्या अंगावर फेंसाप्रमाणें पांढरीं शुभ्र पातळ वस्त्रें धारण केलीं होतीं. वस्त्रांच्या कांठावर हंसाचीं चित्रें खुलत होतीं व त्यांस असणाऱ्या चवऱ्या सारख्या बारीक दशा सुशोभित दिसत होत्या. राजाच्या अंगास शुभ्र चंदनाची उटी लावलेली असून मध्यें मध्यें केशराचे ठिपके खुलत होते, त्यामुळें शुभ्र कैलासपर्वतावर सकाळच्या कोंवळ्या किरणांचे छट्टे पडले ह्मणजे जशी शोभा दिसते तशी शोभा दिसत होती! त्याच्या गळ्यांत पाणीदार बोरा एवढ्याल्या मोत्यांची कंठी चमकत होती, तेणेंकरून नक्षत्रमंडळानें वेष्टित चंद्रच कीं काय असें त्याचें मुख तेजस्वी दिसत होतें! राजाच्या सरळ भुजदंडांत इंद्रनीळमण्याचीं बाहुभूषणें शोभत होतीं, तेणेंकरून चंदनसुगंधाच्या लोभानें हे भुजंग येऊन वेटोळीं घालून बसले आहेत काय, असें दिसत होतें! त्याची नासिका सरळ होती व त्याचे डोळे प्रफुल्लित कमलाप्रमाणें तेजस्वी व सुशोभित दिसत होते. त्याचें कपाळ गौरवर्ण असून अष्टमीच्या चंद्राप्रमाणें वांकदार दिसत होतें. त्याच्या भुवया कमानदार होत्या व त्याच्या मुकुटावर सुवासिक शुभ्र फुलांचा तुरा सुशोभित दिसत होता. राजाचें प्रतिबिंब तेथील फरसबंदींत पडल्यामुळें पृथ्वी मोठ्या प्रेमानें आपल्या पतीला हृदयांत सांठवीतच आहे काय असें दिसत

होतें! त्याच्या अंगावर विलक्षण राजतेज दिसत होतें. त्याच्या सभोंवती पुष्कळ सेवक उभे होते, तरी तो अद्वितीय दिसत होता! त्याजवळ हत्ती, घोडे वगैरे शेंकडों साधनें होतीं तरी खड्ग हेंच काय तें त्यानें साधन होतें! तो सिंहासनावरच बसला होता तरी सर्व पृथ्वी त्यानें व्याप्त केली होती! शत्रुरूप इंधनास नेहमीं जाळीत असल्यामुळें त्याचा प्रतापाग्नि प्रज्वलित दिसत होता. त्याचे नेत्र विस्तीर्ण होते, तरी तो सूक्ष्मदर्शी होता. सतत दानधर्म चालू असल्यामुळें तो जसा काय धर्ममूर्तिच दिसत होता; आणि सर्व गुणांचा हा निवासच आहे काय असा तो वाटत होता. याप्रमाणें राजाला पाहिल्यावर त्या चांडाळकन्येनें सर्वांचें लक्ष आपणाकडे लागावें ह्मणून, रत्नजडित कंकणांनीं शोभायमान अशा आपल्या लाल कमलासारख्या हातानें शेवटास पिंजलेली अशी वेळवाची काठी त्या सभामंडपाच्या फरसबंदीवर आपटली. तेव्हां धाडकन् पडलेल्या ताडवृक्षाच्या शब्दानें हत्तींचा कळप जसा त्याकडे पाहतो, त्याप्रमाणें सर्व राजे शूद्रक राजाच्या मुखाकडे पाहत होते, ते एकदम तोंड फिरवून तिजकडे पाहूं लागले. त्याच वेळेस 'महाराज, इकडे पहावें,' अशी द्वारपालिका विनंती करीत आहे तों राजाची दृष्टि त्या चांडाळकन्येकडे गेली. तेव्हां ह्मातारपणामुळें ज्याचे केंस पांढरे दिसत आहेत, व ज्याचे डोळे लाल दिसत आहेत, आणि ज्याचें तारुण्य गेलें असतांही शरीर बळकट व पीळदार दिसत आहे, असा एक वृद्ध पुरुष तिच्या पुढें पहिल्यानें दृष्टीस पडला. तो जातीचा मांग होता तरी फारसा क्रूर दिसत नव्हता. त्याचा पोषाख शुभ्र व साधा होता. त्या चांडाळ कन्येच्या पाठीमागें एक मुलगा होता. त्याच्या कानांवर झुलपें होतीं व तीं वाऱ्यानें हालत होतीं. त्याच्या हातांत सोन्याच्या तारांचा पिंजरा होता व त्यांत हिरवागार एक रावू होता. त्याच्या हिरव्या कांतीनें तो पिंजरा जसा काय पाचूचाच घडला आहे असें दिसलें! समुद्रमंथनकालीं विष्णूनें अमृतहरण करण्याकरितां स्त्रीरूप धारण केलेली ही मोहिनीच आहे काय, किंवा इंद्रनीलमण्याची ही चालती बोलती

पुतळीच आहे काय, इतकी ती चांडाळकन्या तेजस्वी दिसत होती! तिनें पायाच्या घोट्यापर्यंत निळा झगा घातला होता व त्यावर तांबड्या वस्त्राचा पदर घेतला होता, त्यामुळें नीलकमलांनीं आच्छादिलेली पुष्करिणी कोंवळें ऊन्ह पडलें ह्मणजे जशी शोभते, तशी ती दिसत होती! भूषणांची प्रभा तिच्या गालांवर झळकत असल्यामुळें चंद्रबिंबानें रात्र जशी शोभते, तशी ती सुशोभित दिसत होती. तिच्या कपाळावर तिलक लाविलेला होता, तो तृतीयनेत्राप्रमाणें दिसत होता; त्यामुळें शंकराचें अनुकरण करण्याकरितां भिल्लिणीचा वेष धारण करणारी ही पार्वतीच आली आहे काय, किंवा विष्णूच्या वक्षस्थलावर नेहमीं राहिल्यामुळें त्याच्या कांतीनें नीलवर्ण झालेली अशी लक्ष्मीच आली आहे काय, किंवा अतिशय रागावलेल्या शंकराच्या तृतीयनेत्रानें दग्ध झालेल्या मदनाच्या धुरानें धुरकटलेली ही रतिच आली आहे काय, किंवा बलरामाच्या रागास भिऊन पळत आलेली ही यमुनाच आहे कीं काय, अशी ती दिसत होती! तिचे पाय अळित्याचा रंग लाविल्यामुळें लाल दिसत होते, त्यामुळें पायांनीं मर्दन केलेल्या महिषासुराच्या रक्तानें जिचे पाय भरलेले आहेत अशीही महिषासुरमर्दिनीच आली काय, अशी ती भासत होती! तिच्या लाल बोटांच्या प्रभांनीं नखें आरक्त वर्ण दिसत होतीं, त्यामुळें मणिमय भूमि पायांस रुतूं लागल्यामुळें तांबडे पल्लव पायांखालीं घेऊनच ही चालत आहे काय अशी दिसत होती! तिच्या भूषणांवरील माणकांची आरक्त कांति सर्वांगावर फांकल्यामुळें अशी सुंदरी भलत्याच जातींत घातल्यामुळें ब्रह्मदेवाची निंदा करीत अग्नि आपल्या प्रभेनें तीस शुद्धच करीत आहे काय, असें भासत होतें! तिच्या अंगावर तेजस्वी मोठाल्या मौक्तिकांचा रमणीय हार दिसत होता, त्यामुळें ही यमुना समजून गंगेचा प्रवाह तिला भेटण्या करितांच आला आहे काय, असें दिसत होतें! तिचे नेत्र प्रफुल्लित कमलाप्रमाणें विशाल व सुशोभित दिसत होते. तिचे केंस वर्षाऋतूंतील मेघाप्रमाणें काळेभोर होते. तिनें आपल्या केसांत चंदनाचा कोमल पल्लव

सांवळा होता. नक्षत्रमालेप्रमाणें ती श्रवणभूषणा[1] होती. वसंतलक्ष्मीप्रमाणें ती विजाती[2] होती. तिनें आपल्या हातांत एक सुंदर कमल धारण केलें होतें. तिच्या शरिरांत नुकताच तारुण्याचा विकास झाला असल्यामुळें तिचें रूप फारच अलौकिक व मनोहर दिसत होतें.

असें तिचें रूप पाहून राजा आश्चर्यानें चकित झाला आणि आपल्या मनांत ह्मणाला, "काय हो ब्रह्मदेवाचा वेडेपणा हा! त्यानें पहा हें कसें भलत्याच ठिकाणीं सौंदर्य उत्पन्न केलें! आपल्या स्वरूपानें सर्व स्त्रियांचा उपहास करणारी अशी ही स्त्री त्यानें निर्माण केली आहे, तर स्पर्श सुखास अयोग्य अशा हीनकुलांत हिला कशा करितां उत्पन्न केलें असेल कोण जाणें! ब्रह्मदेवानें केवळ मनानेंच हिला घडली असावी. असें नसतें तर ही इतकी सुरेख व सुकुमार कोठून होती! जाति आणि रूप यांचा अनुरूप संयोग न करणाऱ्या ब्रह्मदेवाला धिक्कार असो! हिची जाती व सुंदर आकृति पाहिली ह्मणजे मनास फारच वाईट वाटतें!" याप्रमाणें राजाच्या मनांत विचार चालू आहेत, तों त्या चांडाळकन्येनें वांकून प्रौढपणानें राजास प्रणाम केला आणि ती खालीं बसली. इतक्यांत त्या वृद्ध मनुष्यानें राघूचा पिंजरा त्या मुलापासून घेतला व राजापुढें करून ह्मणाला, "महाराज, हा पोपट सर्व पृथ्वींतलें एक रत्नच आहे. याचें नांव वैशंपायन. ह्या पृथ्वीतलावर आपण सर्व रत्नांचे उपभोक्ते आहां, ह्मणून आमच्या धन्याची ही कन्या आपणास हें पक्षिरत्न अर्पण करावें ह्मणून आपल्या पायाजवळ आली आहे. हा रावा अनेक शास्त्रें, राजनीति, पुराणें, इतिहास, काव्यें, नाटकें, सुभाषित, नृत्य, गीत, वाद्यकला, चित्रकला, द्यूतक्रीडा, यांस जाणणारा; रुसलेल्या स्त्रियांची समजावणी करणारा; मनुष्यांचीं व जनावरांचीं लक्षणें जाणणारा; आणि मधुर भाषणांनीं

---

१ श्रवण-नक्षत्र-भूषित; श्रवण ह्म० कर्णाचे ठायीं आहेत भूषणें जिच्या अशी. २ जातिपुष्परहित; हीनजातीची.

आनंद देणारा असा आहे. या करितां याचा महाराजांनीं स्वीकार करावा." असें बोलून त्या वृद्धपुरुषानें पिंजरा पुढें ठेविला आणि तो मागें सरला.

तो पुरुष मागें झाल्यावर त्या पिंजऱ्यांतील राव्यानें राजाकडे तोंड करून व आपला उजवा पाय वर उचलून स्पष्ट व मधुर वाणीनें जयजयकार केला, आणि राजास अनुलक्षून ही पुढील आर्या ह्मटली:—

**त्वद्रिपु-रमणीस्तनयुग, अश्रूंनीं स्नात होउनी राया ॥**
**राहि विमुक्ताहाराचि, शोकाग्नि समीप कीं तप कराया ॥१॥**

या प्रमाणें त्या शुकाचें श्लेषयुक्त भाषण ऐकून राजास मोठें आश्चर्य वाटलें, नंतर बृहस्पतीप्रमाणें सकळ नीतिशास्त्र जाणणारा वयोवृद्ध व जातीचा ब्राह्मण असा आपला **कुमारपालित** नांवाचा मुख्य प्रधान आपल्या जवळ आसनावर बसला होता त्यास तो ह्मणाला, "कसें ह्या राव्याचें स्पष्ट व मधुर बोलणें आहे तें तुह्मीं ऐकलें ना ! मला मोठें नवल वाटतें कीं, हा पक्षी असून ह्याला अनुस्वार, विसर्ग, ऱ्हस्व, दीर्घ वगैरे सर्व उच्चार कसे स्पष्ट करितां येतात ! मला उद्देशून यानें आर्या ह्मटली, ती वरून शिकलेल्या मनुष्याप्रमाणें याच्या बुद्धीची प्रवृत्ति दिसते बहुतकरून पशु आणि पक्षी हे आहार, निद्रा, भय इत्यादि कर्मे मात्र जाणतात, परंतु याची कल्पनाशक्ति व ज्ञान हीं पाहून मला मोठें आश्चर्य वाटतें." असें राजाचें भाषण ऐकून, किंचित् हास्यमुद्रा करून प्रधान **कुमारपालित** राजास ह्मणाला, "यांत काय आश्चर्य आहे ! राघू, मैना, वगैरे कांहीं पक्षी जसें ऐकतात तसें बोलतात, हें सर्वत्र प्रसिद्धच आहे. त्यांत पूर्व जन्माच्या संस्कारानें व मनुष्याच्या प्रयत्नानें हे चांगलेंही बोलूं लागतात. दुसरें असें आहे कीं, रावूस मनुष्याप्रमाणें वाणी होती, परंतु ती अग्नीच्या शापामुळें कमी झाली आहे ;" असें संभाषण चाललें आहे तो दोन प्रहर दिवस आल्याचें

१ तुझ्या शत्रुस्त्रियांचें स्तनद्वय. २ मुक्ताहाररहित, निराहार.

सुचविणारा चौघडा वाजूं लागून शेवटीं शंखनादही झाला. तो ऐकतांच स्नानाची वेळ झाली ह्मणून राजा उठला; त्याबरोबर सर्व राजेही उठले. तेव्हां इतकी गर्दी झाली कीं, परस्परांच्या बाहु भूषणांच्या अग्रांनीं एकमेकांच्या अंगावरचे बारीक शेले फाटले व एकमेकांच्या धक्क्यांनीं गळ्यांतील हारास हिसके बसून ते हेलकावे खाऊं लागले. अंगास लावलेल्या सुगंधिद्रव्यांचा धुरळा उडून दिशा पिंवळ्या दिसूं लागल्या. मालतीपुष्पांचे हार तुरे हालून त्यांचा सुगंध चोहींकडे पसरल्यामुळें सुगंध लोभानें भ्रमरांचे थव्यांचे थवे येऊं लागले. जातांना राजास नमस्कार करण्याच्या वेळेस तर फारच गर्दी व गडबड झाली. खांद्यांवर चौऱ्या घेऊन इकडे तिकडे फिरणाऱ्या दासींच्या पायांतील भूषणांच्या झुणझुण शब्दांनीं व त्या शब्दांस ऐकून सरोवरांतील पक्ष्यांनीं केलेल्या मधुरशब्दांनीं, तसाच सारस पक्ष्यांच्या दीर्घशब्दांनीं, व गडबडीनें उठलेल्या मांडलिकराजांच्या पायांनीं सभामंडप हद्रून जाऊन 'दन्' 'दन्' उठलेल्या आवाजांनीं, चोपदारांच्या 'नजर रखो महाराज,' इत्यादि शब्दांनीं व ह्या सर्व शब्दांच्या राजवाड्यांतून निघालेल्या प्रतिध्वनींनीं, नमस्कार करणाऱ्या राजांच्या भूषणांच्या संघर्षणानें उत्पन्न झालेल्या 'खण' 'खण' व 'छण' 'छण' शब्दांनी, मंगलपाठ करणाऱ्या भाटांच्या जयजयकारांनीं आणि शेंकडों लोकांच्या पायांनीं तें स्थळ हदरल्यामुळें व पुष्पांवर बसलेले भ्रमर उडून त्यांचेही गुंजारव चालल्यामुळें सर्व दशदिशा व्याप्त होऊन तो सभामंडप अगदीं दणाणून गेला.

नंतर राजानें त्या चांडाळकन्येस 'या ठिकाणीं स्वस्थ राहून विश्रांति घ्यावी.' असें सांगून, व 'वैशंपायनास आंत नेऊन त्याच्या खाण्यापिण्याची चांगली व्यवस्था ठेव.' असें आपल्या दासीस सांगून तो आपल्या कांहीं राजपुत्रांसहवर्तमान अंतर्गृहांत गेला. मग त्यानें आपल्या अंगावरील भूषणें काढून ठेविलीं, यामुळें किरणांनीं विरहित सूर्य जसा दिसतो, किंवा चंद्र व नक्षत्रें यांनीं रहित असा आकाशप्रदेश दिसतो, तसा तो दिसूं लागला नंतर ज्या

पायन हें नांव कोणीं ठेविलें? तुला वेदशास्त्रांचें ज्ञान कसें ः
झालें? तुला कोणा सत्पुरुषाच्या कृपेनें ज्ञान प्राप्त झालें, किं
तूं स्वतःच कोणी सिद्ध पुरुष आहेस? तूं कोठें होतास? तुझें व
किती आहे आणि इतकें तुला समजत असून तूं चांडाळाचे हातीं का
लागलास? व पिंजऱ्यांत कसा अडकलास? ही सर्व हकीगत आ
ह्मांस सांग."

असें राजाचें भाषण ऐकून तो **वैशंपायन** राघू कांहीं वेळ सचित नसून ह्मणाला, "महाराज, माझी जन्मकथा फारच मोठी आहे, तथापि आपणांस ऐकण्याची उत्कंठा वाटत आहे तर सांगतों." इतकें बोलून तो आपला वृत्तांत सांगूं लागला. तो ह्मणाला, "महाराज, ह्या पृथ्वीवर पूर्व समुद्रापासून पश्चिम समुद्रापर्यंत विस्तीर्ण असें विंध्यारण्य आहे. तें पृथ्वीच्या मध्यभागीं असल्यामुळें पृथ्वीचा जणूं काय हा कमरपट्टाच आहे असें वाटतें! वृक्षांची दाटी असल्यामुळें तें अरण्य फारच सुशोभित दिसतें. त्या ठिकाणीं हत्तींचे कळप इकडून तिकडे एक सारखे फिरत असल्यामुळें त्यांच्या गंडस्थळांतील मदोदक झाडांच्या तळाशीं पडत असल्या कारणानें तेथील वृक्ष इतकें उंच वाढले आहेत कीं, त्यांच्या वरचीं फुलें खालून नक्षत्रांसारखीं दिसतात. मिरवेलींचे वेल ठिकठिकाणीं पसरले आहेत व त्यांचे कोवळे कोवळे शेंडे अनेक प्रकारचे पक्षी तोडून खात असतात. हत्तींचे छावे आपल्या सोंडांनीं तमाल-वृक्षांच्या फांद्या मोडून टाकीत असल्यानें त्यांचा चोहींकडे सुगंध चालू असतो. मद्य प्राशन केल्यामुळें गौरवर्ण स्त्रियांचे गाल जसे लाल दिसतात, त्याप्रमाणें तेथील वृक्षांचे पल्लव तांबडे लाल दिसतात. त्या ठिकाणीं वनदेवता फिरत असल्यामुळें त्यांच्या पायांचा अळिता लागल्यानेंच ते इतके लाल झाले आहेत काय, असें वाटतें!

डाळिंबीचीं फळें राघू फोडीत असल्यामुळें त्यांतून रस गळून वृक्षांचीं आळीं भरलेलीं राहतात. अतिचपळ वानरांनीं फळवृक्ष हालविल्यामुळें त्या ठिकाणीं फळांचा सडा झालेला असतो. प्रफुल्लित पुष्पांतील पराग जागजागीं पडलेले असतात. वाटसरू

वर उंच बिछाना घातला होता व गादीवर पांढरा शुभ्र पलंगपोस ला होता. उशी गिरद्या वगैरे सामानही जागचे जागीं नीट लें होतें. पलंगा जवळच पाय ठेवण्याकरितां चौरंग ठेविला ता. नंतर शूद्रक राजा त्या पलंगावर बसला. तेव्हां एक दा ीही पलंगाजवळ जाऊन बसली. व कमलपत्राप्रमाणें आपल्या मऊ हातानें राजाचे पाय रगडूं लागली. पुढें भेटीकरितां राजपुत्र आले होते त्यांजबरोबर तो थोडा वेळ इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलत बसला.

नंतर त्या राघूचें वर्तमान समजण्याविषयीं राजास उत्कंठा वाटून त्यानें द्वारपालिकेस तो राघू आणण्यास सांगितलें. तेव्हां आज्ञे-प्रमाणें तिनें जाऊन तो राघूचा पिंजरा तेथें आणिला. त्या द्वारपा-लिके बरोबर एक वृद्ध द्वारपाल सोन्याची काठी हातांत घेऊन टेंकीत टेंकीत त्या ठिकाणीं आला. म्हातारपणामुळें तो फार थकला होता. त्याचे केंस पांढरे शुभ्र झाले होते. दांत नसल्यामुळें त्याच्या तोंडांतील शब्द चांगला उमटत नव्हता. त्यानें आपल्या अंगात पांढरा झगा घातला होता, त्यामुळें राघूस पोंचविण्यास हा वृद्ध हंसच प्रेमानें आला आहे काय, असें दिसत होतें! मग तो द्वार-पाल राजास लवून मुजरा करून ह्मणाला, "महाराज, राणी साहे-बांनीं राव्यास पाठविलें आहे." इतकें बोलून तो परत गेला. मग राजा त्या राघूस ह्मणाला, "तुला आवडतात ते पदार्थ खावयास मिळाले ना? तो ह्मणाला, महाराज, येथें काय कमी आहे? मी जांभळांचा आंबट व गोड रस प्यालों. सिंहानें फोडलेल्या मत्त हत्तीच्या गंडस्थळांतील लाल मोत्याप्रमाणें डाळिंबाचे दाणे खाल्ले. द्राक्षासारखा गोड असा मोरआवळा वाटेल तितका खाल्ला. फार काय, राणी साहेबांनीं मला पुष्कळ पदार्थ खावयास दिले, ते सर्व मला अमृतासारखे लागले." मग राजा ह्मणाला, "बरें हें असो; आह्मांस तुझें वर्तमान ऐकण्याविषयीं फार कौतुक वाटत आहे या करितां तें सर्व आह्मांस सांग. तुझें जन्म कोणत्या देशांत झालें? तुला पक्षियोनि कां प्राप्त झाली? तुझे आईबाप कोण? तुझें वैशं-

आहेत काय, असें दिसत होतें! कांहीं दासी सुवर्णाचे कलश घे॰ केशरोदकानें स्नान घालीत असल्यामुळें स्नानकाळीं थंडी वाजूं न ह्मणून ह्या दिवस लक्ष्मी, कोवळें उन्हच राजाच्या अंगावर पाडी आहेत काय, असें वाटत होतें! अशा थाटानें राजाचा स्नान सम। रंभ होत असतां अनेक वाद्यांचा गजरही त्या वेळेस चालू होता.

निर्मळ स्नान झाल्यामुळें राजाचें सर्वांग फारच रमणीय दिसूं लागलें. नंतर त्यानें शुभ्र धौत वस्त्रें धारण केलीं. त्या वेळीं जल क्षालनानें शरन्मेघ जसा स्वच्छ दिसतो, तसा तो दिसूं लागला. त्यानें आपल्या मस्तकास शुभ्र धौत रुमाल गुंडाळला, त्यामुळें गंगा प्रवाहानें हिमालय पर्वत जसा शोभतो, तसा तो दिसूं लागला. नंतर मंत्र ह्मणून सूर्यास अर्घ्य देऊन व पितरांचें तर्पण करून तो देवघरांत गेला. तेथें शिवपूजन करून तो होमशाळेंत गेला. तेथें होम केल्यावर गंध लावण्याच्या जागीं गेला. त्या ठिकाणीं त्यानें कपाळास केशरी गंध लावून अंगास कस्तुरी, कापूर, केशर इत्यादि सुगंधि द्रव्यांनीं मिश्रित अशा चंदनाची उटी लावली, आणि मालतीपुष्पांचा तुरा रुमालांत खोंवला. व अंगावर भूषणें घालून आपल्या अंगावर उंची शाल पांघरण्याकरितां घेतली. पुढें राजपुत्रांसहवर्तमान मोठ्या प्रेमानें त्यानें उत्तम पक्वान्नांचें भोजन केलें.

भोजन झाल्यावर राजानें तांबूल ग्रहण करून तो सेवकांसह आपल्या बैठकीच्या दिवाणखान्यांत गेला त्या ठिकाणीं चोहों बाजूंस शुभ्र पडदे लावले होते, तेणेंकरून ह्या स्फटिकाच्या भिंतीच आहेत काय, असें वाटत होतें. तेथील मणिमय भूमीवर चंदनाचे सडे घातले होते. जागजागीं पुष्पमाळा लाविल्या होत्या, त्यामुळें नक्षत्रांनीं व्याप्त जसें आकाश दिसतें, तसें तें स्थळ दिसत होतें. त्या दिवाणखान्यास सुवर्णाचे खांब होते व त्यावर पुतळ्या कोरलेल्या होत्या, तेणेंकरून त्या मूर्तिमंत गृहदेवताच आहेत काय, असें दिसत होतें! अगरू उदबत्त्या इत्यादि सुगंधि द्रव्यें लावल्यामुळें त्यांचा घमघमाट सुटला होता. दिवाणखान्याच्या मध्यभागीं स्फटिकांचा चबुत्रा होता. त्यावर एक हस्तिदंती पलंग होता.

ठिकाणीं जोड्या, मलखांब वगैरे व्यायामाचीं साधनें ठेविलीं होतीं, त्या तालिमखान्यांत तो गेला, आणि तेथें त्यानें आपल्या बरोबरीच्या राजपुत्रांबरोबर कसरत केली. कसरतीच्या श्रमानें राजाच्या कपाळावर मौक्तिकांसारखे घर्मबिंदु दिसूं लागले, त्यामुळें अष्टमीच्या चंद्रासारख्या त्याच्या कपाळावर अमृतबिंदुच आले आहेत काय, असें भासूं लागलें. व्यायाम झाल्यावर तो स्नानगृहांत गेला. त्या ठिकाणीं सर्व तयारी केलेली होती. स्नानगृहांत शुभ्र चांदवा बांधलेला होता. मध्यभागीं सुगंधिद्रव्यांनीं युक्त अशा जलानें भरलेलें पात्र ठेविलें होतें. स्नानाकरितां स्फटिकांचा चौरंग मांडिला होता. एकेका बाजूस सुगंधिउदकानें भरलेल्या घागरी भरून ठेविल्या होत्या, त्यांच्यावर सुगंधलोभानें भ्रमर येऊन बसल्यामुळें ऊन न लागावें ह्मणून काळ्या फडक्यांनीं घागरीचीं तोंडें बांधूनच ठेविलीं आहेत काय असें वाटत होतें. त्या ठिकाणीं दासी तयार होत्या. त्यांनीं आपल्या स्तनांवरून पदर सावरून घेऊन व ओंचे खोंवून सुगंधी तैलें व मसाले राजाच्या अंगास लावून व चोळून तें निर्मळ केलें. नंतर वरुण जसा हंसावर बसतो, तसा तो स्फटिकाच्या चौरंगावर स्नानाकरितां जाऊन बसला. कांहीं दासींनीं पाचूचे कलश हातांत घेतल्यामुळें त्यांच्या हिरव्या कांतीनें त्या कमलिनी सारख्या दिसत होत्या, व त्यांच्या हातांतील पाणी ओतण्याचे कलश कमलपत्रांच्या द्रोणांसारखे दिसत होते! कांहीं दासींनीं रुप्याचे कलश घेतले होते, त्यामुळें त्या शुक्लपक्षांतील रात्रीप्रमाणें दिसत होत्या! त्यांचे हातांतील कलश चंद्राप्रमाणें दिसत होते, व त्यांतील जलधारा चंद्रिकेप्रमाणें दिसत होत्या! कलश उचलण्याच्या श्रमानें त्यांच्या अंगास घर्म आल्यामुळें, ह्या जलदेवता स्फटिकांच्या कलशांत तीर्थजलें घेऊनच आल्या आहेत काय, असें भासत होतें! कांहीं दासी चंदनरसमिश्रित उदक ओतीत असल्यामुळें त्या मूर्तिमंत मलय पर्वतसंबंधी नद्याप्रमाणें दिसत होत्या! त्यांच्या नखांचे किरण चमकत असल्यामुळें प्रत्येक बोटामधून ह्या जलधाराच चालल्या आहेत, असें भासून ह्या मूर्तिमंत जलयंत्रदेवताच

लोकांनीं बसण्याकरितां जागजागीं लवंगलतांचे पाले पसरलेले असतात. नारळी, पोफळी व केतकी यांचे वृक्ष चोहोंबाजूंस असल्यामुळें मोठी शोभा दिसते. सुपारीचे वृक्ष नागवेलींनीं आलिंगित असल्यामुळें फारच मौज दिसतें! ठिकठिकाणीं लतामंडप असल्यामुळें तीं वनदेवतांचीं राहण्याचींच घरें आहेत, असें वाटतें! बेलदोड्यांचीं वनेंच वनें लागून गेल्यामुळें तेथें सुगंध चालू असतो. गजराजांचीं गंडस्थळें फोडल्यामुळें त्यांतील मोत्यें सिंहाच्या नखांत आडकलेलीं असतात त्यांच्या लोभानें त्या सिंहास मारण्याकरितां भिल्ल लोक त्या ठिकाणीं फिरत असतात. ती विंध्याटवी, यमनगरीप्रमाणें भयंकर व महिष[1]युक्त आहे, सेनेप्रमाणें सिंहनादयुक्त आहे, देवीप्रमाणें खड्गां[2]नीं भयंकर व रक्तचंदनालंकृत अशी आहे, कल्पांतसंध्येप्रमाणें ती नीलकंठ[3]नृत्यानें शोभायमान दिसते, चंद्रदेवतेप्रमाणें ऋक्ष[4] व हरिण यांनीं युक्त आहे. राजलक्ष्मीप्रमाणें चमरपुच्छांनीं वारा घातलेली आणि गजसमुदायांनीं सुशोभीत अशी आहे. जानकीप्रमाणें कुशलवांतें प्रसवणारी व राक्षसांनीं ग्रहण केलेली आहे. कामिनीप्रमाणें चंदन व कस्तुरी यांनीं सुगंधित आहे. विरहिणीप्रमाणें म[5]र्दनाक्रांत व पल्लवांनीं वारा घातलेली आहे. बालकाच्या कंठाप्रमाणें व्याघ्रनखभूषित आहे. कोठें प्रलयकालाप्रमाणें महाव[6]राहोद्धृतभूमि आहे. लंकेप्रमाणें चपलवानरभग्नशाल[7] आहे. भयभीताप्रमाणें कंटकित आहे, उत्तमस्त्रीप्रमाणें कोकिल[8]स्वरा आहे. समरभूमीप्रमाणें शरपूरित आहे. विष्णुमूर्तीप्रमाणें तमालनील आहे. राजद्वारभूमीप्रमाणें वेत्र[9]लतादुष्प्रवेश व खड्[10]गयुक्त आहे. विराटनगरीप्रमाणें कीचक[11]सहित आहे, आकाशलक्ष्मीप्रमाणें तेजस्वितारकमृगांक[12] आहे. ऋषीप्रमाणें दर्भ व वल्कलें धारण करणारी

---

१ रेडे, यमाचा रेडा. २ तरवार, गेंडे. ३ शिव, मोर. ४ नक्षत्रें, अस्वल. ५ मदन, वृक्षविशेष. ६ वराहावतार, रानडुकरें. ७ वृक्ष, कोट. ८ बाण, एक प्रकारचे झाड. ९ काठी, वेत. १० तरवार, गेंडे. ११ कीचक, वेळू. १२ ज्याचें पाणीदार नेत्र आहेत अशा हरिणांनीं युक्त, चकचकित तारे व चंद्र यांनीं युक्त.

आहे, अपरिमितपत्रसंचययुक्त असून सप्तपर्णांनीं[1] सुशोभित अशी ती विंध्याटवी आहे.

त्याच विंध्यारण्यांत **दंडकारण्य** ह्मणून एक प्रदेश प्रसिद्ध आहे. तो केवळ धर्माचें वसतिस्थानच आहे त्यांत **अगस्ति** ऋषींचा आश्रम आहे. त्या ऋषीनें **इंद्राच्या** प्रार्थनेवरून महासागराचें प्राशन केलें. मेरुपर्वताच्या चढाओढीनें विंध्याद्रीनें आकाशांत आपलीं हजारों शिखरें पसरून सूर्याच्या रथाची गति कुंठित केली असतां व सर्व देवांनीं त्याची प्रार्थना केली असतां ही ज्यानें ऐकिली नाहीं, त्या अत्युच्च पर्वतास, **अगस्त्य** ऋषींनीं अगदीं नम्र करून ठेविलें. त्यानें आपल्या शक्तीनें **वातापिनामक** दैत्याचें भस्म करून टाकिलें, देवादिकांनीं देखील वंदन करून त्याची पादधूलि आपल्या मस्तकावर धारण केली, व ज्या ऋषीनें आपल्या हुंकारानें इंद्रपदस्थ नहुषराजास भूतलावर पाडिलें. दक्षिण दिशेच्या मुखास ज्यानें तिलकाप्रमाणें सुशोभित केलें आहे, अशा त्या महर्षींचें सामर्थ्य सर्वत्र प्रसिद्ध आहे. तेथील वृक्षांनीं तें स्थल फारच सुशोभित दिसते आहे. **अगस्त्यऋषींची स्त्री लोपामुद्रा** हिनें आपल्या हातांनीं आळीं करून व पाणी घालून तेथील वृक्षांस वाढविलें आहे. त्या आश्रमाभोंवतालचे प्रदेश पोपटासारख्या हिरव्यागार केळीच्या वनांनीं मनोहर दिसतात. आश्रमाच्या जवळूनच समुद्रास मिळणारी **कावेरी**नांवाची एक नदी वाहत आहे. त्या ठिकाणीं भगवान् **दाशरथी रामचंद्र** पित्याच्या आज्ञेवरून राज्यत्याग करून बंधु **लक्ष्मण** व प्रिया **सीता** यां सहवर्तमान **अगस्त्य**ऋषींची सेवा करण्याकरितां राहिले होते. आलीकडे बरेच दिवस तेथें मुनिजनांची वस्ती जरी नाहीं, तरी झाडांच्या फांद्यांवरून पारव्यांच्या रांगा बसल्या असल्यामुळें ऋषींच्या होमहवनांचे जसे काय अद्यापि हे धूरच चालले आहेत काय असें वाटतें! झाडांचे पल्लव लाल असल्यामुळें सीतेनें पूर्वीं देवपूजेकरितां फुलें तोडलीं होतीं त्यामुळें

१ एक झाड ( साप्वीन ).

तिच्या हातांचीच लाली त्यास लागली आहे काय, असें वाटतें! किंवा **रामचंद्रानें** आपल्या बाणांनीं राक्षससैन्य मारल्यामुळें रक्तांचे लोट चालून झाडांचीं अळीं भरून गेल्यामुळेंच त्या झाडांच्या पल्लवांस इतकी लाली आली असें वाटतें! त्या ठिकाणीं मोठाले डोहो असल्यामुळें **अगस्त्य**ऋषींनीं समुद्र प्राशन करून सोडल्यामुळें त्याचेच हे डोहो झाले आहेत काय असें वाटतें. याच ठिकाणीं मृगया करून रामचंद्रांनीं हरिण मारल्यामुळें सर्वमृगांनीं उत्तेजन दिलेलाच काय असा सुवर्णमृग **सीतेला** मोहित करून व **रामचंद्रांस** नादी लावून दूर घेऊन गेला. सीतेच्या वियोगानें दुःखित झालेले **रामलक्ष्मण** तिचा शोध करीत चालले असतां वाटेंत **कबंध** नांवाच्या राक्षसानें त्यांस धरिलें. त्यावेळीं राहूनें ग्रासलेले सूर्यचंद्र ज्याप्रमाणें दिसतात त्याप्रमाणें ते दिसत होते. **सीतेच्या** विरहाची व्यथा वाटूं नये ह्मणून **रामचंद्रांनीं** करमणुकीकरितां तिची प्रतिमा केली होती ती अद्यापि त्या आश्रमांत आहे. ती जशी काय **रामचंद्राच्या** राहण्याच्या ठिकाणास पाहण्याविषयीं उत्कंठित होऊन फिरून पृथ्वीतलांतूनच बाहेर पडली आहे काय अशी दिसते! व सर्व वनचर प्राणी तिजकडे टक लावून पाहातच आहेत असें वाटतें. अशा प्राचीन अनेक साक्षा त्या ठिकाणीं आहेत.

त्या आश्रमाच्याजवळ **पंपा** नामक सरोवर आहे. तें दृष्टीस पडलें म्हणजे असें वाटतें कीं, **अगस्त्य**ऋषींनीं समुद्र प्राशून टाकल्यामुळें रागावलेल्या वरुणानें मत्सरबुद्धीनेंच ब्रम्हदेवाकडून हा दुसरा समुद्रच त्यांच्या आश्रमाजवळ उत्पन्न करविला आहे काय? किंवा हें आकाशच खालीं उतरून आलें आहे काय? असा भास होतो. त्या सरोवरांत अनेक रंगांचीं कमलें नेहमीं प्रफुल्लित असतात, व त्यांतील मकरंदबिंदु पडत असतात ते तेथील उदकावर मोराच्या डोळ्याप्रमाणें दिसतात! कमलांवरून मकरंद व सुगंध हीं घेण्याकरितां भ्रमरांचे थवे बसले असतात. सरोवराच्या कांठीं हंसादिपक्षी कमलांतील रस प्राशन करून मदोन्मत्त होऊन शब्द करीत असतात. अनेक जलपक्षी तेथील उदकांत क्रीडा करीत असल्यामुळें लाटांवर

लाटा चालून त्यांचे आवाज होत असतात. सरोवरांतील जलतुषार घेऊन वारा वाहत असल्यामुळें ही पर्जन्याचीच बुरबूर येत आहे काय असें वाटतें! एक्या बाजूस वनदेवता स्नानें करीत असल्यामुळें त्यांच्या केशांतील पुष्पांनीं तेथील जलसुवासिक राहतें. दुसऱ्या बाजूस मुनिजन स्नानसंध्या करीत असतात, व ते आपले कमंडलु पाण्यांत बुडवितात, त्या वेळीं त्यांचे 'बुड' 'बुड' असे मनोहर शब्द होत असतात. नीलवर्णाचे पक्षी नीलकमलांत बसल्यामुळें ते शब्दांवरून मात्र समजण्यांत येतात. जवळ असलेल्या पीत केतकीच्या रांगांनीं सरोवराचें तीर पीतवर्ण झालेलें असतें. वृक्षांचे पल्लव सरोवरावर येऊन हालत असल्यामुळें ते त्या सरोवरास पंख्याप्रमाणें वाराच घालीत आहेत काय असें वाटतें! मयूर पक्षी आपले पिसारे पसरून त्या ठिकाणीं नृत्य करीत असतात. वृक्षांच्या रांगांनीं व लतांच्या मंडपांनी तें सरोवर फारच रमणीय दिसतें. समुद्र समजून उदक ग्रहण करण्याकरितां हे मेघच येताहेत काय असा भास करणारे रानांतील मोठाले हत्ती नेहमीं त्या ठिकाणीं पाणी पिण्याकरितां येत असतात. ज्याच्यांतील पाण्याचा थांग लागत नाहीं असें तें अप्रतिम **पंपा** नांवाचें सरोवर आहे.

त्या सरोवराच्या पश्चिमेच्या बाजूस **रामचंद्रांच्या** बाणांनीं भोकें पाडलेले असे **तालवृक्ष** आहेत त्यांच्याजवळ मोठा एक **शिंशिपावृक्ष** आहे. त्या झाडाच्या मुळा जवळचें खोड दिग्गजाच्या सोंडेप्रमाणें जाड अशा वृद्ध अजगरानें वेष्टिलें आहे. तेणेंकरून त्या झाडास हें मोठें आळेंच बांधलें आहे काय असें वाटतें! त्या वृक्षाच्या फांद्यांवरून सापांच्या पांढऱ्या कांती लोंबत असल्यामुळें तो वृक्ष पांढरे शेलेच पांघरला आहे काय असें वाटतें! त्याच्या फांद्या लांब लांब पसरलेल्या असल्यामुळें हा आपल्या भुजांनीं दिशांची लांबीच मोजीत आहे काय किंवा प्रलयकालीं आपले हजारों हात पसरून नृत्य करणाऱ्या **शिवाचें** हा अनुकरणच करतो आहे काय असें वाटतें! किंवा म्हातारपणीं आपले झोकांडे जाऊं नये म्हणून त्या वृक्षानें आपल्या फांद्यारूप भुजांनीं

आकाश धरूनच ठेवलें आहे काय असें वाटतें! त्याच्यावर मुळापासून शेंड्यापर्यंत लहान मोठ्या पुष्कळ वेली पसरल्या असल्यामुळें म्हातारपणीं त्याच्या अंगावर ह्या शिराच दिसत आहेत काय असें वाटतें! त्याच्या अंगावर बारीक बारीक कांटे असल्यामुळें म्हातारपणीं हे त्याच्या अंगावर तीळच उद्भवले आहेत काय असें भासतें! तो वृक्ष इतका उंच आहे कीं, समुद्राचें पाणी घेऊन वृष्टि करण्याकरितां चोहींकडे फिरणाऱ्या मेघांस देखील त्याचे शेंडे कोठवर गेले आहेत हें समजत नाहीं! जणूं काय इंद्राच्या नंदन वनांतील शोभा पाहण्याकरितांच त्या वृक्षानें आपलें मस्तक इतकें उंच नेलें आहे असें वाटतें! आकाशाचें आक्रमण करतां करतां थकलेल्या सूर्याच्या घोड्यांच्या तोंडांतील कापसाप्रमाणें शुभ्र फेंस त्याच्या शेंड्यावर पडत असल्यानें त्याचा माथा पांढरा शुभ्र झालासें दिसतें! ह्याच्या खोडास अरण्यांतील मदोन्मत्त हत्ती आपलीं गंडस्थळें घाशीत असल्यामुळें मदोदक लागून त्यावर भ्रमरांचे समुदाय तल्लीन होऊन बसलेले असतात, त्यामुळें लोखंडाच्या साखळदंडानें तो जखडूनच टाकला आहे काय व ह्मणूनच हा वृक्ष चिरकाल उभा राहिला आहे असें वाटतें! भ्रमरांचे व पक्ष्यांचे समुदाय जागजागीं त्या वृक्षांवर हालचाल करीत असल्यामुळें हा वृक्ष सजीवच आहे काय असें भासतें! दुर्योधनाप्रमाणें शकुनीवर[1] प्रेम ठेवणारा, विष्णूप्रमाणें वनमालेनें[2] भूषित दिसणारा, सर्व त्रैलोक्य पाहण्याकरितां बसण्याचा **वनदेवतांचा** हा बंगलाच, दंडकारण्यांतील सर्व वृक्षांचा राजाच, सर्व वनस्पतींचा नायकच, विंध्यपर्वताचा सखाच, आपल्या शाखारूप बाहूंनीं विंध्याटवीस आलिंगनच करीत आहे काय! असा तो वृक्ष आहे.

त्या वृक्षाच्या पल्लवांत फांद्यांच्या संधींत आणि जुन्या सालीच्या भेगांत राहण्यासारख्या निर्भय जागा असल्यामुळें अनेक प्रदेशांतून हजारों रावू येऊन, घरटीं करून, निर्वेधपणानें राहत असत. तो

---

१ शकुनिमामा, पक्षी. २ पायापर्यंत लांब फुलें व तुळशी यांची माळ. वनाची रांग.

वृक्ष जुनाट झाला असल्यामुळें त्यास थोडीं पानें होतीं तरी त्यावर पुष्कळ हिरवेगार राघू बसत असल्यामुळें हिरव्या पानांनीं तो अगदीं भरलेलाच आहे काय, असा दिसत असे!. ते राघू दररोज रात्रीं आपल्या घरट्यांत राहत असत, आणि सकाळीं उठल्यावर कळप करून आकाशांत हिंडत असत. त्यावेळीं बळिरामानें नांगरानें फेंकल्यामुळें आकाशांत उडालेली ही यमुनाच आहे काय! किंवा ऐरावतानें आकाशगंगेंतील ह्या कमलिनी उपटूनच फेंकून दिल्या आहेत काय! किंवा सूर्याच्या घोड्यांच्या कांतीनेंच हें आकाश व्यापिलें आहे काय, किंवा ही संचारकरणारी पाचूची कांतीच आहे काय! अथवा आकाशरूप सरोवरांतील हे शेवाळच पसरलें आहे काय! किंवा आकाशवनांतील ही हिरवीगार हरळीच पसरली आहे काय! किंवा आकाशांत हीं इंद्र धनुष्येंच पसरलीं आहेत काय! असे ते राघूंचे समुद्राय त्यावेळीं दिसत. केळीच्या पानाप्रमाणें पंख आपले हालवीत चालले ह्मणजे ते राघू दशदिशांस वाराच घालीत चालत आहेत काय असें भासे! बाहेर गेल्यावर भक्ष्य मिळवून फिरून ते राघू आपल्या घरट्यांत येत आणि फळें धान्यें वगैरे चोंचींत आणलेला चारा मोठ्या श्रमानें आपल्या पिलांस घालीत बसत, व संध्याकाळ झाली कीं, त्या पिलांस आपल्या पंखाखालीं झांकून घेऊन सुखानें रात्री घालवीत.

त्याच वृक्षावर एक्या जुन्या खोपट्यांत माझा वृद्ध पिता आपल्या स्त्रीसहवर्तमान राहत होता. त्यास मी फार दिवसांनीं मुलगा झालों. प्रसूतिकालींच माझी माता प्रसववेदनेनें पीडित होऊन परलोकास गेली. आपली आवडती बायको वारल्यामुळें अतिदुःखित झालेला माझा पिता सर्व दुःख गिळून पुत्रस्नेहामुळें माझें लालनपालन फारच काळजीनें करीत असे. माझा पिता वृद्ध असल्यामुळें त्याचे पंख शिथिल झाले होते, त्यामुळें त्यास चांगलें उडतां येत नसे. त्याचें शरीर थरथर कांपत असल्यामुळें शरिरांत शिरलेल्या जरेस झाडूनच टाकीत आहे काय असें वाटे! भक्ष्य मिळविण्यास त्यास दूर जाववत नसल्यामुळें व कवटीचीं फळें फोडतां फोडतां

त्याची चोंचही बोथल्यामुळें दुसऱ्या पक्ष्यांच्या कोठ्यांतून खालीं पडलेले धान्याचे दाणे व फळांचे तुकडे वेंचून आणून तो मला खावयास देत असे. माझें पोट भरून जें उरे, तेवढ्यानेंच तो आपला निर्वाह करी. एके दिवशीं प्रातःकाळीं आकाश तांबडें लाल झालें होतें. आरक्तवर्ण झालेला चंद्र निळ्या आकाशांतून पश्चिम समुद्राकडे चालला होता. ज्याप्रमाणें नीलकमलावर बसलेला वृद्ध हंस दिसतो, तसा तो दिसत होता. पुढें थोड्या वेळानें शुभ्र हरिणाच्या केंसाप्रमाणें आकाश स्वच्छ व विस्तीर्ण दिसूं लागलें. मत्त हत्ती मारल्यामुळें त्यांच्या रक्तानें भरलेल्या सिंहाच्या लाल केंसाप्रमाणें दिसणारे, तापविलेल्या लाखेच्या तारांप्रमाणें लाल भासणारे किंवा जणूं माणकाचे खरांटेच काय अशा आपल्या किरणांनीं सूर्यानें आकाशांत जिकडे तिकडे पडलेलीं नक्षत्ररूपपुष्पें झाडूनच टाकलीं काय असें वाटलें ! सप्तर्षींचें मंडळ मानससरोवरांत स्नानसंध्या करण्याकरितांच उत्तरेकडे गेलें ... असें दिसलें. चंद्रोदयकालीं समुद्रास भरती आल्यामुळें तीरावर मोत्यांचे शिंपले पडून उकळल्यामुळें त्यांतील मोत्यें पडलीं होतीं, तीं जणूं काय सूर्यकिरणांनीं झाडून टाकल्यामुळें हीं नक्षत्रेंच खालीं पडलीं आहेत काय असें पश्चिमसमुद्राचें तीर दिसूं लागलें ! सिंह जागृत होऊन जांभया देऊं लागले. हत्तिणी आपल्या प्रियहस्तींस जागृत करूं लागल्या. रात्रीं दहिंवर पडून जड झालेलीं फुलें झाडांवरून गळूं लागल्यामुळें वृक्ष आपल्या पल्लवभुजांनीं सूर्यास पुष्पांजलिच वाहत आहेत काय, असें दिसूं लागलें ! ऋषींच्या अग्निहोत्रांच्या धुरांचे लोट वर चालल्यामुळें हे पारव्याचे कळपच वर भरारी मारताहेत काय, किंवा हे धर्माचे मूर्तिमंत ध्वजच उभारले आहेत काय, असें भासूं लागलें ! दहिंवराचे बारीक बिंदु घेऊन वाहणारा, प्रफुल्लित कमलवनांतील सुगंध हरण करणारा, चंचललतांस नृत्य शिकविणारा, पुष्पसुगंधानें भ्रमरांस तृप्त करणारा, असा प्रातःकाळचा मंदमंद वारा वाहूं लागला. प्रफुल्लित कमळांचे जणूं स्तुतिपाठक, हत्तींच्या गंडस्थळांवर बसून वाद्य वाजविणारे असे भ्रमर कमलोदरांत सांपडल्यामुळें त्यांचे

झंकार शब्द चालू झाले. डोळ्यावर झोंप असल्यामुळें किंचित् डोळे उघडून हळूहळू चालत आहेत, व भुसभुशीत जमीनीवर निजल्यामुळें ज्यांचीं शरीरें मातीं लागून भरलीं आहेत, असे वनपशू इकडे तिकडे संचार करूं लागले. पंपा सरोवरांतील पक्ष्यांचे मधुर शब्द सुरू झाले. मयूरादि पक्षी जागृत होऊन नृत्य करूं लागले. वनगजांच्या कानांचे फडफड शब्द ऐकूं येऊं लागले. भगवान् सूर्य आकाशावर चढल्यामुळें चोहींकडे प्रकाश पडून चांगलें उजाडलें. तेव्हां त्या वृक्षावरील राघू जिकडे ज्यांला वाटलें तिकडे ते भक्ष्य मिळविण्याकरितां उडून गेले. राघूंचीं पिलें आपल्या घरट्यांत मुकाट्यानें दडून बसल्यामुळें तो वृक्ष शब्दरहित व शून्य दिसूं लागला. मी व माझा बाप आपल्या घरट्यांत बसलेले होतों. मला नुकतेच पंख फुटूं लागले होते त्यामुळें माझ्या अंगांत उडण्याचें सामर्थ्य आलें नव्हतें व ह्मणून मी आपल्या वृध्दपित्याच्या जवळ बसलों होतों. अशा वेळीं एकाएकीं मोठा भयंकर कोलाहल ऐकूं आला. सर्व वनचर प्राणी भयाभीत झाले. पक्षी बावरून उडाल्यामुळें त्यांच्या पंखाचे फडफड, भ्यालेल्या हत्तींचे चीं, चीं, गडबडीनें भ्रमरांचे थवे उडत चालल्यामुळें त्याचे गूंगूं, भयानें धांवत चाललेल्या रानडुकरांचे गुरगुर, पर्वतांच्या गुहांत जागे झालेल्या सिंहाच्या गर्जना, हे सर्व शब्द एकांत एक मिसळून फारच मोठा तो शब्द वाढला. त्यामुळें सर्व अरण्य थरथर कांपतच आहे काय असें वाटलें! तसा शब्द मी पूर्वीं कधींच ऐकिला नसल्यामुळें माझ्या अंगाला थरकांप सुटला आणि मी भयानें घाबरा होऊन आपल्या बापाच्या जीर्ण पंखांत जाऊन दडून बसलों.

इतक्यांत मृगया करण्याकरितां आलेल्या भिल्ल लोकांचीं बोलणीं ऐकूं येऊं लागलीं. ते एकमेकांशीं बोलूं लागले. "अरे! हा पहा, इकडून हत्तींनी कमलिनी उपटून टाकल्यामुळें सुवास येत आहे! अरे हा पहा, इकडून रानडुकरांनीं आपल्या दांतांनीं नागरमोथ्यांचा चुराडा केल्यामुळें त्यांचा सुगंध सुटला आहे! हा पहा, इकडून हत्तींनीं मोडलेल्या शल्लकीवृक्षांचा उग्र वास येत आहे. हे पहा,

इकडे वनमहिष आपल्या शिंगांनीं वारुळांत धडका मारीत असल्यामुळें हा धुराळा उडत आहे! हे इकडे पहा, हरिणांचे कळप पळत आहेत! ते तिकडे हत्तींचे समुदाय चालले आहेत! तो तिकडे रानडुकरांचा जमाव चालला आहे! हे हिकडच्या बाजूस मोर ओरडत आहेत! ते तिकडे चातक पक्षी शब्द करीत आहेत! ह्या हिकडे टिटव्या ओरडत आहेत! ते तिकडे सिंहानीं हत्तींचीं गंडस्थळें फोडल्यामुळें ते चींचीं करीत आहेत! हा ह्या बाजूनें थोडा थोडा चिखल पडत गेला आहे, यावरून नुकतेंच हिकडे रानडुकर गेले आहेत! हे इकडून हरिण हिरवेंगार व कोंवळें गवत चावीत व रवंथ करीत गेल्यामुळें हा पहा या वाटेनें हिरवा फेंस पडत गेला आहे. ह्या इकडच्या झाडांस हत्तींनीं गंडस्थळें घांसल्यामुळें त्या ठिकाणीं सुगंध लोभानें भ्रमर बसून गुंजारव करीत आहेत! ह्या इकडच्या झाडांचे तर हत्तींनीं शेंडे मोडून तोडून ते पायांनीं अगदीं तुडवून टाकले आहेत! ही इकडे गेंड्यांची जागा दिसत आहे! हें इकडे हत्तींचीं गंडस्थळें फोडल्यामुळें त्यांतून रक्त पडलें आहे; व रक्तानें भरलेलीं मौतिकें पडलीं आहेत! यावरून इकडे सिंह गेले असावे असें दिसतें. ही हिकडे हरिणी नुकतीच प्रसवल्यामुळें रक्तानें जमीन लाल दिसत आहे! ही विंध्याटवीची वेणीच काय अशी हत्तींच्या मदोदकाची एक सारखी पडत गेलेली धार दिसत आहे! ही हिकडे चमरमृगांची रांग आहे, हिच्या पाठीस लागा! लवकर धांवत जाऊन जागा रोंखून धरा! कोणी झाडावर चढा! कोणी या बाजूस पाहात राहा! हा शब्द ऐकूं आला पाहा! घ्या लवकर हातांत धनुष्यें, आणि सावध राहा! कुत्रे मोकळे सोडून द्या! याप्रमाणें पारध करणाऱ्या त्या लोकांच्या आरडाओरडीनें तें सर्व अरण्य गलबलून गेलें.

नंतर ते भिल्ल जिकडे तिकडे बाण मारूं लागले, तेणेंकरून सिंह मृदंगासारख्या गर्जना करूं लागले. त्यांच्या गर्जनांचे प्रतिध्वनि पर्वतांच्या गुहांत घुमूं लागले. त्यामुळें भयभीत होऊन हत्ती आपल्या कळपांतून फुटून भलतीकडे पळूं लागले व मेघाप्रमाणें ग-

र्जना करूं लागले. जलद पळणाऱ्या शिकारी कुत्र्यांनीं कोणाचे कान, कोणाचे पाय, इत्यादि अवयव तोडल्यामुळें चंचल व भयभीत नेत्रांनीं पाहात हरिण दीनस्वरानें ओरडूं लागले! कळपांतील पुढारी हत्ती मारल्यामुळें दुःखित झालेल्या हत्तिणी चीं, चीं, करीत धावूं लागल्या. व त्यांच्या पाठीमागें लहान छावे पळत सुटले. ज्यांना प्रसूत होऊन थोडेच दिवस झाले होते अशा गेड्यांच्या स्त्रिया भयानें धांवत चालल्या असतां त्यांचीं पोरें चुकून दृष्टीस न पडल्यामुळें त्या करुणस्वरानें गळे काढून ओरडूं लागल्या. पक्षीही वृक्षांवरून उडून कलकलाट करीत हिंडूं लागले. कानापर्यंत धनुष्यांच्या दोऱ्या ओढून हरिणांच्या मागें धांवणाऱ्या व्याधांच्या पावलांचे दन्‌दन् शब्द होऊन पृथ्वी कांपतेच आहे काय असें वाटलें! धनुष्यांच्या टणत्कारांनीं, रान गेड्यांच्या पाठीवर खड्गांच्या सप्‌सप् शब्दांनीं, आणि शिकारी कुत्र्यांचीं गुरगुरणीं व भोंकणीं यांणीं तें ठिकाण अगदीं दणाणून गेलें.

पुढें थोडक्याच वेळानें मृगयेचा कलकलाट शांत झाला. सर्व उदक सोडल्यावर मेघ जसा गर्जनारहित, किंवा मंथन झाल्यावर समुद्र जसा शांत, त्याप्रमाणें तें अरण्य मग शांतसें दिसलें. तेव्हां माझें भय कांहीं कमी झालें. नंतर बालस्वभावामुळें ही एवढी गडबड कसची आहे ती पाहावी, अशाविषयीं मला कौतुक वाटून, मी बापाच्या पंखातून निघालों व घरट्याच्या बाहेर तोंड काढून भयानें घाबरलेल्या दृष्टीनें इकडे तिकडे पाहूं लागलों तों, सहस्रार्जुनाच्या सहस्रभुजांनीं उडविलेल्या प्रवाहांनींयुक्त अशी नर्मदा नदीच येत आहे काय! किंवा वाऱ्यानें चंचल झालेलें हें तमालवनच आहे काय! कीं सर्व कालरात्री एके ठिकाणीं होऊन हा अंधकाराचा समुदायच येत आहे काय! कां हा कज्जलपर्वतांचा संचयच आहे काय! कां सूर्यकिरणांनीं व्याकूळ झालेला हा अंधकाराचा पूरच येत आहे काय! कां हा फिरत फिरत यमाचा परिवारच येत आहे काय! कां रसातलांतून बाहेर पडलेला हा दैत्यसमुदायच आहे काय! कां हा पाप कर्मांचा संचयच येत आहे

काय! कां कलिकालाचा हा बंधुवर्गच आहे काय! कां पाण्यांतून बाहेर पडलेला हा रानरेड्यांचा कळपच आहे काय! अथवा पर्वतावर संचार करणाऱ्या सिंहानीं हत्ती समजून पंजांनीं खालीं ओढलेलें हें मेघमंडळच आहे काय! ज्याच्या कृष्णवर्णानें सर्व अरण्य काळें दिसत होतें असा, तो भिल्ल लोकांचा समुदाय माझ्या दृष्टीस पडला.

त्या समुदायाच्या मध्यभागीं त्यांचा मुख्य नाईक होता. तो तारुण्याच्या ऐनभरांत आलेला होता. त्याचा देह इतका बळकट दिसत होता कीं, हा लोखंडाचाच पुतळा घडलेला आहे काय! त्याला नुक्तीच मिशी फुटली असल्यामुळें मदस्राव सुरू झाल्यानें तरुण गजराज जसा दिसतो तसा तो दिसत होता. त्याचें शरीर तेजस्वी असून शरिराचें तेज नीलवर्ण असल्यामुळें हें यमुनानदीचें जलच ह्या अरण्यांत पसरलें आहे काय, असें भासत होतें. त्याचे काळेभोर व कुरळे केश खांद्यावर लोंबत असल्यामुळें हत्तींच्या मदोदकानें सिंहाच्या मानेवरचे केंस भरून तो जसा दिसतो तसा तो दिसत होता. त्याचें कपाळ मोठें होतें. नाक उंच व धरधरीत होतें. त्यानें आपल्या डाव्या कानांत सर्पांच्या मण्यांचीं भूषणें घातलीं होतीं व त्यांची प्रभा त्याच्या खांद्यावर झळकत होती, त्यामुळें पल्लवाच्या शय्येवर निजत असल्यामुळें पल्लवांची लालीच त्याच्या खांद्यावर चिकटली आहे काय, असें भासत होतें. नुकतेच मारलेल्या हत्तीच्या मदोदकाची कृष्णागरू चंदनाप्रमाणें त्यानें आपल्या अंगास उटी लाविली होती, तिच्या वासानें भ्रमरांचे थवे त्याच्या अंगा[illegible] झुलत असल्यामुळें, हीं त्यांवर मयुरपिच्छांचीं मोरचेलेंच उडत आहेत काय! किंवा उष्ण निवारण होण्याकरितां हे तमाल पल्लवच त्यावर धरले आहेत काय, असें वाटत होतें! त्याच्या कानावर पल्लव ठेविले होते ते वाऱ्यानें हालत होते, त्यामुळें भुजबलानें जिंकल्यामुळें ही विंध्याटवीच त्यास वारा घालून त्याची सेवा करीत आहे काय, असें दिसत होतें! हरिणादिपशूंच्या काळरात्रीची संध्याच काय, अशी त्याची दृष्टि लाल दिसत होती,

त्याचे भुजदंड गुडघ्यापर्यंत लांब सरळ व लठ्ठ होते. यामुळें ब्रह्मदेवानें वनगजांच्या शुंडादंडाचें प्रमाण याचे भुजच घेतले होते, असें वाटत होतें. चंडिकेला बळी देण्याकरितां तो आपल्या खांद्याचें रक्त काढीत असे, त्यामुळें त्याचे खांदे खडबडीत दिसत होते. त्याचें वक्षस्थळ विंध्याद्रीच्या मोठ्या शिळातळाप्रमाणें विशाल दिसत होतें, आणि त्यावर मारलेल्या वनपशूंचे रक्तबिंदु व घर्माचे शुभ्रबिंदु झळकत होते, त्यामुळें वनांतील गुंजा व हत्तींच्या गंडस्थळांतील मोत्यें यांचा हार करूनच त्यानें गळ्यांत घातला आहे काय! असें दिसत होतें. तो नेहमीं कसरत व शिकारीचे वगैरे श्रम करीत असे त्यामुळें त्याचें पोट सडपातळ होतें, आणि त्याच्या मांड्या हत्तीला बांधण्याच्या खांबासारख्या जाड दिसत होत्या. त्यानें लाखेनें रंगविलेलीं लाल वस्त्रें धारण केलीं होतीं. त्याची मुद्रा रागीट असल्यामुळें त्याच्या कपाळावर मोठाल्या तीन वळ्या दिसत होत्या; तेणेंकरून तो देवीचा भक्त असल्यामुळें तिनें त्याच्या कपाळावर हा त्रिशूळच उठविला आहे काय, असें दिसत होतें! त्याच्या मागून त्याचे शिकारी कुत्रे चालले होते. श्रमामुळें त्यांच्या जिभा तोंडा बाहेर लोंबत होत्या. त्या स्वभावतःच लालभडक असल्यामुळें हरिणाच्या रक्तानें भरल्यामुळेंच अशा दिसत आहेत काय, असें दिसत होतें! श्रमामुळें तोंड वासून चालत असल्यामुळें त्यांच्या तोंडांतील पांढऱ्या दाढा स्पष्ट दिसत होत्या; व त्यांचे किरण तोंडांत पडले होते, त्यामुळें हे सिंहाचे केंसच त्यांच्या दांतांत अडकले आहेत काय! असें भासत होतें. त्यांच्या गळ्यांत मोठाल्या कवड्यांच्या माळा घातल्या होत्या. त्यांच्या अंगावर रानडुकरांच्या दांतांच्या जखमा लागलेल्या होत्या. त्यांच्या शरिराचे बांधे लहान होते तरी ते फार बळकट होते; त्यामुळें ज्यांना जटा फुटल्या नाहींत अशा लहान सिंहाप्रमाणें ते दिसत होते. हरिणास मारून त्यांच्या स्त्रियांस वैधव्य आणण्याविषयीं तत्पर व ज्यांचे रंग अनेक प्रकारचे आहेत असे ते कुत्रे होते. त्यांच्या पाठी लांब असल्यामुळें आपल्या पतींस अभय मागण्याकरितां ह्या सि-

हिणीच आल्या आहेत काय! कुत्र्याही त्यांच्या मागून धांवत चालल्या होत्या.

मुख्य नाइकाच्या चोहींबाजूंकडे भिल्ल लोक चालले होते त्यांच्या पैकीं कांहीं लोकांनीं वनगाईंचीं पुच्छें, कोणीं हत्तीचे मोठाले दांत, कोणीं पानांत गुंडाळलेल्या मधाच्या पोळ्या. कोणीं हत्तीच्या गंडस्थळांतील मोत्यें, कित्येकांनीं राक्षसाप्रमाणें भक्षण करण्याकरितां मांस, कांहीं जणांनीं सिंहाचीं व व्याघ्राचीं कातडीं, कांहींकांनीं मोरांचीं पिसें व कावळ्याचे पंख आपल्या हातांत घेतले होते. त्यांचीं वस्त्रें अगदीं मळकट होतीं, असे हजारों भिल्ल लोक त्याच्या सभोंवतीं चालत होते. अरण्याप्रमाणें तो खड्ग[१]युक्त होता. मेघाप्रमाणें तो मयूरपिच्छधनुष्य युक्त होता. गरुडाप्रमाणें नागदंत[२] उपटणारा, भीष्माप्रमाणें शिखंडि[३]शत्रु, उष्णकाळाप्रमाणें मृगतृष्णा[४]युक्त, हिरण्याक्षदैत्याप्रमाणें वराहभित्र[५]वक्षस्थळ, गायनाप्रमाणें निषाद[६]युक्त, चंडिकाशूलाप्रमाणें महिषरुधिरानें भरलेला. असा तो नाईक शरिरानें धिप्पाड असल्यामुळें विंध्यपर्वताचा जणूं पुत्रच क्रूर असल्यामुळें यमाचा अवतारच, पापकर्माचा जणूं मित्रच, इतका तो भयंकर होता तरी, तेजस्वीपणामुळें थोर पुरुषासारखा दिसत होता आणि त्याचा पराभव करण्यास कोणीच समर्थ नसावा, असा तो बळकट वाटत होता. त्याचें नांव **मातंग** होतें, असें मग समजलें.

याप्रमाणें त्यास पाहिल्यावर माझ्या मनांत आलें कीं, काय हो, या लोकांचें हें जिणें! सज्जनांनीं निंदित असें ह्याचें आचरण तरी काय हें! देवतांस मनुष्यमांसाचा बळी देणें हाच यांचा धर्म! सज्जनांनीं निंदित जें मद्यमांस तेंच यांचें भक्ष्य! मृगया करण्याचेच ज्यांना श्रम! ज्यांना उपदेश करणारे ह्मटले ह्मणजे कोल्ह्याकुत्र्यांचे शब्द! पशुपक्ष्यांच्या जाती ओळखणें हेंच यांचें ज्ञान! यांचे मित्र ह्मटले ह्मणजे कुत्रे; भयंकर अरण्य हें यांचें राज्य,

---

१ तरवार, गेंडे. २ हत्ती, सर्प. ३ राजविशेष, मोर. ४ मृगजल, मृगमारयाची इच्छा. ५ वराहावतारी (विष्णु) डुकर. ६ सप्त सुरांतील प्रथम, भिल्ल.

मद्यप्राशन हाच यांचा उत्साह, यांचें धन ह्मटलें ह्मणजे धनुष्यें! विषमुखी बाण हे त्यांचें साहाय्य करणारे! भोळ्या मृगांचा नाश करणारी अशी यांची गायनकला! बलात्कारानें धरलेल्या परस्त्रिया यांच्या बायका! निर्दय व्याघ्रादिवनपशूंशीं यांचा सहवास! चोरी करणें हेंच यांचें कौशल्य! नागांच्या फणावरील मणी हे यांचे अलंकार! व गजांचें मदोदक हें यांचें उटीचें द्रव्य! ज्या वनांत हे जातील तेथील प्राण्यांचा समूळ नाश करणें हें यांचें कर्तव्यकर्म! याप्रमाणें मी चिंतन करीत होतों, तों, भिल्लांचा नाईक अरण्यांत फिरत फिरत श्रम झाले होते ते दूर होण्याकरितां त्याच शाल्मली वृक्षाच्या खालीं आला, आणि आपलें धनुष्य खांद्यावरून काढून खालीं ठेवून सेवकजनांनीं झटदिशीं आणून घातलेल्या पल्लवांच्या आसनावर तो बसला. तितक्यांत एक तरुण भिल्ल सरोवरावर गेला आणि कमलपत्रांच्या द्रोणांत स्वच्छ पाणी घेऊन आला. तें उदक वैडूर्यमण्यासारखें असून चंद्रमंडळांतूनच पाझरलेलें आहे काय! किंवा मौक्तिकांचेंच बनलेलें आहे काय! असें स्वच्छ व सुंदर होतें, आणि बर्फासारखें थंड व कमल परागांनीं सुवासिक झालेलें होतें. असें तें उदक त्या सेनापतीनें प्राशन केलें व सेवकांनीं कमलिनीचे देंठ धुवून आणले ते, राहू जसा चंद्रकलांचें चर्वण करतो, त्याप्रमाणें त्यानें चावून चावून टाकिले. नंतर त्याच्या बरोबरच्या लोकांनींही जलप्राशन केलें. याप्रमाणें विश्रांति घेतल्यावर त्या सेनापतीला जिकडे जावयाचें होतें, त्या दिशेकडे तो निघून गेला व त्याच्या मागोमाग तें भिल्लसैन्यही गेलें.

त्यांच्या पैकीं एक ह्मातारा भिल्ल त्याच वृक्षाखालीं कांहीं वेळ बसला होता. तो राक्षसासारखा भयंकर दिसत होता. त्या दिवशीं त्यास मांस मिळालें नव्हतें ह्मणून, तें मिळविण्याचें त्याचे मनांत होतें. तो सेनापति दिसेनासा झाल्यावर त्या शाल्मलीवृक्षाकडे तो टक लावून पाहूं लागला. त्याच्या भुवया भोऱ्या रंगाच्या होत्या व त्याची दृष्टि रक्तासारखी लाल होती. त्या दृष्टीनें तो आमचीं आयुष्यें पितोच आहे काय! असें वाटलें. ससाण्याप्रमाणें पक्ष्यांच्या मां-

साची इच्छा करणारा तो भिल्ल त्यावेळीं राघूंच्या घरटीं मोजतोच आहे असें दिसलें. मग त्या वृक्षावर चढावें या इच्छेनें तो फार वेळपर्यंत त्या वृक्षाकडे पाहत बसला. तेव्हां त्याच्या पाहण्यानें भ्यालेल्या राघूंचे प्राण गेल्यासारखेच झाले! कारण, निर्दय पुरुषांना दुष्कर असें कर्म कोणतें आहे? तो वृक्ष अनेकतालप्रमाण व गगनचुंबी असा जरी होता, तरी, त्यावर जसें पायऱ्यांनीं चढावें, त्याप्रमाणें तो चढला, आणि जशीं काय त्या झाडाचीं फळेंच तोडतो आहे काय! अशा रीतीनें ठिकठिकाणीं असलेल्या घरट्यांतून राघूंचीं पिलें काढून त्यांच्या माना मुरगळून त्यांस तो खालीं टाकून देऊं लागला! त्यांत ज्यांना उडण्याची शक्ति नव्हती अशीं कांहीं पिलें होतीं. कांहीं पिलांना उत्पन्न होऊन थोडकेच दिवस झाले होते. त्यामुळें तीं वृक्षाच्या फुलाप्रमाणें दिसत होतीं. कितीएकांना नुकतेच पंख फुटले होते त्यामुळें कमळाच्या नवीन पानाप्रमाणें तीं दिसत होतीं. कांहीं पिलें थोडीं हिरवीं झाल्यामुळें रुईच्या फळाप्रमाणें दिसत होतीं. कांहींकांच्या चोंची लाल झाल्या होत्या त्यामुळें त्या किंचित् फुललेल्या कमळाच्या कळ्याप्रमाणें दिसत होत्या. कांहीं पिलांच्या माना लट लट हालत होत्या, त्यामुळें असें करूं नको ह्मणून त्या त्या भिल्लाचें निराकरणच करीत आहेत काय! असें दिसत होतें.

असा तो प्राणघातक व अपरिहार्य प्रसंग भलत्याच वेळीं येऊन ठेपला, असें पाहून माझा बाप अगोदर जरेनें कांपत होताच तो भयानें अधिकच कांपूं लागला, आणि मरणाच्या भयानें कावऱ्या बावऱ्या व आंसवांनीं भरलेल्या दृष्टीनें चोहींकडे पाहूं लागला. भयानें त्याची टाळू कोरडी पडली, काय करावें आणि काय न करावें, हें त्यास सुचेनासें झालें. माझ्या ममतेमुळें माझें रक्षण करण्याविषयीं तो व्याकुळ झाला आणि आतां दुसरा इलाज नाहीं असें समजून भयानें निर्बल झालेल्या आपल्या पंखांनीं मला झांकून व पोटाशीं घट्ट धरून बसला. इतक्यांत तो पापी सर्व फांद्यांवरून फिरत फिरत आमच्या खोप्याजवळ आला, आणि कृष्ण सर्पाप्रमाणें

भयंकर, रान डुकरांच्या चरबीनें भरलेला, आणि काळाच्या दंडाचें अनुकरण करणारा असा आपला डावा हात त्यानें आमच्या घरट्यांत घातला. त्यावेळीं माझ्या बापानें त्याच्या हातास चोंचीनें प्रहार केले, व मोठ्यानें ओरडून कलकलाटही केला; तरी त्या अधमानें त्यास न सोडतां कोट्याबाहेर काढून मारिलें. माझें शरीर फार लहान होतें व भयानें तें आकुंचित झालें होतें यामुळें ह्मणा, किंवा माझ्या आयुष्याची दोरी बळकट होती यामुळें ह्मणा, मी बापाच्या पंखांत दडून बसलों होतों, तो त्याच्या दृष्टीस पडलों नाहीं. त्या दुष्टानें माझ्या बापाची मान मुरगळून व खालीं डोकें करून त्यास वरून टाकून दिलें. बापाच्या दोन्हीं पायांत डोकें घालून त्याच्या पोटाशीं चिकटून राहिलों होतों यामुळें मी त्याजबरोबर खालीं पडलों. माझें कांहीं पुण्य शिलक होतें, त्यामुळें वाऱ्याच्या झोंकानें गोळा झालेल्या वाळलेल्या पानांच्या ढिगावर पडल्यामुळें मला धक्का पोंचला नाहीं. जोंपर्यंत तो दुष्ट खालीं उतरला नाहीं तोंपर्यंत आपला प्राण वांचविण्याचा उपाय करावा, असें मनांत येऊन मी त्या पानांच्या आडून आडून सरकत गेलों माझ्या पंखांचा रंग त्या पाल्यासारखाच असल्यामुळें मी त्यास दिसलों नाहीं. प्रियपित्याची ती अवस्था दृष्टीस पडतांच प्राणत्याग करण्यासच तो प्रसंग योग्य होता, तरी बाल्यअवस्था असल्यामुळें माझ्या अंगीं तितका समज आला नव्हता. असो, मग मी भयानें घाबरून थोडथोड्या फुटलेल्या पंखांनीं खरडत खरडत जवळच एक तमालवृक्ष होता, त्याच्या बुंधांत जाऊन लपून बसलों. तेव्हां यमाच्या दाढेंतून सुटून दुसऱ्या पित्याच्या मांडीवरच येऊन बसलों असें मला वाटलें! तो तमालवृक्ष बलरामाच्या वस्त्राप्रमाणें नीलवर्ण होता, त्यामुळें विष्णूच्याकांतीस हंसतोच आहे काय! असा तो दिसत होता. त्याचीं पानें इतकीं नीलवर्ण होतीं कीं, तीं यमुनेच्या तरंगानींच केलीं आहेत काय अशीं दिसत होतीं. विंध्याटवीचा हा केशपाशच आहे काय किंवा दिवसास देखील हा अंधकाराचा पुंजच उभा आहे काय! असा तो दिसत होता. त्या ठिकाणीं भर दोन

प्रहरीं देखील सूर्यकिरणांचा रिघाव होत नसे. पुढें लागलाच तो भिल्ल त्या झाडावरून खालीं उतरला, आणि चोंहीकडे मेलेलीं राघूंचीं पिलें पडलीं होतीं तीं त्यानें एके ठिकाणीं गोळा केलीं. नंतर पानांचा मोठा द्रोण करून त्यांत तीं सर्व घातलीं, आणि वेलांनीं त्यांस बळकट बांधून तो पुडा हातांत घेऊन ज्या दिशेकडे तो सेनापति गेला होता, तिकडे तो भिल्ल धांवत धांवत निघून गेला. त्यावेळीं मला जीविताची आशा वाटूं लागली. पितृमरणदुःखानें माझा जीव कोरडा पडला. उंचावरून खालीं पडल्यामुळें माझें अंग ठणकूं लागलें. भयानें सर्व अंग लटलट कांपतच होतें. मला शोष पडून इतकी तहान लागली कीं, ती मुळें माझा जीव जातो किंवा राहतो असें वाटलें. तो दुरात्मा आतां दूर गेला असेल असें समजून मान वर करून, भयानें घाबरलेल्या दृष्टीनें मी चोंहीकडे पाहूं लागलों. गवताची काडी जरी हालली तरी तो दुष्ट फिरून आला कीं काय, असा मला क्षणोक्षणीं भास होऊं लागला. मग तसाच तेथून पाणी पिण्याकरितां सरोवरावर जावें ह्मणून खरडत खरडत चाललों. मला पुरतें पंख फुटले नसल्यामुळें व पायांनीं चालण्याची संवय नसल्यामुळें चालतांना क्षणोक्षणीं तोंड घशीं पडूं लागलों. आणि एक्या अंगास झोकांडें जाऊं लागलें ह्मणजे दुसऱ्या बाजूकडच्या पंखांनीं मी आपला तोल सांभाळून धरूं लागलों. अभ्यास नसल्यामुळें जमिनीवर फरफटत चालण्याच्या श्रमानें माझा जीव फार घाबरा होऊं लागला. पदोपदीं तोंड वर करून मोठ्यानें श्वासोच्छ्वास टाकूं लागलों. तोंडांत, नाकांत, व डोळ्यांत माती शिरून माझें सर्वांग मातीनें भरलें. तरी मी तसाच फरफटत फरफटत चाललों होतों. त्या वेळीं माझ्या मनांत आलें कीं, ह्या जगांत प्राण्याला किती जरी कष्ट सोसावे लागले तरी जीविताची आशा सुटत नाहीं! त्या अर्थीं जीवापरती दुसरी प्रिय वस्तु कोणतीच नाहीं! माझा दयाळू प्रियपिता परलोकास गेला असतां मला कांहींच होत नाहीं! मी आपला खुशाल वांचलों आहें! तेव्हां पितृमरणाचें दुःख सहन करणाऱ्या, व उपकार करणाऱ्या पित्याची गरज न धरतां वांचणाऱ्या मला

निर्दयाला धिक्कार असो!! माझी माता मला सोडून गेली असतां ज्या माझ्या वृद्धपित्यानें शोक दाबून अनेक उपायांनीं जन्मापासून माझें लालनपालन केलें. माझ्या पोषणाकरितां दुःसह श्रम केले, त्या पित्याचें लागलेंच मला विस्मरण पडावें काय? प्राणास वांचण्याची आशा सुटत नाहीं, यामुळेंच ते उपकार करणाऱ्या पित्याच्या मागून अझूनही जात नाहींत! स्वजीविताची आशा प्राण्यास निर्दय करते, हें खरें! कारण अशा वेळेस मला तहान लागून पाणी पिण्याची इच्छा वाटत आहे!! पितृमरणदुःखाला न जुमानतां तहान भागविण्याविषयीं प्रयत्न करीत होतों, तेव्हां माझा निर्दयपणा किती ह्मणून सांगावा! असो, पुढें पाणी पहात चाललों तों सरोवर बरेंच लांब आहे असें वाटलें. कारण जलदेवतांच्या भूषणांचे अनुकरण करणारे असे राजहंसांचे शब्द अझून दूरच ऐकूं येत होते. सरोवर संबंधी इतर पक्ष्यांचे शब्दही तसेच अस्पष्ट ऐकूं येत होते. प्रफुल्लित कमलांचा सुगंध दूरदूर पसरून गेल्यामुळें येथें फारसा सुवास येत नव्हता. उन्ह कडकडीत पडलें होतें यामुळें त्यावेळची अवस्था काय सांगावी! भगवान् सूर्य आकाशाच्या मध्यावर येऊन तापत असल्यामुळें जसा काय तो ठिणग्यांचाच वर्षाव करीत आहे! असें वाटत होतें. उन्हानें जमीन इतकी तापली होती कीं, पाय चटचट भाजत होते. तहान तर मला अधिकच बाधा करूं लागली. थोडें देखील चालवेनासें झालें. आतां एकदम जीव देण्याचेंही आपल्या हातून होणें नाहीं असें वाटलें. जीव तर घाबरा होऊं लागला, डोळ्यापुढें अंधारी आली आणि दुष्ट दैव एकदम मरण देईल तर बरें असें वाटूं लागलें!

अशा प्रकारें मी चिंतन करीत चाललों होतों, इतक्यांत त्या सरोवराजवळच्या तपोवनांत **जाबालि** नांवाचे महा तपस्वी राहत होते, त्यांचा पुत्र **हारीत** ऋषी आपल्या बरोबरीच्या ऋषीकुमारांसह त्या रस्त्यानें सरोवरांवर स्नान करण्याकरितां चालला होता. तो सनत्कुमाराप्रमाणें सर्व विद्यांत प्रवीण होता. ज्याच्याकडे पाहवत नव्हतें असें त्याच्या अंगावर तेज असल्यामुळें हा दुसरा सूर्यच

आहे! किंवा याचे सर्व अवयव विजेचेच केलें आहेत! किंवा, तापविलेल्या सुवर्णरसाचा ज्याच्या अंगाला मुलामाच दिला आहे! असा तो तेजस्वी दिसत होता. कोवळ्या उन्हाच्या शोभेनें दिवस जसा सुशोभित दिसतो, तसा तो दिसत होता! किंवा **खांडववन** दहन करण्याकरितां बटुवेष धारण करणारा हा अग्निच आहे काय, असें वाटत होतें! अनेक तीर्थांच्या स्नानांनीं पवित्र अशा त्याच्या जटा खांद्यावर लोंबत होत्या. त्याच्या उजव्या खांद्यावर स्फटिकमण्यांची लहान माळ अडकविलेली होती. ती जशी धर्माची मूर्तिमंत आज्ञाच आहे काय! अशी दिसत होती. त्यानें आपल्या कपाळावर भस्माचा त्रिपुंड्र लाविला होता. डाव्या हातांत स्फटिकाचा कमंडलु घेतला होता. अंगावर कृष्णाजिन घेतलें होतें. त्याच्या डाव्या खांद्यावर कमळ तंतूंनींच केलें आहे काय! असें शुभ्र यज्ञोपवीत लोंबत होतें. उजव्या हातांत पळसाचा दंड होता. त्याच्या शेवटास देवपूजेकरितां तोडलेल्या फुलांचा पुडा अडकविलेला होता. त्यानें आपल्या हातानें तृण व धान्यें खाऊं घालून वाढविलेला पाळीव मृग त्याच्या मागून चालला होता. वृक्षाप्रमाणें त्यानें वल्कल धारण केलें होतें. पर्वताप्रमाणें त्यानें मेखला[१] धारण केली होती. राहूप्रमाणें तो सोमपान करणारा होता. अश्वत्थाम्याप्रमाणें सकृप[२] होता. नक्षत्र गणाप्रमाणें चित्रमृगकृत्तिकायुक्त[३] होता. ग्रीष्मऋतूप्रमाणें क्षपितदोष[४] होता. वर्षाऋतूप्रमाणें रजशांत[५] करणारा होता. विष्णूप्रमाणें नरकभय[६] दूर करणारा होता. राजाप्रमाणें मंत्रांनें[७] विग्रहताप[८] नाहींसा करणारा होता. तो अबद्ध[९] असून मोक्षार्थी[१०] सामयुक्त[११] असून दंडयुक्त[१२], व नेत्रद्वययुक्त असून त्यक्तवामलोचन[१३] असा होता!

---

१ मध्य भाग. मौंजी (तृणरज्जु). २ वल्लीविशेष, चंद्र. ३ चित्रा, मृग, व कृत्तिका नक्षत्रें, चित्रविचित्र मृगचर्म. ४ कमी केली आहे रात्र ज्यानें (ग्रीष्म) नष्ट केले आहेत दोष ज्यानें. ५ धूळ, रजोगुण. ६ दैत्य वि० नरक. ७ वेदमंत्र. ८ कलह, शरीर. ९ मोकळा, विरक्त. १० सुटण्याची इच्छा करणारा, मुक्ति इच्छिणारा. ११ सलोखी, सामवेद. १२ शिक्षा, दंड. १३ डावा डोळा, स्त्री.

सांधूंचीं मनें कारणावांचून दयारसानें भरलेलीं असतात. माझी तशी अवस्था त्या ऋषिकुमाराच्या दृष्टीस पडतांच त्याच्या अंतः-करणांत दया उत्पन्न झाली, आणि जवळ असलेल्या ऋषिकुमारास तो ह्मणाला, "अरे हें राघूचें पिलूं कांहीं कारणानें ह्या झाडावरून पडलेंसें दिसतें. याला अजून पुरते पंख देखील फुटले नाहींत. कदाचित् हें ससाण्याच्या तोंडांतून पडलें असावें याचें जीवित थोडें राहिलें आहे. यानें आपले डोळे मिटले आहेत. हें मोठमोठ्यानें श्वासोच्छ्वास सोडित आहे. हें वारंवार तोंडघशीं पडत आहे व चोंच वाशीत आहे. याला आपली मान सावरून धरण्याचें देखील अव-सान नाहीं! तर इकडे ये अगोदर, आणि जोंपर्यंत याच्यांत धुग-धुगी आहे तोंपर्यंत याला उचलून पाण्याजवळ घेऊन चल." असें बोलून त्यानें त्याजकडून मला सरोवराच्या कांठीं नेवविलें. सरोवराचे कांठीं आल्यावर त्या हारितऋषीनें आपला दंडकमंडलु खालीं ठेविला. मग माझी हालचाल न पाहून तो फारच बावरला आणि त्यानें मला आपल्या जवळ घेऊन त्या सरोवरांतील उदकाबिंदु आपल्या बोटानें माझ्या तोंडांत सोडले व माझ्या अंगावरही थोडें पाणी शिंपडलें. त्यामुळें मी थोडासा सावध झालों, असें पाहून त्यानें मला जवळच्या कमलिनीच्या थंड छायेंत ठेविलें आणि आपण स्नानादि क्रिया करण्याकरितां गेला. यथाविधि स्नान झाल्यावर त्यानें अनेक प्राणायाम करून अघमर्षण केलें. नंतर कमलिनीच्या पानांचा द्रोण करून व त्यांत रक्तकमळें घालून त्यानें सूर्याला अर्घ्य दिलें. आणि तो सरोवराच्या बाहेर पडला. नंतर त्यानें धुतलेलीं पांढरीं शुभ्र वल्कलें धारण केलीं. तेणेंकरून चंद्रिकेनें जसा सं-ध्याकाळ शोभतो तसा तो दिसूं लागला! मग त्यानें आपल्या जटा झाडून कमलांच्या परागानें सुगंधित झालेल्या सरोवरांतील उदकानें आपला कमंडलु भरून घेतला, आणि मलाही जवळ घेऊन तो तपो-वनाकडे हळू हळू चालला. इतर ऋषिकुमारही स्नान करून त्याच्या मागोमाग चालले.

कांहीं अंतरावर गेल्यावर एक अतिरमणीय आश्रम माझ्या दृष्टीस

पडला. त्या आश्रमाच्या सभोंवतीं दाट अरण्य होतें. त्या ठिकाणचीं फुलझाडें अनेक रंगाच्या फुलांनीं लगडलेलीं होतीं. ताल, तिलक, तमालहिंताल, बकुल, नारिकेल इत्यादि वृक्षांची त्या ठिकाणीं गर्दी होती. लोध्र, लवली, लवंग इत्यादि वृक्षांचे पल्लव जसे काय डोलतच आहेत असें दिसत होतें ! आम्रवृक्षांस मोहोर आले होते व त्यांवर भ्रमर गुंजारव शब्द करीत फिरत होते. कोकिलाही मधुर शब्द करीत बसल्या होत्या. केतकीचीं झाडें प्रफुल्लित झालीं होतीं. सुपारीच्या झाडांवरील लतांचे झोंपाळे करून त्यांवर वनदेवता बसून अधर्म विनाश सूचक अशी पुष्पवृष्टीच करताहेत काय असें भासत होतें. त्या देवतांचीं अंगें केवड्याच्या परागांनीं भरलींच आहेत असें भासे. वाऱ्याच्या झुळके बरोबर शुभ्र पुष्पें गळून पडत असल्यामुळें जशी काय नक्षत्रवृष्टिच होत आहे, असें भासत होतें ! त्या अरण्या शेजारींच दंडकारण्य आहे. त्या ठिकाणीं हरिणांचे कळप निर्भयपणें फिरत होते. स्थलकमलें प्रफुल्लित झालीं होतीं. दंडकारण्यांत भगवान् दाशरथी रामचंद्र राहिले होते. त्यावेळीं त्यांनीं आपल्या धनुष्याच्या टोकानें कंदमूळें उकरलीं होतीं, त्यामुळें जागजागीं खोलगे पडलेले दिसत होते ! तपोवनांतील या आश्रमाच्या सभोंवतीं जिकडे तिकडे मुनिजन दिसत होते. त्यांच्या शिष्यांपैकीं कोणी समिधा, कोणी दर्भ, कोणी फुलें, व कोणी मृत्तिका, घेऊन आश्रमाकडे येत होते. कोणी वेदशास्त्रांचे पाठ ह्मणत बसले होत. त्याचा एकसारखा घोष चालला होता. कमंडलु भरतांना त्यांचे मधुर शब्द होत होते त्यांस मेघध्वनि समजून मयूर नृत्य करीत होते. आश्रमांत जागजागीं होम चालले होते व त्यांचे धूर आकाशापर्यंत नीट वर चालले होते, तेणेंकरून हवनानें अग्नि संतुष्ट होऊन मुनिजनास स्वर्गास नेण्याकरितां धूमाच्या मिषानें हे जिनेच बांधित आहे काय, असें भासत होतें ! त्या आश्रमाजवळ मोठाल्या पुष्करिणी होत्या. त्यांतील उदक ऋषिजनांच्या संपर्कानेंच काय फारच निर्मल दिसत होतें. पुष्करिणीच्या तरंगांत सूर्याचीं प्रतिबिंबें हालत असल्यामुळें आकाशांतील सप्तर्षि

देखील या ठिकाणीं स्नानें करण्याकरितांच येतात काय, असें भासत होतें! त्या विहिरींतील शुभ्र कमलें प्रफुल्लित झाल्यामुळें हा ग्रहगणच स्नानाकरितां उतरला आहे काय! असें वाटत होतें. त्या ठिकाणच्या लतांचे शेंडे वायूच्या योगानें लवत असल्यामुळें त्या आश्रमास ते नमनच करीत आहेत काय! असें दिसत होतें. वृक्षावरील फुलें पडत असल्यामुळें ते वृक्ष ऋषिजनांचें पूजनच करीत आहेत काय! असें भासत होतें. आश्रमांच्या अंगणांत सावे वाळत घातले होते. कांहीं ठिकाणीं आवळे, हरपररेवड्या, लवंगा, बोरें, केळीं, आमसोलें, आंबोशी व तालफळें यांचा संग्रह केला होता. जिकडे तिकडे ऋषिकुमारांच्या अध्ययनाचा घोष ऐकूं येत होता. होमकाळीं नेहमीं वषट्कार शद्बांचा उच्चार होत असल्यामुळें तेथील रावू देखील त्यांचा वारंवार उच्चार करीत होते! वेदमंत्र नेहमीं ऐकूं येत असल्यामुळें तेथील सारिका देखील वेदपठण करीत होत्या! रानांतील पक्षि ऋषींनीं वैश्वदेवाच्या शेवटीं टाकलेले काकबळी भक्षण करीत होते. हरिणी आपल्या पल्लवासारख्या जिभांनीं मुनिबालकांस चाटीत बसल्या होत्या. होमकाळीं अग्नींत टाकलेल्या समिधा, घृत, इत्यादि पदार्थांचे चट चट व तड तड असे शब्द होत होते. रक्तचंदनानें काढलेल्या सूर्यप्रतिमेवर कण्हेरीचीं फुलें वाहिलीं होतीं. मुनिजनांच्या भोजनाच्या जागीं भस्माच्या रांगोळ्या घातल्या होत्या. संवईचे वानर अंध व वृद्ध ऋषींच्या काठ्या हातांत धरून त्यांस पाहिजे तिकडे नेत व आणित होते! हत्तीच्या छाव्यांनीं अर्धीं खावून टाकलेलीं मृणालें जागजागीं पडलीं होतीं. तीं जशीं कांहीं सरस्वतीचा वास तेथें असल्यामुळें तिच्या हातांतलीं हीं भूषणेंच पडलीं आहेत, असें दिसत होतें! हरणें आपल्या शिंगांनीं ऋषीकरितां रानांतील कंदमूळें उकरीत बसलीं होतीं! हत्ती आपापल्या सोंडेंत पाणी आणून वृक्षांचीं आळीं भरीत होते! रानडुकरांच्या दाढांत कमळांचे कंद अडकले होते, त्यांस ऋषिकुमार काढीत होते! मयूर आपल्या पंखांनीं वारा घालून होमकुंडांतील अग्नि पेटवीत होते! अग्नींत हवन केलेल्या चरुपुरोडाशाचा जिकडे

तिकडे सुगंध सुटला होता. अतिथि, देव आणि पितर यांचें पूजन सुरू होतें. कांहीं ठिकाणीं देवतांचें पूजन चाललें होतें. कोठें यज्ञादि विधीविषयीं 'भवति न भवति' चालू होती. कोणी धर्मशास्त्रांचें अवलोकन करित होते. अनेक शास्त्रांचे पाठ चाललेले होते. कोणी शास्त्रांतील विषय विचारीत होते. कोणी पर्णशाला बांधीत होते. कोणी अंगण सारवीत होते. कोणी आश्रम झाडीत होते. कोणी ध्यान करीत बसले होते. कोणी मंत्र साधन करीत होते. कोणी योगाभ्यास करीत होते. कोणी देवतांना बळि अर्पण करीत होते. कोणी मुंजतृणाचें कटिसूत्र करीत होते. कोणी वल्कलें धूत होते. कोणी समिधा नीट करून ठेवीत होते. कोणी कृष्णाजिनें साफ करीत होते. कोणी तृणधान्यांचा संग्रह करीत होते. कोणी कमलाक्षांच्या व रुद्राक्षांच्या माळा करीत होते. कोणी त्रिपुंड्र लावीत होते. कोणी कमंडलु भरीत होते. याप्रमाणें त्या ठिकाणीं मुनिजनाचे अनेक व्यापार चालले होते. आश्रमाजवळच हरणें व गाई स्वच्छंदपणानें चरत होत्या. कलिकालाचा व अनृताचा जेथें संपर्क नव्हता. सांख्य शास्त्राप्रमाणें कपिला[1]धिष्ठित, उदयनाप्रमाणें वत्सकुलास[2] आनंद देणारा, मतंगा[3]श्रित असून पवित्र; धूमकेतूंचा संचार तेथें असून निरुपद्रव द्विजपति[4] मंडळानें सुशोभित असून वृक्षांधकारानें युक्त. असा तो ब्रह्मलोकासारखा आश्रम माझ्या दृष्टीस पडला !

त्या ठिकाणीं होमधूमांत मात्र मलिनता होती, आचरणांत नव्हती! शुकांच्या मुखावर मात्र राग (लाली) होता, दुसऱ्या कोणाला राग (विषयाभिलाष) नव्हता! कदलीच्या पर्णांत मात्र चंचलता होती कोणाच्या मनांत नव्हती! कमंडलूचे मात्र कंठग्रहण होतें. दुसरे कोणाचें (कंठग्रहण) होत नव्हतें ! मयूरांचे ठिकाणीं मात्र पक्षपात (पिसारा गळणें) होता एरव्हीं कोठें पक्षपात नव्हता ! प्रदक्षिणा

---

१ कपिलऋषि, गाई. २ विशेषनाम, वासरें. ३ चांडाळ, हत्ती. ४ ब्राह्मण, चंद्र.

काळीं मात्र भ्रांति (भ्रमण) होती. शास्त्रांत नव्हती ! स्वर्गलोकच्या कथाप्रसंगीं मात्र वसुवर्णन होतें एरव्हीं वसुवर्णन (द्रव्याचें वर्णन) होत नव्हतें! रुद्राक्षांची मात्र गणना होती. देहांची गणना (काळजी) कोणास नव्हती ! रामायणाचे योगानें रामावर (दाशरथी) मात्र आसक्ती होती, यौवनाचे योगानें रामावर (स्त्रियांवर) नव्हती ! भारत कथेंत मात्र शकुनि वध होता, एरव्हीं शकुनि (पक्षी) वध नव्हता. हरिणांना मात्र गीतव्यसन, मयुरांना मात्र नृत्यव्यसन, वानरांना मात्र श्रीफला (नारळ, लक्ष्मी) भिलाष होता, मुनिजनांला कशाचाच अभिलाष नव्हता ! वृक्षांच्या मूलांस मात्र अधोगति होती, इतरांस अधोगति (नरक) नव्हती !

अशा त्या आश्रमाच्या मध्यभागीं एक सुंदर अशोक वृक्ष होता. त्याचे पल्लव आळित्यासारखे लाल होते. त्याच्या फांद्यास ऋषींनीं कृष्णाजिनें व उदकानें भरलेले कमंडलु अडकविले होते. त्याच्या मुळाशीं ऋषिकन्यांनीं हळद वगैरे मंगलद्रव्यांनीं स्वस्तिकादिक काढलीं होतीं. त्या वृक्षाच्या आळ्यांतील पाणी हरिणांचीं पाडसें स्वच्छंदपणानें पीत होतीं. मुनिबालकांनीं खेळण्याकरितां दर्भांच्या व झाडांच्या सालींच्या दोऱ्या झाडांस बांधल्या होत्या. त्या वृक्षाच्या खालची जागा गाईच्या हिरव्यागार शेणानें सारविली होती व तेथें देवपूजेकरितां पुष्पें राहिलीं होतीं, तेणेंकरून फारच शोभा दिसत होती.

तो वृक्ष फार मोठा नसून वाटोळा गरगरीत होता. त्याच्या खालीं भगवान् जाबालीऋषि बसले होते. ते माझ्या दृष्टीस पडले. सप्त समुद्रांनीं जसें भूमंडळ, कुलपर्वतांनीं जसा मेरुपर्वत, अनेक होमकुंडांनीं जशी यज्ञदेवता, द्वादशसूर्यांनीं जसा प्रलयकाळ; तसा तो तेजस्वी महर्षि ऋषिमंडळानें वेष्टित असल्यामुळें दिसत होता. त्या महर्षींचा देह जरेनें शुभ्र झाला होता. डोकें पांढरें दिसत होतें. शरिरास थोडा कंप होता त्यामुळें महर्षींच्या शापभयानें ती जरा थरथर कांपतच आहे काय ! व लाडक्या बायकोप्रमाणें तिनें केश

---

१ अष्टवसु (देवविशेष) द्रव्य.

ग्रहणच केले आहे काय! किंवा तपस्विनीप्रमाणें तिनेंही शुभ्र भस्मच धारण केलें आहे काय! असें भासत होतें. महर्षींच्या मस्तकावरील शुभ्र जटा लांब लांब होत्या त्यामुळें तपश्चर्येच्या योगानें सर्वऋषिजनांस जिंकल्यामुळें ह्या धर्मपताकाच उभारिल्या आहेत काय! किंवा स्वर्गास चढून जाण्याकरितां ह्या पुण्यरज्जुच संपादन केल्या आहेत! अथवा तपोरूप पुरातन वृक्षाच्या ह्या मंजुऱ्याच गोळा केल्या आहेत काय! अशा त्या ऋषीच्या जटा दिसत होत्या. महर्षीनें आपल्या कपाळावर भस्माचा त्रिपुंड्र लावला होता त्यामुळें गंगेचे तीन प्रवाह ज्यावरून चालले आहेत. अशा हिमालयाच्या शिलातलाप्रमाणें तें दिसत होतें! चंद्रकलासारख्या त्याच्या कपाळावरच्या जटा भुवयांवर लोंबत होत्या. व भुवया डोळ्यांवर लोंबत होत्या. महर्षीच्या मुखावाटें वेदपठण चाललें असल्यामुळें, त्यांच्या स्वच्छ दंतांचे किरण झळकत होते; ते सत्याचे अंकुरच आहेत काय! कां स्वच्छ इंद्रिय वृत्तीच आहेत! कां विद्यागुणच आहेत, कां करुणारसाचे पाझरच आहेत, असें भासत होतें. आणि त्यामुळें मुखावाटें गंगाप्रवाह सोडून देणाऱ्या जन्हु राजासारखा तो दिसत होता. सोमवल्लीचा रस प्राशन केल्यामुळें त्याच्या सुगंधानें महर्षीच्या तोंडापुढें भ्रमर येत असल्यामुळें ही मूर्तिमंत शापाक्षरेंच ऋषीच्या पुढें उभीं आहेत काय! असें वाटत होतें. मुनीची मूर्ति कृश होती, गाल बसले होते, नाक उंच होतें, डोळ्यांतील बाहुल्या वक्र दिसत होत्या, पापण्याचे केस झडल्यामुळें त्या विरळ दिसत होत्या. कानावरील केसांनीं (कानांचीं) भोकें झांकून गेलीं होतीं. हनवटी वरील केस (दाढी) नाभीपर्यंत लोंबत होते. त्याच्या अंगावर स्पष्ट शिरा दिसत होत्या, त्या इंद्रियरूप चपल अश्वास बांधण्याकरितां ह्या दोऱ्याच ठेविल्या आहेत काय! किंवा महर्षिरूप कल्पवृक्षावर ह्या वल्लीच पसरल्या आहेत काय! असें वाटत होतें. त्याच्या खांद्यावर शुभ्र यज्ञोपवीत लोंबत होतें. त्याच्या उजव्या हातांत स्वच्छ स्फटिकमण्यांची माळ होती व जप करतांना तींतील मणि ओढण्याचें काम

चालले होते. ती माळ सरस्वतीच्या गळ्यांतील मौक्तिकांचा कंठाच आहे काय! अशी दिसत होती. तारकाचक्रास फिरविणारा हा दुसरा ध्रुवच आहे काय! असा तो ऋषि माळ फिरवीत असतांना दिसत होता. त्याच्या अंगावरची वस्त्रें फारच शुभ्र दिसत होतीं, तेणेंकरून तीं चंद्रकिरणांनीं, किंवा अमृताच्या फेसांनीं, किंवा दया, सत्य इत्यादि सद्गुणांनींच निर्माण केलीं आहेत काय! असें भासत होतें. त्याच्या जवळच गंगोदकानें भरलेला स्फटिकाचा कमंडलु तिवईवर ठेवला होता तो प्रफुल्लित कमलावर राजहंस जसा दिसतो तसा शोभत होता! तो महर्षि स्थैर्यानें पृथ्वीसारखा, गांभीर्यानें समुद्रासारखा, तेजानें सूर्यासारखा, शांतीनें चंद्रासारखा, स्वच्छपणानें निर्मळ आकाशासारखा होता. तो गरुडाप्रमाणें द्विजपति[1], ब्रह्मदेवासारखा आश्रमगुरु[2], बृहस्पतिसारखा संवर्धितकच[3], शंतनूप्रमाणें प्रियसत्यव्रत[4], व शंकराप्रमाणें भस्मपांडुर असा होता.

अशा त्या महर्षीस पाहिल्यावर माझ्या मनांत आलें कीं काय ह्याच्या तपश्चर्येचें सामर्थ्य! मूर्ति शांत असून कशी तप्तसुवर्णाप्रमाणें तेजस्वी दिसत आहे! अंगाची कांति कशी विद्युल्लतेप्रमाणें डोळे दिपवीत आहे, व भय उत्पन्न करीत आहे साधारण तपस्व्याचें तेज देखील दुःसह असतें. मग सर्व जग ज्याचें वंदन करीत आहे, तपोरूपजलानें ज्यानें पापमळ धुऊन टाकला आहे, जो आपल्या दिव्यदृष्टीनें करतलामलकाप्रमाणें सर्व विश्व पाहत आहे, अशा समर्थ महर्षि जाबालीचें तेज असह्य ह्मणून काय नवल आहे? ज्याचें नामस्मरण केलें असतां देखील पापाचा क्षय होतो, मग दर्शन झाल्यावर काय सांगावें? असला थोर महर्षी येथें वास करीत आहे तेव्हां हें आश्रमपद धन्य आहे! येथील हे सर्व ऋषिही धन्य आहेत! कारण हे रात्रंदिवस ब्रह्मदेवासारख्या ह्या महर्षीचें समागमसुख घेत आहेत, आणि त्यानें सांगितलेल्या पुण्यकारक कथा श्रवण करून त्याची सेवा करीत आहेत. सदा प्रसन्न राहणाऱ्या अशा

१ पक्षी, ब्राह्मण. २ चार आश्रम, मठ. ३ बृहस्पति पुत्र. ४ भीष्म, खरे व्रत.

ह्या महर्षीच्या मानसांत राजहंसाप्रमाणें वास करणारी सरस्वती ही धन्य होय! ब्रह्मदेवाच्या मुखकमलांत वास करणाऱ्या वेदांनीं फार दिवसांनीं हें दुसरें योग्य स्थान संपादिलें! शरदृतूप्रमाणें स्वच्छता करणाऱ्या अशा ह्या महर्षीच्या समागमामुळें कलिमेघानें गढूळ केलेल्या सर्व विद्यारूप नद्या निर्मळ झाल्या. येथें सुखरूप राहणाऱ्या व कलिकालाचा संपर्कही न लागणाऱ्या धर्मास कृतयुगाचेंही स्मरण होत नसेल! ह्या महर्षीनें पृथ्वीतल सुशोभित केलें असल्यामुळें माझे ठायींच थोर सप्तर्षि आहेत असा आकाशास अभिमान होता तो आतां दूर झाला! त्याची जरा पाहून मला वाटलें, कायहो धाडशी ही जरा आहे! फेंसानें अधिकच शुभ्र दिसणारी अशी गंगा जशी शंकराच्या जटाजुटांत रहाते किंवा अग्नीच्या ज्वालांत दुग्धाहुति जशी उडी टाकिते! तशी, प्रलयकाळच्या सूर्याप्रमाणें ज्याकडे पहावत नाहीं असें ज्याचें तेज आहे, त्या महर्षीच्या चंद्रकिरणाप्रमाणें शुभ्र जटाभारांत ही खुशाल वास करिते!! आश्रमांत जिकडे तिकडे होमधूर चालल्यानें उन्हाचा कडकपणा वाटत नसल्यामुळें, ह्या आश्रमांत सूर्य आपलें प्रखर तेज पाडीतच नाहीं असें वाटत होतें. वायूनें ज्वाला हालत असल्यामुळें हात पुढें करून अग्नि हविर्द्रव्येंच घेत आहे, काय असें वाटत होतें! आश्रमांतील पुष्पलता हळुहळू हालत असल्यामुळें येथें वायु भयानेंच जपून वाहत आहे काय! असें वाटत होतें. पंचमहाभूतांचें देखील वर्चस्व असल्या तेजावर चालावयाचें नाहीं. ह्याच्या योगानें पृथ्वीतल दोन सूर्यांनींच युक्त आहे असें भासत होतें व ह्याच्या योगानेंच पृथ्वी अचल आहे असें वाटत होतें. करुणारसाचा जणूं प्रवाह, संसारसमुद्र तरण्याला सेतुच, संतोषामृताचा सागर, मोक्षसिद्धीचा उपदेश करणारा, दुष्ट ग्रहांचा अस्तपर्वत, शांतीचा मूलवृक्षच, लोभसमुद्राला वडवाग्नि, शास्त्ररत्नांची खाणच, धर्मसुवर्णाची कसोटी, विषयवासनारूपलतेस दावानल, क्रोधसर्पाचा महामंत्र, मोहांधकाराला सूर्य, नरकद्वाराचा अडसर, सदाचाराचें गृह, मंगलाचें स्थान, सन्मार्गाचा दर्शक, कलीचा शत्रु, तपोधनाचें भांडार, सत्याचा सखा, पुण्याचा उगम, असा तो महर्षि होता.

ह्या ऋषीच्या प्रभावानें हें अरण्य कसें निर्वैर झालें आहे! तेव्हां केवढा हा थोर पुरुषांचा महिमा आहे! या ठिकाणीं पहा, कसे एकमेकांचे हाडवैरी असून पशु आणि पक्षी वैर सोडून शांतपणानें सुखानुभव घेत आहेत! प्रफुल्लित कमलवनाचें अनुकरण करणाऱ्या शेंकडो सुंदर डोळ्यांनीं सुशोभित दिसणाऱ्या अशा मयूरांच्या पिसाऱ्यांत हा सर्प, नवीन फुटलेल्या गवतांत रहावें, त्याप्रमाणें खुशाल राहतो आहे! सिंहबालकाशीं मिळून मिसळून वागणारा असा हरिणबालक, आपल्या आईला सोडून ज्याच्यांतून दूध गळत आहे असा सिंहिणीचा स्तन निर्भयपणें पीत आहे! हे हत्तीचे छावे कमलतंतूची शंका उत्पन्न करणाऱ्या अशा सिंहाच्या मानेवरील सटा खुशाल ओढीत आहेत, व तेणेंकरून सिंह सुखावल्यासारखे दिसत आहेत! हे वानर कसे आपला स्वाभाविक चपलपणा सोडून स्नान केलेल्या ऋषिकुमारांस फुलें आणून देत आहेत! मदोदकाचें प्राशन करीत भ्रमरांचे समुदाय मस्तकावर बसले आहेत तरी, सदयपणानें हत्ती आपल्या कर्णांनीं त्यांचें निवारण करीत नाहींत! फार काय सांगावें? जे रात्रंदिवस अग्निहोत्रांच्या धुरांनीं अंगावर कृष्णाजिनें घेतल्यासारखे दिसत आहेत, व ज्यांनीं वल्कलें धारण केलीं आहेत, परोपकारार्थ ज्यांनीं कंदमूल फळांचा संग्रह केला आहे, असे हे अचेतन वृक्ष देखील ह्या महर्षीच्या सान्निध्यानें तपस्वी बनले आहेत! मग सचेतन झाले आहेत यांत आश्चर्य तें कोणतें?

अशा प्रकारें अनेक विचार माझ्या मनांत चालले होते तों हारितऋषीनें मला त्याच अशोकवृक्षाच्या छायेंत एक्या बाजूस ठेविलें, आणि आपल्या पित्याचें वंदन करून तो त्याजवळ दर्भासन मांडलें होतें त्यावर बसला. मला पाहून त्या सर्व ऋषींनीं, "हा शुकबालक कोठून आणला?" असें हारितऋषीस विचारिलें. तो म्हणाला, "मी स्नान करण्याकरितां चाललों होतों तों वाटेंत हा सरोवराजवळच्या एका झाडावरच्या घरट्यांतून खालीं पडला होता. हा उन्हानें फारच घाबरा झाला होता. उंचावरून पडल्यामुळें हा अगदीं मरायास टेंकला होता. आम्हां सारख्यांस तो वृक्ष चढतां येण्यासारखा

नसल्यामुळें यास पुन्हा झाडावरच्या घरट्यांत ठेवतां येइना. तेव्हां मला याची दया येऊन मी ह्यास येथें आणिलें आहे, तर यास चांगले पंख फुटून आकाशांत उडण्याची शक्ति येईपर्यंत यास आपल्या आश्रमांतील एखाद्या झाडाच्या कोट्यांत ठेवून देऊं, आणि तृणधान्याचे कणवफळें याला खावयास देऊन वाढवूं. कोणीकडून तरी हा वांचो ह्मणजे झालें. अनाथाचें पालन करणें, हा आमच्या सारख्यांचा धर्मच आहे. याला पंख फुटून हा आकाशांत हिंडूं फिरूं लागण्यासारखा झाला ह्मणजे मग पाहिजे तिकडे जावो, किंवा आपली संवय झाल्यामुळें पाहिजे तर येथें राहो." या प्रकारचें भाषण ऐकून भगवान् **जाबाली** मान वळवून मजकडे कौतुकानें पाहूं लागला. तेव्हां तो आपल्या पुण्यजलांनीं मला धुऊन निर्मळच करीत आहे काय! असें वाटलें. बराच वेळ शांत दृष्टीनें मजकडे पाहिल्यावर खूण पटल्यासारखें करून "हा आपल्या दुर्वृत्तपणाचें फळ भोगीत आहे." असें तो ह्मणाला. भगवान् **जाबाली** हा भूत, भविष्य, वर्तमान जाणणारा आपल्या तपश्चर्येच्या सामर्थ्यानें समोर असल्याप्रमाणें सर्व जगांतील व्यवहार जाणणारा असा होता. यामुळें त्याचें भाषण ऐकतांच त्याचें सामर्थ्य जाणणारी ती ऋषि-मंडळी चकित होऊन विचारूं लागली, "भगवान् या शुकानें पूर्व-जन्मीं असें कोणतें दुष्कर्म केलें होतें! हा कोण होता? पक्षी जातींत हा कसा जन्मला? व याचें नांव काय? इत्यादि सविस्तर वर्तमान ऐकण्याविषयीं आह्मांला मोठें कौतुक वाटत आहे, याकरितां कृपा करून सर्व सांगून आमची इच्छा पूर्ण करावी. सर्व आश्चर्य-कारक गोष्टी आपण जाणतच आहा."

याप्रमाणें त्या ऋषिमंडळीनें त्या महर्षीची विनंती केल्यावर तो ह्मणाला, "हें आश्चर्यकारक वर्तमान फार मोठें आहे, आतां दिवस फार थोडा राहिला आहे, माझी स्नानाची वेळ झाली; तुमची देखील देवपूजा करण्याची वेळ झाली, तर उठा आतां, आणि आपापली कर्में करा. फळाहार झाल्यावर हा कोण होता, यानें पूर्वजन्मीं काय केलें व हा ह्या जन्मास कसा आला, हें सर्व मी

तुह्मांस पहिल्यापासून सांगेन. ह्या शुकबालकासही खाण्यापिण्यास घालून याची ग्लानि दूर करावी. मी याचें वर्तमान सांगूं लागलों ह्मणजे एखादा जागा झाला ह्मणजे जशा त्याला स्वप्नांतल्या गोष्टी आठवतात त्याप्रमाणें याला सर्व गोष्टींचें स्मरण होईल." असें बोलत ते महर्षि त्या ऋषि मंडळीसह स्नानादिकर्में करण्यास उठून गेला.

त्या समयीं सूर्यास्त होण्याची वेळ जवळ आली होती, सर्व ऋषि मंडळींनीं स्नानें करून रक्तचंदनामिश्रित उदकाचीं सूर्यास अर्घ्यें दिलीं, त्या मुळेंच सूर्य आरक्तवर्ण दिसूं लागला काय ! असें दिसलें. सर्व ऋषि वर दृष्टि करून सूर्याचें ध्यान करीत उभे राहिले. त्यामुळें ते आपल्या नेत्रांनीं सूर्य तेज ग्रहण करित असल्यामुळेंच तें कमीकमी होत चाललें आहे काय ! असें वाटलें. आकाशांत आतां सप्तर्षि येणार तेव्हां त्यांस आपला पादस्पर्श होऊं नये ह्मणूनच सूर्यानें आपले पाद (किरण) आवरून घेतलेसें भासलें. पश्चिम समुद्राकडे तांबडें लाल सूर्यबिंब दिसूं लागलें. तेव्हां महासागरांत निद्रा करणाऱ्या विष्णूच्या नाभिकमलाचें हें प्रतिबिंबच आहे काय असें भासलें ! त्यावेळीं सूर्यकिरण पक्ष्यासारखें पृथ्वीतल व कमलवनें सोडून झाडांच्या व पर्वतांच्या शेंड्यावर जाऊन बसले ! आश्रमांतील वृक्षांवर थोडीं थोडीं लाल उन्हें दिसत होतीं, त्यामुळें हीं ऋषींनीं आपलीं वल्कलेंच झाडांवर वाळत घातलीं आहेत काय ! असें दिसत होतें. सूर्यास्त झाल्यावर संध्याकाळची लाली चोहींकडे पसरली होती, ती जणू काय पश्चिम समुद्राच्या तीरावर उगवलेली पोंवळ्यांची वेलच पसरली आहे काय! असें दिसत होतें. अशा वेळेस त्या आश्रमांत कांहीं ऋषि ध्यान करीत बसले होते, कोणी होमाकरितां गाईचें दूध काढीत होते, कोणी होमशाळेंत दर्भ पसरीत होते. ऋषींच्या मुली देवपूजेचीं साहित्यें तयार करीत होत्या. अशा प्रकारचीं अनेक कर्में त्या ठिकाणीं चाललीं होतीं. विलास क्रीडा करून आल्यामुळें रक्ततारका झालेली संध्या तपोवनांतील कपिला

१ पायकिरण. २ नक्षत्रें, डोळ्यांतील बाहुल्या.

गाईप्रमाणें कृष्णवर्ण दिसूं लागली ! आपला पति सूर्य गेल्यामुळें विरक्त होऊन कमलिनींनीं कमलगुच्छरूप कमंडलूच धारण केले आहेत, व हंसपंक्तिरूप शुभ्र वस्त्रेंच धारण केलीं आहेत, आणि भ्रमर पंक्तिरूप रुद्राक्षमालाच घेतल्या आहेत काय ! असें वाटत होतें. सूर्यानें आकाशांतून पश्चिम समुद्रांत उडी टाकल्यामुळें हे जलबिंदूच उडाले आहेत काय, किंवा देवांगनांनीं संध्याकाळीं पूजन केल्यामुळें हीं पुष्पेंच वाहिलीं आहेत काय अशीं नक्षत्रें आकाशांत दिसूं लागलीं ! ऋषींनीं अर्घ्ये सोडल्यामुळेंच संध्याकाळची सर्व लाली धुऊन गेली असें दिसलें ! संध्यासखीचा नाश झाल्यामुळेंच दुःखित झालेल्या रात्रीनें अंधकाररूप कृष्णाजीनच धारण केलें आहे काय असें भासलें ! मुनिजनांच्या हृदयावांचून अंधकारानें जिकडे तिकडे काळोखी आणिली. आपल्या मित्राचा अस्त झालासें समजतांच विरक्त होऊन शुभ्रधौत वस्त्रें परिधान करून तारकास्त्रिया सहवर्तमान चंद्र ज्या ठिकाणीं सप्तर्षींचें मंडळ वास करीत आहे, व अरुंधतीच्या संचारानें पवित्र अशा आकाशरूप आश्रमांत रहावयास आला. चंद्रशेखर शिवाच्या मस्तकापासून शुभ्रगंगा भूतलावर पडून जशी वाहते ते,त्याप्रमाणें चंद्रभूषित अशा आकाशापासून पृथ्वीतलावर चंद्रिका पडून चोहींकडे पसरूं लागली. शुभ्र कमलांनीं सुशोभितच काय अशा चंद्ररूप सरोवरांत जलप्राशनाकरितां उतरलेला हरिण अमृतकर्दमांत रुतूनच राहिलासें भासलें ! अंधकाररूपमेघ दूर गेल्यामुळें हंसाप्रमाणें चंद्रकिरणांनीं प्रफुल्लितकमलांनीं युक्त अशीं सरोवरें व्यापिलीं ! चंद्र जसजसा वर येत चालला तसतसें सर्व जग शुभ्र दिसूं लागलें. वायु सुगंध घेऊन मंद मंद वाहूं लागला. आश्रमांतील मृग सुखकारक हवेनें सुखावल्यासारखे होऊन व झोंपेनें आळसलेले होऊन डोळे मिटून रवंथ करीत बसले.

सुमारें चार घटका रात्र झाली. माझें खाणेंपिणेंही आटोपलें. तेव्हां हारीतऋषि मला घेऊन आपला पिता बसला होता त्या ठिकाणीं गेला. त्याच्या बरोबर सर्व ऋषीही त्या ठिकाणीं आले. त्यावेळीं स्वच्छ चांदणें पडल्यामुळें तें स्थान फारच रमणीय दिसत होतें. जा-

बालीऋषि वेतानें विणलेल्या आसनावर स्वस्थ बसला होता. जा- लपाद नामाचा शिष्य त्याचे जवळ उभा होता, व तो ताडपत्रानें त्यांस वारा घालीत होता. नंतर हारीत आपल्या पित्यास म्हणाला, "ह्या शुकबालकाचें आश्चर्यकारक वर्तमान ऐकण्याविषयीं अत्यंत उत्कंठित झालेली ही सर्व ऋषिमंडळी येथें मंडळाकार येऊन बसली आहे. हा शुकबालकही खाऊं पिऊं घालून श्रमरहित केला आहे. याकरितां हा पूर्व जन्मीं कोण होता? यानें काय केलें? व पुढें याचें काय होणार? हें कृपा करून सांगावें. असें आपल्या पुत्राचें भा- षण ऐकून जाबालीऋषि मजकडे पाहून व ती सर्व ऋषिमंडळी कथा- भाग ऐकण्याविषयीं उत्कंठित झाली आहे असें पाहून, "तुम्हां सर्वांस जर मोठें कौतुक वाटत आहे तर सांगतो, ऐका." असें म्ह- णून सांगूं लागलाः—अवंती देशांत उज्जयिनी नांवाची एक नग- री आहे. सर्व त्रैलोक्यांत अशी दुसरी नगरी नाहीं, इतकी ती उत्तम आहे. तिच्या सभोंवतीं मोठा खंदक आहे. त्रिभुवनाची उत्पत्ति स्थिति आणि नाश करणाऱ्या महाकालनामक शंकरानें आपल्याला रहाण्याकरितां दुसरी पृथ्वीच निर्माण केली आहे काय! असें समजून तिच्या सभोंवतीं हा गंभीर समुद्रच पसरला आहे काय असा त्या ठिकाणीं खंदक दिसत आहे. भगवान महाकाल येथें वास क- रीत असल्यामुळें त्याच्या सेवेकरितां उंच उंच शिखरांनीं विराजित असा कैलासपर्वतच येऊन तेथें राहिला आहे काय! असा त्या नग- रीं सभोंवतीं कोट आहे. त्या नगरींत मोठमोठे बाजार भरतात त्यांत शंख, मोत्यें, पोंवळीं, पाचू इत्यादि रत्नांचे ढिगांशींढीग लागलेले असतात. तेथील विस्तीर्ण बाजार दृष्टीस पडले म्हणजे अगस्त्य ऋषीनें जलप्राशन केल्यामुळें कोरडे पडलेले हे समुद्रच आहेत काय असें वाटतें. त्या नगरींत पुष्कळ चित्रशाळा आहेत, त्यांत देव, दैत्य सिद्ध, गंधर्व, व विद्याधर यांचीं हुबेहूब चित्रें काढलेलीं आहेत. त्यामुळें ह्या नगरींत नेहमीं महोत्सव चालू असतो, तो पहाण्याकरितां स्वर्गांतूनच हे सर्व आले आहेत काय! असें वाटतें. तेथील देवा- लयाचे कळस सुवर्णाचे आहेत, व त्यांवर शुभ्रध्वज उभारलेले अ-

सून ते वायूच्या योगानें हालत असल्यामुळें ज्यावर गंगेचे प्रवाह चालले आहेत, अशींहीं हिमालयाचीं शिखरेंच आहेत काय! असें भासतें. बगीच्यांत विहिरींजवळ चुनेगचीं ओटे बांधलेले असून त्यांजवळ राहाटगाडगीं चालत असल्यामुळें झाडांच्या मुळाशीं पाणी खेळत असतें, त्यामुळें त्या नगरीच्या बाहेरचे प्रदेश सुशोभित दिसतात. घरोवरही लहान लहान बगीचे आहेत, व त्यांवर भ्रमरांचे गुंजारव चालू असतात, पुष्पांतील सुगंध घेऊन वारा वाहत असतो. घंटांनीं व मत्स्यचिन्हांनीं युक्त अशा पताका उभारलेल्या असून त्या वाऱ्यानें फडफड उडत असतात, त्यामुळें **मकरध्वज** जो मदन त्याच्या सन्मानाकरितांच ह्या पतका उभारल्या आहेत काय! असें दिसतें. त्या ठिकाणच्या जलमंदिरांत गानकाळीं मेघगर्जनेप्रमाणें मृदंग वाजत असल्यामुळें, पर्जन्याप्रमाणें कारंजांचे फवारे उडत असल्यामुळें, आणि फवाऱ्यांत सूर्यकिरण इंद्रधनुष्याप्रमाणें अनेक रंगीं दिसत असल्यामुळें, पर्जन्यकालचा भास होऊन मोर आपले पिसारे पसरून शब्द करीत असतात! तेथील सरोवरें हजारों कमलांनीं सुशोभित असल्यामुळें सहस्रनेत्र इंद्र जसा दिसतो तशीं तीं दिसतात. उदकावरील फेसाप्रमाणें शुभ्र अशीं ठिकठिकाणीं मंदिरें असून तीं चोहींकडून केळींच्या मळ्यानीं शोभायमान दिसतात. त्या **उज्जयनी**नगरीस ठेपूनच **शिप्रा**नदी वाहते. तिच्या प्रवाहांत उंच उंच लाटा उसळतात, तेणेंकरून महाकालशंकराच्या मस्तकावर बसलेल्या गंगेस पाहून ईर्षेनें तरंगरूप भुवया वांकड्या करून आकाशापर्यंत ती उसळतेच आहे काय असें दिसतें! त्या ठिकाणचे लोक मैनाकाप्रमाणें पक्षपात[1] रहित, गंगेप्रमाणें सुवर्णपद्म[2]युक्त, शूर असून नम्र, मधुर भाषण करणारे असून सत्यप्रिय, परलोकाचें[3] भय बाळगणारे असून परलोकाचें[4] भय न बाळगणारे, वसंत वायुप्रमाणें दक्षिण[5], हिमालयाप्रमाणें अंतःसरळ[6], लक्ष्मणाप्रमाणें रामासक्त,

१ मैनाकपर्वतास पंख आहेत असें मानलें आहे. २ चांगल्या वर्णाची कमलें, सुवर्णनिधि. ३ स्वर्ग. ४ शत्रु. ५ दक्षिणेकडून वाहणारे, उदार. ६ सरळस्वभावाचें, देवदारयुक्त.

शत्रुघ्नाप्रमाणें [1]भरतयुक्त, दिवसाप्रमाणें सन्मित्रें[2] विराजित, सांख्य शास्त्राप्रमाणें *प्रधानपुरुषगुणयुक्त असे होते. तशी ती नगरी गरुडाप्रमाणें अच्युतस्थिति, गौरीप्रमाणें सिंहासनयुक्त, [3] अनुरक्तवर्णे[4] असून सुधाधवल[5], मुक्तालंकृत असून विहारभूमी[6], अशी होती. त्या ठिकाणीं वाड्यावरच्या उंच उंच मंदिरांत बसून गायनकरणाऱ्या स्त्रियांच्या गायनास मोहित होऊन सूर्याच्या रथाचे घोडे खालीं ओढ घेताहेतसें दिसतें, व सूर्य दररोज महाकालेश्वरास नमस्कार करतोसें वाटतें. त्या नगरींतल्या माणकाच्या फरसबंदीवर सूर्याचे किरण पडले ह्मणजे संध्याकाळच्या लालीप्रमाणें ते दिसतात ! ते पाचूच्या ओट्यावर पडतात तेव्हां कमलिनीशीं संगत झाल्यासारखे दिसतात ! कृष्णागरुधूपावर पडतात तेव्हां अंधकाराचा नाश करण्याकरितां झटत आहेत काय असें दिसतात ! मौक्तिकहारावर पडल्यामुळें नक्षत्रमंडळाचा पराभव करीत आहेत काय ? सुंदर स्त्रियांच्या मुखावर पडल्यामुळें प्रफुल्लितकमलांचें चुंबनच करीत आहेत काय ! स्फटिकांच्या भिंतीवर पडल्यामुळें चंद्रिकेशीं संलग्न झाले आहेत काय ! शुभ्र पताकांवर पडल्यामुळें भागीरथीच्या तरंगांत पोहतच आहेत काय ! सूर्यकांतमण्यावर पडल्यामुळें जसें काय त्यांस पल्लवयुक्तच करीत आहेत काय ! इंद्रनीळमण्याच्या खिडक्यांत शिरल्यामुळें राहूच्या मुखांतच शिरले आहेत काय ! असे दिसतात. त्या नगरींत नेहमीं प्रकाश असल्यामुळें चक्रवाक पक्ष्यांस अंधारामुळें होणारा विरहताप होत नाहीं. त्या ठिकाणीं स्त्रियांच्या भूषणावरील रत्नांच्या प्रभा जशा मदनाग्नीच्या ज्वालाच आहेत काय अशा दिसतात ! नेहमीं प्रकाश असल्यामुळें रात्रीं दिवे व्यर्थ लावले आहेत असें वाटतें ! अत्युच्च देवालयाच्या शिखरांवरील स्वच्छ पताका आकाशांत वाऱ्यानें हालत असल्यामुळें त्या माळव्यांतील सुंदर स्त्रियांच्या निर्मळमुखांनीं लज्जित झालेल्या चंद्राचा कलंक

---

१ नाट्याचार्य (पक्षी). २ मित्र, सूर्य. ३ विष्णु, भ्रष्ट न होणारी. ४ लालवर्ण, प्रेमानेंयुक्त असे वर्ण ब्राम्हणादिक. ५ चुना. ६ मुक्ताहाररहित, क्रीडाभुवन. * प्रकृति, ईश्वर, सत्व, रज, तमोगुण.

आडूनच टाकीत आहेत काय असें भासतें! तेथील गच्च्यांवर चंदनाचे सडे टाकवून तेथें निजलेल्या सुंदर स्त्रियांचे मुखांस पाहिल्यामुळें मदनाग्नीनें दग्ध झालेला चंद्र प्रतिबिंबमिषानें तेथील गच्च्यांवर लोळतच आहे काय असें वाटतें! पहाटेस जागे झालेल्या रावूंचे मंगलशब्द, गृहसरोवरांतील पक्ष्यांची ओरडणीं, आणि संचार करणाऱ्या स्त्रियांच्या भूषणांचे मधुरध्वनि हे चालू असल्यामुळें ऐकूं येत नाहींत असें होतें! ज्यानें आपल्या शूळानें अंधकासुराचें विदारण करून टाकलें, ज्यानें आपल्या मस्तकावर चंद्र धारण केला, ज्यानें त्रिपूरदैत्याचें भस्म करून अंगास लाविलें, ज्यानें मदनास जाळून भस्म केलें त्यामुळें रतीनें सेवा करून प्रसन्न केलेला व ज्याच्या जटाजूटांत गंगा भ्रांत होऊन फिरत राहिली, असा भगवान् महाकालेश्वर कैलासपर्वतावर राहण्याचें सोडून ज्या ठिकाणीं वास करीत आहे तेव्हां तेथील महिमा किती सांगावा?

त्या नगरींत **भगीरथ, दशरथ, अर्जुन,** इत्यादि थोर राजांसारखा आपल्या बाहुबलानें सर्वभूमंडळ जिंकणारा, सामर्थ्य, विचार आणि उत्साह यां तीन शक्तींनींयुक्त, बुद्धिमान्, नीतिमान् धर्मशास्त्रपारंगत, सूर्य व चंद्र यां सारखा तेजस्वी, अनेक यज्ञांनीं पवित्र, सर्व जगाची पीडा दूर करणारा;असा **तारापीड** नांवाचा राजा राज्य करीत होता. कमलवनें व विष्णूचें वक्षस्थळ सोडून लक्ष्मी त्याच्याजवळ मोठ्या प्रेमानें राहत होती. गंगाप्रवाहाचें उत्पत्तिस्थान जसा विष्णूचा चरण, तसा तो सत्याचें मूळ होता. स्थिर असून अक्षयीं भ्रमण करणारें, शांत असून शत्रूंना संताप करणारें, निर्मळ असून शत्रूस्त्रियांचीं मुखें मलिन करणारें अशा यशाचें–चंद्राचें उत्पत्तिस्थान जसा समुद्र तसा तो उत्पत्तीस्थान होता. आपल्या पक्षाचा क्षय न व्हावा म्हणून पाताळाप्रमाणें भूभृतांनीं[1] त्याचा आश्रय केला होता, गृहमंडलाप्रमाणें तो बुधयुक्त[2] होता, दशरथाप्रमाणें सुमित्रोपेत[3] होता, शिवाप्रमाणें महासेनाश्रित[4] होता, शेषाप्रमाणें भूभार धारण करणारा,

१ राजे, पर्वत. २ बुध, पंडित. ३ दशरथ, स्त्री सुमित्रा, सुमित्रयुक्त.
४ मोठी सेना, कार्तिकस्वामी.

नर्मदाप्रवाहाप्रमाणें [1]महावंश प्रभव होता, धर्माचा केवळ अवतारच व विष्णूचा प्रतिनिधि असा तो राजा होता. रावणानें जसा कैलास पर्वत हालवून ढिला केला, तसा कलीनें धर्म ढिला केला असतां शंकराप्रमाणें त्यानें तो स्थिर केला. तो राजा दृष्टीस पडला असतां रतीच्या विनवणीवरून शंकरानें हा दुसरा मदनच निर्माण केला आहे असें वाटे! पूर्वेस, समुद्राच्या लाटांनीं ज्याचा भाग धुतला जात आहे, ज्याच्यावरील पुष्पवृक्ष गगनचुंबित असल्यामुळें नक्षत्रें उगवलीं कीं, ज्यांना फुलांचा दुप्पट बार आला आहे काय असें वाटतें! ज्याच्यावरील चंदनवृक्ष चंद्रोदयकालीं अमृतबिंदु पडल्यामुळें ओले होतात, ज्याच्यावरील लवंगादि वृक्षाचे पल्लव सूर्याच्या घोड्यांच्या पायांनीं तुडविले जातात, आणि ज्याच्यावरील शल्लकीवृक्षांचे पल्लव इंद्राचा ऐरावत आपल्या शुंडादंडानें मोडून टाकितो, अशा उदयपर्वतापासून दक्षिणेस, समुद्रांतील जलदेवता जेथील रामेश्वराला नेहमीं प्रणाम करितात, रामचंद्रानें सेतू बांधिला त्या वेळीं वानरांनीं पर्वत व पाषाण आणून टाकल्यानें शंख व शिंपा फुटून त्यांची शुभ्र शकलें झालीं त्यामुळें हीं नक्षत्रेंच आहेत काय असें जेथें दिसतें अशा सेतुबंधापासून पश्चिमेस! समुद्रमंथनकालीं ज्यावर विष्णूचीं बाहुभूषणें घासलेलीं दिसत आहेत व देवदैत्यांनीं वासुकिसर्पाची दोरी करून ज्याला समुद्रांत रवीप्रमाणें हालविलें आहे अशा मंदरपर्वतापासून; उतरेस ज्या ठिकाणीं नरनारायणाचा बदरिकाश्रम आहे, व जेथें कुबेराच्या सुंदरीचा संचार असल्यामुळें पादभुषणांचा मधुरशब्द चालू असतो, ज्याच्यावरील कुंज्यांत सप्तर्षि संध्या करीत असतात, व ज्याच्यावरच्या सरोवरांतील सौगंधिक पुष्प भीमानें हरण केलें, अशा गंधमादनपर्वतापासून; सर्व राजे ज्याच्या पराक्रमानें पराजित झाल्यामुळें हात जोडून त्या तारापीड राजाच्या चरणावर आपले मुकुट वाकवीत असत. क्रौंच पर्वतांतून जसा हंसांचा समुदाय बाहेर पडतो, तसा त्याजपासून गुणसमूह बाहेर पडत असे. त्यानें आपल्या कीर्तीनें सर्व विश्व व्यापिलें होतें. त्याचा प्रताप दुःसह असल्यामुळें राज्यलक्ष्मी त्याचें छत्र

[1] मोठ्या वंशात जन्मलेला, वेळूच्या वेटांतून निघालेला.

सोडून क्षणभर देखील दुसरीकडे राहिली नाहीं. सर्व प्रजा त्याच्या आज्ञेत राहून नेहमीं त्याच्या गुणांचें वर्णन करीत असत. समुद्राप्रमाणें तो गंभीर असून हजारों प्राण्यांस आश्रयभूत होता. शंकराप्रमाणें तो दुर्गाश्रित[१] होता, धर्मराजाप्रमाणें धर्मप्रभव होता, व शेषाप्रमाणें भूभार धारण करणारा असा तो राजा होता.

इंद्राला जसा बृहस्पति, वृषपर्व्याला जसा शुक्राचार्य, दशरथाला जसा वसिष्ठ, रामाला जसा विश्वामित्र, धर्मराजाला जसा धौम्य, नळ राजाला जसा सुमति, तसा त्याला **शुकनास** नांवाचा ब्राह्मणजातीचा प्रधान होता. तो प्रधान राज्यकारभारांत मोठा प्रवीण व बुद्धिमान् होता. त्यानें सर्वत्र बातमीदार ठेविले होते त्यामुळें थोडीशी हालचाल झाली कीं, त्याला समजल्याखेरीज रहात नसे.

ऐरावताच्या शुंडादंडासारखा, राज्यलक्ष्मीची जणुं उशीच, सर्व प्रजेला अभय देण्याविषयीं तत्पर, लखलखित तरवारीच्या किरणांनीं सुशोभित दिसणारा, सर्व शत्रुसमुदायाला धूमकेतू अशा आपल्या बाहुदंडानें तारापीडानें सप्तद्वीपवती पृथ्वी जिंकली. त्याला कोणी शत्रु उरला नाहीं. तेव्हां त्यानें सर्व राज्यभार आपल्या **शुकनास** प्रधानावर सोंपवून तो निर्वेध राहिला. सर्व प्रजेची स्वस्थता केल्यामुळें त्याला कांहीं काम उरलें नाहीं. मग तो तारुण्यसुखाचा अनुभव घेऊं लागला. चंदनमिश्रितजलाप्रमाणें सुंदरीच्या हास्यकांतीनें तो अभिषेक केल्यासारखा दिसत असे! कर्णावरील कमलांप्रमाणें स्त्रियांच्या नेत्रकटाक्षांनीं तो ताडित होत असे! केशरादि चूर्ण फेंकल्यामुळें जसे नेत्र व्याकूळ होतात तसें स्त्रियांच्या अलंकारांतील किरणांनीं त्याचे डोळे व्याकुळ होत असत! सुंदर स्त्रियांच्या चंपकमालाप्रमाणें कोमळ बाहुलतांनीं तो बद्ध होत असे! तो कधीं शृंगाकार सुवर्णाच्या पिचकाऱ्यांनीं स्त्रियांसहवर्तमान रंगक्रीडा करीत असे! त्यावेळीं सुंदर स्त्रियांनीं केशरी रंगाच्या पिचकाऱ्या उडविल्या असतां ह्या मदनाच्या बाणांच्या पंक्तीच चालल्या आहेत काय असें भासे! कधीं गृहाजवळच्या सरोवरांत जलक्रिडा करीत असे त्या

[१] पार्वती, किल्ला.

वेळीं स्त्रियांच्या उटीचें चंदन व त्यांच्या पायांचा अळिता धुऊन पाण्यांत पडत असे, आणि त्यांच्या केशांतील केशरी चूर्ण हीं पाण्यांत पडत असे, व क्रीडेच्या गर्दींत सरोवरांतील कमळांचा परागही पडून जाई. क्रीडा करतांना पाण्यावर हात आपटल्यानें फेंस उत्पन्न होई, व या कारणांनीं सरोवरांची शोभा फारच चमत्कारिक दिसे. कधीं बळरामाप्रमाणें चंदनाची उटी लावून व पुष्पमाला धारण करून तो मद्यप्राशन करीत असे. कधीं मत्त हस्तीप्रमाणें प्रफुल्लितलता पुष्पांनीं सुगंधित अशा अरण्यांत क्रीडा करीत असे. कधीं अलंकाराच्या मधुर शब्दांनीं सानंदमानस होऊन हंसाप्रमाणें कमल वनांत रममाण होत असे. कधीं सिंहाप्रमाणें क्रीडापर्वतावर विलास करीत असे. कधीं भ्रमराप्रमाणें बगीच्यांतील लतागृहांतून फिरत असे. कधीं आप्तमित्रांसह मंदिरांत बसून गीत व नृत्य ऐकत बसे. फार काय सांगावें, आपल्या थोरपणास व त्या त्या दिवसास जें जें योग्य व रमणीय व सुखकारक ह्मणून असे, त्याच्या त्याच्या अगदीं स्वाधीन न राहतां त्या त्या वस्तूंचा तो उपभोग घेत असे. जिकडे तिकडे शांत असून सर्व प्रजा सुखांत असल्यावर उपभोग-सुखांत काल घालविणें हें राजांस भूषणच आहे. देशांत अस्वस्थता असल्यावर विषयसुखांत गर्क राहणें ही मात्र विटंबना होय. प्रजेची आपल्यावर प्रीति राहण्याकरितां तो मधून मधून त्यांच्या भेटीही घेत असे व प्रसंगविशेषीं सिंहासनावर बसून तो राज्य कारभार ही पाहत असे.

**शुकनास** प्रधानानें आपल्या बुद्धि कौशल्यानें इतकी उत्तम राज्यव्यवस्था ठेविली होती कीं, तेणेंकरून राजापेक्षांही त्यानें प्रजेची प्रीति दुप्पट संपादिली होती. ज्यांच्या वरील मुकुटरत्नांच्या प्रभा चोहींकडे फांकत आहेत, अशा मस्तकांनीं सर्व राजे त्यास नमस्कार करीत असत. **शुकनासाच्या** बरोबर ही पुष्कळ चपल व उत्तम घोडे चालत असत व त्यांच्या पायांच्या खाड खाड शब्दांनीं सर्वांचे कान बहिरे होत असत. त्याच्या बराबरही इतकें सैन्य चालत असे कीं, त्यामुळें सर्वपृथ्वी दणाणून जात असे व तेणेंकरून पर्वत इकडे

तिकडे झोंके घेत आहेत काय असें भासे. मोठमोठाले मदोन्मत्त हत्ती बरोबर असल्यामुळें त्यांच्या मदोदकाचा जिकडे तिकडे सडा होत असे. अशा गर्दीमुळें अतिशय धूळ उडून त्यानें समुद्र देखी-ल गढूळ होत असत. त्याजबरोबर चाललेल्या पायदळांच्या गलब-ल्यानें कान फुटतात कीं काय असें वाटे. सैन्याच्या जयजयकार शब्दांनीं दशदिशा भरून जात. स्वारीबरोबर पांढरीं शुभ्र चांमरें उडत असल्यामुळें आणि बरोबर असलेल्या शेंकडों राजांवर सुवर्ण दंडाचीं छत्रें असल्यामुळें सर्व दशदिशा आच्छादून जात व त्यामुळें सूर्यतेजाचा रिघाव होत नसे.

तारुण्यसुखोपभोगांत राजाचा बराच काळ गेला. बहुत दिवस-पर्यंत या लोकच्या सर्व सुखाचा त्यानें उपभोग घेतला. परंतु एक पुत्रदर्शनाचें सुख मात्र त्यास मिळालें नाहीं. उन्हाळ्यास जसें फळ किंवा पुष्प येत नाहीं, त्याप्रमाणें त्याच्या स्त्रियांस फळप्राप्ति ह्मणजे संतती झाली नाहीं. जसजसें त्याचें तारुण्य जात चाललें तशी तशी पुत्र प्राप्तीची त्याला निराशा वाटूं लागली. अपत्यरहित असल्यामुळें त्याचा संताप वाढतच चालला आणि विषयसुखाचा उपभोग घेण्याचा त्याला तिटकारा वाटूं लागला. हजारों मांडलिक राजे त्याचे आज्ञेंत वागणारे असून आपण असहाय आहों व डोळस असून अंध आहों, असें त्यास वाटूं लागलें. सर्व भुवनास आश्रय असून तो आपणांस निराश्रितसें मानूं लागला.

शंकराच्या जटाजूटास जशी चंद्रकोर, विष्णूच्या वक्षःस्थळास जशी कौस्तुभप्रभा, बळरामाच्या हृदयास जशी वनमाळा, समुद्रास जशी मर्यादा, दिग्गजास जशी मदोदकाची धारा, कल्पवृक्षास जशी लता, वसंत ऋतूस जशी पुष्पसमृद्धि, पूर्णचंद्रास जशी चंद्रिका, कमलाकरास जशी कमलिनी, आकाशास जशी तारकापंक्ति, मलय-पर्वतास जशी चंदनलता, शेषास जशी फणामण्यांची प्रभा तशी सर्व त्रैलोक्यास आश्चर्य उत्पन्न करणारी त्या राजास विलासवती नांवाची पट्टराणी होती. तिचें सौंदर्य फारच अप्रतिम होतें. व विलासाची तर ती केवळ खाणच होती.

एके दिवशीं राजा विलासवतीच्या मंदिरांत गेला तों तेथें तिच्या दासी तिच्या सभोंवती पांपणीस पांपणी न लावितां तटस्थ बसल्या आहेत, चोपदार लोकही तसेच चिंताक्रांत बसले आहेत, वृद्ध वृद्ध स्त्रिया तिच्या जवळ बसून तिचें अश्वासन करीत आहेत, विलासवतीच्या डोळ्यांवाटें टपटप अश्रुबिंदु पडत असल्यामुळें तिचें लुगडें भिजलें आहे, तिनें आपल्या अंगावरील अलंकार काढून टाकिले आहेत, डाव्या हातावर मुख कमळ ठेवून चिंताक्रांत बसली आहे, वेणी घातली नसल्यामुळें केश विसकटलेले आहेत, अशा प्रकारची पलंगावर बसलेली आपली स्त्री त्यानें पाहिली. राजास पाहतांच विलासवती उठून उभी राहिली, तेव्हां राजानें तिला पलंगावर बसवून आपणही तिच्या जवळ बसला. तेव्हां एकाएकी शोकाचें कारण काय झालें असावें हें न समजल्यामुळें राजा भांबावल्या सारखा झाला. मग आपल्या हातानें तिच्या गालावरचे अश्रुबिंदु पुसून तो तीस ह्मणाला, "प्रिये, तूं कशाकरितां मुकाट्यानें शोक करीत बसली आहेस! तुझ्या नेत्रांवाटें अश्रुबिंदु पडत असल्यामुळें ते पापण्यांवर मौक्तिकासारखे दिसत आहेत! प्रिये, तूं आपल्या अंगावर अलंकार कां घातले नाहींस! कमळांवर कोंवळें ऊन्ह जसें सुशोभित दिसतें त्याप्रमाणें शोभणारा अळिता तूं आपले पायांस कां लाविला नाहींस! मदनसरोवरांतील कमळावरचे मधुरशब्द करणारे जणुं हंसच, अशीं रत्नजडित पादभूषणें तूं आपल्या पायांत कां घातलीं नाहींस! कमरेस मेखळा भूषण न घालून तूं आपला मध्यभाग सूना कां ठेविलास! चंद्रावर जसें मृग चिन्ह शोभतें, त्याप्रमाणें तूं आपल्या कपाळावर कृष्णागरूचा वेल कां काढिला नाहींस! शंकराच्या मस्तकावरची चंद्रकोर गंगा प्रवाहानें जशी सुशोभित दिसते, तशी तूं आपली मान मोत्यांचा कंठा घालून कां सुशोभित केली नाहींस! हे सुंदरी, ह्या गालावर केशराच्या रंगानें काढलेले वेल नेत्रोदकानें व्यर्थ विशोभित कां केले आहेस! सकुमार अंगुली ज्याला पाकळ्याप्रमाणें शोभताहेत असा लाल कमळासारखा आपला हात कानाखालीं कां ठेविला आहेस! ह्या

भुरेख कपाळावर हे असे केंस कां आले आहेत व त्यावर गोरोचनेचा तिलक कां लाविला नाहींस? तुझ्या केंसांत चंद्रकोर नसल्यामुळें चंद्र लेखेनेंरहित कृष्णपक्षांतील संध्या जशी विशोभित दिसते, तशी तुझी आकृति दिसत आहे. तर आतां प्रसन्न हो, आणि इतकें दुःख होण्याचें कारण कोणतें! तें मला सांग. तुझ्या स्तनांस उडविणारे श्वासोच्छ्वास माझ्या हृदयासही कांपवीत आहेत! याकरितां माझ्या हातून कांहीं अपराध घडला, किंवा सेवकांच्या हातून कांहीं चुकी झाली, हें मला सांग. मजकडून कांहीं प्रमाद घडला असेल असें मला तर वाटत नाहीं. माझें जीवित व राज्यही तुझ्या स्वाधीन आहेत. प्रिये, या शोकाचें कारण काय हें मला लवकर सांग." असें राजानें विचारिलें असतां **विलासवती** कांहीं एक उत्तर देईना. त्यावेळीं राजानें तिच्या दासीस शोकाचें कारण विचारिलें. तेव्हां तिचा विड्यांचा डबा बाळगणारी व नेहमीं तिच्या जवळ असणारी **मकरिका** नांवाची दासी सांगूं लागली.

"महाराज, आपणांकडून थोडा तरी अपराध कोठून होणार? सेवक जन किंवा दुसरें कोणी राणीसाहेबांचा अपराध करण्यास कोण धजणार? राणीसाहेबांस शोक होण्याचें कारण हेंच कीं, इतके दिवस गेले तरी आपणास फलप्राप्ति कांहींच झाली नाहीं, तेव्हां आपलें जीवित निष्फल आहे! असें त्यास बरेच दिवस वाटून दुःख होत आहे. त्यांनीं आज कितीक दिवस विलासाचे उपभोग सोडिले आहेत. स्नान करणें, भोजन करणें, भूषणें घालणें, निद्रा करणें इत्यादि गोष्टी त्यांजकडून अळेंबळें करवाव्या लागतात. महाराजांस दुःख होऊं नये ह्मणून त्या बाहेर दाखवीत नाहींत इतकेंच. आज शिवरात्रीचा दिवस होता ह्मणून राणीसाहेब महाकालेश्वराच्या दर्शनाकरितां गेल्या होत्या, तों त्या ठिकाणीं महाभारत चाललें होतें. त्यांत असें निघालें कीं, 'ज्याला पुत्र नाहीं त्याला उत्तम गति मिळत नाहीं. हें राणीसाहेबानीं ऐकल्यापासून तर त्या फारच कष्टी झाल्या आहेत. आह्मीं किती जरी त्यांची समजूत केली, तरी त्या धड खात नाहींत, पीत नाहींत, दागिने घालीत नाहींत व कांहीं

विचारिलें तर धड उत्तर देत नाहींत. त्यांनीं आपलें एकसारखें रडणें धरलें आहे! राणीसाहेबांच्या दुःखाचें जें कारण होतें तें महाराजांस कळविलें आहे, याकरितां याबद्दल जो विचार करणें असेल तो करावा." असें बोलून ती उगीच उभी राहिली.

तिचें भाषण ऐकून राजा दुःखानें कांहीं वेळ उगीच बसला. नंतर मोठ्यानें श्वासोच्छ्वास टाकून ह्मणाला, "प्रिये! देवाच्या स्वाधीन ज्या गोष्टी आहेत त्याला आपण काय करावें? आपण कितीही रडत बसलों तरी काय उपयोग होणार आहे? देवाची आपल्यावर दया नाहीं त्याला काय करावें? पुत्रालिंगनाचें अमृतपानासारखें सुख आपल्या नशिबीं नाहीं. पूर्वजन्मीं आपण पुण्यकर्म केलें नाहीं ह्मणून आपल्याला ह्या जन्मीं त्याचें फळ मिळालें नाहीं. जसें द्यावें तसें घ्यावें? कोणी कसाही समर्थ असला तरी त्याला दैवाचें उल्लंघन करवत नाहीं. जितके उपाय सांगितले आहेत तितके करून पहावे. आपल्या गुरूची पुष्कळ भक्ति करावी. देवतांचीं पूजनें व अनुष्ठानें करावीं, ऋषींची सेवा करावी. साधू हे देवच आहेत, त्यांची एकसारखी सेवा केली असतां ते दुर्लभ वर देण्यास देखील समर्थ आहेत. **बृहद्रथ** राजानें **चंडकौशिक** ऋषीस प्रसन्न केल्यामुळें त्यास महापराक्रमी **जरासंध** पुत्र झाला. **दशरथ** राजा वृद्ध होईपर्यंत त्यास पुत्र नव्हता परंतु पुढें **ऋष्यशृंगाच्या** कृपेनें त्याला ईश्वरांश **रामलक्ष्मण** व **भरतशत्रुघ्न** असे चार पुत्र झाले. दुसऱ्याही पुष्कळ राजांस ऋषींच्या आराधनेनें पुत्र प्राप्ति झाली आहे. याकरितां ऋषींची सेवा एकनिष्टपणें केली असतां व्यर्थ होणार नाहीं. गर्भाच्या भारानें मंद मंद चालत आहे व दिवस भरल्यामुळें पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणें जिचें मुख पांढुरकें दिसत आहे अशी तूं माझ्या दृष्टीस कधीं पडशील कोण जाणे? आणि "महाराज! आपणास मुलगा झाला." असें आनंदाचें वर्तमान सांगण्याकरितां सेवक मजकडे कधीं धांवत येईल? हाळदीनें लुगडें पिवळें झाल्यामुळें व मुलास मांडीवर घेतल्यामुळें कोवळ्या उन्हानें सुशोभीत अशा आकाशलक्ष्मीप्रमाणें तुला पाहून मला

केव्हां आनंद होईल तो होवो! अनेक औषधींची चूर्णे टाळूवर घातल्यामुळें ज्याचे केश पिंगट दिसत आहेत, कशाची बाधा होऊं नये ह्मणून ज्याची टाळू तूप व मध यांनीं भरून तीवर पांढऱ्या मोहऱ्या चिकटविल्या आहेत व ज्याला दृष्टीचा अंगारा लावला आहे. ज्याच्या गळ्यांत गांठी पडलेले व गोरोचनेनें पिवळें केलेलें सूत घातलें आहे. दंतरहित व हास्ययुक्त असें ज्याचें मुखकमळ दिसत आहे, आणि जो उताणा पडून हातपाय हालवीत आहे, असा बालक माझ्या दृष्टीस पडून केव्हां आनंद देईल तो देवो, गोरोचन लावल्यामुळें ज्याचें अंग पिवळें दिसत आहे व जो एकीपासून दुसरीपाशीं व दुसरीपासून तिसरीजवळ, अशा प्रकारें स्त्रियांच्या कडेवर हिंडत आहे, असा सर्वांस आनंद करणारा बालक माझा शोकांधकार कधीं दूर करील तो करो. ज्याचें शरीर धुळीनें भरलें आहे व मनास वाटेल तिकडे जो रांगत फिरत आहे, स्फटिकांच्या भिंतींत प्रतिबिंबीत झालेल्या हरिणपाडसास सिंहाच्या बालकाप्रमाणें धरण्याचा प्रयत्न करीत आहे. स्त्रियांच्या पादभूषणांचे शब्द ऐकून आलेल्या कलहंसाच्या मागें त्यास धरण्याकरितां पळत आहे, ज्याला आवरण्याकरितां ज्याच्या मागें दाया लागल्या आहेत. मदस्रावाप्रमाणें ज्याच्या मस्तकावर कृष्णागरूचा तिलक दिसतो आहे व जो आपल्या हस्तानें धूळ उडवीत आहे असा हत्ती छाव्यासारखा बालक माझ्या कधीं दृष्टीस पडेल तो पडो, मण्याच्या फरसबंदींत पडलेल्या प्रतिबिंबाकडे पाहून त्यास धरण्याचा प्रयत्न करीत आहे, सभेंत हजारों राजे हात पुढें करून ज्याला जवळ घेण्याकरितां उत्कंठित झाले आहेत. पिंपळपान वगैरे अलंकारावरील रत्नांच्या कांति डोळ्यावर पडल्यामुळें ज्याची दृष्टि चंचल झाली आहे, असा बालक माझ्या दृष्टीस कधीं पडेल तो पडो! याप्रमाणें मनोरथ करतां करतां संतापानें माझे कित्येक दिवस चालले आहेत. अपत्य नसल्यामुळें दुःखाग्नि मला रात्रंदिवस दग्ध करीत आहे. सर्व जग मला शून्य दिसत आहे. माझें जीवित व राज्यही मला निष्फळ वाटत आहेत. परंतु आपलें दैवच प्रतिकूल पडलें त्याला काय क-

रावयाचें आहे ? याकरितां प्रिये, शोक सोडून दे, धैर्य धर, आणि धर्म करण्याकडे लक्ष्य दे, धर्म करणाराचें कल्याण होतें. याप्रमाणें बोलून त्यानें आपल्या हातांत पाणी घेऊन अश्रूंनीं भरलेलें तिचें मुखकमळ धुवून टाकलें. मग अनेक गोष्टींनीं तिचें शांतवन करीत व धर्माचा उपदेश करीत पुष्कळ वेळपर्यंत तो तेथें बसला व नंतर आपल्या मंदिरांत गेला.

राजाच्या ह्या भाषणानें **विलासवतीचा** कांहीं शोक कमी झाला. मग तिनें आपली वेणी घातली व अंगावर वस्त्रालंकार धारण केले. त्या दिवसापासून ती देव, ब्राह्मण व गुरु यांची मोठ्या भक्तीनें सेवा करूं लागली. जो कोणी नियम सांगेल, तो तो ती श्रम व कष्ट सोसून करूं लागली. स्नान केल्यावर शुभ्र वस्त्र नेसून व उपोषित राहून गुग्गुळादि सुगंधि द्रव्यांचा जेथें धूप जळत आहे, अशा देवीच्या देवळांत पूजन केल्यावर भूमीवर दर्भ पसरून त्यावर ती निजूं लागली. कधीं तिर्थोदकांत जाऊन स्नान करूं लागली. कधीं फळपुष्पें व उंबराचे पल्लव यांनीं युक्त अशा भरलेल्या सुवर्णकलशांनीं गाईच्या खालीं बसून स्नानें करूं लागली. तिळांनीं भरलेलीं सुवर्णपात्रें ब्राह्मणास देऊं लागली. कृष्णपक्षांतील चतुर्दशीच्या रात्रीं ज्या ठिकाणीं चार रस्ते मिळतात अशा ठिकाणीं मांत्रिकांनीं काढलेल्या मंडळावर बसून देवतांस बळी देऊन मंगळ स्नानें करूं लागली. कधीं सिद्ध पुरुषांच्या पुण्याश्रमांत, कधीं मांत्रिकांच्या देवालयांत सेवा करूं लागली. अश्वत्थादिवृक्षांची पूजा करून त्यांस प्रदक्षिणा घालूं लागली. रुप्याच्या पात्रांत दहींभात घालून कावळ्यास बळी देऊं लागली. कधीं **ज्येष्ठादेवीची** मोठ्या थाटानें पूजा करूं लागली. वैदिक ब्राह्मणांकडून वेदांचीं पारायणें करवूं लागली. पुराणिकांकडून पुण्यकारक कथा वाचवूं लागली व आपण ऐकत बसूं लागली. गोरोचनेनें ज्यावर मंत्र लिहिले आहेत अशीं भूर्जपत्रें व कांहीं औषधी गांठवून गळ्यांत घालूं लागली, कधीं स्वप्नें पडलीं कीं, तीं गुरुजनांस सांगूं लागली, अशीं अनेक कर्मे ती करूं लागली.

याप्रमाणें कांहीं दिवस गेल्यावर एके दिवशीं पहाटेस नक्षत्रें विरळ व निस्तेज दिसूं लागलीं. आकाश पांडुरकें दिसूं लागलें. अशा वेळीं हत्तिणीच्या मुखांत जसें कमळ जावें त्याप्रमाणें आपली स्त्री **विलासवती** गच्चीवर उभी आहे, व तिच्या मुखांत चंद्र प्रवेश करीत आहे असें राजानें स्वप्नांत पाहिलें. नंतर तो जागा झाला तेव्हां अतिहर्षानें राजाचे नेत्र प्रफुल्लित झाले. मग त्यानें **शुकनास** प्रधानास बोलावून आणून त्यास तें स्वप्न सांगितलें. तेव्हां तो सानंद होऊन ह्मणाला, "महाराज, फारा दिवसांनीं आपले मनोरथ पूर्ण होण्याचा समय आला आहे. आतां थोडक्याच दिवसांत पुत्राचें मुखकमल महाराजांच्या दृष्टीस पडून आनंद होईल. मलाही आज स्वप्नांत असें दिसलें कीं, धौत व शुभ्रवस्त्र नेसलेला एक शांत व दिव्याकृति ब्राह्मण आला आणि त्यानें प्रफुल्लित सहस्रपत्रकमल माझ्या स्त्रिच्या मांडीवर ठेविलें. अशीं सुचिन्हें दृष्टीस पडलीं ह्मणजे सुखप्राप्ति जवळ आली आहे असें तीं सुचवितात. पुत्रमुखाखेरीज दुसरें कोणतेंही सुख आपणास मिळावयाचें राहिलें आहे असें नाहीं. तेव्हां निःसंशय आपले मनोरथ पूर्ण होणार. पहाटेस पडलेलीं स्वप्नें बहुत करून खोटीं होत नसतात. या करितां थोडक्याच दिवसांत मांधात्याप्रमाणें राज्यधुरंधर सर्वांला आनंद देणारा असा पुत्र होऊन शरत्कमलिनी जशी गजराजास आनंद करते, तशी देवी महाराजास आनंद करील, आणि त्यामुळें महाराजांचें कुल अविच्छिन्न राहून तो राज्यधुर धारण करील." याप्रमाणें **शुकनासाचें** भाषण ऐकल्यावर त्याचा हात आपल्या हातांत धरून ज्या ठिकाणीं आपली स्त्री **विलासवती** होती त्या ठिकाणीं राजा गेला, आणि त्यानें तीस तीं स्वप्नें सांगून आनंदित केलें. नंतर थोडक्याच दिवसांत पुष्करिणी जसें चंद्रबिंब व आरशी जसें प्रतिबिंब धारण करिते त्याप्रमाणें **विलासवतीनें** राजाचें प्रतिबिंब गर्भांत धारण केलें. तेव्हां नंदनवनलक्ष्मी जशी कल्पवृक्षानें व विष्णूची वक्षस्थळी जशी कौस्तुभानें सुशोभित दिसते, तशी ती गर्भानें दिसूं लागली. दिवसें दिवस जसा जसा गर्भ वाढूं लागला तसतशी समुद्रोदकानें जड झा-

लेली मेघपंक्ति जशी संचार करिते, त्याप्रमाणें ती हळूहळू चालूं लागली, वारंवार जांभया देऊं लागली व अंगांत आळस शिरल्या-मुळें श्वासोच्छ्वास सोडूं लागली. खाण्यापिण्यावरची तिची इच्छा नाहींशी झाली. वर्षेप्रमाणें कृष्णपयोधरमुखी[1] व केतकीसारखी शुभ्र ती दिसूं लागली. तेव्हां हिला गर्भ राहिला, असें कुशल दासींनीं जाणिलें.

पुढें राणीच्या सर्व दासींत मुख्य, राजमंदिरांत राहून चतुर झा-लेली, नेहमीं राजाच्या सहवासानें प्रौढ झालेली सर्व मंगलकर्में कर-ण्यांत प्रवीण झालेली, अशी **कुलवर्धना** नांवाची दासी एक्या चांगल्या दिवशीं संध्याकाळच्या वेळीं राजसभेंत गेली आणि तिनें **शुकनासाबरोबर** बोलत बसलेल्या राजाच्या कानांत **विलासवतीस** गर्भ राहिल्याचें वर्तमान सांगितलें. त्यावेळीं सभेंत शेंकडो दिवे लावले असल्यामुळें पौर्णिमेचा चंद्र जसा नक्षत्रांनीं सुशोभित दिसतो तसा तो दिसत होता. त्याच्या सभोंवतीं हजारो राजे बसले अस-ल्यामुळें शेषाच्या सहस्रफणांच्या मध्यभागीं विष्णु जसा शोभतो तसा तो शोभायमान दिसत होता.

पूर्वीं कधीं ऐकिलें नव्हतें व ज्याचा संभव नव्हता असें कुलव-र्धनेचें भाषण ऐकून आपल्या अंगावर जसा अमृतरसाचा वर्षावच झाला असें राजास वाटलें. त्याच्या सर्वांगावर रोमांच उभे राहिले. व त्याचे गाल प्रफुल्लित दिसूं लागले. हसतांना दंतकिरण बाहेर चमकत होते, तेणेंकरून अतिशय झालेला आनंद हृदयांत मावेना ह्मणून बाहेरच पडत आहे काय असें दिसत होतें! नंतर आनंदा-श्रूंनीं भरलेल्या नेत्रांनीं तो **शुकनासाच्या** मुखाकडे पाहूं लागला. तेव्हां पूर्वीं कधीं न पाहिलेला राजाचा हर्ष पाहून व **कुलवर्धनेचें** मुखही हास्ययुक्त पाहून तीच गोष्ट मनांत बोलत असल्यामुळें ए-वढ्या मोठ्या हर्षाचें दुसरें कारण नसावें असें समजून प्रधानानें आ-पल्या मनांत त्या हर्षाचें कारण ताडिलें. मग तो आपल्या आसना-वरून उठून राजाच्या अगदीं जवळ गेला, आणि हळूच नम्रपणानें

[1] मेघ, स्तन.

ह्मणाला, "महाराज, आपणास स्वप्न पडलें त्याप्रमाणें खरें झालें कीं काय?" कुलवर्धना हर्षित दिसत आहे व आनंदाची बातमी ऐकण्याकरितां कर्णांच्या जवळच गेले आहेत काय! असे विस्तीर्ण व चंचल आपले नेत्र प्रफुल्लित होऊन आनंदजलानें भरले आहेत, आणि ते मोठा हर्ष झाल्याचें कळवीत आहेत. आनंदाची बातमी ऐकण्याकरितां माझें मन फार उत्कंठित झालें आहे, यासाठीं कृपा करून लवकर सांगावें असें प्रधानाचें भाषण ऐकून राजा किंचित् हांसून ह्मणाला, "या कुलवर्धनेनें सांगितलेलें वर्तमान जर खरें असेल तर स्वप्न खरेंच समजावयाचें, परंतु मला अजून तें खरें वाटत नाहीं." कारण, असलें प्रियवर्तमान ऐकण्याचें आमचे नशिबीं कोठें आहे! कुलवर्धना जरी खोटें बोलणार नाहीं, तरी असल्या कल्याणाचा संभव आमचे ठायीं विरळा, ह्मणून खरें वाटत नाहीं. तर चला आतां आपणच जाऊन हें खरें आहे किंवा कसें? हें देवीस विचारूं, ह्मणजे काय तें कळेल. असें बोलून त्यानें सर्व राजे लोकांस निरोप दिला. आणि आपल्या अंगावरचे अलंकार काढून ते कुलवर्धनेस बक्षीस दिले. तेव्हां तिनें राजास भूमीस मस्तक लावून नमस्कार केला. मग अतिहर्षानें विलासवतीकडे केव्हां जाईन असें राजास झालें. आनंदामुळें त्याचा उजवा डोळा लवूं लागला. त्यानें आपल्या बरोबर थोडेच सेवक घेतले. मशाली पेटवून मशालजी पुढें चालूं लागले. त्यामुळें सर्व अंधार नाहींसा झाला. याप्रमाणें राजा अंतःपुरांत शिरला व मग विलासवतीच्या मंदिरांत गेला. ते मंदिर अनेक पदार्थांनीं सुरक्षित केलें होतें. नवीन चुना दिल्यामुळें तें पांढरें शुभ्र दिसत होतें, जागजागीं मंगलदीप प्रज्वलित केले होते, द्वाराच्या बाजूस भरलेले कलश ठेविले होते, भिंतीवरून मंगलसूचक चित्रें काढल्यामुळें तें स्थान फारच रमणीय दिसत होतें. वरती स्वच्छ छत बांधून त्यास मोत्यांची झालर लाविली होती, व रत्नखचित दीप लाविले होते. त्या मंदिराच्या मध्यभागीं एक पलंग मांडलेला असून त्याचे पाय उथळ्यावर ठेविले होते. त्याच्या सभोंवतीं रंगवल्ली काढल्या होत्या. उशाकडे मंगल कलश ठेविले होते. त्याना अनेक

औषधींचीमुळें बांधलीं होतीं. त्याच्या सभोंवती पांढऱ्या मोहऱ्या फेकल्या होत्या. पिंपळाचे व लिंबाचे हिरवेगार पल्लव तेथें लावले होते. पलंगावर स्वच्छ चादर घातली होती. त्यामुळें हिमालयपर्वताच्या शिलातलाप्रमाणें तो दिसत होता. सुवर्णाचीं पात्रें अनेक पदार्थांनीं भरलेलीं त्या पलंगाजवळ ठेविलीं होतीं. आचारविचार जाणणाऱ्या कुशल वृद्धस्त्रिया व दासी विलासवतीची सेवा करण्याकरितां पलंगाजवळ सिद्ध होत्या. अशा त्या पलंगावर **विलासवती** निजली होती, ती राजानें पाहिली. जिच्या अंतर्भागांत कुलशैलपर्वत आहे अशी पृथ्वी जशी दिसते, ऐरावतानें जिच्यांत बुडी मारली आहे अशी गंगा जशी दिसते, जिच्या आंत सिंह आहे अशी हिमालयाची गुहा जशी दिसते, मेघांनी सूर्य झांकल्यामुळें दिवसशोभा जशी दिसते, चंद्रोदयाच्या आड उदयपर्वत असल्यामुळें रात्र जशी दिसते, अगस्तीचा उदय होण्याचे वेळीं दक्षिणदिशा जशी दिसते, तशी उदरांत गर्भ असल्यामुळें विलासवती दिसत होती. ती पांढरें पातळ नेसली होती, व त्याच्या दशा गोरोचनानें पिवळ्या केलेल्या होत्या.

राजाची स्वारी आली असें पाहून **विलासवती** उठावयास लागली तेव्हां तिची सखी गडबडीनें जवळ गेली आणि तिनें तिला हात दिला. तेव्हां आपल्या उजव्या हातानें तिचा हात धरून व आपला डावा हात गुडघ्यावर ठेवून **विलासवती** उठूं लागली. तें पाहून राजा तीस म्हणाला, प्रिये! पुरे कर. उठावयास नको! इतक्या सन्मानाचें कांहीं कारण नाहीं! असें बोलून तिच्यासहित तो त्याच पलंगावर बसला. तेथें जवळच एक सोन्याचा पलंग होता व त्यावर स्वच्छ बिछाना घातला होता, त्यावर **शुकनास** बसला.

नंतर आपली स्त्री गर्भिणी आहे असें राजाचें दृष्टीस पडतांच त्यास फार आनंद झाला. मग तो विनोदानें ह्मणाला, प्रिये, शुकनास प्रधान विचारीत आहे कीं, **कुलवर्धनेनें** जें आनंदाचें वर्तमान सांगितलें तें खरेंच आहे ना? असें राजाचें भाषण ऐकून **विलासवती** लाजून व किंचित हास्य करून खालीं तोंड घालून बसली! हस-

सांना तिच्या दंतकांती तोंडाबाहेर दिसूं लागल्या, त्यामुळें ती पदरानें तोंड झांकूनच घेत आहे काय असें दिसलें! राजा पुन्हां पुन्हां विचारूं लागला, तेव्हां ती म्हणाली, मला मेलें उगीच वारंवार लाजवायाचें हें काय!! मला कांहीं ठाऊक नाहीं! असें बोलून राजाकडे वक्रदृष्टीनें पहात ती खालीं तोंड घालून बसली. मग राजा पुन्हां हासत म्हणाला, "हे सुंदरी माझ्या बोलण्यानें जर तुला लाज वाटते तर मी आपला मुकाट्यानें बसतों. परंतु तुझ्या शरिराचा वर्ण पूर्वीं प्रफुल्लित सोनचांफ्याच्या फुलासारखा पिवळा होता व अंगास केशर लावलें असतां सुगंधानें मात्र समजत होतें. तो वर्ण आतां पांढऱ्या चांफ्याच्या फुलासारखा दिसतो आहे! गर्भसंभवामुळें दुग्धामृत उत्पन्न होऊन त्यानें हृदयांत असलेला शोकाग्नि विझवून टाकिल्यामुळेंच ज्याच्या तोंडावाटें धूरच निघत आहे काय! किंवा तोंडांत नील कमलें धारण केलेले हे चक्रवाक् पक्षीच आहेत काय! किंवा ज्याच्या तोंडावर तमाल वृक्षाचे पल्लव ठेवले आहेत असे हे सुवर्ण कळशच आहेत काय, असे तुझे स्तन दिसत आहेत. तर आतां यांना कशानें लपविशील? कमरेचा बारीकपणा मोडून कमरपट्टा दररोज घट्ट होत चालला आहे व पोटावरच्या वळ्या नाहींतशा होत चालल्या आहेत! तर प्रिये! ह्या इतक्या गोष्टी कशानें झांकशील?" तेव्हां **शुकनास** प्रधान राजास ह्मणाला, कां उगीच आपण देवीस त्रास देतां. आपल्या विनोदानें देवीस फार लज्जा वाटत आहे, याकरितां आतां या गोष्टीविषयीं बोलण्याचें पुरें करावें. मग **शुकनास** प्रधान राजाबरोबर कांहीं वेळ तेथें बोलत बसून तो आपल्या घरीं गेला. राजानें त्या दिवशीं **विलासवतीच्या** मंदिरांतच रात्र घालविली.

पुढें **विलासवतीस** लवकरच डोहाळे लागले, ते सर्व राजानें पुरविले, त्यामुळें तिचें मन फार संतुष्ट राहिलें. नऊ महिने पूर्ण झाल्यावर एका उत्तम दिवशीं प्रसूतीची वेळ जवळ आली त्यावेळीं कांहीं ज्योतिषांनीं पाण्यांत घटका घालून व कांहींनीं उन्हांत छाया मोजून बरोबर कालमान साधलें; व लग्ननिश्चय ठरविला. प्रसूतका-

ळची उत्तम वेळ साधली. तेव्हां मेघपंक्तीपासून विद्युत्प्रकाश जसा निवतो त्याप्रमाणें **विलासवती**पासून पुत्ररत्न उत्पन्न झालें. तेव्हां सेवकजन इकडे तिकडे धावूं लागले. त्यामुळें जमीन हादरूं लागली. हजारो चोपदार पुत्रजन्माचें प्रिय वर्तमान राजास सांगण्याकरितां धांवत गेले. जिकडे तिकडे गर्दी झाल्यामुळें कुबडे, लंगडे, आंधळे, पांगळे वगैरे लोक चेंगरून गेले. स्त्रिया गडबडीनें मिरवूं लागल्यामुळें त्यांच्या भूषणांचा मधुर शब्द होऊं लागला. बक्षीस मिळविण्याकरितां पुष्कळ लोक राजाकडे धांवत जाऊं लागल्यामुळें त्यांची फारच धांदल उडाली! धांवतांना कोणाचीं वस्त्रें पडलीं, व कोणाचीं भूषणें गळालीं. याप्रमाणें राजवाड्यांत व सर्व नगरभर मोठी धूम माजली. नंतर मंदरपर्वताच्या हिसक्यांनीं समुद्राचा शब्द जसा होत होता, त्याप्रमाणें नगारे वाजूं लागले. मृदंग, शंख, कर्णे, पडघम इत्यादि वाद्यें वाजूं लागलीं. सनया सूर इत्यादि मंगलसूचक वाद्येंही वाजूं लागलीं. वाद्यांच्या शब्दांनीं व हजारों लोकांच्या शब्दांनीं सर्व त्रैलोक्य जसें काय भरून गेल्यासारखें वाटलें! थोरापासून लहानापर्यंत सर्व लोक अतिहर्षानें उन्मत्तासारखे होऊन इकडे तिकडे फिरूं लागले. चंद्रोदयानें समुद्र जसा वाढत जातो, तसा तो महोत्सव त्या गलबल्यानें फारच वाढला. पुत्रमुख पाहण्याविषयीं राजा फार उत्कंठित झाला होता, तरी ज्योतिष्यांनीं ज्या वेळीं मुहूर्त सांगितला त्या वेळीं तो **शुकनास** प्रधानास बरोबर घेऊन सर्व लोकांचें निवारण करीत ज्या ठिकाणीं **विलासवती** प्रसूत झाली होती, त्या ठिकाणीं गेला. तेथें द्वाराच्या दोन्ही बाजूंस मंगळ कलश भरून ठेविले होते. वृक्षांचे पल्लवही जागजागीं अडकविले होते. तेथें सुवर्णाचा नांगर व मुसळही ठेविला होता. शुभ्रपुष्पें, दुर्वा व पल्लव यांच्या माळा गुंफून त्या ठिकठिकाणीं लावल्या होत्या. दारावर वंटांच्या माळा बांधल्या होत्या. स्त्रियांनीं तेथें कुंकुमादिकांचीं स्वस्तिकें काढलीं होतीं. हळदीच्या रंगानें रंगविलेलें पिवळें वस्त्र नेसवून षष्टीदेवीची स्थापना केली होती. मयूरावर बसलेला, व ज्याच्याजवळ तांबड्या पताका काढल्या आहेत व ज्याच्या हातांत

मोठी शक्ति आहे, असा कार्तिकस्वामी काढला होता. सूर्य व चंद्र हे तांबड्या रंगानें काढले होते. सुवासिनी स्त्रिया अनेक मंगलसूचक प्रकार करीत होत्या. दाराजवळ अनेक प्रकारच्या पुष्पांच्या माळा गळ्यांत घातलेला, असा बोकड बांधला होता. वृद्धस्त्रिया विला-सवतीच्या शयनाजवळ बसल्या होत्या. भूतादिकांची बाधा दूर होण्याकरितां अनेक पदार्थांचे धूप जळत होते. शांतिपाठ करणारे ब्राह्मण मंत्र ह्मणून उदक शिंपडीत होते. दाया नवीन काढलेल्या मातृकांची पूजा करीत बसल्या होत्या. कांहीं स्त्रिया बाळबाळंतिणीला गाणीं म्हणत होत्या. पुण्याहवाचनाची तयारी चालली होती. बा-लकाच्या रक्षणाकरितां बलीदानें चाललीं होतीं. विष्णुसहस्रना-माचे पाठ चालले होते. सुवर्णाच्या कांबीवरून मंगळदीप लावले होते, त्यांच्या ज्योति स्थीर असल्यामुळें मंगलांचें चिंतनच करीत आहेत काय! असें दिसत होतें. पहारेकरी लोक नागव्या तरवारी हातांत घेऊन पहारा करीत होते. असें तें सूतिकागृह राजाच्या दृष्टीस पडलें. मग पायावर पाणी घेऊन व अग्निस्पर्श करून राजा आंत गेला.

त्या ठिकाणीं प्रसवामुळें जिचा पांडुरवर्ण कमी झाला आहे, अ-शा आपल्या प्रियेनें मांडीवर घेतलेला पुत्र त्याचे दृष्टीस पडला. बालकाच्या प्रभेनें त्या ठिकाणच्या प्रदीपांच्या प्रभा अगदीं निस्तेज दिसत होत्या. त्याच्या अंगावर लाली दिसत असल्यामुळें उदय-कालच्या सूर्याप्रमाणें किंवा चंद्राप्रमाणें अथवा कल्पवृक्षाच्या नवीन पल्लवाप्रमाणें किंवा प्रफुल्लित लाल कमलाप्रमाणें अथवा पृथ्वीवर उतरलेल्या मंगलगृहाप्रमाणें तो शोभायमान दिसत होता! त्याचे अवयव पोंवळ्यांच्या वेलीच्या नवीन पल्लवांनीं किंवा कोवळ्या लाल उन्हाच्या तुकड्यांनीं अथवा माणकाच्या कांतीनेंच केले आहेत काय! असें दिसत होतें. देवांगनांच्या हातांतून खालीं पडलेला हा इंद्र-पुत्र जयंतच आहे काय! असा तो दिव्यमूर्ति दिसत होता. त्यानें आपल्या तप्त सुवर्णासारख्या कांतीनें तें सूतिकागृह प्रकाशित केलें होतें. जन्माबरोबर उत्पन्न झालेलीं भूषणेंच काय अशा उत्तम

लक्षणांनीं तो सुशोभित दिसत होता. हा आपला पुढें पति होणार म्हणून राज्यलक्ष्मीनें अलिंगित केलेला आहे काय! अशा शोभेनें तो सुशोभित दिसत होता. मग हजारों मनोरथानंतर प्राप्त झालेल्या पुत्राकडे आनंदाश्रूंनीं भरलेल्या नेत्रांनीं मोठ्या स्नेहानें तो टक लावून पहात बसला! त्यावेळीं स्नेहभरित नेत्रांनीं तो त्याच्या रूपाचें प्राशनच करीत आहे काय! असें दिसत होतें. पुत्रमुख पाहून राजास पराकाष्टेचा आनंद झाला. आणि त्यानें आपणास कृतकृत्य मानिलें.

आपले मनोरथ पूर्ण झाले ह्मणून **शुकनासासही** फार आनंद झाला व त्यानेंही त्या बालकाचे सर्व अवयव न्याहाळून पाहिले. मग तो राजास म्हणाला, ह्या बालकाच्या अल्पावयवांची शोभा स्पष्ट जरी दिसत नाहीं, तथापि सार्वभौमत्वाचीं पूर्ण लक्षणें याच्या अंगावर दिसत आहेत. संध्याकाळच्या चंद्रकलेसारख्या याच्या ललाटावर दोन्ही भुवयांच्या मध्यभागीं कमलतंतूप्रमाणें लव दिसत आहे. याचे नेत्र, कमळासारखे विस्तीर्ण व प्रफुल्लित दिसत आहेत. याच्या मुखकमलाचा सुवास मनोहर असल्यामुळें चंपककलिकेसारखी नासिका तो घेण्याकरितांच जवळ गेली आहे! असें दिसतें. ह्याचे ओष्ट रक्तकमलासारखे लाल दिसत आहेत, ह्याचे हातही तसेच लाल असून. विष्णूप्रमाणें शंख व चक्र यांनीं युक्त आहेत. याचे पाय कोमलपल्लवासारखे मऊ व लाल आहेत व ते ध्वज, रथ, छत्र, वगैरे रेखाचिन्हांनीं सुशोभित दिसत आहेत. यावरून हे चरण सर्व राजांस वंद्य आहेत. ह्याच्या रडण्याचा स्वर दुंदुभीसारखा गंभीर ऐकूं येत आहे.

याप्रमाणें **शुकनास** राजाशीं बोलत आहे, इतक्यांत **मंगल** नांवाचा पुरुष त्या ठिकाणीं धांवत आला. तें पाहून दारापाशीं राजे वगैरे लोक उभे होते ते झटकन एकीकडे झाले. त्या पुरुषाचा चेहरा प्रफुल्लित दिसत होता. तो राजाजवळ जाऊन नमस्कार करून म्हणाला, महाराज, आपण मोठे भाग्यवान् आहां. आपले शत्रु सर्व नष्ट झाले. आपणास चिरकाल आयुष्य असो, व सर्व

पृथ्वीवर आपला जयजयकार असो. आपल्या कृपेनें सर्वांस पूज्य अशा शुकनास प्रधानाच्या मनोरमास्त्रीस, रेणुकेला जसा परशुराम झाला, तसा पुत्र झाला. हें महाराजांस कळविलें आहे.

त्या पुरुषाचें अमृतासारखें भाषण ऐकून राजास फारच आनंद झाला. मग तो ह्मणाला, काय हो ही कल्याणाची परंपरा! येऊं लागली ह्मणजे संपत्तीमागें संपत्ति व विपत्तीमागें विपत्ति येते, असें लोक ह्मणतात, तें खोटें नाहीं. मग राजा शुकनासास म्हणाला, तुम्हीं जसें मजबरोबर सारखें सुखदुःख बाळगतां, तसेंच देवानेंही केलें. असें बोलून राजानें मोठ्या प्रेमानें शुकनासास आलिंगन केलें आणि विनोदानें त्याच्या अंगावरचा शेला "देणगी द्या आतां" असें म्हणून ओढून घेतला, आणि त्या आनंदाची बातमी सांगणाऱ्या पुरुषास पुष्कळ बक्षीस देण्यास आज्ञा केली.

मग राजा शुकनासास बरोबर घेऊन त्याच्या घरीं जावयास निघाला. राजाच्या मागोमाग पुष्कळ स्त्रियाही तिकडे जावयास निघाल्या. तेव्हां त्यांच्या पायांतील नूपुरांचे मधुर शब्द होऊं लागले. त्यांचे हात इकडे तिकडे हालल्यामुळें कंकणादि भूषणांचे खणखण आवाज होऊं लागले. त्या स्त्रियांपैकीं कोणी 'चला चला' म्हणून खुणेकरितां हात वर केल्यामुळें वाऱ्यानें उडालेलीं हीं कमळेंच आहेत काय! असें दिसूं लागलें! कित्येकांच्या कर्णांतील भूषणार्थ ठेविलेले पल्लव खालीं पडून चोळवटून गेले. एकमेकींच्या दागिन्यांचीं टोंकें एकमेकींच्या वस्त्रास लागून तीं फाटलीं. अंगास घाम येऊन केशरादि सुगंधि पदार्थांच्या उटीचे ओघळ वस्त्रांवर पडल्यामुळें तीं रंगित दिसूं लागलीं. कपाळावरील तिलक घामानें पुसून गेले. अशी मोठी गर्दी झाली. कितीएक वेश्या गडबडीनें हर्षभरित होऊन चालल्या होत्या, त्यामुळें त्या स्त्रीसमुदायांत प्रफुल्लित कमलाप्रमाणें शोभा दिसत होती. स्त्रियांच्या स्तनावर रत्नांचे व मौक्तिकांचे हार इकडून तिकडे हालत होते. त्यांच्या भांगांतील शेंदूर पुसून गेले होते. गुलाल, बुक्का उधळल्यामुळें त्यांचे केश भरून गेले होते. त्यांच्या कानांतील रत्नजडित बाळ्या गालावर आपटत होत्या. त्यांच्या

मार्गे मुके, कुबडे, खुजे, बहिरे इत्यादि व्यंग लोक नाचत उडत चालले होते. गळ्यांतील पुष्पमाळा हालत होत्या, आणि त्यांतील पराग खालीं पडत होते. वीणा, मृदंग, टाळ, झांजा, नगारे, कर्णे, शंख, इत्यादि वाद्यांचा मोठ्यानें गजर चालला होता. स्तुति पाठक व गायक लोक स्तवन करीत व गात चालले होते. त्या सर्वांच्या पायांनीं त्यावेळीं पृथ्वी हदरून गेली. **शुकनासाच्या** वाड्यांत गेल्यावर राजानें तेथें आपल्या घरच्यापेक्षां देखील अधिक उत्सव करविला.

पांचवी झाल्यावर सहावे दिवशीं राजानें समारंभानें षष्ठीजागर करविला. पुढें दहावे दिवशीं त्यानें ब्राम्हणांस पुष्कळ गाई व सुवर्ण दिलें. आपल्या स्त्रीच्या मुखांत चंद्रबिंब गेल्याचें आपणांस स्वप्न पडलें होतें म्हणून राजानें पुत्राचें नांव **चंद्रापीड** असें ठेविलें. **शुकनासानें**ही दुसरे दिवशीं आपल्या पुत्राचे जातकर्मादि संस्कार केले व राजाच्या संमतीनें ब्राम्हण जातीस योग्य असें पुत्राचें **वैशंपायन** असें नांव ठेविलें. नंतर कांहीं दिवसांनीं **चंद्रापीडाचे** चौलादि संस्कार झाले व त्याची बाल्यावस्थाही निघून गेली.

पुढें **तारापीड** राजानें आपल्या मुलाचें लक्ष खेळाकडे लागूं नये म्हणून नगराबाहेर **शिप्रानदी**च्या कांठीं अर्धकोस लांबीचें मोठें विद्यामंदिर तयार करविलें, त्यांत जागजागीं मोठमोठाले चुनेगच्ची वाडे बांधिले. ते हिमालय पर्वताच्या शिखराप्रमाणें दिसत होते. त्या विद्यामंदिराच्या सभोंवतीं मोठा खंदक तयार करविला. त्याचा दरवाजा फारच बळकट केला होता. त्याची दिंडी मात्र उघडी रहात असे. त्यांत एकीकडे घोड्यांची पागा केली होती, व खालच्या बाजूस तालिमखाना केला होता. त्या विद्यामंदिराचा आकार देवालयाच्या आकारासारखा होता. त्या ठिकाणीं सर्व विद्यांचे शिक्षक मिळविण्याकरितां फारच प्रयत्न पडले होते. अशा त्या विद्यामंदिरांत, सिंहाचा बालक जसा सांपळ्यांत अडकवावा, त्याप्रमाणें राजानें एका उत्तमदिवशीं **वैशंपायनासह** **चंद्रापीडास** विद्याप्राप्ति होण्याकरितां गुरूंच्या जवळ नेऊन ठेविले. त्या ठिकाणीं गुरुपुत्रा-

खेरीज दुसरे फारसे कोणी नव्हते. व खेळण्याचीही फारशी मोकळीक नव्हती. मुलांस तेथें ठेवल्यावर तारापीडराजा विलासवतीसह दररोज तेथें जाऊन मुलांची भेट घेत असे. आपणांस असा बुद्धिमान राजपुत्र शिकविण्यास मिळाला म्हणून, गुरूंस सार्थकता वाटली. चंद्रापीडाचें लक्ष एकसारखें असल्यामुळें थोडक्याच काळांत त्यांनीं सर्वविद्यांचा अभ्यास केला. स्वच्छ आरशांत जशीं प्रतिबिंबें बिंबतात, त्याप्रमाणें त्यांच्या निर्मळ बुद्धींत सर्व विद्या प्रतिबिंबित झाल्या. धर्मशास्त्र, राजनीति, काव्यें, नाटकें, महाभारतादिक इतिहास, रामायणादि पुराणें, अनेक लिपी, अनेक देशभाषा, शिल्पशास्त्र, धनुर्विद्या, शस्त्रविद्या, गायनविद्या, वाद्यकला, घोड्यावर व हत्तीवर बसणें, कसरतींतील डावपेच खेळणें, वगैरे सर्व गोष्टींत तो प्रवीण झाला.

चंद्रापीड कसरत करीत असतां त्याचें आश्चर्यकारक भीमसेनासारखें बळ लोकांच्या दृष्टीस पडे. त्यानें सहज खेळतां खेळतां हत्तीच्या छाव्याचे कान धरिले असतां सिंहबालकानें धरल्यासारखे इकडचे तिकडे होण्यास ते समर्थ होत नसत. तो तरवारीच्या एका सपाट्यानें मोठमोठाल्या ताडवृक्षांचे,कमलतंतूप्रमाणें तुकडे करून टाकी. परशुरामाच्या बाणासारखे त्याचे बाण पर्वताच्या मोठमोठाल्या शिळा फोडून पार निघून जात असत. दहा पुरुषांस उचलण्यासारख्या लोखंडी मुद्गलानें तो कसरत करीत असे. बलाढ्यपणावांचून इतर सर्व गोष्टींत वैशंपायन चंद्रापीडाप्रमाणेंच प्रवीण झाला होता. वैशंपायनाची सर्व विद्या व कला यांत निपुणता असल्यामुळें, शुकनासाचे ठायीं चंद्रापीडाचे गौरव असल्यामुळें, वैशंपायन आपल्या बरोबर वाढल्यामुळें, खेळल्यामुळें आणि अभ्यास केल्यामुळें तो चंद्रापीडाचें विश्वासाचें ठिकाण झाला होता. वैशंपायनावांचून चंद्रापीड थोडा वेळही राहत नसे. सूर्यास सोडून जसा दिवस राहत नाहीं, त्याप्रमाणें चंद्रापीडास सोडून तो क्षणभरही निराळा राहत नसे. याप्रमाणें चंद्रापीड विद्याभ्यास करीत असतां त्यास तारुण्य प्राप्त झालें. तेव्हां सर्व देवांस आनंद देणाऱ्या अमृत-

रसानें जसा क्षीरसमुद्र; सर्वांस आनंद देणाऱ्या चंद्रोदयानें जसा प्रदोषकाळ; अनेक चित्रविचित्र रंगांनीं रमणीय अशा इंद्रचापानें जसा वर्षाकाळ; प्रफुल्लितपुष्पगुच्छांनीं जसा कल्पवृक्ष; सूर्योदयानें जसा कमळसमूह; अनेक रंगी पिसाऱ्यानें जसा मयूर शोभतो; तसा तो तारुण्यभरानें फारच शोभूं लागला. आपला सेवा करण्याचा समय आला म्हणून सेवकाप्रमाणें मदन त्याच्या जवळ येऊन राहिला. चंद्रापीडाची छाती, दंड, मांड्या वगैरे सर्व अवयव चांगले भरून शरीर फारच सुंदर व तेजःपुंज दिसूं लागलें.

चंद्रापीड तारुण्यांत आला त्यावेळीं त्याच्या सर्वविद्या व कला यांचा पूर्ण अभ्यास झाला. त्याच्या गुरूंनींही त्यास घरीं जाण्याविषयीं अनुमोदन दिलें. तेव्हां राजानें उत्तम दिवस पाहून बलाहकनांवाच्या सेनापतीस बोलावून आणिलें. आणि त्याजबरोबर सैन्य देऊन चंद्रापीडास घेऊन येण्यास त्यास विद्यामंदिरास पाठविलें. राजाज्ञेप्रमाणें बलाहक विद्यामंदिरास गेला. तेव्हां तेथें द्वारपालांनीं बलाहक आल्याचें वर्तमान कळविल्यावर तो आंत गेला, आणि चंद्रापीडास भूमीस मस्तक लावून नमस्कार केल्यावर चंद्रापीडाच्या ह्मणण्यावरून तो त्याच्याजवळ आसनावर बसला. मग तो पुढें सरून नम्रतेनें ह्मणाला, "चंद्रापीडमहाराज, तारापीडमहाराजांची अशी आज्ञा आहे कीं, आमचे सर्व मनोरथ पूर्ण झाले. तूं सर्वशास्त्रांचें अध्ययन केलें, सकल कलांचा अभ्यास केला, सर्व शस्त्रविद्येंत निपुणता संपादिली. गुरूंनींही घरीं नेण्यास अनुमोदन दिलें. याकरितां बंधनांतून मुक्त झालेल्या सुशिक्षित हत्तिछाव्याप्रमाणें किंवा सकल कलांनीं पूर्ण अशा पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणें तुला पाहून लोक संतुष्ट होवोत. त्यांचे नेत्र तुला पाहण्यास उत्कंठित झाले आहेत. सर्वस्त्रिया तुला पाहण्याविषयीं फारच उत्सुक झाल्या आहेत. सहाव्या वर्षीं तुला विद्यामंदिरांत घातलें, त्याला आज दहा वर्षें झालीं. तुला आतां सोळावें वर्ष चालू आहे. आतां विद्यामंदिरांतून निघून आपल्या दर्शनाविषयीं उत्कंठित अशा आपल्या सर्व मातांस भेट दे. सर्ववडील माणसांस

नमस्कार कर, आणि प्रतिबंधरहित होऊन राज्यसुखाचा व तारुण्यसुखाचा यथेच्छ अनुभव घे. राजेलोकांचा सन्मान कर. ब्राह्मणांचें पूजन कर. प्रजेचें पालन कर. व आपल्या आप्तमित्रांस आनंद दे." त्रैलोक्यांत केवळ रत्नच आणि वेगानें वायू व गरुड यासारखा इंद्रायुध नांवाचा अश्व आपल्याकरितां महाराजांनीं पाठविला आहे तो बाहेर उभा केला आहे. हा अश्व सर्वांस आश्चर्य करणारा व समुद्रांत उत्पन्न झालेला आहे. हा अश्व तारापीडमहाराजांच्या बसण्यास योग्य ह्मणून पारसीक देशच्या राजानें नजर पाठविलेला आहे. अश्वलक्षण जाणणाऱ्या पुरुषांनीं याला पाहून असें सांगितलें कीं, उच्चैश्रवानामक इंद्राच्या अश्वाचीं जीं सुलक्षणें ऐकण्यांत आहेत, तीं सर्व याचे ठायीं आहेत. असा अश्व पूर्वीं कधीं झाला नाहीं व पुढेंही होणार नाहीं. याकरितां यावर बसून चलावें. विनययुक्त, शूर, शहाणे, कलाकौशल्य जाणणारे, पिढ्यानुपिढ्या आपले पदरीं असणारे असे हजारों राजपुत्र आपल्या सेवेकरितां महाराजांनीं पाठविले आहेत; व आपणास नमस्कार करण्याकरितां मोठ्या उत्कंठेनें ते बाहेर वाट पाहत आहेत.

चंद्रापीडानें पित्याची आज्ञा शिरसा मान्य करून इंद्रायुधाला आंत आणण्यास सांगितलें; तेव्हां सेनापतीनें त्यास आंत आणिलें. त्या अश्वाच्या लगामाच्या कड्यांस दोन पुरुषांनीं दोन्हीं बाजूंकडे ओढून धरिलें होतें. तो इतका उंच होता कीं, उंच पुरुषानें हात वर केला तर मात्र त्याच्या पाठीस पुरत असे. तो मानेचा आंकडा वळवून चालत असल्यामुळें समोरचें आकाश प्राशूनच टाकीत आहे काय! असें दिसत होतें. त्यानें आपल्या खिंकाळण्यानें सर्व आकाश भरून टाकिल्यामुळें वेगाचा व्यर्थ गर्व वाहणाऱ्या गरुडाची तो निर्भर्त्सनाच करीत आहे काय! असें दिसत होतें. तो अश्व, क्षणांत वांकत होता, व क्षणांत ताठ उभा राहत होता. त्याचा वेग आवरून धरल्यामुळें रागानें त्याच्या नाकपुड्या उडत होत्या. आणि त्या वाटें घुर घुर असा शब्द चालला होता. त्याला मोकळें सोडलें तर तो त्रैलोक्याचें ही उल्लंघन करील कीं काय! असें दिसत

होतें. त्याच्या शरिराचा रंग अनेकरंगी इंद्रधनुष्याप्रमाणें दिसत होता. त्यामुळें ज्याच्या पाठीवर चमत्कारिक गालिचा घातला आहे असा हत्तीचा छावा जसा दिसतो, किंवा कैलासपर्वताच्या टेंकडीला धडका मारल्यामुळें अनेक रंगी धातूंची धूळ अंगावर उडालेला शंकराचा नंदी जसा दिसतो, किंवा दैत्यांच्या रक्तानें भरलेला देवीचा सिंह जसा दिसतो, त्याप्रमाणें तो दिसत होता. तो वेगाची प्रत्यक्ष मूर्तिच आहे काय असा भासत होता. त्याचे ओंठ वारंवार फुरफुरत होते. व नाकावाटें सूं सूं असा शब्द चालला होता. त्यामुळें वेगानें धरलेल्या वायूस नाकावाटें सोडूनच देत आहे असें वाटत होतें. तो लगाम चवळीत असल्यामुळें त्याच्या तोंडावाटें फेंस गळत होता, तेणेंकरून समुद्रवास झाल्यामुळें तेथें प्राशन केलेल्या अमृताच्या गुळण्याच टाकीत आहे काय! असें भासत होतें. त्याचें तोंड लांब असून सुरेख होतें, त्यामुळें हें कोरूनच केलें आहे काय, असें दिसत होतें. त्याचे कान उभे होते. मुखावरील रत्नभूषणांची प्रभा त्याच्या कानावर फाकली होती; त्यामुळें हीं दोन चामरेंच आहेत काय! असें दिसत होतें. त्याच्या गळ्यांत सोन्याच्या सुतानें गुंफलेलीं माणकें, पाचू, इत्यादि रत्नांचेहार होते. त्याच्या मानेवरचे केंस तांबड्या रंगानें रंगविलेले होते, या कारणानें समुद्रांत संचार केल्यामुळें त्याच्या मानेभोंवतीं ही पोंवळ्यांची वेलीच लटकविली आहे काय, असें दिसत होतें. मौक्तिकांचे व रत्नांचे हार त्याचे गळ्यांत असल्यामुळें नक्षत्रमंडळानेंयुक्त अशी संध्याकाळची लाली जशी दिसते, तशी त्याची शोभा दिसत होती. पाचूंचे हारांची हिरवी कांति त्याच्या अंगावर पडल्यामुळें हा सूर्याच्या रथाचा घोडाच खालीं आला आहे काय! असें भासत होतें. त्याच्या अंगावर शुभ्रघर्मबिंदु दिसत असल्यामुळें समुद्रांतून आल्यामुळें हीं त्याच्या अंगास मोत्येंच लागलीं आहेत काय! असें दिसत होतें. तो इंद्रनीळमण्यासारख्या काळ्या व कठिण खुरांनीं भूमीस उकरीत होता. त्याचा बांधा व सर्व अवयव जसे असावे तसे होते. तो वेगानें वायू, गरुड व मन यासारखा होता. हा उच्चैःश्रव्याच्याच

अवतार आहे असें पाहणारांस वाटत होतें. असा तो अश्व **चंद्रापीडानें** पाहिला.

पूर्वीं कधीं न पाहिलेला, देवलोकीं राहण्यास योग्य, सर्वलक्षणांनीं युक्त, रंगानें, रूपानें व डौलानें उत्तमप्रकारचा असा तो अश्व पाहून **चंद्रापीडास** विलक्षण आश्चर्य वाटलें. तो मनांत ह्मणाला, पूर्वीं देवदैत्यांनीं मंदरपर्वतास वासुकी लावून मोठ्या खटाटोपानें समुद्राचें मंथन केलें, आणि हें अश्वरत्न न काढतां भलतींच रत्नें काढलीं ! मेरुपर्वताच्या शिलेसारख्या विस्तीर्ण अशा त्याच्या पृष्ठावर न बसतां इंद्रानें त्रैलोक्यराज्याचें फळ काय मिळविलें असेल तें असो ! उच्चैश्रव्याला पाहूनच भुललेल्या इंद्रास समुद्रानें खरोखर फसविलें ! हा विष्णूच्या दृष्टीस पडला नाहीं, ह्मणून तो अजूनही गरुडावर बसण्याची हौस सोडीत नाहीं ! काय हो ! इंद्रापेक्षां देखील माझ्या पित्याचें वैभव अधिक आहे, ह्मणून सर्व जगांत दुर्लभ अशीं रत्नें माझ्या पित्याजवळ आहेत ! ह्या अश्वाची आकृति मोठी तेजस्वी व बलाढ्य असल्यामुळें हा देवांश असावा असें दिसतें, व यामुळें ह्यावर आरोहण करण्यास शंका वाटते. सामान्य अश्वाची आकृति अशी सर्वांस थक्क करून टाकणारी नसते. असें ऐकण्यांत आहे कीं, ऋषींच्या शापांनीं देवता आपलीं शरिरें सोडून शापबलानें दुसऱ्या शरिराचा स्वीकार करितात. पूर्वीं **स्थूलशिरा** ऋषीनें रंभेला शाप दिल्यामुळें ती स्वर्गलोक सोडून ह्या लोकीं अश्वयोनींत उत्पन्न होऊन **शतधन्वा** राजाजवळ पुष्कळदिवस राहिली होती. दुसरेही पुष्कळ मुनिशापानें या लोकीं उत्पन्न झाल्याचें ऐकण्यांत आहे. तसाच हाही कोणी महात्मा असावा, व शापामुळें या जातींत उत्पन्न झाला असावा. याची आकृतिच याच्या दिव्यपणाबद्दल खात्री करीत आहे. असें चिंतन करीत तो राजपुत्र घोड्यावर बसण्याच्या हेतूनें आसनावरून उठला, आणि आपल्या मनांत ह्मणाला, "अश्वा, तूं कोण असशील तो अस, तुला नमस्कार असो, मी तुजवर आरोहण करितों, याबद्दल क्षमा कर." असें तो ह्मणत आहे तों त्याचा अभिप्राय जाणूनच

काय तो अश्व मानेवरचे केंस हालवून व वक्रदृष्टीनें चंद्रापीडाकडे पाहून खुरांनीं पृथ्वीस उकरूं लागला. तो आपला उजवा खुर वारंवार आपटीत असल्यामुळें चंद्रापीडास बोलावितोच आहे काय, असें दिसत होतें. त्याच्या नाकाच्या रंध्रांतून मधुरशब्द चालला होता, व तो आनंदानें खिंकाळत होता. तेव्हां हा आपल्यास चढण्याविषयीं सूचनाच करीत आहे असें समजून चंद्रापीडानें त्यावर आरोहण केलें.

त्या अश्वावर चढल्यावर चंद्रापीडास सर्व त्रैलोक्य अगदीं अल्पसें वाटूं लागलें. मग तो त्या वाड्याच्या बाहेर पडला; तेव्हां अपरिमित अश्वसैन्य त्याच्या दृष्टीस पडलें. त्या वेळीं प्रळयकाळच्या मेघांनीं सोडलेल्या गारांच्या शब्दाप्रमाणें तेथील घोड्यांच्या टापांचे खाड खाड शब्द चालले होते. ह्या शब्दांनीं, नाकांच्या फुरफुरण्यांनीं व खिंकाळण्यांनीं सर्वांच्या कानठाळ्या बसून गेल्या. घोडेस्वारांनीं हातांत धरलेल्या भाल्यांच्या चकचकित टोंकांवर सूर्यकिरण पडल्यामुळें तीं फारच लकलकीत दिसत होतीं. त्या वेळीं मोठ्या सरोवराप्रमाणें दिसणारें आकाश, भाल्यांच्या योगानें कमलांच्या कळ्यांनींच भरल्यासारखें दिसत होतें. त्या राजे लोकांच्या मस्तकांवर मयूर पिच्छांचीं छत्रें असल्यामुळें इंद्रधनुष्यांनीं युक्त मेघमंडळाप्रमाणें तें सैन्य दिसत होतें. त्या घोड्यांचीं तोंडें फेसांनीं शुभ्र झाल्यामुळें व तीं तेजस्वी असल्यामुळें हा प्रळयसमुद्राच्या लाटांचा लोटच आला आहे काय, असें भासत होतें तें सैन्य अगण्य होतें व त्याचा पारही दिसत नव्हता. चंद्रदर्शनानें समुद्र उसळतो, त्याप्रमाणें चंद्रापीडास पहातांच त्या सैन्यांत हालचाल सुरू झाली. राजपुत्रास मी आधीं नमस्कार करीन, असें प्रत्येकाच्या मनांत असल्यामुळें मोठ्या गर्दीनें त्यांनीं राजपुत्रास वेढिलें. त्या दाटींत घोड्यास धोंड लागून उधळूं लागल्यामुळें राजे लोकांस त्यांस आवरून धरण्यास बरेच प्रयास पडले. मग त्या बलाहकसेनापतीनें प्रत्येक राजपुत्राचें नांव चंद्रापीडास सांगितलें. मग त्या राजपुत्रांनीं आपलीं मस्तकें खालीं करून व हात जोडून चंद्रापीडास नमस्कार केले.

त्या वेळीं त्यांच्या मुकुटावरील आरक्त प्रकाश पडल्यामुळें हा, यांनीं अनुरागच प्रकट केला आहे काय! असें दिसत होतें. त्यांनीं आपले हात जोडले होते, त्यामुळें **चंद्रापीडास** यौवराज्याभिषेक करण्याकरितां हे त्यांनीं कलशच घेतले आहेत काय! असें वाटत होतें.

नंतर **चंद्रापीडानें** त्या सर्व राजपुत्रांचा योग्य सन्मान केला, आणि नंतर तो नगरास जाण्यास निघाला. त्याच्या मागून प्रधानपुत्र **वैशंपायनही** घोड्यावर बसून निघाला. **चंद्रापीडास** उष्ण लागूं नये म्हणून त्याच्या मस्तकावर शुभ्र छत्र धरिलें होतें. त्याचा आकार कमळासारखा होता त्यामुळें राज्यलक्ष्मीचें राहण्याचें हें कमलच आहे काय! असें दिसत होतें. कमलसमुदायासारखा राजसमुह व चंद्रमंडळासारखें छत्र दिसत होतें. त्या छत्रास मोत्यांची झालर लावलेली होती व त्यावर सिंहाचें चित्र होतें. त्या छत्रास सुवर्णाचा दांडा होता व त्याच्या दोहों बाजूस चौऱ्या उडत होत्या. त्यांच्या वाऱ्यानें राजपुत्राच्या कर्णांतील अलंकार हालत होते. त्याच्यापुढें हजारों तरुण वीर धांवत जयजयकार करीत व मंगलशब्दांचा उच्चार करीत चालले होते; आणि भाटलोक स्तुतिपाठ करीत चालले होते.

मूर्तिमान मदनासारख्या **चंद्रापीडाची** स्वारी शहरांतून चालली आहे, असें शहरांतील लोकांस समजतांच चंद्रोदयकालीं चंद्रविकासी कमलें जशीं भराभर प्रफुल्लित होतात त्याप्रमाणें नगरवासी लोक प्रफुल्लितमुखांनीं आपापले काम धंदे सोडून **चंद्रापीडास** पाहण्याकरितां येऊन उभे राहिले. त्यांस पाहून ते लोक एकमेकांशीं बोलूं लागले, " हा राजकुमार असतां कार्तिकस्वामी आपणास कुमार म्हणवितो ही गोष्ट मोठ्या उपहासाची आहे! आपण मोठे पुण्यवान् व धन्य आहों. याची दिव्यमूर्ति प्रेमानें व कौतुकानें भरलेल्या नेत्रांनीं आपणास यथेच्छ पाहण्यास सांपडली, तेव्हां आज आपल्या जन्माचें सार्थक्य झालें. **चंद्रापीडाच्या** रूपानें भगवान् नारायणच अवतरला आहे यांत संशय नाहीं. असें बोलून हात जोडून स-

वांनीं त्यास नमस्कार केले. नगरांतील खिडक्यांचीं दारें भराभर उघडल्यामुळें **चंद्रापीडास** पाहण्याकरितां नगरानें आपले डोळेच उघडले काय असें वाटलें. सर्व विद्याभ्यास करून **चंद्रापीड** विद्यामंदिरांतून निघून शहरांतून चालला आहे असें ऐकून त्याला पाहण्याच्या कौतुकानें शहरांतील स्त्रियांनीं आपलीं अर्धीं कामें सोडलीं आणि **चंद्रापीडास** पाहण्याकरितां गडबडीनें धांवत आल्या.

कांहीं स्त्रियांच्या हातांत वेणी घालण्याकरितां आरसे होते ते तसेच असल्यामुळें त्या पूर्णचंद्रानें युक्त पौर्णिमेच्या रात्रीसारख्या दिसत होत्या! कांहीं स्त्रियांच्या पायास अलित्याचा लाल रंग असल्यामुळें कोंवळ्या उन्हानें कमलिनी जशा दिसतात तशा त्या दिसत होत्या!घाईनें आल्यामुळें कांहीं स्त्रियांच्या पायांत कमरपट्टा आल्यामुळें पायांत साखळदंड अडकून हळूहळू चालणाऱ्या हत्तिणीप्रमाणें त्या दिसत होत्या ! त्यांच्या नखांची कांति पायावर पडल्यामुळें पादभूषणशब्दास मोहित होऊन हे कलहंस पक्षीच आले आहेत काय! असे त्यांचे गौरवर्ण पाय दिसत होते. कोणी गळ्यांत घालण्याकरितां हातांत घेतलेला मौक्तिकहार हातांतच राहिल्यामुळें, मदननाशानें विरक्त होऊन स्फटिकाची माळ धारण करणाऱ्या रतीप्रमाणें त्या दिसत होत्या ! कांहीं स्त्रियांच्या स्तनांवर मौक्तिकहार हालत असल्यामुळें स्वच्छ जलधारेच्या दोहों बाजूंस बसलेल्या चक्रवाक पक्ष्यांच्या जोड्यानें संध्याकाळची शोभा जशी दिसते, तशा त्या दिसत होत्या! कांहीं स्त्रियांच्या पायांत रत्नजडित नूपुरांच्या निरनिराळ्या प्रभा पडल्यामुळें त्यांच्या बरोबर ह्या मयूरीच चालत आहेत काय ! असें भासत होतें. याप्रमाणें सर्वस्त्रिया घाईनें येऊन कोणी गच्चीवर उभ्या राहिल्या. कांहीं खिडक्यांतून बसून पाहूं लागल्या. पाचूच्या हिरव्या खिडक्यांतून त्यांचीं मुखकमलें दिसूं लागल्यामुळें ह्या आकाशांत कमलिनीच उगवल्या आहेत काय, असें भासूं लागलें ! त्या स्त्रिया गडबडीनें आल्यामुळें त्यांच्या भूषणांचे मधुर शब्द ऐकूं आले, त्यामुळें सरोवर संबंधी पक्षी शब्द करूं लागले. हें मेघाचें गडगडणें समजून कलहंस पक्षी ओरडूं लागले.

तेव्हां हा मदनाच्या स्वारीच्या वेळचा चौघडाच झडत आहे काय, असें वाटलें!

माड्यावरून, गच्च्यांवरून, व खिडक्यांमधून जिकडे तिकडे स्त्रिया बसल्यामुळें शहरांतील सर्व वाडे फुलल्याप्रमाणें दिसूं लागले. व जिकडे तिकडे नारीमय व लावण्यमय दिसूं लागलें! स्त्रियांच्या पायांचे लाल रंग जमिनीस लागल्यामुळें भूमि लाल पल्लवांनीं आच्छादितच केल्यासारखी दिसूं लागली! जिकडे पहावें तिकडे त्यांच्या अंगाची सुवर्णासारखी कांति दिसत असल्यामुळें हें मूर्तिमंत लावण्यच पसरलें आहे काय, असें दिसत होतें! त्यांचीं सुंदर मुखें चोहींकडे दिसत असल्यामुळें, हीं आकाशांत हजारों चंद्रबिंबेंच उगवलीं आहेत काय, असें भासत होतें! त्यांनीं आपल्या तोंडावर ऊन्ह पडूं नये ह्मणून पुढें हात केले होते त्यामुळें सर्व दिशा कमलांनींच भरल्या आहेत काय, असें वाटत होतें! अनेक प्रकारच्या रत्नालंकारावर सूर्यकिरण पडून त्यांचे अनेकरंगी किरण झळकत असल्यामुळें हीं इंद्रधनुष्येंच पडलीं आहेत काय, असें वाटत होतें! त्या स्त्रियांचे कज्जलयुक्त तेजस्वी डोळे दिसतअसल्यामुळें हीं नील कमळेंच प्रफुल्लित झालीं आहेत काय, असें भासत होतें! त्या सुंदरींचीं अंतःकरणें आदर्शरूपी किंवा स्फटिकरूपी अथवा जलरूपी असल्यामुळेंच काय त्यांत **चंद्रापीडाचें** स्वरूप प्रतिबिंबित झालें! **चंद्रापीडास** पाहतांक्षणींच त्या स्त्रिया मोहित झाल्या आणि त्या ईर्षेनें, प्रेमानें व विनोदानें एकमेकींशीं बोलूं लागल्या. "एक ह्मणाली, अग! मला येऊं दे, इतकी पळत कां सुटलीस! दुसरी म्हणाली, अग, तो पदर खालीं पडला आहे, तो सावर अमळसा? अग चपळे! तोंडावर केंस आले आहेत, ते मागें सार अगोदर; अग वेडे! ती तुझी चंद्रकोर भलतीकडेच गेली आहे, ती नीट कर! अग ये अंधळे! वाटेंत फुलें पडलीं आहेत, त्यांना अडखळून कशी पडतेस! अग, कामानें वेडावलेले! आपली वेणी तर खोंव! **चंद्रापीडास** पाहण्यासाठीं जशी घाबरी झाली आहे! अग, तुझा कमरपट्टा खालीं गळाला आहे, तो अगोदर वर तर सार! अग ये, पापिणी!

तुझ्या कानावरचा पल्लव गालावर लोंबत आहे, तो काढून तरी टाक! अग, तुझें चित्त अगदींच कोंग ठिकाणीं नाहीं! ही तुझी फणी पडली आहे, ती आपली घे! तरणेपणानें माजली आहे जशी! अग, आपल्या स्तनावर नीट पदर तरी घे, लोक तुझ्याकडे टक लावून पाहताहेतना! अग निलाजरे! तुझें लुगडें सैल झालेंना! अग, टाकंटिकला करीत बसणारे! लवकर इकडे ये. अग, नादिष्टे, मला पाहण्यास जागा दे. किती पाहिलें तरी समाधान न पावणारे, अग, किती पाहतेस तरी किती? अग ये, बावरलेले, सेवकाला तरी बरोबर येऊं दे. अग ये वेडे, तुझ्या अंगावरचा शेला पडला म्हणून लोक तुला हंसतात ना! अग ये विषयांधे, तुला आपल्या मैत्रिणी देखील दिसत नाहींत! अग मदनपीडिते, आपल्या मनाला दुःख देऊन कष्टी कां होतेस! अग खोटा भोळेपणा दाखविणारे, असें मीस करून कां पहातेस! चंद्रापीडाकडे खुशाल कां पहात नाहींस? अग ये, तारुण्याचा डौल दाखविणारे, माझ्या अंगाला कांगबाई आपले स्तन लावतेस! हिच्या तर बाई जसा नाकावर राग! तूंच हो बाई पुढें, झाले? कायग, तूं दुष्ट आहेस! एकटीच खिडकी अडवून बसली आहे! माझ्या अंगावरचा पदर आपल्या अंगावर ओढून घेतेस तेव्हां तूं शुद्धीवर तरी आहेस कां? अग माजुरडे, कांहीं तरी शुद्धीवर ये. अग दांडगे, उतावळीनें धांवतेस कां. अग ये उनाड मुली, इतकी घाबरी कां होतेस. अग, तुझ्या अंगावर मदन विकारानें थरारून कांटा उभा राहिला आहे तो दिसूं तरी देऊं नको! अग तूं इतकी उतावळी कां होतेस? अग शून्य हृदये, घरांतून बाहेर निघाल्याचें मुद्धां तुला भान नाहीं! अग कौतुक पाहण्यांत गुंगणारे, तूं श्वास सोडण्यास देखील विसरलीस! आपल्या मनामध्यें समागमसुख घेण्यांत गर्क रहाणारे, नीट डोळे उघड, हा राजपुत्र निघून चालला ना! अग मदनबाणांनीं मूर्छितझालेले, ऊन्ह न लागण्याकरितां डोळ्यावर पदर तरी घे? पतिव्रतेचा डौल मिरविणारे, पाहण्याची वस्तू पाहत नाहींस, तेव्हां आपल्या डोळ्याला अंधळे करतेस! अग अधन्ये, परपुरुषाकडे पहावयाचें नाहीं, असा तुझा नियम असल्यानें सर्वस्वी

बुडालीस? तर आतां हा नियम सोडून दे, आणि ज्यानें आपल्या बरोबर मकरध्वज[1] घेतला नाहीं, व ज्याच्या बरोबर रतिही नाहीं, असा साक्षात् मदन चालला आहे त्याकडे पहा. त्याचा केशपाश कसा भ्रमरांच्या थव्याप्रमाणें काळाभोर दिसत आहे. हें नीलाकाश समजून चंद्रच आला आहे काय असा मालतीपुष्पांचा शुभ्र व सुवासिक तुरा यानें आपल्या केशपाशांत खोंविला आहे. त्याच्या कानांत पाचूचीं भूषणें असून त्यांची हिरवीगार प्रभा गालांवर झळकत आहे. तेणेंकरून कानांवर शिरीषपुष्पांचे गुच्छच ठेविले आहेत काय, असें भासत आहे. याच्या कंठांतील रत्नहारांत माणकांचा आरक्तवर्ण प्रतिबिंबित झाल्यामुळें तारुण्यराग हृदयांत शिरण्याकरितांच स्फुरण पावत आहे काय! असें वाटत आहे. वैशंपायनाबरोबर हा कांहीं बोलत चालला आहे. हा किंचित् हास्य करीत आहे तेणेंकरून त्याच्या दंतांच्या कांति झकळत आहेत. घोड्यांच्या खुरांनीं धूळ उडून ती ह्या राजकुमाराच्या केसावर उडाली कीं, हा बलाहक सेनापति आपल्या हिरव्या शेल्याच्या पदरानें ती पुशीत आहे. जसा एखादा हत्ती सोंडेनें शेवाळ घेतो त्याप्रमाणें हा आपला हात पुढें करून विडा घेत आहे. ती स्त्री मोठी धन्य होय कीं, जी लक्ष्मीप्रमाणें पृथ्वीची सवत होऊन याचें हस्तकमळ आपल्या हातांतग्रहण करील! दिशा जशी दिग्गजास धारण करिते, त्याप्रमाणें ज्या विलासवतीनें सकलभूमंडळाचा भार धारण करण्याविषयीं समर्थ असा हा चंद्रापीड आपल्या उदरांत धारण केला. तेव्हां ती धन्य होय!" याप्रमाणें अनेक प्रकारें भाषण करणाऱ्या स्त्रियांनीं आपल्या नेत्ररूपपात्रांनीं प्राशनच केला काय! भूषणांच्या मधुरशब्दांनीं बोलाविलाच काय! मनांनीं पाठोपाठ धांवच घेतलेला काय, अलंकारांच्या किरणरूप रज्जूंनीं बद्धच केला काय, तारुण्यरूप नजराणा देऊन भेट घेतलेलाच काय! असा तो चंद्रापीड दिसला. त्याच्या अंगावर त्या नगरांतील स्त्रियांनी पुष्कळ फुलें व लाह्या उधळल्या. मग तो राजवाड्याजवळ येऊन पोहों-

---

१ मत्स्यचिन्हयुक्त ध्वज.

चला. त्या ठिकाणीं कज्जल पर्वतासारख्या हत्तींची गर्दी होती व त्यांच्या गंडस्थळांवाटें मदोदक गळत होतें. तेणेंकरून वर्षाकालची जशी शोभा दिसते तशी तेथें दिसत होती. हजारों राजेलोकांची गर्दी जमल्यामुळें छत्राला छत्र लागून राहिलें होतें. परद्वीपाहून आलेले शेंकडो राजदूत त्या ठिकाणीं जमले होते. राजवाड्याच्या थोर दरवाजाजवळ **चंद्रापीडाची** स्वारी आल्यावर तो खालीं उतरला.

घोड्यावरून उतरल्यावर आपल्या हातानें **वैशंपायनाचा** हात धरून **चंद्रापीड** वाड्यांत चालला. तेव्हां **बलाहक** सेनापति पुढें होऊन वाट दाखवीत चालला. त्या वेळीं एके ठिकाणीं जमलेलें त्रिभुवनच काय असें तें राजमंदिर दिसत होतें. द्वारांच्या दोहों बाजूस सोन्याच्या काठ्या हातांत घेऊन व कंबरा बांधून चोपदार उभे होते. त्यांचे पोशाख पांढरे शुभ्र होते. व त्यांनीं आपल्या पागोट्यांत पांढरे तुरे खोंवले होते. त्या वाड्याचीं मंदिरें आकाशास स्पर्श करणारीं असल्यामुळें, व शुभ्र सफेती दिली असल्यामुळें कैलासपर्वताच्या शिखरास हंसतच आहेत काय अशीं तीं दिसत होतीं. मंदिराच्या माड्यांवरील खिडक्यांतून स्त्रिया बसल्या होत्या, व त्यांच्या भूषणांचे किरण वरील छतावर झळकत होते, तेणेंकरून तेथील शोभा फारच मनोहर दिसत होती. मोटमोठ्या सर्पांसारख्या शस्त्रास्त्रांनीं युक्त व पाताळलोकपर्यंत खोल अशा गुहाच आहेत काय अशा तेथील आयुधशाळा खोल व भयंकर दिसत होत्या. त्या ठिकाणीं क्रीडा करण्याचे रमणीय पर्वत होते. त्यांच्या शिलातलावर क्रीडा करणाऱ्या स्त्रियांच्या पायांचे लाल रंग लागलेले होते व मयुरादि पक्षी ओरडत होते. भरगच्ची झुली घालून आलंकृत केलेल्या सुशिक्षित हत्तिणी चौकांत उभ्या केल्या होत्या. एक्या बाजूस गंधमादन नांवाचा गजराज एक्या मोठ्या खांबास सांखळदंडानें बांधला होता. त्याला रंजविण्याकरितां गायन व वाद्यें यांचा गजर सुरू होता. आपली सोंड डाव्या दांतावर ठेवून व डोके मिटून तो निश्चलपणानें गायन ऐकण्यांत निमग्न झाला होता. त्याच्या पाठीवर चित्रविचित्र रंगाची झूल घातली होती. त्यामुळें अनेक रंगाचे धातु

उघावर आहेत अशा विंध्यपर्वतासारखा तो दिसत होता. त्या गायनानें तो संतुष्ट होऊन मधून मधून मधुरगर्जना करीत होता. त्याच्या गंडस्थळापासून मदोदक वाहत होतें. त्याच्या मस्तकावर पांढऱ्या रंगाचा भोंवरा असल्यामुळें चंद्रबिंबानें युक्त मेघ जसा दिसावा, तसा तो दिसत होता. त्याच्या कानाजवळ सुवर्णाचे अंकुश खोंवले होते. ते कर्णभूषणांप्रमाणें दिसत होते. त्याच्या गंडस्थळावर भ्रमर गुंजारव शब्द करीत होते. त्या गजराजाचें पुढचें अंग उंच होतें, व मागचें निच होतें. त्यामुळें हा पाताळांतूनच वर येत आहे काय! असा दिसत होता. तो नक्षत्रमालांनीं सुशोभित दिसत होता. त्याच्या सोंडेचें बोंड लाल होतें. तो आपल्या कानांनीं आपणास वारा घेत होता. एकीकडे राजाचे आवडते मोठाले घोडे बांधले होते. त्यांच्या पाठीवर चित्रविचित्र झुली घातल्या होत्या. त्यांच्या गळ्यांत घांटा होत्या त्यांचा मधुर शब्द चालला होता. त्यांच्या मानेवरचे केंस लाल रंगविले होते, त्यामुळें, हत्तीला मारल्यामुळें रक्तानें ज्यांच्या सटा भरल्या आहेत असें सिंह जसे दिसतात, त्याप्रमाणें ते दिसत होते. त्यांच्या पुढें गवताचे ढीग पडले होते. त्यांच्याजवळ मोतद्दार लोक गाणीं गात बसले होते. तीं ऐकण्याकरितां त्यांनीं आपले कान उभे केलेहोते. न्यायसभेंत केवळ धर्ममूर्तिच असे धर्माधिकारी पुरुष सभ्य वेष धारणकरून वेतांच्या आसनावर बसले होते. यमधर्माचें घरीं जसा सर्व जगाचा कारभार चालतो त्याप्रमाणें तेथील व्यवस्था दिसत होती. हजारों कारकूनलोक हिशेब करीत बसले होते, व आज्ञापत्रें लिहित होते. जागजागीं शिपाई लोक पाहऱ्यावर ढालतरवारी घेऊन फिरत होते व राजाची स्वारी केव्हां येते ह्मणून वाट पाहत होते. ठिकठिकाणीं मांडलिक राजे बसले होते. त्यांत कोणी सोंगट्या व कोणी बुद्धिबळें खेळत होते. कोणी वीणा सतार वगैरे वाद्यें वाजवीत होते. कोणी चित्रें काढीत बसले होते. कोणी विनोदपर भाषणें बोलत होते. कोणी अनेक प्रकारच्या कविता करीत होते. कोणी काव्यें व सुभाषितें वाचीत होते. कोणी कवींचे गुणवर्णन करीत

होते. कोणी वेश्यांचीं गायनें ऐकत बसले होते. कोणी स्तुति पाठकांचे पवाडे ऐकत बसले होते. कोणाच्या डोक्यावर चकचकित मुकुट होते व कोणाच्या डोक्यावर पागोटीं होतीं. कोंवळे उन्ह पडलें ह्मणजे उदक प्रवाहयुक्तकुलपर्वत जसे शोभतात, तसे ते दिसत होते. सभास्थानीं तऱ्हेतऱ्हेचीं रत्नासनें व गालीचे असल्या-मुळें हीं इंद्रधनुष्येंच पडलीं आहेत काय, असें भासत होतें. मणि-मयभूमींत सभासदांचीं मुखें दिसत असल्यामुळें हीं प्रफुल्लित कमळेंच पसरलीं आहेत काय, असें वाटत होतें. शेंकडो दासी हातांत चवऱ्या घेऊन इकडे तिकडे फिरत होत्या, व त्यांच्या भूषणांचे मधुर शब्द चालले होते. एक्या बाजूस शिकारी कुत्रे सोन्यांच्या सांखळ-दंडांनीं बांधले होते. पाळलेले कस्तूरीमृग इकडे तिकडे फिरत असल्यामुळें त्यांचा सुवास चालला होता. ज्या ठिकाणीं किन्नरांचीं जोडपीं, रानमाणसें, अनेक प्रकारचे पशु व नानाप्रकारचे पक्षी आहेत असे शिकारखानेही तेथें होते. तो राजवाडा रात्रीप्रमाणें नक्षत्र-मालांनीं सुशोभित दिसत होता. प्रातःकाळाप्रमाणें तो मित्रोदयानें[1] रमणीय दिसत होता. जागजागीं फुलझाडें व फळझाडें सुशोभित दिसत होतीं. कित्येक पुरुष व स्त्रिया चंद्रापीडाच्या दर्शना-विषयीं उत्कंठीत होऊन वाट पहात बसल्या होत्या. इतक्यांत **चंद्रापीडाची** स्वारी आली, तेव्हां द्वारपाललोक पुढें होऊन **चंद्रापीडास** प्रणाम करूं लागले. मग त्यांनीं दाखविलेल्या मार्गानें **चंद्रापीड** आंत चालला. **चंद्रापीडाचें** दर्शन घेण्याकरितां पूर्वींच येऊन बसलेले राजेलोक पुढें येऊन त्यास नमस्कार करूं लागले. नंतर आचार जाणणाऱ्या वृद्ध स्त्रियांनीं त्याच्या वरून अनेक पदार्थ ओवाळून टाकिले. मग तो पुढें चालला तों हजारों पदार्थ असल्यामुळें हीं सप्तभुवनेंच आहेत काय असे सात चौक ओलांडून ज्या ठिकाणीं आपला प्रिय पिता होता त्या ठिकाणीं तो गेला. तेथें अंगांत कवचें व शस्त्रास्त्रें धारण केलेले असे कुलीन व महापराक्रमी लोक आपल्या पित्याच्या संरक्षणाकरितां उभे होते. दासी हातांत

१ सूर्य, स्नेही.

चवऱ्या घेऊन त्यास वारा घालीत होत्या. शुभ्रवाळवंटानें सुशोभित अशा गंगा प्रवाहांत ऐरावत जसा दिसतो, त्याप्रमाणें शुभ्रबिछान्यावर बसलेला आपला पिता **चंद्रापीडानें** पाहिला. "**चंद्रापीड** महाराजाकडे अवलोकन करावें" असें द्वारपालांनीं राजास सांगितलें, तेव्हां मस्तक भूमीस लावून नमस्कार करणाऱ्या पुत्रास पाहून राजाच्या अंगावर रोमांच उभे राहिले. त्याचे डोळे आनंदाश्रूंनीं भरले. मग पुत्रास आलिंगन करावें ह्मणून राजानें शयनावरून थोडेंसें उठून व हात पसरून "ये, ये; मला भेट दे." असें ह्मणून नम्र झालेल्या पुत्रास हृदयाशीं घट्ट धरून आलिंगन केलें. त्यावेळीं राजाच्या अंगावर आनंदानें रोमांच उभे राहिल्यामुळें **चंद्रापीडाचें** शरीर आपल्या शरिराशीं शिवूनच टाकितो आहे काय, किंवा त्याला शरिरांतच घालतो आहे काय, अथवा डोळ्यांनीं पितोच आहे काय असें वाटलें ! राजानें यथेच्छ आलिंगन केल्यावर तो आपल्या पित्याच्या पादपीठाजवळ जमिनीवर बसूं लागला, इतक्यांत तांबूलाचा डबा बाळगणाऱ्या दासीनें आपल्या अंगावरील शेल्याची घडी करून झट्दिशीं त्यास बसावयास दिली. 'ती एकीकडे कर,' असें हळूच बोलून व तीस पलीकडे सारून तो जमिनीवरच बसला. नंतर पुत्राप्रमाणें ज्याला राजानें आलिंगन दिलें असा **वैशंपायनही** **चंद्रापीडा**जवळ बसला. दोन घटका आपल्या पित्याजवळ बसल्यावर **तारापीड** म्हणाला, "बाळा ! अंतःपुरांत जा, आणि तुझ्या भेटीविषयीं तुझी माता फार उत्कंठित झाली आहे, तिला नमस्कार कर, व तसेंच इतर मातांची भेट घेऊन त्यांसही आनंदित कर. असें बापानें आज्ञा केल्यावर तो नम्रपणानें तेथून उठला आणि बरोबर येणाऱ्या सेवकांचें निवारण करून तो **वैशंपायनास** बरोबर घेऊन अंतःपूरवासी सेवकानें दाखविलेल्या मार्गानें अंतःपुरांत गेला.

त्या ठिकाणीं पांढरे पोषाक केलेले चोपदार आपल्या मातेच्या रक्षणाकरितां उभे आहेत, त्यामुळें क्षीरसमुद्राच्या लाटांच्या कल्लोळानें लक्ष्मी जशी दिसली तशी ती दिसत आहे. रक्तवस्त्र नेसलेल्या व इतिहास पुराणांतील गोष्टी जाणणाऱ्या अशा स्त्रिया जिला धर्माचा

उपदेश करीत आहेत, व पूर्वीच्या कथा सांगून करमणूक करीत आहेत, स्त्रीवेष धारण करणारे षंढलोक जेथें कामें करीत आहेत व ज्या विलासिनीवर चवऱ्या वारीत आहेत. आपल्या हातांत अलंकार, पुष्पें, सुवासिक द्रव्यें, तांबूल, पंखे, उटीचें साहित्य, पाण्यानें भरलेल्या झाऱ्या इत्यादि पदार्थ घेऊन कित्येक स्त्रिया जिच्या भोंवताली जें लागेल तें देण्याकरितां उभ्या आहेत. जिच्या अंगावर रत्नहारादि अलंकार सुशोभित दिसत आहेत. पुढें ठेवलेल्या आरशांत जी आपलें प्रतिबिंब पहात आहे, अशा आपल्या मातेस पाहून **चंद्रापीडानें** पुढें होऊन तीस नमस्कार केला.

मग **विलासवती** गडबडीनें उठून, आज्ञा ऐकण्यास तत्पर असे पुष्कळ दास व दासी जरी जवळ होत्या तरी, स्वतःच तिनें कांहीं पदार्थ पुत्रावरून ओवाळून टाकले. मग पुत्राचें कल्याण इच्छिणाऱ्या **विलासवतीनें चंद्रापीडाच्या** मस्तकाचें अवघ्राण करून त्यास आलिंगन दिलें. **चंद्रापीडाप्रमाणेंच वैशंपायनाचेंही** उपचार करून त्यास आलिंगन दिलें. मग **चंद्रापीड** जमिनीवर बसूं लागला असतां **विलासवतीनें** त्यास आपल्या जवळ घेतलें. मग सेवकांनीं गडबडीनें आणून मांडलेल्या आसनावर **वैशंपायनही** बसला.

मग **चंद्रापीडास** वारंवार आलिंगून व त्याच्या सर्व अवयवांवरून हात फिरवून **विलासवती** त्यास म्हणाली, " बाळा, तुझा पिता मोठा निष्ठुर म्हणावयाचा, म्हणून तुझी ही सकुमार तनु इतके दिवसपर्यंत त्यानें मोठ्या क्लेशांत ठेविली; तूं इतके दिवस गुरूचा प्रतिबंध कसारे सोसलास! तूं लहान असून तुझें मोठ्या पुरुषासारखें धैर्य आहे; बाबा, लहानपणीं खेळण्याचें कौतुक सोडून तुझें लक्ष अभ्यासाकडे लागलें तेव्हां तुझें धैर्य फारच मोठें म्हणावयाचें. तुझी गुरूवर भक्तिही खरी, पित्याच्या अनुग्रहानें, विद्येनें भूषित जसा तूं दृष्टीस पडलास, तसा अनुरूप स्त्रीनें युक्त केव्हां पडशील, असें मला झालें आहे!" असें आपल्या आईचें भाषण ऐकून **चंद्रापीड** सलज्ज होऊन खालीं तोंड घालून बसला. मग त्याच्या आईनें

परम कौतुकानें त्याचें चुंबन केलें. नंतर तेथें **चंद्रापीड** थोडाच वेळ बसून उठला आणि इतर मातांची भेट घेऊन त्यानें त्यांसही आनंदित केलें. नंतर राजवाड्याजवळ इंद्रायुध अश्व उभा होता त्यावर बसून तो इतर राजपुत्रांच्या व **शुकनास** प्रधानाच्या भेटीस गेला.

**चंद्रापीड** प्रधानाच्या वाड्याजवळ गेला तेव्हां द्वारपाळ पुढें धाऊन सामोरे आले. त्यांनीं **चंद्रापीडाचें** निवारण केलें नाहीं तरी तो राजवाड्याबाहेर जसा उतरला होता तसाच आतांही बाहेरच उतरला. त्या ठिकाणींही पाळीपाळीनें पहारा करणारे पुष्कळ हत्ती उभे होते. तसेंच हजारों घोडेही होते. अनेक कामाकरितां आलेल्या लोकांची पुष्कळ दाटी होती. अनेक शास्त्रें जाणणारे व अनेक धर्मपंथाचें अनुसरण करणारे लोक त्या ठिकाणीं दृष्टीस पडत होते. वाड्याच्या अंगणांत राजेलोकही कामा निमित्त आलेले होते, त्यामुळें त्यांचे हत्ती घोडे व मनुष्यें यांची गर्दी झाली होती. नंतर बाहेरच्या दरवाज्याजवळ घोडा उभा करून **वैशंपायनाचा** हात धरून तो वाड्यांत शिरला. तेव्हां द्वारपाळ पुढें होऊन लोकांचें निवारण करून जाण्याकरितां वाट करूं लागले. मग त्या ठिकाणीं असलेल्या राजे लोकांनीं त्यास उठून नमस्कार केले. चोपदार लोक ललकारी मारीत व काठ्या वर करीत पुढें चालत असल्यामुळें सर्व लोक भयभीत होऊन पलीकडे सरले. त्या वेळच्या गर्दीनें तेथील चौकांतील जमीन अगदीं हदरून गेली. ती मौज पहात **चंद्रापीड** नवीन सफेती दिल्यामुळें जेथील मंदिरें शुभ्र व उत्तम दिसत आहेत, व त्यामुळें हें दुसरें राजमंदिरच आहे काय अशा प्रकारें दिसणाऱ्या **शुकनासाच्या** मंदिरांत गेला. तेव्हां अनेक राजे लोक ज्याच्या भोंवतीं बसले आहेत अशा पित्यासारख्या **शुकनाशास** पाहून **चंद्रापीडानें** त्यास परम नम्रतेनें नमस्कार केला.

राजपुत्र आला असें पाहून प्रधान आपल्या आसनावरून उठला. त्या बरोबर राजेही उठले. मग प्रधान मोठ्या प्रेमानें राजपुत्रास सामोरा गेला. त्यावेळीं त्याच्या नेत्रांतून आनंदाश्रु गळूं

लागले. मग त्यानें राजपुत्रास दृढ आलिंगन दिलें. आणि मग आपला पुत्र **वैशंपायन** यासही आलिंगन दिलें. नंतर बसण्याकरितां आसन दिलें त्यांवर न बसतां **चंद्रापीड** भूमीवरच बसला. त्याच्या शेजारीं **वैशंपायनही** बसला. तेव्हां **शुकनासा**खेरीज सर्वांनीं आपापलीं आसनें सोडिलीं व सर्व जमिनीवरच बसले. नंतर आनंदामुळें ज्या ज्या आंगांवर रोमांच उभे राहिले आहेत असा **शुकनास** राजपुत्राशीं बोलूं लागला.

" बाबा **चंद्रापीडा,** तुझा विद्याभ्यास पुरा होऊन तूं तारुण्यांत आला आहेस; असें पाहून **तारापीड** महाराजांस सार्वभौम पद मिळाल्याचें आज सार्थक्य झालें. सर्व गुरुजनांचे आशीर्वाद आज फळास आले. अनेकजन्मीं केलेलें पुण्य आज उदयास आलें. कुलदेवता आज प्रसन्न झाल्या. ज्यांच्या पदरीं पुण्य नाहीं त्यांनां तुजसारखा पुत्र कोठून होणार ? हें तुझें अल्प वय कोणीकडे ! आणि ही सकल विद्यांचें आकलन करणारी तुझी अमानुष शक्ति कोणीकडे? ह्या प्रजा धन्य होत कीं, ज्यांचा पालन करणारा भरत भगीरथ यांसारखा तूं उत्पन्न झालास. पृथ्वीनें असें कोणतें पुण्य केलें होतें कीं, तुजसारखा पति तिला मिळाला. विष्णूच्या वक्षस्थळावर राहण्याचा आग्रह धरणाऱ्या लक्ष्मीनें तुजजवळ मूर्तिमंत राहण्यास न येऊन आपला मोठा तोटा करून घेतला ! श्रीवराहानें आपल्या दांतानें जसा सर्वभूभार धारण केला, त्याप्रमाणें तूं आपल्या बाहूनें सर्व पृथ्वीचा भार धारण कर." असें बोलून त्यानें वस्त्रालंकार व पुष्पमाला यांनीं राजपुत्राचा सन्मान केला व त्यास जाण्यास निरोप दिला. तेथून उठल्यावर **चंद्रापीड** अंतःपुरांत गेला आणि त्यानें **वैशंपायनाची** आई **मनोरमाबाई** हिची भेट घेतली. नंतर इंद्रायुधावर आरोहण करून आपल्या पित्यानें आपल्याकरितां मंदिर तयार करून ठेविलें होतें तेथें गेला. त्या ठिकाणीं द्वाराच्या दोन्ही बाजूंस पूर्ण कलश ठेविले होते. द्वारावर पल्लवपुष्पांच्या माळा लाविल्या होत्या. हजारों पताका उभारल्या होत्या, व त्या वाऱ्यानें फडकत होत्या. मंगलवाद्यें वाजत असल्यामुळें त्यांच्या

शब्दांनीं दशदिशा भरून गेल्या होत्या. जागजागीं फुलांचे ढीग पडले होते. उज्वल वेष धारण करणारे सेवक सेवेविषयीं तत्पर होते. त्या ठिकाणीं अनेक मंगलकर्मे केलीं होतीं. अशा त्या मंदिरांत चंद्रापीड गेल्यावर, दिवाणखान्यांत तयार केलेल्या एका मंचकावर तो बसला. मग तेथें त्यानें दोन घटका विश्रांति घेतल्यावर स्नान भोजन वगैरे जीं दिवसाचीं कर्मे करावयाचीं होतीं तीं केलीं. आपल्या राहण्याच्या जाग्याजवळच त्यानें इंद्रायुधास राहण्याकरितां जागा तयार करविली.

अशा प्रकारें तो दिवस गेला. पुढें संध्याकाळच्या वेळेस दिवस लक्ष्मीच्या पायांतील माणकाचें भूषणच काय! असें सूर्यबिंब खालीं पडलेसें दिसलें. सूर्याच्या रथाच्या चाकांच्या चाकोऱ्यावाटें उदक प्रवाहाप्रमाणें दिवसप्रकाश पश्चिमेकडे जसा काय वाहतच गेलासें दिसलें! दिवसानें सूर्यबिंबरूप तळहातानें रक्तकमलांची सर्व लाली घेतली असें भासलें. चंद्रविकासी कमलांचा सुगंध घेण्याकरितां आलेल्या भ्रमरसमुदायरूप कालपाशानें ओढल्यामुळेंच चक्रवाक पक्ष्यांचीं जोडपीं भिन्न झालीं काय असें वाटलें! सूर्यबिंबानें सर्व दिवसभर रक्तकमलांतील मधुर रस आपल्या हस्तांनीं घेऊन अतिशय प्राशन करून तें आकाशमार्गानें घाईघाईनें चालत असल्यामुळें त्यांस ही वांतिच झाली काय अशी संध्याकाळची लाली दिसूं लागली! पश्चिमदिशेच्या कोनांतील रक्तकमलच काय असा दिसणारा भगवान् सूर्य लोकांतरास गेला. आकाशरूपसरोवरांतील रक्तकमलिनीच काय अशी संध्या दिसूं लागली. दिशांच्या मुखावरचीही कृष्णागरूचंदनानें काढलेली पत्ररचनाच आहे काय! अशी अंधकाराची झांक दिसूं लागली. रक्तकमलांवर भ्रमरांचा थवा बसल्यामुळें जसें सरोवर काळें दिसतें, त्याप्रमाणें अंधकारानें संध्या राग काळा करून टाकला! कमलिनींनीं प्राशन केलेलें सूर्यतेज हरण करण्याकरितां हे अंधकाराचे हेरच आहेत काय असे भ्रमरांचे थवे कमलांवर दिसूं लागले! रात्रीरूप विलासिनी स्त्रीच्या कानांवरील रक्त पल्लवच काय! असा संध्या राग पडून नाहींसा झाला. मयूरांच्या बसण्या

ऱ्या काळ्यावर. ते बसले नसतां ही अंधकारामुळें ते बसलेच आहेत काय असें भासूं लागलें. खिडक्या जवळच्या भोंकांतून पारवे बसल्या-मुळे गृहलक्ष्मीच्या कानांतीलही नीलकमलेंच आहेत काय असें भासूं लागलें ! अंतःपुरांतील विलासिनी स्त्रिया संध्याकाळ झाल्यामुळें उठून गेल्या. त्यामुळें झोपाळ्याच्या कड्या कर कर वाजत होत्या त्या स्तब्ध राहिल्या. घराजवळच्या आंब्याच्या झाडांस टांगलेल्या पिंजऱ्यांतील राघू व मैना बोलत होते ते मुके राहिले. गायन व वाद्यें सुरू होतीं तीं बंद झालीं. हत्तीच्या गंडस्थळावर भुंग्यांच्या झुंडी येत होत्या त्या बंद झाल्या. उपाध्यायलोक आपापलीं कर्मे करून घरीं गेले. राजेलोक उठून गेल्यामुळें राजवाड्यांतली गर्दी कमी झाली, व त्यामुळें ते विस्तिर्ण दिसूं लागले. राजवाड्याच्या सर्व बाजूंस दिवे लागून त्यांचीं प्रतिबिंबें फरसबंदींत पडल्यामुळें ह्या कमलांच्या भेटीच झाल्या आहेत काय असें दिसूं लागलें ! सरोव-रांतून दीपांची प्रभा पडल्यामुळें आपल्या विरहानें पीडित झालेल्या कमलिनींचें शांतवन करण्याकरितां सूर्यानें आपली प्रभाच पाठविली आहे काय, असें भासूं लागलें. पिंजऱ्यांतून असलेले सिंह, व्याघ्र इत्यादि पशु निद्रेमुळें आळसल्यासारखे झाले. पहारेकऱ्याप्रमाणें मदन, धनुष्यबाण सज्ज करून अंतःपुरांत संचार करूं लागला. वीरहिणीं स्त्रियांच्या अंतःकरणांत विरहाग्नि पेटून अंतःकरणास दग्ध करूं लागला! अशा प्रदोषकाळीं चंद्रापीड पायांनींच राजवा-ड्यांत गेला. त्याजबरोबर मशाली पेटवून सेवक लोकही गेले. तेथें चंद्रापीड कांहीं वेळ आपल्या बापाजवळ बसला. नंतर आपल्या आईकडे गेला. तेथें कांहीं वेळ बसून नंतर तो पुनः आपल्या मंदिरांत गेला. नंतर फणामण्यांनीं सुशोभित अशा शेषावर भगवान् विष्णु जसा निद्रा करितो, त्याप्रमाणें अनेक रत्नकांतीनीं सुशोभित अशा मंचकावर तो निजला.

दुसरे दिवशीं चंद्रापीड पहांटेच उठला आणि आपल्या पित्याची आज्ञा ग्रहण करून मोठ्या कौतुकानें मृगया करण्याविषयीं उत्कंठित होऊन सूर्योदय होण्यापूर्वीच इंद्रायुधावर बसून अरण्यांत जाण्यास

निघाला. त्याजबरोबर कुत्रे बाळगणारे शिकारी लोक निघाले. त्यांनीं सोन्याच्या सांखळदंडास बांधलेले मोठ मोठाले शिकारी कुत्रे आपल्या हातांत धरले होते. त्यांनीं आपल्या अंगांत व्याघ्रचर्मांचीं कवचें धारण केलीं होतीं. मस्तकास चित्रविचित्र रंगांचीं वस्त्रें गुंडाळलीं होतीं. त्यांच्या दाढी व मिशा लांब लांब होत्या. त्यांनीं आपल्या हातांत धनुष्यें धारण केलीं होतीं. याप्रमाणें ते लोक मोठ्यानें आरडाओरड करीत व धांवत **चंद्रापीडा**बरोबर चालले होते. यामुळें तर **चंद्रापीडास** मृगया करण्याचा दुप्पट उत्साह वाटला. **चंद्रापीडा**बरोबर पुष्कळ हत्ती घोडे व शिपाई लोक धांवत चालले होते. वनांत गेल्यावर **चंद्रापीडानें** बाण सोडून मदोन्मत्त हत्ती, रानडुकरें, सिंह, सांबर व अनेक हरिण मारिले, व पराक्रमानें कित्येक वनपशु जिवंतही धरिले. पुढें सूर्यप्रखर तापून माध्यान्हकाळ झाला. **चंद्रापीडाच्या** घोड्याच्या अंगावाटें घामाच्या धारा वाहूं लागल्या. तो घोडा लगामास चावीत असल्यामुळें त्याचा खळखळ शब्द होऊन तोंडावाटें फेस व किंचित् रक्त निघूं लागलें. घोड्याच्या कानावर पुष्पगुच्छ बांधला होता व त्यावर भ्रमर गुंजारव करीत फिरत होते. **चंद्रापीडाचें**ही अंग घामानें अगदीं थबथबलें होतें. त्याच्या अंगांतल्या कवचावर वनपशूंच्या रक्ताचे थेंब उडाले होते, त्यामुळें त्याचा पोशाक फारच विलक्षण दिसत होता. छत्रधारण करणारे लोक मागें राहिल्यामुळें उष्ण निवारण होण्याकरितां त्यानें हातांत वृक्षाचा पल्लव धरिला होता. त्याच्या अंगावर लतापुष्पांतील पराग उडाल्यामुळें हा मूर्तिमंत मदनच आहे काय असें भासत होतें! अश्वांच्या खुरांची धूळ उडून त्याच्या ललाटावर उडाली होती. त्याच्या बरोबरचें पायदळ दूर मागें राहिल्यामुळें त्याच्या पुढें कोणी धांवत नव्हतें. भरधांव घोडे फेंकीत चाललेले कांहीं राजपुत्र मात्र त्याजबरोबर होते. 'असा सिंह होता,' 'असा रानडुकर होता,' 'असा रानरेडा होता,' 'असा हरिण पळाला.' याप्रकारें मृगयेच्या गोष्टी बोलत बोलत **चंद्रापीड** आपल्या घरीं आला.

घरीं आल्यावर तो घोड्यावरून खालीं उतरला आणि सेवकांनीं

झट्दिशीं मांडलेल्या आसनावर बसला. मग त्यानें मृगयेचा सर्व पोशाक काढून टाकला आणि दोन घटका विश्रांति घेतली. त्यावेळीं सेवकांनीं चोहींकडून पंख्याचा वारा घालून त्याचे श्रम दूर केले.

नंतर ज्या ठिकाणीं रत्नखचित रौप्यमय व सुवर्णमय कलश ठेविले होते व स्नानाकरितां चौरंग मांडला होता, अशा स्नानगृहांत तो गेला. त्या ठिकाणीं त्यानें स्नान करून व आपलें अंग पुसून स्वच्छ वस्त्रें धारण केलीं व रुमालानें आपलें डोकें गुंडाळलें. मग देवपूजा करून उटी लावण्याच्या ठिकाणीं तो गेला. तेथें राजानें व **विलासवतीनें** पाठविलेल्या दासी, वस्त्रें, अलंकार, पुष्पें व सुगंधी द्रव्यें पेटाऱ्यांत घालून घेऊन आल्या व त्यांतील सर्व जिनसा काढून त्यांनीं त्यांजपुढें ठेविल्या. त्या घेऊन **चंद्रापीडानें** पहिल्यानें **वैशंपायनास** उटी लावून मग आपल्या अंगास लाविली व जवळ जे राजपुत्र होते त्यांसही दिली. नंतर सर्वांसह वस्त्रालंकार धारण केल्यावर अनेक रत्नपात्रांनीं सुशोभित अशा भोजनगृहांत तो गेला. त्यावेळीं शरदृतुंतील आकाश जसें नक्षत्रांनीं सुशोभित दिसतें, तसें तें गृह भोजनपात्रांनीं दिसत होतें. त्या ठिकाणीं **चंद्रापीड** अनेक रंगी आसनावर भोजन करण्याकरितां बसला. **वैशंपायनही** त्याजवळ बसला होता व तो पदार्थांचें वर्णन करीत होता. राजपुत्रही जवळच आपापल्या योग्य ठिकाणीं बसले होते. सर्वांना पदार्थ वाढण्याचा आग्रह करीत सर्व मंडळीबरोबर **चंद्रापीडानें** मोठ्या आनंदानें भोजन केलें. नंतर आंचऊन व विडा घेऊन कांहीं वेळ विश्रांति घेतल्यावर तो ज्या ठिकाणीं इंद्रायुध बांधला होता त्या ठिकाणीं गेला. तेथें उभ्या उभ्यानें त्याच्या गुणांचें वर्णन करून, आज्ञेची वाट पाहणारे असें सेवक जवळ उभे होते तरी त्या अश्वाच्या गुणास मोहीत होऊन, त्यानें स्वतः इंद्रायुधापुढें गवत टाकलें. आणि मग तो तेथून राजवाड्यांत गेला. व पूर्वींप्रमाणें आईबापांचें दर्शन घेऊन निजला.

दुसरे दिवशीं प्रातःकाळींच **कैलास** नांवाचा चोपदार बरोबर एक कन्या घेऊन **चंद्रापीडा**कडे आला. ती कन्या नुकतीच तारुण्यांत आली होती, राजगृहांत राहून ती प्रौढ झाली होती, तथापि ती

फार नम्र होती. तिनें तांबड्या वस्त्राचा बुर्खा घेतला होता. त्यामुळें कोंवळ्या उन्हानें जशी पूर्वदिशा शोभते, तशी ती दिसत होती. तिच्या सौंदर्याच्या कांतीनें राजमंदीर भूषित झाल्यासारखें दिसत होतें; त्यामुळें राहूच्या भीतीनें चंद्रास सोडून ही चंद्रिकाच भूमीवर अवतरली काय, किंवा राजमंदिराचीही मूर्तीमंत देवताच आहे काय, अशी ती दिसत होती! तिच्या पायांत मधुर शब्द करणारीं भूषणें होतीं त्यामुळें मधुर शब्द करणाऱ्या कलहंसांनीं युक्त जशी कमलिनी दिसते, तशी ती दिसत होती. तिच्या कमरेवर सुवर्णाची मेखला होती. तिच्या उरावर नुक्ताच स्तनाविर्भाव झाला होता. तिच्या नखाच्या कांति झळकत असल्यामुळें हें हिजपासून सौंदर्यच पाझरतें आहे काय! असें दिसत होतें. तिच्या अंगावरील भूषणांच्या नवरत्नांची प्रभा तिच्या सभोंवती फाकल्यामुळें क्षीरसमुद्रांतून निघणाऱ्या लक्ष्मीप्रमाणें ती दिसत होती! विडा खाल्ल्यामुळें तिचे ओंठ लाल दिसत होते. तिचें नाक सरळ व उंच होतें. तिचे नेत्र कमलाप्रमाणें होते. तिच्या कानांतील कुंडलाची प्रभा तिच्या गालावर झळकत होती त्यामुळें कानावर ठेवलेले हे पल्लवच आहेत काय असें दिसत होतें. तिच्या कपाळावरील तिलक सुशोभित दिसत होता. तिच्या अंगावर तेजस्वी मोत्यांचे दागिने होते. तिनें आपल्या आंगास केशराची उटी लाविली होती, तिचें शरीर फारच नाजूक दिसत होतें. तिचें चालणें हळू हळू व खुबीदार होतें. तिची कमर बारीक होती आणि तिचा सर्व बांधा फार सुरेख होता.

नंतर तिच्या बरोबर आलेला **कैलास** नावाचा चोपदार पुढें सरला व जमिनीस उजवा हात लावून **चंद्रापीडास** प्रणाम करून विनंती करूं लागला; "महाराज राणी साहेबांनीं अशी आज्ञा सांगितली आहे कीं, पूर्वीं थोरल्या महाराजांनीं जेव्हां कुलूत राजास जिंकिलें. त्यावेळीं त्या राजाची ही कन्या **पत्रलेखा** बंदी केलेल्या लोकांबरोबर अगदीं लहान असतांच आणिली. ही इतके दिवस मी आपल्या जवळ अंतःपुरांत ठेविली होती. ही राजकन्या अनाथ समजून आजपर्यंत मी मोठ्या स्नेहानें कन्येप्रमाणें वाढविली. ही

आतां तुझा तांबुलाचा डबा बाळगण्यास योग्य झाली आहे, असें समजून तुजकडे पाठविली आहे. याकरितां हिला ठेवून घ्यावें. हिला दासीप्रमाणें मानूं नये. हिचें लालनपालन चांगल्या रीतीनें करावें. आपल्या चित्तवृत्तीप्रमाणें भलत्यासलत्या गोष्टीपासून हिचें निवारण करावें. शिष्यिणीप्रमाणें हिजवर लक्ष ठेवावें. मित्राप्रमाणें भरंवश्याच्या गोष्टी हिला सांगत जाव्या. मीच हिला वाढविली असल्यामुळें मुलीप्रमाणें हिजवर माझी ममता आहे. ही मोठ्या कुलीन घराण्यांतील मुलगी आहे, तेव्हां ही प्रीति करण्यास योग्य आहे. ही तुझी चांगल्या रीतीनें सेवा करील. हिचें शील तुला माहीत नाहीं ह्मणून निरोप पाठविला आहे. ही फार दिवस तुझी सेवा करण्यास उपयोगी पडेल." असा निरोप सांगून तो उगीच राहिला. मग **पत्रलेखानें** पुढें होऊन **चंद्रापीडास** प्रणाम केला. तेव्हां त्यानें तिजकडे पाहून "जशी आईची आज्ञा असेल तसें" असें ह्मणून त्या चोपदारास जावयास सांगितलें.

त्या दिवसापासून **पत्रलेखा** नेहमीं **चंद्रापीडाच्या** सेवेंत तत्पर असती झाली. **चंद्रापीडाचीही** प्रीति तिजवर दररोज अधिकाधिक वाढत गेली व ती त्याची अगदीं भरंवशाची झाली.

याप्रमाणें कांहीं दिवस गेल्यावर **चंद्रापीडास** यौवराज्याभिषेक करावा, असें **तारापीड** राजाच्या मनांत येऊन त्यानें सेवकास अभिषेकाची तयारी करण्यास आज्ञा केली. पुढें अभिषेक होण्याचा समय जवळ आला, तेव्हां एके दिवशीं **चंद्रापीड शुकनास** प्रधानाच्या भेटीस गेला. **चंद्रापीड** अगोदर नम्र असतां ही त्यास अधिक विनय संपन्न करावें असें **शुकनासाच्या** मनांत येऊन तो त्यास ह्मणाला:—

बाबा! **चंद्रापीडा** तूं सर्व जाणत आहेस, व सर्व शास्त्राचें अध्ययनही तूं केलें आहेस, तेव्हां तुला उपदेश करण्याजोगें कांहीं राहिलें आहे असें नाहीं. तथापि कांहीं सांगावेंसें वाटल्यावरून सांगतों, तर नीट ऐक. तारुण्यांतील अंधपणा सूर्यकिरणांनीं, रत्नांच्या प्रभेनें किंवा दीपप्रकाशानें जावयाचा नाहीं असा मोठा तो गहन

आहे! लक्ष्मीच्या योगानें मदांधपणा येतो तो कितीही अंजनें डोळ्यांत घातलीं तरी दूर व्हावयाचा नाहीं! गर्वानें दाह झाला असतां कितीही शीतोपचार केले तरी तो कमी होत नाहीं! विषय-सुखानें मद उत्पन्न झाला असतां तो औषधें किंवा मंत्र यांनीं जात नाहीं. विषयमलाचा एकदां लेप बसला कीं, तो कितीही स्नानें केलीं तरी जात नाहीं. राज्यसुखनिद्रेची धुंदी आली असतां रात्रीच्या रात्री गेल्या तरी ती जात नाहीं. याकरितां तुला सांगतों कीं, गर्भ श्रीमंती, नूतन तारुण्य, अप्रतिम सौंदर्य, विलक्षण शक्ति, ही सर्व अनर्थाची रांग आहे असें म्हटलें तरी चालेल. यांतील एक एक देखील उन्मत्तपणा आणण्यास कारण होतें, मग सर्वच एके ठिकाणीं जमल्यावर मग काय विचारायाचें आहे? शास्त्रजलानें निर्मल झालेली जरी बुद्धि असली तरी ती तारुण्याच्या भरांत मळीन होतें. तारुण्यभरांत वावटळीसारखी रजो[1]भ्रमण करणारी प्रकृति मनुष्याला कोणिकडे उडवील याचा नियम नाहीं. इंद्रियरूप हरणें विषयसुखरूप मृगजलास भुलून भलतीकडे भटकत जातात, त्यामुळें त्याचा परिणाम फार वाईट होतो. तारुण्यानें ज्याचें अंतःकरण तुरट होतें त्याला विषयसंभोग मधुर उदकाप्रमाणें लागतात. विषयासक्ति दिशाभुलीप्रमाणें मनुष्यास सन्मार्गापासून भ्रष्ट करिते. तुझ्यासारखे नीतिमान् पुरुष अशा उपदेशास पात्र आहेत. स्फटिकांत जसें चंद्रकिरण प्रवेश करितात त्याप्रमाणें उपदेशांचे शब्द तुजसारख्याच्याच अंतःकरणांत शिरतात. गुरूचें हितकारक वचन असलें तरी, अयोग्य पुरुषाच्या कानांत तें सूळ उत्पन्न करितें! आणि योग्य पुरुषाच्या कर्णास तेंच मधुर लागतें! चंद्र जसा अंधाराचा नाश करितो तसा गुरूचा उपदेश सर्व दोषांचे निवारण करितो. तूं अजून विषयरसाचें आस्वादन केलें नाहींस म्हणून तुला उपदेश करण्याचा हा समय आहे. मदनबाणाच्या प्रहारांनीं हृदय जर्जरित झाल्यावर त्या ठिकाणीं फुटक्या पात्रांत जलासारखा गुरूचा उपदेश कोठून ठरणार? विषयांनीं प्रकृति दूषित झाली असतां त्यास

१ रजोगुण-धूळ.

उत्तम कुल किंवा शास्त्र, मार्गावर आणूं शकत नाहीं. चंदनकाष्टापासून अग्नि उत्पन्न झाला असतां तो दग्ध करीत नाहीं काय? उदक हें विझविणारें जरी आहे तरी तें समुद्रांतील वडवाग्निवर टाकलें तर तो अधिक भडकत नाहीं काय? गुरूचा उपदेश सर्वमल दूर करणारें स्नानच म्हटलें तरी चालेल, जरारहित असून प्रौढत्व आणणारा हा होय. मेंदोवृद्धि न करतां भारदास्तपणा आणणारा होय. सुवर्णाचा नसून कर्णाला भूषित करणारा अलंकारच, ज्योतिविरहित असा प्रकाशच आणि त्रास न देणारी अशी जागृतिच होय! विशेषेंकरून राजांना उपदेश करणारे फारच थोडे असतात; त्यांची मर्जी न बिघडावी म्हणून सर्व लोक प्रतिध्वनीप्रमाणें राजाच्या भाषणाला 'हो' ला 'हो' लावून देतात! उन्मत्ततारूप सूज येऊन त्यांच्या कानांचीं भोंकें बुजून जातात, व त्यामुळेंच काय त्यांच्या कानांत कोणाचा उपदेश शिरत नाहीं; गुरू उपदेश करीत असतां मदोन्मत्त गजाप्रमाणें डोळे झांकून ते त्यांना खेद मात्र देतात! राजांची प्रकृति मदांधज्वरानें मूर्छित रहाते! राज्यलक्ष्मी त्याना राज्यविषानें गुंग करून टाकिते. **चंद्रापीडा** आपलें कल्याण व्हावें अशी तुला इच्छा आहे, याकरितां प्रथमतः लक्ष्मीचें स्वरूप लक्षांत आण. ही वीरांच्या खड्गमंडलरूपी कमलवनांत संचार करणारी भ्रमरीच आहे! ही क्षीरसमुद्रांतून निघाली तेव्हां पारिजातपल्लवापासून राग, चंद्रकलेपासून वक्रता, उच्चैश्रव्यापासून चपलता, कालकुटापासून मोह, मद्यापासून उन्मत्तपणा, आणि कौस्तुभापासून कठोरपणा, हे गुण आपल्या भावंडापासून घेऊन बाहेर पडली आहे! हिच्यासारखी परिचय न बाळगूं देणारी वस्तु ह्या जगांत दुसरी कोणतीच नाहीं. हिला गुणरूप पाशांनीं बळकट आंवळून टाकिलें तरी निसटून जाते! हजारों शूर लोकांच्या तरवारींच्या पिंजऱ्यांत घालून ठेविली तरी गुंगारा मारते! मदोन्मत्त हत्तींनीं वेष्टित असतांही पळून जाते! ही कोणाचा परिचय ठेवीत नाहीं! शास्त्राच्या गोष्टी ऐकत नाहीं! सौंदर्यास भुलत नाहीं! विद्वत्तेचाही विचार करीत नाहीं! आचार, विचार, सत्य त्यांपैकीं कोणालाच जुमानीत नाहीं! गंधर्वनगराप्रमाणें

पाहतां पाहतां नाहींशी होते. मंथनकाळीं मंदरपर्वताचा गरगर फिरण्याचा संस्कार तिला लागल्यामुळेंच काय भ्रमण करीत रहाते! कमलनींवर संचार करितां करितां पायास काटे रुतल्यामुळेंच काय कोणाच्या घरीं पाऊल ठेवण्यास बिचकते! मोठमोठ्या श्रीमंतांच्या घरीं मोठ्या बंदोबस्तांत ठेविली असते, तरी उन्मत्त हत्तींच्या गंडस्थळांतील मधुपान केल्यामुळेंच काय धुंद होऊन झोकांडे खात कोणीकडे तरी जाऊन पडते! तीक्ष्णता शिकण्याकरितांच खड्गधारांत जाऊन रहाते! सर्व विश्व व्यापून टाकण्याकरितांच काय विष्णूच्या आश्रयानें रहाते! गंगातरंगाप्रमाणें चंचल, गुहेप्रमाणें तमानें युक्त, साहस, कर्म करणारांनाच प्राप्त होणारी, विद्युल्लतेप्रमाणें थोडा वेळ चमकणारी, सरस्वतीनें अलंकृत पुरुषाजवळ जणूं सवतमत्सरानेंच न रहाणारी, अपवित्र पदार्थांप्रमाणें गुणवानाला स्पर्श न करणारी, अशी ही आहे! ही द्रव्याचा उष्मा उत्पन्न करते, तरी जडपणा आणिते! उन्नती करते तरी नीचपणासही नेते! समुद्रकन्या असून तृष्णा वाढविते! अमृताची भगिनी असून परिणामीं कटु रहाते! पुरुषोत्तमाजवळ राहून ही कुपुरुषावर प्रीति करते! तृष्णारूप विषवल्लीस वाढविणारी ही जलधाराच! इंद्रियमृगास मोहीत करणारी गीतीच! सत्कर्म चित्रांस मलिन करणारी धूमपंक्तीच! मोहनिद्रेची केवळ शय्याच! उद्धटपणाची पताकच! दोषरूप सर्पाची दरीच! गुणरूप हंसांना जशी वर्षाच[1]! कपट नाटकाची प्रस्तावनाच! मदनरूपमत्त हस्तींना कदलीच! सज्जनतेला जशी बंदीशालाच, अशीही आहे. ज्याला लक्ष्मीनें फसविलें नाहीं असा पुरुष सांपडणें विरळा. तिनें वरलेले राजे पुढें फार खेद पावतात. राज्याभिषेक झाल्यावर त्यांचा सरळपणा, ज्ञान, पुण्य, क्षमा, व सत्यभाषण हीं नाहींशीं होतात. ग्रहदेवता किंवा भुतें यांनीं संचार केल्यासारखें ते करूं लागतात! अधर्मानें गति कुंठित झाल्यामुळेंच दुसऱ्याच्या अनुरोधानें चालतात! असत्य भाषणरूप विषानें मुखरोग झाल्यामुळेंच एकादा शब्द बोलतात! मरणास टेकलेल्या मनुष्याप्रमाणें त्यांच्या पुढें बंधुजन आले

१ वर्षाऋतु.

असतां त्यांस ते नकोसे वाटतात! नेत्ररोगी मनुष्याप्रमाणें तेजस्वी पुरुषाकडे पाहत नाहींत! कालसर्पानें दंश केलेल्याप्रमाणें मंत्रानें सावध होत नाहींत! खड्गाप्रमाणें पाजलेले, व दुसऱ्यांनीं प्रेरिलेले होऊन नाश करितात! नेत्ररोग्यासारखे दूरदर्शी होत नाहींत! हलकट मनुष्यांनीं घेरलेले व पापकर्म करणारे होऊन व्यसनांत बुडतात. त्यांस द्यूत हाच विनोद, परस्त्री सेवन हेंच चातुर्य, शिकार करणें हाच व्यायाम, मद्यपान हाच विलास, उन्मत्तपणा हेंच शौर्य, स्वस्त्री परित्याग हाच पुरुषार्थ, गुरू वचनाचा तिरस्कार हाच शाहणपणा, वेश्या, नृत्य, गीत, यांचे ठायीं आसक्ति हीच रसिकता, स्वच्छंदपणानें वागणें हेंच प्रभुत्व,देवाचा अपमान करणें यांत मोठेपणा, बंदिजनांची स्तुति हीच कीर्ति; अशा प्रकारच्या दोषांस गुणांचे स्वरूप देणारे, आंतल्या आंत हांसणारे, फसविण्याविषयीं कुशल, स्वार्थ संपादण्याविषयीं तत्पर, द्रव्यरूप मांसास लंपट झालेले जणूं गृध्रच, किंवा सभारूप सरोवरा जवळचे बगळेच काय असे धूर्तलोक राजांची स्तुति करून त्यांस फसवितात. द्रव्याधिकारानें गत झालेले, वृथाभिमान बाळगणारे, व आपणास देवाप्रमाणें मानणारे, असे राजेलोक सर्वांच्या उपहासास पात्र होतात. चांगल्या लोकांचा खरा उपदेश त्यांस रुचत नाहीं. रात्रंदिवस हात जोडून देवाप्रमाणें जे स्तुति करितात, अशा लोकांस राजे चहातात, त्यांज बरोबर भाषण करितात, त्यांस जवळ बाळगितात, ते सांगतील तसें वागतात, त्यांचा सन्मान करितात, व त्यांना आप्त समजतात. दुसऱ्याचा घात करण्याचा उपदेश हेच त्यांचे शास्त्र, जारणमारणादि क्रिया करणारे हेच त्यांचे गुरू, दुसऱ्याला फसविण्याचा उपदेश करणारे हेच त्यांचे मंत्री, संपत्तीविषयींच काय तो ज्यांना हव्यास आणि खरोखर स्नेह करणाऱ्या बंधूंचा उच्छेद करण्याविषयीं अंतःकरणाची प्रवृत्ति राहते. अशा प्रकारच्या पुरुषांची योग्यता काय सांगावी? याकरितां हे राजपुत्रा! अशा प्रकारचें हें कुटिल, कष्टकारक, व हजारों व्यापारांनीं भयंकर असें राजतंत्र आहे. आणि अत्यंत मोह उत्पन्न करणारें असें तारुण्य आहे याकरितां हे

राजपुत्रा, ज्या रीतीनें लोक हांसणार नाहींत, साधुजन निंदा करणार नाहींत, गुरुजन धिक्कार करणार नाहींत, सुहृत् विटंबना करणार नाहींत, विद्वज्जन तुच्छ मानणार नाहींत, कुशल पुरुष उपहास करणार नाहींत, कामीजन फसविणार नाहींत, सेवकजन लांडग्यासारखे तोडणार नाहींत, स्त्रिया विटंबना करणार नाहींत, लक्ष्मीचा मद उन्मत्तपणा आणणार नाहीं, मदन वेडे करणार नाहीं, व विषयसुख नादीं लावणार नाहीं, अशा प्रकारें वागण्याचा तूं प्रयत्न कर. तूं अगोदर स्वभावानें गंभीर आहेसच. तुझ्या पित्यानें मोठ्या प्रयत्नानें तुला चांगल्या विद्येचा संस्कार दिलाच आहे. याकरितां तुजकडून तसें कांहीं होणार नाहींच. लक्ष्मी चंचल व अविचारी मनुष्यास मात्र उन्मत्त करिते. सर्वांसच करीत नाहीं. तुझे सद्गुण पाहून मला फार संतोष वाटत आहे. मला जें जें बोलावेंसें वाटलें तें तें बोललों. तुला वारंवार सांगणें हेंच आहे कीं, विद्वान्, ज्ञानी, शूर, कुलीन, धीर व उद्योगी अशा पुरुषांनां देखील ही चंचल लक्ष्मी हलकेपणा आणिते, हें लक्ष्यांत ठेव. तुझा पिता तुला यौवराज्याभिषेक करणार आहे, त्या उत्सवाचा तूं अनुभव घे ! पूर्वजांनीं चालविलेला राज्यभार धारण कर ! शत्रूंचीं मस्तकें वाकीव ! आपल्या आप्त मित्रांस मोठेपणास चढीव, आणि राज्याभिषेक झाल्यावर लागलींच दिग्विजय करण्यास नीघ. तुझ्या पित्यानें पूर्वीं सर्व पृथ्वी जिंकिली आहे, ती पुनः जिंकण्याकरितां जा. प्रतापानें उज्वलित होण्याचा हाच तुझा समय आहे. प्रतापानें राजा एकदां नावाजला कीं, त्याची आज्ञा सर्वत्र मान्य होते. असें बोलून **शुकनास** प्रधान उगीच बसला.

**शुकनासाच्या** ह्या निर्मळ उपदेश वाणीनें स्वच्छ धुतल्यासारखा, चकचकीत केल्यासारखा, अभिषेक केल्यासारखा, अलंकृत केल्यासारखा, पवित्र केल्यासारखा, किंवा तेजस्वी केल्यासारखा, असा **चंद्रापीड** होऊन फारच संतुष्ट झाला ; आणि दोन घटका तेथें राहून आपल्या मंदिरांत गेला.

पुढें कांहीं दिवस गेल्यावर सर्व सिद्धता होऊन राज्याभिषेकाचा

उत्तम प्रकारचा पुण्य दिवस प्राप्त झाला. उपाध्यांनीं राज्याभिषेकाची सर्व साहित्यें जमविलीं. शेकडों राजेलोक त्या समारंभाकरितां आले. **शुकनास** प्रधानासह राजानें स्वतः मंगलकलश धारण केला. पुण्यतीर्थांपासून, नद्यांपासून, समुद्रांपासून आणविलेलें उदक, अनेक औषधी, फलें व रत्नें यांनींयुक्त करून व अनेक मंत्रांनीं पवित्र करून राजानें आपल्या पुत्रास अभिषेक केला. अभिषेक होतांच जशी एखादी लता एखाद्या वृक्षावर पसरलेली असते आणि मग जवळच्या दुसऱ्या वृक्षावर जाते, त्याप्रमाणें राजलक्ष्मीनें **तारापीड** राजास नसोडतां **चंद्रापीडा**वरही आरोहण केलें. नंतर सर्व अंतःपुरांतील स्त्रियासहवर्तमान **विलासवतीनें चंद्रापीडास** उटी लाविली. त्याच्या मस्तकावर शुभ्र सुवासिकपुष्पांचा तुरा खोंविला. चंद्राप्रमाणें शुभ्र वस्त्रें त्यानें धारण केलीं. नंतर उपाध्यानें **चंद्रापीडाच्या** हातांत कंकण बांधिलें. त्याच्या गळ्यांत रत्नांचा अतितेजस्वी हार होता त्यामुळें त्याला अभिषेक करण्याकरितां हें सप्तर्षिमंडलच अवतरलें आहे काय! असें भासूं लागलें. शुभ्रपुष्पांच्या माळा, गजरे व तुरे त्याच्या अंगावर असल्यामुळें शुभ्र सटांनीं युक्त अशा नरसिंहाप्रमाणें किंवा अनेक नद्यांचे स्वच्छ प्रवाह ज्या वरून वाहत आहेत अशा कैलासपर्वतासारखा, किंवा गंगेंतील शुभ्र कमलमृणालांनीं युक्त अशा ऐरावत गजासारखा, किंवा फेसानें व्याप्त अशा क्षीरसमुद्रासारखा तो **चंद्रापीड** दिसूं लागला. मग **चंद्रापीड** सभामंडपाकडे चालला, तेव्हां **तारापीड** राजा स्वतः हातांत कांठी घेऊन लोकांचें निवारण करीत त्याज बरोबर चालला. सभामंडपांत आश्यावर **चंद्रापीड** जसा मेरू पर्वतावर चढतो तसें त्यानें सिंहासनावर आरोहण केलें. युवराज पदीं आरूढ झाल्यावर **चंद्रापीडानें** सर्व राजांचा योग्य सन्मान केला. कांहीं वेळ तेथें बसल्यावर दिग्विजय प्रस्थानाची सूचना करणारा, प्रलयकालच्या मेघगर्जनेसारखा, किंवा मंथनकालच्या समुद्रासारखा गंभीर असा चौघडा मोठ्यानें वाजूं लागला. त्याचे प्रतिध्वनि सर्व दिशांकडे घुमूं लागले. अशा शब्दानें सर्वांचे कान बहिरे केले. व सर्व त्रैलोक्य दणाणून टाकिलें.

त्यावेळीं शेषाच्या फणा थर थर कापूं लागल्या! दिग्गज मोठ्यानें दचकले! सूर्याच्या रथाचे घोडे भिऊन उधळून गेले! हा शिवाचा अट्टहासच आहे असें समजून शंकराचा नंदी कैलासपर्वतावर डुरकण्या फोडूं लागला! तो शब्द ऐकून स्वर्गलोकीं ऐरावतानें मोठ्यानें गर्जना केली! पूर्वीं कधीं न ऐकिलेला असा तो शब्द ऐकून यमाचा टोणगा रागानें आपलीं शिंगें पुढें करून उभा राहिला; तेव्हां तो त्या शब्दांस नमनच करीत आहे काय असें वाटलें! याप्रमाणें तो शब्द सर्व त्रैलोक्यांत भ्रमण करीत राहिला. तो शब्द ऐकून त्या ठिकाणीं असलेल्या सर्व लोकांनीं मोठ्यानें जयजयकार केला. तेव्हां चंद्रापीड सिंहासनावरून उठला. त्याच्या उठण्याबरोबर शत्रूंच्या राज्यलक्ष्मीही उठल्या. चंद्रापीडाबरोबर त्याठिकाणीं असलेले राजेलोक व इतर सर्व गडबडून उठले. तेव्हां इतकी गर्दी झाली कीं, कित्येक राजांच्या गळ्यांतील हार तुटले. व त्यांतील मौक्तिकें जिकडे तिकडे पसरलीं. त्यामुळें दिग्विजयाच्या प्रसंगीं चंद्रापीडावर ह्या लाह्याच उधळल्या आहेत काय असें भासलें! शुभ्रपुष्पांची वृष्टि करणाऱ्या कल्पवृक्षांनीं जसा पारिजात, आपल्या सोंडांतील जलतुषार फेंकणाऱ्या दिग्गजांनीं वेष्टित जसा ऐरावत, नक्षत्रवर्षाव करणाऱ्या दिगंतरांनीं जसा आकाश प्रदेश, त्याप्रमाणें चंद्रापीड मौक्तिकवर्षाव करणाऱ्या त्या राजांच्या योगानें दिसूं लागला. मग तो त्या राजपुत्रांसह त्या सभामंडपांतून उठून बाहेर गेला.

त्या ठिकाणीं जिच्या अंगावर पुष्कळ अलंकार घातले आहेत व जिच्यावर पत्रलेखा अगोदरच बसली आहे, अशी उत्तम हत्तीण महातानें आणिली. मग चंद्रापीड तीजवर चढून बसला. उन्हाचा उपद्रव होऊं नये ह्मणून त्याच्यावर शुभ्र छत्र धरिलें होतें व त्यास मोत्यांची झालर होती, त्यामुळें तें फारच सुशोभित दिसत होतें. मग चंद्रापीडाची स्वारी तेथून निघून नगरा बाहेर गेली. त्या ठिकाणीं हजारों राजेलोक चंद्रापीडाची वाट पहात उभे होते. त्यांच्या मुकुटावरील माणकांचे किरण चोहींकडे पडले होते, त्या-

मुळें युवराजाच्या प्रतापाचें हें तेजच पसरलें आहे काय, किंवा त्या राजांचा **चंद्रापीडा**विषयींचा हा मूर्तिमंत अनुरागच प्रकट झाला आहे काय, किंवा शत्रुवनासदग्ध करणारा हा वणवाच आहे काय, किंवा सर्वभुवनाची राज्यलक्ष्मी **चंद्रापीडा**कडे येत असल्यामुळें तिच्या पायांचा हा आलिताच भूमीस लागला आहे काय असें दिसलें! हजारों हत्ती, घोडे व पायदळ असल्यामुळें फारच गर्दी झाली. छत्रांशीं छत्रें लागल्यामुळें तीं एकमेकांशीं घासूं लागलीं. नंतर सेनापतीनें सर्वांचीं नांवें सांगितल्यावर सर्व राजांनीं **चंद्रापीडास** नमस्कार केले व ते स्वारी बरोबर चालूं लागले. **चंद्रापीडाच्या** मागून गंधमादन नामाचा मोठा हत्ती चालला होता. त्याच्या अंगावर शेंदराचे पट्टे ओढलेले होते. मौक्तिक रत्नांनीं खचलेली व जमिनीपर्यंत लोंबणारी अशी मोठी झूल त्याच्या अंगावर लोंबत होती, व त्याच्या मस्तकावर शुभ्रपुष्पांच्या माळा घातल्या होत्या. त्यामुळें संध्याकाळचा प्रकाश ज्यावर पडला आहे, आकाश गंगेचा प्रवाह ज्यावर दिसतो आहे व ज्या वरचा प्रदेश नक्षत्र समुदायानें व्याप्त झाला आहे, असा मेरूपर्वत जसा दिसतो, तसा तो गजराज दिसत होता. त्याच्या अंगावर सुवर्णालंकारांचें तेज झळकत असल्यामुळें हे केशराचे टिपकेच लावले आहेत काय असा इंद्रायुध नांवाचा अश्वही पुढें चालविला होता. **चंद्रापीडा**बरोबर इतकें सैन्य चाललें होतें कीं, हा पृथ्वीवर समुद्रच चालत आहे काय असें दिसत होतें! हजारों राजे लोकांचीं शुभ्रछत्रें सैन्य समुदायांत दिसत असल्यामुळें समुद्राच्या अनेक मोठमोठ्या लाटा चालून त्यांत चंद्राचीं प्रतिबिंबें जशीं दिसतात, त्याप्रमाणें शोभा दिसत होती!

इकडे प्रस्थानकालचीं मंगलकृत्यें केल्यावर **वैशंपायनानें** आपल्या अंगावर वस्त्रालंकार धारण केले. अंगास चंदनाची उटी लाविली. मग सर्व पोषाक घालून तोही हत्तीणीवर बसला. त्याजबरोबरही पुष्कळ सैन्य व राजे चालले होते. त्याच्या मस्तकावरही छत्र होतें. त्यामुळें हाही दुसरा युवराज आहे काय असा भास होत होता. तो **चंद्रापीडाच्या** शेजारीं येतांच सूर्या शेजारीं चंद्रासारखा

दिसूं लागला. मग मोठ्या थाटानें युवराजाची स्वारी चालू लागली. त्या अपरिमित सैन्याच्या भारानें पृथ्वी थर थर कांपूं लागली. त्या वेळीं चंद्रापीडास नमस्कार करण्याकरितां ठिकठिकाणचे राजे लोक आल्यामुळें त्यांच्या मस्तकावरील रत्नखचित मुकुटावरचीं व बाहुभूषणावरच्या रत्नांचीं किरणें, कांहीं ठिकाणीं चाष पक्ष्यांच्या पंखासारखीं, कांहीं ठिकाणीं मोरांच्या डोळ्यासारखीं, कोठें विद्युल्लतेसारखीं चमकणारीं, कोठें पल्लवासारखीं लाल, कोठें इंद्रधनुष्यासारखीं चित्रविचित्र, कोठें बालसूर्यप्रभेसारखीं आरक्त अशीं दशदिशेकडे चमकूं लागलीं! राजांच्या मस्तकावरील छत्रें शुभ्र होतीं तरी तीं भिन्न भिन्न रंगांच्या मुकुटरत्नांच्या किरणांनीं व्याप्त झाल्यामुळें हीं छत्रें मयूरपिच्छांचींच केलेलीं आहेत काय असें भासत होतें! जिकडे पहावें तिकडे घोडेच घोडे व हत्तीच हत्ती दिसत होते. छत्रें व ध्वज यांनीं आकाश व्यापून टाकिलें. हत्तीच्या मदोदकाचा गंध घेऊन वायू वाहूं लागला. राजेलोकांवर चामरें उडत असल्यामुळें सूर्यतेज दिसेनासें झालें व सैन्याच्या शब्दांनीं सर्व आकाश व्यापून गेलें. त्या सैन्यांत मोठमोठ्या पर्वतासारखे हत्ती चालले होते. उत्पातकालच्या चंद्रमंडळासारखीं मोठमोठालीं छत्रें दिसत होतीं. प्रलयकालच्या मेघध्वनिसारखा रणवाद्यांचा शब्द चालला होता. आपल्या सोंडांतील फवारे उडवीत असल्यामुळें नक्षत्रांची वृष्टि करतात काय असे हत्ती गर्जना करीत चालले होते. त्यांच्या गंडस्थळावरील शेंदूर वाऱ्यानें उडत होता, व मदोदकाचे स्राव चालूं होते. [समुद्राच्या लाटाप्रमाणें घोड्यांच्या रांगा धांवत चालल्या होत्या.] सैन्याच्या गर्दीमुळें दिशा अंधुक दिसत होत्या. व सर्व त्रैलोक्य शब्दमय झालेंसें भासत होतें. ह्या सर्व कारणांनीं हा प्रलयकालच आहे काय असे भासत होतें! जिकडे तिकडे ध्वजच ध्वज दिसत असल्यामुळें दिशा जाग्यावर नाहींत असें वाटूं लागलें! मलिनरजाचा स्पर्श होईल ह्मणून आकाश पळून गेल्यासारखें दिसूं लागलें! घोड्याच्या खुरांच्या धुळीनें सर्व आकाश व्याप्त झाल्यामुळें शिपाई लोकांच्या काठ्यांनींच उन्ह दूर पळून गेलें असें वाटलें!

हत्तींच्या सोंडांतील फराऱ्यांनीं व छत्रांच्या गर्दीनें दिवसाचा पत्ता नाहींसा झाला! चतुरंग सैन्याच्या गर्दीनें पृथ्वी व्यापून गेली हत्तींच्या गंडस्थळांतील मदोदक रस्त्यानें वाहत असल्यामुळें व त्यांत घोड्यांच्या तोंडांतील फेस पडत असल्यामुळें पादचारी लोकांचे पाय निसरून ते पडूं लागले. मदोदकाचा सुगंध इतका चालला होता कीं, त्यामुळें कशाचाच वास येईनासा झाला! सैन्याच्या आरडाओरडीनें, घोड्यांच्या फुरफुरण्यानें, हत्तींच्या गर्जनेनें, त्यांच्या कानांच्या फडफडण्यानें, गळ्यांतील घंटांच्या आवाजानें, शंखांच्या शब्दानें, आणि कर्णे, चौवडे इत्यादि अनेक वाद्यांच्या आवाजानें सर्वांच्या कांठाळ्या बसून गेल्या. अनेक रंगाच्या जमिनीवरून सैन्य चालत असल्यामुळें तेथील धुराळा उडाला तेणेंकरून कोठें मत्स्याच्या छातीसारखा, कोठें उंटाच्या केंसासारखा, कोठें हरिणांच्या केंसारखा, कोठें धुतलेल्या स्वच्छ पितांबरासारखा, कोठें जुन्या मृणालासारखा व कोठें फेंसासारखा, असा तो अनेक रंगाचा व अनेक आकृतीचा दिसत होता. गंगाप्रवाहाप्रमाणें हरिचरणापासून[1] उत्पन्न झालेला, कुपित होऊनच पृथ्वीस सोडून निघालेला, तृषित झाल्यामुळें हत्तींच्या सोंडेंतील जलतुषार प्राशन करणारा, पक्ष्याप्रमाणें आकाशांत संचार करणारा, भ्रमराप्रमाणें हत्तींचें मदोदक प्राशन करणारा, सिंहाप्रमाणें त्याच्या गंडस्थळावर उडून बसणारा, विजयी वीराप्रमाणें पताका ग्रहण करणारा, वृद्धावस्थेप्रमाणें मस्तकास शुभ्र करणारा, आणि दृष्टीस मांद्य आणणारा, हत्तींच्या कर्ण ताडणानें त्रस्त होऊनच कर्णे व शंख यांच्या उदरांत जाऊन बसणारा, राजमुकुटावर असलेल्या रत्नखचित मगरींनीं प्यालेला अश्वमुखांतील शुभ्रपुष्पगुच्छासारख्या फेसानें पूजन केलेला; चौऱ्यांच्या हलण्यानें अंगावरील उडालेल्या सुगंधि द्रव्यानें व पुष्पमालांतील परागांनीं मिश्रित झालेला, राहूप्रमाणें सूर्यबिंबास ग्रासून टाकणारा, अशा प्रकारचा तो धुराळा उडाला! तेव्हां हें आकाशांत अकालीं मेघमंडळच भरून आलें काय असें भासलें! दिग्विजयकालचा हा मंगल

---

१ विष्णु, घोडे.

ध्वजच फडकत आहे काय असा तो दिसूं लागला ! शत्रुरूपकमळांस नाशकारक हें धुकेंच भरून आलें काय ! किंवा राजलक्ष्मीच्या विलासाचें हें सुगंधी चूर्णच उडत आहे काय ! असें वाटलें. सैन्याच्या भरानें पीडित झालेल्या पृथ्वीचा हा मूर्तिमंत मूर्च्छांधकारच पसरला काय ! सूर्यकिरणरूप कमलवनाचा नाश करणारा हा उन्मत्त हत्तींचा कळपच संचार करतो आहे काय ! किंवा पृथ्वीस बुडविण्याकरितां हा प्रलयकालच्या समुद्राचा लोटच पसरला आहे काय, किंवा त्रैलोक्य लक्ष्मीचें मस्तकास गुंडाळण्याचें हें वस्त्रच आहे काय, कां प्रलयाग्नीच्या धुराचा लोट चालला आहे काय, असें वाटलें ! नवें आलेलें पाणी जसें कमलवन व्यापून टाकतें; त्याप्रमाणें धुळीनें सर्व जग व्यापून टाकलें, व त्यामुळें सूर्यबिंब अगदीं निस्तेज होऊन चवरीसारखें दिसूं लागलें ! राजांचा अतिशय भार सहन होत नसल्यामुळें जणूं काय पृथ्वी स्वर्गलोकीं ब्रम्हदेवास शरणच चालली आहे असें भासलें ! नंतर सर्व उष्ण प्राशून टाकल्यानें तप्त झालेलाच काय ! असा तो धुराळा समुद्रांत जाऊन पडलासें वाटलें. ह्याप्रमाणें जिकडे तिकडे धूळच धूळ होऊन एकमहाभूतरूपीं[1] सर्वविश्व झालेसें दिसलें.

नंतर संतापानें हत्तींनीं आपल्या सोंडांतील फवारे उडविले त्यांनीं गंडस्थळांतून वाहणाऱ्या मदोदकानें, त्यांच्या कानांच्या वाऱ्यांनीं व घोड्यांच्या तोंडावाटे पडलेल्या फेसांनीं तो धुराळा शांत झाला. त्यामुळें दिशा स्वच्छ दिसूं लागल्या व नंतर सर्व क्रमाक्रमानें सर्व दिसूं लागलें. तेव्हां हें सैन्य समुद्रांतूनच वर आलें काय असें भासलें. असें पाहून **वैशंपायनास** मोठें आश्चर्य वाटलें आणि तो चोहींकडे पाहून **चंद्रापीडास** म्हणाला.

" महाराज, **तारापीड** महाराजांनीं जिंकिलें नाहीं असें काय उरलें आहे ? त्यांनीं कोणत्या दिशा जिंकिल्या नाहींत व किल्ले हस्तगत केले नाहींत ? कोणतीं द्वीपें पादाक्रांत केलीं नाहींत कीं, आपण तीं कराल ? कोणतीं रत्नें मिळविलीं नाहींत कीं, आपण तीं

१ पृथ्वीरूप.

मिळवालं ! कोणते राजे नम्र केले नाहींत ? व कोणीं पायावर मस्तकें ठेविलीं नाहींत ! आणखी **दशरथ** व **भगीरथ** यासारखे महान् महान् पराक्रमी राजे देखील वारंवार नमस्कार करून आपल्या पायांची धूळ मस्तकांवर धारण करीत आहेत. ह्या राजांचीं दश-दिशा व्यापणारीं सैन्यें आपल्या सेवेंत तत्पर आहेत. पहा पहा ! ज्या ज्या दिशेकडे दृष्टि फेंकावी, तिकडे तिकडे आपलें सैन्य दिसत आहे ! हें कां रसातलांतून वर आलें आहे ! किंवा पृथ्वीच यांस प्रसवते आहे ! कां आकाश व्याप्त वृष्टि करून पाडीत आहे असें हें दिसतें आहे. अपरमित सैन्यभारानें पृथ्वी व्याप्त असल्या-मुळें तिला आज महाभारतांतील युद्ध प्रसंगाची आठवण होत असेल. हा सूर्य पर्वताच्या शिखरावर चढून कौतुकानें ध्वजच मोजतो आहे काय ! असें दिसतें आहे ! हत्तींच्या मदोदकांचे प्रवाह चालून त्यावर भ्रमराचे थवे बसल्यामुळें पृथ्वी यमुना नदीनेंच व्याप्त झाली आहे काय असें दिसतें ! सैन्याच्या भारानें क्षोभ पावलेल्या नद्या पृथ्वी सोडून आकाशांतच वाहत आहेत काय अशा ध्वज पंक्ती दिसत आहेत ! मला मोठें आश्चर्य वाटतें कीं, एवढ्या मोठ्या सैन्याच्या भारानें कुल पर्वतांचे बंध तुटून पृथ्वीचे हाजारों तुकडे कसे अद्यापि झाले नाहींत ? किंवा इतक्या भारानें विव्हल झालेल्या अशा शेषा-च्या फणातरी कशा भग्न झाल्या नाहींत !

याप्रमाणें **वैशंपायन** **चंद्रापीडाशीं** बोलत चालला होता तों पुढें उतरण्याचें स्थळ आलें. त्याठिकाणीं मोठमोठाले दरवाजे व मंदिरें तयार केलीं होतीं. शुभ्रवस्त्राचे शेंकडो रमणीय मंडप उभारले होते. त्याठिकाणीं उतरल्यावर **चंद्रापीडानें** सर्व मंडळीसह नित्य कृत्यें केलीं. नंतर सर्व राजे व प्रधान यांनीं एके ठिकाणीं बसून व अनेक प्रकारच्या गोष्टी सांगून वेळ घालविला. तथापि त्या दिवशीं **चंद्रापीडास** पित्याच्या विरहाचें दुःख वाटलें. नंतर रात्र बरीच झाल्यावर तो आपल्या शय्येजवळच्या बिछान्यावर बसलेल्या **वैशंपायनाबरोबर** व दुसऱ्या बाजूस गालिच्यावर निजलेल्या **पत्र**

लेखे बरोबर आई बापांच्या व शुकनास प्रधानाच्या गोष्टी सांगत फारशी निद्रा न घेतां ती रात्र घालवीत बसला.

प्रातःकाळीं उठून नित्याप्रमाणें दिग्विजय करीत चालला. दररोज नवीन नवीन सैन्यें येऊन मिळत असल्यामुळें चंद्रापीडाचें सैन्य वाढत चाललें. त्यामुळें तो पृथ्वीला जर्जर करीत, पर्वतांना कंपित करीत, नद्या व सरोवरें यांस अटवीत, अरण्याचें चूर्ण करीत, उंच व सखल जागा सपाट करीत, शत्रूंचे किल्ले जमीनदोस्त करीत, उद्धट शत्रूंला वांकवीत, भयभीतास आश्वासन देत, शरणागतांचें रक्षण करीत, दुष्टांचें उत्पाटन करीत, शरण आलेल्या राजपुत्रांस राज्याभिषेक करीत, उत्तम रत्नांच्या भेटी घेत, देणग्या व कारभार यांचा स्वीकार करीत, जागजागीं राज्यांची व्यवस्था करीत, ठिकठिकाणीं जयसूचक ध्वजादि चिन्हांस स्थापन करीत, परराजांस आज्ञापत्रें पाठवीत, देवादिकांचें पूजन करीत, आश्रमांचें रक्षण करीत, लोकांची प्रीति संपादन करीत, किर्तीचा संग्रह करीत, गुणांचा विस्तार करीत, साधूंचा महिमा वाढवीत आणि सैन्याच्या धुळीनें समुद्राचें उदक गढूळ करीत, चंद्रापीड सर्व पृथ्वीभर दिग्विजय करीत फिरला.

चंद्रापीडानें पहिल्यानें पूर्वदिशा, पुढें दक्षिणदिशा, नंतर पश्चिमदिशा आणि मग उत्तरदिशा, याप्रमाणें तीन वर्षांत बेटासहित समुद्रवलयांकित पृथ्वी जिंकून आपल्या स्वाधीन केली. नंतर पृथ्वीला प्रदक्षिणा करीत असतां कैलासपर्वताचे जवळ पूर्व समुद्रापासून फार लांब नसलेलें हेमजट नांवाच्या किरातांचें सुवर्णपुर नांवाचें स्थान होतें तें त्यानें जिंकून घेतलें. आणि सर्व पृथ्वीवर फिरतां फिरतां आपलें सैन्य थकलें होतें म्हणून विश्रांति घेण्याकरितां तो कांहीं दिवस तेथें राहिला.

त्या ठिकाणीं असतां एके दिवशीं चंद्रापीड इंद्रायुधावर बसून मृगया करण्याकरितां वनात फिरत होता, तो एक्या पर्वताच्या शिखरावरून खालीं उतरलेलें एक किन्नरांचें जोडपें त्याच्या दृष्टीस पडलें. पूर्वीं कधीं पाहिलें नसल्यामुळें चंद्रापीडास मोठें कौतुक

वाटून त्यास धरावें, असें त्याच्या मनांत आलें. मग त्याच्याजवळ जाण्याकरितां त्यानें आपला घोडा तिकडे फेंकला. तेव्हां त्या किन्नरजोडप्यानें कधीं मनुष्य पाहिलें नसल्यामुळें तें भिऊन दूर पळालें. **चंद्रापीडही** त्याच्या मागोमाग आपल्या घोड्यास टांचा मारीत व भरधांव फेंकीत फार दूर गेला. आपला हा पिच्छा सोडीत नाहीं असें त्या जोडप्यास वाटून **चंद्रापीड** पाहत असतां तें समोरच्या एक्या पर्वताच्या शिखरावर चढून गेलें. आणि लागलीच दिसेनासें झालें. तें चढून गेल्यावर **चंद्रापीडानें** त्याजवरची आपली दृष्टि आवरली. आणि पाहूं लागला तों जिकडे तिकडे पाषाण पडल्यामुळें घोड्याला चालण्यासारखा रस्ता नाहीं, असें पाहून तो घोड्यास धरून उभा राहिला. मग श्रम झाल्यामुळें आपल्या इंद्रायुधाच्या शरिरापासून घाम चालला आहे असें पाहून क्षणभर विचार करून तो आपलें ठिकाणीं हंसून म्हणाला, काय पहा हा मी पोरखेळ आरंभिला! विनाकारण मीं आपल्या जिवास इतके श्रम दिले! हें किन्नरांचें जोडपें धरून मला काय करायाचें होतें बरें? कायहो हा मूर्खपणाचा प्रकार! यत्किंचित कर्तव्याविषयीं केवढीही आसक्ती! भलत्याच कामाबद्दल केवढा हा आग्रह! उत्तम फल देणारें आरंभलेलें कर्म तसेंच राहिलें, राजधर्म आरंभिला तोही पुरता झाला नाहीं, पित्याच्या आज्ञेप्रमाणें आरंभिलेलें कर्म शेवटांस गेलें नाहीं. पृथ्वी जिंकण्याचें काम तडीस गेलें नाहीं, आणि भूतसंचार झाल्यासारखा सर्व परिवार सोडून इतक्या लांब आलों याला काय म्हणावें? याबद्दल विचार करूं लागलों असतां माझें मलाच हंसूं येतें! माझ्या मागून येणारें सैन्य किती लांब राहिलें आहे कोण जाणें! इंद्रायुधास भरधांव फेंकण्याच्या नादांत वृक्ष, लता, पाषाण, जाळ्या व वाळलेल्या पानांचे ढीग ह्यांनीं व्याप्त अशा वनभूमीवरून आल्यामुळें व किन्नरांच्या जोडप्याकडे माझें लक्ष असल्यामुळें मार्गाकडे लक्ष न राहून तो ध्यानांत राहिला नाहीं. आतां परत तरी कसें जावें! आतां कोणास रस्ता पुसावा? या ठिकाणीं कितीही फिरत बसलों तरी कोणी मनुष्य भेटून सुवर्णपुरचा-

रस्ता सांगेल असें वाटत नाहीं. तथापि माझ्या असें ऐकण्यांत आहे कीं, हें सुवर्णपूर पृथ्वीच्या उत्तरसीमेवर आहे, त्याच्या पुढें निर्मानुष अरण्य आहे आणि त्याच्या पुढें कैलासपर्वत आहे. हा कैलासपर्वतच आहे याकरितां येथूनच आपण परतून दक्षिणदिशा धरून चालावें. आपण केलेल्या दोषांचें फळ आपणासच भोगलें पाहिजे. असा विचार करून डाव्या हातानें घोड्याचा लगाम वळवून त्यानें त्यास माघारीं परतविलें. पुढें लागलींच त्याचें मनांत असें आलें कीं, हा सूर्य फार कडक तापत आहे व आकाशाच्या बरोबर मध्यावर आला आहे. यामुळें दिवस लक्ष्मीच्या कमरपट्ट्यावरील जणूं हिराच काय, असा हा दिसतो आहे! हा इंद्रायुधही फार थकला आहे, याकरितां याला थोडें हिरवें गवत चारून व एखाद्या झऱ्यांत किंवा नदीच्या उदकांत पाणी पाजून याचे श्रम दूर करावे आणि आपण स्नान करून उदक प्राशन करावें. व थोडा वेळ एखाद्या झाडाच्या सावलींत विश्रांति घ्यावी, आणि नंतर जाण्याचें करावें. असा विचार करून तो पाण्याचा शोध करीत हिकडे तिकडे फिरूं लागला, तों एक मार्ग त्याच्या दृष्टीस पडला. त्या मार्गानें वनगज गेल्यामुळें त्यांच्या पायांचा चिखल जागजागीं पडलेला दिसत होता. त्या वन गजांनीं सोंडांत धरून आणलेले कमलकंद, कमलदंड व कमलें जागजागीं फेंकून दिलीं होतीं. त्यामुळें तो मार्ग चित्रविचित्रित दिसत होता. कोठें शेवाळ फेंकून दिलें असल्यामुळें तो प्रदेश हिरवागार दिसत होता. रस्त्याच्या मध्यें तांबड्या पांढऱ्या व निळ्या कमळांचे कळे फेंकलेले दिसत होते. कोठें चिखलासकट उपटलेले कंद पडले होते. कोठें तोडून टाकलेले पुष्पगुच्छ व पल्लव पडले होते. कोठें वेली तोडून टाकलेल्या होत्या. व त्यांच्या पुष्पांवर भ्रमरांचे थवे गुंजार करीत हिंडत होते. बकुलपुष्पाप्रमाणें ज्याचा सुगंध चालला आहे, व तमालपल्लवांच्या रसाप्रमाणें जो काळा दिसत आहे, अशा हत्तीच्या मदोदकानें तो मार्ग भिजलेला दिसत होता.

तेव्हां ह्या बाजूकडे सरोवर असावें असें **चंद्रापीडास** वाटून तो त्या रस्त्यानें चालला. तो कोठें छत्राकार वृक्ष दिसत आहेत, कोठें

दगड पुढें आले आहेत, कोठें रानांतील हत्ती आपल्या दातांनीं ढुसण्या मारीत असल्यामुळें मनशिळेची धूळ उडत आहे, कोठें दगडांच्या भेगींत वेली उगऊन त्यांनीं पाषाण हिरवेगार झालेले दिसत आहेत, कोठें गुग्गुळांच्या झाडांचा चीक दगडावर पडलेला दिसत आहे, कोठें पर्वताच्या शिखरामधून शिलाजिताचा रस कांहीं पाषाणावर गळत आहे, कांहीं वनपशू नखांनीं व खुरांनीं उकरीत-असल्यामुळें धूळ उडत आहे, उंदरांनीं उकरून बिळें केल्यामुळें कोठें मातीचे ढीग पडले आहेत, कोठें कस्तूरीमृगांचीं पावलें वाळूवर उमटलीं आहेत, कोठें वृद्ध हरिणाच्या अंगाचे केंस पडले आहेत, कोठें चकोरपक्ष्यांचीं जोडपीं बसलीं आहेत, कोठें गुहा द्वाराजवळ वनमनुष्यांचीं जोडपीं बसलीं आहेत, कोठें वेताच्या लतांचीं व कोठें कळकांचीं मोठमोठालीं बेटें पसरलीं आहेत, अशा कैलासपर्वताच्या वरच्या बाजूनें कांहीं अंतरावर गेल्यावर त्या पर्वताच्या ईशान्येस एक दाट व विस्तीर्ण बन त्याच्या दृष्टीस पडलें. तें जसें कांहीं उदकभारानें वाकलेलें मेघमंडळ, किंवा एके ठिकाणीं सांचलेला कृष्णपक्षांतील अंधकारच काय! असें दिसत होतें. समोरून पुष्पांचा सुगंध व जलतुषार घेऊन आल्यामुळें चंदनासारखा शीतळ व सुवासिक असा वारा येऊन त्यानें आलिंगन केलेला व कमलांतील मकरंद प्राशन करून मत्त झालेल्या कलहंसपक्ष्यांनीं आपल्या मधुर शब्दांनीं बोलाविलेलाच काय! असा चंद्रापीड त्या झाडींत शिरला.

त्या झाडीच्या मध्यभागीं एक तलाव त्याच्या दृष्टीस पडला. तेव्हां हा त्रैलोक्य लक्ष्मीचा रत्नाचा आरसाच आहे काय, किंवा पृथ्वीचा राहण्याचा स्फटीकाचा बंगलाच आहे काय, कां समुद्राचा हा उगमच आहे काय, कां आकाशाचा हा जलरूपी अवतारच आहे काय, किंवा जलरूपी झालेला हा कैलासपर्वतच आहे काय, किंवा द्रवलेला हा हिमालयच आहे काय, कां रसरूप झालेला हा चंद्रप्रकाशच आहे काय, कां सर्व त्रैलोक्याचा हा पुण्यराशिच आहे काय, कां शरदृतूंतील स्वच्छ आकाशच आहे काय, किंवा वरुणाचा

हा आरसे महालच आहे काय ! असा तो दिसला. तेव्हां हा मुनींच्या निर्मलमनांनीं सज्जनांच्या गुणांनीं, हरिणांच्या नेत्रकांतीनीं किंवा मोत्यांच्या पाण्यानेंच निर्माण केला आहे काय असें वाटलें ! तो पाण्यानें बंब भरला होता, तरी सर्व पदार्थांचीं प्रतिबिंबें त्यांत दिसत असल्यामुळें सर्व पदार्थांनीं भरलाच आहे काय ! असा वाटत होता. वायूनें त्या सरोवरांतील उडविलेल्या फवाऱ्यांत अनेक रंगी इंद्रधनुष्याप्रमाणें चकाकी दिसत असल्यामुळें, त्याच्या संरक्षणाकरितां हीं इंद्रानें धनुष्येंच पाठविलीं आहेत काय असें वाटत होतें ! सर्व अरण्यें, पर्वत, नक्षत्रें, ग्रह इत्यादि त्यांत प्रतिबिंबीत असल्यामुळें व कमलोदर असल्यामुळें तो तलाव विष्णूप्रमाणें दिसत होता ! तीरावरील तमाल वृक्षांच्या प्रतिबिंबांनीं सरोवराचा आंतील प्रदेश अंधारयुक्त दिसत होता, तेणेंकरून हीं रसातलाचीं द्वारेंच आहेत काय असें दिसत होतें ! सरोवरांतील कांहीं प्रदेश निळ या कमलांनीं भरून गेले असल्यामुळें भरदिवसास हा येथें अंधकारच वास करीत आहे काय असें समजून चक्रवाकपक्ष्यांची जोडपीं विरहानें अक्रोश करीत होतीं. त्या ठिकाणीं देव आणि ऋषी स्नान करण्याकरितां येत असत. तशाच गंधर्वादिकांच्या स्त्रिया जलक्रीडा करण्याकरितां येत असत. कोठें वरुणाचा हंस कमलावर बसून क्रीडा करीत आहेसें भासत होतें. कोठें दिग्गजांनीं आपल्या सोंडांनीं कमलांचे दांडे मोडून टाकले होते. कोठें शिवाच्या नंदीनें आपल्या शिंगाच्या टोकांनीं सरोवराच्या तीरची माती उकरली होती. कोठें यमाच्या महिषानें आपल्या शिंगानीं सरोवरांतील फेंस उडीवला होता, कोठें इंद्राच्या ऐरावतानें आपल्या सोंडेनें कमलें उपटून टाकलीं होतीं, त्या सरोवरांत उदकाच्या मोठमोठाल्या लाटा चालल्या होत्या. अनेक प्रकारचे पक्षी त्याच्या आंत क्रीडा करीत होते. तीरावर मयूरपक्षी तटस्थ बसून उदक प्राशन करीत होते. कृष्णाच्या बालक्रीडेप्रमाणें तेथील वानर तटावरील कदंबवृक्षावरून पाण्यांत धडाधड उड्या टाकीत होते. हजारों जलचरप्राणी त्यांत संचार करीत होते. हजारों शतपत्रकमलें त्यांत प्रफु-

ञ्छित झालीं होतीं. व त्यांच्यावर भ्रमर गुंजारव करीत फिरत होते. त्या सरोवराच्या सभोंवतीं मलयपर्वताप्रमाणें चंदनाचीं झाडें होतीं. त्यांच्यांतील उदकाचा तर थांगच नव्हता. असें तें अति रमणीय अच्छोद नांवाचें सरोवर **चंद्रापीडानें** पाहिलें.

तें दृष्टीस पडतांच **चंद्रापीडाचे** सर्व श्रम नाहींसे झाले. मग तो आपल्या मनांत ह्मणाला. किन्नरांच्या जोडप्याच्या मागें लागणें जरी निष्फल झालें, तरी त्यामुळें हें सरोवर दृष्टीस पडल्यानें साफल्य झालें! पहावयास योग्य तें पाहिल्यामुळें नेत्रद्वयांची सफळता झाली. रमणीय व आनंद देणाऱ्या मनोहर पदार्थांची परमावधिच आज पाहिली. ह्या सरोवरांचें अमृततुल्य उदक उत्पन्न करून ब्रह्मदेवानें पुनः अमृत कशाकरितां उत्पन्न केलें कोण जाणें! कारण, हें अमृतासारखें सर्व इंद्रियांस आनंद देणारें आहे. हें अति स्वच्छतेमुळें दृष्टीस आनंदवीत आहे, थंड असल्यामुळें शरिरास सौख्य करीत आहे. कमलांच्या सुगंधामुळें घ्राणेंद्रियांस तृप्त करीत आहे, हंसादिपक्ष्यांचे मधुर शब्द चालूं असल्यामुळें कर्णेंद्रियांस आनंद देत आहे, मधुर असल्यामुळें जिभेस मिष्ट लागत आहे! खरोखरच ह्या सरोवराच्या लोभानेंच भगवान् शंकर याच्या समीप कैलासपर्वतावर राहतो आहे. सर्वेंद्रियांस सुख करणारें अमृतासारखें सुवासिक व मधुर असें ह्या सरोवराचें उदक सोडून ज्याचें खारट व तुरट उदक आहे, अशा समुद्रांत विष्णु निद्रा करीत आहे, हें कांहीं तो बरें करीत नाहीं! त्यावेळीं हें सरोवर नव्हतेंसें वाटतें, ह्मणून पृथ्वी महावराहाच्या ढुसणीला भिऊन अगस्त्यऋषीनें प्राशून सोडल्यामुळें खारट अशा समुद्रांत शिरली! नाहीं तर पाताळापर्यंत खोल असें ज्याचें उदक आहे, अशा ह्या सरोवरांत ती बुडून राहिली असती तर, एक वराहतर काय, परंतु हजारों वराह जरी तिला धरण्याकरितां जाते, तरी त्यांस तिचा पत्ता लागला नसता! प्रलयकाळीं मेघजलप्रलय करितात ते ह्यांतीलच उदक घेऊन सर्व लोक बुडवून टाकीत असतील! पूर्वीं सर्व ब्रह्मांड जलमय होतें तें सर्व एके ठिकाणीं जमून सरोवररूपानेंच येथें राहिलेसें वाटतें. असा विचार

करीत तो त्या सरोवराच्या दक्षिणेकडच्या तीरावर गेला. तो प्रदेश वाळुकामय होता. त्या ठिकाणीं विद्याधरांनीं जागजागीं मातीचीं लिंगें करून तीं कमलपुष्पांनीं पूजिलीं होतीं. सूर्यास अर्घ्यें दिलीं असल्यामुळें त्यांतील रक्तकमलें जागजागीं पडलीं होतीं. तीरावरच्या शिलातळावर जलमाणसें बसलीं होतीं. कैलासावरून मातृदेवता स्नानाकरितां तेथें येत असल्यामुळें त्यांचीं पावलें उमटलेलीं दिसत होतीं. कांहीं ठिकाणीं भस्म पडलें होतें, त्यावरून शिवाचे गण स्नान करून गेले असावें असें दिसत होतें. गणपति स्नान करून गेल्यामुळें त्याच्या गंडस्थळांतील मदोदक पडल्याचें दिसत होतें. सिंहाचीं मोठमोठालीं पावलें उमटलीं असल्यामुळें देवीचा सिंह पाणी पिण्याकरितां येत असल्याचें भासत होतें, असें तें ठिकाण पाहिल्यावर **चंद्रापीड** घोड्यावरून खालीं उतरला, आणि त्यानें त्यावरचें खोगीर काढलें. नंतर तो घोडा जमिनीवर लोळून उभा राहिल्यावर त्यानें कांहीं कोंवळें कोंवळें गवत खाल्लें. नंतर सरोवरांत उतरून येतेच्छ पाणी प्याल्यावर व अंग धुतल्यावर **चंद्रापीडानें** त्यास एका जवळच्या झाडाच्या मुळीशीं बांधून टाकलें आणि त्यानें आपल्या तरवारीनें सरोवराच्या तीरची हरळीकापून त्याजपुढें टाकिली. नंतर तो त्या सरोवरांत उतरला आणि हातपाय धुऊन त्यानें चातकपक्ष्याप्रमाणें उदकाचा आहार केला. नंतर उदकावरून आलेल्या वाऱ्यानें आनंद पावल्यावर त्यानें कांहीं कमलपत्रें व फुलें घेऊन तो सरोवराच्या बाहेर आला. मग एक्या लतामंडपांत एका शिळेवर कमलपत्रांची शय्या करून व आपल्या अंगावरच्या शेल्याची गुंडळी करून व ती मस्तकाशीं घेऊन विश्रांति घेण्याकरितां तो त्या ठिकाणीं स्वस्थ पडला. तेव्हां उत्तरेच्या बाजूकडून आलेला विण्याच्या नादानें मिश्रित असा गायनाचा सूर त्याचे कानीं पडला. त्या सुरास मोहित होऊन पहिल्यानें गवत खाण्याचें सोडून देऊन आणि मान व कान वर करून इंद्रायुध तटस्थ ऐकत उभा राहिला. तेव्हां मनुष्याचा संचार जेथें नाहीं अशा ठिकाणीं गायनाचा सूर कोठला! ह्मणून **चंद्रापीडास** फारच आश्चर्य वाटलें.

मग तो त्या जाग्यावरून उठून ज्या दिशेकडून गायनाचा सूर ऐकूं येत होता त्या दिशेकडे पाहूं लागला. परंतु तो प्रदेश बराच दूर असल्यामुळें डोळे ताणून पाहूं लागला तरी त्यास कांहीं एक दिसलें नाहीं. फक्त गायनाचा सूर मात्र ऐकूं येत होता. तेव्हां त्यास कौतुक वाटून हा गायनाचा स्वर कोठून येतो हें पहावें ह्या हेतूनें इंद्रायुधावर खोगीर घालून व त्यावर बसून तो चालला. त्याच्या अगोदरच गायन प्रिय हरणें पुढें धांवत चाललीं असल्यामुळें तीं त्यास मार्गच दाखवीत आहेत काय! असें दिसलें. त्यांच्या मागून **चंद्रापीड** चालला. मार्गानें सप्तपर्ण, बकुळ, वेलदोडे, लवंग इत्यादि वृक्ष व पुष्पितलता यांच्यावरील फुलें वायूनें हालत होतीं व त्यांचा घमघमाट सुटला होता. भ्रमरांचे थवे गुंजारव करीत फिरत होते. तमालवृक्षांचीं दाट झाडें लागून गेलीं होतीं. अशा त्या पश्चिमेकडील तीरावर दाट झाडींतून त्या गायनस्वरांच्या धोरणानें तो चालला. वाटेनें कैलासपर्वतावरून येऊन सरोवरांतील जलकण ग्रहण करून व अनेक पुष्पांचा सुगंध सेवन करून वायु वाहत असल्यामुळें मनास आनंद वाटत होता. हारीतपक्ष्यांचे मधुर शब्द ऐकूं येत होते. पुष्पांवर बसून भ्रमर गुंजारव करीत होते. कोकिलपक्षी आम्रवृक्षाचे पल्लव भक्षण करीत मंजूळ शब्द काढीत होते. चकोरपक्षी मिरवेलीचे कोमल अंकूर आपल्या चोंचींनीं खुडीत बसले होते. चातकपक्षी हिरव्या पिंपळ्या खात होते. डाळिंबीचीं झाडें फळांनीं वांकलेलीं दिसत होतीं, व त्यांवर आपल्या पिलांकरितां त्रिमण्यांनीं घरटीं केलीं होतीं. वानरांचे कळप खेळत असतां ताडांचीं झाडें हातांनीं हालवीत होते. फुलझाडांवर पारवे भांडत असल्यामुळें त्यांच्या पंखाच्या झपाऱ्यांनीं फुलें खालीं पडत होतीं. शेंकडो रावू आपल्या चोंचींनीं व नखांनीं झाडांवरील फळें फोडीत होते. तमालवृक्षांच्या झाडीस मेघमंडळी समजून चातकपक्षी मोठ्यानें ओरडत होते. हत्तींचे छावे आपल्या सोंडांनीं लतांचे पल्लव तोडीत होते. मंदझुळूका चालत असल्यामुळें केळींचीं बनें हालत होतीं. नारळीचीं व सुपा-

रीची झाडें फळांनीं अगदीं लटकून गेलीं होतीं. खारकांच्या झाडांवर पक्षी फळें खात बसले होते. मत्तमयूरांच्या शब्दांनीं सर्व दिशा भरून गेल्या होत्या. कैलासपर्वतावरून नद्या वाहत असल्यामुळें तेथें वालुकामय प्रदेश दिसत होता. सुवासिक पुष्पवृक्षांच्या खालीं विश्रांतीकारितां हरणें बसलीं होतीं. नागवेलींनीं वेष्टित असल्यामुळें कांहीं प्रदेश सुशोभित दिसत होते. त्या ठिकाणीं सूर्यकिरणांचा रिघावही होतनव्हता. चित्रविचित्र रंगांचे अनेक पक्षी तेथें संचार करीत असल्यामुळें ते प्रदेश मोठे रमणीय दिसत होते. सभोंवतीं लतांच्या जाळ्या पसरलेल्या दिसत होत्या. प्रफुल्लित वृक्षांवरून भ्रमरांचे थवे बसल्यामुळें कवचें धारण केल्याप्रमाणें ते वृक्ष दिसत होते. ठिकठिकाणीं लालगुंजा पडल्या होत्या. जागजागीं सिंहांचीं पाऊलें उमटलेलीं दिसत होतीं. मोरांचे व हरणांचे कळप हिंडत होते. व अनेक प्रकारच्या मनोरम वृक्षांनीं तें ठिकाण फारच मनोहर दिसत होतें. अशा त्या ठिकाणीं गेल्यावर **चंद्रापीडानें** चंद्रप्रभा नांवाच्या सरोवराच्या पश्चिमतीरावर चंद्रिकेसारख्या कैलासपर्वताच्या प्रभेनें शुभ्र अशा पायथ्याशीं मैदानांत महादेवाचें एक शुभ्र देवालय पाहिलें.

त्या ठिकाणीं केवड्यांचीं पुष्कळ झाडें प्रफुल्लित झाल्यामुळें त्यांच्या परागांनीं त्याचें अंग भरून पांढरें झाल्यामुळें शंकराच्या दर्शनाकरितां भस्म लावूनच चालला आहे काय! किंवा दर्शन घेण्याच्या पुण्यानेंच तो शुभ्र झाला आहे काय! असा **चंद्रापीड** घोड्यावरून उतरून त्या देवाळयांत गेला. त्या ठिकाणीं चौखांबी मंडपाच्या मध्यभागीं परमेश्वर महादेवाची मूर्ति त्याच्या दृष्टीस पडली. त्या मूर्तीच्या पिंडीवर शुभ्र व तेजस्वी कमळें वाहिलीं होतीं, तेणेंकरून चंद्रबिंबाच्या शकलांनीं किंवा मौक्तिकांनीं निर्माण केलेला हा मुकुटच मस्तकावर धारण केला आहे काय! असें भासत होतें.

त्या दक्षिणमूर्ति महादेवाच्या समोर ब्रम्हासन घालून शंकराची आराधना करीत बसलेली एक कन्या त्याच्या दृष्टीस पडली. तिच्या अंगाची कांति सभोंवतीं पडल्यामुळें ह्या दुग्ध समुद्राच्या लाटाच

पसरल्या आहेत, किंवा तिच्या तपश्चर्येच्या ह्या राशीच पडल्या आहेत असें भासत होतें! तिच्या शरिराची कांति भागिरथीच्या जलाप्रमाणें दिसत होती. शुभ्र कांतिच्या मध्यभागीं ती असल्यामुळें स्फटीकाच्या मंदिरांतच बसली आहे काय! किंवा दुग्ध समुद्रांत स्नान करीत आहे काय! किंवा चीन देशांतील शुभ्र वस्त्रांनेंच अच्छादित झाली आहे काय! किंवा आरशांत प्रतिबिंबीत झाली आहे काय! किंवा शरत्कालच्या अभ्रानें वेष्टीत झाली आहे काय! अशी ती दिसत होती. पंचमहाभूतांवांचून केवळ श्वेत गुणानेंच हिचें शरीर निर्माण केलें असावें असें दिसत होतें. तिनें आपल्या अंगास शुभ्रभस्म लाविलें होतें, त्यामुळें शंकराची उपासना करीत ही रतिच बसली आहे काय! किंवा राहूच्या भीतीनें शंकरास शरण आलेली ही चंद्राची मूर्तीच आहे काय! कां शंकराच्या मुखांतून निघालेली ही मूर्तीमंत हास्याची मूर्तीच आहे काय! कां शिवाची मूर्तिमंत विभूतिच आहे काय! कां ही मूर्तिमंत चंद्रिकांच आहे काय! कां त्या ठिकाणीं ही प्रफुल्लित पुष्पांची मूर्तिमंत संमृद्धिच शिवपूजेकरितां आली आहे काय! अथवा कलियुगांत धर्मभ्रष्ट झाल्यामुळें शोकानें वनवास करणारी ही श्रुतिच आहे काय! किंवा पुढें होणाऱ्या कृतयुगाची ही जीवकलाच आहे काय! अथवा रावणानें कैलासपर्वत हालविल्यामुळें खालीं पडलेली ही कैलासपर्वताची लक्ष्मीच येथें येऊन बसली आहे काय! कां कांहीं मौक्तिक कांतींनीं, मृणालांनीं, किंवा हस्तिदंतांनीं निर्माण केली आहे काय! अशी दिसत होती. चंद्रकिरणांच्या कुंचल्यांनीं स्वच्छ केलेली कां अमृताच्या फेसानें शुभ्र केलेली, कां पाऱ्यानें धुतलेली, कां रुप्याचा मुलामा दिलेली, कां कुंद, शुभ्र कमलें इत्यादि पुष्पांनीं निर्माण केलेली अशी ती सकल शुभ्र पदार्थांची मूर्तिमंत इयत्ताच दिसत होती. तिच्या खांद्यावर केंस लोंबत होते ते उदयपर्वतावर आलेल्या सूर्याच्या बालकिरणांनींच निर्माण केले आहेत! किंवा विद्युल्लतेच्या तेजांनीं निर्मिले आहेत! असें दिसत होते. तिनें नुकतेंच स्नान केलें होतें त्यामुळें तिच्या केसांच्या अग्रावर बारीक बारीक

मलबिंदु दिसत होते, ते शंकराच्या चरणास नमस्कार करतांना भस्म कणच लागले आहेत काय! असें वाटत होतें. अशा केसांनीं तिचें मस्तक सुशोभित दिसत होतें. सूर्याच्या घोड्यांच्या खुरांनीं चूर्ण झालेल्या नक्षत्रांप्रमाणें शुभ्र असें भस्म तिनें कपाळीं लावलें होतें. त्यामुळें शिखरावर उदय पावलेल्या चंद्रकलेनें जशी हिमालयाची भूमि दिसते, तशी ती दिसत होती. तिनें शिवलिंगाकडे एक सारखी दृष्टि लावल्यामुळें ही अणखी दुसरी नेत्र कमलांची मालाच अर्पण करीत आहे काय! असें वाटत होतें. गायनकाळीं तिच्या मुखांतून दंतकिरण बाहेर पडत असल्यामुळें हें मूर्तिमंत गायनांचे गुण किंवा वर्णच बाहेर पडत आहेत काय! असें दिसत होतें. तें किरण शिवलिंगावर झळकत असल्यामुळें फिरूनही अभिषेकच करीत आहे काय! असा भास होत होता. तिनें आपल्या गळ्यांत कमळाक्ष व आवळ्या एवढीं मौक्तिकें यांनीं मिश्रित अशी जपमाळा धारण केली होती. तींतील तेजस्वी मोत्यें प्रत्यक्ष वेदार्थच आहेत किंवा गायत्रीचे मूर्तिमंत वर्णच आहेत, किंवा तिच्या हस्तस्पर्शानें आपलें शरीर पवित्र करण्याकरितां हे आकाशांतील सप्तर्षिच आले आहेत काय! असें वाटत होतें. त्या मौक्तिकमालेच्या योगानें चंद्रमंडळानें युक्त अशी ही पौर्णिमाच आहे काय अशी ती दिसत होती. तिच्या उरावर स्तनद्वय दिसत असल्यामुळें हंसाच्या जोड्यानें युक्त अशी श्वेतगंगा जशी दिसते, तशी ती दिसत होती. पार्वतीच्या सिंहाच्या सटांनीं निर्माण केलें आहे काय असें कल्पवृक्षाचें वल्कल तिनें धारण केलें होतें. तिच्या गळ्यांत यज्ञोपवीत होतें. तें तिची भक्ति पाहून शंकरानें आपल्या मस्तकांतील चंद्रबिंबाचें किरणजालच अर्पण केलें आहे काय! इतकें शुभ्र तें दिसत होतें. ती तारुण्याच्या भरांत होती तरी अगदीं निर्विकार होती. तिचें तारुण्य फारच अप्रतिम होतें, तिनें आपल्या गळ्यांत शंखांचीं भूषणें घातलीं होतीं. आपल्या मांडीवर हस्तिदंती वीणा धारण करून उजव्या हातानें ती वाजवीत गायन करीत होती; त्या वेळीं ही प्रत्यक्ष गंधर्व विद्याच आहे काय! असें दिसत होतें.

तेथील मंडपांतील खांबावर वीणा धारण करणाऱ्या पुतळ्या होत्या त्या जशा काय तिच्या सख्याच आहेत असें दिसत होतें. अभिषेकानें भिजलेल्या शिवलिंगांत तिचें प्रतिबिंब पडल्यामुळें भक्तीच्या योगानें ती शिवसारूप्याप्रतच पावली आहे काय! असें वाटत होतें. तिच्या मधुर गायनास मोहित होऊन कान न हालविता हरणें ऐकत उभीं राहिलीं असल्यामुळें हीं ध्यानाचाच अभ्यास करीत आहेत काय! असें वाटत होतें. इतर वनपशु ही तटस्थ उभे राहून गायन ऐकत होते. ती निर्मम व निरहंकार दिसत होती. तिच्या दिव्यतेजामुळें तिचे वय निश्चितपणें समजत नव्हतें, तरी आठरा वर्षांपेक्षां कमी वयाची असावी अशी ती दिसत होती.

नंतर घोड्यावरून उतरून चंद्रापीडानें एक्या झाडाच्या फांदीस घोडा बांधिला आणि देवालयांत जाऊन महादेवास नमस्कार केला. नंतर तो त्या दिव्य स्त्रीकडे तटस्थ पहात उभा राहिला. तिची विलक्षण रूपसंपत्ति, कांति व शांतवृत्ति, पाहून चंद्रापीडास विलक्षण आश्चर्य वाटलें. मग त्याच्या मनांत असें आलें कीं, ह्या जगांत ज्यांचा तर्क देखील होत नाहीं, अशा विलक्षण गोष्टी घडून येतात. मी आपल्या इच्छेनें मृगया करण्यास आलों असतां किन्नरांचें जोडपें माझ्या दृष्टीस पडलें! पुढें मनुष्यांच्या दृष्टीस न पडणारा व देवादिकांचा जेथें संचार आहे असा रमणीय प्रदेश माझ्या दृष्टीस पडला. त्या ठिकाणीं उदकाचा शोध करीत फिरत असतां सिद्धजनांनीं सेवित असें सरोवर माझ्या दृष्टीस पडलें! त्याच्या तीरावरील झाडींत विश्रांति घेत असतां अमानुष गायन कानीं पडलें! पुढें त्या गायनाचा सुगावा काढीत चाललों असतां जिचें दर्शन मनुष्यांस दुर्लभ अशी ही दिव्यकन्या माझ्या दृष्टीस पडली! हिची आकृतीच अमानुषत्वाचें अनुमान करविते. अशा प्रकारच्या गायनविद्येचा संभव मनुष्यलोकीं कोठून होणार? तर ही जर माझ्या दृष्टिसमोरून नाहींशी होणार नाहीं, किंवा कैलासपर्वतावर झट्दिशीं जाणार नाहीं किंवा आकाशांत उडून जाणार नाहीं, तर तूं कोण? तुझें नांव काय? आणि तारुण्याच्या भरांत असें व्रत आचरण्याचें

कारण काय? हें सर्व मीं हिला विचारीन. असा विचार करून तो त्या स्फटिकाच्या मंडपांत एक्या खांबाशीं उभा राहून तिचें गाणें संपण्याची वाट पाहत उभा राहिला.

गायन झाल्यावर विणा वाजविण्याचें बंद करून ती दिव्य कन्या उठली. त्यावेळीं भ्रमर गुंजारव शांत झाल्यामुळें शुभ्र कमलिनी जशी दिसते तशी ती दिसत होती. तेथून उठल्यावर तिनें महादेवास प्रदक्षिणा व नमस्कार केले. नंतर तिनें **चंद्रापीडाकडे** अवलोकन केलें. तेव्हां ती तपश्चर्येच्या गंभीर दृष्टीनें आश्वासनच देत आहे काय, किंवा तीर्थजलाप्रमाणें आपल्या दृष्टीनें त्यास स्नानच घालीत आहे काय! किंवा तपश्चर्येच्या तेजानें पवित्रच करीत आहे काय, अशी ती दिसली! मग ती **चंद्रापीडास** म्हणाली, " अतिथीचें या ठिकाणीं येणें झालें हें फार चांगलें झालें. महा भाग्यवान् या-ठिकाणीं कसे आले असतील ते असोत. असो, तर आतां उठावें आणि माझ्या मागें येऊन अतिथीसत्कार ग्रहण करावा." अशा तिच्या भाषणानें आपल्यावर मोटाच अनुग्रह झाला, असें मानून **चंद्रापीडानें** तीस नमस्कार केला. मग तो ह्मणाला, "भगवती, जशी आपली आज्ञा असेल तसें" असें ह्मणून तो नम्रपणानें शिष्या-प्रमाणें तिच्या मागून चालला. चालतांना त्याच्या मनांत असें आलें कीं. मला पाहून ही गुप्त झाली नाहीं हें बरें झालें. हिला पुसण्याविषयीं मला मोठें कौतुक वाटत आहे. तपस्वीजनांला दु-र्लभ अशा दिव्यरूपानें युक्त अशी ही कन्या असून, मोठ्या अ-गत्यानें माझा आदरसत्कार करीत आहे, यावरून हिला पुसलें तर ही आपलें सर्व वर्तमान मला सांगेल. असा विचार करीत तो तिच्या मागून शंभर पावलें गेला, तों एक गुहा त्याच्या दृष्टीस पडली. तिच्या पुढच्या बाजूस तमालवृक्षांची इतकी दाटी होती कीं, त्या ठिकाणीं दिवसास देखील अंधकाराचा भास होत होता. प्रफुल्लित पुष्पवेलींच्या जाळ्यांतून मत्तभ्रमरांचे गुंजार व शब्द चालू होते. पर्वतावरून शिलातलावर पडणाऱ्या उदकाच्या जल कणांनीं त्या गुहेचा प्रदेश व्यापून टाकल्यामुळें तो बर्फानें व्याप्त

झाला आहे काय! असें दिसत होतें. त्या गुहेच्या दोन्ही बाजूकडे बर्फाप्रमाणें किंवा हाराप्रमाणें शुभ्र असे दोन प्रवाह वाहत होते, तेणेंकरून तिच्यावर ह्या शुभ्र चवऱ्याच ढळत आहेत काय! असें वाटत होतें. गुहेच्या आंतल्या बाजूस एक्या अंगास कमंडलु ठेवलें होते. व एकीकडे योगपट्टिका लोंबत होती. एक्या अंगास नारळीच्या काथ्यांचीं घुतलेलीं पादत्राणें होतीं. एकीकडे अंगावरचें भस्म जिला लागलें आहे अशी वल्कलशय्या दिसत होती. एकीकडे चंद्रमंडळासारखें शुभ्र असें शंखाचें कोरून केलेलें भिक्षापात्र पडलें होतें. अशी ती गुहा पाहिल्यावर **चंद्रापीड** त्या गुहेच्या बाहेर एक्या शिलातलावर बसला. मग ती कन्या त्या गुहेंत गेली, आणि तिनें ती वीणा आपल्या शय्येच्या उशाकडे ठेविली. नंतर एक द्रोण घेऊन त्यानें एक्या झऱ्यांतील पाणी **चंद्रापीडास** अर्घ्य देण्याकरितां आणिलें. तेव्हां **चंद्रापीड** ह्मणाला "हे भगवती, पुरें पुरें! एवढा सत्कार कशाला पाहिजे! केवळ तुमचें दर्शनच पापांचा नाश करण्याकरितां समर्थ आहे, याकरितां स्वस्थ बसावें," असें **चंद्रापीडानें** ह्मटलें तरी त्या कन्येनें फार आग्रह करून त्याची पूजा केली, तिचा त्यानें परम नम्रतेनें स्वीकार केला.

**चंद्रापीडाचें** अदरातिथ्य केल्यावर ती जवळच दुसऱ्या एका शिळेवर बसली. क्षणभर उगीच बसल्यावर "इकडे कोणी कडून येणें झालें" ह्मणून तिनें त्यास विचारलें, तेव्हां त्यानें दिग्विजयास निघाल्यापासून किन्नराच्या जोडप्याचे मार्गें लागून येथपर्यंत आल्याचें सर्व वर्तमान सांगितलें. तें ऐकल्यावर ती कन्या तेथून उठली आणि हातांत भिक्षापात्र घेऊन आश्रमा जवळच्या वृक्षाखालीं जाऊन हिंडूं लागली. तेव्हां लागलीच आपोआप गळालेल्या पक्कफळांनीं तिचें भिक्षा पात्र भरलें. तें घेऊन परत आल्यावर तिनें तीं फळें ग्रहण करण्या करितां **चंद्रापीडास** विनंती केली. तेव्हां **चंद्रापीडाच्या** मनांत आले कीं, खरोखरीच तपःसामर्थ्यास दुष्पाप म्हणून कांहींच नाहीं! हें मोठें आश्चर्य आहे कीं, या ठिकाणीं अचेतन-वृक्ष देखील सचेतनाप्रमाणें फळें अर्पण करून हिचा आपणावर

अनुग्रह व्हावा असें इच्छितात. अशी विलक्षण गोष्ट पूर्वीं कधींच पाहण्यांत आली नाहीं. याप्रमाणें आश्चर्य युक्त झाल्यावर **चंद्रापीड** तेथून उठला आणि त्यानें इंद्रायुधाला त्या ठिकाणीं आणून त्याजवरचें खोगीर काढिलें, आणि त्यास तेथें बांधून ठेविलें. नंतर त्यानें झऱ्याच्या उदकांत स्नानादि विधी करून मग अमृतासारखीं गोड अशीं फळें भक्षण केलीं, आणि त्या झऱ्याचें बर्फासारखें शीतलजल प्राशन केलें. नंतर ती कन्या कंदमूळ फळें भक्षण करीत आहे तों पर्यंत तो त्या ठिकाणीं एकटाच बसला. मग त्या कन्येनें फलाहार केला. पुढें संध्याकाळचीं कर्तव्यकर्मे केल्यावर ती त्या शिलातलावर येऊन बसली. तें पाहून चंद्रापीडही मर्यादेनें तिच्याजवळ जाऊन बसला आणि कांहीं वेळानें तो तिच्याशीं नम्रपणानें बोलूं लागला. तो ह्मणाला, "हे भगवती, आपण कृपा केल्यामुळें माझ्या कौतुकास उत्तेजन मिळाल्यासारखें होऊन तें मला व्याकूळ करीत आहे व प्रश्न करण्याविषयीं प्रवृत्त करीत आहे. थोरांची थोडी कृपादृष्टी झाली तरी अधीर पुरुषास धैर्य येतें. दोघांचें एकेठिकाणीं थोडावेळ राहणें झालें असतां स्नेह जडतो. तर सांगण्याविषयीं जर भगवतीस कांहीं अडचण वाटत नसेल तर आपलें सर्व वर्तमान सांगून मजवर अनुग्रह करावा. देव, ऋषि, गंधर्व, गुह्यक, किंवा अप्सरा, यांपैकीं कोणतें कुल भगवतीनें आपल्या जन्यानें भूषित केलें हें जाणण्याविषयीं मला फार कौतुक वाटत आहे. पुष्पासारखें सुकुमार व मनोहर अशा अल्पवयांत व्रत आचरणाचें कारण काय? हें वय कोणीकडे आणि हें तप कोणीकडे? हें नाजूक सुखरूप कोणीकडे आणि हा इंद्रियनिग्रह कोणीकडे? तर हें पाहून मला मोठें विलक्षण आश्चर्य वाटतें आहे. सिद्धादिक लोक ज्या ठिकाणीं राहतात अशीं देवलोकचीं उत्तम स्थानें सोडून ज्या ठिकाणीं मनुष्यसंचार देखील नाहीं, अशा वनांत भगवती कोणत्या कारणास्तव वास करीत आहे? आणखी हा मोठा विलक्षण प्रकार वाटतो कीं, पंचमहाभुतांनींच हें शरीर निर्माण झालें असतां हें इतका तेजस्वीपणा कसें धारण करीत आहे? तर याबद्दल जें मला

विलक्षण आश्चर्य वाटत आहे तें सर्व वर्तमान सांगून दूर करावें."

असें तिनें भाषण ऐकून ती दोन घटका उगीच चिंताक्रांत बसली. आणि मोठ्यानें श्वासोच्छ्वास मोडून रडूं लागली. तेव्हां तिच्या नेत्रांतून टपटप अश्रुबिंदु पडले. त्या वेळीं ती इंद्रियांचा प्रसन्नपणाच सोडीत आहे काय! किंवा तपश्चर्येचा रस सांडीत आहे काय! किंवा नेत्रांतील शुभ्रपणाचें पाणी करून सोडीत आहे काय! अथवा तुटलेल्या हारापासून मोत्येंच गळून पडत आहेत काय? असे ते अश्रुबिंदु तिच्या गौर गालावरून वल्कलानें आच्छादित अशा स्तनांवरून वाहत जाऊन त्यांनीं सर्व वल्कल भिजविलें. याप्रमाणें ती स्फुंदस्फुंदून रडूं लागली

तें पाहून चंद्रापीडाच्या मनांत आलें, "काय! कर्मभोगानें कोणालाच सोडिलें नाहीं! अशा दिव्य आकृतीस देखील तो आहेच! तेव्हां शरीर धारण करणारा कोणीही असो, त्याच्या मागें कर्म लागलेंच आहे, व त्या प्रमाणेंच सुखदुःखांची प्राप्तिही जशी व्हावयाची असतें तशीच ती होते. हिच्या रोदनानें तर मळा अधिकच नवळ वाटूं लागलें. अशा दिव्यमूर्ति अल्पकारणानें शोकाकूल व्हावयाच्या नाहींत. अल्प स्वल्प आघातानें पृथ्वी कंपित होत नसते. हिच्या दुःख स्मरणास मीच कारण झालों, तेव्हां मीच अपराधी आहे." असें समजून तो तेथून उठला आणि जवळच्या झऱ्याचें पाणी आपल्या ओंजळींत घेऊन तो तीजजवळ जाऊन उभा राहिला. तेव्हां तिच्या नेत्रांवाटें एक सारख्या अश्रुधारा चालल्या होत्या. मग त्याच्या इच्छे करितां तिनें त्या उदकानें आपले आरक्त नेत्र धुतले आणि वल्कलाच्या पदरानें आपलें तोंड पुसलें. नंतर मोठ्यानें श्वासोच्छ्वास टाकून ती ह्मणाली. "महाराज! निर्दय, मंदभागिनी, आणि पापिणी मी पडलें, तेव्हां माझें जन्मापासून वैराग्यरूपी वर्तमान ऐकून काय करायाचें आहे? तथापि आपणास ऐकावयाची फारच उत्कंठा आहे याकरितां सांगतें ऐकावें. देवलोकीं अप्सरा आहेत, हें ऐकून आपणास माहित असलच. त्या अप्सरांची चौदा

कुळें आहेत; त्यांपैकीं पाहिलें, ब्रह्मदेवाच्या मनापासून उत्पन्न झालें; दुसरें, वेदापासून झालें; तिसरें, अग्नीपासून; चवथें, वायूपासून; पांचवें, अमृतापासून; सहावें, उदकापासून; सातवें, सूर्यकिरणापासून; आठवें, चंद्रकिरणापासून; नववें, पृथ्वीपासून; दहावें, विद्युल्लतेपासून; अकरावें, मृत्युपासून; व बारावें, मदनापासून झालें. दक्षप्रजापतीच्या मुलींत मुनी व अरिष्टा अशा दोन कन्या होत्या, त्यापासून गंधर्वांच्या संबंधानें अप्सरांचीं आणखी दोन कुळें झालीं. अशीं एकंदर चवदा कुळें झालीं. मुनीला चित्रसेनादि पंधरा पुत्र झाल्यावर सोळावा **चित्ररथ** झाला. त्याचा पराक्रम सर्व त्रैलोक्यांत विश्रुत झाल्यामुळें सर्व देव ज्याचें वंदन करितात अशा इंद्रानें त्याशीं मित्रत्व केलें. या कारणांनेंच त्यास लहानपणापासून सर्व गंधर्वांचें अधिपत्य मिळालें. त्याचें रहाण्याचें ठिकाण तेथून जवळच भारतवर्षांच्या उत्तरसीमेवर हेमकूट नांवाचा पर्वत आहे, त्यावर आहे. त्या **चित्ररथाच्या** भुजबलानें सुरक्षित अशीं हजारों गंधर्वकुळें त्या ठिकाणीं आहेत. त्यानें चैत्ररथ नांवाचें उद्यान तयार केलें आहे. हें अच्छोद सरोवरही त्यानेंच तयार केलें व शंकराच्या लिंगाची स्थापनाही त्यानेंच केली. दुसरी कन्या **अरिष्टा** हिला सहा पुत्र झालें. त्या सर्वांत वडील, सर्व जगांत प्रसिद्ध असा **हंस** होय. त्याला **चित्ररथानें** दुसऱ्या कुळाच्या राज्यपदीं बसविलें. तोही हजारों गंधर्वांसह त्याच हेमकूट पर्वतावर राहतो. चंद्रकिरणापासून उत्पन्न झालेल्या अप्सरांच्या कुळांत **गौरी** नांवाची कन्या दुसरी गौरीच काय! अशी उत्पन्न झाली. चंद्राच्या कलानींच जसें काय तिचें शरीर घडलें आहे इतकी सुंदर ती आहे! दुसऱ्या गंधर्वकुळाचा स्वारी हंस यानें, समुद्र जसा गंगेचा स्वीकार करितो, तसा तिचा प्रीतीनें स्वीकार केला. मदनाच्या योगानें जशी रति, किंवा शरत्कालानें जशी कमलिनी, त्याप्रमाणें हंसाच्या अनुरूप समागमानें ती फारच आनंद पावली, आणि अंतःपुराची मुख्य स्वामिनी झाली. त्या थोर स्त्रीपुरुषांच्या पोटीं हजारों दुःखें भोगणारी मी एकटी करंटी उत्पन्न झालें! माझ्या पित्यास दुसरें मूल न आ-

त्यामुळें माझ्या जन्मकालीं त्यानें पुत्र जन्मापेक्षांही अधिक उत्साव केला. दहा दिवस समारंभ केल्यावर पुढें त्यानें माझें महाश्वेता असें नांव ठेविलें. मी लहान असतां वीणेप्रमाणें मधुर भाषण करणाऱ्या मला गंधर्वांनीं आपल्या मांडीवर घेऊन माझें पुष्कळ कोडकौतुक केलें. पुढें सुखदुःखांचें खरें स्वरूप ज्यांत पुरतें समजत नाहीं, अशी बाल्यावस्था नाहींशी झाली. नंतर वसंतऋतूचेंठायीं चैत्रमास, चैत्रमासाचेंठायीं नवीन पल्लव, पल्लवाचेठायीं पुष्प, पुष्पाचेठायीं भ्रमर व भ्रमरांचेठायीं उन्मत्तपणा जसा प्रकट होतो, तसा माझे ठिकाणीं तारुण्यभाव प्रकट झाला! पुढें वसंतऋतु प्राप्त झाला. तेव्हां नवीन कमलें प्रफुल्लित झालीं, आंब्यांस मोहर आला. सुगंधग्रहण करून वायूच्या झुळका मंदमंद वाहूं लागल्या. बकुलवृक्ष प्रफुल्लित झाले. प्रफुल्लित वृक्षांवरून भ्रमरांचे थवे गुंजारव करीत हिंडू लागले. अशोकवृक्षांस सुंदर स्त्रियां आपल्या भूषण युक्त चरणांनीं ताडण करूं लागल्यामुळें त्यांचे झणत्कार उठूं लागले. पुष्पांतील पराग पडून जमिनी शुभ्र दिसूं लागल्या. कोकिला मधुर शब्द करूं लागल्या. विरहिणी स्त्रियां पतिविरहानें दुःखी होऊं लागल्या. मदनधनुष्यांचे झणत्कार ऐकूं येऊं लागले! त्यामुळें पांथलोकांचीं हृदयें फुटूं लागलीं. ह्या प्रकारचे रतिसुखानें पूर्ण असें वसंतऋतूचे दिवस आले असतां एके दिवशीं मी आपल्या आईबरोबर ह्याच अच्छोद सरोवरावर स्नाना करितां आलें. वसंतऋतूचा उदय झाला असल्यामुळें ह्या सरोवरांतील अनेक रंगी कमलें प्रफुल्लित होऊन जिकडे तिकडे उत्तम प्रकारची शोभा दिसत होती. स्नानाकरितां आलेल्या पार्वतीनें नंदी, भृंगी, इत्यादि गणासहित शंकराचीं लिंगें काढिलीं होतीं. अशा त्या लिंगास नमस्कार करून मी पुढें गेलें तों एक लतामंडप माझ्या दृष्टीस पडला. त्या ठिकाणीं कोकिलपक्ष्यांनीं कळे तोडल्यामुळें पुष्परसाच्या धारा चालल्या होत्या. मोहरांनीं आंब्याचीं झाडें तर अगदीं लवलीं होतीं. मदोन्मत मयूरांचे शब्द ऐकून भीतीनें मोठाले भुजंग पळून गेल्यामुळें निर्भय अशा चंदनवृक्षाच्या रांगा फारच शीतल व रमणीय दिसत होत्या. वनदेवतांनीं बसण्याकरितां वेलींचे

झोपाळे केले होते व त्यांवर बसून त्यांनीं झोके घेतल्यामुळें त्याखालीं फुलांचे ढीग पडले होते. पुष्पांतील पराग चोंहींकडे पडला होता व त्यांत राजहंसपक्ष्यांनीं क्रीडा केल्यामुळें त्यांचे पाय उमटले होते. असा ह्या सरोवरावरच्या तीरचा प्रदेश पाहून माझें मन अगदीं मोहित झालें. व त्यामुळें मी आपल्या सखीसहवर्तमान या वनांत आनंदानें फिरूं लागलें. मी फिरत फिरत एक्या ठिकाणीं गेलें तों एकाएकी घ्राणेंद्रियास तृप्त करणारा असा उत्तम प्रकारचा सुवास वनांतील झुळके बरोबर आला. या वनांत जिकडे तिकडे सुवासिक पुष्पें प्रफुल्लित झालीं होतीं, तरी आलेल्या सुंगधापुढें सर्व सुवास तुच्छ वाटले. त्या उत्तम सुंगधावर वनांतील भ्रमरांचे थवे चोंहींकडून धांवूं लागले. तेव्हां आहाहा! काय उत्तम सुंगध हा! ह्मणून डोळे मिटून मी तो यथेच्छ ग्रहण केला. आणि हा कोठून आला ह्मणून मला मोठें कौतुक वाटून भ्रमरीप्रमाणें त्या सुंगधानें आकर्षिलेली होऊन आश्चर्यानें कांहीं पावलें पुढें चालून गेलें. माझ्या पायांतील नुपूरांचे मधुर शब्द ऐकून सरोवरांतील कलहंस मजबरोबर चालूं लागले! अशा रीतीनें मी उत्कंठेनें इकडे तिकडे पाहत चाललें तों याच सरोवरावर शिष्यासह स्नानाकरितां आलेला एक ऋषिकुमार माझ्या दृष्टीस पडला. तेव्हां शंकराच्या तृतीयनेत्रानें आपला मित्र मदन दग्ध झाला ह्मणून हा वसंतच तप करीत आहे काय! असा तो दिसला. त्याचें शरीर तेजःपुंज असल्यामुळें हा विजांच्या पिंजऱ्यांतच बसला आहे, किंवा ग्रीष्मकाळच्या सूर्यमंडळांतच प्रविष्ट झाला आहे, अथवा अग्नीच्या ज्वालामध्यें उभा आहे, असा तो भासला! दीपप्रकाशासारख्या त्याच्या शरिराच्या तेजानें तो प्रदेश सुवर्णमय भासत होता. त्याच्या मस्तकावरच्या जटा गोरोचनेच्या रसानें रंगविल्या आहेत काय! अशा पिंगट दिसत होत्या. हा पुण्याचा ध्वजच आहे काय! असा भस्माचा पट्टा त्याच्या कपाळीं शोभत होता व त्यामुळें शुभ्र वालुकाप्रदेशानें गंगाप्रवाह जसा सुशोभित दिसतो, तसा तो दिसत होता. हें शापगृहाचें तोरणच आहे काय!

अशा त्याच्या कमानदार भुवया भासत होत्या. सर्व हरिणांच्या नेत्र शोभेच्या विभागांनींच केले आहेत काय! असे त्याचे नेत्र विस्तीर्ण व सुशोभित दिसत होते त्याचें नाक सरळ व उंच होतें. हृदयांत प्रविष्ट न झालेला असा नवीन तारुण्याचा अनुरागच काय! असा त्याच्या ओष्टावर आरक्तवर्ण दिसत होता. त्यास मिशी फुटली नसल्यामुळें ज्यावर भ्रमर बसले नाहींत अशा नवीन प्रफुल्लित कमलाप्रमाणें त्याचें मुख दिसत होतें. ही मदनधनुष्याची दोरीच आहे काय, किंवा तपश्चर्यारूप कमलिनीचें हें मृणालच काय, असें यज्ञोपवीत त्याच्या कंठांत शोभत होतें. त्यानें आपल्या एका हातांत बकुलफलाच्या आकाराचा कमंडलु धारण केला होता. दुसऱ्या हातात स्फटिकमण्यांनीं मिश्रित अशी रुद्राक्षमाला घेतली होती. विद्यारूप नद्यांच्या संगमांतील भोंवराच काय अशी त्याची नाभि दिसत होती! हृदयांतील ज्ञानानें बाहेर घालवून दिलेलें अज्ञानच काय अशी सूक्ष्म रोम पंक्ति त्याच्या उरावर शोभत होती! त्यानें आपल्या तेजानें सूर्यास जिंकून त्याचें मंडळ हिरावूनच घेतलें आहे काय अशी त्याच्या कमरेभोंवती मेखला शोभत होती! गंगोदकानें धुतलेलें कल्पवृक्षाचें वल्कल त्यानें धारण केलें होतें. काखेंत पळसाचा दंड धारण केला होता. हा ब्रम्हचर्येचा अलंकारच किंवा मूर्तिमंत धर्मच किंवा सरस्वतीचा विलासच, सर्व विद्यांचा पतिच असा तो अति मनोहर ऋषिकुमार माझ्या दृष्टीस पडला. त्याच्या बरोबर तेवढाच दुसरा एक ऋषिकुमार देवपूजेकरितां फुलें तोडीत येत होता.

त्या सुंदर ऋषिकुमाराच्या कर्णावर पुष्पमंजरी दृष्टीस पडली. तेव्हांही वसंतदर्शनानें आनंदित झालेल्या वनलक्ष्मीची हास्यप्रभाच आहे काय, किंवा मदनाची पताकाच आहे काय, किंवा हा कृत्तिका नक्षत्रांचा झुपकाच आहें काय अशी ती दिसली! पूर्वीं कधीं न पाहिलेला तो पुष्पगुच्छ त्यानें आपल्या कर्णावर ठेवला होता. तेव्हां सर्व पुष्पगंधांचा पराभव करणारा जो अत्युत्तम सुवास आला तो ह्या पुष्पमंजिरीचाच, असें मला वाटलें. नंतर त्या तरुण ऋषिकुमाराकडे

पाहिल्यावर मला वाटलें कीं, अतिशय रूपसंपत्ति निर्माण करणाऱ्या ब्रह्मदेवाचें हें किती तरी कौशल्य! कारण सर्व त्रैलोक्यांत ज्याचा सौंदर्याचा डंका वाजत आहे, अशा मदनास मागें सारणारा असा हा दुसरा मायावी मदनच त्यानें उत्पन्न केला आहे! त्याचें मुख-तर किती सुंदर होतें ह्मणून सांगूं? तें उत्पन्न करावयाचें तेव्हां ब्रह्मदेवानें पहिल्यानें सर्वांस आनंद देणारें असें चंद्रबिंब व लक्ष्मीचीं निवासस्थानें सुंदरकमलें' ही प्रथमतः करून अभ्यास केला असावा व नंतर त्याचें मुख केलें असावें! कृष्णपक्षीं चंद्राच्या कला सूर्यग्रहण करितो, हें ह्मणणें खोटें आहे, तर त्या कला ह्या ऋषि-कुमाराच्या शरिरांतच प्रवेश करितात! असें न ह्मणावें तर फार क्लेश करणारें व सौंदर्याचें हरण करणारें असें, हा तप करीत असतां, अत्युत्तम लावण्य कोठलें? याप्रमाणें मी चिंतन करीत होतें तों, पुष्पांतील मकरंद दृष्टीस पडला असतां जसा भ्रमरीस पराधीन करतो त्याप्रमाणें गुणदोषांचा विचार न करणाऱ्या व सुरूपानें उत्तेजन पावणाऱ्या व नवीन तारुण्यांत प्रगट झालेल्या अशा मदनानें मला पराधीन केलें.

त्यावेळीं शिकल्यावांचून शिकविलेल्या, सांगतां न येणाऱ्या, स्वतःसच कळणाऱ्या, अशा विकारानें माझें सर्वांग स्तब्ध केलें! आणि त्यामुळें श्वासोछ्वास सोडण्यास व पापणीस पापणी लावण्या-सही मी विसरलें! नंतर मी त्या ऋषिकुमाराकडेच मोठ्या प्रेमानें एकसारखी टक लावून पहात बसलें. त्यावेळीं मीं दृष्टीनें जसें कांहीं त्याचें प्राशनच करीत आहे! कां त्यापाशीं कांहीं मागणेंच मागत आहे! कां तुझ्या स्वाधीन मी झालें असेंच ह्मणत आहें! कां त्याला आपलें हृदयच अर्पण करीत आहें! कां त्याच्या शरिरांत प्रवेशच करीत आहें! कां तद्रूपीच व्हावेंसें इच्छित आहें! कां मदनानें पराभव केल्यामुळें माझें संरक्षण करावें, असेंच ह्मणत आहें! किंवा मला हृदयांत जागा द्यावी ह्मणून प्रार्थनाच करीत आहे, अशी माझी स्थिति झाली. तेव्हां काय हें अयोग्य लज्जा-स्पद, कुलीन कुमारीस बट्टा लावणारें नीचकर्म, मीं आरंभलें आहे,

असें जाणित असूनही इंद्रियें स्वाधीन ठेवण्यास मी असमर्थ झालें, आणि स्तंभासारखी, चित्रासारखी, बांधून टाकल्यासारखी, मुर्च्छित झाल्यासारखी, किंवा धरून ठेवल्यासारखी मी झालें. ती कां ऋषिकुमाराच्यारूपसंपत्तीनें, कां मदन विकारानें, कां नवीन तारुण्यानें, कां प्रेमानें, कां आणखी कांहीं कारणानें; काय असेल तें असो! मी फार वेळ एकसारखी त्याजकडेच पहात उभी राहिलें! त्यासमयीं मशी काय इंद्रियांनीं ओढून त्याच्यापुढें चालविलेली, हृदयानें पुढें ओढीत नेलेली, आणि मदनानें मागून लोटलेली अशी मीं झालें! मग मोठ्या कष्टानें व बळानें मी आपल्यास आवरून धरून ठेविलें. तेव्हां मदनास आंत जागा देण्याकरितांच काय मोठ्यानें श्वासोछ्वास बाहेर पडले! बाहेर घडलेलें वर्तमान हृदयास सांगण्याकरितांच कीं काय स्तनाग्रें स्फुरण पाऊं लागलीं! अंगास डवडव घाम सुटला, व त्यानें जणुं काय लज्जा धुऊनच टाकली! मदनबाणांनीं पीडित झाल्यामुळेंच तनू थरथर कांपूं लागली! त्याचें आलिंगन करण्याविषयीं उत्कंठित झालेल्या अवयवांतून त्याचें उत्तम स्वरूप पाहण्याकरितांच कीं काय घाईघाईनें रोमांच बाहेर पडले! घर्मोदकानें पायाचा अनुराग धुतला गेल्यामुळें तो जणूं हृदयांतच शिरला काय असें वाटलें!

तेव्हां माझ्या मनांत आलें, इंद्रियनिग्रह करणाऱ्या आणि विषयसुखाचा तिरस्कार करणाऱ्या अशा पुरुषांशीं मूर्खमदनानें माझा संबंध जोडला, ही गोष्ट त्यानें कांहीं बरी केली नाहीं! किंवा अज्ञानी स्त्रियांचें हृदयच वेडें होय! त्याला कोठें प्रीति करावी आणि कोठें न करावी हें समजत नाहीं! हें तेजाचें व तपाचें स्थान कोणीकडे! आणि प्राकृतजनास संमत अशा मदनाच्या चेष्टा कोणीकडे! मदनानें वेडावलेल्या मला पाहून हा ऋषिकुमार आपल्या मनांत माझा उपहास मात्र करीत असेल! हें सर्व मला कळत असूनही माझ्यानें मदनविकार आवरून धरवत नाहींत! हें मोठें आश्चर्य आहे! आतां पुष्कळ कन्या आपण होऊन पतीकडे गेल्या व किती एकतर ह्या दुर्वृत्त मदनानें उन्मतावस्थेस पोहोंचविल्या!

माझी एकटीचीच त्यानें अशी अवस्था केली आहे असें नाहीं. हा ऋषिकुमार दृष्टीस पडल्यापासून माझें अंतःकरण किती व्याकुळ व पराधीन झालें आहे, ह्या मदनाचें चेष्टित किती दुर्निवार्य आहे पहा! तर आतां जोपर्यंत मी शुद्धीवर आहें व जोपर्यंत दुष्ट-मदनाचें चेष्टित ह्याला स्पष्ट कळलें नाहीं, तोंपर्यंत येथून दूर जावें हें बरें, नाहींतर ह्यास न आवडणारे मदनविकार ह्याच्या दृष्टीस पडले तर हा शापून टाकील. कारण, मुनिजनास कोप येण्यास उशीर लागणार नाहीं. असें म्हणून तेथून जाण्याचा मी विचार केला, आणि ऋषिजन वंद्य आहेत असें मनांत आणून त्याकडे गेलेली दृष्टि बळेंच मार्गे फिरवून, त्या ऋषिकुमारास मी नमस्कार केला.

त्यावेळीं मदनाची आज्ञा दुर्लंघ्य असल्यामुळें, किंवा वसंतऋतु हा मदनविकार उत्पन्न करणारा असल्यामुळें, किंवा तो प्रदेश फारच रमणीय असल्यामुळें, किंवा नवीन तारुण्य अविचारानें भरलेलें असल्यामुळें, किंवा इंद्रियें चंचल असल्यामुळें, किंवा विषयसुखाची इच्छा दुर्निवार असल्यामुळें, किंवा मनोवृत्ति चंचल असल्यामुळें, किंवा तशा गोष्टी घडून यावयाच्या असल्यामुळें, फार काय? माझ्या दुर्भाग्यामुळें, किंवा मला असले क्लेश भोगावयाचे होते यामुळें, कोणत्याही कारणानें म्हणा! माझ्या दर्शनानें त्या ऋषिकुमाराचें धैर्य नाहीसें होऊन वायु जसा दीपास चंचल करतो, त्याप्रमाणें मदनानें त्यासही चंचल केलें! त्यावेळीं मदनाची स्वारी आल्यामुळें सामोरेच आले आहेत काय! असे रोमांच त्याच्या अंगावर उभे राहिले. मजकडे येण्याकरितां निघालेल्या मनास मार्ग दाखविण्याकरितांच पुढें चालले आहेत काय! असे श्वासोच्छ्वास सुरू झाले. व्रतभंग होतो म्हणून भयाभीतच झाली काय अशी त्याच्या हातांतील स्फटिकमाळा कांपूं लागली. कर्णावर ठेवलेल्या पुष्पमंजरीप्रमाणें दुसरी घर्मबिंदूंची मंजरीच गालावर दिसूं लागली! अशी त्या ऋषिकुमाराची अवस्था होऊन तो मजकडे एकसारखी टक लावून पाहूं लागला. तेव्हां तर माझे ठिकाणचे मदनविकार दुप्पट

वाढले. आणि मग जी माझी स्थिति झाली ती तर कांहीं सांगतां येत नाहीं ! माझ्या मनांत आलें, अनेक विलासांचा उपदेश करण्याविषयीं आचार्य असा मदन याम विलासांचा उपदेशच करीत आहे काय ! असें न म्हणावें तर अशा कर्मांचा ज्याला गंध देखील माहीत नाहीं, अशा ह्या ऋषिकुमाराची [illegible] लावण्याची, अमृताचा वर्षाव करणारी, मदनविकारामुळें घाबरलेली, घर्मानें आळसलेली, व आनंदभारानें मंद झालेली, भ्रूलतेमह नृत्य करणारी, अशी दृष्टि कशी झाली ! ही दृष्टिच याचा सर्व अभिप्राय कळवीत आहे ! तेव्हां तिजमध्यें असली निपुणता आली ती कोठली ?

नंतर मी संधि साधून त्या ऋषिकुमाराचा मित्र दुसरा ऋषिकुमार जवळ होता, त्याच्याजवळ गेलें; आणि त्याम ममस्कार करून विचारूं लागले; हे भगवन्! ह्या तुमच्या मित्राचें नांव काय ? कोणत्या ऋषीचा हा पुत्र आहे ? याच्या कर्णावर पुष्पमंजरी आहे ती कोणत्या वृक्षाची आहे ? हिचा हा चोहींकडे घमघमाट सुटला आहे तो फारच मनोवेधक आहे ! असा सुगंध मी पूर्वीं कधींच घेतला नव्हता ! मग तो हास्य करून म्हणाला, मुली, हें तुला विचारून काय करायाचें आहे ? तथापि तुला ऐकण्याविषयीं कौतुकच वाटत असेल तर सांगतों ऐक.

सर्व त्रैलोक्यांत ज्याची कीर्ति प्रसिद्ध आहे, ज्याच्या तपःसामर्थ्यामुळें देवादिक ज्याचें वंदन करिताहेत असा देवलोकीं राहणारा श्वेतकेतु नांवाचा ऋषि आहे. तो ऋषि कोणे एकेवेळीं देवपूजेसाठीं कमळें तोडण्याकरितां आकाशगंगेंत उतरला असतां प्रफुल्लित कमलवनांत वास करणाऱ्या लक्ष्मीनें त्यास पाहिलें. तेव्हां त्याचें लोकोत्तर सौंदर्य दृष्टीस पडतांच लक्ष्मीच्या मनांत मदन विकृति उत्पन्न झाली. मग ज्या शुभ्र कमलावर ती बसली होती तेथें ऋषिदर्शनानेंच समागमसुख झाल्यासारखें होऊन ती कृतार्थ झाली, आणि तत्क्षणींच त्या कमलापासून एक कुमार उत्पन्न झाला. मग तो कुमार मांडीवर घेऊन ती श्वेतकेतूस म्हणाली, "भगवन्, हा आपला बालक घ्यावा !" असें बोलून तिनें तो त्यास अर्पण केला. श्वेत-

केतूनें तो बालक घेऊन त्याचे जातकर्मादि संस्कार केले व **पुंडरी-काापासून** उत्पन्न झाला, ह्मणून त्याचें **पुंडरीक** असें नांव ठेविलें. नंतर त्याजकडून सर्व विद्यांचा अभ्यास करविला व व्रतधारण करविलें. तोच हा पुंडरीकऋषि होय.

आतां याच्या कर्णावर पुष्पमंजरी आहे ती देवदैत्यांनीं समुद्रमंथन करून कल्पवृक्ष काढिला त्याची आहे. हें ऋषिव्रतास विरुद्धच दिसतें आहे, तथापि त्याचें जें कारण घडलें, तें आतां तुला सांगतों. आज चतुर्दशी तिथी असल्यामुळें कैलासपर्वतावर पार्वतीपतिशंकर यांचें पुजन करण्याकरितां मला बरोबर घेऊन हा माझा मित्र देवलोकापासून नंदनवनाच्या जवळून चालला असतां वसंतलक्ष्मीनें जिचा हात धरिला आहे, व जिनें आपल्या अंगावर पुष्पांचे हार धारण केले आहेत, अशा नंदनवनदेवतेनें कल्पवृक्षाची पुष्पमंजरी आणून यास नमस्कार करून ह्मटलें "भगवन्, सर्व त्रिभुवनांत सुंदर अशा आपल्या रूपास हा पुष्पालंकार अनुरूप आहे, याकरितां कृपाकरून याचा स्वीकार करून कर्णावर धारण करावा, ह्मणजे कल्पवृक्षांचें जीवित सफल होईल." अशी आपल्या रूपाची तिनें केलेली स्तुति ऐकून हा माझा मित्र लज्जित झाला, आणि खालीं तोंड घालून ती पुष्पमंजरी न घेतां व त्या देवतेचा सन्मान न ठेवितां तसाच पुढें चालूं लागला. तरी ती मागें येत आहे असें पाहून मी यास ह्मटलें, सख्या! ही वनदेवता परमप्रीतीनें तुला पुष्पमंजरी देत आहे तर हिचा स्वीकार करण्यास काय दोष आहे? असें ह्मणून मी तिच्यापासून पुष्पमंजरी घेऊन याची इच्छा नसतां बळेंच याच्या कानावर ठेविली. याप्रमाणें ह्याचा, व ह्याच्या कर्णावरील पुष्पमंजरीचा सर्व वृत्तांत तुला सांगितला.

याप्रमाणें त्याचा मित्र मजशीं बोलत असतां तो ऋषिकुमार किंचित् हास्य करून मला ह्मणाला, "अगे कौतुकवती! एवढी विचारपूस करण्याची खटपट तूं कशाकरितां करतेस? जर तुला या पुष्पमंजरीच्या सुगंधाचें कौतुक वाटत असेल तर ही घे पाहिजे तर तुला!" असें बोलून तो मजजवळ आला आणि आपल्या कानावरून काढून

त्यानें ती माझ्या कानावर ठेविली! त्यावेळीं तिच्यावर भ्रमरांचा शब्द सुरू होता, त्यामुळें ही समागमसुखाची प्रार्थनाच चालली आहे काय असें वाटत होतें! पुष्पमंजरी ठेवतेवेळीं त्याच्या हाताचा स्पर्श माझ्या अंगास होतांच माझें हृदय त्या ठिकाणीं लागलें! माझ्या गालाच्या स्पर्शसुखानें त्याचा हात कंपित होऊन लज्जेबरोबर त्याच्या हातांतील रुद्राक्षमाळा गळाली! ती त्यास कळली देखील नाहीं! ती माळ जमिनीवर पडली नाहीं तोंच मी मध्येंच झेलून त्याच्या आलिंगनसुखाचा अनुभव घेण्याकरितांच कीं काय मोठ्या कौतुकानें आपल्या गळ्यांत घातली!

याप्रमाणें इकडे आह्मां उभयतांमध्यें लटपट सुरू असतां माझी छत्र धरणारी मला ह्मणाली, "हे राजपुत्री, राणीसाहेबांचें स्नान झालें व घरीं जाण्याची वेळही जवळ आली, याकरितां लवकर स्नान करावें." असें तिचें भाषण ऐकून नवीन धरलेली एखादी हत्तीण पहिल्याच अंकुशप्रहारानें जशी पाहिजे तिकडे वळते, त्याप्रमाणें लावण्यरूप अमृतांत रुतलेली! किंवा त्याच्या गालावरील रोमांचकमळांत अडकलेली! किंवा मदनाच्या बाणांनीं खिळून टाकलेली! किंवा सौंदर्यादिगुणांनीं ओवलेली! अशी मी आपली दृष्टि त्याच्यावरून काढिली; आणि स्नान करण्याकरितां जाण्यास निघालें! मी चालती झालें तेव्हां दुसरा ऋषिकुमार आपल्या मित्राचें धैर्य सुटलेंसें पाहून लटकाच कोप दाखविल्यासारखें करून त्यास ह्मणाला:—"सख्या पुंडरीका, प्राकृतजन ज्या मार्गानें जातात त्या मार्गानें जाणें तुजसारख्यास योग्य नाहीं. तपस्व्यांचें धैर्य हेंच धन होय! यःकश्चित् पुरुषासारखा घाबरा काय झाला आहेस? आपल्या अंतःकरणाचा निरोध कां करीत नाहींस? आज तुझ्या इंद्रियांस हा असला अपूर्वविकार कोठून झाला! कीं ज्यामुळें अशी तुझी अवस्था झाली आहे. सख्या! तें तुझें धैर्य! तो तुझा इंद्रियनिग्रह! ती तुझी शांतवृत्ति! तें तुझें ब्रह्मचर्य! ते गुरूचे उपदेश! तें शास्त्रादिकांचें श्रवण! ती विषयसुखाविषयीं पराङ्मुखता! तो तपश्चर्येचा भर इत्यादि सर्व कोठें गेलें? अरे! ती तुझी सुबुद्धि निष्फळ

कशी झाली ! धर्मशास्त्राचा अभ्यास फुकट कसा गेला ! सर्व विद्यादिसंस्कार व्यर्थ कसे झाले ! गुरूंचा उपदेश लयास कसा गेला ! एवढें मोठें ज्ञानपण तेंही निरुपयोगी कसें झालें ? तुजसारख्यांनीं देखील विषयांनीं पराभूत होऊन वेडे व्हावें काय ? अरे ! तुझ्या हातांतून माळ गळून पडली, हें देखील तुला समजूं नये काय ? काय या मूर्खपणाला ह्मणावें तरी काय ! तिनें माळ हिरावून नेली, ती नेलीच. पणही उद्धट स्त्री तुझें मन देखील घेऊन चालली तें तरी आवरून धर ! !

असें आपल्या मित्राचें भाषण ऐकून तो ऋषिकुमार सलज्ज होऊन ह्मणाला, सख्या **कपिंजला**! मजविषयीं भलतीच शंका काय घेतोस ? ह्या दांडग्या मुलीनें माझी माळ घेतली, हा तिचा अपराध मी कधीं सहन करणार नाहीं ! असें बोलल्यावर त्यानें लटकाच रागाचा आवेश आणिला आणि त्यानें आपल्या भूवया वर चढविल्या. त्यावेळीं त्याचे ओंठ हालूं लागले ते जणू कांहीं चुंबनाच्या इच्छेनेंच स्फुरण पावत आहेत असें वाटलें ! अशी मुद्रा केल्यावर तो मला ह्मणाला, अगे उनाड मुली ! माझी रुद्राक्षमाला दिल्याखेरीज जर तूं एक पाऊल टाकिलेस तर खबरदार ! असें त्याचें भाषण ऐकून मी लगबगीनें आपल्या गळ्यांतून पाणीदार मोत्यांची एकसरीमाळ काढून त्यास ह्मटलें, "भगवन्, ही घ्यावी आपली अक्षमाला !" असें ह्मणून माझ्या मुखाकडेच ज्यानें लक्ष्य लाविलें होतें व ज्याचें चित्त जाग्यावर नव्हतें, अशा त्या ऋषिकुमाराच्या हातांत ती अमोलिक माळ मीं दिली; आणि घर्मोदकानें जरी मी न्हालें होतें, तरी पुन्हां त्या सरोवरांत स्नान करण्याकरितां उतरलें. स्नान झाल्यावर जशी नदी मोठ्या कष्टानें उलटी वळवावी त्याप्रमाणें सख्यांनीं मला परतविलें ! तेव्हां त्या ऋषिकुमाराचें मनन करीत मी मोठ्या दुःखानें घरीं गेलें; व अंतःपुरांत जाऊन तटस्थ बसलें. त्याच्या विरहानें मी फारच व्याकुळ झालें. आणि मी आलें, का तेथेंच राहिलें; एकटी आहें, का सखीजनांत आहे ! मुकी आहें, का पुष्कळ बोलत आहें ! जागी आहें, का निजलें आहें ! हास्य

करीत आहें, का रुदन करीत आहें! सुखांत आहें, का दुःखांत आहें! दिवस आहे, का रात्र आहे! हें मला कांहींच समजेनासें झालें. मदनवृत्तांत मला माहीत नसल्यामुळें कोठें जावें, काय पहावें, काय ऐकावें, काय बोलावें, कोणाला सांगावें, व याला कोण उपाय सांगेल, हें मला कांहींच समजेना. नंतर सख्यांचें निवारण करून त्यांचेंजवळ येणें बंद करून व कांहीं करणें सवरणें सोडून देऊन मी एकटीच मंदिराच्या गच्चीवर चढून खिडकींत तोंड घालून ज्या दिशेकडे तो ऋषिकुमार दृष्टीस पडला होता, तिकडेच पहात बसलें. त्या ऋषिकुमाराच्या योगानें ती दिशा अलंकृत आहे! का प्रफुल्लित आहे? का रत्ननिधीनें युक्त आहे? का अमृतरसानें परिपूर्ण आहे? का चंद्रोदयानें सुशोभित आहे? इतकी मला ती अतिरमणीय वाटली. आणि त्या दिशेकडून येणाऱ्या वायूस, सुगंधास व पक्ष्यांस त्या ऋषिकुमाराची बातमी विचारावी, असें मला वाटलें. मदनानें त्यावर प्रेम जडविल्यामुळें त्याच्या तपश्चर्येचे क्लेश प्रिय वाटून आपणही तेंच स्वीकारावें असें मला वाटूं लागलें. त्यानें केलेला ऋषिवेषच मला उत्तम वाटूं लागला. तारुण्यानें त्याचा स्वीकार केल्यामुळें तें मनोहर वाटूं लागलें. त्याच्या कर्णावर असल्यामुळें ती पारिजाताची पुष्पमंजरी रमणीय वाटूं लागली. त्याचें राहण्याचें ठिकाण असल्यामुळें स्वर्गलोक मनोरम वाटूं लागला. त्याचें स्वरूप दृष्टीस पडल्यापासून मदन दुर्जय आहे असें पक्कें वाटलें. कमलिनी जशी सूर्याविषयीं, समुद्रवेला जशी चंद्राविषयीं, आणि मयूरी जशी मेघाविषयीं उत्कंठित होतें; तशी मी झाल्यें. मग विरहानें प्राणकंठाबाहेर निघून जाऊं नयेत ह्मणून रक्षाबंधनच काय! अशी ती त्याची रुद्राक्षमाला मीं आपल्या गळ्यांत घातली. त्या ऋषिकुमाराच्या गुजगोष्टी सांगण्याकरितां माझ्या कानांशींच लागली आहे काय! अशा त्या पुष्पमंजरीच्या योगानें, व त्याच्या हस्तस्पर्शाच्या योगानें अंगावर रोमांच उभे राहून मी अगदीं पराधीन झालें.

माझी तांबूलकरंड बाळगणारी **तरलिका** नांवाची दासी मजबरो-

वरच स्नान करण्याकरितां आली होती. ती माझ्या मागून बऱ्याच वेळानें घरीं आली, आणि माझी तशी अवस्था पाहून मला हळूच ह्मणाली, बाईसाहेब! अच्छोद सरोवराच्या तीरावर जे ते दोघे दिव्य ऋषिकुमार आपण पाहिले, त्यांपैकीं ज्यानें तुमच्या कानावर ही पुष्पमंजरी ठेविली, तो, दुसऱ्या ऋषिकुमाराची दृष्टि चुकवून पुष्पितलतांच्या आडून लपत लपत येऊन, मी मागून येत आहें असें पाहून, मजजवळ आला आणि आपल्याविषयीं मला विचारूं लागला. तो ह्मणाला, मुली, ती सुंदर कन्या कोण? ती कोणाची मुलगी? तिचें नांव काय? आणि ती कोठें जात आहे? मी मग ह्मणालें, चंद्रकिरणापासून उत्पन्न झालेल्या गौरीनामक अप्सरेपासून तिचे जन्म झाले. ज्याला सर्व गंधर्व नमस्कार करितात अशा हंसनामक गंधर्वाची ती कन्या आहे. तिचें नांव 'महाश्वेता.' गंधर्वलोकांचें राहण्याचें ठिकाण हेमकूटपर्वत आहे, त्या ठिकाणीं ती चालली आहे. असें मीं सांगितल्यावर तो थोडावेळ उभा राहिला आणि निश्चलदृष्टीनें फार वेळ मजकडे पाहिल्यावर कांहीं गुह्य गोष्ट बोलावयाची आहे असें दर्शवून ह्मणाला, "अगे मुली, तूं अल्पवयी असून ही तुझी आकृति सौम्य व प्रौढ दिसते आहे, यावरून एखादी गोष्ट सांगितली तर ती तूं करशील असें मला वाटतें."

असें त्याचें भाषण ऐकून मी हात जोडून मोठ्या नम्रतेनें ह्मणालें, "महाराज, आपण मला असें कां ह्मणतां? मी ह्मणजे काय! सर्व त्रैलोक्यांत पूज्य असे आपल्यासारखे थोर पुरुष तसेंच पुण्य असल्याखेरीज मजसारखीकडे पाहणार सुद्धां नाहींत! मग आज्ञा तर कोठली? याकरितां कांहीं एक शंका मनांत न आणितां आज्ञा करून या दासीवर अनुग्रह करावा." असें माझें भाषण ऐकून त्यानें जसें कांहीं सखी, उपकार कर्त्री किंवा प्राणदात्री असें मानून आपल्या आनंदसूचक अवलोकनानें मला आनंदित केलें. नंतर जवळच्या तमालवृक्षाचा पल्लव तोडून शिलातळावर ठेंचला व त्याचा सुगंधी रस काढून, त्यानें आपल्या उत्तरीय वल्कलाची पट्टी फाडून तीवर त्या रसानें आपल्या करंगळीनें कांहीं मजकूर

लिहिला. आणि "ही पत्रिका तूं ती गंधर्वकन्या एकांती असतां तिला दे." असें बोलून मजजवळ दिली. असें बोलून तिनें तांबूल करंडांतून ती पत्रिका काढून मला दाखविली. ती पाहतांच मला इतका आनंद झाला कीं, त्या ऋषिकुमाराचे शब्द त्या दासीच्या मुखानें आले, ते शब्दमय असून ही त्यांनीं जसें काय सर्वांगांत स्पर्शसुखच उत्पन्न केलें!! ते शब्द कानीं पडल्याबरोबर सर्वांगावर रोमांच उभे राहिले! व ते जणुं मदनप्रवेशाचे मंत्रच काय असें भासले! नंतर मी आवेशानें तिच्या हातांतून ती पत्रिका घेऊन तिजवर लिहिलेली एक आर्या पाहिली ती अशी.

" बिसंसितमुक्तावलिनें, जाय जसा हंस दूर लोभविला ॥
मानसजन्मा माझा लावुनि आशेस गे तुवां हरिला! ॥"

ही त्याची आर्यारूपवाणी माझ्या दृष्टीस पडली. ती वाट चुकलेल्यास जशी दिग्भ्रांति, अंधळ्यास जशी कृष्णपक्षांतील रात्र, अज्ञानी मनुष्यास जशी गारुडी विद्या, अधार्मिकास जशी नास्तिकसंगति, उन्मत्तास जशी मदिरा, याप्रमाणें त्या वाणीनें मला झालें. पूरानें जशी नदी बेफाम होते तशी मदनविकारानें माझी अवस्था झाली. मग माझ्या दासीस त्या ऋषिकुमाराचें फिरून दर्शन झाल्यामुळें ती मोठी पुण्यवती व भाग्यवती असें मीं तिला मानिलें; आणि ती दासी असतांही ती मोठी पूज्य अशी वाटूं लागली. मग मीं तिच्या गालाला व केसाला कुरवाळून ह्मणालें, " तरलिके, सांग बरें बाई! तो ऋषिकुमार त्वां कसा पाहिला! तो काय ह्मणाला? त्याजबरोबर किती वेळपर्यंत तुझा सहवास झाला? आणि तो कोठपावेतों तुझ्या मागून आला? अशा प्रकारानें फिरून फिरून मी तिला विचारूं लागलें. आणि त्या ऋषिकुमाराच्याच गोष्टी बोलतां बोलतां मीं तेथेंच सर्व दिवस घालविला.

तेव्हां माझ्या अनुरागानेंच लाल झालें काय! असें सूर्यबिंब आकाशांत दिसूं लागलें. सूर्यप्रभा कामातुर स्त्रीप्रमाणें अनुरक्त

---

१ कमलतंतुप्रमाणें शुभ्र अशा मौक्तिकहारानें. २ अभिलाष.

होऊनच काय सूर्याच्या पाठोपाठ निघून गेली ! गैरिकादिधातूंनीं युक्त अशा पर्वतांतून जसे उदकाचे लाल प्रवाह चालतात, त्याप्रमाणें दिसणारें सूर्यकिरण पश्चिमदिशेकडे वाहत गेलें. रक्तकमलें मिटल्यामुळे त्यांत लोभानें भ्रमर गुंतून राहिले. सूर्यविरहानें ज्यांनां मूर्च्छाच आल्या आहेत काय अशा मिटलेल्या कमलिनी दिसूं लागल्या. चक्रवाकपक्ष्यांचीं जोडपीं विरहानें व्याकुळ होऊन फिरूं लागलीं. अशा वेळेस माझी छत्र धरणारी दासी येऊन मला ह्मणाली; " बाईसाहेब, त्या दोघां ऋषिकुमारांपैकीं एकजण पुढल्या दारापाशीं येऊन उभा राहिला आहे, आणि रुद्राक्षमाळा मागण्याकरितां आलों आहें असें ह्मणत आहे."

ऋषिकुमाराचें नांव घेतांक्षणीच मी जागच्या जागीं असून दारापर्यंत गेल्यासारखी झालें ! आणि तोच ऋषिकुमार आला असेल असें समजून एका चोपदारास बोलावून त्यास त्याला आंत घेऊन येण्यास सांगितलें. मग रूपास अनुरूप जसें तारुण्य, तारुण्यास जसा मदन विकार, वसंतास जसा दक्षिणवायु, तसा त्या ऋषिकुमाराला अनुरूप असा त्याचा सखा **कपिंजल,** जरेनें ज्याचे केंस पांढरे झाले आहेत अशा चोपदाराच्या मागून येत आहे, व त्यामुळें चंद्रिकेच्या मागून कोमल सूर्यप्रकाश जसा यावा त्याप्रमाणें तो भासला. तो जवळ आला तेंव्हां घाबरल्यासारखा खिन्न व उदास झालेला आणि कांहीं याचना करण्याकरितां आला आहेसा दिसला. मग मीं लागलींच उठून त्यास नमस्कार केला. आणि मोठ्या आदरानें त्यास बसावयास आसन दिलें. तो बसल्यावर त्याची इच्छा नसतां बळेंच मीं त्याचें पाय धुतले आणि ते पदरानें पुसून त्याचें पूजन केलें. नंतर त्याच्याजवळ मी भूमीवरच बसलें. तो ऋषिकुमार थोडा वेळ उगीच बसल्यावर कांहीं बोलावयाचें असल्यामुळें **तरलिका** जवळ होती तिजकडे पाहूं लागला. त्याच्या पाहण्यानेंच त्याचा हेतु जाणून मीं प्रार्थना केली, "भगवन्, जशी मी तशीच ही आहे, कोणी परकी नाहीं याकरितां जें बोलावयाचें असेल तें निःशंक बोलावें."

असें माझें भाषण ऐकिल्यावर कपिंजल ह्मणाला, राजपुत्री! मी काय बोलूं? लज्जेमुळें बोलण्यास माझी वाणी प्रवृत्त होत नाहीं. काय पहा, कंदमूल फळें भक्षण करणारा, शांतवनांत राहणारा असा मुनि कोणीकडे, आणि विषयभोगांनीं मलीन असा प्रपंच कोणीकडे! दोहोंचा संबंध अगदींच अयोग्य होय. असें असून दैवानें पहा काय आरंभिलें आहे तें! असलें आचरण का वल्कलास योग्य; का जटाभारास योग्य, का तपाला योग्य किंवा धर्मोपदेशास योग्य! काय ह्मणावें तरी काय! अशी विटंबना पूर्वीं मीं कधींच पाहिली नाहीं. असो; आतां सांगणें भाग आहे, न सांगितलें तर त्यापासून मोठा अनर्थ होणार आहे. प्राणत्याग करून देखील मित्राचें रक्षण करावें असें आहे ह्मणून सांगतों.

तुझ्या समक्ष मी आपल्या मित्रास निष्ठुरपणानें बोलल्यावर, मला त्याचा राग आल्यामुळें त्यास सोडून व फुलें तोडण्याचें टाकून देऊन, मी दुसरीकडे गेलों. तूं निघून घरीं आलीस, मग हा एकटा काय करितो तें पहावें, ह्मणून परत येऊन झाडाच्या फांदीच्या आड दडून पाहूं लागलों तों, तो कोठें त्या ठिकाणीं दिसेना. मग माझ्या मनांत अनेक तर्क उत्पन्न झाले. हा का मदनानें वेड लावून दिल्यामुळें तिच्यामागें गेला किंवा पुढें शुद्धीवर आल्यामुळें मला तोंड कसें दाखवावें ह्मणून कोठें लपून बसला! कां रागावून मला सोडून कोठें एकीकडे जाऊन बसला! किंवा माझ्या शोधाकरितां कोठें गेला! असे अनेक तर्क करीत मी कांहीं वेळ उभा राहिलों. जन्मापासून त्याचा व माझा थोडा वेळ देखील वियोग नसल्यामुळें मला फारच खेद वाटला. माझ्या मनांत असें ही आलें कीं, धैर्यभ्रष्ट झाल्यामुळें त्यास पश्चात्ताप वाटून तो भलतेंच करावयास तर गेला नसेल-ना? लज्जेनें काय होत नाहीं? याकरितां त्याला एकटें सोडून राहणें ठीक नाहीं. असें मनांत आणून त्याचा शोध करीत हिंडूं लागलों. मी शोध करीत असतां जेव्हां तो माझ्या दृष्टीस पडेना, तेव्हां अतिस्नेहामुळें भयाभीत होऊन माझ्या मनांत त्याजविषयीं वाईट तर्क येऊं लागले. आणि तसाच वृक्ष व लता यांच्या दाटींत

लतामंडपांत व सरोवराच्या तीरावरून बारकाईनें त्याचा शोध करीत चाललों. याप्रमाणें पुष्कळ वेळ फिरत असतां, एका सरोवराच्या जवळ पुष्पांनीं फुललेल्या, भ्रमरांनीं भरून गेलेल्या, आणि कोकिलांनीं व मयूरांनीं व्याप्त झालेल्या मनोहर लतामंडपांत सर्व व्यापार सोडून चित्रासारखा, स्तंभासारखा, निद्रितासारखा, समाधी लावल्यासारखा, असा माझा प्रियमित्र पुंडरीक एका शिलातलावर बसलेला माझ्या दृष्टीस पडला. तो एकटा असून मदनयुक्त अनुरागयुक्त असून फिका पडलेला; शुन्यांतःकरण असून आपल्या दयितेस हृदयांत धारण करणारा; स्तब्ध बसलेला असून मदनपीडाच सांगत आहे असा दिसणारा; शापभीतीनेंच दृष्टीस न पडणाऱ्या अशा मदनानें संतप्त केलेला; असा तो दिसला. आणि अगदीं हालचाल नसल्यामुळें हृदयवासिनी प्रियेस पाहण्याकरितांच गेलीं आहेत काय, किंवा मदनतापानें विरघळूनच गेलीं आहेत काय, किंवा अंतःकरणास क्षोभ झाल्यामुळें त्यास सोडूनच गेलीं काय अशीं त्याचीं इंद्रियें दिसलीं. अंतःकरणांत मदनाग्नि पेटल्यामुळें त्याच्या धुरानेंच काय व्याकूळ झालेल्या नेत्रांनीं अश्रु ढाळीत आहे, हृदयास जाळणाऱ्या मदनाग्नीची ज्वालाच काय अशा त्याच्या आरक्त ओष्टप्रांतांतून श्वासोच्छ्वास चालत आहेत व त्यामुळें जवळच्या लतांचीं पत्रें हालत आहेत, असा तो दृष्टीस पडला. त्यानें आपल्या डाव्या हातावर गाल ठेविला होता. कानावर ठेविलेली पुष्पमंजरी काढून फार वेळ झाला नसल्यामुळें त्या ठिकाणीं भ्रमर गुंजारव करीत झुलत होते, त्यामुळें हे कर्णांजवळ मदनाचे मोहकारक मंत्रच ह्मणत आहेत काय असें भासलें. कर्णांवर एकसारखे भ्रमर असल्यामुळें ते नीलकमलांनीं किंवा तमालपल्लवांनीं युक्त आहेत काय असें वाटत होतें! अंगावर रोमांच उभे राहिल्यामुळें तें मदनबाणांनीं खचलेंच आहे काय असें दिसत होतें. तेजस्वी मौक्तिकांची माळ त्याच्या वक्षस्थलावर हालत होती, ती जशी काय अविचाराची पताकाच फडकत आहे काय असें भासत होतें! लतामंडपावरील प्रफुल्लित पुष्पांतील पराग त्याचे अंगावर पडत असल्यामुळें हें त्याच्या अंगावर मदनाचें

वशीकरणचूर्णच पडत आहे काय असें भासत होतें! लतांचे पल्लव हालून त्याच्या अंगास लागत होते तेणेंकरून ते आपल्यांतील अनुराग त्याच्या शरिरांतच घालीत आहेत काय असें भासत होतें! पुष्पांतील रस त्याच्या अंगावर गळत असल्यामुळें यौवनराज्यपदावर बसवून मदन त्यास अभिषेकच करीत आहे काय असें वाटत होतें! भ्रमरयुक्त आरक्तफुलें पडत असल्यामुळें मदन आपले धूम्रयुक्त तापविलेले बाणच हाणीत आहे काय असें दिसत होतें! दक्षिण-वायूच्या सुगंधावरावर भ्रमर गुंजारव करीत येत असल्यामुळें तो वायु त्याची निर्भत्सना करीतच चालत आहे काय असें वाटत होतें! वसंतऋतूचा जयजयकार करणाऱ्या कोकिला आपल्या शब्दांनीं त्यास व्याकूळच करीत आहेत काय असें दिसत होतें! प्रातःकाळच्या चंद्राप्रमाणें पांडुरका दिसणारा–ग्रीष्मऋतूंतील गंगाप्रवाहा-प्रमाणें कृश झालेला–चंदनवृक्षासारखा अंतराग्नीनें युक्त असलेला. आणि रूपांतर घेतल्यासारखा–भूताविष्टासारखा–उन्मत्तासारखा–अं-धासारखा–बहिऱ्यासारखा–मुक्यासारखा–पराधीन झाल्यासारखा – व मदनावेशाच्या परमावधीस पोंचलेला, असा माझा सखा पुंडरीक अगदींच मला निराळा दिसला.

मी पापणीस पापणी न लावितां फार वेळ त्याजकडे पाहिल्यावर वाईट वाटून भयानें माझें काळीज थरथर कांपूं लागलें. माझ्या मनांत आलें काय हा मदन असह्य वेग आहे! यानें एका क्षणांतच माझ्या मित्राची पहा कशी दुर्दशा करून टाकिली आहे ती! एवढा हा ज्ञानराशि असून कसा व्यर्थ झाला! हा लहानपणापासून किती सदाचरणीं व सुस्वभावाचा होता. इतर ऋषिपुत्रांस घेण्यासारखें याचें आचरण होतें. आणि आज पहा इतर मनुष्याप्रमाणें मदनानें याच्या ज्ञानाचा पराभव केला, तपसामर्थ्याची अवगणना केली, स-मूळ गांभीर्य नाहींसें केलें. तारुण्यावस्था प्राप्त झाली असतां चि-त्तवृत्ति स्थिर रहाणें फार कठिण आहे हें खरें! मग मी पुढें होऊन ज्या शिळेवर तो बसला होता त्याच शिळेवर त्याच्या शेजारीं जा-ऊन बसलों तो तर गच्च डोळे मिटून बसला होता. मग मीं त्याच्या

खांद्यावर हात ठेवून ह्मणालों, "सख्या **पुंडरीका**, हें तूं काय आरंभिलें आहेस? हें मला सांग." पुढें फार वेळ गेल्यावर त्यानें चिकटलेले, रोदनानें लाल झालेले व अश्रूंनीं भरलेले आपले डोळे मोठ्या कष्टानें उघडले व मंददृष्टीनें मजकडे पाहिलें. नंतर लज्जा वाटल्यामुळें अडखळत अडखळत तो मजशीं बोलूं लागला. तो म्हणाला, "सख्या **कपिंजला**, तुला सर्व वर्तमान माहीत असून आतां मला काय विचारतोस?" इतकेंच तो मोठ्या कष्टानें व हळूच बोलला. ह्या त्याच्या भाषणानेंच याच्या विकारास आतां दुसरा इलाज राहिला नाहीं असें मी समजलों. तथापि आपल्या मित्राचें होईल तोंपर्यंत दुर्मार्गापासून निवारण करावें असें मनांत आणून मी त्यांस ह्मणालों, "मित्रा मला सर्व माहीत आहे; परंतु मी असें विचारतों कीं, हें जें त्वां आरंभिलें आहे, हें काय गुरुजनांनीं उपदेशिलें आहे? किंवा धर्मशास्त्रांत सांगितलें आहे? किंवा धर्म संपादन करण्याचा हा एक मार्ग आहे? किंवा हा एक तपश्चर्येचा प्रकार आहे? का स्वर्गप्राप्तीचा उपाय आहे? का व्रताचें रहस्य आहे? का मोक्षप्राप्तीची युक्ति आहे? का हा कांहीं एक निराळा नियम आहे? काय आहे तरीं काय? असला प्रकार तुला मनांत आणण्यास तरी योग्य आहे काय? अरे दुष्ट मदनानें तुझा देह उपहासास पात्र केला असतां तूं कसें जाणत नाहींस? मूढजनांस मदन अयास देतो. साधुजनांनीं निंदित व प्राकृत जनांनीं मान्य केलेल्या विषयांत तुला सुखाची आशा कोठली? जो विषयापासून सुखाची आशा करितो तो विषवृक्षास उदक घालून वाढवितो. किंवा नीलकमलांची माळा आहे ह्मणून खड्गलतेस आलिंगन करितो; किंवा कृष्णागरूचा धूम्र आहे ह्मणून कृष्णसर्पाजवळ जातो; किंवा हें उत्तम माणिक आहे ह्मणून पेटलेला अग्नि आपल्या पदरीं बांधितो. अज्ञानी मूर्ख असतात ते अनिष्टकारक व परिणामीं विरस अशा विषय सुखांकडे आपली बुद्धि लावितात. विषयवासनेचें दुःख तुला माहीत असतां अशा अज्ञानांत कां शिरतोस? उदकाचे प्रवाह जसें बांध फोडून भलतीकडे जातात त्याप्रमाणें रजोगुणानें गढूळ झालेलीं आपली इंद्रि-

यें व चंचल मन हीं दुर्भागीनें चाळलीं असतां त्यांचें निवारण कां करीत नाहींस ? अरे मदन ह्मणजे काय ? धैर्य धरून त्या दुष्टाचा तिरस्कार करावा ह्मणजे झालें !"

असें मी बोलत असतां त्यानें माझ्या बोलण्याचा तिरस्कार केला आणि डोळ्यांतील अश्रुधारा पुसून व आपल्या हातानें माझा हात धरून ह्मणाला, "सख्या कपिंजला फार काय बोलावें? सर्पाच्या विषवेगापेक्षांही दुःसह अशा मदनबाणाच्या तडाक्यांत तूं सांपडला नाहींस ह्मणून स्वस्थ दुसऱ्याला उपदेश करितोस; ज्याचीं इंद्रियें जाग्यावर आहेत, ज्याला ऐकूं येत आहे, व दिसत आहे आणि हें शुभ आहे, किंवा अशुभ आहे, असें ज्याला समजतें आहे, त्याला तुझा उपदेश उपयोगीं पडेल! मला तर कांहीं एक समजत नाहीं! माझें धैर्य, स्थैर्य, ज्ञान व निग्रह हे सर्व लयास गेले. त्यांची मजजवळ वार्ताही नाहीं. केवळ प्राण मात्र कसे तरी धारण केले आहेत. उपदेशाचा काळ आतां राहिला नाहीं. धैर्याचा समयही दूर गेला, निवारण करण्याची वेळ गेली, ज्ञानमार्ग नष्ट झाला. तुजवांचून मला उपदेश करणारा व कुमार्गापासून निवारण करणारा दुसरा कोण आहे? दुसऱ्या कोणाच्या भाषणावर मीं विश्वास ठेवावा? ह्या जगांत तुजवांचून माझा दुसरा बंधु कोण आहे? परंतु मी काय करूं? मी आतां आपल्या स्वाधीन नाहीं. माझी अवस्था कशी झाली आहे ती तूं पाहतोस आहेस. आतां उपदेशाचा कांहीं उपयोग नाहीं. प्रलयकाळच्या बारा सूर्यांप्रमाणें ताप देणाऱ्या मदनतापाचें जसें निवारण होईल तसें तूं झटावें, असें मला वाटतें. माझी अवस्था किती कठीण ह्मणून सांगूं? माझे अवयव जसें काय शिजतच आहेत! माझ्या अंतःकरणाला जसें काय कढ येत आहेत! माझी दृष्टि जशी काय दग्ध होत आहे आणि शरीर जसें काय जळतच आहे! तर अशा वेळेस जें करावयास योग्य तें तूं करावें." असें बोलून तो उगीच बसला. असें त्याचें भाषण ऐकिलें तरी मीं मोठ्या प्रीतीनें व अजैवानें शास्त्रांतील प्रमाणें दाखवून व इतिहासांतील दृष्टांत देऊन त्याला पुष्कळ उपदेश केला. परंतु तो त्यास जसा

काय ऐकूं जाईनासा झाला. तेव्हां मीं आमल्या मनांत विचार केला कीं, याचा मदनताप अमर्याद वाटला. आतां याचें निवारण होणें कठीण दिसतें; तेव्हां उपदेश करीत बसणें ही व्यर्थ आहे. तर आतां याचें प्राण रक्षण होण्यास आपण प्रयत्न करून पहावा. असा विचार करून मी तेथून उठलों, आणि जवळच्या सरोवरांतून ताजीं मृणालें, जलबिंदुयुक्त अशीं कमळपत्रें, व अनेक प्रकारचीं सुगंधी कमळें आणून त्यास लतागृहांतील शिलातलावर शय्या करून दिली. त्या शय्येवर त्याला निजविल्यावर जवळच्या चंदनवृक्षाचा कोंवळा पाला आणून तो ठेंचून त्यांतील सुगंधी व शीतलरस काढून त्याच्या कपाळापासून पायापर्यंत लेप केला. आणि घाम बंद व्हावा ह्मणून कापराची भुकटी करून ती त्याच्या सर्वांगास लाविली. त्याच्या उरावर चंदनरसानें आर्द्र असें वल्कल ठेविलें आणि नंतर त्यास केळीच्या पानानें वारा घालीत बसलों. वारंवार बदलून बदलून कमलपत्रांची शय्या करीत असतां, वारंवार चंदनरस लावीत असतां व एकसारखा केळीच्या पानानें वारा घालीत असतांही जेव्हां त्याचा ताप कमी होईना; तेव्हां माझ्या मनांत आलें कीं, ह्या मदनाला दुःसाध्य ह्मणून कांहीं नाहीं! हरिणाप्रमाणें वनांत रहाणारा व स्वभावानें भोळसर असा हा **पुंडरीक** कोणीकडे! आणि अनेक प्रकारच्या विलासरसांचा उपभोग घेणारी गंधर्वराजपुत्री कोणीकडे! तेव्हां ह्याला कोणती गोष्ट घडवून आणण्यास अशक्य नाहीं! सचेतन प्राण्याची गोष्ट राहोच! परंतु अचेतनाचा देखील हा संयोग करितो. पहा, सूर्यविकासिनी कमलिनी सूर्यावर अनुराग करिते व चंद्रविकासिनी कमलिनी चंद्रावर करिते. रात्र देखील दिवसास आलिंगन करिते. विद्युल्लता मेघासह विहार करिते! त्या अर्थी मदनाला दुष्कर तें काय आहे! एवढा गांभीर्याचा समुद्र असा हा **पुंडरीक** असून यानें पहा एका क्षणांत कसा तृणासारिखा हलका करून टाकिला तो! तें यांचें तप कोणीकडे आणि ही याची अवस्था कोणीकडे! ह्या विपत्तीला आतां इलाज दिसत नाहीं. तर आतां कोणाला शरण जावें? कोणाचा आश्रय करावा कीं, ज्या-

च्या योगानें माझा प्रियमित्र पुंडरीक वांचेल? याप्रमाणें अनेक तर्क माझ्या मनांत आले. मग माझ्या मनांत असें आलें कीं, उगीच पुष्कळ वेळ विचार करीत बसण्यांत काय उपयोग आहे? याचे प्राण, शुभ किंवा अशुभ अशा कोणत्या तरी उपायानें राखले पाहिजेत. याला महाश्वेतेच्या समागमाखेरीज दुसरा उपाय दिसत नाहीं. तपश्चर्येस विरुद्ध व उपहासास्पद असा आपल्यास मदनविकार झाला आहे असें हा जाणत आहे. परंतु तिजकडे जाऊन आपले मनोरथ पूर्ण करून घेण्यास हा समर्थ नाहीं. कारण, याचें जीवित श्वासोच्छ्वास मात्र राहिले आहेत. याचा काम ताप तर कालातिक्रम सहन करण्याजोगा नाहीं. निंद्यकर्मानेंही मित्राचें प्राण रक्षण करणें भाग आहे. तेव्हां हें लज्जाकारक व करण्यास अयोग्य असें जरी हें कृत्य आहे, तरी तें अवश्य केलें पाहिजे, त्या खेरीज गत्यंतर नाहीं. महाश्वेतेकडे जाऊन तिला तुझी अवस्था सांगतों. असें यास सांगून जावें तर माझा मित्र मजकरितां अयोग्यकर्म करीत आहे, असें समजून माझें निवारण करील. याकरितां त्याला न सांगतां कांहीं निमित्त करून मी तेथून उलटलों आणि तुजकडे आलों. व जो प्रकार घडला तो तुला सांगितला. तर अशा समयास जें योग्य, अशा प्रेमास जें युक्त, येथपर्यंत माझ्या येण्यास जें अनुरूप, आणि तुला करण्यास जें उचित् तें तूं करावें. असें बोलून तो कपिंजल, मी काय बोलतें, ह्मणून माझ्या तोंडाकडे पहात बसला.

मी तर त्याच्या अशा भाषणानें सुखरूप अमृताच्या डोहांत का निमग्न झालें? का प्रीतिरसाच्या समुद्रांत उतरलें? का आनंदपर्वताच्या शिखरावर चढलें? किंवा फलयुक्त अशा मनोरथवृक्षाच्या अग्रावर जाऊन उभी राहिलें? असें मला वाटलें, आणि मी विलक्षण आनंदांत गर्क होऊन राहिलें, माझ्या नेत्रावाटें आनंदाश्रु चालून मी सलज्ज होऊन खालीं तोंड घालून बसलें; तेव्हां माझ्या मनांत आलें कीं, ह्या मदनानें मजप्रमाणें त्यालाही वेड लाविलें! खरोखर मला हा जरी ताप देत आहे तरी हा मला अनुकूळ आहे, असें ह्मटलें पाहिजे. खरोखर जर त्याची अशी अवस्था मदनानें

केली असेल, तर त्यानें मजवर हा मोठाच उपकार केला नाहीं काय? तेव्हां आतां मदनासारखा दुसरा बंधु कोण आहे? ह्या सत्यवादी कपिंजलाच्या मुखावाटें कधीं खोटी वाणी निघावयाची नाहीं. असो. अशा प्रसंगीं मीं काय उत्तर द्यावें व काय करावें, अशा विचारांत मी पडलें. इतक्यांत माझी द्वारपालिका गडबडीनें येऊन ह्मणाली, "बाईसाहेब, तुह्मी अस्वस्थ अहां असें सेवकांच्या मुखावाटें राणीसाहेबांस कळल्यावरून त्या तुमच्या समाचाराकरितां येत आहेत." असें तिचें भाषण ऐकतांच कपिंजलऋषि "येथें आतां पुष्कळ गर्दी होईल" ह्मणून भिऊन उठला आणि मला ह्मणाला, "हे राजपुत्री, आतां येथें मी बसलों तर फारच विलंब होईल. भगवान् सूर्य अस्तास चालला, याकरितां मी आतां जातों. इष्टजनाचें प्राणरक्षण करावें हीच मला दक्षिणा दे! अशी माझी प्रार्थना आहे. मी तुला हात जोडतों, एवढें केलें तर माझी मोठी संभावना केली असें होईल." असें बोलून तो माझ्या उत्तराची वाट न पहातां, माझ्या आईच्या बरोबर कोणी तांबुलाचा डबा, कोणी उटीचें साहित्य, कोणी सुवर्णाच्या काठ्या घेऊन आलेल्या दासींच्या गर्दींत तो झटदिशीं निघून गेला. नंतर माझी आई मजजवळ फार वेळ बसून आपल्या मंदिरास निघून गेली. ती मजपाशीं आल्यावर तिनें काय केलें? काय भाषण केलें? व काय आचरण केलें? यां पैकीं, माझें चित्त जाग्यावर नसल्यामुळें, मला कांहींच समजलें नाहीं.

नंतर कमलिनींचा प्राणेश्वर, चक्रवाकपक्ष्यांचा मित्र, असा भगवान् सूर्य अस्तास गेला. पश्चिमदिशा अनुरक्त दिसूं लागली. पूर्वदिशेचें मुख कृष्णवर्ण दिसूं लागलें. प्रलयकालच्या महासमुद्राचा पूरच काय अशा अंधकारानें जिकडे तिकडे व्यापून टाकलें. अशा वेळेस काय करावें आणि काय न करावें हें मला कांहींच सुचेनासें झालें. मग मी तरलिकेस ह्मणालें, "तरलिके, माझें हृदय फारच व्याकूळ झालें आहे. इंद्रियांस काय करावें आणि काय न करावें हें सुचेनासें झालें आहे, हें तुझ्या दृष्टीस पडत नाहीं काय? अशा

वेळेस मीं काय करावें याचा तूं मला उपदेश कर. कपिंजलऋषि तुझ्यासमक्ष काय बोलला तें तूं ऐकलेंच. आतां मी जर इतर कन्येप्रमाणें लज्जा, धैर्य, नम्रता, लोकापवाद, सदाचार, कुल, शील, या सर्वांस सोडून अनुरागानें अंध होऊन आईबापांच्या संमतीशिवाय स्वतः जाऊन जर पाणिग्रहण करावें, तर वडील माणसांची अवमर्यादा केलीसें होऊन मोठा उद्धटपणा होईल. बरें हें सर्व सांभाळण्याकरितां त्याजकडे न जातां मृत्यूचा अंगिकार करावा, तर आपण होऊन आलेल्या थोर कपिंजलाचा मनोभंग केल्यासारखें होईल. व माझ्यामुळें त्या ऋषिकुमाराचा आशाभंग होऊन प्राणविपत्ति झाली तर मुनिवधाचें पातक मला लागेल !" असें मी तिजशीं बोलत होतें तों वसंतऋतूंतील पुष्पलता प्रफुल्लित झाल्यामुळें त्यांतील परागांनीं जशा दिशा दिसतात त्याप्रमाणें चंद्रोदयानें पूर्वदिशा दिसूं लागली.

नंतर चंद्ररूप सिंहानें अंधःकाररूप हत्तीचें किरणरूपनखांनीं विदारण केल्यामुळें त्याच्या मस्तकांतील मौक्तिकांचें शभ्र चूर्णच पसरलें आहे काय असें दिसलें ! प्रियपतिचंद्र याच्या दर्शनानें हास्य करणाऱ्या रात्रीची दंतकांतिच पसरली आहे काय अशी चंद्रकांति दिसूं लागली ! पातालांतून शेषाचें फणा मंडाळच वर येत आहे काय असें चंद्रमंडळ दिसूं लागलें ! सकलजीव लोकांनां आनंद देणारा, कामिनी स्त्रियांचा प्रिय व मदनाचा बंधु अशा सुखकारक अमृतरूपी चंद्रानें रात्र रमणीय दिसूं लागली. उदयकालीं चंद्रावर लाली दिसत असल्यामुळें तो जवळच्या समुद्र किनाऱ्यावरील पोवळ्यांच्या वेलींच्या कांतीनेंच असा दिसतो आहे काय! किंवा उदयपर्वतावरील सिंहानें चंद्रांतील हरिणास पंजा मारल्यामुळेंच तो रक्तानें भरला आहे काय ! किंवा रतिकालीं कुपित झालेल्या रोहिणीनें अळिता लावलेल्या आपल्या चरणकमलानें ताडण केल्यामुळेंच अनुरक्त झाला आहे काय ! असा चंद्र दिसूं लागला. तो प्रकाशित झाल्यामुळें हृदयांत मदनाग्नि पेटला तरी मला सर्व दिशांकडे अंधारी दिसूं लागली ! मी तर तरलिकेच्या मांडीवर डोकें ठेवून स्वस्थ पडलें होतें तरी मदनाच्या हातांत सांपडलें आहें असें वाटलें !

चंद्राकडे मी दृष्टी लाविली होती तरी मृत्यूकडे मी पहात आहे असें मला वाटलें ! त्या वेळीं माझ्या मनांत आलें, मदन, वसंत, मलयवायु इत्यादि सर्व एकीकडे आणि हा तापकारक पातकी चंद्र एकीकडे ! मदनबाणांनीं व्याकूळ झालेल्या माझ्या हृदयास या मेल्यांचा ताप अगदींच सहन होत नाहीं. ज्वरदाहानें तप्त झालेल्या वर जसा अग्नीचा वर्षाव, थंडीनें कांकडल्यावर जशी बर्फाची वृष्टि, किंवा विषानें मोहित झालेल्यास जसा कृष्ण सर्पाचा दंश, तसा मेला हा चंद्र मला वाटतो आहे! सूर्य दर्शनानें चंद्रविकासिनी कमलिनीस जशी ग्लानी येते, त्याप्रमाणें मला मूर्छा येऊन मी डोळे झांकून पडलें. अशी माझी अवस्था पाहून माझी दासी फारच घाबरली. मग चंदनाची उटी तयार करून व माझ्या सर्वांगास लावून ती ताडाच्या पंख्यानें मला वारा घालीत बसली. मग मी अमळ सावध झाले आणि डोळे उघडून पाहूं लागलें तों खिन्न होऊन बसलेली व जिच्या नेत्रावाटें अश्रुधारा चालल्या आहेत, अशी तरलिका माझे दृष्टीस पडली. मी डोळे उघडलेसें पाहून ती माझ्या पायां पडून व हात जोडून ह्मणाली, "बाईसाहेब, आतां कोठवर लज्जा धरावयाची! व वडील माणसांच्या मर्यादेकडे कोठवर पहायाचें? आतां कृपा करा, आणि मला आज्ञा करा, ह्मणजे मी तुमच्या हृदयप्रियास लवकर घेऊन येतें; किंवा तुह्मींच होऊन त्याजकडे जा. आतां चंद्रोदयानें वृद्धिंगत होणाऱ्या समुद्राप्रमाणें वाढणाऱ्या मदनाला सहन करण्यास तुह्मी समर्थ होणार नाहीं." असें बोलणाऱ्या तरलिकेस मी ह्मणालें, "अगे बाई तरलिके ! मेल्या मदनानें अधिक तें काय करायाचें आहे? उपाय, शंका, लज्जा, भय इत्यादिकांस समूळ नाहींसा करणारा, आपण होऊन जायाचें, या हलकेपणास न जुमानणारा असा हा चंद्र मृत्यूच्या किंवा त्याच्याजवळ मला नेण्याकरितां आलाच आहे ! तर आतां चल बाई, माझा जीव आहे तोपर्यंत मजकरितां दुःख भोगणाऱ्या प्रियजनास भेटूं तरी एकदाचें !" असें बोलून मदनपीडेनें माझीं अंगें अशक्त झालीं होतीं तरी तरलिकेस धरून मी मोठ्या कष्टानें उठून उभी राहिलें व जाण्यास तयार झालें. त्यावेळीं दुश्चिन्हसूचक असा मेला माझा

उजवा डोळा लवूं लागला त्यामुळें माझ्या मनांत आलें कीं, हें दैवानें कांहीं निराळेंच आरंभिलें नाहीं ना ?

मग त्रैलोक्यरूप राजवाड्याच्या कारंजाचें अनुकरण करणारा ! अमृताचे पूर सोडणारा ! शुभ्र चंदनरसाचे पाझर सोडणारा, आकाशांतील शुभ्र गंगेचे हजारों प्रवाह सोडणारा, असा चंद्र आपल्या चंद्रिकेनें सर्व जग व्याप्त करून चांगला प्रकाशित झाला असतां, आपण श्वेतद्वीपांतच आहोंत किंवा चंद्रलोकांतील सुखाचा अनुभव घेत आहों, असें सर्व लोकांस वाटूं लागलें. महावराहाच्या दंष्ट्रेसारख्या चंद्रानें हें भूमंडळ क्षीरसमुद्रांतूनच वर काढलें आहे काय ? असें भासूं लागलें ! घरोघरच्या स्त्रियांनीं प्रफुल्लित कमलें व चंदन यांनीं मिश्रित केलेल्या उदकानें चंद्रास अर्घ्यें दिलीं. चंद्रप्रकाशामुळें भयभीत झालेल्या स्वेच्छाचारी स्त्रिया वस्त्रानें आपलें अंग झांकून रस्त्यानें जलदीनें चालू लागल्या. सरोवरांतील चंद्रविकासिनी प्रफुल्लित होऊन त्यांवर भ्रमरांचे थवे हिंडू लागले. मंद मंद वाहणाऱ्या वायूच्या झुळकां बरोबर कमलांतील पराग व सुगंध वाहूं लागले. रात्रीरूपनदीचे शुभ्र वाळवंटच काय ! असें आकाश दिसूं लागलें. शुभ्र चंद्रप्रकाशानें रतिमय, उत्सवमय, विलासमय किंवा प्रीतिमय असा सर्व मनुष्यलोक दिसूं लागला ! चंद्रकांत पाषाणास पाझर फुटून ते वाहूं लागले. मयूर आनंदानें ओरडूं लागले. अशा प्रदोषकालीं मी आपल्याबरोबर अनेक सुगंधी पुष्पें, तांबूल, उटीचें साहित्य वगैरे पदार्थ घेऊन निघालें, आणि **तरलिकेनें** अंगास उटि लाविली होती, तशा वेषानेंच **तरलिकेस** बरोबर घेऊन चाललें. माझ्या गळ्यांत रुद्राक्षमाला होती ती तशीच होती, व कानावर पुष्पमंजरी ठेविली होती तीही तशीच होती. मीं आपल्या अंगावरून तांबडें वस्त्र गुंडाळून घेतलें होतें. तें वस्त्र जसें माणकाच्या कांतीनेंच निर्माण केलें आहे काय असें दिसत होतें ! अशा वेषानें निघून कोणासही कळूं न देतां मी आपल्या मंदिरांतून खालीं उतरलें.

खालीं उतरून बगीच्यांतून चाललें तों माझ्या कर्णावरील पुष्प-

मंजरीच्या सुगंधानें ओढलेलेच काय ! असे भ्रमर चंद्रविकासी कमळें सोडून व उपवनांतील पुष्पवल्ली सोडून मजकडे धांवत आले; आणि त्यामुळें नीलवस्त्रानें गुरगटून घेतल्याप्रमाणें माझें अंग दिसूं लागलें. नंतर प्रमदवनाच्या मागल्या दारावाटे मी बाहेर पडलें आणि **पुंडरीकाच्या**जवळ जाण्याकरितां झपाट्यानें चाललें. जातांना **तरलिके**वांचून आपल्याबरोबर दुसरा कोणीच सेवक नाहीं असें पाहून मी आपल्या मनांत ह्मणालें, प्रियतमाकडे उत्कंठेनें चाललेल्या स्त्रीस इतर सेवकांचें काय प्रयोजन आहे? या वेळेस सेवकांचें काम करणारे दुसरेच तयार असतात. धनुष्याला बाण लावून सज्ज झालेला हा मदन मजबरोबर चाललाच आहे! आपले कर[1] दूर पसरून माझ्या हाताला धरून हा चंद्र जसा काय मला ओढूनच नेत आहे! मी एखादी पडेन ह्मणून राग[2] मला जसा काय पावलोंपावलीं सावरूनच धरीत आहे! लज्जेला मागें सारून इंद्रियांसहवर्तमान हृदय पुढें धांवतच चाललें आहे! उत्कंठा दासी मला खात्रीनें त्याच्याजवळ नेण्याचें काम करीत आहे! असें वाटल्यावर मी **तरलिकेस** ह्मणालें, '**तरलिके**? हा दुष्ट चंद्र माझ्याप्रमाणें त्याचेही केश धरून मजजवळ त्याला आणीत असेल कांगे?' असें माझें बोलणें ऐकून ती हंसून ह्मणाली, बाईसाहेब! तुह्मी बाई खरोखरच वेड्या आहां! ह्या चंद्राला त्याचा काय बरें उपयोग होणार आहे! हा मेला कामातुर होऊन तुमचे ठायीं अनेक विलास करीत आहे पहा! घामानें डवडवलेल्या गालावर प्रतिबिंब मिषानें जसा चुंबनच करीत आहे! तुमच्या सुंदर स्तनास व कमरेस आपल्या करांनीं स्पर्शच करीत आहे! पायाच्या निर्मळ नखांत प्रतिबिंबीत झाल्यामुळें जणुं काय पायाच पडत आहे! विरही पुरुषाप्रमाणें याचें शरीर कसें फिक्कें दिसतें आहे! मृणालाचीं कडीं घातल्यामुळेंच काय याचे कर पांढरे दिसत आहेत! मण्याच्या फरसबंदींत विरह तापामुळें हा प्रतिबिंब मिषानें जसा काय लोळतोच आहे! कमलयुक्त सरोवरांत जसा काय स्नानच करतो आहे काय! आणि पाझर सुटल्यामुळें

१ हात, किरण. २ प्रेमा.

थंडगार अशा चंद्रकांतमण्यास स्पर्शच करीत आहे काय! असें दिसतें. याप्रमाणें पुष्कळ रीतीनें तरलिकेबरोबर बोलत बोलतां मीं त्या ठिकाणाजवळ गेलें. नंतर चंद्रोदयामुळें कैलासपर्वताच्या शिखरावरून चंद्रकांत पाषाणाचे पाझर चालले होते, त्यांत वाटेंतील लतापुष्पांच्या परागांनीं पाय भरले होते ते धुतले. नंतर पुढें चाललें तों त्या सरोवराच्या पश्चिमेकडील तीरावर दूर असल्यामुळें अस्पष्ट असा पुरुषाच्या स्वरासारखा रोदनाचा स्वर माझ्या कानीं पडला. पूर्वीं माझा उजवा डोळा लवला होता त्यामुळें माझ्या मनांत डाचत होतेंच! आणि त्यांत तो रुदनाचा स्वरकानीं पडतांच माझें हृदय फुटल्यासारखें झालें! आणि कांहीं तरी वाईट असल्याची कल्पना मनांत येऊन मी तरलिकेस ह्मणालें, तरलिके, 'हें कायग आहे बाई!' असें ह्मणून भयानें थरथर कांपत तशीच पुढें लगबगीनें चाललें.

पुढें गेल्यावर दोन प्रहर रात्र होऊन गेली असल्यामुळें दुरून देखील रोदनयुक्त करुण शब्द स्पष्टपणें ऐकूं येऊं लागले ते असे. "हायहाय! मी मेलों! मी जळालों! मी फसलों! हें काय एकाएकीं असें झालें! मी सर्वस्वी बुडालों; अरे दुरात्म्या! मदनपिशाच्या! पाप्या! निर्दया! हें काय तूं दुष्कर्म केलेंस! अगे दुष्टे महाश्वेते यानें तुझें असें काय केलें? अरे दुष्टा चांडाळा, चंद्रा, आतां तूं कृतार्थ झालास! अरे दुष्टा दक्षिणवायो, आतां तुझे मनोरथ पूर्ण झाले? आतां तूं खुशाल आनंदानें वहा? भगवन्, श्वेतकेतो, हा आपला घात झालेला आपणास कळला नसेल काय? हायहाय! धर्मा, तुझें मूळ नाहींसें झालें. हे तपा, तूं आतां निराश्रित झालेंस? हे सरस्वती, तूं विधवा झालीस? सत्या, तूं अनाथ झालेंस? देवलोका, तूं शून्य दिसूं लागलास? अरे सख्या माझी वाट पहा? हा मी तुझ्या बरोबर येण्यास तयार आहें? तुजवांचून मला येथें क्षणभर देखील राहवत नाहीं. अनोळख्या सारखा व अपरिचितासारखा कसा मला एकाएकीं सोडून चाललास? आज तूं इतका निष्ठुर कसा झालास? तुजवांचून मी कोठें जाऊं?

कोणाला मागणें मागूं ? कोणाला शरण जाऊं ? मी अंध झालों ! सर्व दशदिशा मला शून्य झाल्या. माझें जीवित व्यर्थ झालें ? माझें सुख नाहींसें झालें ? आतां मी कोणा बरोबर फिरूं व कोणा बरोबर बोलूं ? सख्या पुंडरिका, ऊठ ! मी इतका विलाप करीत आहे तर मला एकदां तरी प्रतिवचन दे ! तुझें माझ्यावरचें प्रेम कोठें गेलें ? तुझें तें हास्यपूर्वक भाषण कोठें गेलें ?" अशा प्रकारें कपिंजलाचा विलाप माझ्या कानीं पडला !

तो विलाप कानीं पडतांच मीं अगदीं घाबरी होऊन मोठ्यानें किंकाळी फोडली. मग मी धांवत धांवत तिकडे चाल्लें तों सरोवराच्या तीरावरील लतांस माझें उत्तरीय वस्त्र अडकून फाटलें तरी तिकडे लक्ष न देतां, व उंचनीच प्रदेशाकडे न पहातां, जितक्या जलदीनें चालवेल तितकें चालून गेलें. तेव्हां जसें काय मला कोणीं उचलूनच नेत आहे ! असें वाटलें. त्या ठिकाणीं गेलें तों सरोवराच्या जवळच्या लतामंडपांत जिला पाझर सुटले आहेत अशी चंद्रकांत पाषाणाची शिळा होती. तीवर अनेक पुष्पांचीं शय्या केली होती त्यामुळें ती जशी काय मदनबाणांनींच निर्माण केली आहे काय ! अशी दिसत होती. अशा त्या शय्येवर पडलेला अगदीं बोलत चालत नसल्यामुळें माझ्या शब्दांचाच कानोसा घेत आहे काय ! मदनतापास दूर करून सुखानें निद्राच करीत आहे काय, अंतःकरणास क्षोभ झाल्यामुळें प्रायःश्चित्त करण्याकरितां प्राणायामच करीत आहे काय! ओष्ठावर प्रभा चमकत असल्यामुळें तुझ्याकरितां माझी अशी दशा झाली, असें सांगतच आहे काय! असा तो दिसत होता. त्यानें चंद्राच्या तिरस्कारानें त्याजकडे पाठ केली होती, तीवर चंद्रकिरण पडले होते तें विव्हल झालेल्या हृदयावर हात ठेविल्यामुळें नखप्रभेच्या मिषानें हृदय विदारण करून पाठीवाटे बाहेरच पडले आहेत काय असें दिसत होतें! मजपेक्षां ही तुला दुसरें प्रिय तर झालें आहे ह्मणून रागावूनच जीवितानें ज्याला सोडलें आहे काय! मदनपीडेबरोबर प्राणासही सोडून निश्चेतन सुखाचा अनुभव घेत आहे काय ! किंवा मदनाचें ध्यानच करीत आहे काय ! अथवा अपूर्व

प्राणायामाचा अभ्यासच करीत आहे काय! असा तो दिसला. तेव्हां मला जवळ आणून सोडल्याबद्दल मदनानें त्याजपासून प्राण-रूप बक्षीसच घेतलें काय असें वाटलें! त्याच्या कपाळीं चंदनाचा त्रिपुंड्र लावलेला होता. नवीन मृणालाप्रमाणें त्याचे गळ्यात यज्ञो-पवीत होतें. त्याच्या उरावर केळीचे पान ठेविलें होतें. त्याच्या गळ्यांत माझी एकसरी मौक्तिकमाळ होती. अंगास कापराची भुकटी लावली होती. हातांत कमलतंतूची कडीं घातलीं होतीं, तीं माझा समागम व्हावा ह्मणून मदन व्रत करणाऱ्या पुंडरीकानें आपल्या हातांत रक्षादोरच बांधले आहेत काय! असें दिसत होतें. अति रोदनानें अश्रु संपून गेल्यामुळें रक्तच बाहेर पडत आहे काय! असे त्याचे डोळे लाल दिसत होते. त्याचे डोळे व ओठ चमत्कारिक दिसत होते, त्यामुळें फिरून या **पुंडरीकावर** दर्शनाचा अनुग्रह केला नाहीं ह्मणून ते माझा तिरस्कारच करीत आहेत काय! असें भासत होतें. दंतांचें किरण बाहेर पडलें होतें त्यांमुळें जीवित हरण करण्याकरितां आंत शिरलेले हे चंद्रकिरणच बाहेर पडत आहे काय! असें वाटत होतें. त्यानें डावा हात उरावर पालथा ठेवला होता त्यामुळें प्राणसमे! प्राणाबरोबर "तूं माझ्या हृदयांतून जाऊं नको" ह्मणून हृदयांत असणाऱ्या मला धरूनच ठेविलें आहे काय! असें दिसत होतें. त्याच्याजवळ त्याच्या तपःश्रयेचा सोबती कमं-डलु होता, तो नुकताच गतप्राण झालेल्या आपल्या मित्राच्या जीविताकडे तोंडवर करून पहातच आहे काय! असें वाटत होतें. त्याच्या गळ्यांत मृणालाची माळ असल्यामुळें चंद्रकिरणरूप पाश गळ्यास बिलगून तो त्यास लोकांतरासच ओढून नेत आहे काय! असें भासत होतें मला पाहतांच ज्याचें दुःख दुप्पट होऊन मोठ्यानें रडें कोसळलें आहे, अशा **कपिंजलानें** ज्याच्या कंठास मिठी मारली आहे, ज्याचें जीवित नुकतेंच गेलें आहे असा **पुंडरीक** माझ्या पापि-णीच्या दृष्टीस पडला.

त्या वेळीं मला मूर्च्छा येऊन डोळ्यापुढें अंधारी आली आणि पाताळांत पडल्यासारखें मला होऊन मी आलें कोणीकडे? केलें

काय? बोलणें काय? वगैरे मला कांहीं एक समजेनासें झालें. माझे प्राण त्यावेळेसच निघून जावे! पण या मूढ हृदयाच्या कठीणपणामुळें किंवा या शरिरास हजारों दुःखें भोगावयाचीं होतीं यामुळें, किंवा दीर्घकाल शोकानुभव घ्यावयाचा होता यामुळें, किंवा जन्मांतरीं केलेलें पाप भोगावयाचें होतें यामुळें, किंवा दुःखें देण्याविषयीं तत्पर अशा मेल्या दैवास माझे हाल करावयाचे होते यामुळें, किंवा त्या मेल्या दुष्ट घातकी मदनाच्या खोडसाळपणामुळें, कोणत्या कारणानें असेल तें असो! माझे प्राण निघून गेले नाहींत. पुष्कळ वेळ मी मूर्छित पडलें होतें. पुढें मी सावध झाल्यावर अग्नींत पडल्याप्रमाणें असह्य दुःखानें दग्ध झालेला माझा जीव तळमळूं लागला. व मी भूमीवर गडबडां लोळूं लागलें. प्रिय **पुंडरीक**, मरण पावला आणि मी कशी जिवंत राहिलें, ह्मणून मी मोठ्यानें रडूं लागलें. हे आई, अहो बाबा, अहो सख्यांनों, हें काय झालें! हा नाथा, हा जिविताधारा! मला एकटीला टाकून तुह्मी कोठें चालला? ह्या **तरलिकेला** पुसून पहावें, 'आपल्या करितां मी कशी अवस्था भोगीत आहें तें! एकच दिवस पण सहस्त्र युगांप्रमाणें घालविला! प्राणनाथा, प्रसन्न व्हावें, व एक वेळ तरी मजशीं बोलावें! आपली भक्तवत्सलता दाखवावी! थोडा वेळ तरी मजकडे पहावें आणि माझे मनोरथ पूर्ण करावे! मी आपल्यावर अनुरक्त झालेली अनाथ दासी आहे! मी अनन्य शरण आहे! मदनानें पराभूत केल्यामुळें दुःखित झालें आहे!. मजवर दया न करावी असा मीं कोणता अपराध केला? मीं आपली कोणती आज्ञा मोडली? कोणत्या गोष्टींत मी आपणास प्रतिकूळ झालें कीं, ज्यामुळें आपण मजवर इतके रागावलां? कारणावांचून दासीस टाकून जाणारे आपण लोकोपवादास कसें भीत नाहीं? किंवा खोटा अनुराग दाखवून फसविणाऱ्या या चांडाळणीचा तरी आपणास काय उपयोग! हा माझ्या नशिबा! अजून मी वांचलें तरी कशी? मी मंदभागिनी सर्वस्वी बुडालें प्राणप्रिया, मला तुह्मी अंतरलां, मातापितर अंतरले, अप्तमित्र सुटले, इहलोक नाहीं व परलोकही नाहीं असें झालें. जिच्याकरितां आ-

पली अशी दुर्दशा झाली, त्या पापिणीला मला धिक्कार असो! आपणांस सोडून मी खुशाल घरीं गेलें. तेव्हां मजसारखी चांडाळीण दुसरी कोणी नसेल! मला घराचें तरी काय करायाचें होतें! आई-बापांचा तरी काय उपयोग होता! आप्तमित्रांचें तरी काय प्रयोजन होतें!! आणि सेवकांचें तरी मला काय करायाचें होतें!! हाय हाय! आतां मीं कोणास शरण ये़ऊं? अरे निर्दया देवा दया कर. मी तुला पदर पसरतें! माझ्या प्रिय दयिताची मला देणगी दे, मी अनाथ अबळा आहें, याकरितां कृपाकरून माझें रक्षण कर! अहो वन देवतांनों प्रसन्न व्हा, आणि माझ्या प्रियाचें मला प्राणदान द्या? माते पृथ्वी, सर्वांवर अनुग्रह करणारी तूं आहेस तेव्हां मजवर कां कृपा करीत नाहींस? बापा कैलासा, मी तुला शरण आलें, तर मजवर दया कर? अशा प्रकारें व आणखी पुष्कळ प्रकारें मी विलाप केला. तो आतां कोठवर आठवून सांगावा! भूत संचार झाल्यासारखी मी पुष्कळ आक्रोश करित बसलें. डोळ्यावांटें पाण्याचे लोट चालल्यामुळें अश्रुमिषानें माझेंच पाणी होत आहे काय! असें वाटलें. माझ्या दयिताला जीवित प्राप्ति होऊन मला मरण येईलतर बरें, असें मला वाटूं लागलें. मग मृतपुंडकाच्या हृदयांत प्रवेशच करावा असें मला वाटून मी आपल्या हातानें त्याच्या गालास ज्याच्या वरचें गंध वाळलें होतें अशा कपाळांस, ज्यावर कमल तंतू ठेविले होते अशा खांद्यास आणि ज्यांवर चंदनरस युक्त कमळ पत्रें ठेवलीं होतीं अशा हृदयास स्पर्शकरून ह्मटलें " पुंडरिका! तुह्मी मोठे निष्ठुर अहाहो! इतकी मी शोक करून व्याकुळ होत आहे. तरी तुमच्या मनांत कांहींच कसें येत नाहीं! असें वारंवार निंदा पूर्वक त्यांस प्रश्न करूं लागलें. वारंवार त्यांचें चुंबन करूं लागलें. वारंवार त्याच्या गळ्यास मिठी मारून आक्रोश करूं लागलें. त्याला मी मोत्यांची माळ दिली होती ती त्याच्या गळ्यांत होतीच. तिची निंदा करून मीं ह्मटलें, ' कायगे एका वलि! तूं मोठी चांडाळीण आहेस, माझी तूं जवळ असून मी परत येईपर्यंत तूं माझ्या प्रियाचे प्राण कसे राखिले नाहींस'! भगवान् कपिजला! प्रसन्न व्हा आणि पुंडरीक जिवंत होईल असें करा"

असें बोलून पटापटा त्याच्या पायां पडूं लागलें ! वारंवार तरलिकेच्या पायां पडून मोठ्यानें रडूं लागलें ! त्यावेळीं विचार केल्यावांचून व शिकविल्यावांचून या चांडाळणीच्या तोंडावाटें हजारों दीनवचनें निघालीं तरी कशीं, हें मला अजूनही समजत नाहीं. प्रलयकालच्या समुद्राच्या लाटांप्रमाणें माझ्या पोटांत दुःखाचे उमाळ्यावर उमाळे येऊं लागले. कारंजाच्या धारांप्रमाणें नेत्रावाटें अश्रुधारा चालल्या व शेवटीं मूर्छनावर मूर्छना आल्या.

याप्रमाणें अति दुःखकारक आपली हकीकत सांगत असतां महाश्वेताला मूर्छा येऊन ती शिळातलावर पडूं लागली, तों चंद्रापीडानें हात पुढें करून तिला सांवरून धरिलें, आणि अश्रुजलानें तिचें उत्तरीय वल्कल भिजलें होतें त्यानें तीस वारा घालून सावध केलें. तिच्या दुःखकारक वृतांतानें चंद्रापीडाचें हृदय फारच दुःखित झालें. मग ती सावध झाल्यावर तो तीस ह्मणाला, ह्यां पाप्यानें दुःखाचें स्मरण करून तुमचा शोक नवीन केला व त्यामुळें तुमची अशी अवस्था झाली ! तर आतां ही दुःखकारक कथा पुरे करावी, ती मला ऐकवत नाहीं. कोणी आपलीं भोगिलेलीं दुःखें सांगूं लागलें असतां, तीं आप्तमित्रांस फारच दुःखी करतात व त्यामुळें आपणही त्या दुःखांचाच अनुभव घेत आहों असें त्यांस वाटतें— याकरितां कसें तरी दुःखानें धारण केलेले प्राण पूर्व गोष्टीच्या स्मरणानें पेटलेल्या दुःखाग्नीनें दग्ध करूं नयेत. असें बोलून चंद्रापीड उगीच बसला.

याप्रमाणें तो बोलल्यावर महाश्वेता मोठ्यानें श्वासोच्छ्वास टाकून डोळ्यांतून अश्रु ढाळीत खिन्नपणानें ह्मणाली, "महाराज, जिला त्या भयंकर रात्रीं देखील ह्या दुष्ट प्राणांनीं सोडिलें नाहीं, तिला आतां हे प्राण कोठून सोडणार ? खरोखरच मी चांडाळीण मोठी पापी आहे, ह्मणून यम देखील माझें दर्शन घेण्याचें टाळतो ! मी कठीण हृदयीच पडलें तेव्हां मला शोक तरी काय करणार ? हें सर्व कृत्य त्या मेल्या घातकी मदनाचें आहे, त्या निर्लज्यानें मला सर्व निलाजऱ्यामध्यें पुढारी केलें आहे. मी वज्रासारखें कठिण हृदय करून

त्या भेल्या मदनाच्या वेदना सोसल्या, तर आतां, त्या सांगितल्यानें मला अधिक काय होणार आहे! जें सांगितलें त्याहून अधिक कष्टकारक असें सांगण्याचें तरी काय उरलें आहे कीं, जें सांगवणार नाहीं व ऐकवणार नाहीं! हें वज्रपातासारखें दुःख झाल्यावर जें आश्चर्यकारक वर्तमान झालें आणि दुराशारूप मृगतृष्णेला मोहित होऊन हें मृततुल्य, भार करणारें व ज्याचें कांहीं एक प्रयोजन नाहीं, असें हें नष्ट शरीर धारण करण्यास जें कारण झालें, तें मी सांगतें," ऐकावें.

तशी दुःखावस्था प्राप्त झाल्यावर मी मरणाविषयीं निश्चय करून व पुष्कळ प्रकारें विलाप करून **तरलिकेस** ह्मटलें, "अगे निष्ठूर हृदये **तरलिके**! उठ बाई, आतां रडूं तरी कोठवर! काष्टें आणून चिता तयार कर, प्राणवल्लभाच्या मागून मला लवकर गेलें पाहिजे." असें मी बोलत होतें तों चंद्रमंडळापासून निघून आकाशांतून खालीं उतरूं लागलेला एक पुरुष माझ्या दृष्टीस पडला. त्याचें उत्तरीय वस्त्र फारच शुभ्र होतें व वाऱ्याच्या योगानें तें हालत होतें. त्याच्या बाहूंच्या ठायीं भूषणें होतीं. त्याच्या दोन्हीं कर्णांतील रत्नकुंडलें हालत असल्यामुळें त्यांतील मण्यांची प्रभा त्याचे अंगावर झळकत होती. मोठाल्या मोत्यांचा हार त्याच्या वक्षस्थलावर हालत असल्यामुळें त्यानें हें नक्षत्रमंडळच धारण केलें आहे काय असें दिसत होतें. त्याच्या मस्तकावर कुरळे व भ्रमरासारखे काळे केश दिसत होते. त्यानें आपल्या कानावर भूषणार्थ कमळें धारण केलीं होतीं. श्वेतकमलासारखा त्याचा देह शुभ्र दिसत होता. तो उदकाप्रमाणें आपल्या शुभ्रकांतीनें सर्व दिशा धुऊन टाकीत आहे काय असा दिसत होता. सुगंधि व शीतल अमृत वर्षावानें सर्व प्रदेश थंडगार करीत तो दिव्यपुरुष ऐरावताच्या शुंडादंडाप्रमाणें पुष्ट व शुभ्र अशा बाहूंनीं त्या **पुंडरीकास** उचलून वर घेऊन गेला आणि गंभीर वाणीनें ह्मणाला, "हे वत्से **महाश्वेते**, तूं प्राण सोडूं नको. फिरून तुझा याच्याशीं समागम होईल," असें पित्याप्रमाणें मला अश्वासन देऊन तो आकाशांत उडाला. ह्या

बदलेल्या प्रकारानें मी भयभीत, विस्मययुक्त व कौतुकयुक्त होऊन वेड्यासारखी वर पहात, 'हें काय!' ह्मणून कपिंजलास विचारूं लागलें.

कपिंजल तर मला उत्तर न देतां गडबडीनें उठला, आणि 'अरे दुष्टा अंतका! माझ्या मित्राला घेऊन कोठें चाललास?' असें बोलून रागानें वर पहात झटदिशीं आपली कमर बांधून त्या पुरुषाच्या मागून आपणही आकाशांत उडाला, आणि पाहतां पाहतां ते दोघे तारागणाच्या मधून वर गेले. कपिंजल गेल्यानंतर प्रियतमाच्या मरणासारखेंच मला दुःख वाटलें व दुप्पट शोकानें माझें हृदय फुटल्यासारखें झालें. पुढें काय करावें याविषयीं मला कांहींच कळेनासें होऊन मीं तरलिकेस ह्मणालें, 'बाई तरलिके! याला काय ह्मणावें! हें तुला कांहीं समजतें कां?' तरलिका तर स्त्रीस्वभावामुळें घाबरी होऊन थरथर कांपूं लागली, आणि माझ्या मरणाच्या शंकेनें ती बापडी खिन्न होऊन दीनवाणीनें मला ह्मणाली, "मी पडलें मेली पापीण! मला हें कोठून समजणार? परंतु ही गोष्ट मोठी आश्चर्यकारक झाली खरी. आतां जो पुरुष दृष्टीस पडला तो देवासारखा दिसत होता व त्यानें सदय होऊन बाईसाहेबांस आश्वासन दिलें आहे. अशा दिव्यपुरुषाचें भाषण कधींही खोटें व्हावयाचें नाहीं. उगींच खोटें बोलण्यास त्याला कांहीं कारण असेलसें वाटत नाहीं. याकरितां प्राणत्याग करण्याचा विचार आपण करूं नये, असें मला वाटतें. त्या दिव्यपुरुषाच्या मागोमाग कपिंजलऋषि गेलाच आहे, तर तो परत आल्यावर तो दिव्यपुरुष कोण? तो कोठून आला? त्यानें पुंडरिकाचें शरीर कशाकरितां उचलून नेलें? कोठें नेलें? आणि त्यानें बाईसाहेबास कशाकरितां आश्वासन दिलें? हें सर्व समजल्या नंतर आपण आपल्या जीविताचें काय करणें तें करावें. कपिंजलऋषि जिवंत असतां तो आपणास भेटल्या खेरीज राहणार नाहीं. याकरितां तो परत येईपर्यंत तरी प्राण धारण करावें." असें बोलून ती माझ्या पटपटां पायां पडूं लागली. मीही दुर्लभ्यजीविताशेमुळें व स्त्रीस्वभावाच्या विचारामुळें

कपिंजल परत येईल, या आशेनें तरलिकेच्या वचनास मान देऊन प्राणत्याग केला नाहीं. आशेनें कोण काय करणार नाहीं! मग काळरात्री सारखी, हजारों वर्षांसारखी वाटणारी, दुःखरूपी व अग्नि-रूपी अशी ती रात्र दुःखानें गडबडां लोळत तरलिकेसहित त्याच सरोवराच्या कांठीं घालविली.

पहांट होतांच ह्या सरोवरांत स्नान करून तपश्चर्येंत काळ घाल-वावा असा मीं निश्चय केला. मग प्रिय पुंडरीकाच्या प्रीतीमुळें त्याचाच कमंडलु त्याचींच वल्कलें व त्याचीच अक्षमाला धारण केली, आणि संसार निःसार आहे, आपलें पुण्य फारच थोडें आहे, कर्मभोग भोगल्यावांचून सुटावयाचे नाहींत, सर्व सुखें क्षणभंगुर आ हेत, असें समजून आई, बाप, आप्त व मित्र इत्यादिकांचा त्याग करून व इंद्रियांचा निग्रह करून ब्रह्मचर्यव्रत धारण केलें. आणि सर्व त्रैलोक्याचा स्वामी व अनाथाचा नाथ जो हा शंकर यास शरण जाऊन त्याच्या आश्रयानें येथें राहिलें.

दुसरे दिवशीं हें वर्तमान माझ्या बापाला समजलें तेव्हां तो माझ्या आईस बरोबर घेऊन आप्तमंडळीसह ह्या ठिकाणीं आला आणि फार वेळ शोक करून अनेक उपायांनीं, प्रार्थनांनीं, उपदेशांनीं व अनेक प्रकारच्या सांत्वनांनीं मी घरीं चलावें, ह्मणून त्यानें आपली परा-काष्ठा केली. परंतु मीं आपला निश्चय सोडला नाहीं. त्याला घरीं जाण्याकरितां मी पुनः पुनः सांगितलें तरी कन्या स्नेहामुळें फार दिवस तो येथेंच राहिला. शेवटीं निराश होऊन व शोकानें दग्ध हृदय होऊन घरीं गेला. पिता निघून गेल्या वर प्रिय पुंडरीका-करितां वारंवार अश्रू ढाळून कृतज्ञता दाखवीत त्याच्या प्रेमानें कृश झालेलें, पापरूपी, निर्लज्ज, अमंगळ व हजारों क्लेशांचें स्थान, असें हें खराब शरीर अनेक प्रकारच्या नियम धर्मांनीं वाळवीत, कंदमूल-फळें खाऊन कसें तरी धारण केलें आहे; आणि ह्या सरोवरांत दररोज स्नान करून महादेवाचें पूजन करीत तरलिकेसह ह्या गुहेंत फार दिवस शोक करीत राहिलें आहें. अशा प्रकारची पापकर्में करणारी, दुर्दैवी, निर्लज्ज, क्रूर, घातकी, निरुपयोगी, अनाथ, दुःख

भोगणारी मी चांडाळीण आहे. अशा रीतीनें ब्रह्महत्या करणाऱ्या, माझ्या दर्शनाचा महाभाग्यवंत महाराजांना काय उपयोग ? व माझा वृत्तांत विचारल्यापासून तरी काय फळ ? असें बोलल्यावर शरत्कालांतील चंद्रबिंब जसें शुभ्र मेघानें आच्छादित होतें त्याप्रमाणें शुभ्र वल्कलाच्या पदरानें तिनें आपलें मुख झांकून घेतलें आणि अनिवार्य शोकावेश दाबून न धरवल्यामुळें गळा काढून फार वेळ ती रडत बसली. महाश्वेतेचे सद्गुण व तपश्चर्यादि पवित्र धर्म पाहून तिजविषयीं चंद्रापीडाच्या अंतःकरणांत पूज्यबुद्धि उत्पन्न झाली, त्यांत तिनें खऱ्या मनोभावानें आपला वृतांत सांगितल्यामुळें व तिची कृतज्ञता दृष्टीस पडल्यामुळें तर त्याचें चित्त तिजकडे लागून तिजवर त्याचा फारच लोभ बसला. मग स्नेहानें आर्द्रचित्त होऊन तो तीस ह्मणाला, क्लेशाश भिणारा, उपकार न जाणणारा, व सुखाची इच्छा करणारा असा मनुष्य स्नेहास उचित असें कर्म न करितां स्नेह दाखविण्याकरितां केवळ अश्रु मात्र ढाळीत बसतो. तुह्मी तर करावयास योग्य असें कर्म केल्यानें प्रेमास उचित असें काय केलें नाहीं ? त्याच्याकरितां जन्मापासून प्रेम करणाऱ्या आप्तमित्रांचा देखील त्याग केला. सर्व सुखें प्राप्त होण्यासारखीं असून त्यांचा ही तिरस्कार केला. इंद्राच्या ऐश्वर्यापेक्षांही अधिक ऐश्वर्याचा त्याग केला. कमलिनीपेक्षां सकुमार अशा आपल्या तनूस क्लेशांनीं कृशता आणिली. ब्रह्मचर्यव्रत धारण करून तपःश्चर्या चालविली. स्त्रियांस दुष्कर व अतिकष्टकारक असा अरण्यवास स्वीकारला. तेव्हां यापेक्षां आतां स्नेहास उचित असें कृत्य कोणतें राहिलें ? माता, पिता, भ्राता, भर्ता किंवा इतर आप्त यांपैकीं कोणी मरण पावलें असतां शोकानें प्राणत्याग करणें हें अज्ञानाचें व साहसाचें कर्म होय. विचार केला असतां प्राणत्याग करणें यांत स्वार्थ आहे. प्रियजनाच्या शोकवेदना सहन होत नसल्यामुळें असें करतात, मरण पावलेल्या प्राण्यास असें करण्यापासून कांहीं उपयोग नाहीं. अशानें तो कांहीं जिवंत होत नाहीं, त्याकरितां धर्म होत नाहीं, याला उत्तम लोक प्राप्त होत नाहीं, त्याच्या नरकवासाचें निवारण

होत नाहीं, किंवा परस्परांचा समागम होत नाहीं. मृत प्राणी आप-ल्या कर्मानें प्राप्त झालेल्या स्थानास जातो व आत्मघात करणाऱ्या-च्या पातकानें मात्र बद्ध होतो. जिवंत राहिल्यानें जलांजलि पिंडदान इत्यादि कृत्यांनीं मृतावर पुष्कळ उपकार करतां येतात. आत्मघात करणारास स्वहित नाहीं व परहितही नाहीं, असें होतें. पहा, शंकराच्या नेत्राग्नीनें सकल स्त्रीजनाला आनंद देणारा असा भगवान् मदन दग्ध केला असतां त्याची पतिव्रता स्त्री रति हिनें प्राण-त्याग केला नाहीं. महापराक्रमी **पांडुराजा** किंदमऋषीच्या शापानें मृत झाला असतां त्याची पतिव्रता स्त्री कुंती हिनें प्राण-त्याग केला नाहीं. बालचंद्राप्रमाणें नेत्रास आनंद देणारा अभि-मन्यु युद्धांत मरण पावला असतां **विराट** राज्याची कन्या उत्तरा हिनें देहत्याग केला नाहीं. महादेवाच्या वरप्रदानानें ज्याचा महिमा वाढला असा जयद्रथ **अर्जुनानें** परलोकास पाठविला असतां **धृतराष्ट्राची** मुलगी **दुःशीला** हिनें प्राणत्याग केला नाहीं. या-प्रमाणें आणखी पुष्कळ स्त्रियां पति मरणा नंतर जीवित धारण करून राहिल्या असल्याचें ऐकण्यांत आहे. बरें यांतही **पुंडरीकाच्या** समागमा विषयीं जरसंदेह असता तर जीवित सोडणें योग्य होतें. परंतु त्याच्याशी फिरून समागम होण्याविषयीं महा पुरुषाची वाणी तुह्मी ऐकिली आहे, तेव्हां आतां त्याविषयीं शंका करीत बसणें व्यर्थ आहे. दिव्यपुरुषाची वाणी कधीं खोटी व्हावयाची नाहीं. मेलेल्याबरोबर समागम कसा होईल ह्मणून त्यास दया येऊन त्यानें त्यास जिवंत करण्याकरितांच उचलून देवलोकीं नेलें. दिव्यपुरु-षाचें सामर्थ्य विलक्षण असतें. देवाचे खेळ चमत्कारिक असतात. तपःसामर्थ्य विलक्षण असतें. या गोष्टीबद्दल पूर्णपणें विचार केला तर त्याला हरण करण्यांत जीवित प्रदानावांचून दुसरें कोणतेंही कारण असावेंसें वाटत नाहीं. ही गोष्ट असंभवनीय आहे असें कांहीं नाहीं. अशा गोष्टी घडल्याचें ऐकण्यांत आहे. पूर्वीं **विश्वा-वसु** गंधर्वाची **प्रमद्वरा** कन्या सर्पदंशानें मृत झाली असतां तिचा पति **रुरु** यानें आपल्या आयुष्याचें अर्ध्य देऊन तिला जिवंत केलें.

अश्वमेध यज्ञाकरितां घोडा सोडून त्याच्या रक्षणाकरितां अर्जुन गेला असतां त्याचा पुत्र बभ्रुवान यानें युद्धांत अर्जुनास गतप्राण केल्यावर त्याची स्त्री उलुपी हिनें त्यास जिवंत केलें. उज्जयनीस सांदीपनीचा पुत्र मृत झाला असतां कृष्णानें तो यमपुरीहून आणून गुरूस दक्षणा ह्मणून अर्पण केला. याकरितां हेंही असेंच होईल. दैव हें बलवत्तर आहे; दुष्ट दैवाचे खेळ घात करणारे असतात. ते कोणाचे निष्कपट प्रेम फार वेळ राहूं देत नाहीं. सुख क्षणभंगुर वाटतें व दुःख चिरकाळ राहणारें वाटतें. संसारांत असले प्रकार घडून येतातच. परंतु धीर पुरुष त्यांचें सहन करून संकटें तरून जातात." अशा प्रकारच्या भाषणांनीं चंद्रापीडानें महाश्वेतेचें समाधान केलें, आणि झन्यांतील उदक आपल्या ओंजळींत आणून त्यानें तिजकडून तोंड धुवविलें.

महाश्वेतेचा शोकवृत्तांत ऐकून शोकाविष्टच झाला काय अशा सूर्यानें दिवसव्यापार सोडून आपलें तोंड खालीं घातलें. दशदिशेकडे आरक्त सूर्य किरण पसरलें होते ते नाहींसें झालें. तेव्हां अंधकारानें जिकडेतिकडे व्याप्त केलें. संध्याकाळचा सुगंधी व शीतळ वारा वाहूं लागला. पशु पक्षी आपआपल्या ठिकाणीं निद्रा करण्याकरितां गेले. अशा वेळेस महाश्वेता तेथून उठली आणि कमंडलूतील उदकानें तिनें पाय धुऊन सांयकाळचीं कर्में केलीं, आणि नंतर वल्कलाच्या शय्येवर दुःखानें श्वासोच्छ्वास टाकीत बसली. चंद्रापीडही त्या ठिकाणाहून उठला, आणि झन्यावर जाऊन त्यानें अर्घ्यप्रदानपूर्वक संध्यादी कर्में केलीं नंतर दुसऱ्या शिलातलावर पल्लवांची शय्या करून तीवर तोही बसला आणि वारंवार महाश्वेतेचा वृत्तांत मनांत आणून तिकडेच लक्ष लावून बसला. मग त्याच्या मनांत आले कीं, हा मदन मोठा दुर्धर व कष्टकारक आहे. यानें पराभूत केलेले मोठमोठे पुरुष देखील धैर्य सोडून जीवितत्याग करितात अशा मदनाला साष्टांग नमस्कार असो! मग तो तीस ह्मणाला, भगवति, आपल्या वनवासाची व दुःखाची मैत्रीण आपली सखी तरलिका कोठें गेली? ती ह्मणाली, 'महाराज! अमृतापा-

सून अप्सरांचें एक कुळ उत्पन्न झालें आहे ह्मणून पूर्वीं मीं आपणास सांगितलेंच आहे. त्याच कुळांत मदिरा नांवाची अत्यंत रूपवति एक कन्या उत्पन्न झाली. सर्व गंधर्वलोक ज्याला नमस्कार करतात अशा चित्ररथगंधर्व राजानें तिजबरोबर विवाह केला. नंतर तिच्या अनेक सुंदर गुणांस मोहित झालेल्या चित्ररथानें तीस छत्रचामरादि चिन्हांनीं युक्त करून इतर स्त्रियांस दुर्लभ असें पट्टराणीचें पद दिलें. त्या उभयतांचें प्रेम एकमेकांवर फारच जडलें. पुढें तीं उभयतां मोठ्या आनंदानें तारुण्यसुखाचा उपभोग घेत असतां कांहीं कालानें त्या उभयतांचें व सर्व गंधर्वांचें जीवितच काय! असें लोकोत्तर कन्या रत्न त्यांस झालें. त्या कन्येचें नांव त्यांनीं कादंबरी असें ठेविलें. लहानपणापासून माझें तिजवर व तिचें मजवर प्रेम जडलें. आह्मी दोघींनीं एक्याच आसनावर बसावें, एक्याच शय्येवर निजावें, एक्याच पात्रांत भोजन करावें, एकेजागीं खेळावें, याप्रमाणें मजवांचून तिला व तिजवांचून मला क्षणभर देखील करमेनासे झालें. माझा तिजवर व तिचा मजवर पूर्ण भरंवसा असे. आह्मी दोघींनीं एके ठिकाणींच नृत्य गितादिकांचा अभ्यास केला. आह्मी लहानपणीं यथेच्छ क्रीडा करून बालपण घालविलें. असो, पुढें माझें हें दुःखकारक वर्तमान ऐकून माझ्या कादंबरीनें निश्चय केला कीं, महाश्वेता दुःखी आहे तोंपर्यंत विवाह करावयाचा नाहीं सख्याच्या समक्ष अशी प्रतिज्ञा करून तिनें ह्मटलें कीं, माझी इच्छा नसतां जर माझा बाप बळेंच मला कोणाला द्यावयाचें मनांत आणील तर मी उपाशी राहून किंवा अग्नींत प्रवेश करून किंवा गळ्याला फास लावून किंवा विष भक्षण करून आपला जीव देईन. आपल्या कन्येचा हा निश्चय कर्णपरंपरेनें चित्ररथ गंधर्वासही कळला. आपली एकुलती एक कन्या वयांत आलेली पाहून व तिचा असा निर्धार ऐकून चित्ररथ गंधर्वास मोठीच काळजी पडली. मग त्यानें आपली पट्टराणी मदिरा इजबरोबर विचार करून क्षीरोद नांवाचा चोपदार मजकडे पाठविला आणि मला असा निरोप पाठविला कीं, "हे महाश्वेते तुझ्या दुःखाग्नीनें अगोदरच आमचें हृदय जळून गेलें आहे, व

त्यांत असें हें दुसरेंही संकट प्राप्त झालें आहे, अशा वेळेस **कादंबरीची** समजूत करून समाधान करण्यास तूंच समर्थ आहेस, तुजवांचून हें काम दुसऱ्याच्यानें होणार नाहीं." असा निरोप आल्यावर वडील माणसांच्या गौरवामुळें व प्रियसखीच्या प्रेमामुळें त्या चोपदाराबरोबर आज पहाटेस **तरलिकेस कादंबरीकडे** पाठविलें व तिजबरोबर असें सांगून धाडलें आहे कीं, "प्रियसखी, दुःखित असलेल्या पितरांस आणखी कां तूं दुःख देतेस? मी जिवंत रहावें असें तुझ्या मनांत असेल तर वडील माणसांच्या आज्ञेप्रमाणें वाग." असा निरोप घेऊन **तरलिका** गेल्यावर फार वेळ झाला नाहीं तोंच महाराजांची स्वारी या ठिकाणीं आली. इतकें बोलून ती उगीच बसली.

इतक्यांत कलंकाच्या मिषानें शोकाग्नीनें दग्ध झालेल्या **महाश्वेतेच्या** हृदयाचें अनुकरणच करीत आहे काय! असा भासणारा, किंवा कलंकमिषानें जणूं काय पुंडरीकवधाचें पातक धारण करणारा! शंकराच्या जटामंडलास सुशोभित करणारा, शुभ्र कमलें प्रफुल्लित करणारा, दशदिशा शुभ्र करणारा, श्वेतछत्राप्रमाणें दिसणारा, मानिनी स्त्रियांचा अभिमान दूर करणारा असा तारकापति चंद्र उदयास आला. त्यामुळें कैलासपर्वतावरील चंद्रकांत पाषाणास पाझर फुटले व अच्छोद सरोवर फारच सुशोभित दिसूं लागलें. चक्रवाकपक्षी विरहानें आक्रोश करीत हिंडूं लागले. अशा वेळेस **महाश्वेतेस** झोंप लागली असें पाहून **चंद्रापीडही** पल्लवांच्या शय्येवर चिंतन करीत पडला. तो मनांत ह्मणाला, माझा **वैशंपायन** मजविषयीं किती काळजी करीत असेल! ती बिचारी पत्रलेखाही काळजी करीत बसली असेल! व राजेलोकही फिकिरींत असतील. असे विचार मनांत येतां येतां तोही झोंपीं गेला.

रात्र संपून पहाट झाली. तेव्हां **महाश्वेता** स्नान करून अघमर्षणादि कर्में करीत शिलातलावर बसली. **चंद्रापीडही** उठून प्रातःस्नानादि कर्में करीत बसला. इतक्यांत सोळा वर्षांचा गजराजाप्रमाणें गमन करणारा, ज्यानें आपल्या अंगास उटी लाविलेली आहे,

त्याचें वक्षस्थळ विशाळ आहे, ज्याचे बाहु लांब पुष्ट असून त्यांत माणकांचीं भूषणें आहेत, ज्याच्या कर्णांतील भूषणांची प्रभा चमकत आहे, नेत्र तेजस्वी असल्यामुळें दशदिशा शुभ्र दिसत आहेत, ज्याचें कपाळ मोठें आहे, ज्याचे केंस भ्रमर समुदायाप्रमाणें काळे असून सरळ आहेत, ज्याची आकृति भव्य दिसत आहे, गंधर्व राजकुलांत राहिल्यामुळें ज्यानें चातुर्य संपादन केलें आहे, असा **केयूरक** नांवाचा गंधर्व कुमार आपल्या बरोबर घेऊन **तरलिका** दिवस उगवतांच त्या ठिकाणीं आली. तेथें **चंद्रापीड** तिच्या दृष्टीस पडतांच हा कोण ह्मणून तिला मोठें आश्चर्य वाटलें. मग ती बराच वेळ त्याजकडे पाहून **महाश्वेतेच्या** जवळ जाऊन बसली. नंतर **केयूरक** नम्रतेनें **महाश्वेतेस** नमस्कार करून तिनें दृष्टीनें सुचविलेल्या शिलातलावर जाऊन बसला. पूर्वीं असा न पाहिलेला देवादिकांच्या रूपास देखील तुच्छ करणारा व मदनाच्या रूपाचाही उपहास करणारा असा **चंद्रापीड** त्याच्या दृष्टीस पडल्यामुळें त्यास मोठें आश्चर्य वाटलें. **महाश्वेतेचा** जप संपल्यावर ती **तरलिकेस** ह्मणाली, "सखे **तरलिके**! तूं **कादंबरीची** भेट घेतलीस काय? ती खुशाल आहेना? माझें ह्मणणें तिला कबूल झालें कां!" **तरलिका** मोठ्या नम्रपणानें म्हणाली, "मी बाईसाहेबांची भेट घेतली त्या खुशाल आहेत. तुह्मी सांगितलेला सर्व निरोप मीं त्यानां सांगितला. तेव्हां त्यांनीं अश्रू ढाळीत तुम्हांस उलट निरोप पाठविला आहे तो मजबरोबर आलेला त्यांचा वीणा वाजविणारा **केयूरक** सांगेल." असें बोलून ती उगीच बसली. मग **केयूरक** ह्मणाला, बाईसाहेब! देवी कादंबरी तुह्मास दृढ आलिंगन करून विनंति करीत आहे कीं, "**तरलिके**बरोबर जो तूं निरोप पाठविला हा का वडील माणसांच्या मर्जीकरितां आहे, का माझ्या मनाची परीक्षा पहाण्याकरितां आहे, का मी खुशाल घरीं राहिलें ह्मणून माझी निंदा आहे, का मजवर हा कोप आहे! काय आहे तरी काय? हें मला समजत नाहीं. माझें अंतःकरण तुजविषयीं किती स्नेहभरित आहे, हे तूं जाणतच आहेस. असें असतां असा कठोर

निरोप पाठविण्यास तुला कसें कांहीं वाटलें नाहीं. तूं स्वभावतः मधुर भाषणें करणारी असून असलें अप्रिय व कठोर भाषण करण्यास तुला कोणीं शिकविलें! तुझ्या दुःखानें अगोदरच मी दुःखी आहें. आपल्या माणसांचें मन दुःखी असल्यावर मग सुखाची आशा कोठची? व शांति तरी कोठची? संभोग सुखें कोठचीं व हास्यविनोद तरी कोठचे? ज्यानें माझ्या प्रियसखीची अशी दशा केली त्या मेल्या मदनाचें कोडकौतुक मी कशाला पुरवूं? सूर्याच्या विरहानें कमलिनी म्लान झाल्या असतां त्यांच्या सहवासानें राहणाऱ्या अज्ञानी चक्रवाकी देखील सुखाचा त्याग करितात, मग मजसारखीचें काय नवल? प्रिय विरहानें दुःखित झालेली व परपुरुषाचें दर्शन वर्ज करणारी अशी माझी प्रिय सखी या हृदयांत वास करीत आहे, त्या ठिकाणीं इतर पुरुषाचा प्रवेश कसा मी होऊं देईन? माझी प्रिय सखी विरहानें दुःखित राहून व्रत नियमांनीं आपलें शरीर कृश करून कष्ट भोगीत आहे, अशा वेळेस तिच्या दुःखाकडे लक्ष न देऊन आपल्या सुखाकरितां पाणिग्रहण सुखाची इच्छा करणें योग्य आहे काय? अशानें मला सुख कोठून होणार? तुझ्या स्नेहामुळें ह्या वयास विरुद्ध जें स्वातंत्र्य तें मीं स्विकारिलें. नांव लौकिकाकडे कानाडोळा केला, मर्यादशीलपणा सोडला, वडील माणसांच्या ह्मणण्यास मान दिला नाहीं, लोकोपवादाचें भय सोडिलें आणि स्त्रियांस भूषण जी लज्जा तिचाही त्याग केला. इतकें जिणें केलें, ती आतां असें करण्यास कशी बरें प्रवृत्त होईल? तर मी तुला आतां हात जोडतें, तुझ्या पाया पडतें, मजवर कृपा कर, तूं एकटीच वनांत गेली नाहींस तर माझ्या जीवितासह गेली आहेस हें लक्ष्यांत ठेव, आणि पुन्हां असली गोष्ट स्वप्नांत देखील आणूं नको." असें सांगून केयूरक उगीच बसला.

याप्रमाणें भाषण ऐकिल्यावर महाश्वेतेनें बराच वेळ विचार करून, "तूं आतां जा मीच स्वतां येऊन जें करणें तें करीन," असें त्यास सांगितलें. तो गेल्यावर ती चंद्रापीडास ह्मणाली, महाराज, "आपण मजबरोबर चलावें अशी माझी इच्छा आहे. हेमकूटपर्वत

फार रमणीय आहे. तेथें **चित्ररथ** गंधर्वाची **विचित्र** नांवाची राजधानी आहे; गंधर्वलोक फार मनोहर आहे. त्या ठिकाणीं थोर मनाची माझी सखी **कादंबरी** आहे; तिचीही भेट होईल. जर आपणास येण्याचे श्रम वाटत नसतील, किंवा आपल्या कामाची कांहीं हरकत होत नसेल, किंवा अपूर्वस्थळ पाहण्याविषयीं आपणास कौतुक वाटत असेल, माझ्या ह्मणण्यास मान द्यावा असें आपणास वाटत असेल, व मजवर अनुग्रह करावा असें मनांत येत असेल तर माझी प्रार्थना निष्फळ करूं नये. सर्व रमणीय पदार्थांचा निधिच! अशा हेमकूटपर्वतावर मजबरोबर चलावें, आणि माझ्यांत व जिच्यांत बिलकूल अंतर नाहीं अशा माझ्या **कादंबरीची** भेट घेऊन, तिच्या मनांत जें वेड शिरलें आहे तें दूर करावें व आजचा दिवस तेथें राहून उद्यां पाहिजे तर परत यावें. कारणावांचून प्रेम करणाऱ्या महाराजाच्या दर्शनानें दुःखांधकारानें माझें चित्त म्लान झालें होतें तें पुन्हां टवटवीत झाल्यासारखें झालें आहे. मी आपला दुःखरूपी वृत्तांत आपणास कळविला तेव्हांपासून माझा शोकही मला सहन करण्याजोगा झाला आहे. सज्जनांचा समागम दुःखित जनासही रमवितो. आपल्यासारख्या थोर पुरुषांचा उदय दुसऱ्यास सुख देण्यासच असतो." असें **महाश्वेतेचें** भाषण ऐकून **चंद्रापीड** तीस ह्मणाला, "हे भगवति! आपलें दर्शन झाल्यापासून मी आपला झालों आहें, याकरितां मनांत शंका न आणतां आज्ञा करावी." असें बोलून तो तिजबराबर हेमकूटपर्वतावर जाण्यास तयार झाला.

नंतर **महाश्वेतेबरोबर** **चंद्रापीड** चालला असतां जातां जातां **हेमकूट** पर्वतावर जाऊन गंधर्व राज्याच्या वाड्यावरून सुवर्ण तोरणांनीं सुशोभित असे सात चौक ओलांडून कन्याजनांच्या अंतःपुराजवळ आला. **महाश्वेता** दृष्टीस पडतांच सुवर्णाच्या काठ्या धारण करणारे द्वारपाळ धांवत पुढें आले. मग त्यांनीं दाखविलेल्या मार्गानें **महाश्वेतेबरोबर** **चंद्रापीड** आंत गेला. तों त्या ठिकाणीं हजारों स्त्रियांचीं गर्दी होती, त्यामुळें हा लोक स्त्रीमयच आहे,

किंवा पुरुष रहित ही निराळी सृष्टिच आहे ! असें त्यास वाटलें. तरूण स्त्रियांच्या लावण्याची प्रभा चोहींकडे पडून दशदिशा व्याप्त झाल्या होत्या. त्यामुळें ही अमृताचीच वृष्टि होत आहे असें त्यास वाटलें. त्या ठिकाणीं जिकडे तिकडे चंद्रमंडळेंच उगवलीं आहेत काय ! व सर्वत्र चंद्रिकाच पसरली आहे काय ! असें दिसत होतें. स्त्रियांच्या अंगावरील भूषणांची प्रभा चमकत होती. जिकडे पहावें तिकडे विलास व साहजिक हावभाव दिसत होते. त्यामुळें शृंगारमय ! सौंदर्यमय ! मदनमय ! कौतुकमय ! प्रेममय ! असें तें अंतःपूर त्याच्या दृष्टिस पडलें. तेथील त्या सुंदर कन्यांच्या मुख-कांतीमुळें चंद्रबिंबांची वृष्टिच होत आहे ! कटाक्ष विक्षेपामुळें नीलकमलांची वृष्टि होत आहे ! भ्रूभंग विलासामुळें हीं का मदन धनुष्यें लवत आहेत. हास्य प्रभेमुळें ही का वसंतलक्ष्मीच प्रकटली आहे ! सुगंधयुक्त श्वास चालल्यामुळें हे का मलयवायुच चालले आहेत ! आरक्त हस्तकमलांमुळें हे का मदनाचे हजारों बाणच सुटत आहेत ! अलंकारांवरील नवरत्नांचे किरण एकमेकांत मिसळल्यामुळें ह्या ठिकाणीं हीं का इंद्र धनुष्येंच पडलीं आहेत ! असें भासत होतें.

अशा प्रकारच्या अंतःपुरांत **चंद्रापीड** चालला असतां **कादंबरी-च्या** दासींचीं भाषणें त्याच्या कानीं पडलीं. “ कोणी ह्मणते, **लवंगिके** ! केतकीच्या परागांनीं हरपररेवडीच्या झाडांला आळीं कर. कोणी ह्मणते, **सागरिके** ! गंधोदकाच्या हौदांत रत्नांची वाळू टाक. कोणी ह्मणतें, कृतिम कमलिनींवर केशराच्या रंगानें चक्रवाक पक्षांचीं जोडपीं काढ. अगे **मकरिके** ! कर्पुरवृक्षाच्या रसानें पात्रें सुवासिक कर. अगे **रजनिके** ! घरांतील विहीरीजवळच्या तमाल वृक्षांच्या अंधःकारांत रत्नदीप ठेव. अगे **कुमुदिके** ! दाळींबास पक्ष्यांचा उपद्रव होऊं नये ह्मणून त्यांस मोत्यांच्या जाळ्यांनीं झांकून टाक. **निपुणिके** ! रत्नांच्या पुतळ्यांच्या स्तनांवर केशराच्या रंगानें वेलबुटी काढ. अगे **उत्पलिके**! सुवर्णाच्या झाडणीनें केळींच्या मंडपांतल्या पांचूचे ओटे झाडून स्वच्छ कर. अगे **नलिनिके** ! ह्या

मोरांस कारंज्याच्या वरांत ने. अगे चूतलतिके ! पिंजऱ्यांतल्या कोकिळांस आंब्यांचा मोहोर खावयास घाल. अगे लवंगिके ! चकोरपक्ष्यांस पिंपळ्यांचे तुकडे खावयास दे. अगे मधुरिके, पुष्पांचे अलंकार कर. अगे मधुरिके, संगीत शाळेंत किन्नरांचें जोडपें सोड. अगे कंदलिनी ! क्रिडा पर्वतावर चक्रवाकपक्ष्यांचें झोडपें सोड. अगे हरणिके, पिंजऱ्यांतील रावूंस व सारिकांस बोलावयास व गावयास शिकीव. " अशीं अनेक प्रकारचीं भाषणें ऐकत तो कादंबरीच्या मंदिराजवळ गेला. त्या ठिकाणीं कादंबरीच्या सेवेंत तत्पर अशा पुष्कळ दासी उभ्या होत्या. त्यांनीं झटदिशी दोन्ही बाजूकडे होऊन रस्ता सोडला. त्यांच्या अंगावरील रत्नजडीत भूषणांचा प्रकाश चकाकत असल्यामुळें मधून स्वच्छप्रवाहच वाहत आहे काय असें वाटलें ! मग त्या मार्गानें तो चालला तों ज्या ठिकाणीं पुष्कळ द्वारपालिका उभ्या होत्या असा कादंबरीचा बसावयाचा श्रीमंडप त्याचे दृष्टीस पडला. त्या मंडपाच्या मध्यभागीं पलंगावर कादंबरी ऊशीवर कोंपर टेंकून बसली होती, व तिच्या सभोंवतीं पुष्कळ स्त्रिया बसल्या होत्या. तिच्या सकुमार तनूची कांति चहूंकडे झळकत होती. त्यांमुळें तिच्यावर चवऱ्या वारणाऱ्या दासी तेजोरूपीजलांत पोहतच आहेत काय ! असें भासत होतें. तिची प्रतिबिंबें जमिनींत, भिंतींत, खांबांत व आरशांत पडल्यामुळें त्यांनीं तिला आपल्या हृदयांतच धारण केली आहे काय ! असें वाटत होतें. त्या मंडपांत अनेक प्रकारचीं चित्रें हुबेहूब काढलेलीं असल्यामुळें सर्व त्रैलोक्यांतील लोक आश्चर्यानें तिला पहाण्याकरितांच आले आहेत काय ! असें भासत होतें. सुंदर स्त्रियांच्या भूषणाचे मधुर शब्द ऐकून आपले पिसारे पसरून मयूर नृत्य करीत असल्यामुळें तो राजवाडा आपले हजारों डोळे उघडून कौतुकानें कादंबरीचें सौंदर्यच बघत आहे काय ! असें वाटत होतें. तिच्या सख्या दिव्यदृष्टी प्राप्त झाल्यामुळेंच काय पापणीस पापणी न लावतां तिच्या आज्ञेची वाट पहात उभ्या होत्या ! तिचे सर्व अवयव रेखलेले असून त्यावर उत्तम वस्त्रालंकार असल्यामुळें फारच शोभा दिसत होती ! ती

आपल्या दासीबरोबर अनेक प्रकारचीं विनोदपरभाषणें बोलत होती, व समोर बसलेल्या **केयूरकास** तो कोण? कोणाचा मुलगा? त्याचें रूप कसें आहे! त्याचें वय किती आहे! तो काय बोलत होता? तुझें व त्याचें काय बोलणें झालें! **महाश्वेतेचा** व त्याचा परिचय कसा झाला! तो येथवर येईल काय! याप्रमाणें, **चंद्रापीडाचें** गुणानुवर्णन करणाऱ्या, **केयूरकास** वारंवार विचारीत होती.

याप्रमाणें **कादंबरी** दृष्टीस पडतांच चंद्रोदयानें समुद्रोदक जसें उल्लास पावतें तसें **कादंबरीच्या** अवलोकनानें **चंद्रापीडाचें** अंतःकरण झालें! त्यास असें वाटलें कीं, ब्रह्मदेवानें माझीं सर्व इंद्रियें नेत्रमय केलीं असतीं तर बरें होतें! या नेत्रांनीं पूर्वजन्मीं असें कोणतें पुण्य केलें असेल तें असो! ह्मणून ही सुंदरी माझ्या दृष्टीस पडली. सर्व रमणीय पदार्थांचें एकस्थानच असें **कादंबरीचें** स्वरूप ब्रह्मदेवानें फारच अप्रतिम उत्पन्न केलें! असें रूप उत्पन्न करण्यास त्याला इतकी उत्तम सामुग्री कशी व कोठें मिळाली असेल तीं असो! असा विचार करीत चालला आहे तों **कादंबरीची दृष्टी चंद्रापीडावर** गेली. त्यास पहातांक्षणींच केयूरकानें वर्णन केलेला पुरुष हाच असावा, असें त्याच्या सौंदर्यावरून **कादंबरीच्या** लक्षांत आल्यामुळें तिची दृष्टि तत्काळ प्रफुल्लित झाली, व ती फार वेळ त्याजकडे टक लावून पाहूं लागली. त्यास पहातांक्षणींच **कादंबरीच्या** अंगावर अगोदर रोमांच उभे राहिले! ती उठूं लागली तों तिच्या अंगावरील भूषणांचा मधुर शब्द उठला. त्यानंतर **कादंबरी** उठली! तिच्या अंगास घर्म सुटला. मांड्यास व हृदयास कंप सुटला, श्वासोच्छ्वास चालल्यामुळें स्तनावरील पदर हालूं लागला. तिच्या नेत्रांवाटें आनंदाश्रु वाहूं लागले, अंतःकरणांत लज्जा उत्पन्न झाली, असे अनेक मदनविकार तिचे ठायीं उत्पन्न झाले. **चंद्रापीडाची** ही अशाच प्रकारची अवस्था झाली.

फार दिवसांनीं महाश्वेतेस पाहिल्यामुळें उत्कंठीत झालेली **कादंबरी** मोठ्या कष्टानें कांहीं पावलें चालत गेली व तिनें तिला आलिंगन केलें. महाश्वेतेनें ही तिला दृढालिंगन केलें. मग ती **का-**

दंबरीस ह्मणाली, "भरतखंडांत समुद्रवलयांकित पृथ्वीचें राज्य करणारा, सर्वप्रजांचें यथायोग्य पालन करणारा असा तारापीड नांवाचा विख्यात राजा आहे, त्याचा पुत्र हा चंद्रापीड आहे. दिग्विजयाच्या निमित्तानें ह्या राजपुत्राचें या देशाकडे येणें झालें. याचें दर्शन झाल्यापासून हा मला आप्तासारखा वाटत आहे. सर्व संग परित्याग करून मी विरक्त झालें आहें तरी ह्यानें आपल्यां सद्गुणांनीं माझी चित्तवृत्ति आकर्षून घेतली. चतुर असून अनुकूल वागणारा निमित्तावांचून मैत्री करणारा व निष्कपटपणानें प्रेम ठेवणारा असा पुरुष फारच दुर्लभ होय! याकरतां याला पाहून ब्रह्मदेवाचें निर्माण करण्याचें चातुर्य, रूपाची अप्रतिमता, लक्ष्मीस राहण्यास योग्य स्थान, पृथ्वीस योग्य पति मिळाल्यामुळें सौख्य, मनुष्य लोकांस देव लोकांपेक्षां श्रेष्टता, स्त्रियांच्या नेत्रांची सफलता, आणि सर्व कलांचा एकत्र समागम, हीं सर्व तुझ्या दृष्टीस पडतील! ह्मणून मी याला येथें बळेंच आणलें आहे. तुझ्या सौजन्याची ही मी याच्या जवळ खात्री केली आहे. अशा सुमनुष्याचें अपूर्व दर्शन समजून लज्जेस धरून बसूं नको! ह्याचा परिचय नसल्यामुळें यावर अविश्वास ठेवूं नको! ह्याचा स्वभाव माहीत नसल्यामुळें मनांत बिलकूल शंका धरूं नको! परकीयपणा सोडून जशी माझ्याशीं वागतेस तशीच याच्याशीं वाग! हा तुझा मित्र, बंधु किंवा आप्त आहे असें समजून अशा प्रकारें कादंबरीशीं महाश्वेतेचें भाषण होत आहे तों, चंद्रापीड पुढें झाला आणि त्यानें कादंबरीस नमस्कार केला. तेव्हां कादंबरीनें सलज्ज होऊन व किंचित हास्य करून वक्रदृष्टीनें चंद्रापीडाकडे पाहिलें. त्यावेळीं इतर कन्याही चंचल दृष्टीनें चंद्रापीडाकडे पहात उभ्या राहिल्या. मग कादंबरीनेंही चंद्रापीडास नमस्कार केला, व नंतर ही महाश्वेतेसह आपल्या पलंगावर बसली. ज्याला सुवर्णाचे पाय आहेत, व ज्यावर शुभ्र वस्त्र घातलें आहे, अशा सिंहासनावर चंद्रापीड बसला. तेव्हां कादंबरीचा चित्ताभिप्राय जाणणाऱ्या द्वारपालिकांनीं वीणा, वेणु, मृदंग, इत्यादि वाद्यांचे शब्द, गायनाचे स्वर, स्तुतिकरणारांचे जयशब्द,

इत्यादिकांचें निवारण केलें. नंतर **कादंबरीनें** उठून दासींनीं आणलेल्या उदकानें महाश्वेतेचे पाय धुतले. आणि आपल्या पदरानें ते पुसून ती पुन्हा पलंगावर बसली. मग **कादंबरीचा** जीव की प्राण अशा मदलेखेनें मोठ्या आग्रहानें **चंद्रापीडाचे** पाय धुतले.

नंतर **कादंबरीच्या** कर्णांतील भूषणें लोंबत होतीं तीं **महाश्वेतेनें** आपल्या हातांनीं नीट केलीं आणि चवऱ्या हालत असल्यामुळें तिचे केंस इकडे तिकडे झाले होते ते नीट सांवरले. नंतर तिनें तिला अनेक खुशालीचे प्रश्न विचारिले. तेव्हां **कादंबरीनें, महाश्वेता** संकटांत असतां आपण खुशाल घरीं राहिलों, ह्मणून आपणास अपराधी मानून व लज्जित होऊन तीस कशी तरी उत्तरें दिलीं. आणि **महाश्वेतेच्या** दुःखानें दुःखित होऊन खिन्नपणानें ती तिच्याकडे पहात बसली. नंतर कांहीं वेळानें ती **चंद्रापीडाकडे** पाहूं लागली व त्याच्या मनमोहकरूपास अगदीं मोहित होऊन गेली. अशा प्रकारें कांहीं वेळ गेल्यावर **कादंबरी महाश्वेतेस** विडा देऊं लागली. तेव्हां **महाश्वेता** ह्मणाली, ‘ सखे **कादंबरी** ! आपणां सर्वांस आपल्या घरीं आलेल्या नवीन पाहुण्याचा आदरसत्कार केला पाहिजे ! याकरितां अगोदर पाहुण्यास विडा दे ! ’ असें तिचें भाषण ऐकिल्यावर **कादंबरी** तोंड फिरवून ह्मणाली, ‘ माझी यांची ओळख नसल्यामुळें मला यांस विडा देण्यास लाज वाटतें ! याकरितां तूंच बाई हा विडा त्यांस दे ! ’ असें जरी तिनें ह्मटलें तरी **महाश्वेतेनें** तिलाच तांबूल देण्याविषयीं आग्रहानें सांगितलें. पुनः पुनः तिनें सांगितल्यामुळें **कादंबरी चंद्रापीडास** तांबूल देण्यास प्रवृत्त झाली. तेव्हां नवीनच प्रसंग असल्यामुळें **कादंबरीच्या** अंगास कंप व घर्म सुटला अशी तिची अवस्था झाली. नंतर लज्जेनें **महाश्वेतेच्या** तोंडाकडे पहात **चंद्रापीडास** तांबूल देण्याकरितां तिनें आपला हात पुढें केला, व त्याच्या सुलक्षणयुक्त हातांत तांबूल दिला. त्यावेळीं “आजपासून माझें जीवित आपल्या हातीं आहे!” हें समजाविण्याकरितांच काय तिनें तांबूलरूपानें तें त्यास अर्पणच केलेंसें दिसलें! तांबूल देतांना तिच्या हातांतील रत्नकंकण पडलें, ते देखील

तिला समजलें नाहीं! नंतर दुसरा विडा घेऊन तिनें **महाश्वेतेस** दिला.

इतक्यांत ज्याची चोंच पोंवळ्यासारखी लाल आहे, व ज्याचे पंख पाचूप्रमाणें हिरवेगार आहेत, असा एक राघू जिच्या मागें लागला आहे, अशी एक सारिका घाई घाईनें येऊन **कादंबरीस** ह्मणाली, "हे गंधर्व राजकन्ये, सौंदर्याचा मोठा अभिमान बाळगणारा हा दांडगा **शुक** माझे पाठीस लागला आहे. ह्या अधमाचें तूं निवारण कां करीत नाहींस? हा मला फारच त्रास देत आहे. याकरितां तूं जर इकडे लक्ष देत नाहींस तर मी आपला प्राण त्याग करीन, हें मी खचित सांगतें." असें त्या सारिकेचें भाषण ऐकून **कादंबरी** हंसली. **महाश्वेतेच्या** हें कांहींच लक्ष्यांत न आल्यामुळें ही काय ह्मणते आहे असें तिनें **मदलेखेस** विचारिलें. तेव्हां ती ह्मणाली, 'ही **कादंबरीनें** बाळगलेली **कालिंदी** नांवाची सारिका आहे हिचा परिहास नांवाच्या **शुकाशीं** तिनें विवाह संबंध करून दिला. आज पहांटेस ह्या **शुकास, कादंबरीची** दासी **तमालिका** इजबरोबर एकांतीं बोलतांना हिनें पाहिलें. तेव्हांपासून ही ईर्षा व कोप यांनीं युक्त होऊन त्या **शुकाकडे** जात नाहीं, त्याजबरोबर बोलत नाहीं, व त्याजकडे पहात देखील नाहीं. आह्मी सर्व जणींनीं कितीही सांगितलें सवरलें तरी तिची अजून समजूत होत नाहीं! **मदलेखेचें** असें भाषण ऐकून **चंद्रापीड** किंचित् हंसून विनोदानें ह्मणाला, 'खरेंच राजवाड्यांत सेवकांच्या तोंडावाटें हेंच जिकडे तिकडे ऐकूं येत आहे बाहेर लोकही हेंच बोलत आहेत कीं, देवी**कादंबरीच्या तमालिका** दासीची कामना करणारा परिहास **शुक** कामाधीन होऊन, गेलेल्या दिवसास देखील जाणत नाहीं! दुराचारी व स्वस्त्रीचा त्याग करणारा असा हा **शुक** आहे. हा दासीशीं सक्त आहे. ही गोष्ट देवी**कादंबरीला** कशी आवडते कोण जाणे? देवी**कादंबरीची** या बिचाऱ्या **कालिंदीवर** पहिल्यापासून नावड असावीशी वाटते! ह्मणूनच तिनें ह्या दांडग्या **शुकाशीं** हिची गांठ पाडली. ह्या बिचारीनें आतां काय करावें? स्त्रियास सवतमत्सर असणें फारच वाईट! तोच क्रोधास व विरक्त-

पणास कारण होतो ! ही मोठी धैर्याची ह्मणावयाची ! कारण हिला सवतमत्सराचें इतकें दुःख असतां हिनें अद्यापि विष भक्षण केलें नाहीं ! अग्नींत प्रवेश केला नाहीं ! किंवा अन्न खाण्याचें सोडलें नाहीं ! स्त्रियांचा अपमान करणारी या सारखी दुसरी गोष्ट कोणतीच नाहीं. ह्या शुकानें आर्जव केल्यावर राग सोडून देऊन जर हिनें ह्यावर विश्वास ठेवला असेल तर हिला धिक्कार असो ! हिला जवळ सुद्धां उभी राहूं देऊं नये ! आपल्या अपमानाची जिला लाज वाटत नाहीं तिच्याशीं कोणी भाषण करावें ? तिचें नांव देखील कोणी घेऊं नये ! "

असें चंद्रापीडाचें विनोदपर भाषण ऐकून कादंबरी व इतर सर्व स्त्रियां हंसल्या. तेव्हां तो शुक ह्मणाला, " हे राजपुत्रा, जरी ही चपल आहे, तरी ती कोणाच्यानें फसली जाणार नाहीं अशी आहे ! अशीं वक्रभाषणें व विनोदपर भाषणें तिला माहीत आहेत. राजवाड्यांत राहून ही पुरी शहाणी झालेली आहे. हिजपुढें असल्या भाषणाचा कांहीं उपयोग व्हायाचा नाहीं. ही मधुर भाषिणी कोप व प्रसाद यांचीं कारणें व प्रसंग सर्व जाणते आहे."

याप्रमाणें तो शुक बोलत आहे, इतक्यांत एक चोपदार येऊन महाश्वेतेला नमस्कार करून ह्मणाला, " बाईसाहेब ! देवचित्ररथ आणि देवीमदिरा हीं दोघे आपणास भेटावयाकरितां बोलावीत आहेत." असें त्याचें भाषण ऐकून महाश्वेता तिकडे जाण्यास तयार झाली. त्यावेळेस ती कादंबरीस ह्मणाली, 'सखे कादंबरी ! राजपुत्र चंद्रापीड यानें कोठें रहावें तें सांग !' असें महाश्वेतेचें भाषण ऐकून कादंबरी आपल्या मनांत ह्मणाली कीं, " ह्या चंद्रापीडास हजारों स्त्रियांच्या हृदयमंदिरांत राहण्यास जागा पुरत नाहींत काय ?" मग ती हंसून उघड ह्मणाली, " सखे महाश्वेते ! तूं असें काय विचारतेस ? त्यांचें दर्शन झाल्यापासून ह्या माझ्या शरिराचे देखील तेच धनी झाले आहेत ! मग ह्या मंदिराच्या सर्व वैभवाचे व सर्व सेवकांचे तेच धनी आहेत ह्मणून सांगावें ! त्यांना जेथें राहणें रुचत असेल किंवा तुला जेथें वाटत असेल त्या ठिकाणीं

त्यांना राहण्यास जागा द्यावी." असें **कादंबरीचें** भाषण ऐकून **महाश्वेता** ह्मणाली, 'तुझ्या प्रमदवनांतील क्रीडापर्वतावरच्या मणिगृहांत यांस राहण्यास जागा द्यावी, असें मला वाटतें.' असें **कादंबरीस** सांगून ती निघून गेली. **चंद्रापीडही** तिजबरोबरच बाहेर पडून **केयूरकानें** दाखविलेल्या मार्गानें क्रीडा पर्वतावरील मणिगृहांत गेला. त्याच्या मागून अनेक वाद्यें वाजविणाऱ्या व गायनकला जाणणाऱ्या गंधर्वकन्या **चंद्रापीडास** कर्मणूक देण्याकरितां **कादंबरीनें** त्या ठिकाणीं पाठविल्या.

**चंद्रापीड** गेल्यावर **कादंबरीनें** आपल्या सख्यांस तेथून जावयास सांगून बरोबर थोडक्या सख्या घेऊन ती आपल्या मंदिराच्या गच्चीवर चढली आणि शय्येवर जाऊन पडली. तेव्हां जवळ सख्या होत्या त्या तिला कर्मणूकीकरितां कांहीं गोष्टी सांगत बसल्या असता, **कादंबरी** डचकून सावध झाल्यासारखी होऊन आपली निंदा करून ह्मणाली, नम्रपणा, आचार, विचार, कुलशील, मर्यादा या सर्वांचा विचार न करितां हें मी काय केलें? असें तिच्या मनांत येऊन ती आपल्या जागीं अगदीं शरमून गेली. ती आपल्या मनांत ह्मणाली, कांहीं एक शंका न धरितां आपली चंचलता लोकांस दाखविणारी व मोहानें अंध अशी मी झालें. जो पूर्वीं कधीं ऐकिला न देखला अशा पुरुषाकडे मनाची प्रवृत्ति करण्यास मी कांहींच शंका धरिली नाहीं! जवळच्या बायका मला काय ह्मणत असतील? हेंही मी मनांत आणिलें नाहीं. बरे, त्या पुरुषाचें मन मजवर कितपत आहे याचीही म्यां परीक्षा केली नाहीं. वडील माणसाचें भय व लोकोपवादाचें भय हेंही मी मनांत बाळगलें नाहीं! सख्या, सेवक, मला किती हंसत असतील! **महाश्वेता** दुःखी आहे हें देखील माझ्या लक्षांत राहिलें नाहीं! हा माझा उद्दामपणा स्थूलबुद्धि मनुष्याच्या देखील लक्ष्यांत येण्यासारखा आहे, मग मदन चेष्टांचा जिला अनुभव आहे अशी महाश्वेता व चतुर सख्या यांच्या ध्यानांत आला असेल ह्मणून काय सांगावें? माझ्या अल्प पुण्यानें असें घडून येऊन मी सर्वस्वी बुडालें! मला मरण येईल तर बरें,

परंतु हें लज्जाकारक जीवित धारण करणें नको! हें वर्तमान ऐकून आईबाप व गंधर्वलोक मला काय ह्मणतील? आतां याला मी काय करावें, कोणता उपाय करावा, ह्मणजे माझें हें कृत्य झांकलें जाईल? ह्या दुष्ट इंद्रियांचें चापल्य कोणाला सांगावें? दुष्ट मदनानें मला पराधीन केल्यामुळें काय करावें व कोणीकडे जावें हें कांहींच मला समजत नाहीं. महाश्वेतेचें दुःखरूपी प्रकार पाहून मी तशी प्रतिज्ञा केली! सख्यांच्या पुढें ही तसें बोललें! आणि **केयूरका** बरोबरही तसा निरोप पाठविला! मला हें समजत नाहीं कीं, मज मंदभाग्ये पुढें ह्या वंचक **चंद्रापीडास** कोणी आणिलें? दुष्ट दैवानें? का मेल्या मदनानें? का पूर्वपातकसंचयानें? का दुष्ट मृत्यूनें! कोणीं आणिलें असेल तें समजत नाहीं! जो कधीं ऐकिला नाहीं, पाहिला नाहीं व ठाऊक नाहीं, असा हा **चंद्रापीड** माझी विटंबना होण्याकरितां येथें आला आहे! ज्याचें नुसतें दर्शन होण्याचाच काय तो उशीर! त्याबरोबर इंद्रियांनीं जसें काय मला बांधूनच त्याच्या स्वाधीन केलें! किंवा मदनानें आपल्या बाणांच्या पिंजऱ्यांत घालूनच त्याला अर्पण केलें! अनुरागानें दासी करूनच मला त्याच्या पुढें नेलें! जें झालें तें झालें! परंतु आतां त्या चपळ धूर्तांचा मला संबंध नको! याप्रमाणें **कादंबरीनें** कांहीं वेळ विचार केला. अशा प्रकारें तिचा संकल्प अंतःकरणांत राहणाऱ्या चंद्रापीडास कळल्या मुळेंच तो रागावून चालला असतां, त्याला अडविण्याकरितांच कीं काय, किंवा त्याचा संबंध नको ह्मणण्याबरोबर जीवित बाहेर जाण्यास तयार होऊन कंठापर्यंत येऊन ठेपल्या मुळेंच काय, किंवा तुझ्या धैर्याबरोबर प्राणांचेंही हरण करतो, अशी मदनानें निर्भत्सना केल्या मुळेंच काय, **कादंबरीचें** अंतःकरण फिरून **चंद्रापीडाकडे** लागलें. आणि त्याच्या प्रेमानें तिला स्वाधीन करून टाकल्यामुळें ती पराधीन होऊन खिडकीच्या जाळींतून त्या क्रिडापर्वताकडे पहात उभी राहिली.

तिकडे **चंद्रापीड कादंबरीचें** दुसरें हृदयच काय अशा मणिमय मंदिरांत गेल्यावर ज्यावर गालिचा पसरून लोड तक्के ठेविले आहेत,

अशा सिलातलावर स्वछंदपणानें पडला. केयूरक त्याचे पाय रगडीत बसला. सभोंवतीं गंधर्वकन्या गीत गात व वाद्यें वाजवीत बसल्या. परंतु चंद्रापीडाचें अंतःकरण कादंबरीच्या चिंतनांत गर्क झालें होतें. तो आपल्या मनांत ह्मणाला, " गंधर्व राजकन्या कादंबरी हिचे हे काय सहज विलास ह्मणावे! का आराधन न करितां प्रसन्न झालेल्या मदनानें असले प्रकार मजकरितां तिजकडून करविले? काय असेल तें असो! ती तर मजकडे वक्रदृष्टीनें पहात होती! मी तिजकडे पाहिलें तेव्हां हास्यमुद्रा करून तिनें लज्जेनें तोंड फिरविलें! असे अनेक तिचे विलास माझ्या दृष्टीस पडले! किंवा मनुष्यस्वभावास सुलभ जी विषयसुखेच्छा तीच हजारों कल्पना उत्पन्न करून मला फसवीत आहे कीं काय कोण जाणे? तरुणपणांत मदनविकार उत्पन्न झाल्यावर विवेक नष्ट होतो! तरुणाची दृष्टि अज्ञानानें युक्त झाल्यावर अल्प असलें तरी मोठें दिसतें! अल्प स्नेह असला तरी तो मोठा वाटतो आणि कवि कल्पनेप्रमाणें मनाची चपलता अनेक तर्क चालविते! स्वप्नाप्रमाणें अनेक मनोरथ उत्पन्न करिते, आणि जी वस्तू प्राप्त होण्यासारखी नसते तिजविषयीं देखील आशा उत्पन्न करिते! असो, ह्या मनाला आतां व्यर्थ आयास तरी कां द्यावे? कादंबरीचें खरोखरच मजवरच अंतःकरण असेल तर मदनच सर्व संशय दूर करून याचा उलगडा करील!" असा विचार करून चंद्रापीड उठून बसला आणि तेथें आलेल्या गंधर्वकन्याबरोबर द्यूतक्रीडा, वाद्यें, गायन इत्यादि प्रकारांनीं त्यानें करमणूक करून घेतली. पुढें कांहीं वेळा नंतर प्रमदवन पाहण्याच्या उद्देशानें तेथून उठला आणि तें पहात पहात क्रीडापर्वतावर चढला.

चंद्रापीडास पहातांक्षणींच काम पीडित होऊन जाळीदार खिडकी सोडून, 'महाश्वेता अजून कां येत नाहीं बाई!' असें निमित्त करून कादंबरी त्या बंगल्यावरच्या शिखरावर चढली आणि चंद्रापीडाकडे पाहूं लागली. त्यावेळीं दासीनें तिच्या मस्तकावर चंद्रमंडळासारखें सुवर्णाच्या दंडाचें शुभ्र छत्र धरिलें,

व कांहीं दासी तिच्या मस्तकावर शुभ्र चवऱ्या वारीत उभ्या राहि-ल्या. कैलास पर्वतावर भगवती पार्वती चढली असतां जशी दिसते तसी ती दिसूं लागली. कादंबरीच्या मस्तकावरच्या पुष्पावर सुगंध लोभानें भ्रमर समुदाय झुलत असल्यामुळें दिवसास देखील काळ्या वस्त्रानें आपला चेहरा गुंडाळून चंद्रापीडाकडे जाण्याचा अभ्यासच करीत आहे काय असें भासत होतें. मदनतापानें वारंवार छत्रीच्या दांड्यास धरीत आहे! वारंवार तमालिकेच्या खांद्यावर हात ठेवीत आहे! व तिला अलिंगन करीत आहे! आणि वक्र-दृष्टीनें विलासपूर्वक चंद्रापीडाकडे पहात आहे, अशा अनेक शृंगार चेष्टा करीत ती चंद्रापीडाकडे पहात फार वेळ त्या ठिकाणीं उभी राहिली. तथापि तिला फार वेळ झालासें वाटलें नाहीं!

पुढें महाश्वेता परत आल्याचें वर्तमान द्वारपालिकेनें कादंबरीस कळविलें. तेव्हां ती त्या मंदिरावरून खालीं उतरली नंतर स्नानादि-कर्माविषयीं जरी तिची इच्छा नव्हती, तरी महाश्वेतेच्या संतोषास्तव तिनें सर्व कृत्यें केलीं. मग चंद्रापीडही क्रीडापर्वतावरच्या शिख-रावरून खालीं उतरला आणि कादंबरीच्या सेवकांनीं सर्व सिद्धता करून ठेविली होती, त्या ठिकाणीं त्यानें स्नानादिक सर्व दिवस कृत्यें केलीं. भोजन झाल्यावर चंद्रापीड मनोहर हिरळ्यागार लता, मंडपा खालच्या शिलातलावर बसला असतां एकाएकीं शुभ्र प्र-काश त्याच्या दृष्टीस पडला. त्यावेळीं स्वच्छोदकाप्रमाणें त्या प्रकाशानें सर्व दिवस धुवून स्वच्छ केलें आहे! किंवा दुग्धसमुद्रानें जिकडे तिकडे धुवून शुभ्र केलें आहे! असें दिसलें—आणि हा भगवान् चंद्रचंद्रिकेसहित भलत्याचवेळीं उदयास आला आहे काय! किंवा ही कारंजीं उडून त्यांच्या शुभ्र धारा चालल्या आहेत काय! किंवा वाऱ्यानें जिचे फवारे उडत आहेत अशी ही शुभ्र आ-काशगंगाच अवतरली आहे काय! असें भासलें. इतक्यांत जिच्या सभोंवती पुष्कळ कन्या आहेत व जिच्या मस्तकावर शुभ्र छत्र धरलें आहे, व जिच्या मस्तकावर चवऱ्या उडत आहेत, व जिनें आपल्या द्वारपालिकेचा हात धरला आहे, व सर्पाच्या शुभ्र कांतीप्रमाणें

शुभ्र, पातळ, हलकीं व मऊ अशीं दोन वस्त्रें हातांत घेऊन चालणा-
रा **केयूरक** जिला मार्ग दाखवीत आहे, मालती पुष्पाचे हारतुरे
घेऊन **तमालिका** जिच्या मागून येत आहे, अशा प्रकारें **कादंब-
रीची** प्रियसखी **मदलेखा तरलिकेसह** येत आहे, असें **चंद्रापीडा-
च्या** दृष्टीस पडलें; आणि **तरलीकेनें** तबकांत घेतलेला व शुभ्र
वस्त्रानें आच्छादित केलेला मौक्तिकहारही त्याच्या दृष्टीस पडला.
तो चंद्राचा बंधु ! का समुद्र मंथनकालचा अमृतावरचा फेंस ! का
समुद्रांतून निघालेल्या लक्ष्मीचें हास्य ! का मंदरपर्वताच्या घुसळण्या-
नें वेगळ्या झालेल्या चंद्राच्या कळा एके ठिकाणीं जुळून केलेला
अलंकार ! किंवा समुद्रांत प्रतिबिंबित झालेला हा तारागण ! किंवा
दिग्गजांनीं आपल्या सोंडांनीं उडविलेल्या तुषारांचा समुदाय ! किंवा
**कादंबरीच्या**रूपानें वश केलेल्या मुनिजनांच्या निर्मळ अंतःकर-
णांनीं निर्माण केलेला ! सर्व रत्नांचा केवळ गुरुच ! एके ठिकाणीं
जमलेला यशोराशिच ! चंद्रिकेचा केवळ जीवच ! शुभ्र तेजाची वृष्टि
करणारा ! असा तो हार त्याच्या दृष्टीस पडला. तेव्हां **चंद्रापी-
डाच्या** मनांत आलें कीं, चंद्रतेजाचा देखील पराभव करणारा असा
शुभ्र प्रकाश दृष्टीस पडला तो ह्या हाराचाच होय ! ती मदलेखा
आपणाकडेसच येत आहे, असें पाहून त्यानें उठून तिचा सत्कार
केला. मग मदलेखाजवळ येऊन त्याच पाचूच्या शिळेवर थोडा
वेळ बसली. नंतर उठून, तिनें सुगंधिक द्रव्यानें **चंद्रापीडास** उटी
दिली, बरोबर आणलेलीं शुभ्र वस्त्रें त्यास दिलीं. पुष्पांच्या माळा
त्याच्या गळ्यांत घातल्या, आणि त्याच्या मस्तकांत तुरा खोविला.
मग तो मौक्तिक हार हातांत घेऊन ती **चंद्रापीडास** ह्मणाली,
'महाराज ! ही आपली मनोहर आकृति पाहून आपणावर कोणाची
प्रीति जडणार नाहीं ? आपलें सौजन्य आह्मा सारिख्यास जवळ
करीत आहे. कारणावांचून स्नेह करणारे आपणासारखे थोर
पुरुष कोणास प्रिय वाटणार नाहींत ? अथवा प्रथम दर्शन होतांच
आपल्या सुंदर आकृतीनेंच आमचा आपणावर विश्वास उत्पन्न
केला ! सर्व जगांत ज्यांचा महिमा प्रख्यात आहे अशा आपणासा-

रख्या पुरुषांचा जितका सत्कार करावा तितका थोडाच आहे! असो, माझ्या प्रियसखीचें असें ह्मणणें आहे कीं, आपण होऊन ज्यानें माझें अंतःकरण हरण केलें, व जो माझे जीविताचा धनी झाला, त्याला म्यां काय द्यावें? ज्यानें पहिल्यानें स्वतः येथें येण्याचा मोठा उपकार केला, त्यावर प्रत्युपकार कोणता करावा? ज्यानें प्रथमतःच दर्शन देऊन जीविताचें साफल्य केलें, त्याचें आगमन कशानें सफल करावें? माझी प्रिय सखी **कादंबरी** ह्या हाराच्या मिषानें आपली प्रीति आपणास अर्पण करीत आहे! यांत ती आपली संपति दाखवित आहे, असें नाहीं! आपलें दास्यत्व करणारीस 'ही हें भलतेंच करिते,' असें कोणी ह्मणणार नाहीं. आमची सर्वांची अशी खातरी आहे कीं, आपणाला आपलें जीवित अर्पण करून आमची सखी फसली असें कधींही होणार नाहीं! व जीवित अर्पण केल्याबद्दल तिलाही पश्चाताप होणार नाहीं! सुजनांची कृति अशी असते कीं, जो कोणी भेटेल त्याला ती प्रतिकूळ नसते. आणि प्रीति करणाराचा तिरस्कार करणारी ही नसते. आपलें येणें येथें फारच दुर्लभ, तें झालें असून आपला व्हावा तसा सत्कार आमच्या हातून झाला नाहीं, ह्मणून **कादंबरी** आपणाला अपराधी मानिते! असो, हा हार समुद्रमंथन करून जीं रत्नें काढिलीं, त्यांपैकीं शेष राहिला होता ह्मणून ह्यास 'शेष' असें नांव प्राप्त झालें आहे. हा हार सर्व रत्नांत श्रेष्ठ समजून समुद्रानें वरुणास दिला, त्यानें **चित्ररथ** गंधर्वास दिला, आणि त्यानें आपली प्रियकन्या **कादंबरी** हीस दिला. चंद्रास जसें आकाशमंडळ योग्यस्थान! तसें ह्या हारास आपलें हृदय योग्यस्थान! असें मनांत आणून तिनें आपणाकडे पाठविला आहे. तर याचा स्वीकार करावा. सद्गुणालंकारांनीं भूषित असे आपल्यासारखे पुरुष, भारभूत व क्लेशकारक अशा जडालंकाराचा स्वीकार करीत नाहींत, असें जरी आहे तरी **कादंबरीच्या** प्रीतिकारितां ह्या हाराचा आपण अंगीकार करावा. कौस्तुभमणि हा आपल्या प्रियेबरोबर जन्मला, ह्मणून विष्णूनें तो बहुमानानें आपल्या वक्षस्थलावर धारण केला नाहीं काय! आपण

विष्णूपेक्षां कमी आहां असें नाहीं, व हा हारही कौस्तुभमण्यापेक्षां गुणांनीं कमी आहे असें नाहीं; आणि माझी प्रियसखी **कादंबरी** सौंदर्यादिगुणांनीं लक्ष्मीपेक्षां उणी आहे असेंही पण नाहीं ! माझी **कादंबरी** सन्मानास व प्रेमास पात्र आहे, असें मनांत बाळगून ह्या हाराचें आपण ग्रहण करावें. आपण त्याचा स्वीकार न करितां प्रीतीचा भंग कराल तर माझी निंदा करून **कादंबरी** आपल्या जिवास काय करील याचा नियम नाहीं! हे मनांत आणून **महाश्वेतेने तरलिकेच्या** हातीं हार देऊन आपणाकडे पाठविलें आहे. आणखी **महाश्वेतेचा** आपणास असा निरोप आहे कीं, "हे भाग्यवंता! आपण ह्या **कादंबरीच्या** प्रथम प्रीतिदानाचा स्वीकार करावा; अनादर करूं नये." असें बोलून मेरुपर्वताच्या शिखरावर जसा तारागण शोभतो, त्याप्रमाणें शोभणारा तो मौक्तिकहार **मदलेखेनें चंद्रापीडाच्या** गळ्यांत घातला !—

तेव्हां **चंद्रापीड** आश्चर्ययुक्त होऊन सन्मानपूर्वक ह्मणाला, "**मदलेखे** ! काय सांगावें ? तूं मोठी चतुर आहेस, दुसऱ्याकडून एखादी वस्तु घेववावी कशी ! हें तूं चांगलें जाणतेस ! उत्तर देण्यास अवकाशही राहूं न देण्याविषयीं तुझें मोठें कौशल्य आहे ! **मदलेखे** मी ह्या शरीराचा स्वामी नाहीं ! आणि ग्रहण करणें किंवा न करणें हेंही नाहीं ! तुमच्या सौजन्यानें मला दास केलें आहे. याकरितां ह्याला इष्ट किंवा अनिष्ट अशा कोणत्याही कामास योजावें !—चतुर व थोर अशा **कादंबरीचे** सद्गुण कोणास वश करणार नाहींत ?" असें बोलून **कादंबरीच्याच** गोष्टी बोलत तो फार वेळ बसला आणि नंतर त्यानें **मदलेखेस** जाण्यास निरोप दिला. ती फारशी दूर गेली नाहीं तोंच उदयपर्वतावर चंद्र जसा उदय पावतो, त्याप्रमाणें चंदनाची उटी लावून शुभ्र वस्त्रें व हार यांनीं सुशोभित झालेल्या क्रीडापर्वतावर असलेल्या **चंद्रापीडास** पहाण्याकरितां **कादंबरी** सर्व दासींचें निवारण करून तमालिकेसह फिरून त्या बंगल्यावर चढली आणि अनेक प्रका-

रच्या विलास. चिन्हांस प्रदर्शीत करीत सूर्यास्तपर्यंत **चंद्रापीडाचे** मन हारण करीत उभी राहिली.—

त्या वेळेस सूर्यबिंब आरक्तवर्ण दिसूं लागलें. तें जसें कांहीं कमलिनी विषयींच्या रागानेंच आरक्त झालें काय! असें वाटलें, दिवस मोठा केल्यामुळें रुष्ट झालेल्या कामीनी स्त्रियांनीं रागानें आरक्तदृष्टीनें पाहिल्यामुळेंच काय! आकाश लाल झालेसें दिसूं लागलें. कमलें मिटल्यामुळें कमलवनें हिरवीं दिसूं लागलीं. शुभ्र कमलें प्रफुल्लित झाली, दिशा लाल दिसूं लागल्या, रात्रीस आरंभ होऊन काळोखी दिसूं लागली, सूर्य आपल्या कांतीसह अस्तास गेला. संध्याकाळची प्रभा तांबडी पडल्यामुळें **कादंबरीच्या** रागरसानेंच सर्व व्याप्त झालें काय! असें भासूं लागलें! तमालवृक्षांच्या पंक्तीप्रमाणें चोहीकडे अंधकार पसरला. दिग्गजांच्या सोंडेतील जळकणिकांप्रमाणें आकाशांतील तारा दिसूं लागल्या. अंधःकार पडूं लागल्यामुळें चांगलें दिसेनासें झालें. अशा वेळेस **कादंबरी** आपल्या बंगल्यावरून खालीं उतरली. **चंद्रापीडही** क्रीडापर्वतावरून खालीं उतरला.

चंद्रोदयकालीं चंद्रविकासी कमलिनी, किरणपडल्यामुळें चंद्राची पादसेवाच करीत आहे काय! अशा दिसल्या! किंचित्कृष्णमुखी झाल्यामुळें रागावल्याच आहेत काय! अशा दिशांस आपल्या कर स्पर्शानें प्रसन्नच करीत आहे काय! कलंक मिषानें रात्रीरूपस्त्रीस आपल्या हृदयांचे ठायीं धारणच करीत आहे काय! रोहिणीच्या चरणसंबंधीं अलिता लागल्यामुळें आरक्त वर्ण झाला आहे काय! असा दृष्टीला आनंद देणारा चंद्र उदयास आला. पुढें तो वर येऊन शुभ्र वर्ण दिसूं लागला. तेव्हां हें मदनराजाचें छत्र आहे काय! कां रात्रीस्त्रीची ही हस्तिदंती फणीच आहे काय! असा तो भासला. नंतर ज्याच्या भोंवताली अनेक पुष्प वृक्ष आहेत, ज्यांतील कमलें प्रफुल्लित झालीं आहेत अशा सरोवराच्या कांठीं मौक्तिकशिलापट्टावरील शयनावर निद्रा करण्याकरितां **कादंबरीच्या** सेवकांनीं सांगितल्या वरून तो तेथें जाऊन

शय्येवर पडला. इतक्यांत **केयूरकानें** येऊन सांगितलें कीं, **महाश्वेतेनें** पाठविल्यावरून **देवीकादंबरी** आपल्या दर्शनाकरितां आली आहे.

तेव्हां **चंद्रापीड** उठला आणि पाहूं लागला तो तिच्याबरोबर थोड्या सख्या आहेत, तिनें छत्रचामरादि राजचिन्हांचा त्याग केला आहे, तिनें आपल्या गळ्यांत एक सरी मोत्यांची माळमात्र घातली आहे, तिनें आपल्या अंगास शुभ्र व सुवासिक चंदनाची उटी लाविली आहे, कानावर कमळ ठेविलें आहे, ती पांढरें पातळ नेसली आहे, व तिला **मदलेखेनें** हात दिला आहे. असें पाहून ही साक्षात् चंद्रोदयदेवताच अवतरली आहे काय! असें **चंद्रापीडास** वाटलें. नंतर ती परमप्रीतीनें आपला नम्रपणा दाखवीत सेवकजनाप्रमाणें भूमीवरच बसली. तेव्हां आपण शय्येवरच बसावें असें मदलेखा वारंवार ह्मणत असतां **चंद्रापीड**ही जमिनीवरच बसला. सर्व बसल्यावर कांहीं वेळानें **चंद्रापीड कादंबरीस** ह्मणाला, केवळ अवलोकनानें धन्य मानणारा असा हा दास सिद्ध असतां त्यावर येथपर्यंत येण्याचा येवढा अनुग्रह कशाकरितां पाहिजे होता? येवढा सन्मान करण्यासारखे विशेष गुण मजमध्यें काय आहेत? अपरीचित जनाचा येवढा गौरव करणें याला देवीचा सरळपणा व सौजन्य इत्यादि गुणच कारण होत. आज्ञा करण्यास योग्य अशा दासजनाचा इतका आदर कशाला पाहिजे? परोपकारास साधन असें हें शरीर व तृणासारखें लघु असें हें जीवित याची आपणापुढें भेट ठेविली आहे! याचा स्वीकार करून सार्थकता करणें आपणाकडे आहे! इत्यादि प्रकारें **चंद्रापीड** बोलत असतां किंचित् हास्य करून **मदलेखा** ह्मणाली, "महाराज! अशा भाषणानें **कादंबरीस** खेद व लज्जा वाटत आहे! याकरितां असें भाषण कशाला पाहिजे? हिला आपल्या भाषणांतील सर्व अभिप्राय समजलाच आहे. अशा भाषणानें फिरून हिला संदेहांत पाडूं नये. अशा प्रकारें बोलतांना **तारापीड** महाराज कसे आहेत? राणी **विलासवती** कशी आहे? मनुष्य लोक कसा आहे? **उज्जयिनी**

नगरी कशी आहे? व ती किती दूर आहे? भारतवर्ष कसें आहे? मनुष्यलोक कसा आहे? अशा प्रकारें **मदलेखेनें** जें जें विचारलें तें तें सर्व त्यानें सांगीतलें. ह्याप्रमाणें भाषणें झाल्यावर कांहीं वेळानें **कादंबरी** तेथून उठली, आणि **चंद्रापीडास** विचारून निघाली. नंतर ती आपल्या मंदिराच्या वरच्या गच्चीवर जाऊन शय्येवर निजून राहिली. इकडे **चंद्रापीडही** त्याच शयनावर पडला. **केयूरक** त्याचे पाय रगडीत बसला. त्यावेळीं **कादंबरीचा** निरभिमानी स्वभाव, सौजन्य, व गंभीरपणा आणि तरीच **महाश्वेतेची** निष्कारण कृपालुता, **मदलेखेची** सुजनता, गंधर्वलोकांची रमणीयता, इत्यादि गोष्टी मनांत आणून त्याविषयीं विचार करीत **चंद्रापीडानें** ती सर्व रात्र क्षणाप्रमाणें घालविली.

नंतर **कादंबरीस** पाहतां पाहतां जागरण झाल्यामुळें सुस्त झालेला असा चंद्र निद्रा करण्याकरितांच काय समुद्रकाठच्या सीतल झाडींत शिरलासें दिसलें. आतां प्रियजनाचा विरह होणार ह्मणून कामिनीस्त्रियांचे मोठाले उष्णश्वास चालल्यामुळेंच चंद्रिकेस काळवटी येऊन ती निस्तेज दिसूं लागली! **चंद्रापीडदर्शनानें** मदनपीडित झाल्यामुळेंच काय! लक्ष्मी चंद्रविकासी कमलांस सोडून सूर्यविकासी कमलांत जाऊन पडली. मंदिरांतील दीप स्त्रीसुख अंतरल्यामुळें क्षीणतेज होऊन फिक्के दिसूं लागले. एकसारखी बाणांची वृष्टि करितां करितां दमलेल्या मदनाच्या श्वासाप्रमाणें चाललेला प्रफुल्लित पुष्पांचा सुगंध घेऊन वाहणारा, असा मंद मंद वारा वाहूं लागला. सूर्योदयाच्या तापानें त्रस्त झाल्यामुळेंच तारकामंदरपर्वतावरील लतांच्या जाळ्यांत जाऊन दडून बसल्या काय! असें दिसलें. चक्रवाकपक्षांच्या हृदयांतील अनुरागानेंच आरक्तवर्ण झालें काय असें सूर्यबिंब दिसूं लागलें! तेव्हां **चंद्रापीड** शय्येवरून उठला, आणि मुखप्रक्षालन व स्नानसंध्यादि कर्मेंकेल्यावर त्याणें तांबूल ग्रहण केला. मग तो **केयूरकास** ह्मणाला, "**केयूरका!** 'देवी **कादंबरी** निजून उठली किंवा नाहीं,' हें पहा बरें! उठली असल्यास ती कोठें बसली आहे हें पाहून ये." अशी चं-

द्रापीडाची आज्ञा होतांच केयूरक तिकडे गेला आणि परत येऊन ह्मणाला, महाराज! मंदरपर्वताच्या खालच्या बाजूस आंगणांत ल-हान मंदिर आहे, त्याच्या ओट्यावर ती महाश्वेतेशीं बोलत बसली आहे. असें त्याचें भाषण ऐकून चंद्रापीड उठला, आणि कादंबरीस भेटून तिचा निरोप घेऊन जावें या हेतूनें तो तिकडे गेला. त्या ठिकाणीं जप करणाऱ्या व देवांचीं गाणीं ह्मणणाऱ्या अशा स्त्रियांनीं वेष्टित अशी महाश्वेता व कादंबरी त्याच्या दृष्टीस पडली. मग तो पुढें गेला, आणि महाश्वेतेस नमस्कार करून त्याच ओट्यावर आसन मांडलें होतें त्यावर जाऊन बसला. मग कांहीं वेळानें तो किंचित् हास्य करीत महाश्वेतेच्या मुखाकडे पाहूं लागला. तेव्हां ती त्याचा अभिप्राय लक्ष्यांत आणून कादंबरीस ह्मणाली, "सखे कादंबरी जसा चंद्रकांतमणि चंद्रिकेनें द्रवतो, त्याप्रमाणें चंद्रापीडमहाराज तुझ्या गुणांनीं द्रवल्यामुळें बोलण्यास देखील समर्थ होत नाहींत! ह्यांना परत जाणें अवश्य आहे, कारण ह्याजबरोबरच्या राजे लोकांस यांचा शोध नसल्यामुळें ते यांचा शोध करीत दुःखानें हिंडत आहेत. याकरितां ह्यांना जाण्यास अनुमोदन द्यावें. तुह्मी एकमेकांस दूर झाला तरी कमलिनी आणि सूर्य किंवा कुमुदिनी आणि चंद्र यांचें जसें एकमेकांवर प्रेम असतें तशी तुह्मां उभयतांची प्रीति सदोदित राहो."

नंतर कादंबरी ह्मणाली, "सखे महाश्वेते! सर्व परिवारासह हा देह महाराजांच्या स्वाधीनच आहे तर याचा इतका प्रतिबंध कशाला पाहिजे! असें महाश्वेतेसीं बोलून तिनें गंधर्वकुमारांस बोलावून आणिलें, आणि त्यांस चंद्रापीडास आपल्या स्थानास पोंचविण्यास सांगितलें. मग चंद्रापीडानें तेथून उठून महाश्वेतेस नमस्कार केला. त्यावेळीं कादंबरी निश्चल नेत्र व सप्रेम अंतःकरण यांणीं ज्यास हृदयांत सांठवीतच आहे काय! असा चंद्रापीड कादंबरीस ह्मणाला, "देवी फार काय बोलावें? पुष्कळ बोलणारावर कोणाची श्रद्धा बसत नाहीं. माझें मागणें ह्मणून इतकेंच आहे कीं, सेवकजनांच्या गोष्टींत तरी माझें स्मरण करीत जावें."

असें बोलून तो तेथून निघाला. तेव्हां त्याच्या गुणांनीं आकर्षिले-ल्या सर्व गंधर्वकन्या त्याच्या मागून बाहेरच्या दारापर्यंत गेल्या. **कादंबरी** मात्र लज्जेनें पोंचविण्यास गेली नाहीं. मग त्या कन्यांस परतवून **केयूरकानें** आणिलेल्या घोड्यावर **चंद्रापीड** बसला, आणि गंधर्वकुमाराबरोबर हेमकूटपर्वतावरून जाण्यास निघाला. **चंद्रापीड** चालला असतां **कादंबरी** केवळ त्याच्या हृदयांत व दृष्टीसमोरच होती असें नाहीं, तर जिकडे तिकडे त्यास तीच दिसूं लागली ! पुढें **चंद्रापीड महाश्वेतेच्या** आश्रमाजवळ आला तों त्या ठिकाणीं इंद्रायुधाच्या खुरांच्या मागानें आपलें सैन्य येऊन स्वच्छोदसरोव-राच्या कांठीं उतरलें आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें. नंतर त्यानें आपणाबरोबर आलेल्या गंधर्वकुमारास परत लावून आपण आपल्या सैन्यांत गेला. तेव्हां त्याच्या सर्व लोकांनीं मोठ्या आनंदानें व आश्चर्यानें **चंद्रापीडास** पाहून नमस्कार केले. मग तो आपल्या तंबूत गेला आणि तेथें आलेल्या सर्व राजे लोकांची भेट घेऊन त्यानें त्यांचा सन्मान केला. नंतर तो वैशंपायन व पत्र-लेखा ह्याजबरोबर बोलत **महाश्वेता** अशी आहे, **कादंबरी** अशा प्रकारची आहे, **मदलेखा, तमालिका,** व **केयूरका,** हे असे आहेत. गंधर्वलोक असा आहे. अशा प्रकारच्या गोष्टी बोलण्यांतच त्यानें तो दिवस घालविला. **कादंबरीचें** दर्शन झाल्यामुळें द्वेषबुद्धीनेंच काय, राजलक्ष्मी त्यावर प्रीति करीनाशी झाली. मग **चंद्रापीडानें कादंबरीचें** चिंतन करण्यांतच रात्र घालविली.

दुसरे दिवशीं **चंद्रापीड** सभेमध्यें बसला असतां द्वारपालाबरोबर आलेला **केयूरक** त्याचे दृष्टीस पडला. तेव्हां **केयूरकानें** भूमीस स्पर्श करून दुरूनच **चंद्रापीडास** नमस्कार केला. **चंद्रापीडानें** पुढें जाऊन ये ये सख्या ! असें बोलून मोठ्या आनंदानें त्यास मिठी मारून आलिंगन केलें आणि त्यास आपल्याजवळ बसविलें. नंतर किंचित् हास्यकरून मोठ्या प्रेमानें तो त्यास ह्मणाला, **केयूरका! देवीकादंबरी** सर्व परिवारासह खुशाल आहेना ? आणि भगवती

**महाश्वेता** कुशल आहेना ? तेव्हां **चंद्रापीडाच्या** प्रेमभरयुक्त हास्यानें स्नान झाल्यासारखा होऊन सर्व मार्गश्रम ज्याचे दूर झाले आहेत असा **केयूरक** ह्मणाला, 'महाराजांनीं कुशल विचारल्यामुळें **देवीकादंबरी** कुशलयुक्तच झाली !' असें बोलून **कादंबरीनें** दिलेला कमलिनीपत्रांचा पुडा पुढें ठेवून उघडून दाखविला त्यांत पाचूसारख्या हिरव्या रंगाचीं कोंवळीं पोफळें, नागवेलीचीं पानें, चंद्रखंडासारखाकर्पूर आणि कस्तुरीयुक्त चंदनविलेपन हीं द्रव्यें होतीं. तीं वेगळीं करून तो ह्मणाला, **देवीकादंबरी** मस्तकास अंजली लावून महाराजांचें पूजन करीत आहे; **महाश्वेता** आलिंगनपूर्वक कुशल प्रश्न विचारीत आहे, आणि **मदलेखा, तमालिका** व इतर कन्यका महाराजांच्या चरणांस वंदन करीत आहेत. **महाश्वेतेचें** ह्मणणें असें आहे कीं, ज्यांच्या आपण मुळींच दृष्टीस पडला नाहींत ते धन्य होत! महाराज समक्ष असतां जे आपले गुण चंद्राप्रमाणें शीतळ वाटत होते, तेच गुण आपला विरह झाला असतां सूर्याप्रमाणें ताप देणारे वाटतात! आपण येथें असतां आह्मास अमृतमय दिवस गेला तसा दिवस फिरून सुदैवानें यावा, अशी आमची सर्वांची इच्छा आहे. आपल्या वियोगानें सर्व गंधर्वनगर उत्सवरहित दिसत आहे. मी सर्व संगपरीत्याग केला आहे. हें आपणास माहीत आहेच; तथापि कारणावांचून प्रीति करणारें आपण असल्यामुळें आणखी एकवेळ आपणांस पहावें. असें माझ्या मनांत आहे. आणखी आपल्या विरहानें **कादंबरी** अस्वस्थ आहे. मदनासारखे सुंदर गुणवान् असे आपण असल्यामुळें आपलें तिला वारंवार स्मरण होत आहे. याकरितां फिरून येथपर्यंत येऊन गुणवानावर प्रीति ठेवणाऱ्या **कादंबरीस** संतुष्ट करावें. आपल्यासारख्या थोर पुरुषाचा आदर सत्कार केला असतां त्यांत भूषणच आहे ! ह्या आमच्या प्रार्थनेबद्दल आह्मास क्षमा असावी. कारण असला निरोप पाठविणें हें अनुचित खरें, तथापि आपली सुजनता पाहून आह्मांस धैर्य वाटतें. हा शेष नांवाचा हार आपल्या शय्येवर विसरून राहिला होता तो मजबरोबर पाठविला आहे. असें बोलून अंगवस्त्राच्या पदरीं

बांधलेला हार काढून त्यानें तो चंद्रापीडाच्या दासीजवळ दिला.

चंद्रापीड ह्मणाला, 'माझ्या सारख्याची आठवण येऊन देवीकादंबरी एवढा अनुग्रह करितें, हें महाश्वेतेच्या कृपेचें फळ होय.' असें बोलून त्यानें सर्व पदार्थ आपल्या मस्तकावर धारण केले. नंतर रस रूप झालेलें कादंबरीचें लावण्यच काय! किंवा तिचा पातळ झालेला प्रत्यक्ष हास्यरसच काय! किंवा द्रवलेलें तिचें निर्मळ अंतःकरणच काय! किंवा रसरूप झालेले तिचे गुणगणच काय! स्पर्शानें सुख देणारे व सुवासिक असें तें विलेपन अंगास लावून त्यानें तो हार आपल्या गळ्यांत घातला. नंतर तांबूल ग्रहण करून तो मुहूर्त मात्र त्या ठिकाणीं बसला. नंतर राजे व प्रधान लोक यांचा यथायोग्य सन्मान करून त्यांस त्यानें जाण्यास निरोप दिला. मग केयूरकासहवर्तमान तो गंधमादन हत्ती पहावयास गेला. तेथें आपल्या हातानें त्याजपुढें कोंवळें कोंवळें गवत घालून दोन्ही बाजूकडे सेवक उभे होते त्याजकडे पहात पहात तो अश्वशाळेकडे गेला. जातांना दोन्ही बाजूकडे मान वळवून पाहतांच अभिप्राय समजणाऱ्या द्वारपाळांनीं सेवक लोक तेथें होते त्यांस दूर केलें. नंतर केयूरकासहित चंद्रापीड इंद्रायुधाजवळ गेला. आणि त्यानें त्याच्या पाठीवरची झूल एकीकडे गेली होती ती नीट केली, व त्याच्या मानेवरील आयाळीचे केश इकडे तिकडे उडाले होते तेही नीट सारले. मग दवासणीच्या खुंट्यावर एक पाय ठेवून व अश्वशाळेतील आडव्या दांड्यावर देह टाकून तो केयूरकास ह्मणाला, "केयूरका, सांग बरें, मी निघून आल्यावर त्या मंदिरांत कसें काय वर्तमान झालें? कादंबरीनें तो दिवस कोणत्या प्रकारानें घालविला? महाश्वेता काय करीत बसली? मदलेखा मग काय बोलली? सर्वांची मग काय काय बोलणीं झालीं? सर्व सेवक मग काय करीत बसले? मजविषयीं मग काय गोष्टी चालल्या?" तो ह्मणाला, "ऐकावें महाराज, सांगतों, आपण तेथून निघाल्यावर देवीकादंबरी अंतःपुरांतून निघून दासीसहवर्तमान गच्चीवर चढून जों पर्यंत आपल्या घोड्याच्या पायांनीं धूळ

उडत होती तोपर्यंत आपणाकडेच पाहत उभी होती, आपण दिसेनासे झाले तेव्हां मदलेखेच्या खांद्यावर हनवटी ठेवून आपण गेला त्या दिशेकडे कांहीं वेळ पहात उभी राहिली व नंतर मोठ्या दुःखानं खाली उतरली. कांहीं वेळ सभामंडपांत जाऊन बसली. तेथेंही बरें वाटेना तेव्हां तेथून उठून जेथें मयूरादिपक्ष्यांचे शब्द होत असल्यामुळें जिला त्रास वाटूं लागला, अशा प्रफुल्लित वेलींच्या मधून ज्या क्रीडापर्वतावर महाराज होते त्या ठिकाणीं गेली, आणि "ह्या लतामंडपांतील शीतल शिलातलावर महाराज बसले होते! सुगंधी उदकानें सुवासिक अशा ह्या शिळेवर महाराजांनीं स्नान केलें! या ठिकाणीं शंकरांचें पूजन केलें! चंद्रकांतीस देखील लाजविणाऱ्या अशा ह्या स्फटिकाच्या शिळेवर महाराजांनीं उपहार केला! चंदनरसानें शीतळ अशा ह्या मौक्तिक सिलापदावर महाराजांनीं निद्रा केली!" याप्रमाणें दासींनीं फिरून फिरून सांगितलेल्या स्थानाकडे पहात पहात तिनें तो दिवस घालविला. रात्र झाल्यावर महाश्वेतेच्या अग्रहामुळें त्याच स्फटिकमंदिरांत तिनें थोडासा फलाहार केला, पुढें चंद्रोदय झाल्यावर चंद्रकांत पुतळीसारखी ती कादंबरी आपल्या मुखावाटे चंद्रकिरण शिरतील ह्मणूनच काय दोन्ही तळहातांवर दोन गाल ठेवून व डोळे झांकून चिंताक्रांत बसली! थोडा वेळ बसल्यावर ती तेथून उठली आणि जिच्या निर्मळ नखांत चंद्रप्रतिमा शिरल्यामुळें जड झालेलीं पावलें मंद मंद टाकित मंदगतीनें आपल्या शय्यागृहांत गेली. तेथें शय्येवर पडून शिरोवेदनेनें पीडित होऊन इकडे तिकडे लोळूं लागली, आणि मानासिक ज्वरानें व विलक्षण मनोव्यथेनें, व्याकूळ होऊन मंगळदीप व चंद्रविकासी कमळें जशीं रात्रीं मिटत नाहींत, त्याप्रमाणें पापणीसपापणी न लावतां तिनें मोठ्या दुःखानें ती रात्र घालविली. प्रातःकाळ होतांच मला बोलावून नेऊन, महाराजांचें वर्तमान समजावें ह्मणून मोठ्या उत्कंठेनें देवीनें मला जावयास आज्ञा केली.

असें त्याचें भाषण ऐकून चंद्रापीड कादंबरीकडे जाण्याविषयीं अत्युत्कंठित होऊन 'घोडारे घोडा!' असे बोलत निघाला. तेव्हां

सेवकानें खोगीर वगैरे घालून तयार केलेल्या इंद्रायुधावर बसून पत्र-लेखेस आपल्या पाठीमागें बसवून निघाला. नंतर सर्व सैन्याची व्यवस्था ठेवण्याकरितां वैशंपायनास सांगून कोणीएक सेवक बरोबर न घेतां तो तिकडे चालता झाला. त्याच्या मागें केयूरकही घोड्या-वर बसून चालला. अशा प्रकारें चंद्रापीड हेमकूटपर्वतावर आ-ल्यावर कादंबरीच्या मंदिराजवळ तो घोड्यावरून खालीं उतरला. नंतर त्यानें आपला घोडा चोबदाराच्या स्वाधीन करून तो मंदिरांत शिरला. कादंबरीस पाहण्याकरितां उत्कंठित झालेली पत्रलेखाही चंद्रापीडाच्या मागून चालली. मग समोर एक खोजा आला त्यास चंद्रापीडानें विचारलें, ' देवीकादंबरी कोठें बसली आहे! ' तेव्हां त्यानें मुजरा करून सांगितलें कीं, क्रीडापर्वताच्या आधोभागीं पुष्क-रिणीच्याजवळ हिमगृह आहे त्या ठिकाणीं बाईसाहेब बसल्या आ-हेत! असें त्यानें सांगितल्यावर केयूरकानें दाखविलेल्या मार्गानें तो तिकडे चालला. तो प्रमदवनांतून चालला असतां पाचुसारख्या हिरव्यागार केळींनीं सूर्य प्रभा देखील जेथें हिरवीगार दिसत होती, अशा वनांतून गेला, तों पुढें हिरव्यागार दाट कमलीनींनीं सुशोभित असें हिमगृह त्याच्या दृष्टीस पडलें. व त्यांतून बाहेर पडलेल्या कादं-बरीच्या दासीही त्याच्या दृष्टीस पडल्या. त्या दासींनीं स्नानें करून आपल्या अंगावर कमलभूषणें धारण केली होती, कर्णावर केतकी-पत्रें ठेविलीं होतीं, कर्पूरानें मिश्रित असें चंदनाचें विलेपन अंगास लाविलें होतें, व हातांत कमलीनींचीं पत्रें घेऊन त्या उष्णाचें निवा-रण करीत होत्या. अशा वेळीं शीतोपचार करण्याविषयीं कुशळ अशा मूर्तिमंत जळदेवतांच किंवा पुष्करिणीच आहेत काय? अशा त्या भासल्या! मग त्यांनीं प्रणाम करून दाखविलेल्या मार्गानें अनेक सुवासिक व शीतल उपायांनीं युक्त अशा कमलिनींच्या मंडपांतून ते-थील शोभा पहात पहात चंद्रापीड हिमगृहाच्या मध्यभागीं गेला. तेव्हां हें हिमालयाचें हृदयच आहे काय! किंवा वरुणाचें क्रीडा करण्याचे जलमंदिरच आहे काय! किंवा चंद्रकलांची जन्मभूमिच आहे काय! अथवा चंद्रकांतमण्याचें उत्पत्तिस्थानच आहे काय! किंवा

शीतकालच्या रात्रीचें ठिकाणच आहे काय! असें तें त्यास वाटलें. त्या ठिकाणीं सर्व बाजूंकडे कारंजाचे फवारे उडत असल्यामुळें हें सूर्यकिरणांचा पराभवच करीत आहे काय, असे भासत होते. पुष्पांचे पराग घेऊन वायू शीतल व मंदमंद वाहत होता. हिरव्यागार केळीचीं पानें हिकडून तिकडे व तिकडून हिकडे हालत होतीं, पुष्प सुगंधास लुब्ध होऊन भ्रमर गुंजारव शब्द करीत फिरत होते. अनेक प्रकारच्या पुष्पलतांनीं युक्त असें तें ठिकाण पाहिल्यावर चंद्ररूपीमन कमलरूपीं इंद्रियें, चांद्रिकारूपीं सर्व अंग, असें त्यास होऊन सर्व आनंदमय वाटलें!

त्या हिमगृहाच्या आंत सख्यांनीं वेष्टित अशी कादंबरी हिमालयाच्या गुहेंत अनेक नद्यांनीं युक्त गंगा जसी दिसते, तसी दिसली! ती पुष्पांच्या शय्येवर निजली होती. तिनें आपल्या अंगावर मृणालांची भूषणें घातलीं होतीं. त्यामुळें मदनानें पुष्पतंतुरूप साखळदंडानें जागजागीं तिला खिळूनच टाकिलें आहे काय! असें दिसत होतें! तिच्या गौरवर्ण कपाळावर चंद्रानेंच वास केला आहे काय! नेत्रांतून अश्रुधारा चालल्यामुळें त्या ठिकाणीं वरुणच येऊन राहिला आहे काय! श्वासोच्छ्वास चालल्यामुळें मुखाचे ठायीं वायूनेंच चुंबन केलें आहे काय! सर्वावयव संतप्त झाल्यामुळें त्यांचे ठायीं सूर्यानेंच वास्तव्य केलें आहे काय! मदनदाहानें संतप्त अशा हृदयाचेठायीं अग्नीनेंच स्थिति केली काय! असें भासलें. तिचे सर्व अवयव हृदयवल्लभाकडे गेल्यामुळें तिची अशी अवस्था झाली असें दिसलें. तिच्या अंगावरील रोमांच चंदनाविलेपनानें शुभ्र दिसत असल्यामुळें मौक्तिक हाराच्या संगतीनें हीं सर्वांगावर मौक्तिकेंच पसरलीं आहेत काय! असें भासलें. कानांतील कमलावर भ्रमर फिरत असल्यामुळें ते आपल्या पंखांनीं तीस वाराच घालीत आहेत काय! असें वाटलें. नेत्रावाटें अश्रूंचे प्रवाह चालल्यामुळें यांस जावयाकरितां हे पनाळच लाविले आहेत काय? अशीं केतकीपत्रें तिच्या कर्णावर दिसलीं! श्वासोच्छ्वासानें तिच्या स्तनावरील वस्त्र हालत असल्यामुळें तें मदनतापाच्या भयानें पळतच आहे काय, असें वाटलें! ती मदन-

दाहामुळें शीतळ केलेल्या पाषाणाच्या पुतळीस आलिंगित आहे! गालानें कापराच्या पुतळीस स्पर्श करीत आहे! व पायांनीं चंदनाच्या पुतळीस स्पर्श करीत आहे असें दृष्टीस पडलें! मदनपीडित झाल्यामुळेंच काय तिच्या कंठांतील मुक्ताहारही तिचें आलिंगनच करीत आहेत काय, असें दिसत होतें. हृदयावर मण्याचा आरसा ठेवून ' आज तूं उगवूं नको ' ह्मणून चंद्राला आपल्या जिवाची शपथ घालीत आहे काय, असें भासत होतें! अशा प्रकारें वर्तन करणारी **कादंबरी चंद्रापीडानें** पाहिली.

नंतर **कादंबरीच्या** दासींनीं **चंद्रापीड** महाराज आले आहेत! असें तीस सांगितलें. तेव्हां ती मोठ्या उत्कंठेनें ह्मणाली, " खरेंच कां ते आले आहेत? तुह्मी त्यांना पाहिलें का? ते किती दूर आहेत?" असें ह्मणून ती समोर टक लावून पाहूं लागली, तों **चंद्रापीड** तिच्या दृष्टीस पडला. तेव्हां पराधीन झालेल्या **कादंबरीस** पुष्पशय्येच्या सुगंधानें आलेले भ्रमरच उठवीत आहेत काय, असें दिसलें! गडबडीनें उरावरील पदर एकीकडे गेल्यामुळें गळ्यांतील शुभ्रहाराच्या किरणांनीं ती आपलें स्तन झांकण्याचाच प्रयत्न करीत आहे काय? असें दिसलें! उठतांना मण्याच्या भिंतीस हात दिल्यामुळें भिंतींत पडलेल्या आपल्या प्रतिमेस हात देण्याविषयीं याचनाच करीत आहे काय? असें वाटलें! अशा प्रकारें ती त्या पुष्पशय्येवरून उठली. इतक्यांत **चंद्रापीडानें** जवळ जाऊन पाहिल्यानें **महाश्वेतेस** नमस्कार करून नंतर **कादंबरीसही** केला. **कादंबरीनेंही** त्यास उलट नमस्कार केल्यावर ती त्याच पुष्पशय्येवर बसली. नंतर **चंद्रापीडही** बसला. इतक्यांत **केयूरक** पुढें होऊन ह्मणाला, " **चंद्रापीड** महाराजांच्या अत्यंत प्रीतींतली ही दासी आहे, हिचें नांव **पत्रलेखा** आहे." असें बोलून त्यानें ती **कादंबरीस** दाखविली. तीस पाहतांच **कादंबरीस** मोठें आश्चर्य वाटून ती ह्मणाली, " काय पहा मानवी स्त्रियांचें सौंदर्य करण्याविषयीं ब्रह्मदेवाचा खरोखरच पक्षपात दिसतो!" असें ती आपल्या मनांत ह्मणत आहे तोंच **पत्रलेखेनें कादंबरीस** नमस्कार केला.

तेव्हां " ये बाई! अशी इकडे बैस, " असें ह्मणून कादंबरीनें तीस आपल्या पाटीशीं बसविलें. तेव्हां सर्व दासी तिजकडे मोठ्या आश्चर्यानें पाहत राहिल्या. पत्रलेखेस पाहिल्याबरोबर कादंबरीची प्रीति तिजवर फारच जडली. त्यामुळें ती वारंवार तिजवरून हात फिरवूं लागली. आगतस्वागत वगैरे उपचार झाल्यावर कादंबरीची तशी आवस्था पाहून चंद्रापीड चिंतन करून ह्मणाला, माझें हृदय फारच वेडें आहे. त्याला अजूनही खात्री वाटत नाहीं! असो, आतां मीच ही सयुक्तिप्रयुक्तीनें विचारितों. असें ह्मणून तो विचारूं लागला. तो ह्मणाला, " कोणत्या कारणानें हा देवीस संताप देणारा व्याधि उत्पन्न झाला आहे. हे सुंदरी! खरोखरच हा व्याधि आह्माला जसा संताप देत आहे, तसा ईस्वील देत नसेल. देवीचा व्याधि दूर होण्याकरितां मी आपला देह देखील अर्पण करीन. अशी अवस्था पाहून माझें हृदय अगदीं व्याकूळ होत आहे. संतापामुळें देवीचे डोळे किती तरी लाल दिसत आहेत! व त्यावाटें अश्रुबिंदूही पडत आहेत! याकरितां स्वयंवराला योग्य असें मंगल करून आपला ताप दूर करावा."

कादंबरीस मदनानें शिकविल्यामुळेंच काय चंद्रापीडाच्या भाषणाचा सर्व अर्थ समजला, तथापि बालस्वभावामुळें आपले मनोरथ पूर्ण होतील किंवा नाहींत, याविषयीं खात्री न वाटून ती लज्जेनें कांहीं एक न बोलतां खालीं तोंड वाळून उगीच बसली. परंतु किंचित् हास्य करून तिनें त्याजकडे पाहिलें ! तेव्हां मदलेखा ह्मणाली, " महाराज हिचा संताप किती कठीण आहे ह्मणून सांगावा ! व यास कुमारावांचून[१] दुसरें कारण नसावें. पहा, हिला कमलनीचा शीतलपल्लव अग्नीसारखा वाटतो. चांद्रिका उष्णासारखी वाटते ! कोमलपल्लवांचा वारा देखील दुःख देतो ! हें सर्व आपल्या दृष्टीस पडत नाहीं काय ! " ह्या भाषणानें कादंबरीच्या मनांत होतें तेंच उत्तर मदलेखेकडून चंद्रापीडास मिळालें. तथापि त्याचें मन मनोरथ सिद्धीविषयीं संशययुक्तच राहिलें. मग तो महाश्वेतेबरोबर

१ चंद्रापीड, कुत्सितमदन.

बराच वेळ बोलत बसला. आणि नंतर प्रयासानें तेथून उठून त्या दोघींस विचारून ज्या ठिकाणीं आपल्या सैन्याचा तळ होता तिकडे जावयास निघाला.

**चंद्रापीड** आपल्या घोड्यावर बसत आहे तो मागून **केयूरक** येऊन ह्मणाला, "महाराज ही **मदलेखा** अशी विनंति करीत आहे कीं, **पत्रलेखेची** भेट झाल्यापासून **देवीकादंबरीची** तिजवर प्रीति जडली आहे. याकरितां देवीची अशी इच्छा आहे कीं, **पत्रलेखेनें** माघारीं यावें. व मागून कांहीं दिवसांनीं जावें. यावर महाराजांची जी आज्ञा होईल ती प्रमाण." हें ऐकून **चंद्रापीड** ह्मणाला, **देवीकादंबरीची पत्रलेखेवर** एवढी प्रीति जडली यावरून ती धन्य आहे! तर हिला **कादंबरी**कडे घेऊन जावें. असें बोलून **चंद्रापीड** निघून गेला. नंतर तो आपल्या सैन्याच्या तळाजवळ गेला, तों आपल्या पित्याकडून आलेला एक जासूद त्याच्या दृष्टीस पडला. तेव्हां घोडा उभा करून दुरूनच त्यानें त्यास विचारिलें. "सर्व मंडळीसह माझे वडील खुशाल आहेत ना? सर्व स्त्रियांसहवर्तमान माझी आई खुशाल आहे ना?" असा प्रश्न ऐकून तो जासूद पुढें आला आणि त्यानें प्रणाम करून 'सर्व खुशाल आहेत' असें ह्मणून पत्राचे दोन लाखोटे **चंद्रापीडाच्या** हातीं दिले. त्यानें ते लाखोटे शिरसा मान्य करून व आपल्या हातानें फोडून तो वाचूं लागला.

"स्वस्ति श्री उज्जयनींत राहणारा सर्व राजांनीं वंदन केलेला परम शिवभक्त असा राजाधिराज **तारापीड** राजा रत्नखचित मुकुटानें सुशोभित अशा **चंद्रापीड** पुत्राच्या मस्तकाचें अवघ्राण करून आशीर्वाद देत आहे. इकडील सर्व कुशल आहे. फार दिवस झाल्यामुळें बालक केव्हां दृष्टीस पडेल असें आह्मास झालें आहे. बालकाच्या वियोगा मुळें सर्व स्त्रियांसहवर्तमान देवी फार कष्टी आहे. याकरितां पत्र पावतांच त्वकर निघून यावें. प्रधानाचें पत्र वाचून पाहिलें त्यांतही असाच मजकूर होता. इत-

क्यांत वैशंपायनानें ही चंद्रापीडाजवळ जाऊन आपल्यासही अशाच प्रकारचें पत्र आलें आहे, ह्मणून चंद्रापीडास दाखविलें.

तेव्हां चंद्रापीडानें पित्याची आज्ञा मान्य करून प्रयाणकाळचा नगारा वाजविण्यास सांगितलें. आणि आपण घोड्यावर बसला होता तसाच जावयास निघाला. जातेवेळीं त्यानें मेघनाद सेनापतीस बोलावून आणून सांगितलें, "तूं पत्रलेखेबरोबर ये. केयूरक तिला येथपर्यंत आणून पोंहोचवील. त्याजबरोबर देवीकादंबरीला माझी अशी विनंति सांगून पाठीव कीं, आपणावर प्रीति करणाऱ्याच्या देखील अनुरोधानें न वागणारी व परिचयास देखील न मानणारी अशी कांहीं (मजसारख्या) मनुष्याची वृत्ति असते, तर मी अशाच प्रकारचा मनुष्य आहें. देवीला सोडून चालल्यामुळें मी आपला कपटस्नेह दाखविला. 'मीं तुझा आहे' इत्यादि मधुरभाषण बोलण्यानें मी आपला धूर्तपणा मात्र प्रकट केला. मनांत एक व बोललों एक, असें मीं केलें. माझी स्वतःची गोष्ट असो; परंतु माझ्यासारख्या अपात्राचे ठायीं देखील प्रीति करणारी, दिव्य पुरुषास मान्य अशी देवी ही माझ्यामुळें लोकांनीं नांवें ठेवण्याजोगी झाली. अपात्रीं केलेला प्रसाद थोरांच्या अंतःकरणास पश्चाताप करणारा होतो, हें खरें आहे. त्यांत महाश्वेतेविषयीं जितका मला शरमिंधेपणा वाटत आहे तितका देवीविषयीं वाटत नाहीं. महाश्वेतेनें माझा पक्षपात धरून माझ्या गुणांचें फारच वर्णन केलें. व त्यामुळें आतां देवीकादंबरी तिची निंदा करील परंतु मी काय करूं? पित्याची आज्ञा मान्य आहे, तिचें उल्लंघन करितां येत नाहीं, हेमकूटपर्वतावर वास करावा. अशा विषयीं ज्याला फार हौस वाटत आहे अशा माझ्या अंतःकरणानें तर देवीला सहस्रजन्मपर्यंत सेवा करीन ह्मणून दास्यपट लिहून दिला आहे. देवीचा प्रसाद माझ्या अंतःकरणास येथून जाऊं देत नाहीं, परंतु पित्याच्या आज्ञेनें मात्र मला उज्जयिनीस नेलें. दुर्जनांच्या गोष्टींचा प्रसंग निघेल त्यावेळेस तरी देवीनें ह्या चंद्रापीडाचें स्मरण करावें, परंतु देवीनें असें समजूं नये कीं, हा चंद्रापीड जिवंत असतां देवीच्या दर्शनानंदाचा अनुभव

घेतल्या खेरीज राहील !" आणखी "प्रदक्षिणापूर्वक **महाश्वेतेच्या** दोन्हीं पायांचें मीं वंदन केलें आहे असें तिला सांगावें. तसेंच **तमालिका** व **कादंबरीच्या** दुसऱ्या दासी यांस कुशल प्रश्न विचारिले आहेत ह्मणून सांगावें. हेमकूटपर्वतासही माझें नमन सांगावें." आणखी तो **मेघनादास** ह्मणाला, "सर्व आप्तमित्रांस क्लेश न देतां सांभाळून घेऊन ये. नंतर तो **वैशंपायनास** ह्मणाला, **वैशंपायना** ! तूं सर्व सेनेचा बंदोबस्त चांगला ठेव व सर्वांस घेऊन ये."

मग **चंद्रापीड** घोड्यावर बसला होता तो तसाच तेथून निघाला. त्यावेळीं ज्याच्या फुरफुरण्यानें कैलासपर्वत थरथर कांपतोच आहे काय! व ज्याच्या खुरांनीं पृथ्वी विदीर्णच होत आहे काय! असें अश्वसैन्यबरोबर घेऊन तो निघाला. **कादंबरीच्या** वियोगानें **चंद्रापीडाचें** अंतःकरण ठिकाणीं नव्हतें तरी खोगरास धरून चाललेल्या नासुदास तो **उज्जयिनी**कडील वर्तमान विचारीत होता.

जातांना वाटेंत भयंकर व उदास असें मोठें अरण्य लागलें. त्या ठिकाणीं मोठमोठ्या जुनाट वृक्षांचे सोठ वाढलेले होते. वृक्षांच्या झाडींतून लतांचे मंडपही दिसत होते. अरण्यांतील मत्त हत्तींनीं मोठाले वृक्ष मध्यें मोडून टाकल्यामुळें वांकड्या तिकड्या वाटा पडल्या होत्या. गवत, पानें व लांकडें यांचे मोठे ढीग करून ठेविले होते. त्यावरून थोर पुरुषाच्या घाताचें हें स्थान आहे असें स्पष्ट दिसत होतें. तृषित पांथस्थ लोकांनीं आवळे तोडून टाकल्यामुळें त्याचे ढीग पडले होते. त्या ठिकाणीं जुन्या विहिरी होत्या त्यांत वेलींच्या जाळ्या व झाडें पसरलीं होतीं. त्या फार खोल असल्यामुळें त्यांतील उदक प्राप्त होण्यासारखें नव्हतें. व तेंही पानें व केर पडल्यामुळें घाणेरडें झालेलें दिसत होतें. अशा कारणांनीं त्या प्रदेशाकडे जाण्यास कोणासच इच्छा होत नव्हती. त्या ठिकाणीं रानांतील पर्वतांवरून वाहणाऱ्या नद्यांचीं शुष्क पात्रें दिसत होतीं. त्या नद्यांच्या कांठावर निर्गुंडीचीं झाडें होतीं व त्याच्या पुष्पांतील परागतीरावर पडले होते व तेथें अनेक प्रकारच्या जाळ्या पसरलेल्या

होत्या. वाटसरू लोकांनीं वाळवंटांत खोल झरे केले होते त्यावरून त्यास थोडेसें मळकट पाणी मिळाल्याचें दिसत होतें. कोंबडे व कुत्रे यांचा मधून मधून शब्द ऐकूं येत असल्यामुळें क्वचित् ठिकाणीं लहानसहान खेडीं असल्याचें अनुमान होत होतें. अरण्य संपत आलें तेव्हां राळ्याचीं शेतें लागलीं. त्यांच्या सभोंवतीं जुनाट वेळूचीं कुंपणें केलीं होतीं व पशु आणि पक्षी यांना भेडावण्याकरितां गवताचे पुरुष करून बसविले होते. अशा अरण्यांतून दिवसभर प्रवास केल्यावर सूर्यास्ताच्या सुमारास चंद्रापीडानें दूर एक्या जुनाट रक्तचंदनाच्या वृक्षावर एक मोठा तांबडाध्वज पाहिला. त्याच्या जवळ दुसऱ्याही पताका फडकत होत्या व त्याला घंटा बांधलेल्या होत्या, त्यांचा घणघण अवाज चालला होता.

त्या ध्वजाच्यासमोर कांहीं मार्ग चालून गेल्यावर एक देवालय त्याच्या दृष्टीस पडलें. त्यास लोखंडाचा व ज्यास हस्तिदंती कवाडें आहेत असा दरवाजा होता व समोरच्या ओत्यावर लोखंडाचा रेडा होता व त्यावर रक्तचंदनाचे हात मारले होते त्यामुळें यमानें रक्तानें भरलेल्या हातानें त्याची पाठ थोपटलीच आहे काय! असा तो दिसत होता. देवालयांत चंडिकेची मूर्ति होती. चंडिकेवर अनेक प्रकारचीं पुष्पें वाहिलीं होतीं. तिच्यावर बाल कमलें अर्पण केलीं होतीं, त्यामुळें भिल्ल लोकांनीं वनमहिषांचे हे डोळेच वाहिले आहेत काय! असें दिसत होते. अगस्त्याचे कळे वाहिले होते तेणेंकरून हीं सिंहाचीं नखेंच अर्पण केलीं आहेत काय! असें भासत होते. पळसाचीं फुलें वाहिलीं होतीं, त्यामुळें हीं रक्तानें भरलेलीं व्याघ्र नखेंच अर्पण केलीं आहेत काय! असें भासत होते. देवीच्या गळ्यांत मुंडमाळा घातली होती. अंगणांत लाल अशोकाची झाडें होतीं. त्यांवर तांबडे कोंबडे बसल्यामुळें भीतीनें यांस अकालीं हे आरक्तपुष्प गुच्छच लटकले आहेत काय! असें दिसत होते. चंडिकेस बळी दिलेल्या प्राण्यांचें रक्त पिण्याकरितां हे वेताळच आले आहेत काय! असे मोटमोठाले ताडवृक्ष दिसत होते व ते आपल्या फलरूप मुंडांचीं देवीस भेटच अर्पण करीत आहेत काय!

असें भासत होतें. त्या ठिकाणच्या केळी हालत असल्यामुळें तें भयंकर स्थान पाहून त्या कांपतच आहेत काय! असें वाटत होते. भयानें रोमांच युक्तच झाले आहेत काय! असे नारळाचे वृक्ष दिसत होते. भीतीमुळेंच ज्यांनीं आपले केश उभारले आहेत काय असे खर्जूरवृक्ष दिसत होते. अशा अनेक वृक्षांची तेथें दाटी होती. त्याठिकाणीं सिंहाच्या छाव्यांनीं हत्तींचीं गंडस्थळें फोडल्यामुळें त्यांतून रक्तानें भरलेलीं मोत्यें पडलेलीं होतीं. तीं देवीस अर्पण केलेल्या बळींतील शिजलेले दाणेच आहेत काय असें समजून कोंबडे त्यांस चोंचींत घेऊन टाकून देत होते! देवळाच्या अंगणांत पुष्कळ रक्त सांचलेलं होते त्यांस पाहून मूर्छित होऊनच पडलें आहे काय! अशा प्रतिबिंबांत आरक्त सूर्यबिंबानें त्या अंगणांतील रक्त संचय अधिकच लाल दिसत होता. देवालयांत नंदादीप जळत असल्यामुळें त्यावरचीं वस्त्रें धुरकटलेलीं दिसत होतीं. कडाकणे, साटोऱ्या इत्यादि पदार्थ व घंटांच्या माळा ज्यावर लोंबत आहेत व ज्यावर कथिलाच्या सिंहप्रतिमा आहेत अशी तेथील गाभाऱ्यांचीं दारें दिसत होतीं. चंडिकेच्या लाल लुगड्याचा घोळ पायाखालच्या चौरंगावर पसरल्यामुळें सर्व पशूंचीं जीवितें तिच्या चरणास शरणच आलीं आहेत काय, असें वाटत होतें. परशु, पट्टीश इत्यादि घातुक शस्त्रें टांगलेलीं असल्यामुळें त्यांची छाया पडून अंधःकार दिसत होता, त्यामुळें देवी खोल भुयारांत असल्याप्रमाणें दिसत होती. रक्तचंदनानें भरलेल्या बिल्वपत्रांच्या फळयुक्त माळा तिच्या गळ्यांत होत्या व कदंबपुष्पांच्याही माळा होत्या, त्यामुळें पशु बळी देण्याच्या वेळीं वाजत असलेल्या वाद्यांचे शब्द ऐकून तिच्या अंगावर हे रोमांचच उभे राहिले आहेत काय! असें दिसत होतें. पारधी लोकांच्या स्त्रियांनीं तिच्या कपाळावर शेंदराचा टिळा लावला होता. तिच्या कानावर डाळिंबाचीं फुलें ठेविलीं असल्यामुळें त्यांचीं गालावर लाल प्रभा पडली होती. रक्तानें व तांबुलानें तिचे ओठ लाल दिसत होते. भुवया वक्र होत्या व डोळे पिंगटवर्ण होते. रक्तवस्त्रानें तिचा सर्व देह वेष्टित असल्यामुळें ही काळी

प्रेमानें महाकालाकडे जाण्याकरितांच उद्युक्त झाली आहे काय! अशी दिसत होती. देवालयांत गुग्गूळ व धूप, दीप जळत होते. त्या ठिकाणीं मोठाल्या दाढीचे बोकड होते ते जसे कांहीं जटाधारी तपस्व्याप्रमाणें दिसत होते! उंदीर तोंड हलवीत असल्यामुळें जसे काय ते जपच करीत आहेत काय! असें भासत होते. ऋषीप्रमाणें कृष्णाजिनें पांघरूनच बसले आहेत काय! असें हरीण दिसत होते. डोक्यावर मणिदीप घेऊन कृष्णसर्प देवीचें अराधनच करीत आहेत काय! असें वाटत होते. कावळे ओरडत असल्यामुळें स्तुतिपाठकाप्रमाणें ते स्तवनच करीत आहेत काय! असें दिसत होतें. चंडिकेच्या जवळ एक वृद्ध द्रवीड ब्राह्मण आराधना करीत बसला होता. त्याच्या सर्वांगावर शिरा होत्या, व तो काळा होता, जळून काळाठिक्कर पडलेला झाडाचा सोट जसा सरडे व पाली यांनीं युक्त दिसतो तसा तो दिसत होता. आकाबाईचीं स्थानेंच काय! असें त्याच्या आंगावर वण दिसत होते. व त्यामुळें त्याचें शरीर काळेठिक्कर दिसत होतें. अंबिकेच्या पायां पडतां पडतां त्याच्या प्रतिवादींनीं भलतेंच अंजन घातल्यामुळें त्याचा एक डोळा गेला होता. दुसरा डोळा चांगला रहावा ह्मणून त्यांत औषधाची शलाका तो नेहमीं फिरवीत होता. कपाळास टेंगूळ आलें होतें. त्या द्रविडास अनेक अंजने व रसायनें करण्याचा छंद होता. एक्या मोठ्या पाटीवर त्यानें दुर्गास्तोत्र लिहिलें होतें. ताडपत्रांवरही पुष्कळ मंत्रतंत्रांचा संग्रह केला होता. द्रव्याचा निधि शोधणें व लोखंडाचें सोनें करणें इत्यादिकांचेंही त्याला वेड होतें! यक्षकन्याप्राप्तीचें साधन करण्याचाही त्याला नाद होता. गुप्त होण्याच्या मंत्रांचाही त्यानें संग्रह केला होता. पांढऱ्या मोहऱ्या मंत्रून तो पिशाचांच्या अंगावर फेंकीत होता. मंत्र ह्मणून तो टाळ्या व चुटक्या वाजवीत होता. तंबोरी वाजवून मान हलवीत तो गुणगुण गाणें गात होता. द्रविड भाषेत चंडिकेचें स्तोत्र ह्मणून तो नाचत होता. त्यानें फुलें ठेवण्याकरितां वनलतांचा एक मोठा करंडा तयार केला होता. व फुलें तोडण्याकारितां वेळूची आंकडी तयार केली होती. काळ्या

घोंगडीचे पट्टे त्यानें घेतले होते. अशा प्रकारें तें चंडिकेचें देवालय पाहिल्यावर **चंद्रापीडानें** त्या ठिकाणींच मुक्काम करण्याचा विचार केला.

नंतर **चंद्रापीड** घोड्यावरून उतरला आणि देवळांत जाऊन परमभक्तीनें त्यानें देवीस साष्टांग नमस्कार केला व प्रदक्षिणा करून पुन्हा नमस्कार केल्यावर भोंवतालचा शांत प्रदेश पहाण्याच्या कौतुकानें तो फिरूं लागला. इतक्यांत तो **द्रविड** ब्राह्मण रागावून मोठ्यानें ओरडत शिव्या देऊं लागला. हें **चंद्रापीडाच्या** दृष्टीस पडलें. तेव्हां **कादंबरीच्या** विरहानें तो खिन्न होता तरी त्याला हंसूं आल्यावांचून राहिलें नाहीं. मग आपले सैनिक त्याची चेष्टा करीत होते व हांसत होते, त्यांचें निवारण करून मोठ्या प्रेमानें मधुरभाषण करून त्यानें त्या ब्राह्मणाचा राग शांत केला. मग त्यानें त्यास त्याची जन्मभूमि, विद्या, स्त्री, पुत्र, घरदार, वय आणि विरक्त होण्याचें कारण विचारलें. तेव्हां त्या ब्राह्मणानें सर्व त्यास सांगितलें. बोलतांना त्यानें जी आत्मप्रशंसा व बडबड चालविली होती तेणेंकरून चंद्रापीडाच्या विरहातुर अंतःकरणास बरीच करमणूक वाटली. नंतर बोलण्याचें संघट्टण होऊन परिचय झाल्यामुळें **चंद्रापीडानें** त्यास तांबूल देवविला.

इतक्यांत भगवान् सूर्य अस्तास गेला. मग राजपुत्र व सैनिक लोक यांनीं झाडांच्या खालीं उतरण्यास जागा पाहून तेथें निजण्याकरितां जागा तयार केल्या. नंतर घोड्यावरची खोगरें काढून तीं झाडांच्या फांद्यावर ठेवून दिलीं. घोडे जमिनीवर लोळूं दिल्यामुळें त्यांचे श्रम दूर होऊन ते पुनः ताजादमाचे झाले. नंतर सेवक लोकांनीं त्यांस स्वच्छ धुतले आणि त्यांस वैरण व दाणा पाणी देऊन जमिनींत भाले रोवले होते त्यास बांधून टाकले. पुढें दिवसभर मार्गश्रम झाले होते, ते निद्रा करून घालवावे, ह्मणून जागजागीं सिपाईलोकांचे पहारे उभे केले आणि छावणींत जागजागीं आगट्या पेटविल्या, त्यांनीं अंधःकार पिऊन टाकल्यामुळें दिवसासारखा चहूंकडे प्रकाश पडला. नंतर इंद्रायुधअश्व ज्या ठिकाणीं बांधला होता त्या

ठिकाणीं राजपुत्राची शय्या तयार केली होती, तेथें **चंद्रापीड** गेला. तो शय्येवर बसला असतां विरहदुःखानें त्याच्या अंतःकरणास कांहीं एक नकोसें वाटलें. मग दर्शनास आलेल्या राजे लोकांस निरोप देऊन आपल्या प्रीतींतल्या सेवकजनाबरोबरही कांहीं एक न बोलतां डोळे झांकून तो स्वस्थ पडला. त्याचें मन प्रथमतः हेमकूटपर्वताकडे गेलें. **महाश्वेतेच्या** निष्कारण दयाळुपणाचें त्याला स्मरण झालें. आणि **कादंबरीचें** दर्शन हेंच आपल्या जीविताचें साफल्य असें त्यास वाटलें. त्या ठिकाणचें हिमगृह त्याच्या डोळ्यापुढें दिसूं लागलें व त्यामुळें तो मोठ्यानें श्वासोच्छ्वास टाकूं लागला. शेषनांवाच्या हारावर तो अधिक प्रीति करूं लागला, आणि मागें **पत्रलेखा** राहिली ती धन्य आहे, असें त्यास वाटलें. याप्रमाणें चिंतन करितां करितां सर्व रात्र निघून गेली.

प्रातःकाळीं उठल्यावर **चंद्रापीडानें** त्या द्रविड ब्राह्मणास पुष्कळ द्रव्य देऊन संतुष्ट केलें. नंतर तेथून निघून रम्य प्रदेशाचे ठायीं मुक्काम करीत करीत कांहीं दिवसांनीं तो **उज्जयिनीस** पोहोंचला.

**चंद्रापीडाची** स्वारी आली असें नगरवासी लोकांस समजतांच ते मोठ्या गडबडीनें धांवत गेले आणि हात जोडून नमस्कार करूं लागले. त्यावेळीं अंजलीपुट जोडल्यामुळें हे हजारों कमळेंच अर्पण करीत आहेत काय! असें भासलें. सर्व नागरिक लोकांचा सन्मान ग्रहण करीत करीत **चंद्रापीड** शहरांतून चालला तेव्हां राजसेवकांनीं मोठ्या आनंदानें धांवत जाऊन "युवराज **चंद्रापीडाची** स्वारी द्वारापाशीं आली" असें **तारापीड**राजास सांगितलें. हें ऐकतांच **तारापीड** हर्षभरित होऊन गडबडीनें उठला आणि आपल्या अंगावरचा शेला सांवरीत मोठ्या आनंदानें छत्रचामरादि राजचिन्हांनीं युक्त अशा राजे लोकांसहीत पायांनींच **चंद्रापीडास** भेटण्याकरितां गेला. आपला प्रिय पिता दृष्टीस पडतांच **चंद्रापीड** घोड्यावरून खालीं उतरला आणि मुकुटासहित आपलें मस्तक भूमीस लावून त्यानें त्यास नमस्कार केला. तेव्हां **तारापीडानें** आपले

हात पुढें करून 'ये! ये!' असें ह्मणून दोन्ही हातांनीं चंद्रापीडास पोटाशीं धरून दृढालिंगन केलें. नंतर चंद्रापीडानें पुढें आलेल्या सन्माननीय राजांस ही नमस्कार केले. मग राजानें त्यास हातीं धरून विलासवतीच्या मंदिरांत नेलें. तेव्हां तिनें सर्व स्त्रियांस-हवर्तमान पुढें जाऊन चंद्रापीडास आलिंगन केलें व जे मंगलोपचार करावयाचे होते ते केले. मग चंद्रापीड तेथें दिग्विजयाच्या गोष्टी बोलत कांहीं वेळ बसला व नंतर तो शुकनास प्रधानाच्या भेटीकरितां गेला. तेथें गेल्यावर त्यानें शुकनास प्रधानास नमस्कार केला. प्रधानानें मोठ्या आनंदानें चंद्रापीडास आलिंगन केलें. नंतर चंद्रापीडानें शुकनास प्रधानास पुत्राचें कुशल वर्तमान सांगून त्यास सैन्य रक्षणाकरितां मागें ठेविलें आहे, असें सांगितलें. मग प्रधान स्त्री मनोरमा हिची भेट घेऊन तो पुनः आपल्या मातेच्या मंदिरीं आला. तेथें स्नानोपहारादिकर्मे उदासीनपणानें केल्यावर दोनप्रहर दिवसाच्या सुमारास तो आपल्या मंदिरास गेला. त्या ठिकाणीं गेल्यावरही त्यास चैन पडेनासें झालें. कादंबरीवांचून सर्व व्यर्थ आहे! असें त्यास वाटून कादंबरी कडील बातमी ऐकण्याविषयीं तो इतका उत्कंठित झाला कीं, वर मागण्याच्या वेळेस जसा कोणी उत्कंठित होतो, किंवा अमृत निघण्याच्या वेळेस देव जसे उत्कंठित होऊन वाट पहात बसले, तसा तो वाट पहात बसला.

ह्याप्रमाणें कांहीं दिवस गेल्यावर मेघनाद पत्रलेखेस घेऊन आला आणि त्यानें तिला चंद्रापीडाजवळ पोंहचविलें. ती दृष्टीस पडतांच चंद्रापीडास मोठा आनंद झाला. अगोदर ती प्रीतींतली होतीच, त्यांत कादंबरीची प्रीति संपादून तिजकडून आल्यामुळें तर ती अधिकच प्रिय वाटूं लागली. मग त्यानें तिचा मोठा सत्कार केला. आणि नमस्कार करणाऱ्या मेघनादाच्या पाठीवरून हात फिरवून त्यानें त्याचाही गौरव केला. मग खालीं बसल्यावर तो ह्मणाला, "पत्रलेखे! भगवती महाश्वेता व मदलेखेसह देवी-कादंबरी खुशाल आहेना? तसेंच तमालिका व केयूरक हे

खुशाल आहेतना! हें सर्व मला सांग." ती ह्मणाली, "महाराज, आपण विचारतां त्याप्रमाणें सर्व खुशाल आहेत, सर्व सख्या व दासीयांसहवर्तमान **देवीकादंबरीनें** आपणास नमस्कार सांगीतला आहे." इतकें ऐकतांच **चंद्रापीडानें** लोकांस निरोप देऊन **पत्रलेखेस** घेऊन तो आपल्या मंदिरांत गेला. त्या ठिकाणीं सेवक होते त्यांस बाहेर जाण्यास सांगून तो लतामंडपाच्या खालीं जाऊन बसला आणि मोठ्या उत्कंठेनें **पत्रलेखेस** ह्मणाला पत्रलेखे, "सांग बरें! त्या ठिकाणीं तूं कसी राहिलीस? किती दिवस होतीस? **देवीकादंबरीची** तुजवर कशी काय प्रीति होती? त्या ठिकाणीं कोणत्या कोणत्या गोष्टी घडून आल्या? व कोणत्या कोणत्या गोष्टी चालत होत्या? माझी फारसी, अठवण कोणाला होत होती? मजवर विशेष प्रीति कोणाची अढळून आली!" असें **चंद्रापीडाचे** प्रश्न ऐकून **पत्रलेखा** ह्मणाली, 'महाराज, ऐकावें मी सर्व सांगतें.'

"तेथून महाराजांची स्वारी, निघून गेल्यावर **केयूरकाबरोबर** मी परत गेलें. आणि त्या दिवशीं सर्व वेळ माझ्या डोळ्यासीं डोळा, अंगाला अंग, हातांत हात, वारंवार मला हाका मारणें, यांत देवीचा सर्व वेळ गेला! संध्याकाळच्या वेळीं माझा हात धरून त्या हिमगृहांतून **देवीकादंबरी** बाहेर पडली, आणि स्वच्छंदपणानें इकडे तिकडे फिरत असतां सर्व दासींना पलीकडे जाण्यास सांगून ती आपल्या प्रिय बालोद्यानांत गेली. त्या ठिकाणीं पाहिलें तों जशा यमुनेच्या लाटाच! आहेत काय अशा पाचूच्या पायऱ्यावरून शुभ्र ओट्यावर चढून रत्नजडित खांबाशीं उभी राहिली. नंतर फार वेळ उगींच विचार करीत बसल्यावर कांहीं बोलण्याच्या इच्छेनें बराच वेळ ती माझ्या तोंडाकडे पहात बसली. मदनाग्नीनें संतप्त झाल्यामुळें तिच्या अंगावाटें घामाच्या धारा वाहूं लागल्या व खिन्न होऊन थरथर कांपूं लागली. मग तिचा अभिप्राय जाणून, काय आज्ञा असेल ती सांगावी, अशी मी तिची विनंती केली, तरी तिचे अवयव कांपत होते; ते जसे कांहीं ही गुप्त गोष्ट सांगू नको

ह्मणून तिचें निवारणच करीत आहेत काय असें दिसलें. आपलें रहस्य कोणास ऐकूं जाऊं नये ह्मणून मणिमयभूमींत आपली प्रतिमा पडली आहे तीस पायाचे अंगठ्यानें दूर जाण्याकरितां ढकलीतच आहे काय! कानावरच्या कमळांवर आलेल्या भ्रमरास घर्म नाहींसा करण्याच्या निमित्तानें, हालविलेल्या पदरानें दूरच करीत आहे काय! वनदेवता ऐकतील ह्मणून घाबरेपणानेंच इकडे तिकडे पहात आहे काय! अशी ती कादंबरी बोलण्याविषयीं उतावीळ झाली असतां ती लज्जेमुळें कांहीं एक बोलेना तेव्हां मदनाग्नीनें दग्ध केल्यामुळें! किंवा नेत्रोदकानें वाहून नेल्यामुळें? किंवा दुःखाच्या भरानें लादल्यामुळें? किंवा मदनबाणांनीं छिन्नभिन्न केल्यामुळें? किंवा श्वासोच्छ्वासानीं उडवून दिल्यामुळें? अथवा श्वासावर आलेल्या भ्रमरांनीं व्यापून टाकल्यामुळें? कशानें असेल तें असो! तिच्या तोंडांतून वाणी निघेनाशी झाली. तिच्या नेत्रांतून टपटप अश्रुबिंदु पडूं लागल्यामुळें हजारों दुःखाच्या गणनेकरितां ही मौक्तिकांची जपमाळच तयार करीत आहे काय! असें वाटलें. नंतर मी तीस ह्मटलें, "बाई साहेब! हें काय तुह्मी आरंभिलें आहे?" असें ह्मटल्यावर तिनें रडून रडून आपले डोळे लाल केले होते ते पुसलें. त्या वेळीं तिच्या हातांत पुष्पमाला होती ती तिनें फास घेण्याकरितांच हातांत घेतली आहे काय? व भुवया वर केल्यामुळें ही मृत्यूचीच वाट पहात आहे काय? असें वाटलें. मग ती मोठ्यानें उसासे टाकीत बसली. तिच्या मनांतील दुःखाचा तर्क करून मी तिला वारंवार विचारलें. ती तर लज्जेमुळें खालीं पाहून पायाच्या नखांनीं केतकीच्या पानास टोंचीत असल्यामुळें जें बोलावयाचें तें लिहीतच आहे काय! व ओठ हालत असल्यामुळें श्वासावर आलेल्या भ्रमरांस हळूहळू सांगतच आहे काय! अशी दिसली. फार वेळ मजकडे पाहून पुन्हा अश्रु ढाळूं लागल्यामुळें मदनाग्नीच्या धुरानें धुरकटलेल्या आपल्या वाणीस स्वच्छ धुतच आहे काय! व दंतकिरण पडल्यामुळें शोकाच्या आवेशानें नष्ट झालेल्या अक्षरांस गुंफितच आहे काय, असें

वाटलें!—मग ती मोठ्या कष्टानें बोलण्यास तयार झाली आणि मला ह्मणाली, "पत्रलेखे! आईबाप, महाश्वेता, मदलेखा; फार काय? हें माझें जीवित सुद्धां मला प्रिय वाटत नाहीं. इतकी तूं मला प्रिय वाटतेस. सर्वांचा तिरस्कार करून माझें मन तुजवरच विश्वास धरून कां राहतें हें समजत नाहीं! तर मी आपलें दुःख दुसरे कोणास सांगूं? कोणाच्या दुःखाशीं मी आपलें ताडून पाहूं? मला सहन न होणारा दुःखभार तुला एकदांचा पोट उकलून सांगावा आणि हा मेला जीव सोडावा असा मी निश्चय केला आहे! यांत खोटें असेल तर तुझ्या गळ्याचीच शपथ. ज्याला हें वर्तमान माहित झालें आहे अशा मनाची देखील मला लाज वाटते. मग दुसऱ्याला समजल्यापासून लाज वाटते ह्मणून काय सांगावें? मज-सारखी स्त्री चंद्रप्रकाशाप्रमाणें निर्मळ अशा आपल्या वंशास लोको-पवादाचा डाग कसा लाविल? व कुलक्रमास उचित अशा लज्जेचाही त्याग कसा करील? इतर कन्याजनास उचित जी चपलता तिजकडे मी आपली चित्तप्रवृत्ति कशी लावावी? मला मातापितरांनीं संकल्पून दिलें नाहीं. वाडवडिलांनीं अनुमोदन दिलें नाहीं. तेव्हां मी आतां कांहीं निरोप पाठवीत नाहीं व मी आपला आकारही दाखवीत नाहीं. राजकुमारानें मला भयभीत अनाथ व नीचासारखें करून वाडवडिलांनीं नांवें ठेवण्याजोगें केलें तर तूंच सांग बरें! हाच काय थोरांचा थोरपणा, व हेंच काय परिचयाचें फळ? कमलतंतूसारखें माझें मन त्यानें अगदीं दुखवून टाकिलें. मजसारख्या कन्याजनास फसविणें हें अशा पुरुषास योग्य नाहीं! मदनाग्नी प्रथमतः लज्जेस जाळून नंतर देहास जाळीत आहे. मदन-बाण प्रथमतः विनयादिगुणांस तोडून टाकतात नंतर मर्मे तोडतात. तेव्हां मागणें इतकेंच आहे कीं, जन्मांतरीं तुजबराबर सहवास व्हावा. तुजहून मला आतां दुसरें कोणीच प्रिय वाटत नाहीं. तर आतां मागणें इतकेंच कीं, प्राणत्यागरूपी प्रायश्चित्त घेऊन मला लागले-ला कळंक दूर करतें." इतकें बोलून उगीच बसली.

मला यांतील खरें मर्म न समजल्यामुळें मी आपल्या जागीं खजील झाल्यासारखी, भयभित झाल्यासारखी, आश्चर्ययुक्त झाल्यासारखी व देहभानावर नसल्यासारखी होऊन खिन्नपणानें देवीस विनंती केली कीं, "आमच्या महाराजांनीं असा कोणता अपराध केला कीं, त्यामुळें शुभ्रकमलासारखें सुकुमार देवीचें मन इतकें दुःखित झालें!" हें ऐकल्यावर पहिल्यानें मी आपलें जीवित सोडीन व नंतर देवीनें सोडावें, हें ऐकून ती पुनः ह्मणाली, " मी सांगतें ऐक. तो कुमार प्रतिदिवशीं माझ्या स्वप्नांत येऊन मला एकांतांतील निरोप सांगण्याकरितां पिंजऱ्यांतील राघू व मैना यांस दूर करितो. मी निजले असतां कानावरच्या केसांत खोंवलेल्या फणीवर संकेतलेख लिहितो! घर्माच्यायोगानें पुसट झालेले व अश्रुबिंदू पडल्यामुळें विरहावस्था सुचविणारे असे मदनलेख धाडतो! आपला मूर्तिमंत अनुरागच काय अशा लाक्षारसानें माझे पाय बळेंच रंगवितो! देहभानावर नसल्यासारखा तो आपला देह माझ्या नखांत प्रतिबिंबित झाला असतां आपल्याला धन्य मानतो! खोटी प्रौढी मिरविणारा तो उपवनांत मला एकटीला पाहून माझ्या पाठीस लागतो! भयानें पळून जातांना वेलीच्या पल्लवास माझा पदर अडकला असतां माझें आलिंगन करतो! तो माझ्या स्तनावर वेलबुटी काढतो, तेणेंकरून तो कुटिल माझ्या सरळ हृदयास जसें काय वक्रपणाचें वळणच लावतोसें वाटतें ! माझ्या गालावर घर्मबिंदु आले असतां हृदयांतील उत्कंठा तरंगावरून आलेला आपल्या मुखांतील वारा त्यावर घालतो! लटकें चातुर्य दाखविणारा तो माझ्या कानावर ठेवण्याकरितां घेतलेले कमल घामानें खालीं गळून पडलें असतां आपलें हस्तकमलच त्याठिकाणीं ठेवतो! माझ्या प्रिय बालबकुलाचें पोषण होण्याकरितां मी आपल्या तोंडांत मद्याचा गुळणा घेतला असतां तो दांडगा आपल्या तोंडांतच तो घेतो. आणि अशोकवृक्षास प्रफुल्लित होण्याकरितां मी पादप्रहार करीत असतां निर्लज्जपणानें तो मध्येंच येऊन आपलें मस्तकावर घेतो. तर आतां सांग बरें बाई! पत्रलेखे! मदनसंचरानें वेडावलेल्या व शुद्धीवर नसलेल्या त्या चंद्रापीडाचें

कोणत्या प्रकारानें निराकरण करावें? त्याचे निर्भर्त्सन केलें तरी तो विनोदच समजतो. भाषण न केलें तरी तो मर्यादा राखिली असें समजतो! त्याच्या दोषाचा उच्चार केला असतां तो ह्या योगानें आपलें स्मरण होत आहे असें समजतो! त्याचा अपमान केला तरी तो विशेष प्रेमाचें कृत्य समजतो! लोकोपवादाचेंही तो भूषणच समजतो!

असें तिचें भाषण ऐकून मला फारच हर्ष झाला आणि मी मनांत ह्मटलें, कामदेवानें महाराज **चंद्रापीडाकडे** हिचें मन फारच आकर्षिलें आहे. खरोखरच **कादंबरीच्या** मिषानें साक्षात् मदनाची मनोवृतिच जर **चंद्रापीडावर** प्रसन्न झाली आहे तर त्याच्या अंगच्या साहजिक गुणांनीं त्याजवर मोठेंच उपकार केले. त्याच्या यशानें दशदिशा शुभ्र केल्या आणि तारुण्यानें प्रीतिरसरूप समुद्राच्या तरंगाकडून रत्नांची वृष्टि करविली आणि त्याच्या शरीरकांतीनें चंद्रावर देखील आपलें तेज पाडिलें. मलयवायु व चंद्रोदय यांना फार दिवसांनीं असा सुसमय मिळाला. वसंतऋतूसही योग्य फळ मिळालें. आणि रति व मदन यांनीं अवतार घेतला? मग हंसून मी उघडपणें ह्मणालें, "बाईसाहेब! असें जर आहे तर कोप सोडून द्या. आणि प्रसन्न व्हा. मदनानें केलेल्या अपराधाबद्दल आमचे महाराजांस आपण दोष देण्यास योग्य नाहीं.. हे सर्व खेळ महाठक जो मदन त्याचे आहेत! महाराजांचे नाहींत." असें माझें भाषण ऐकल्यावर ती मोठ्या कौतुकानें मला ह्मणाली, "हा मदन किंवा जो कोणी मेला असेल त्याचें स्वरूप तरी कोणतें? तें मला सांग." मग मी विनंती केली, "देवी, त्याला रूप कोठचें? शरीररहित हा अग्निच आहे! जाळांचे लोट प्रकट न करतां हा ताप करतो! धुरांचे लोट प्रकट न करतां हा डोळ्यावाटे पाणी पाडतो! अंगावर राख न उडवितां शरीर पांढरें करतो! ह्या त्रिभुवनांत असा कोण आहे कीं, जो मदनाच्या बाणास लक्ष्य झाला नाहीं, होत नाहीं, किंवा होणार नाहीं? यापासून कोणाला त्रास होत नाहीं? त्याचे पुष्पाचेच बाण आहेत तरी त्यांनीं तो मोठमोठ्या बलाढ्य पुरु-

षांस देखील चीत करून टाकतो! त्यानें ज्या कामिनीस्त्रियांवर आपलें अधिष्टान केलें आहे त्या स्त्रियांस चिंतेमुळें आपल्या स्त्रियाचें मुखचंद्र आकाशांत इतकें दिसतात कीं, तें आकाश देखील त्यांस पुरत नाहींसें वाटतें! प्रियाच्या आकृती काढण्यास एवढें विस्तीर्ण भूमितळ परंतु तें अल्प वाटतें! वल्लभाच्या गुणांची गणना करण्यास सर्व संख्या थोडीच वाटते! प्रियतमाचे गुणानुवर्णन करण्यास साक्षात् सरस्वती जरी बसली तरी तिला देखील त्या मुखजडच समजतात! आणि प्राणवल्लभाच्या समागमसुखाचें मनन करीत असतां दीर्घकाळ देखील अल्पच वाटतो!

असें माझें भाषण ऐकून क्षणभर विचार करून ती ह्मणाली, "पत्रलेखे, तूं ह्मणतेस त्याप्रमाणें मेल्या मदनानें माझे पंचप्राण राजकुमाराकडे लाविलें आहेत खरें! मदनाचीं जीं लक्षणें तूं सांगितलीं तीं सर्व माझें ठायीं आहेत. तूं माझ्या प्राणाहून वेगळी नाहींस, या करितां तुलाच ह्मणून विचारितें. कीं, या वेळेस मीं काय करावें? तें मला सांग. अशा प्रकारच्या गोष्टी मला मुद्लींच माहीत नाहींत. सांप्रत मी वाड वडिलांनीं नांवें ठेवण्याजोगीं झाळें आहे. लज्जेमुळें तोंड दाखवूं नये असें मला वाटत आहे व यामुळें जीवित ठेवण्यापेक्षां तें सोडणेंच बरें असें मला झालें आहे." असें ती बोलत आहे तों मी तिला ह्मटलें, "असळे मेले भलतें मरण्याचें नांव कशाला पाहिजे! अराधना केल्यावांचून प्रसन्न झालेल्या मदनानें आपणाला उत्तम वर दिला आहे. त्याबद्दल आपले मातापितर व वाडवडील तरी काय ह्मणणार आहेत? ज्या वेळेस मदन पित्याप्रमाणें तरुणकन्येस देण्याविषयीं संकल्प करतो व मातेप्रमाणें अनुमोदन देतो, सखीप्रमाणें उत्कंठा उत्पन्न करतो व उपमोतप्रमाणें प्रेमाचे उपचार शिकवितो, त्या वेळेस कोणाचीच अपेक्षा रहात नाहीं. ज्यांनीं स्वयंवर विधीनें पतिवरले आहेत, अशा कन्या आपणास किती ह्मणून सांगूं? असें नसतें तर धर्मशास्त्रांत सांगितलेला स्वयंवर विधि अनर्थकारकच होता याकरतां प्रसन्न व्हा आणि मरणाविषयीं जो आपण आग्रह धरला आहे तो

सोडून द्या. मी तुमच्या पायांची शपथ वाहतें. मला आज्ञा करा कीं, मी अशीच जाते आणि तुमच्या प्रियवल्लभास घेऊन येतें." असें माझें भाषण ऐकून तीस फारच आनंद झाला आणि प्रेमार्द्र-दृष्टीनें ती मजकडे इतकी पाहूं लागली कीं, दृष्टीनें माझें प्राशनच करते आहे काय! असें वाटलें. नंतर दाबून धरलें तरी मदनबा-णांनीं जर्जर झालेल्या लज्जेचा भेद करूनच बाहेर पडलेल्या प्रीती-च्या विकासांनीं ती व्याप्त झाली. अत्यानंदामुळें तिच्या अंगावर रोमांच उभे राहिले आणि मला देण्याकरितांच कीं काय ती आपल्या गळ्यांतील मोत्यांचा हार काढूं लागली! तेव्हां मदनानें गळ्यांत घातलेला मरणपाशच काढीत आहे काय असें वाटलें! नंतर पोटांत आनंद मावेनासा झाला होता तरी बालस्वभावास सहाजिक असणाऱ्या लज्जेचा स्वीकार करून ती हळूहळू बोलूं लागली.

ती ह्मणाली, "तुझी मजवर मोठी प्रीती आहे? मजसारख्या अल्पवयी स्त्री मुलींस एवढा प्रौढपणा कोठला? ज्या आपण होऊन निरोप पाठवितात किंवा उठून जातात त्या सहासकर्म करणाऱ्या दा-लगज पोरी ह्मणायाच्या! तर असलें सहास कर्म करण्यास मला लाज वाटते. व निरोप तरी कसा पाठवावा हेंही मला समजत नाहीं. मला आ-पण अतिप्रिय अहां असा पाठवावा तर फिरून फिरून तेंच तें येतें! मी आपली, प्रिया आहे असें आपण होऊन ह्मणणेंही नीट नाहीं! माझी आपणावर मोठी प्रीति जडली आहे, असें ह्मणणें हें वेश्ये-सारखें होते! आपणावांचून मी वांचावयाची नाहीं, असें ह्मणणें अनुभवाला विरुद्ध आहे! मदन मला मोठी पीडा करतो, यांत आपलीच फजिती आहे! मदनानें मला आपणास अर्पण केलें आहे, असें ह्मणणें हें आपण होऊनच चिकटण्यासारखें होय! मी आपणाला बळेंच वरलें आहे, हा व्यभिचारी स्त्रीसारखा दांडगेपणा दिसतो! आपण माझ्या भेटीस अवश्य यावें, असें सांगून पाठविणें ह्मणजे आपला डौल मिरवण्यासारखें होय! मीच होऊन येतें, असें सांगून पाठविणें ह्मणजे आपला उतावीळपणा दाखविणें होय! आपले ठिका-

णींच मी आसक्त आहे असें ह्मणणें, हें आपल्या प्रीतीस लघुत्व आणण्यासारखें होय! आपला अंगिकार होणार नाहीं ह्या शंकेनें निरोप न पाठविणें हा अज्ञानीपणाचा समज होय! मी आपणास नकोसी वाटल्यास मला फारच दुःख होईल, असें ह्मणणें हें फारच सलगीचें होतें! मी मेल्यावर आपणास प्रीती करून येईल, ही गोष्ट तर असंभवनीयच दिसते!

पूर्वार्ध समाप्त.

# कादंबरीसार.

## उत्तरार्ध.

देहद्वयें चि घडिली तनु ती जयांची
संधी कुठें हि न दिसे जणुं एक साची-
व्हावी सुदुर्घट कथा पुरती म्हणूनी-
वंदूं जगत्पितर ईश तशी भवानी ॥ १ ॥

सा थोर हालति सटा[1] मुख उग्र ज्याचें ।
हातीं गदा जलज[2] चक्र हि खड्ग साचे ।
ऐसें जयें प्रकटिलें नरसिंह-रूप ।
विश्वेश ही हरि नमूं धरुनी हुरूप ॥ २ ॥

सन्मान देतिहि घरोघर लोक ज्यास ॥
केली कथा रुचिर, ये न तशी परास[3] ।
माझें सुपुण्य म्हणुनी सुत मी जयाचा-
झालों, पित्यास नमिं वाक्पति[4] होय साचा ! ॥३॥

बाणीसवें जनक[5] तो परलोकिं गेला
कादंबरीनवकथारसभंग झाला !
दुःखी बघून रसिकां, रचिली पुढें ही
दावावया न इतरांस कवित्व कांहीं ॥ ४ ॥

---

१ मानेवरचें आयाळ. २ शंख. ३ दुसऱ्यास.
४ वाणीचा पति (बृहस्पति). ५ पिता.

केला गद्यात्मक जरि असे ग्रंथ तातें, सुवाणी-
साची तैशी हृदय द्रववी, शक्ति साचीच जाणीं!।
शुभ्रांशूची अमृतसुरसस्थान कांतीच एक-
आहे दक्षा विधुमणिचिया ते द्रवाला, विलोक! ।५।

गंगेस येथ सरितों मिळती कितीक
तद्रूप जाती उदधीप्रति त्या विलोक
आसिंधुगामिपितृवाङ्मयसुप्रवाहीं
छोटीं स्वगीस रचण्यास कथा पुरी ही ॥ ६ ॥

कादंबरीरसभरांत बुडून राही-
हा लोक, त्यास न रुचे मग अन्य कांहीं!
तच्छेष पूर्ण करितों धरुनीच धैर्य
वाणी नसे सुरसवर्ण जरी मदीय! ॥ ७ ॥

गर्भीं फळें धरिति रम्य विकास ऐशीं-
जीं लाविलीं सुकृति योग्य करून त्याशीं
बीजें, सुभूंत जनकें, बहु पुष्ट झालीं-
ज्यां तत्सुतें, न पर, संहृतं तींच केलीं! ॥ ८ ॥

---

१ चंद्र. २ चतुर. ३ चंद्रकातमणि. ४ नद्या. ५ समुद्र. ६ समुद्रापर्यंत वाहणारा (सर्वत्र प्रसिद्ध) पित्याच्या वाणीरूप प्रवाहांत. ७ मी आपल्या वाणीस. ८ त्याच्या पुत्रानें. ९ गोळा.

॥ श्री ॥

# कादंबरीसार.

रजोगुण धरी हरी सकल विश्व निर्मावया
परेश अवलंबि ही सुगुण सत्त्व रक्षावया।
तमोगुण वरी तरी विभु जगास नाशावया
त्रयीमय गुणत्रयें युत जगत्पती वंदुं या! ॥ १ ॥

सुरासुरांच्या नमनप्रसंगीं
जी लागली होय ललाटभागीं
पावो मला ती शिवपादधूली
संसारतापा हरि स्याच कालीं ॥ २ ॥

उत्कर्ष पावो हरि, शत्रुवक्षीं-
आरक्तनेत्रीं क्षण एक लेक्षी।
रक्तें जणूं तें भरलें फुटूनि-
भेदास जों इच्छि तया दुरूनि! ॥ ३ ॥

श्री भर्वुच्या या पदसारसांतें
मी वंदितों मौखरिवंद्य सातें।
अनेकभूपालकिरीटतेजें
प्रकाशिलेलें दिसतें अहा जें! ॥ ४ ॥

अकारणद्वेष करीच रागें
कोणा खलापासुन भी न? सांगें!

---

१ वेदत्रयरूपी. २ पाही. ३ भर्वु नावाचा गुरु. ४ पादकमल. ५ भर्वुचे शिष्य (या नावाचे राजे)

मुखीं अहीच्या विष जेंवि आहे
असभ्र तेंदुर्वच तेविं राहे ॥ ५ ॥

खल खळखळशब्दा शृंखलेच्या परी ते-
करिति मलिनें अंगीं दुःख देती जनांतें
झुणझुणु सुखकारी नूपुरांच्या परी हे-
वदति वचन, देति सौख्य ही संत पाहें ॥ ६ ॥

सुभाषितसुधारसद्रव न दुर्जनाच्या मुखीं-
शिरे, अमृत जेवि न द्युमणिशत्रुच्या नीरखीं
सुभाषित हृदीं धरी सुजन नित्य तो भक्तिनें
जसा हरि धरी उरीं सुमणिकौस्तुभ प्रीतिनें ॥७॥

सुशब्दांनीं युक्ता रसभरित होई जरि कथा
स्वयें ये शय्येच्या वरि नववधू सुंदर तथा-
असे ती सर्वांच्या करित हृदयीं प्रीति बहुव
तसें चित्तीं त्यांच्या कुतुक करिते ही अभिमत॥८।

नवीन दीपापरि उज्वलोर्थीं-
प्रबद्ध आहेत कथा पदार्थीं
सुश्लेषयुक्ता हरतीन कां त्या ?
माला जशा चंपकयुक्त कांता ॥ ९ ॥

वात्स्यायनाच्या सुकुलांत जन्मला
होई जगीं ख्यात गुणीं सुधी भला ।
वैश्यादिकांनीं नतपादपंकज-

१ खलाचें भाषण. २ दुष्ट, मळकट. ३ पादभूषणें.
४ राहु. ५ उत्तम अर्थांनीं. ६ पदें, व अर्थ, वस्तु.
७ अर्थांतरें, स्पर्श. ८ ओजो गुण, शोभा.

स्वयंभुचा अंश कुबेर कीं द्विज ॥ १० ॥

वेदादिपाठें करि पाप शांत
यज्ञार्थसोमें बहु होय पूत ।
समग्रशास्त्रस्मृतिवासभूत
यदाननीं गी करि वास मूर्त ॥ ११ ॥

सवेदशास्त्रां प्रति नित्य ऐकतां-
होई शुकां पाठ हि सारिकायुतां ।
शिष्यांस शंका पढतांचि वाटतां-
पक्षी तयां सांगति तेथ तत्वतां ! ॥ १२ ॥

ब्रह्मा हरीपासुन जेवि झाला
शुभ्रांशु जैसा सुत सागराला ।
हो पक्षिराजा विनतेस जेंवी
त्यांपासुनी अर्थपती हि तेंवी ॥ १३ ॥

प्रतिदिन बहु चाले शास्त्रविद्याविचार
नवनव पढती येंद्रेहिं सच्छिष्य फार ।
श्रुतिमधुरसुरांनीं कर्ण जाती भरून
दिनमुखि बहु ऐकूं घोष येई दुरून ! ॥ १४ ॥

विध्युक्त दानीं बहु भूषवीलें
सुवीरभूपींहि सुयुक्त झाले-
ऐशा मखांनीं सुरलोक जिंकी
गजापरी यूंपकरीं लहून कीं ! ॥ १५ ॥

---

१ ब्रह्मदेव. २ ज्याच्या मुखांत. ३ वाणी. ४ मूर्तिमंत.
५ गरुड. ६ कुबेर ब्राह्मणापासून. ७ ज्याच्या घरीं.
८ वेद. ९ प्रातःकाळीं. १० यज्ञस्तंभरूपहस्त.

यालागीं होई सुत चित्रभानू
सर्वांत तो उत्तम जेंवि भानू ।
वेदांत शास्त्रांतहि पूर्ण वानूं
शैलामधें ज्या परि शुभ्रसानु ॥ १६ ॥

महात्म्याचे त्याचे गुणगण किती निर्मळ पहा
निरंकों इंदूच्या अतिधवल रैश्मीपरि अहा !
अमित्राच्या वक्षीं शिरति मलिनीं सत्वर तसे
नृसिंहाचे पूर्वीं खरनखररश्मी झणिं जसे ॥ १७ ॥

दिक्सुंदरीचा कचभार कीं नव
श्रुतिश्रृंर्गातील तमालपल्लव
मलीन ही तो, करि कीर्ति पांडुर
घाले मखीं यद्गृहीं धूम्र धूसर ॥ १८ ॥

या होमकालीं बहु धर्म चालतां
सरस्वती त्यास पुशी करीं स्वतां ।
यत्कीर्तिनें लोक समस्त पांडुर
या लागी होई सुत बाण भासुर! ॥१९॥

या बाणभट्टें रचिली असे ही
कादंबरी बुद्धिबळेंच पाहीं ।
जिचें करी साम्य, गमे न चित्ता
बृहत्कथा वासवपूर्वदत्ता ॥ २० ॥

---

१ कैलास. २ निष्कलंक. ३ किरण. ४ शत्रु. ५ कान. ६ यज्ञ. ७ ज्याच्या घरीं. ८ वासवदत्ता.

# कादंबरीसार.

## उत्तरार्ध.

### [ कादंबरीचें भाषण पुढें चालू. ]

पत्रलेखे, आणखी त्या राजकुमारास तूं आणिलें तरी माझ्या अस्थिरपणामुळें लाजलीच काय अशी लज्जा मला तोंड पुढें करूं देणार नाहीं. मदनपीडेनें झालेला विलक्षणपणा मला त्याजपुढें जाऊं देणार नाहीं. करावें कोणतें, न करावें कोणतें, यामुळें झालेला गोंधळ त्याजपुढें मला हूं कीं चूं करूं देणार नाहीं. आपण होऊन पुढें व्हावयाचें, या हलकेपणाबद्दल तर कसेंसेंच वाटलें. त्याची इच्छा नसतां, बळेंच त्यास आपल्या बद्दलचीं भीति तर, बाई, समोर उभी राहूं देणार नाहीं! वाडवडिलांच्या लज्जेमुळें, राजकार्याच्या आसक्तीमुळें, आप्तमित्रांच्या सहवाससुखामुळें, फिरून इतक्या लांब जाण्याची दगदग कोण करतो यामुळें, घरीं राहण्याच्या प्रीतीमुळें, किंवा इकडे येण्याची इच्छा नसल्यामुळें, अथवा मजवर तितकी प्रीति नसल्यामुळें माझ्या स्नेहासाठीं प्रिय सखीनें ( पत्रलेखेनें ) त्याच्या पायां पडून व खटपट करूनही जर त्याला आणितां आलें नाहीं, तर मग या जीविताचा काय उपयोग? त्याला इकडे येण्याला आतां अधिक तें काय आहे? त्यानें पाहिलेली तीच ही कादंबरी!

त्यानें मला पाहिलें त्या संध्याकाळच्या वेळीं, वसंतऋतु असल्यामुळें भ्रमर गुंजारव करीत होते. चक्रवाकपक्ष्यांची फुटाफुट झाल्यामुळें त्यांच्या स्त्रियांचे करुणस्वर चालू होते, त्यामुळें विरहीजनांची मनें दुःखाकुल झालीं होतीं. प्रफुल्लित कमळें व पुष्पें

यांतील सुगंध घेऊन वायु मंद मंद वाहत होता व त्यामुळें मनाला आनंद वाटत होता. पुष्प विकासाबरोबर मानिनी स्त्रियांचे अभिमान ग्रंथी दूर करण्याविषयीं चतुर असा मदन सिद्ध होता. कुपित अभिमानी स्त्रियांचा राग घालविण्यासाठीं विनोद करणारा सेवकजन गात होता. तरुणी स्त्रियांच्या त्या ठिकाणीं उटी करितां कर्पूर चूर्णानें मिश्रित असा चंदनाचा गोळा तयार करून ठेविला होता. गौर गालाचें अनुकरण करणारा असा चंद्रमा चंद्रिकरूप जलाचा वर्षाव करीत गगन मंडळास सुशोभित करीत होता. प्रफुल्लित कमलिनी वरून वारा वाहत असल्यामुळें जिकडे तिकडे सुगंध सुटला होता. चंद्रकांत पाषाणांस किरण स्पर्श झाल्यामुळें पाझर सुटून ते झुळझुळ वाहत होते. अति मनोहर अशा मौक्तिक शिलेवर चंदनरस शिंपडल्यामुळें जलबिंदु दिसत होते, ते, चंद्र किरणांचें स्पर्शसुख झाल्यामुळें तिला घर्मबिंदुच आले आहेत काय, असें दिसत होतें. जेथें पुष्पसुवासांचा घमघमाट सुटला होता, पाण्याचे फवारे चालल्यामुळें बाहेरचा दाह मात्र कमती होत होता, आणि ज्या ठिकाणीं अनेक रमणीय पदार्थांचे स्थानच अशा क्रीडापर्वतावरील हिमगृहांत मौक्तिक शिलेवरच्या पुष्पशय्येवर तळमळत पडलेली जी चंद्रापीडानें पाहिली, तीचना ही हतभाग्य **कादंबरी !**

तो **चंद्रापीड** समोर आला असतांही ज्यांनीं त्यास पोटभर पाहिलें नाहीं, तेच मेले हे डोळे ! तो आंत प्रविष्ट झाला असतांही ज्याला त्यास पक्कें धरून ठेवतां आलें नाहीं, तेंच मेलें हें वेडें हृदय ! तो फार वेळ येथें असतांही जें उदासीनपणानें राहिलें, तेंच मेलें हें शरीर ! वाडवडील काय ह्मणतील या शंकेनें ज्यानें त्यास वरिलें नाहीं, तोच मेला हा हात ! दुसऱ्यास दुःख व्हावें हें ज्याच्या मनांतही नव्हतें व जो येथें दोन वेळ येऊन गेला तो **चंद्रापीड** होय ! मजवर सोडतां सोडतां बाण संपल्यामुळेंच ज्याचा इलाज खुंटला काय, असा मेला मदनही तोच ! ज्याचें स्वरूप तूंच मला सांगितलें **महाश्वेते**जवळही मीं प्रतिज्ञा केली आहे कीं, तूं दुःखी आहेस ! तोंपर्यंत विवाह करणार नाहीं. ती ह्मणाली,

"सखे कादंबरी! असली वाईट बुद्धि मनांत आणूं नकोस कारण, हा घातकी मदन मोठा पाप करणारा आहे. प्रियजन दृष्टी आड झाला कीं, कदाचित् तो जीव घेण्यासही मागें पुढें पाहत नाहीं." परंतु "पत्रलेखे! याबद्दल मला कांहींच वाटत नाहीं. दैवानें ह्मण, विरहानें ह्मण, तारुण्यानें ह्मण, अनुरागानें ह्मण, मदनानें ह्मण, हृदयानें ह्मण, किंवा आणखी कोणी ह्मण; मला जो हृदयवासी कुमार अर्पिला आहे हा कोणी जवळ असलें तरी त्यास दिसत नाहीं, सिद्ध पुरुषासारखा हा जेव्हां पाहिजे तेव्हां दर्शन देतो, आणखी त्या कुमारासारखा हा भलत्याच वेळीं सोडून जाणारा इतका निर्दय नाहीं, तर हाच माझ्या विरहाची भीति बाळगतो! हा लक्ष्मी, पृथ्वी, विद्या, आणि कीर्ति ह्यांच्या हव्यासाकरितां रात्रंदिवस व्याकूळ होत नाहीं. बसतांना, उठतांना, फिरतांना, निद्रित असतां, जागृत असतां, डोळे मिटले असतां, चालत असतां, स्वप्नांत, शयनावर, श्रीमंडपांत, बगीच्यांत, क्रीडासरोवरांत, क्रीडानदींत, क्रीडापर्वतावर त्या कुमाराची प्रतिमा मी सर्वत्र पाहतें! हें तुला सांगितलेंच आहे. तर आतां त्या अज्ञजनास फसविणाऱ्या कुमारास आणण्याची गोष्ट कशाला पाहिजे!" असें ह्मणून मूर्च्छा आल्याप्रमाणें तिनें डोळे मिटले, आणि त्यां वाटें अश्रुधारा चालूं लागल्या. अशी क्रोधानें वेडी झालेली कादंबरी जागचे जागींच पुतळीसारखी तटस्थ उभी राहिली.

हें तिचें भाषण ऐकून माझ्या मनांत आलें कीं, खरेंच, विरहिणी स्त्रियांस जीव धारण करण्यास हें चांगलें साधन आहे! त्यांत कुलस्त्रियांस व विशेषें करून कन्या जनास तर हें फारच उपयोगी! हृदयवासी कुमाराबरोबर समागम करून देण्यास दूतींना क्षणोक्षणीं पाया पडायास नको, व विनवणी करायासही नको. पाहिजे त्यावेळेस तो समागम सुख देण्यास तयारच! ज्याच्या समागमापासून कन्या धर्मदुषित होत नाहीं. आलिंगनकाळीं अंगास पीडन व्हावयाचें नाहीं! नख व दंत यांचीं क्षतें कोठें उमटावयाचीं नाहींत, तीं कोणाच्या दृष्टीस पडतील ह्मणून लाजावयासही नको! वेणीचा केसही इकडचा तिकडे

व्हावयाचा नाहीं ! मुखचुंबनादि प्रकार मुकाट्यानेंच व्हावयाचा ! विलास केल्याबद्दल वडील माणसांस मागमूसही समजावयाचा नाहीं! काळोख पडो, पाऊस पडो, किंवा थंडी पडो, यामुळें त्याचे दर्शनास कधींच हरकत व्हावयाची नाहीं, याप्रमाणें माझ्या मनांत घोळत होते तों तिच्या अनुरागानेंच काय दिवस व सूर्यबिंब आरक्त झालें; हें **कादंबरीचें** अनुरक्त हृदयच काय असें सूर्यबिंब लज्जेनेंच पळून गेलेसें दिसलें ! संध्याकाळची लाली चोंहीकडे पसरल्यामुळें रात्रीनें पल्लवांची शय्याच पसरली आहे काय, असें वाटलें. व सेवकाप्रमाणें प्रदोषकालानें चन्द्रकांतमण्याची शय्याच पसरली काय असें भासलें !

त्या वेळीं आपल्या कामांत तत्पर अशा दासी ज्याचा सुगंध जिकडे तिकडे चालला आहे अशा तैलानें परिपूर्ण दीपिका पेटवून **कादंबरीच्या** सभोंवती येऊन उभ्या राहिल्या. दिव्यांचीं प्रतिबिंबें तिच्या निर्मल लावण्यांत बिंबल्यामुळें ही मदनबाणांची लखलखीत टोंकेंच धारण करते काय ! किंवा नवीन बार आल्यामुळें लढलेली अशी ही चंपकवल्लीच आहे काय ! अशी ती दिसली ! फिरून मीं तिची विनंति केली, "देवी ! प्रसन्न हो, उगीच संताप करून घेऊं नकोस; रागाचा झपाटा आवर. ही मी अशीच **चंद्रापीडास** घेऊन आलेंच समज!" महाराज ! हें आपलें नांव ऐकतांच विषानें मूर्च्छित झालेली स्त्री विष दूर करणारा मंत्र ऐकून जशी झट्कन सावध होते, त्याप्रमाणें चतुर्दिशीं तिनें डोळे उघडिले, आणि मोठ्या उत्कंठेनें मजकडे पाहून "कोण येथें आहे ग !" असें आपल्या दासींस विचारिलें.

तेव्हां परशुरामानें बाणांनीं पाडलेल्या विवरावाटें जशा काय हंसीच येत आहेत, अशा शुभ्र वस्त्र नेसलेल्या दासी द्वारावाटें गर्दीनें धांवत आल्या. त्यांच्या पादभूषणांचे मधुर शब्द चालत असल्यामुळें 'आलें ! आलें !' अशींच उत्तरें देत आहेतसें वाटलें. त्यांच्या कर्णांवरील पल्लव पुढें लोंबत असल्यामुळें आज्ञा ऐकण्याकरितां त्यांचे हे कानच धांव घेत आहेत काय असें भासलें ! मौक्तिक कुंडलांच्या कांति खांद्यांवर पसरल्यामुळें त्यांनीं ह्या चवऱ्या घेतल्या

आहेतसें दिसलें ! कानांवरील कमलांवर भ्रमरांचा गुंजारव चालू असल्यामुळें "आज्ञा बाई साहेब !" असेच शब्द निघत आहेत काय असें वाटलें. याप्रमाणें त्या दासी येऊन आज्ञेकरितां तिच्या तोंडाकडे पहात तटस्थ उभ्या राहिल्या. त्यांजकडे पहात पहात पाचूच्या शिळेवर बसून मजकडे पाहून ती ह्मणाली, "**पत्रलेखे,** तुला गोड वाटावें ह्मणून मी बोललें असें नाहीं. खरोखरच तुजकडे पाहूनच मी आपलें जीवित धारण केलें आहे. तर आतां तुझ्याच मनांत जर त्याला आणावें असें आहे तर लवकर तरी जा." असें बोलून तिनें मला वस्त्र भूषणें व तांबूल देऊन मोठें अगत्य दाखविलें, आणि मला जावायास निरोप दिला.

याप्रमाणें सांगून **पत्रलेखा** दुःखानें खालीं पहात बसली व नंतर थोड्या वेळानें नम्रपणानें ह्मणाली, "महाराज, देवीच्या प्रेमातिशयामुळें मला बोलल्यावांचून रहावत नाहीं, अतिशय दुःखित झाल्यामुळें मी विनंती करितें कीं, अशी जिची अवस्था, त्या देवीस महाराजांनीं दूर केलें, हें आपल्या दयाळूस्वभावास अनुरूपच केलें ना ?" याप्रमाणें दोष देऊन **पत्रलेखेनें** विनंती केली असतां स्नेह, संताप, परिहास, प्रार्थना, अभिमान, प्रीति, दुःख, सुस्वभाव, हास्य, इत्यादिकांनीं युक्त, व जें मधुर असून न ऐकवणारें, रसभरित असून शोषकारक, कोमळ असून कठोर, नम्र असून प्रौढ, असें **कादंबरीचें** भाषण ऐकल्यामुळें व दुःखानें जिच्या नेत्रांतून अश्रुधारा चालल्या आहेत असें तिचें मुखकमळ त्याचे मनांत दिसूं लागल्यामुळें तो धीर स्वभावाचा असतांही फारच व्याकूळ झाला.

**कादंबरीच्या** भाषणांतील शब्द तिच्याबरोबर शरिरांतूनच आले काय, अशा विकारांनीं त्यावेळीं **चंद्रापीड** घेरला. त्याचें हृदय क्रोधानें भरलें. प्राणकंठांत आले, अधरोष्ट थरथर कांपूं लागला, तोंडावाटें श्वास चालला, नाक स्फुरण पावूं लागलें, डोळे भरून आले, व **कादंबरीसारखीच** त्याचीही अवस्था झाली. याप्रमाणें **चंद्रापीड** दुःखानें सद्गदित होऊन ह्मणाला, "**पत्रलेखे** ! काय करूं? दुष्ट, कुशिक्षित, ज्ञानाभिमानी, पंडितमानी, नष्ट, दुर्बुद्धि, अधीर,

हजारों खोट्या कल्पना उत्पन्न करणारा, आणि शृंगाररसास नृत्य शिकविणारा गुरुच, अशा मदनानें त्या सुंदरीकडून अंतर्गत विकार समजाविण्याकरितां मन्निमित्त बलात्कारानें अनेक प्रकारचे विलास करवून दाखविले. त्याचप्रमाणें मी अशा दिव्यकन्या पूर्वी कधीं-हीं न पाहिल्यामुळें, ती त्यांची लीला त्यांच्या रूपास अनुरूपच असेल अशा समजुतीमुळें, आणि तशा सुंदरींचें प्रेम आपले ठिकाणीं असण्याचा संभव नाहीं यामुळें, सर्व त्या शृंगारचेष्टा साहजिक असतील, विकल्पांत मला पाडून त्या दुष्ट मदनानें देवीच्या दुःखास आणि तूं दिलेल्या दोषास मला पात्र केलें. मला आतां वाटतें कीं, त्या वेळीं व्यामोह करणारा हा कोणाचा तरी मला शापच असावा, त्या खेरीज असें झालें नसतें. साधारण मनुष्यास देखील स्पष्ट कळण्यासारखीं मदनचिन्हें दृष्टीस पडलीं असतां मी मोहांतच राहिलों, तेव्हां दुसरें काय ह्मणावें! हसणें, पाहणें, लाजणें, वगैरे सूक्ष्म प्रकार तर राहोत, कारण ते स्वाभाविक असण्याचाही संभव आहे! परंतु चिरकाल तिनें आपल्या गळ्यांत घातल्यामुळें धन्य झालेला असा हा हार माझ्या हतभाग्याच्या गळ्यांत घालून तिनें काय बरें कळविलें नाहीं? सर्व कांहीं कळविलें! आणखी हिमगृहांतील वृत्तांत तर तुला प्रत्यक्ष माहित आहेच; तेव्हां तूं सांगितलेलें हें सर्व देवीचें प्रणय-कोपाचें बोलणें होय! परंतु हें माझ्या लक्षांत आलें नाहीं. हीं सर्व चूक दुर्दैवानें मजकडूनच घडून आली; तर आतां देवी मला कठोर हृदय समजणार नाहीं अशाविषयीं मी आपले प्राणसुद्धां खर्ची घालून प्रयत्न करीन."

याप्रमाणें चंद्रापीड बोलत आहे तों एक दासी आली, आणि नमस्कार करून ह्मणाली, महाराज, विलासवती राणीसाहेब आज्ञा करितात कीं, "सेवकांच्या तोंडावाटें मीं ऐकिलें कीं, पत्रलेखा मागें राहिली होती. ती आज परत आली आहे. तुजवर आणि तिजवर माझें प्रेम सारखेंच आहे, कारण तिला तरी मींच वाढविलें वर्तविलें आहे; आणखी तुला पाहूनही बराच वेळ झाला आहे, तर तिला बरोबर घेऊन तूं लवकर ये. हजारों मनोरथां नंतर नवस

सायास करितां करितां कोठें आतांशीं बाळकाचें मुख माझ्या दृष्टीस पडलें आहे!"

तें ऐकून चंद्रापीड मनांत ह्मणाला, "काय करावें! माझा जीव संशयांत झोके खात आहे. इकडे क्षणभर मी दृष्टीस पडलों नाहीं तर आई दुःखित होते, तिकडे पत्रलेखेच्या मुखानें देवीचें प्रेम मला बोलावतें आहे! इकडे आईचे पंचप्राण माझे ठायीं आहेत व माझें हृदय तर कादंबरीच्या अभिलाषानें व्याकूळ झालें आहे! पित्याच्या चरण सेवेचें सुख सोडून जाणें ठीक नाहीं, व दुष्ट मदन तर येथें चैन पडूं देत नाहीं. वडिलांचें लालनपालन चांगलें वाटतें, आणि उत्कंठा तर दुःसह वाटते. बांधवाची प्रीती तर मला बद्ध करिते, तिची प्रार्थना पूर्ण करण्याविषयीं तर मला कौतुक वाटतें! इकडे राजे लोक माझें मुख केव्हां दृष्टीस पडेल ह्मणून वाट पाहतात, आणि मला तर प्रियतमेचें मुख दृष्टीस पडून केव्हा जीविताचें साफल्य होईल असें वाटतें! इकडे सर्व प्रजा मजवर प्रेम करितात व माझें प्रेम तर गंधर्व राजकन्येवर आहे! जन्मभूमि तर सोडावीशी वाटत नाहीं, व प्रियतमा तर जवळ करावीशी वाटतें! आणि तिचें राहणें तर पडलें दूर!" याप्रमाणें चिंतन करीत करीत पत्रलेखेचा हात धरून द्वारपालिकेच्या मागून जेथें त्याची आई होती तेथें गेला. त्या ठिकाणीं आईनें सर्व दिवसभर त्याचें पुष्कळ प्रकारें कोडकौतुक केलें, त्यामुळें त्याची उत्कंठा कांहीं कमी झाली. मग त्यानें तो दिवस तेथें राहूनच घालविला. संध्याकाळ झाला तेव्हां अंधारानें सर्व व्याप्त करणारी मूर्तिमंत चिंताच काय, अशी रात्र प्राप्त झाली. चक्रवाकपक्ष्यांचीं जोडपीं करुणस्वरानें ओरडूं लागलीं. मदनबाणांस तीक्ष्ण करणारे असे स्वच्छ चंद्रकिरण जिकडे तिकडे पसरले. चंद्रविकासिनी कमलिनींतील सुगंध घेऊन वायू मंद मंद वाहूं लागला. तेव्हां निद्रा करावी ह्मणूच चंद्रापीड शय्येवर जाऊन डोळे मिटून पडला असतां, त्यास झोंप येईनाशी झाली. त्याचें मन कादंबरीकडे गेलें. हेमकूट पर्वत चढून गेल्यामुळें थकून तें कादंबरीच्या पादपल्लवच्छायेंत विश्रांतीच घेत

बसले! पुढें पोटऱ्या, मांड्या, नाभि, उदर, स्तन, व बाहु, इत्यादिकांवरून आनंदानें अनुक्रमें चढत चढत तिच्या कंठाचे ठायीं जाऊन आसक्तच होऊन राहिलें! मग तिच्या चेहऱ्याकडे एकाग्र लक्ष देऊन पहात बसलें! पुढें केशभाराच्या अंधकारांत जाऊन अडकून राहिलें! याप्रमाणें जिकडे पहावें तिकडे वाहणाऱ्या तिच्या लावण्यपुरांत त्याचें मन पोहतच राहिलें! याप्रमाणें मदनाचें वसतिस्थान जें **कादंबरीचें** रूप तें पाहण्यांत तो तल्लीन झाला.

त्या दिवसापासून तर माझी **कादंबरी**! असें समजून तिच्या प्रेमातिशयामुळें तो जिकडे जिकडे धनुष्य ओढून मदन तिजवर प्रहार करीत आहेसें वाटे. तिकडे तिकडे तिचें रक्षण करण्यासाठीं आपण मध्यें जाऊन जसा काय अडवाच होऊं लागला! "सुंदर मालतीपुष्पाप्रमाणें तिची सुकुमार तनु असून तीवर तूं निर्दयपणानें प्रहार करितोस; तुला लाज कशी वाटत नाहीं?" असें बोलत अश्रूंनीं भरलेल्या आपल्या डोळ्यांनीं तो मदनास दटावूं लागला! मदनबाणाच्या प्रहारानें मूर्छित झालेल्या **कादंबरीस** शुद्धीवर आणण्याकरितां जणूं काय! घर्मोदक व श्वास सोडूं लागला. मग या उपायांनीं ती शुद्धीवर आली ह्मणून आनंद झाल्यामुळेंच काय, त्याच्या सर्व अंगावर रोमांच उभे राहिलें! हृदयपीडा सहन होते किंवा नाहीं हें पुसण्याकरितां तिजकडे मन पाठविल्यामुळेंच तो शुन्य हृदयसा दिसूं लागला! तिच्याकडील वर्तमान ऐकण्याकरितांच जणूं काय तो कोणाशी बोलेनासा झाला! तिचें मुख पहाण्यांत तो गुंतल्यामुळेंच जणूं काय त्यास दुसरें कांहीं एक दिसेनासें झालें! चंद्रबिंबाचे ठायींही त्याची दृष्टि रमेनाशी झाली. तिच्या मधुर भाषणांनी त्याचे कान भरल्यामुळें गीत, वाद्य, व सुभाषित यापैकीं कांहीं एक त्याच्या कर्णद्वारें अंतःकरणांत प्रविष्ट होईनासें झालें! आप्तमित्र यांचीं भाषणें कठोरशीं वाटूं लागली, आपली ही अवस्था दुसऱ्यास कळेल ह्मणून पूर्वीं सारखी तो कोणाची भेट घेईनासा झाला. मदनाग्नि शरीरांत भडकून जाळीत होता, तरी वडील माणसांस समजेल या लज्जेमुळें, मौक्तिकासारखे जलबिंदु ज्यावर

नक्षत्राप्रमाणें चमकत आहेत अशा कमलपत्रांच्या शय्येवर तो निजला नाहीं. ज्या ठिकाणीं एकसारखीं कारंजीं उडताहेत अशा मंदिरांतसुद्धां तो गेला नाहीं. पुष्परस पडल्यामुळें ज्याचा मध्यभाग फारच शीतळ, अशीं दाट लतागृहें सेवन करण्याचेंसुद्धां त्यानें सोडून दिलें, इतकेंच नव्हे, तर चंदनाची उटी अंगास लावणें हें देखील त्यानें वर्ज केलें. याप्रमाणें रात्रंदिवस चैन पडूं न देणारा, पेटलेला असून न जाळणारा, दग्ध करीत असून स्नेहरूप इंधनास कायम ठेवणारा, दुःखाच्या अनुभवाकरितांच शरीराचें अगदीं भस्म करून न टाकणारा, असा मदनाग्नि आंत बाहेर भाजीत असतां त्यास शोष पडला, तरी तिजविषयींची त्याची स्नेहार्द्रता कमी झाली नाहीं.

याप्रमाणें **कादंबरी** वरील प्रेमामुळें मदनानें त्यास पीडित केलें असतां ही त्यानें आपली अवस्था लोकांच्या दृष्टीस पडूं दिली नाहीं. त्यानें आपल्या शरिरास कृशता आणिली, परंतु लज्जेस आणिली नाहीं. भोजनादि व्यवहाराचा अनादर केला, परंतु रीतिभातीचा केला नाहीं. प्रजेच्याच अनुरोधानें वागला, परंतु मदनोत्कंठेच्या वागला नाहीं. सुखाचाच त्याग केला, परंतु धैर्याचा केला नाहीं. **कादंबरीचें** स्वरूप, गुण व तिजवरील प्रेम यांनीं त्यास पुढें ओढलें असतांही वडिलांच्या स्नेहानें त्यास मागें परतविलें. चंद्रोदयानें भरती आल्यामुळें लाटांनीं दूरवर उंच उसळणाऱ्या समुद्राप्रमाणें अनिवार्य मदनचेष्टांनीं खवळलेल्या **चंद्रापीडानेंही** मर्यादेचें उल्लंघन केलें नाहीं, व अशा विरह दुःखानें त्यानें थोडकेच दिवस हजारों दिवसाप्रमाणें घालविले.

एके दिवशीं **चंद्रापीड** मदनपीडेनें त्रस्त होऊन नगराबाहेर शिप्रानदीकडे फिरावयास गेला. तेथें तरंगांवरून आल्यामुळें थंडगार असा वारा वाहत होता. त्या नदीच्या वाळवंटावर हंस, चक्रवाक वगैरे पक्षी मधुर शब्द करीत होते. अशा त्या ठिकाणीं फिरत असतां पुष्कळ घोडे स्वामिकार्तिकाच्या देवळाकडे वेगानें येत आहेत असें त्याच्या दृष्टीस पडलें. ते, क्षणांत जमा होत आहेत, क्षणांत

वेगळे होत आहेत, पुन्हां एके ठिकाणीं मिळताहेत, पुनः फुटताहेत, कांहीं शरीर लांब करून चालताहेत, कांहीं आंखडून चालताहेत, कांहीं पडताहेत, कांहीं टेंचाळताहेत, व जलदीनें येत असल्यामुळें जरूरीच्या कामासाठींच येत आहेत, अशा त्या घोड्यांचा समुदाय त्यानें पाहिला, तेव्हां **चंद्रापीडास** कौतुक वाटून त्यानें हें कोण येत आहेत हें समजण्याकरितां एक मनुष्य तिकडे पाठविला आणि आपण गुडघ्या इतक्या पाण्यांतून शिप्रानदी उतरून त्याच कार्तिकस्वामीच्या देवळांत जाऊन त्याची वाट पाहत बसला. तो मोठ्या कौतुकानें त्या घोड्यांकडे एकसारखा बघत असतां जवळ असणाऱ्या **पत्रलेखेस** आपल्याजवळ बोलावून ह्मणाला, **पत्रलेखे,** तो पहा, ज्याच्या डोक्यावर ऊन न लागावें ह्मणून मयूरपिछांची छत्री आहे आणि तीमुळें ज्याचें तोंड नीट दिसत नाहीं, असा घोड्यावर बसून येत आहे, तो **केयूरकच** असावा असें वाटतें.

याप्रमाणें तो तिजशीं बोलत आहे तों धाडलेल्या मनुष्याकडून आपण येथें आलों आहों असें समजल्यामुळें घोड्यावरून उतरून चालत येत आहे, तातडीनें लांबून आल्यामुळें धूळ उडून ज्याचें अंग मळकट झालें आहे, ज्याचा आकार अगदीं बदलून गेला आहे, अंगास संस्कार नसल्यामुळें ज्याचें शरीर निस्तेज दिसत आहे, तोंड उतरून गेल्यामुळें व उदास दृष्टि असल्यामुळें दुरूनच न पुसतां व न बोलतां कादंबरीची अवस्थाच सांगत आहे कीं काय, असा **केयूरक** त्याच्या दृष्टीस पडला.

त्यानें गडबडीनें येऊन नमस्कार केल्यावर, 'यावें, यावें,' असें ह्मणून **चंद्रापीडानें** लांब हात करून त्यास आलिंगन दिलें. मग त्याला सर्व खुशाल आहेतना, असें विचारून व स्नेहानें वारंवार **केयूरकाकडे** पाहून ह्मणाला, "**केयूरका,** तुझ्या दर्शनानें **देवी-कादंबरी,** आपल्या परिवारासह खुशाल आहेसें कळलेंच, आणि कांहीं वेळ विश्रांति घेऊन स्वस्थ झाल्यावर येण्याचें कारण कोणतें वगैरे सर्व तूं सांगशीलच." असें बोलून महातानें पळवीत आणिलेल्या हत्तिणीवर तो चढून बसला, आणि **केयूरक** व **पत्रलेखा** यांसही

आपल्या मार्गे बसवून जलदीनें घरीं गेला. नंतर राजे लोकांस निरोप देऊन **केयूरकासह** तो वल्लभ नांवाच्या बगीच्यांत गेला. तेथें उत्कंठित व व्यग्रचित्तानें कसें तरी दिवस कर्म केल्यावर त्यानें **पत्रलेखेस** ठेवून इतर सेवकांस दूर घालविलें. मग **केयूरकास** जवळ बोलावून ह्मणाला, "**केयूरका**, सांग बरें! आतां **देवीकादंबरीचा** व **मदलेखेसहित महाश्वेतेचा** मला काय निरोप आहे तो?" नंतर तो नम्रपणानें ह्मणाला, "महाराज, काय मीं सांगूं? देवीनें किंवा **मदलेखेनें** अथवा **महाश्वेतेनें** मजजवळ कांहीं एक निरोप सांगितला नाहीं." **पत्रलेखेस** मेघनादाच्या स्वाधीन करून मी परत गेलों, आणि महाराज उज्जयिनीस गेले असें सांगितलें, तेव्हां मोठ्यानें श्वासोच्छ्वास टाकीत "असें झालें काय!" असें कष्टानें बोलून **महाश्वेता** तपश्चर्या करण्यास आपल्या आश्रमीं गेली. **कादंबरी** ही तत्काळ लोखंडी घनानें हृदयावर ताडिल्यासारिखी, वज्रानें मस्तकावर प्रहार केल्यासारिखी, बुचाडल्यासारिखी, पराभव पावल्यासारिखी, फसविल्यासारिखी आणि अंतःकरणानें सोडल्यासारखी होऊन मूर्च्छित झाली. **महाश्वेता** गेल्याचें ही तिला समजलें नाहीं. तिनें पुष्कळ वेळानें आपले डोळे उघाडिलें व आश्चर्यानें मजकडे टक लावून "**महाश्वेता** कोठें आहे?" असें मला रागानें विचारून **मदलेखेकडे** वळून बोलली, "**मदलेखे**, **चंद्रापीडाची** करणी पाहिलीना? असें कधीं तरी कोणी केलें होतें, व पुढें तरी कोणी करील काय?" असें बोलून "मजजवळ तुह्मी कोणी बाई, येऊं नका!" असें दासींस सांगून आपण बिछान्यावर जाऊन पडली, आणि शालूच्या पदरानें डोके आवळून समान दुःखी अशा **मदलेखेबरोबर** देखील एक शब्द न बोलतां सर्व दिवसभर तशीच पडून राहिली. दुसरें दिवशीं सकाळीं मी जवळ गेलों असतां देवी मला ह्मणाली, "तुह्मी सुदृढ पुरुष जवळ असतां मी अशी दशा भोगावी ना? धिक्कार असो तुह्माला! तुह्मी कोणी माझ्या जवळ असण्याचें प्रयोजन नाहीं" अशा प्रकारें निर्भत्सनाच करीत आहे काय? आणि रागानें "का तूं माझ्यापुढें उभा राहिला

आहेसरे !" "नीव येथून !" असेंच ह्मणत आहे काय? अशी ती दिसली. आणि डोळ्यांवाटें अश्रुढाळीत मजकडे पाहत राहिली. देवीनें जरी कांहीं एक सांगितलें नाहीं, तरी महाराजांकडे मीं जावें असें देवीच्या मनांत आहे, असें समजून ती शोकभरांत असल्यामुळें तीस न विचारितां चरणाजवळ आलों आहें, तर महाराज, कृपा करतील तरच देवीचें जीवित राहणार आहे. याकरितां विनंतीकडे लक्ष देण्याची कृपा करावी.

महाराज! प्रथमतःच मलय वायूप्रमाणें आनंद देणारे असें महाराजांचें आगमन झालें तेव्हांच सर्व कन्यालतिका चंचलवृत्ति झाल्या, आणि वसंताप्रमाणें रमणीय अशा आपणांस पाहतांक्षणींच अनुरक्त अशोकलतेसारख्या कादंबरीवर मदनानें अधिष्ठान केलें. सांप्रत ती आपणाकरितां फारच क्लेश भोगीत आहे! तिचा मदनाग्नि किती विलक्षण ह्मणून सांगावा! सूर्यकांत पाषाणांतील अग्नीप्रमाणें त्याचा शब्द होत नाहीं, त्याला पेटवायाला वारा लागत नाहीं, त्यापासून धूरही निघत नाहीं, व तो भस्म करीत नाहीं. सेवकांनीं वातलेल्या पल्लवांच्या वाऱ्यानें, आर्द्रपंख्याच्या तुषारांनीं, चंदनाच्या उटीनें, किंवा हस्तिदंती हंसाच्या चोंचीवाटें जेथें पाणी पडत आहे अशा जलमंदिरानें किंवा कारंजांच्या फवाऱ्यांनीं त्याचा शम होत नाहीं. शांत करण्याकरितां जितका जितका उपचार करावा, तितका तितका विद्युल्लतेचा जणूं बंधूच, असा तिचा मदनाग्नि अधिकच पेटतो. आणखी हें मोठें आश्चर्य वाटतें कीं, मदनाग्नीनें दग्ध केलें असतां अग्निसंस्कारानें निर्मल केलेल्या वस्त्राप्रमाणें तिचें लावण्य फारच रमणीय दिसतें! जल हें स्वभावतः मृदु असतें खरें, परंतु तेंच मौक्तिकरूप बनलें असतां जसें कठिण होतें, तसें अबलांचें हृदय जात्या कोमल असूनही तें मदनाग्नीसही दाद देईनासें होतें! त्यांना प्रिय जनाच्या समागमाची इतकी मोठी आशा असते कीं, तिच्या योगानें व्याकूळ झालेल्या प्राणांसही ती धरून ठेवते! देवीच्या विरहोत्कंठेला काय करावें? तिच्या अवस्थेचें वर्णन तरी कोणत्या रीतीनें करावें! ती उघड करून

तरी कशी दाखवावी! व तिला उपमा तरी कशाची द्यावी! ती कोणत्या प्रकारानें वर्णन करावी! अशा तिच्या अवस्थेकडे आपण कांहींच लक्ष देत नाहीं! फार काय? तिच्या पुष्प शय्येवरील कमळें सूर्याचा प्रखरताप देखील सोसणारीं असून तिच्या स्पर्शानें म्लान होतात. तेव्हां ती आपल्या तापानें सूर्यास देखील लाजविते! निर्दय व दुष्ट मदनानें तिला वेड लावल्यामुळें तिचे जे व्यापार चालतात ते किती ह्मणून सांगावें? तिच्या कठीण मनांत आपली मूर्ती असल्यामुळें आपल्याला अगदीं इजा होऊं नये ह्मणूनच काय ती आपल्याला सख्याकडून पुष्पांच्या शय्येवर ठेवविते! तेथें तिच्या पायाचा अलिता शय्येवरील पुष्पास लागला असतां मदनानें हृदय भेदल्यामुळें रक्तानें भरलेले हे त्याचे बाणच पडले आहेत काय, असें सख्यांना वाटून त्या घाबरतात! आपल्या स्मरणानें तिच्या अंगावर रोमांच उभे राहिले असतां, मदनबाणांच्या निवारणार्थ ती रोमांच रूप कवचच धारण करिते आहे काय असें वाटतें! श्वासानें एकीकडे गेलेला स्तनावरील पदर वारंवार सावरतांना हातास रोमांचकंटक लागल्यामुळें महाराजांनीं पाणी ग्रहण करावें, ह्मणून तो कंटकशयन व्रतच करीत आहेसा तिला भास होतो! डाव्या हातावर गाल ठेवून बसल्या कारणानें जड झालेला हात झाडतांना माणकाच्या कंकणाचें लाल तेज झळकत असल्यामुळें मदनाग्नीनें हात भाजल्यामुळेंच काय ही असें करिते असें वाटतें! कमलपत्रानें तिला वारा घालीत असतां कानांवरील भूषणकमळें उडत असल्यामुळें अश्रुप्रवाहाच्या भयानें तिचें नेत्र पळतच आहेत असें दिसतें! कृशतेमुळें हातांतील मंगलकंकण पडूं लागलें तर तें ती धरिते इतकेंच नाहीं, तर महाराजांच्या समागमाच्या आशेनें उडणारें हृदय देखील हातानें धरून ठेविते! तिच्या सख्या कमलासारख्या आपल्या थंडगार केलेल्या हातांनीं उपचार करीत असतां ती म्लान होते! समागमाच्या इच्छेनें हृदयास, हृदयानें महाराजांस, कंठानें जीवितास, हातानें गालास, स्कंधानें वेणीस आणि नेत्रांनीं आश्रूंस, ती धारण करिते!! फुटून जाणारें

हृदय महाराजांच्या दर्शनाकरितां असावेंसें इच्छितें! भलतेंच नांव चुकून तोंडांत आलें असतां लाजते! प्रिय सखीप्रमाणें मूर्च्छा तिला वारंवार स्पर्श करिते! पुष्पशय्येवर पराधीन पडली असतां दासीप्रमाणें उत्कंठा तिला वारंवार उठविते! तिचें शरीर अशक्त झाल्यामुळें दासीप्रमाणें मदनपीडा तीस अनेक ठिकाणीं फिरविते! कांहीं वेळ लतामंडपांत, कांहीं वेळ कमलवनांत, कांहीं वेळ बगीच्यांत जाऊन ती राहते. तेथून तमालवनांत जाते. तेथें दोन्ही हातांनीं झाडाच्या फांदीस धरून व दोन्ही बाहूंमध्यें डोकें घालून तटस्थ उभी राहते; तेथून सरोवरावर जाते! रडून रडून लाल झालेल्या नेत्रांचीं प्रतिबिंबेंच काय अशीं रक्तकमळें, 'आपली ही शय्या करील!' या भीतीनें पाण्यांत बुडून लपूनच राहिलीं आहेत काय! अशा सरोवरांत ती स्नान करिते. पुढें संगीतगृहांत जाते, तेथें गायनाचा मधुर शब्द ऐकून त्रास पावते! तेथून जलमंदिरांत जाते, त्या ठिकाणीं अंगावर तुषार उडाल्यामुळें कदंबकलिकेप्रमाणें कंपित होते! नंतर अंतःपुरांतील स्थल कमलिनीकडे जाते, तेथें कलहंसपक्ष्यांचे शब्द सहन न होऊन चालली असतां पायांतील वाजणारीं भूषणेंही काढून घेते! मग पुष्करिणीवर जाते. तेथील चक्रवाकपक्षी, ही कडीं करण्याकरितां कमलतंतु काढिते, ह्मणून रागावूनच काय ओरडून ओरडून तीस खिन्न करितात! शय्येकरितां पुष्पांचे ढीगचे ढीग नेऊन ही सुकविते ह्मणून क्रोधानेंच काय भ्रमर आपल्या गुंजारवानें तीस उद्विग्न करितात! हिनें गीतस्वरानें आपल्यास जिंकिलें ह्मणूनच काय अंगणांतल्या आम्रवृक्षावरचे कोकिल तिच्या भोंवतीं कलकल करितात! विरहानें फिके पडलेल्या गालांनीं जिंकल्यामुळें ती जात असतां केतकी आपल्या पत्रांच्या अग्रांनीं टोंचतेच आहे कीं काय असें वाटतें! अशा प्रकारच्या अनेक मदनचेष्टांनीं तिचा एक एक दिवस जातो!

रात्रीं चंद्रोदय झाला ह्मणजे अंधकाराप्रमाणें तिचें धैर्य जातें! सूर्यकमलाप्रमाणें हृदय म्लान होतें! चंद्रविकासी कमलाप्रमाणें तिचा मदनप्रफुल्लित होतो! चंद्रकांतमण्याप्रमाणें तिच्या नेत्रावाटें

पाणी वाहूं लागतें! समुद्राप्रमाणें तिच्या श्वासास भरती येते! चक्रवाकाच्या जोडप्याप्रमाणें तिचे मनोरथ विघटित होतात! शीतज्वरानें पीडितासारखी तापानें कंपित होऊन मण्याच्या फरसबंदीवर चंद्रकिरण पसरले असतां त्यावर हात पसरून चंद्राचा प्रकाश आपल्याला सहन होत नाहीं असें दाखविते! मदनबाणांनीं पीडित होऊन सीत्कार करीत असतां पूर्वीं शरिरांत शिरलेले चंद्रकिरणेही ओकतेच आहे काय असें दंत कांतीच्या योगानें दिसतें! जांभया देत असतांना कंठांत आलेल्या प्राणांस जाण्याकरितां द्वारच उघडते काय असें वाटतें! ती अश्रु ढाळीत असतां अश्रुप्रवाहाची ही नदीच आहे काय असे भासते! आरसे महालांत तिचीं प्रतिबिंबें पडल्यामुळें तिनें आपळे शेंकडों तुकडे केले आहेत काय असें दिसतें! पुष्पशय्येवर सुगंध लोभानें भ्रमरांचे थवे आले असतां तिच्या अंगांत मदनाग्नी पेटल्यामुळें हे धुराचे लोटच चालले आहेत काय असें वाटतें! कमलशय्येवरील पराग अवयवांस लागल्यामुळें मदनाग्नीनें ती पेटल्यासारखीच दिसते! घाम जाण्याकरितां अंगास कापराची भुकटी लाविली असतां जळून खाक झाल्यासारखी दिसते! संगीतकालीं मृदंग वाजत असतां हे मयूराचेच शब्द आहेत असें तीस वाटून ती मंदिरांतील पाचूच्या मोरांचीं तोंडे जाऊन दाबते! संध्याकाळीं "नकोगबाई तें विरहाचें दुःख!" असें बोलून चित्रांतील चक्रवाकजोडप्याचा वियोग न व्हावा म्हणून त्याला कमलतंतूनीं बांधून टाकिते! रात्रीं महाराज आलिंगन करीत आहेत असें वाटून कर्णावरील कमळ काढून रत्नदीप विझण्याकरितां त्यावर मारते! उत्कंठा लेखांत कल्पित समागमाच्या खुणा लिहिते! स्वप्नांत घडलेल्या अपराधा बद्दल क्षमा मागते! महाराजांची समजावणी करण्याकरितां दूतींना आपल्याकडे धाडते! तर हे असले प्रकार ती वेडेपणामुळें किंवा विलासामुळें किंवा उन्मादामुळें करते, हें कांहींच समजत नाहीं!

आणखी दक्षिणवायु जसा सुगंध बरोबर घेऊन येतो, तसा तिला मोहही आणतो! रात्र, तिला जागृति आणिते! उपवनांतील

सुगंधाबरोबर तिला मरणाभिलाष प्राप्त होतो! कमलपर्णावरील जलबिंदूप्रमाणें तिला थरथर कांप सुटतो! कमलिनीप्रमाणें चंद्रकिरणांनीं ती म्लान होते! हंसीप्रमाणें मृणालिकाहारानें[1] ती जीव धारण करिते! चंद्राप्रमाणें कमल समुदायांवर पादसंचार[2] करीत रात्र घालविते! विष्णूच्या शय्येप्रमाणें ती मंदश्वास शेष[3] राहते! चंद्रविकासी कमलिनीप्रमाणें जागृत राहते! मलयनदीप्रमाणें चंदनपल्लवांनीं युक्त अशा शिलातलावर पडते! असह्य संतापानें भुजंगीप्रमाणें चंदनपल्लवास आलिंगिते व मयूराच्या शब्दास भिते! मृगीप्रमाणें केसरिवनांत[4] जाण्याचें टाळते! सीतेप्रमाणें पीतरक्त[5] राक्षसांसारखे चंपक व अशोक यांस भिते! उखेप्रमाणें स्वप्नसमागमानेंच धन्यता मानते! ग्रीष्मरात्रीप्रमाणें दररोज ती कृश होत जाते! फार काय सांगावें मदनपीडा सोसतां सोसतां तिचीं सर्व अंगें क्षीण झालीं आहेत! कर्डी करतां करतां मृणालेंही मिळतनाशीं झालीं आहेत! दररोज औषधें देतां देतां तींहि आतां मिळतनाशीं झालीं आहेत! एकसारखा उपदेश करतां करतां सख्यांचीं भाषणेंही सरलीं त्यांना नवें बोलण्याचें कांहींच सुचेनासें झालें आहे! पुष्पशय्या करतां करतां बागांत आतां फुलें राहिलीं नाहींत! आणि एकसारखी वृष्टि करतां करतां मदनाचीं शस्त्रें देखील बोथल्यासारखीं झालीं आहेत! फार काय सांगावें! हल्लीं सर्व सख्या महाराजांच्या नांवाचाच गजर करीत आहेत! आपल्या समागमाचीं रहस्यें व त्या संबंधाचींच बोलणीं आपल्या संबंधाच्याच काय त्या गोष्टी! आपल्या संबंधाचेच काय ते विनोद! आपल्या प्रतिमा करणें हाच काय तो चित्रकलेचा अभ्यास! आपल्या संबंधाचींच काय तीं गाणीं! आपल्या दर्शनाचींच काय तीं स्वप्नें! मदनज्वरानें संतप्त होऊन बरळते तेंही आपल्या संबंधाचेंच! आपल्या संबंधा खेरीज

---

१ मृणालिकांचा ह्म० कमलतंतूचा आहार (भक्षण) पक्षीं मृणालिकांचा हार=माळ. २ किरण, पक्षीं पाय. ३ मंद श्वास आहे शेष (सर्प) जिचे ठायीं, पक्षीं मंद श्वास आहे शेष (बाकी) जीचा. ४ सिंह पक्षीं वकुलवृक्ष. ५ रक्त प्राशन केलेले पक्षीं पिंवळे व तांबडे.

दुसरें कांहीं एक नाहीं! तिची मूर्च्छा जाण्यास आपलें नांव घेऊनच आला तर उपाय. बाकी सर्व इलाज खुंटले!"

याप्रमाणें **केयूरक** सांगत असतां, **चंद्रापीडास** मूर्च्छा आली. पुढें आतां ऐकवत नाहीं असें डोळे मिटून तो खुणेनें सांगतच आहेसें वाटलें! दुःखित **चंद्रापीडावर** दयाळू होऊन मूर्च्छेनेंच पुढें न सांगण्याविषयीं **केयूरकाचें** निवारण केलें. नाहीं तर तिची त्याला पुष्कळच अवस्था सांगायाची होती! मूर्च्छा आल्यामुळें **कादंबरीचें** ध्यानच करीत आहे काय अशा त्या **चंद्रापीडास केयूरकानें** सांवरून धरिलें. **पत्रलेखा** वारा घालीत बसली. तिनें व पुढें दुःख देण्याविषयीं तयार असलेल्या दैवानें त्यास सावध केलें! नंतर आपल्या सांगण्यानें **चंद्रापीडाची** अशी अवस्था झाली ह्मणून भ्यालेलाच काय; व चोरट्यासारखा झालेलाच काय, किंवा खिन्न झालेलाच काय अशा **केयूरकास** तो मोठ्या दुःखानें ह्मणाला, "**केयूरका**, माझ्या मनांत प्रीति नाहीं, मी निष्ठुर आहें, व फिरून मी येणार नाहीं, असें समजून **देवीनें, महाश्वेतेनें** किंवा **मदलेखेनें ही** तुला जाण्यास सांगितलें नाहीं व कांहीं निरोपही सांगितला नाहीं, तथापि **पत्रलेखेनें** मला जो वृत्तांत सांगितला त्यावरून मला कळलें आहे. कुलीन, उदार, सरळ स्वभावाची व मर्यादशील अशी **देवीकादंबरी** पडली. यामुळें तिला तिचें कर्तव्य समजलें नाहीं, याला मी काय करावें बरें? चंद्रप्रकाश पडल्यावर पाझर सोडणें हें चंद्रकांत पाषाणाच्या स्वाधीन आहे, परंतु चंद्रिका पाडणें हें नाहीं. सूर्याच्या तापानें म्लान झालेल्या चंद्रविकासी कमळांस विकासाची इच्छा असतेच, परंतु ती पूर्ण करणें हें चंद्रिकेच्या स्वाधीन आहे. वृक्ष रसभरित आहे तरी वसंतलक्ष्मीनें आलिंगन दिल्याखेरीज त्याला पल्लव कोठून फुटणार बरें! तर या कामांत देवीचाच अपराध ह्मणण्यास हरकत नाहीं. ज्याला ओंठ हालविण्याचाच काय तो उशीर! असा हा दास पुढें असतां लज्जा धारण करून तिनें आपली विनाकारण अशी अवस्था करून घेतली! अथवा देवीच्या सेवकजनांचा तरी केवढा हा वेडेपणा बरें!

त्यांनीं कसें या गोष्टींत लक्ष पुरविलें नाहीं ? या दासाची इतकी लज्जा व इतका गौरव कशाला पाहिजे होता ? ज्यामुळें पुष्पा-प्रमाणें सुकुमार अशा आपल्या तनूस तिनें इतके क्लेश दिले व माझाही मनोरथ पूर्ण केला नाहीं, इतका अविश्वास धरण्याचें काय कारण होतें बरें ! स्त्रियांचा हा संकोच परंपरागतच आहे, त्यांत ज्यांचा बालभाव पुरा गेला नाहीं, अशा मुग्ध स्त्रियांच्या मनांत तर फारच लज्जा राहते. मदलेखा ह्मटली तर तिचें दुसरें हृदयच ! असें असतां तिनें तरी देवीची कां उपेक्षा केली हें समजत नाहीं ! मोठमोठ्या निग्रह करणाऱ्या ऋषींच्या मनांत देखील संचार करणारा, कधीं कोणास न सांपडणारा असा पटाईत चोरच, मोठमोठ्या पवित्र साधूंनाहीं स्पर्श करणारा चांडाळ, अनंत प्राणी ज्यानें भस्म केले तरी अतृप्त असा स्मशानाग्निच ! सर्व दोषांचें स्थान, व दिसणारा असा रोगच ! रूपानें मोहित करणारा, मर्माचें ठायीं भेद करणारा असा व्याधच, अकालीं मृत्यु आणणारा, योग्यायोग्य विचार न करणारा, अपकार करण्यांत सार्थक्य मानणारा, हृदयांत उत्पन्न होणारा, असा जो दुरात्मा मदन त्यानें देवीस इतके आयास दिले असतां तिची अशी कां उपेक्षा केली ? तिला उघड बोलण्यास लाज वाटत होती तर, तेथें मी होतों तेव्हांच कां बरें माझ्या कानांत सांगितलें नाहीं ? आतां मला तिचा वृत्तांत कळला पण काय उपयोग ! कित्येक दिवस जायाला पाहिजेत, इतका दूर मी पडलों तेव्हां आतां काय करावें बरें ? वाऱ्यानें अंगावर फूल पडलें तरी तिला सहन होत नाहीं असें जिचें सकुमार शरीर, तें वज्राप्रमाणें कठीण व आह्मासारख्यास देखील असह्य असे मदनबाण कसे सोशित असेल ? क्षणांत तिचें काय होईल याचा मला कांहींच भरंवसा वाटत नाहीं. देवीच्या वशीर्वाच दुःखाचा अनुभव होता असें ह्मटलें पाहिजे. दुसऱ्यास नाडण्याविषयीं तत्पर, दुर्घट घडविण्याविषयीं पंडित, मनास वाटेल तसें करण्यास उद्युक्त अशा घातकी दैवानें जो विलक्षण प्रकार घडवून आणिला, त्यावरून हें इतकेंच करून उगीच बेमेलमें दिसत नाहीं. यांत कांहीं तरी त्याचा हेतु

असलाच पाहिजे! तसें नसतें तर विनाकारण किन्नराच्या जोड-प्याच्या मागें लागून निर्मानुष भूमीकडे कशाला गेलों असतों? तृषा लागून अच्छोद सरोवराकडे तरी कशाला वळलों असतों? तेथें विश्रांति घेत असतां दिव्यगीत कशाला कानीं पडलें असतें? त्या ठि-काणीं हें स्थळ कोणाचें अशी जिज्ञासा कशाला उत्पन्न झाली असती? महाश्वेता तरी कशाला दृष्टीस पडली असती? तरलिकेसह तुझें येणें होऊन माझी गोष्ट कां निघाली असती? महाश्वेतेसह हेम-कूटपर्वतावर कां जाणें झालें असतें? तेथें देवीचें दर्शन कां झालें असतें? परस्परावर अनुराग कां उत्पन्न झाला असता? किंवा मनोरथ सफळ झाले नाहींत, तोंच पित्याची अलंघनीय आज्ञा तरी कां येऊन ठेपली असती? तेव्हां आमच्या कर्मबलानें प्रेरित व घा-तकी अशा दैवानें खूप वरच चढवून आह्मांला तोंडघशी पाडलें! तथापि देवीचा सत्कार करण्याकरितां मजकडून किंचित्‌ही अनमान होणार नाहीं.

याप्रमाणें चंद्रापीड बोलत असतां संध्याकाळ झाला. अगोद-रच हा कादंबरीच्या वृत्तांतानें संतप्त झाला आहे, यास आणखी आपण कशाला ताप द्यावा ह्मणूनच काय दयाळू झालेल्या सूर्यानें तप्त सुवर्णाप्रमाणें पसरलेले आपले हजारों किरण आवरले. उंच वृक्ष व शिखरें यांवर जें कोठें कोठें उन्हाचे छटे राहिले होते, त्यांस तुकड्याप्रमाणें गोळा करीत करीत दिवसही निघून गेला. शुद्धीवर नसलेला चंद्रापीड कोणाच्या दृष्टीस पडूं नये ह्मणूनच काय संध्येनें आपल्या लालीनें व रात्रीनें अंधकारानें आप्ताप्रमाणें त्यास झांकून टाकिलें! आपली शय्या करून हा सुकवून टाकणार, ह्मणून भीतीनें सूर्यकमळें मिटूं लागलीं. चंद्रविकासी कमळें शुद्ध असल्या मुळें परोपकारातच सार्थक्य समजून यानें आमची शय्या करावी ह्मणूनच काय प्रफुल्लित होऊं लागलीं. चक्रवाक पक्षी दीनस्वरानें कादंबरीच्या जवळ जाण्याविषयीं उपदेशच करीत आहेतसें वाटलें. सकल भुवनाचें शुभ्र छत्र, अमृतानें भरलेला रुप्याचा जणूं कल-शच, पूर्वदिशारूप स्त्रीच्या कपाळावरील तिलक, आकाशलक्ष्मीच्या

लावण्याचा जणूं डोहोच व सर्व लोकांस आनंद देणारा असा चंद्र अमृतमयकिरणांनीं **चंद्रापीडास** स्पर्श करण्याकरितांच, किंवा जीवन देणाऱ्या चंद्रिकाजलानें त्यास शिंपडण्याकरितांच उदयपर्वतावर चढला. त्या वेळीं वल्लभोद्यानांत चंद्रिकास्पर्शानें पाझर फुटल्यामुळें, मनोहर अशा शिलातलावर अंग टाकून देऊन तो **केयूरकास** ह्मणाला, "आपण जाऊं तोंपर्यंत देवी प्राणधारण करीलना? **मदलेखा** तोंपर्यंत तिला करमणूक करीलना? तिचें समाधान करण्याकरितां **महाश्वेता** तरी तिजकडे जाईलना? माझ्या परिचयानें त्रासलेली देवी खाण्यापिण्याकरितां त्या दोघींची प्रार्थना तरी ऐकेलना? भयचकित हरिण बालकाचे नेत्रांप्रमाणें चंचल व विस्तीर्ण असे तिचे नेत्र आणि मंदहास्ययुक्त मुख हीं फिरून माझ्या दृष्टीस पडतीलना?" तो ह्मणाला, "धैर्य धरून लवकर जाण्याचें करावें. तिच्याजवळ कोणीही असले तरी कांहीं उपयोग होणार नाहीं. तिचें लक्ष काय तें आपणांकडेच आहे. व त्यामुळें तिला क्षणभर सुद्धां झोंप येत नहीं. कंठांत आलेले प्राण आपल्या समागमाच्या इच्छेनेंच तिनें धरून ठेविले आहेत. तिच्या मुखावाटें एकसारखा श्वास चालू आहे व रोमांच तर क्षणभर सुद्धां तिच्या शरीरास सोडीत नाहीं! तिच्या नेत्रावाटें अश्रुपात तर चालू आहेतच! झोंप तर मुद्दलीच नाहीं व सर्व तिला उदास भासूं लागलें आहे." असे त्याचें भाषण ऐकून **चंद्रापीडानें** "जा तूं आतां विश्रांति घे" असें त्यास सांगितलें, व आपण विचारांत गर्क होऊन राहिला.

तो म्हणाला, आईबापांस न कळवितां व नमस्कार करून त्यांचा आशीर्वाद न घेतां उद्धटपणानें त्यांच्या आज्ञेचें उल्लंघन करून जावें, तर मग सुख कोठलें, कल्याण कोठलें, मनोरथ सिध्दि कोठली, आणि हृदयास समाधान तरी कोठलें? सुखादिप्रकार पुढें होणार नाहींत ते न होवोत, परंतु मी अगोदर जावें तरी कसें? दुःख समुद्रांतून तरून जाण्यास सेतुच, पाहिजे तें फल देण्यास कल्पवृक्षच, शत्रु यशाला प्रतिबंध करणारा अडसर, व सर्व जगाला आधारभूत, अशा आपल्या भुजांवरून राज्यकारभार काढून ज्यानें

माझ्या स्वाधीन केला, त्या पित्याला न विचारतां गेलों, तर अपरिमित हत्ती, घोडे, रथ, पायदळ वगैरे बरोबर घेऊन धांवत, पळत, विश्रांति न घेतां, भुकेनें, तहानेनें व्याकूळ होऊन धुराळा खात राजे लोकांनीं चोहोंकडे मला पहात हिंडावें असें होणार! राजे तर येतीलच, परंतु पित्याच्या स्नेहामुळें स्त्रिया व पुत्र सोडून प्रजा देखील मला पहात फिरेल. बरें, पित्याला तरी मजखेरीज दुसरें कोण आहे, कीं ज्यावर दृष्टि देऊन हा गेला तर गेला असें रागानें म्हणून तो स्वस्थ बसेल? सुखांत असलेली माझी आई तरी कोणाच्या तोंडाकडे पाहील? मला आणण्याकरितां दुःखानें हंबरडा फोडून ती केवळ बापालाच व्याकूळ करणार नाहीं. बाप शोधास निघाल्यावर सर्व पृथ्वीच मार्गे लागल्यासारखी होईल, तेव्हां मीं कोठें जावें, कोठें विश्रांति घ्यावी, कोठें खावें, कोठें प्यावें, कोठें मीं आपला प्राण राखावा आणि सांपडल्यावर तोंड कसें दाखवावें? मला पुसल्यावर काय सांगावें? कदाचित् हातीं लागलों नाहीं, तरी क्लेश देण्यास अयोग्य अशा पित्यास व त्याच्याच कृपेनें जिला दुःख ठाऊक नाहीं, अशा आईस दुःख समुद्रांत लोटून दिल्यावर पातक्यानें मजपेक्षां अधिक तें काय करायाचें आहे? दिग्विजयापासून बहुत दिवस प्रवास करून दमून भागून गेलेलें व जें अजून येथें आलें देखील नाहीं, त्या सैन्यानें अर्ध्या रस्त्यांतूनच परतून माझ्या शोधा करितां धांवत पळत सुटावें? हें ठीक आहे काय? बरें, आईबापांच्या संमतीनें जावें, तर त्यांना काय सांगावें, कीं माझ्यावर प्रेम जडल्यामुळें जिला मदनपीडा देत आहे अशी **देवीकादंबरी** दुःख भोगीत आहे! किंवा तिजवर प्रेम जडल्यामुळें तिजवांचून माझे प्राण राहणार नाहींत! किंवा तिच्या आणि माझ्या जीवितांची सांगड घालून देणाऱ्या **महाश्वेतेनें** तिचें पाणिग्रहण करण्याकरितां मला बोलाविलें आहे! किंवा तिचें दुःख पाहवेना ह्मणून हा **केयूरक** मला नेण्याकरितां आला आहे. दुसरी शोभण्यासारखी सबब कांहींच दिसत नाहीं. नुकताच पृथ्वी जिंकून आलों त्याला तीन वर्षांवर दिवस लागले. गमन कारण न सांगतां मी येथून निघावें तरी

कसें ! आईबाप तरी कोणत्या कारणानें मला जाण्यास अनुमोदन देतील ? जिवलग मित्राकडून या कामांत मदत पाहिजे होती, परंतु तसा कोणी जवळ नसल्यामुळें मोठीच अडचण प्राप्त झाली. माझा प्रियमित्र **वैशंपायन** ही जवळ नाहीं. आतां मी कोणाला विचारूं? कोण मला खात्रीनें असें कर ह्मणून सांगेल ? अशी कोणाची विचारशील बुद्धि आहे ? इतका कोणीच माझ्या अगत्याचा दिमत नाहीं, कीं, जो मी दुःखित झालों असतां दुःखी, व सुखित झालों असतां सुखी होईल. हें कार्य करण्याचा भार सोंपवून मी स्वस्थ राहूं असा कोण आहे ? माझ्या जाण्यामुळें आईबाप रागावले तर त्यांची समजूत घालून कोण मला नेण्यास समर्थ आहे ? याप्रमाणें चिंता करितां करितां मोटी भासणारी रात्र परंतु तेव्हांच संपली. प्रातःकाळ होतांच दशपुरीपर्यंत सैन्य आलें अशी बातमी येऊन पोहोंचली. तेव्हां त्याचे मनाला उल्हास वाटला, आणि तो ह्मणाला, "अहाहा! आतां मी धन्य आहें ! थोर दैवानें मजवर मोठाच अनुग्रह केला. माझ्या काळजीबराबर माझा दुसरा प्राणच असा **वैशंपायन** आला," असा हर्षभरित होऊन, **केयूरक** येऊन नमस्कार करीत आहे तोंच त्यास ह्मणाला, "**केयूरका,** आतां आपलें काम झालें ! **वैशंपायन** आला." **चंद्रापीडाचें** येणें कसें होतें या काळजींत तो होताच, त्यानें **चंद्रापीडाचें** भाषण ऐकतांच ह्मटलें, "फार चांगलें झालें, महाराजांच्या मनासारखी गोष्ट झाली." असें बोलत तो त्याजवळ जाऊन बसला, आणि ह्मणाला, "सर्वत्र चमकणारी विद्युल्लता जशी मेघगर्जना होणार ह्मणून सुचविते, काळेभोर मेघ आल्यामुळें वृष्टि होणार ह्मणून जसें समजतें, पूर्वदिशा शुभ्र झाली ह्मणजे चंद्रोदय होणार ह्मणून जसें कळतें, सुगंध घेऊन मलयवायु आला असतां वसंतऋतु प्राप्त झाला ह्मणून जसें कळतें, वसंत आला ह्मणजे पल्लव फुटणार, पल्लववृद्धि झाली ह्मणजे पुष्पें येणार, काश पुष्पें फुललीं ह्मणजे शरदृतु येणार, असें जसें लक्ष्यांत येतें, त्याप्रमाणें हल्लीची सानंदवृत्तीच महाराजांचें तिकडे आगमन होणार ह्मणून कळविते ! यावरून महाराजांस देवीचा समागम अवश्य होणारच

असें आतां खास वाटतें! चंद्रिकेवांचून चंद्र, मृणालिकेवांचून कमलाकर, लतेवांचून उद्यान, मोहोरावांचून मनोहर वसंतऋतु, कधीं कोणी पाहिला आहे काय? तर आतां वैशंपायन येऊन त्या बरोबर विचार व तयारी होण्यास बराच वेळ पाहिजे. देवीची अवस्था कालक्रमणास किती असमर्थ आहे तें महाराजास कळविलेंच आहे. त्यांत आशा असली ह्मणजे जीविताचें जतन करावेंसें वाटतें. तिचें हृदय तर निराश असल्यामुळें तिनें कोणत्या आधारानें दम धरावा? या करितां मी लवकर जाऊन आपल्या येण्याची वार्ता सांगितली ह्मणजे देवीस वाटेल कीं, माझ्या जीविताचें प्रयोजन आहे, ह्मणून पाहिजे तितकें कष्ट सोसून तें मी धारण करीन! मनानें महाराजांची स्वारी पुढें गेलीच आहे व शरीरानेंही मागोमाग येण्यास तयार झालीच आहे, याकरितां मला येथें राहून काय करायाचें आहे? आनंदाची बातमी सांगण्यास पुढें जावेंसें वाटतें तर मला जाण्याविषयीं महाराजांनीं आज्ञा द्यावी!"

हें ऐकून **चंद्रापीडास** फार आनंद झाला. व प्रसन्नदृष्टीनें त्याकडे पाहून तो म्हणाला, "प्रसंग पाहून व काल देश वर्तमान यांस अनुसरून वागणारा, निष्कपट प्रीति करणारा, आपल्या सुखाकडेही लक्ष न देणारा असा दुसरा तुजवांचून मला कोण आहे? तूं चांगला विचार काढला. देवीचे प्राण धारण होण्याकरितां पुढें जाऊन मी खचीत येणार असें तिला सांगावें. तिला आणखी धैर्य यावें म्हणून **पत्रलेखे**लाही तुजबरोबरच पाठवितों. हिनें देवीच्या पायांजवळ जाण्याचें करावें. हिजवर तिची मोठी कृपा आहे. हिला पाहिल्या बरोबर ही देवीला पुष्कळ धैर्य येईल." असें बोलून त्यानें **पत्रलेखे**कडे पाहिलें. ती खालीं तोंड करून "जशी महाराजांची आज्ञा असेल तसें," असें ह्मणाली. तिचा जाण्याचा निश्चय ठरतांच **चंद्रापीडानें** मेघनादास बोलावून आणण्यास द्वारपालिकेस सांगितलें. आज्ञेबरोबर हजर झालेल्या, व आज्ञेची वाट पाहणाऱ्या मेघनादास उत्तेजन देऊन तो ह्मणाला, "ज्या ठिकाणाहून **पत्रलेखेस** आणण्याकरितां तुला सांगितलें होतें, त्याच ठिका-

णावर तिला घेऊन **केयूरका** बरोबर तूं जा, मी **वैशंपायनाची** भेट घेऊन तुझ्या मागोमाग आलोंच, समज." "आज्ञा महाराज" ह्मणून मेघनादानें प्रणाम करून तो तयारी करण्याकरितां निघून गेला. तेव्हां "आंतां उगीच उशीर तरी कशाला पाहिजे" असें ह्मणून नमस्कार करून **केयूरक** उभा राहिला असतां **चंद्रापीडानें** त्यास अगत्यानें जवळ बोलाविलें, आणि अश्रूंनीं भरलेल्या डोळ्यांनीं त्याजकडे पाहून त्यास आलिंगन दिलें. नंतर अनेक वर्षांनीं युक्त निरोपच काय असें रत्नजडित कर्णभूषणें आपल्या कर्णांतून काढून त्यानें त्याच्या कानांत घातलें व तो सद्गदित होऊन ह्मणाला, "**केयूरका**, तूं असा कांहीं देवीचा निरोप आणिला नाहींच कीं, त्याच्या अनुरूप तुजबरोबर मी परत निरोप पाठवावा! तथापि देवीला माझी विनंति सांगावी, कीं व्यर्थ लज्जा धरल्यामुळें मी फार क्लेशदायक झालों; तर असल्या लज्जेचा काय उपयोग? देवीच्या पायांजवळ **पत्रलेखा** तर येतच आहे ती सर्व विनंति सांगेल." असें बोलत आहे तों आपल्या विरहानें दुःखित झालेल्या, प्रयाणकालीं रडणें हें अमंगळ समजून त्यास दाबित असतां तिच्या नेत्रावाटें अश्रूंचा लोट चालू आहे, व शून्य दृष्टीनें आपल्याच पायांकडे पहात आहे अशा **पत्रलेखे**समोर होऊन **चंद्रापीड** ह्मणालाः—"**पत्रलेखे**, देवीस माझी अशी विनंति सांगावी कीं, पहिल्या भेटीसच दयाळु स्वभावामुळें कृपा करणाऱ्या देवीचा सन्मान न करितां मी निघून आलों, तेव्हां सर्व खलांच्या अग्रभागीं राहून मीं सर्व गुण दुषित केले. तर आतां कोणत्या तोंडानें अनुग्रह करण्याकरितां देवीस विनवावें? लटकी माया दाखवून देवीच्या कोमल हृदयास दुखवून मी निघून आलों नाहीं काय? तिच्या अस्वस्थ शरीराची या पाषाण हृदयानें उपेक्षा केली नाहीं काय? तथापि देवीच्या दयाळु स्वभाव दूर राहिलेल्या व मदनाग्नीनें दग्ध झालेल्या मला राखीतच आहे! तिचा सरळपणा मला बोलावितच आहे! तिचा स्नेह मला ओढून नेतच आहे! तिचा उदारपणा मजवर अनुग्रह करितोच आहे! तिची प्रीति चरण पतिताची निर्भर्त्सना करणारच नाहीं! तिचें मृदुहृदय

मला उठवून गौरव करीतच आहे! तिचें प्रिय भाषण मला हृदयांत अवकाश देतच आहे! तेव्हां फिरून निर्लज्जपणानें देवीचें दर्शन घेण्यास मी मागें पुढें पाहणार नाहीं. देवीचा अनुग्रह माझ्या जीवितास अभय देऊन मजकडून काय करविणार नाहीं? देवीच्या सेवेस मला योग्य करील, सेवाचातुर्य शिकवील, व सर्व करील. देवीचे गुण अनंत व अलंघनीय असल्यामुळें गमनाज्ञेवांचून मी कोठेंही गेलों तरी तें बळेंच मला देवीच्या पायांजवळ आणतील. इत्यादि विनंती सांगून ह्मणावें कीं जसें माझें येणें निष्फळ होणार नाहीं, व हें जग मला शून्य वाटणार नाहीं तसें देवीनें आपल्या जिवास जपावें?" असें बोलून तो आणखी ह्मणाला "पत्रलेखे, वाटेनें माझ्या विरहाचें दुःख बाळगूं नकोस. शरीराची अबाळ करूं नकोस. जेवण्या खाण्यास उशीर करूं नकोस. माहित नाहीं अशा रस्त्यानें जाऊं नकोस. नीट पाहिल्याखेरीज व चौकशी केल्याखेरीज कोठें राहत जाऊं नकोस. ज्याची पुरी ओळख देख नाहीं, अशा कोणाला आपलें हृद्गत कळूं देऊं नकोस. आपल्या शरीराची सावधगिरी ठेव. काय करावें! तुजपेक्षांही देवीचे प्राण मला अधिक प्रिय आहेत. ह्मणून त्यांच्या रक्षणाकरितां तुला एकटीला पाठवित आहें. माझे पंचप्राण तुझ्याच हातांत आहेत, असें समजून तूं आपलें चांगलें रक्षण कर." असें सांगून व मोठ्या प्रीतीनें तिला व **केयूरकाला** आलिंगून त्यालाही **पत्रलेखेला** नीट सांभाळून नेण्यास सांगितलें, आणि "हिला बरोबर घेऊन तेथून मला नेण्याकरितां तूं अगत्य ये बरें!" असें बोलून त्यास जाण्यास निरोप दिला.

ते गेल्यावर, हे लवकर पोंहचतीलना? यांना वाटेंत कांहीं अडथळा तर येणार नाहींना? यांना पोंहचण्यास किती बरें दिवस लागतील? अशीं काळजी करीत थोडा वेळ बसला. मग सैन्य आल्याची खरी काय ती बातमी कळावी ह्मणून त्याच्या शोधाकरितां एक जासूद पाठवून व ज्याच्या भेटीस फार दिवस झाले होते अशा **वैशंपायनास** सामोरें जावें असें मनांत आणून तो आ-

पळे पित्याकडे गेला. त्या ठिकाणीं दोन्ही बाजूंकडे द्वारपाळ होते. त्यांनीं झटदिशीं एकीकडे होऊन रस्ता सोडल्यावर तो आंत गेला. मग उजवा गुडघा व हात टेंकून त्यानें नम्रपणानें आपल्या पित्यास दुरूनच नमस्कार केला. त्यावेळीं त्याचें प्रतिबिंब व केश कलाप हीं मण्यासारख्या स्वच्छ फरस बंदींत प्रतिबिंबित झालेलीं दिसत होतीं.

त्यास पाहून सजल मेघाप्रमाणें गंभीर अशा स्नेह भरित वाणीनें "ये इकडे ये!" असें **तारापीड** ह्मणाला. तेव्हां **चंद्रापीड** गडबडीनें जात असतां मध्यें **शुकनास** प्रधान होता, त्यास नमस्कार करून तो एके बाजूस भुईवरच बसला. तेव्हां **तारापीडानें** बळेंच त्यास आपल्या जवळ घेऊन सिंहासनावर बसविलें. नंतर किती वेळ पाहिलें तरी अतृप्त अशा नेत्रांनीं त्याचें रमणीय शरीर पाहून **तारापीडानें** त्याच्या सर्व अंगावरून हात फिरविला. नंतर तो प्रधानास ह्मणाला, "**शुकनासा**!! दीर्घायुषी **चंद्रापीडाकडे** पाहिलें का? सुवर्ण पर्वतावर जशी इंद्रनील मण्यांची कांती! चंद्रावर जशी कलंक लक्ष्मी! प्रफुल्लित कमलाकरावर जशी भ्रमर पंक्ति! किंवा प्रज्वलित मदनदीपावरची काजळीच! दैदीप्यमान प्रतापाग्नीची जणूं धूमरेखाच! किंवा मदनाच्या विलास वनांतील तमाल वल्लीच! अशी **चंद्रापीडाच्या** मुखावरही पहा कशी रोमपंक्ति (मिशी) फुटली आहे ती! हो हा विवाह मंगळ करण्यास योग्य झाला. असें कळवितेच आहे! याकरितां देवींचा विचार घेऊन एखादी सुंदर व कुलीन राजकन्या पाहून आणावी. ह्मणजे जसें बालकाचें दुर्लभ मुख एकदांचें दृष्टीस पडलें, तसेंच आतां त्याच्या वधूचेंही दृष्टीस पडेल असें करून मला आनंद करा.

**शुकनास** ह्मणाला, "महाराजांनीं फार चांगला विचार मनांत आणिला. चंद्रकांतानें सर्व विद्या व कला यांचें संपादन केलें आहे. सर्व प्रजेस अगदीं वश केलें आहे. सर्वदिक्सुंदरीचें करग्रहण केलें आहे. राजलक्ष्मीस कुटुंबवत्सल करून सुस्थिर केलें आहे. चतुः समुद्रवलयांकित भूमीही वरिली आहे. तेव्हां

यानें वरिलें नाहीं असें काय राहिलें आहे? हें भापण ऐकून **चंद्रापीडानें** लज्जेनें मान खालीं घातली, आणि तो मनांत ह्मणाला, "वाहवा! काय वडिलांचें संभाषण चाललें आहे! **कादंबरीच्या** समागमाच्या उपायांचें मी चिंतन करीत आहे तों पित्यास अशी बुद्धि सुचली! अंधकारांत प्रवेश करण्यास जसा प्रकाश, निबिड अरण्यांत जाणाऱ्यास जसा वाटाड्या, समुद्रांत पडलेल्यास जशी नौका प्राप्ति, मरणोन्मुखावर जशी अमृतवृष्टि, याप्रमाणें ही प्रसंगोचित गोष्ट निघाली आहे! तर आतां **कादंबरीची** प्राप्ति होण्यास **वैशंपायनाच्या** भेटीवरच काय तें अवलंबून आहे!" असें तो चिंतन करीत आहे तों **तारापीड** उठला, आणि **शुकनास** व **चंद्रापीड** यांस **विलासवतीच्या** मंदिरांत घेऊन गेला. तेथें गेल्यावर चंद्रोदयानें समुद्र वेला[१] जशी चंचल होते त्याप्रमाणें **तारापीडास** पाहून **विलासवतीच्या** जीवाची उठून उभें राहण्याची वगैरे गडबड झाली. मग तो तीस उभ्या उभ्याच ह्मणाला, "देवी, हें पहा बालकाचे मुखावर तारुण्य लक्षण (मिशी) दिसत आहे. तारुण्यभराचें सूत्र, तरुणपणांतील विलास पुरविण्याविषयीं मूर्तिमंत आज्ञाच, असें हें दिसत आहे! सुनमुख दृष्टीस पडावें ह्मणून तूं अजूनही कशी उतावळी होत नाहींस? मी तुझा विचार घ्यावयास आलों असतां तूं लज्जेनें आपलें मुख एकीकडे कां करतेस! नीट कां सांगत नाहींस? लाजून तोंड खालीं घालून कां बसली आहेस? तूं तर आता वरमाय होणार! तुला तर अगोदर हौस असावी! पण तूं कांहींच बोलत नाहींस, यावरून **चंद्रापीडावर** तुझी ममता नाहीं असें वाटतें!' याप्रमाणें तिशीं विनोद करीत मोठ्या आनंदांत कांहीं वेळ तेथें राहून तो भोजन करण्यास निघून गेला. पुढें **चंद्रापीडानें वैशंपायनास** घेऊन येण्याविषयीं **शुकनासाकडून** पित्याची आज्ञा मिळविली, मग त्या दिवशीं त्यानें आपल्या आईच्या घरींच भोजन केलें, आणि **वैशंपायनास** सामोरें जावयाचें, अशा नादांत त्यानें दिवस घालविला. रात्रीं निद्रा कर-

१ मर्यादा.

ण्याकरितां बिछान्यावर गेला असतां मित्राच्या दर्शनाच्या उत्कंठेनें दोन प्रहर रात्र उलटून गेली तरी त्यास झोंप कशी ती लागली नाहीं. नंतर, जिकडे तिकडे अति स्वच्छ चंद्रकिरण पडलें होतें, तें जसें काय आपल्या कांतीनें आकाशाचा नीलवर्ण बदलीतच आहेत काय! हिरव्यागार वनाचा हिरवा वर्ण नाहींसाच करीत आहेत काय! व त्यांना छिद्रें पाडून आंत शिरतच आहेत काय! वृक्षच्छायेस वाळवूनच देत आहेत! गुहा, वनें, व वनस्पतींच्या दाट जाळ्यांत जाऊन लपलेल्या अंधकारास पिटाळूनच लावीत आहेत काय! विवर प्रवेशाच्या मिषानें रसातळांत शिरून पृथ्वीचा तळ शोधितच आहेत काय! चुने गच्ची हवेल्यांस आणखी नवीन सफेतीच देत आहेत काय! दशदिशांकडे कर्पूराची धूळच उठवित आहेत काय! शुभ्रचंदनरसानें रात्रिरूप स्त्रीस उटीच देत आहेत काय! ग्रह व नक्षत्रें यांचा संक्षेपच करीत आहेत काय! नद्यांचीं वाळवंटें विस्तीर्णच करीत आहेत काय! सूर्यविकासी कमलांना दाबूनच धरीत आहेत काय! चंद्रविकासी कमलांना विस्तीर्णच करीत आहेत काय! सर्व पृथ्वीवर वाहतच चालले आहेत काय! जलतरंगांवर पोहतच आहेत काय! वाळवंटांत पसरलेच आहेत काय! हंसांच्या समुदायांत अगदीं मिळूनच गेले आहेत काय! चंद्रकांत पाषाणापासून निघालेल्या प्रवाहांत स्वच्छ अंग धुऊनच बाहेर पडले आहेत काय! **कादंबरीच्या** समागमाकरितां **चंद्रापीडानें** लवकर जावें ह्मणून मदनाचे बाण होऊन त्यावर भडिमारच करीत आहेत काय! असें तें किरण त्याच्या दृष्टीस पडलें. तेव्हां त्याच्या मनांत दुप्पट उत्साह उत्पन्न होऊन आपले प्रयाण कळण्याकरितां त्यानें शंख फुंकण्यास सांगितलें.

आकाशांत तो शंखनाद घुमत राहिला असतां सर्व आकाशभर पसरलाच आहे काय! दशदिशा भरून उरलाच आहे काय! नगराच्या तटबंदी वरून फिरतच आहे काय! मोठमोठ्या उंच वेशीवरून व मनोऱ्यावरून चढतच आहे काय! राजवाड्याच्या मध्यभागीं घुमतच आहे काय! राजमार्गां मधून पसरतच जात आहे

काय! पर्वतांच्या गुहा, व सांदीकोंदी यांमध्यें भ्रमणच करीत आहे काय! देवालयांमध्यें जाऊन गजरच करीत आहे काय! सरोवराव-रील पक्ष्यांनीं तो नाद उच्च स्वरांनीं वृद्धिंगतच केला काय! गमनकालीं नमन करण्याकरितां आलेल्या वेश्यांच्या भूषण शब्दांनीं ज्याला सहाय्यच केलें आहे काय! अशा प्रकारें तो नाद घुमत राहिला. अशा समयीं स्वारीबरोबर निघणाऱ्या लोकांची एक सारखी धांदल उडाली. त्या शब्दाबरोबर कित्येक घोडे उठून उभे राहिले आहेत. कित्येकांना उठवून उभे केलें आहे, कित्येक बाहेर काढिलें आहेत, कित्येकाना बाहेर काढण्याची तयारी चालली आहे, कित्येकावर खोगिरें घातिलीं आहेत, कित्येकांवर खोगिरें घालण्याचें काम चालूं आहे, कित्येक इकडचे तिकडे व तिकडचे इकडे धांवत आहेत, कित्येक सज्ज करून रांगांनीं उभे केले आहेत, व कित्येकांवर साज चढविण्याची तयारी चालली आहे, कित्येकांवर स्वार बसले आहेत. व कित्येक चौखुरावर उडत आहेत. ते इतके पुष्कळ हो-ते कीं राजवाड्याच्या विस्तीर्ण अंगणांत, रस्त्यांत, मोठ मोठ्या मैदा-नांत, व आंत बाहेर सर्व नगर भर उभे राहण्यास त्यांस पुष्कळ जागा होती तरी त्यांना ती पुरेनाशी झाली. असे हजारों घोडे तयार होऊन उभे राहिले. स्वारांनीं हातांत भाले धरिले होते त्या मुळें हें भाल्यांचें वनच उभे आहे काय असें भासलें! घोड्यांच्या टापांच्या धुराळ्यानें पृथ्वी झांकूनच गेली आहे काय असें दिसलें! घोड्यांचीं फुरफुरणीं इतकी चाललीं होतीं कीं त्यांनीं कानटाळ्या बसून गेल्या! त्यांच्या तोंडांतील फेंस पडल्यामुळें राजवाड्याचें अंगण शुभ्र पुष्प गुच्छांनीं भरूनच गेलें आहे काय असें वाटलें! त्यांच्या लगामांच्या खळखळ शब्दांनीं दशदिशा अगदीं भरून गेल्या. शुभ्र चंद्रिका अश्वांच्या अलंकारावर पडल्यामुळें जिकडे तिकडे चंद्रिकामय दिसत होते! नंतर चंद्रापीड सज्ज होऊन त्या ठिकाणीं येऊन इंद्रायुधावर चढून बसला. त्याचें तेजस्वी छत्र पुढें चालूं लागल्यामुळें स्वारी निघाली असें सर्वांस समजलें. तें छत्र हंसाप्रमाणें शुभ्र व तेजस्वी असल्याकारणानें प्रकाशाकरितां हें दुसरें

चंद्रमंडळच पुढें चाललें आहेसें भासलें! शेंकडों राजे चोहोंकडून येऊन त्यास नमस्कार करूं लागले. नगरवासी लोक निद्रित असल्यानें रस्ते मोकळे होते तरी घोड्यांची इतकी गर्दी होती कीं, चंद्रापीडास मोठ्या अडचणीनेंच बाहेर निघावें लागलें. नंतर शिप्रा नदीजवळ गेला, नदीवर अति स्वच्छ चंद्रिका पसरल्यामुळें जिचें उदक दिसत नव्हतें, चंद्रविकासीकमलें प्रफुल्लित झाल्यामुळें व त्यांवर हंसपक्षांचे थव्याशी थवे लागल्यामुळें जसें काय पांढरें शुभ्र वाळवंटच पसरलें आहेसें दिसत होतें. सैन्याच्या गलबल्यानें हंसपक्षी त्रासून शब्द करूं लागले. त्यामुळें व थंडगार व तुषार युक्त असा वारा आल्यामुळें जिचें पाणीजवळ आलेंसें कळलें, अशी ती शिप्रा नदी उतरून गेल्यावर दशपुरास जाण्याच्या मार्गानें तो चालला. तो मार्ग फार मोठा असल्यामुळें व वाटेंत मनुष्यांची अडचण नसल्यामुळें गमनोत्साहास वाढवितच आहे काय असा दिसला. त्याच्या बरोबरचे अश्वही वेगानें चालत असल्यामुळें सर्व दिशांकडे वाहणाऱ्या चंद्रिकारूप प्रवाहाबरोबर ते वाहतच चालले आहेत काय असें दिसलें! किंवा वैशंपायनाच्या भेटी करितां पुढें धांवत चाललेल्या चंद्रापीडाच्या मनाबरोबर वेगानें धांवणाऱ्या इंद्रायुधानें ओढीतच चालविले आहेत काय असे ते अश्व दिसले. याप्रमाणें वैशंपायनाच्या दर्शनाच्या उत्कंठेनें जलदीनें घोडे उडवीत चंद्रापीड पहांटपर्यंत बाराकोस जमीन चालून गेला.

नंतर मार्गश्रम दूर करण्याकरितांच मंदमंद वाहून आनंद देणारा, चंद्रिकाप्रवाहांत स्नान केल्यामुळें शीतल, दहिंवरांतील जलकण घेऊन येणारा, अनेक प्रकारच्या वृक्षपल्लवांच्या चवऱ्यांस हालविणारा, प्रफुल्लित कमलांतील सुगंध घेऊन येणारा, व रात्र संपली असें सुचविणारा, वारा वाहूं लागला. रात्रि रूप स्त्रीच्या विरहानें दुःखित झाल्यामुळेंच काय! किंवा आपला अस्त होणार या चिंतेंमुळेंच काय! किंवा चंद्रविकासींकमलनी वर तोंडेंकरून सर्व रात्रभर चंद्रिका पिऊन टाकल्यामुळेंच काय! अथवा चंद्रापीडाच्या घोड्यांच्या धुळीनें भरल्यामुळेंच काय! फिकट झालेला असा चंद्र अस्तास

जाऊं लागला. पश्चिम समुद्राकडे वाहत जाणाऱ्या चंद्रिका प्रवाहा बरोबरच फेंस व बुडबुडे या सारखीच काय अशीं नक्षत्रें वाहत गेल्यासारखीं दिसलीं. दहिंवराच्या पाण्यानें मौक्तिकासारखा गौर असा चंद्रिकेचा तजेला धुऊन गेल्यामुळेंच ती फिकी दिसूं लागली. नंतर चहुंकडे लता व वृक्ष हिरवेगार दिसूं लागले व जसे काय उदकांतूनच बाहेर येत आहेत असें दिसले. अरुणोदय झाल्यामुळें पूर्व दिशेच्या कर्णांतील पल्लवच काय, आकाशरूप सरोवरांतील रक्तकमलच काय, किंवा सूर्याच्या रथध्वजाचें हें लाल फडकेंच काय, असा तो दिसला! झाडावर लाल प्रकाश पडला असतां हा वणवाच लागला असें समजून पक्षी झाडांवरून उठून ओरडत फिरूं लागले सर्व रात्रभर पाय पसरल्यामुळें ज्याना लवकर पळतां येत नाहीं, तथापि बळानेंच ते लांबवून पळत आहेत असे, व झोंप पुरी न झाल्यामुळें आळसलेले, असे हरिण हिंडूं लागले. सांचलेल्या सरोवराजवळच्या नागरमोथ्याचे मनास येईल तसे तुकडे करून टाकणारे असे रानडुकर पर्वताच्या गुहांकडे जाऊं लागले. पहांट झाल्यामुळें गुरे चरण्याकरितां गांवाबाहेर जाऊं लागलीं. गुराखी गुरें चारीत असल्यामुळें ग्रामसीमा पांढऱ्या शुभ्र दिसूं लागल्या. दिशा दूर झाल्यासारख्या दिसल्या. अरण्यें मागें सारल्यासारखीं झालीं. गांवाच्या सीमा विस्तृत दिसूं लागल्या. तलाव उथळ दिसूं लागले. अंधकार रूपी पडदा करांनीं दूर करून आपल्या विरहानें दुःखित झालेल्या कमलनीस पाहण्याकरितांच सूर्य उदय पर्वतावर चढला. आकाश तेजस्वी होऊन सर्व दशदिशा प्रकाशित झाल्या. अशा वेळीं सुमारें एक कोसावर रात्रभर चालून आलेलें, अंतःक्षोभामुळें भ्यालेल्या रसातलानेंच बाहेर टाकून दिलेलें, सर्व दिशांकडे पसरलेले, सूर्य किरणांबरोबरच विस्तीर्ण होत चाललेलें, डोळे ताणून पाहिलें तरी ज्याचा शेवट दिसत नाहीं असें अनेक मांडलिकराजे ज्याला आवरीत आहेत असें मोठ्या नदीच्या प्रवाहा सारखें, प्राणिमय असा आठवा समुद्रच व अतिशय धूळ उडाल्यामुळें नीट दिसत नाहींत असें हजारों हत्ती, घोडे, व मनुष्य यांची

एकसारखी चळवळ चालूं असल्यामुळें जे मंदरपर्वताच्या घुसळण्यानें लाटांनीं खवळलेला हा महासागरच आहे काय, असें भासणारें व तळदेण्याच्या तयारींत असलेलें सैन्य त्याच्या दृष्टीस पडलें.

तेव्हां **चंद्रापीड** ह्मणाला, " वाहवा ! फार चांगलें झालें ! मी येणार हें ज्याच्या ध्यानीं मनीं ही नाहीं, अशा **वैशंपायनास** मी आतां एकाएकी जाऊन भेटेन." असें ह्मणून छत्र चामरादिक राज चिन्हांसह सर्वांचें निवारण करून व शेल्यानें डोकें गुंडाळून इंद्रायुधास दौडवितच तो तिकून गेला. त्याच्या मागून तीन चार स्वार मात्र धांवत गेले. **चंद्रापीड** त्या सैन्यांत येऊन दाखल झाला, त्या वेळीं तेथील लोक अनेक प्रकारच्या आपआपल्या काम धंद्यांत गुंतून गेले होते. तो तेथें गेल्यावर प्रत्येक तंबूजवळ जाऊन '**वैशंपायन** कोठें आहे ?' असें विचारूं लागला. तेव्हां त्या ठिकाणच्या उद्विग्न असलेल्या स्त्रियांनी त्यास ओळखिलें नाहीं आणि त्या आपआपल्या कामांत व्यग्र राहून ह्मणाल्या, " बाबा काय पुसत हिंडतोस ! या ठिकाणीं कोठला **वैशंपायन** ?" असें भाषण ऐकून तो घाबरून ह्मणाला, " हा पापिणींनो, तुह्मी असें भलतेच काय बोलता ?" असें ह्मणून तो वेड्यासारखा होऊन फिरूं लागला. जसा भ्यालेला हरिणबालक धांवत जातो, किंवा कळपांतून चुकलेला हत्तीचा छावा जसा धांवत फिरतो, किंवा गाईची चुकामूक झाल्या मुळें तिचें वांसरूं जसें घाबरून व वरकान करून पळत सुटतें, त्या प्रमाणें त्याची स्थिति झाली. तो नीट पाहीना, नीट ऐकेना, नीट बोलेना, नीट लक्ष्य देईना, एके जागीं ठरेना, व मी कोठें आलों, कशाकरितां आलों, कोठें चाललों, काय करितों, हें त्यास कांहींच कळेना. शेवटीं आंधळ्यासारखा, बहिऱ्यासारखा, मुक्यासारखा, जडासारखा, व भूताविष्टासारखा होऊन तो एकसारखा धांवत पळत सैन्याच्या मध्यभागीं गेला.

त्या ठिकाणीं इंद्रायुधाला पाहिल्यामुळें व त्याच्या मागें राजपुत्र ही असल्यामुळें हा युवराज चंद्रापीड आहे असें समजून धांवत धांवत राजे लोक त्याजवळ आले. त्या राजपुत्रांत कित्येकांची

देहभानें जाग्यावर नसल्यामुळें त्यांच्या अंगावरचीं वस्त्रें मार्गांत पडलीं आहेत, कित्येकांचीं फाटलीं आहेत, कित्येक अश्रुढाळीत आहेत व कित्येक दुःखानें उदास व भयभीत झाले आहेत, असे राजे येऊन नमस्कार करताहेत तों, '**वैशंपायन** कोठें आहे?' असें **चंद्रापीडानें** त्यांस घाईनें विचारलें. तेव्हां महाराजांनीं या झाडाखालीं उतरून बसावें, म्हणजे आम्ही सर्व हकीकत सांगतों, अशी त्यांनीं विनंति केली. तेव्हां स्पष्ट कळण्यापेक्षां देखील अधिक दुःख देणारें असें त्यांचें संदिग्ध भाषण ऐकून **चंद्रापीडाचें** हृदय व्याकूळ झालें व त्यास मूर्च्छा आली. त्या वेळीं वृद्ध राजे लोकांनीं त्यास घोड्यावरून उतरून गालिच्यावर बसवून धरून ठेविलें, परंतु तो देहभानावर नसल्यामुळें हे त्यास कांहींच समजलें नाहीं. मग तो सावध झाल्यावरही **वैशंपायनाला** न पाहिल्यामुळें मी कोठें आहे, काय करितो आहें, हें न समजून तो अगदीं भ्रमिष्टासारखा होऊन गेला, व नुसतें सैन्य आलें, यावरूनच **वैशंपायनाची** घडगति नाहीं असें मानून असह्य दुःखानें तो पीडित झाला व मी आतां मोठ्यानें रडूं, कां शोक दाबून गुपचीप बसूं, कां बलात्कारानें आत्महत्या करूं, कां कोठें अरण्यांत निघून जाऊं, काय करूं तरी काय! अशा अनावर शोकाग्नीनें अंतःकरणांत दग्ध होऊन तो आपल्या मनांत ह्मणाला, "काय पहा, सर्व जग मला रमणीय दिसत होतें, तेंच आतां कसें भयाण दिसूं लागलें, व सर्व दिशाही कशा अंधक दिसूं लागल्या! माझें जीवित मला सफल वाटत होतें, तेंच आतां निष्फलसें वाटूं लागलें! प्राण सुरक्षित होते, ते आतां चोरून नेल्यासारखे झाले! मी आतां कोणाला भेटूं, कोणा बरोबर बोलत बसूं, कोणाजवळ मरंवशाच्या गोष्टी सांगत बसूं, कोणा बरोबर आनंदानें कालक्रमण करूं, माझ्या व **कादंबरीच्या** जीविताचा तरी आतां काय उपयोग? **वैशंपायना** करितां कोठें जाऊं? कोणाला पुसूं? व कोणाची मी विनवणी करूं? कीं तेणेंकरून मला फिरून तें मित्र रत्न तो आणून देईल? त्याच्या वांचून आर्य **शुकनासास** तरी मी आपलें तोंड कसें दाखवावें? पुत्रवत्साला

मनोरमाबाईचें तरी शांतवन काय सांगून करावें? एखादें दुष्पाप-स्थान मिळविण्याकरितां तो मागें राहिला! किंवा कोण्या राजाची वाट पहात बसला! किंवा कांहीं सांगितलेलें काम करण्याकरितां कोणीकडे गेला! हें कांहींच समजत नाहीं." याप्रमाणें अनेक कल्पना करीत खालीं तोंड घालून तो चिंताक्रांत बसला. आणि अजून माझें हृदय कसें फुटत नाहीं ह्मणून आश्चर्यानें आपणाला महा-पराधी व महापातकी मानीत दुःखानें त्या राजे लोकांस त्याचें वर्त-मान विचारूं लागला.

"मी आल्यावर मागें कांहीं युद्ध प्रसंग उपस्थित झाला, किंवा शेवट करणारा असा एखादा असाध्य व्याधि उत्पन्न झाला कीं, त्यामुळें त्याच्या प्राणावर येऊन प्रसंग गुदरला काय, झालें तरी काय!" हें भाषण ऐकतांच त्यांनीं कानांवर हात ठेवून विनंति केली, "महाराज, असें भलतेंच बोलूं नये. महाराज दीर्घायुषी आहेत, तसा **वैशंपायनही** आहे." हें ऐकतांच पुनरुज्जीवनच पावलेला असा **चंद्रापीड** त्यांस आलिंगून ह्मणाला, "**वैशंपायन** जिवंत असल्यावर मजवांचून तो क्षणभरही दुसरीकडे राहणार नाहीं, असें समजून मीं भलतेंच म्हटलें, परंतु तो जिवंत आहे, असें तुमच्या मुखानें समजतें, तर आतां त्याचें काय वर्तमान आहे? तो कां आला नाहीं? तो कोठें राहिला? त्याला एकट्याला सोडून तुह्मी कसे आलांत? तो राहिला तरी तुह्मीं त्याला बळेंच कां आ-णिलें नाहीं? हें लवकर सांगा!" त्यांनीं विनंति केली, "महाराज, सर्व सांगतों," ऐकावें. "तुह्मी **वैशंपायना**बरोबर मागून यावें" अशी आज्ञा करून महाराज निघून आल्यावर त्या दिवशीं सर्व सामग्रीचा संग्रह असल्यामुळें सैन्याचा तळ तेथून उठविला नाहीं. दुसरे दिवशीं प्रातःकाळींच निघायाचें ह्मणून नगारा वाजविला व हत्ती, घोडे वगैरे सर्व सैन्य तयार झालें. इतक्यांत **वैशंपायन** ह्म-णाला; अति पुण्यकारक असें अच्छोदसरोवर पुराणांत सांगितलें आहे, याकरितां त्यामध्यें स्नान करून व सिद्ध पुरुषांनीं सेवित अशा त्याच्याच तीराचे ठायीं संसारांतून मुक्त करणाऱ्या शंकराचें

स्थान आहे त्याचेंही वंदन करून मग जाण्याचें करूं. देवादिकांनीं सेवित ही भूमि फिरून कशानें दृष्टीस पडणार आहे ! असें बोलून तो पायांनींच अच्छोदसरोवरावर गेला. तेथें सर्वत्र अति रमणीय देखावा असल्यामुळें त्यास पाहत तो फिरूं लागला. तेथील सरोवराच्या तरंगांवरून आलेल्या वायूच्या योगानें वृक्षांचे पल्लव हालत असल्यामुळें व त्यांवरच्या पुष्पांवर मकरंद लोभानें भ्रमर गुंजारव करीत असल्यामुळें तो दुरून बोलावितच आहे काय असा, पाचूप्रमाणें हिरवागार कांतीनें दशदिशा व्यापच करीत आहे काय असा, सूर्याच्या किरणांचा जेथें रिघाव होत नसल्यामुळें भर दिवसा देखील दोन प्रहर रात्रीचा देखावा दाखवीत आहे असा, माहितीतला असूनही हें मेघजालच आहे असें समजून ज्याकडे माना वर करून मोर पहात व ओरडत आहेत असा, सर्व तापांचा शत्रुच, शैत्याचें केवळ घरच, वसंतऋतु बाहेर पडण्याचा मार्गच, मदनाला आश्रय भूतच, रतीचें विनोद स्थानच, सर्व रमणीय पदार्थांचें आलयच, अच्छोदसरोवरा वरून शितल व सुगंधि झुळुका येत असल्यामुळें सुखकारक, ज्याच्या मध्यभागीं पाचूची शिळा असल्यामुळें सुशोभित दिसणारा, असा एक लतामंडप त्याचे दृष्टीस पडला. त्यास पाहून बंधु, पुत्र किंवा मित्र यांची पुष्कळ दिवस भेट अंतरली ह्मणजे जसें होतें, तसें त्याला झालें, आणि स्तंभासारखा किंवा चित्रासारखा स्तब्ध होऊन पापणीस पापणी न लावतां फार वेळ तिकडेच पहात तो उभा राहिला. पुढें त्याला आपलें अंग सांवरून धरवेनासें झालें, आणि सर्व इंद्रियांनीं सोडल्यासारखें होऊन व आपळें अंग सोडून देऊन तो जमिनीवर बसला, आणि कांहीं मनांत चिंतन करीत आहे, कां ध्यान करीत आहे, असा तो दिसला. त्याच्या डोळ्यावाटें अश्रुधारा चालून तो तोंड खालीं घालून उगीच बसला. अशी त्याची अवस्था पाहून आमच्या मनांत आलें, कीं मोठें धैर्य धारण करणारे प्रौढ पुरुष असतात ते देखील तसें कांहीं दृष्टीस पडलें तर मोहित होतात. मग तारुण्यभरांत आलेले पुरुष मोहित होतील यांत नवल तें कोणतें ! तेव्हां हें मनो-

हर स्थान दृष्टीस पडल्यामुळें याला हा विकार उत्पन्न झाला असावा. मग लागलींच आम्हीं त्यास ह्मटलें कीं, "दर्शनीय पदार्थांची केवळ परमावधिच असें हें स्थान त्वां पुष्कळ वेळ पाहिलें. तर उठ आतां, आपण स्नान करूं! आपल्याला फार विलंब झाला, सर्व सैनिक लोक तयार होऊन तुझी वाट पहात बसले आहेत, तेव्हां आतां उशीर कशा करितां? असें आम्हीं म्हटलें असतां, जसें कांहीं आमचें भाषण त्याला मुदलींच ऐकूं गेलें नाहीं. असा जडासारखा, मुक्यासारखा किंवा वेड्यासारखा होऊन, कांहीं एक उत्तर न देतां त्या लतामंडपाकडेच टक लावून अश्रु ढाळीत बसला. फिरून फिरून आम्हीं चलण्याविषयीं त्यास म्हटलें, तरी तिकडेच पहात आम्हांस निष्ठुरपणानें म्हणाला, 'या ठिकाणास सोडून मी तर येणार नाहीं. याकरितां सैन्य घेऊन तुम्हीं जावें. **चंद्रापीड** गेला असतां त्याच्या बाहुबलानें रक्षिलेलें एवढें मोठें सैन्य घेऊन या ठिकाणीं क्षणभर राहणें देखील तुम्हांस योग्य नाहीं.' असें त्याचें भाषण ऐकून दुर्दैवानें याला वैराग्य उत्पन्न झालेसें वाटून चालण्याविषयीं आम्हीं त्याची वारंवार प्रार्थना केली परंतु ती व्यर्थ झाली. तेव्हां त्याच्या विरुद्ध आचरणानें वाईट वाटून आम्हीं त्यास निष्ठुरपणानें म्हटलें. "आम्हांला येथें रहाणें योग्य नाहीं ह्मणतोस, आणि तुला योग्य आहे काय? अरे **तारापीड** महाराजांत व ज्यांत बिलकूल अंतर नाहीं अशा आर्य **शुकनासा**पासून तुझें जन्म झालें! **विलासवती**नें आपल्या मांडीवर तुझें लालनपालन केलें! **चंद्रापीडा**बरोबर एके ठिकाणीं वाढविलें! व विद्यामंदिरांत मोठ्या प्रयत्नानें तुला शिकविलें! असें असून तुझा वडील बंधु, मित्र, पालक, सर्व जगाचा स्वामी, गुणवान् अशा **चंद्रापीडा**नें सर्व तुझ्या स्वाधीन करून गमन केलें असतां त्याला सोडून तुला येथें राहणें योग्य आहे काय? बिलकूल विचार मनांत न आणणारा असा तुज खेरीज दुसरा कोण आहे? आमची तुझ्यावर किंवा तुझी आमच्यावर प्रीति आहे ही गोष्ट राहूं दे; परंतु अशा भयंकर अरण्यांत तुला एकटें सोडून आम्ही गेलों असतां चंद्राप्रमाणें

शांत असा चंद्रापीड तरी आम्हाला काय ह्मणेल! चंद्रापीड निराळा व तूं वेगळा! असा कांहीं भेद आहे काय? तर आतां असा हेकडपणा सोडून दे आणि आमच्या बरोबर चल. असें आमचें भाषण ऐकून किंचित् आश्चर्ययुक्त हास्यमुद्रा करून तो म्हणाला, चंद्रापीडाकडे जावें हें देखील मला समजत नाहीं काय? म्हणून तुह्मी मला इतका बोध करितां? ज्याच्या वांचून क्षणभर देखील मला दुसरीकडे राहवत नव्हतें हें सर्व मला माहीत आहे, परंतु काय करूं? हल्लीं मी आपल्या स्वाधीन राहिलों नाहीं. कशाची तरी आठवण करीत असल्यामुळें मन दुसरीकडे लागत नाहीं. कांहीं तरी पाहत असल्यामुळें दृष्टि तेथून निघत नाहीं. कोठें तरी आसक्त झाल्यामुळें हृदय दुसरें कांहीं जाणीत नाहीं, खिळ्या ठोक-ल्याप्रमाणें पाय एक पाऊल देखील दुसरीकडे टाकूं शकत नाहींत. या ठिकाणीं माझें शरीर अगदीं जखडून टाकल्यासारखें झालें आहे! याकरितां आपण होऊन मी येण्यास समर्थ नाहीं. बळेंच तुह्मीं जर मला न्याल, तर या ठिकाणाहून पलीकडे गेल्यावर माझे प्राण राहतील कीं नाहीं हें सांगवत नाहीं! येथें राहिलों असतां माझ्या मनांत सांगतां येत नाहीं असें कांहीं घुटमळतें आहे, त्यानेंच प्राण धारण होईलसें वाटतें. याकरितां मला येण्याविषयीं आग्रह करूं नका. तुह्मी जा आणि जन्मभर चंद्रापीडाच्या दर्शनसुखाचा अनुभव घ्या. मला पाप्याला तें प्राप्त झालें असतांही दुर्दैवानें हिरावून घेतलें! अशा त्याच्या भाषणानें आश्चर्य वाटून आह्मीं वारंवार त्यास विचा-रिलें कीं, चंद्रापीडाकडेही येत नाहीं ह्मणतोस व असेंही बोलतोस! तर हें आहे तरी काय? तो ह्मणाला, मला सांगायाला लाज वाटतें, तथापि मला येथून कां येववत नाहीं याबद्दल जर मला माहीत असेल तर प्रियमित्र चंद्रापीड याच्या गळ्याचीच शपथ! हा सर्व वृत्तांत तुमच्या समक्षच घडला आहे. दृष्टीआड कांहीं एक झालें नाहीं. याकरितां तुह्मी जाण्याचें करावें. असें बोलून तो तटस्थ बसला व दोन घटकांनीं तेथून उठून रमणीय वृक्षतळें, लतागृहें, सरोवरें, व देवालयें या सर्व ठिकाणीं जसें कांहीं हारवलें

आहे, व त्यास शोधीतच आहे, अशा तो तिकडेच लक्ष देत व पाहत हिंडूं लागला. अशा रीतीनें फार वेळ हिंडल्यावर खिन्न होऊन मोठ्या दुःखानें श्वासोच्छ्वास सोडीत तो दुसऱ्या एका लतागृहांत जाऊन बसला. हा कांहीं वेळानें तरी उमजेल, अशा आशेनें आम्ही त्याच्या जवळच त्या झाडींत राहिलों. पुढें दोन प्रहर लोटून गेल्यावर भोजन करण्याविषयीं आह्मीं त्याची प्रार्थना केली. तेव्हां तो ह्मणाला, प्रियमित्र **चंद्रापीडाला** माझे प्राण आपल्या जिवापेक्षां देखील अधिक प्रिय आहेत, याकरितां ते मला बलात्कारानें सोडून जाऊं लागले, तरी त्यांच्या रक्षणाकरितां प्रयत्न केला पाहिजे. **चंद्रापीडाच्या** भेटीचीच मला इच्छा आहे, मृत्यूची नाहीं; तेव्हां या कामांत तुमची प्रार्थना कशाला पाहिजे? असें ह्मणून तो उठला आणि स्नान करून वनवासाला उचित अशा कंदमूल फलांचाच त्यानें आहार केला. त्या प्रकारच्या त्याच्या वर्तनानें आश्चर्ययुक्त होऊन हें काय असावें, ह्मणून विचार करीत तीन दिवसपर्यंत आम्ही तेथेंच राहिलों; शेवटीं त्याचा कांहीं परिहार त्याजवळ ठेवून केवळ निरुपायामुळें आम्ही इकडे निघून आलों. ही बातमी पूर्वीं पाठविली नाहीं याचें कारण एक हें कीं, गृहाकडे चाललेल्या महाराजांस ती लवकर वाटेंत पोंहोंचणार नाहीं दुसरें, घरीं आल्यावर पोंचली ह्मणजे लागलींच पुन्हां येण्याचे श्रम होऊं नयेत. आपल्या वांचून तो येणार नाहीं अशी आमची पक्की खात्री झाली आहे.

स्वप्नांत देखील ज्याची कल्पना होणार नाहीं असा **वैशंपायनाचा** वृत्तांत ऐकून दुःख व आश्चर्य यांनीं व्याप्त होऊन **चंद्रापीड** ह्मणाला, "**वैशंपायनाला** सर्व सोडून देऊन वनवासांत राहण्याचें असें काय कारण झालें असावें बरें? माझ्या हातून चुकी झाल्याचें ही कांहीं दिसत नाहीं. पित्याच्या कृपे करून माझ्याप्रमाणें त्याचाही राजेलोक सन्मान ठेवितात. माझ्याप्रमाणें त्यालाही सर्व उपभोग वस्तु आहेत. कांहीं एक कमी नाहीं. माझ्याप्रमाणें त्याचीही कोणी आज्ञा मोडीत नाहीं. मी जसा दुसऱ्यावर निग्रहानु-

ग्रह करितों, तसा तोही करितो. मला अपराधी भितात, तसेच त्यालाही भितात. मजप्रमाणें त्यालाही संपत्ति आहे. माझ्याप्रमाणें त्याजवरही लोकांची प्रीति आहे. इकडून जातांना माझे किंवा त्याचे वडील यांनीं पुत्रोचित स्नेहानें त्यास वागविलें नसेल काय? किंवा अधिक नम्रपणा इच्छिणारा त्याचा बाप त्याला रागें तर भरला नसेलना? काय झालें असेल तें असो! बरें वैशंपायन असा कांहीं वाईट स्वभावाचा मनुष्य नाहीं. किंवा वडील माणसांची भक्ति न करणारा असाही नाहीं. भलभलतेंच करणारा, अक्षरशत्रु, हलकट, दांडगा, एकुलता एक ह्मणून वेडेवेडेचार करणारा असाही नाहीं. जन्मापासून ज्यांनीं उपकार केले त्या वडील माणसांस दुःख देणारा व त्यांच्या आज्ञेचें उल्लंघन करणारा असाही पण नाहीं. इंद्रिय निग्रह करून वनवासांत राहण्याचा त्याचा हा काळही नव्हे. अद्यापि त्यानें विद्वज्जनमान्य अशा गृहस्थाश्रमाचा अनुभव घेतला नाहीं. देव, पितर आणि बांधव यांच्या ऋणापासून देखील त्यानें आपल्यास सोडविलें नाहीं. ऋणभयापासून मुक्त न होतां त्यानें असें कसें करावें बरें? पुत्रपौत्रसंततीच्या योगानें वंशाचा विस्तारही केला नाहीं. यज्ञयाग करून पुष्कळ दक्षिणाही दिल्या नाहींत. अन्नसत्रें, विहिरी, तलाव, देवळें, पाणपोई इत्यादि कीर्तिकारक सत्कृत्यांनीं त्यानें अद्यापि पृथ्वीही अलंकृत केली नाहीं. चिरकाळ राहणारी अशी कीर्तिही जगांत संपादिली नाहीं. वडील माणसांच्या आज्ञेप्रमाणें वागून त्यांना सुखही दिलें नाहीं. प्रिय बांधवांचीं कामें करून त्यांवर उपकारही केले नाहींत, व त्यांना वैभवासही चढविलें नाहीं. आपल्याकडे आलेल्या साधुसंताचाही सत्कार केला नाहीं. अतिथि व अभ्यागत यांचे मनोरथही पूर्ण केले नाहींत. रमणीय स्त्रियांचें तर त्याला वारें देखील माहीत नाहीं! ह्या लोकांचीं कोणतींच सुखें त्यानें भोगिलीं नाहींत. धर्म, अर्थ, काम, व मोक्ष, ह्या चार पुरुषार्थांपैकीं एकही साधिला नाहीं. अशीं ह्या लोकींचीं कर्तव्यकर्में सोडून त्यानें हें काय भलतेंच केलें बरें! याप्रमाणें तिकडेच ज्याचें लक्ष्य लागून राहिलें आहे, असा

चंद्रापीड चिंताक्रांत बसला. पुढें आपले जवळ असलेल्या राजेलोकांचा सत्कार करून त्यानें त्यांस निरोप दिला, आणि आपण त्या ठिकाणीं आपल्या राहण्याकरितां तयार केलेल्या राजमंदिरांत गेला.

तेथें द्वारावरून चंदनपल्लवांच्या माळा लाविल्या होत्या व दोन्ही बाजूंकडे पल्लवयुक्त असे भरलेले सुवर्ण कलश ठेविले होते. आंत बाहेर झाडून सारवून सडा शिंपडून तें स्वच्छ केलें होतें. जागजागीं पुष्पांच्या माळा लाविल्या होत्या. अनेक पात्रें हातांत घेऊन सेवक लोक फिरत होते. चौऱ्या, पंखे, पादुका इत्यादि अनेक सुखोपभोगाच्या वस्तु हातांत घेऊन दासी चहुंकडे हिंडत होत्या. त्या मंदिराच्या एके बाजूस जागा तयार करून तेथें गंधमादन नांवाचा मोठा हत्ती बांधिला होता. त्याच्या मदोदकाचा सुगंध चोहींकडे पसरला होता. दुसऱ्या बाजूस इंद्रायुध अश्व बांधला होता. पुढल्या अंगणांत राजाची बसण्याची हत्तीण बांधिली होती. सर्व ठिकाणीं शिपाई लोक पहारे करीत होते. अनेक पदार्थांनीं व रत्नांनीं भरलेलें असल्यामुळें तें स्थान समुद्राप्रमाणें गंभीर दिसत होतें. दुःखामुळें ज्यांनीं अंगावर वस्त्रभूषणें घातलीं नाहींत, व मळकट वेषधारण केल्यामुळें कलाहीन अशा सेवकांनीं मुजरे केल्या नंतर चंद्रापीड सुगंधावरून माहित झालेल्या गंधमादन हत्तीकडे शून्य दृष्टीनें पाहात आपल्या राहण्याच्या ठिकाणीं गेला. तेथें अंगावरचा पोशाक काढून टाकून तो शय्येवर जाऊन पडला. तेव्हां अंग रगडणाऱ्या सुंदर दासींनीं पंख्यानीं त्यास हळू हळू वारा घालून व अंग रगडून त्याचा श्रम दूर केला. सर्व रात्रभर जागरण झालें होतें, तरी दुःखामुळें त्याला झोंप लागली नाहीं. शय्येवर पडला असतां त्याचें मन विचारांत निमग्न राहिलें. तो ह्मणाला, "शुकनास व मनोरमा यांची आज्ञा न घेतां व त्यांचें शांतवन न करितां त्यांस दुःखसमुद्रांत सोडून याच ठिकाणाहून जाण्याचें केलें, तर मीं ही वैशंपायनाचेंच अनुकरण केलेंसें होईल. बरें असें न करावें तर कादंबरीकडे तरी जाणें कसें व्हावें? परत घरीं

गेल्यावर सुटका होईल किंवा नाहीं याची शंका वाटते. अथवा ही शंका व्यर्थ आहे. प्रिय मित्र वैशंपायनानें अशा निमित्तानें माझें जाणें उपस्थित करून कादंबरीकडे कसें जाणें होतें, ह्मणून काळजी वाहणाऱ्या मजवर हा उपकारच केला! तेव्हां वैशंपायनाला आणण्याकरितां मी चाललों असतां वडील माणसें माझें निवारण करतील असें होणार नाहीं. त्याच्या शोधाकरितां मी गेलों ह्मणजे त्याला बरोबर घेऊन तसाच पुढें कादंबरीकडे जाईन." असा विचार करून व वैशंपायनाचें विरह दुःख परिणामीं सुख देणारें औषधच आहे, असें मानून दोन घटका विश्रांति घेतल्यावर दीड प्रहर दिवस आल्याचें सुचविणारा असा शंख नाद झाल्या बरोबर तो भोजन करण्याकरितां उठला, आणि जेथें कादंबरी तेथेंच वैशंपायनही आहे! असें अंतःकरणास धैर्य देत तसाच भोजनगृहांत गेला.

भोजन झालें तों ऐन दोन प्रहर भरले. याच्या शरीरांत मदनाग्नि व वैशंपायनाचा विरहाग्नि हे पेटून दग्ध करीत आहेतच, त्यांस बाहेरून आपणही मदत करावी, या साठींच काय आपलें प्रखर किरण पसरून ताप देण्याकरितां सूर्य आकाशाच्या मध्यभागीं आला आहे असें दिसलें. उष्णाच्या मिषानें तापविलेला रुप्याचा रसच फेंकीत आहेत काय असें देदीप्यमान त्याचें किरण भासत होतें. उष्णाचीं शकलें शरीर भेदून आंतच शिरत आहेत असें भासत होतें. झाडांच्या सांवलींत मनुष्य व पशु यांचे थवे अगदीं दाटीनें उभे राहिले होते. ज्याकडे पाहिलें असतां डोळे दिपत होते, असें ऊन फारच चमकत होतें. सर्व दिशा धगधग पेटल्यासारख्या दिसत होत्या. जमीन इतकी तापली होती कीं, पाय ठेवूं देत नव्हती. वाटेनें चिटपांखरूं देखील दृष्टीस पडत नव्हतें. मार्गानें पाणपोईच्या झोंपड्यांतून पाणी पिण्याकरितां मार्गस्थ लोकांची गर्दी जमली होती. पक्षी आपआपल्या घरट्यांत धापा टाकीत बसले होते. सांचलेल्या पाण्यांत ह्मशींचे कळप स्वस्थ बसले होते. सरोवरांत हत्तींचे कळप शिरून कमलिनींचीं पानें व दांडे आपल्या

सोंडांनीं पाहिजे तसे मोडून टाकीत होते. रक्तकमळाप्रमाणें सुकुमार स्त्रियांचे गाल लाल दिसत होते. अंगावर घर्मबिंदूंच्या रांगा बारिक मौक्तिकांप्रमाणें सुशोभित दिसत होत्या. रात्र केव्हां होईल व चांदणें केव्हां पडेल असें लोकांस झालें होतें. थंड उदकाचें वर्णन सर्वत्र चालून त्या वेळीं त्याची योग्यता लोकांच्या लक्षांत येत होती. पर्जन्य लवकर पडेल तर बरें, असे लोक बोलत होते. दिवस केव्हां उतरेल व संध्याकाळ केव्हां होईल, ह्मणून सर्वांचे डोळे तिकडे लागले होते. अशा दुःसह उष्णाच्या वेळीं चंद्रापीड, सरोवराच्या तीरावर उष्णतेची पीडा न व्हावी ह्मणून जलमंडप तयार केला होता त्या ठिकाणीं गेला.

तेथें जलधारांची एकसारखी वृष्टि सुरू असल्यामुळें सूर्यकिरणांपासून होणाऱ्या संतापाचें कांहीं चालत नव्हतें. त्याच्या मधून एक सारखा वाहणारा नदीचा पाट सोडिला होता. त्या मंडपाच्या आंतल्या बाजूस पाणी शिंपडलेले जांभळीचे पल्लव लावून अंधकार केला होता. पुष्पयुक्त लतांनीं सर्व आंतील खांब वेष्टिले होते. त्या ठिकाणीं चंदनाचे सडे घातले होते. पाचूप्रमाणें हिरव्यागार कमलिनींचींपत्रें भूमीवर पसरलीं होतीं. सुवासिक कमलांची शय्या केली होती. उष्णकाळांत ही केवळ वर्षाकाल असा तो मंडप भासत होता. शीतोदकांत स्नान करून आलेल्या जलदेवताच काय, ज्यांनीं आपल्या अंगांस चंदनाची उटी लाविली होती अशा, गळ्यांत मौक्तिक हार, व हातांत गोठ व तोडे, इतकेच काय ते अलंकार घातले होते अशा व ज्यांनीं आपल्या कानांवर कोमल पल्लव ठेविले होते, अशा वेश्या कमलदंड युक्त पत्रांचे पंखे, कापूर, अष्टगंध, व चंद्रकांत मण्याचे आरसे इत्यादिक द्रव्यें हातांत घेऊन सेवा करण्याकरितां तयार होत्या. फार काय! उष्णकाळाचा पराभव करणारा शत्रुच, शितकाळाचा सखाच, सूर्य किरणांचा तिरस्कार करणारा, सरोवराच्या हृदयाचा मध्यच, हिमालयाचा बंधुच, रात्रीचें त्या मंडपाच्या रम्यतेमुळें क्षुधित झालेला मकरध्वज हा

ज्यांतील मगरच, प्रियजन समागमाच्या उत्कंठा ह्या वसति स्थानच, असा तो जलमंडप तयार केला होता.

ज्यांतील लाटाच, मित्रविरहाग्नि हा ज्यांतील वणवाच, यांमुळें दुर्लंघ्य व भयंकर, असा तो महासमुद्राप्रमाणें मोठा दिवस त्यानें धैर्यरूप नौकेनें कसा तरी घालविला.

नंतर सूर्यास्ताच्या वेळचें तांबडे ऊन पडलें तेव्हां **चंद्रापीड** त्या जलमंडपांतून निघून आपल्या राहण्याच्या ठिकाणीं आला. त्या जागीं सारविल्यामुळें हिरवेंगार दिसत होतें, आणि शुभ्र सुगंधि पुष्पांच्या माळा लाविल्या होत्या, त्या वाऱ्यानें हालत होत्या. अशा अंगणांतच तो थोडा वेळ जमलेल्या राजेलोकांबरोबर **वैशंपायना**विषयीं बोलत उभा राहिला. नंतर आज प्रहर रात्री नंतर, तुह्मी येथून निघा; असें सेनापतीस सांगून नक्षत्रें दिसूं लागलीं न लागलीं तों सर्वांस निरोप देऊन तो आंत गेला. उज्जयनी सोडून फार दिवस झाल्यामुळें उतावीळ झालेले सैनिकलोक आज्ञेप्रमाणें तयार होऊन निघाले. त्या दिवशीं प्रयाण वाद्य वाजविण्याचीही गरज लागली नाहीं. **चंद्रापीडास** झोंप कशी ती मुद्दलीच लागली नाहीं. मग दोन प्रहर रात्र उलटल्या नंतर तो हत्ती व घोडे यांवर बसून तयार असलेल्या कांहीं राजेलोकांसह बेताचें सैन्य बरोबर घेऊन ज्या वाटेनें सैन्याची दाटी नव्हती त्या वाटेनें निघाला व प्रातःकालाच्या सुमारास उज्जयनीजवळ आला.

रात्र संपल्यामुळें जसे काय रसातलांतूनच सर्व सृष्टींतील पदार्थ वर येत आहेत काय, असें वाटलें! स्वच्छ दिसूं लागून सर्वांच्या दृष्टिविकास पाऊं लागल्या. सर्व जीवलोक पुनः उत्पन्नच झाला आहे काय, असें वाटलें! जमिनीचे उंच खोल भाग स्पष्ट दिसूं लागले. अरण्यें, वृक्ष व लता हीं विरळ दिसूं लागलीं. लतांच्या जाळ्या लहान दिसूं लागल्या. गगन तलावर चढणाऱ्या दिवस लक्ष्मीचे आलिता लावलेले पदच काय, किंवा पूर्वदिशारूप लतेस, दंव पडल्यामुळें हा पल्लवांकुरच फुटला काय असें, कमलास लाली देणारें सूर्यबिंब उगवलें. प्रातःकाळ होऊन चहूंकडे स्पष्ट दिसूं

लागलें. अशा वेळीं दूर पहातो तों उज्जयनींतून बाहेर पडलेले पुष्कळ नगरवासी लोक त्याच्या दृष्टीस पडलें. त्यां पैकीं कांहीं जोडीनें उभे आहेत, कांहीं एके ठिकाणीं गोळा झाले आहेत. कांहीं जमा होत आहेत, कांहीं कडें घालून बसले आहेत, कांहीं दुःखानें इकडे तिकडे फिरत आहेत, कांहीं वर तोंडें करून व कांहीं खालीं तोंडें घालून बसले आहेत, कित्येकांचे डोळे पाण्यानें भरून आले आहेत, कित्येकांचीं तोंडें उतरून गेलीं आहेत, कोणी शिव-शिव! हरेराम! हरेराम! कोणी अरेरे! असे दुःखाचे उद्गार सोडीत आहेत, व कित्येक मुकाट्यानें चिताक्रांत बसले आहेत असे ते त्याच्या दृष्टीस पडले. ह्या मंडळींत सज्जन, दुर्जन, निस्पृह, लोभी, लहान व थोर, असे सर्व प्रकारचे लोक होते. ते मोठ्या प्रीतीनें पित्याप्रमाणें, बंधूप्रमाणें, किंवा मित्राप्रमाणें कळकळीनें, **वैशंपायनाचें** वर्तमान विचारीत आहेत व कोणी सांगत आहेत; एकमेकांस विचारण्याचा व सांगण्याचा क्रम चालू आहे, असें पाहून **चंद्रापीड** आपल्या मनांत ह्मणाला, "काय हो! बाहेरच्या परकी लोकांची जर ही दशा तर ज्यांनीं त्याला मांडीवर खेळविलें वाढविलें, व बालपणचें बोबडेबोल ऐकिले, त्यांची अवस्था तर कशी झाली असेल बरें? तर आतां **वैशंपायना**वांचून घरीं जाणें व वडील माणसांस आपले तोंड दाखविणें हें मोठेंच संकट प्राप्त झालें आहे." याप्रमाणें चिंता करीत इकडे तिकडे न पाहतां व कोणाशीं कांहीं एक न बोलतां तो उज्जयनींत शिरला.

राजवाड्याजवळ उतरतांच आपले मातापितर प्रधानाच्या वाड्यांत गेले आहेत असें त्यास समजलें, तेव्हां तोही तिकडेच गेला. तेथें गेला तों मनोरमेचा शोक त्याच्या कानीं पडला. "बाळा **वैशंपायना**! तूं अजून माझ्या मांडीवर लोळण्यासारखा बालक असून ज्या ठिकाणीं हजारों मोठमोठाले सर्प राहतात व जेथें एकही मनुष्य नाहीं अशा भयंकर ओसाड अरण्यांत तूं एकटा कसारे राहिलास? तेथें तुला कोण जपत असेल? कोण तुझ्या जेवणाची तजवीज राखीत असेल? झोंप आली असतां तुला बिछाना कोण

घालून देत असेल! तुला भूक किंवा तहान लागली असतां कोण तुझी तजवीज ठेवीत असेल! सुखाला सुखी, व दुःखाला दुःखी अशी स्त्रीही तुला करून दिली नाहीं. तूं परत आल्या बरोबर तुझ्या पित्याची विनंती करून सुनमुख पाहीन असें ह्मणत होतें, पण माझी एवढी पुण्याई कोठली! तें दृष्टीस पडलें नाहीं तें नाहींच; पण तुझें मुखही मला दुर्लभ झालें! बाळा, तेथेंच तुझ्या मनांत राहवेंसें वाटलें होतें तर त्या ठिकाणीं आपल्या पित्याची विनवणी करून मला तरी न्यावयाचें होतेंस! तूं दृष्टीस पडला नाहींस तर माझे प्राण वांचणार नाहींत. बाळा! तूं लहानपणींही मला तटकन तोडून टाकिलें नाहींस, आणि आतांच कसा एकदम इतका निष्ठुर झालास! साऱ्या जन्मांत तुला राग आलेला कधींही माझ्या दृष्टीस पडला नाहीं, आणि आतांच कसा एकाएकीं मजवर एवढा राग केला कीं, त्यामुळें मला सोडून देऊन एकीकडे जाऊन राहिलास! बरें गेलास तर गेलास, आतां तरी लौकर ये! बाबा! मीं तुझ्या पायां पडतें! काय सांगशील तें करतें!! तुज-वांचून मला कोण आहे बरें! दुसऱ्या नादीं लागून आमच्या वरची माया कशी पातळ केलीस! ज्या **चंद्रापीडा**वांचून तुला क्षणभरही करमत नव्हतें त्याजवरची आतां सगळीच माया कशी कमी केली! बाबा, हें चांगलें केलें नाहींस! वडील माणसांस सुखांत ठेवावें, तें सोडून देऊन दुःखांत कसें लोटलेस! असें करून तुला काय मिळालें! मला समजत नाहीं." याप्रमाणें ती मोठ्यानें शोक करीत आहे व आपली आई **विलासवती** तिचें समाधान करीत असतां तिचाही कंठ दाटून येऊन तीही मोठ्यानें शोक करीत आहे असें **चंद्रापीडानें** पाहिलें.

त्या तिच्या करूण विलापरूपविषानें **चंद्रापीड** विव्हल होऊन झोंप आल्यामुळें जसा मनुष्य गुंग होतो तसा गुंग होऊन गेला. मग तसेंच धैर्य धरून तो आंत गेला मग बापाला तोंड कसें दाखवावें, ह्मणून शरमिंधा होऊन **चंद्रापीडानें** तोंड खालीं घातलें, आणि समुद्रमंथनकालच्या मंदरपर्वताप्रमाणें थरथर कांपणाऱ्या **शुक**-

नासासह, खवळलेल्या समुद्राप्रमाणें दिसणाऱ्या आपल्या पित्यास त्यानें दुरूनच नमस्कार केला. तेव्हां कंठ दाटून आल्यामुळें सद्रदित अशा मेघाप्रमाणें गंभीर वाणीनें **तारापीड** म्हणाला, "वत्सा, **चंद्रापीडा**, आपल्या जीवापेक्षां देखील तुझी भावावर प्रीति अधिक आहे असें मी समजतों. सुख देणाऱ्या आप्तांपासून दुःखाचा संभव नाहीं खरा, तथापि त्यांजपासून पीडा झाली ह्मणजे ती काय करणार नाहीं? तर थोर कुळांतल्या जन्माला, सर्वांचा स्नेहाला, गुरुजनाच्या सुशिक्षेला, शास्त्रांच्या अभ्यासाला, आपल्या शीलाला व नम्रपणाला, अयोग्य अशा तुझ्या भावाचें विलक्षण वर्तन आम्हीं ऐकिलें; तेव्हां यांत तुझा कांहीं तरी दोष असावा, असें मला वाटतें." असें **तारापीड** बोलत असतां त्याला थांबवून जिकडे तिकडे अंधारून येऊन विजा चमकत असल्यामुळें ज्याकडे पाहवत नाहीं, अशा वर्षाकाळाप्रमाणें शोक व क्रोध, यांनीं ज्याला कांहीं दिसेनासें झालें आहे, ज्याचा ओंठ हालतो आहे असा **शुकनास** म्हणाला:—

"महाराज, चंद्राचे ठायीं उष्णता, अग्नीचे ठायीं शीतलत्व, सूर्याचे ठायीं काळोख, समुद्राचे ठायीं शुष्कपणा, साधूंचे ठायीं अनुपकार बुद्धि, शेषाच्या मस्तकावरून पृथ्वीचें पतन इत्यादि गोष्टींचा जर संभव असेल, तर युवराजाचे ठायींही हा दोष संभवेल; हें मनांत न आणितां अज्ञानी, मूर्ख, मातृपितृघाती, मित्रद्रोही, कृतघ्न, चांडाळ, महापातकी, व्यर्थ जन्मास आलेल्या अशा कारट्या करितां कृतयुगांतील गुणांनीं योग्य अशा आपल्या **चंद्रापीडास** महाराजांनीं असें कसें ह्मटलें? गुणी असून त्याला उगीच दोषी ठरविणें, यासारखें दुःखकारक दुसरें कांहीं नाहीं! इतर लोकाची गोष्ट निराळी, पण वडील माणसांनीं जो गुणवान् आहे त्याच्या गुणांचा गौरव करावा. आपणच नांवें ठेवूं लागलों तर मग त्यानें कोणाला गुण दाखवावे? महाराजांच्या व देवी **विलासवतीच्या** मांडीवर जो खेळला, तथापि त्याबद्दल ज्याला कांहीं वाटलें नाहीं, असा तो कारटा वाऱ्यासारखा दुर्धर पडला, त्याला **चंद्रापीड** काय करील?

असलीं कारटीं शरीरांतले मोठाले किडेच होत. अंतर्विष असे हे सर्पच, गुणरहित असे पारधीच, आरशाप्रमाणें प्रसन्न ठेविलें तरी त्यांच्यांत उलटेंच दिसायाचें! स्नेह्याबरोबर रुक्ष, सरळाबरोबर वक्र, सुजनाबरोबर दुर्जन, आणि राजद्रोही, मित्रद्रोही, विश्वासघातकी, गर्विष्ठ, निर्दय, गुरूला हलके मानणारे, नीचाला उंच मानणारे, असे व ज्यांना अकार्य तेंच कार्य, अन्याय तोच न्याय, अनाचार तोच आचार, अयुक्त तेंच युक्त, अविद्या तीच विद्या, अविनय तोच विनय, दुःशील तेंच सुशील, अधर्म तोच धर्म, व असत्य तेंच सत्य असें वाटतें. ज्यांची बुद्धि दुसऱ्याला फसविण्याकरितांच होय. ज्यांची विद्या आत्मश्लाघेकरितांच होय, मनाच्या शांती करितां नाहीं. ज्यांचा पराक्रम दुसऱ्याच्या घाता करितांच होय, उपकारा करितां नाहीं. ज्यांचा उत्साह साधन प्राप्ती करितां होय, यशः प्राप्तीकरितां नाहीं. ज्यांचा धन व्यय कामवासना पूर्ण करण्याकरितांच होय, धर्माकरितां नाहीं. फार काय ज्यांचें सर्व करणें वाईटा करितांच, चांगल्याकरितां ह्मटलें तर कांहीं एक नाहीं असे कित्येक प्राणी जन्मास येतात. तर हा **वैशंपायनही** असल्या पैकींच कोणी पातकी चांडाळ माझ्या पोटीं आला आहे. मी **चंद्रापीडाचा** परम मित्र असून असें केल्यानें त्याचा द्वेष कसा संपादन करितों, हें त्याच्या मनांत कसें आलें नाहीं? असें केलें असतां माझ्यासारख्या मूढास शासन करणारे **तारापीड** महाराज मजवर रागावतील, अशी त्याला शंका कशी वाटली नाहीं! आईला मी एकुलता एक आहे, व तिचा सर्व जीव काय तो मजवरच असल्यामुळें मजवांचून तिला कसें राहवेल हें देखील त्या दुष्टाच्या मनांत कसें आलें नाहीं? वंशाच्या वृद्धीकरितां व पिंडदान करण्याकरितां बापानें मला जन्म दिलें, आणि त्याची आज्ञा नसतां हें काय मी करितों, हेंही त्या मूर्खाच्या मनांत आलें नाहीं आं! त्या अधमानें कांहींच कसा विचार केला नाहीं! व पहायाचें तें पाहिलें आणि पाहिलें असून ज्याला दिसलें नाहीं! असल्या अज्ञानांधाचें

१ सद्गुण, जाळें.

करावें तरी काय! जो मोठ्या श्रमानें राघूसारखा पढविला, परंतु ह्या गुलामानें कांहींच कसें चीज केलें नाहीं आं! विनोदाकरितां पक्ष्यांस शिकविण्याचा प्रयत्न केला असतां तो देखील सफल होतो, त्यांना खाऊं पिऊं घातलें असतां ते देखील प्रीति करितात, ते देखील उपकार जाणतात, ते देखील ओळख ठेवितात, त्यांची देखील मातापितरांवर ममता राहते! परंतु हा लोक व परलोक ह्या दोन्ही लोकांस गमावणाऱ्या अशा कारट्यानें सर्वच निष्फल केलें! असल्या आचरणानें तो पशु पक्ष्यांच्या योनींत अवश्य जाईल! त्या अधमानें केवळ आम्हांस साधारण दुःखांत ठेविलें असें नाहीं, तर दुःख समुद्रांत लोटून दिलें! कोणी जें काय करितो त्यांत स्वहित किंवा परहित कांहीं तरी असतेंच; परहित तर राहोच, परंतु स्वहित तरी त्यानें साधावयाचें असतें! पण कांहींच नाहीं! तेव्हां त्या मूर्खानें असें कां केलें याबद्दल कांहीं अक्कलच चालत नाहीं! आम्हाला दुःख देण्याकरितांच तो जन्मास आला." याप्रमाणें संतापून बोलतांना **शुकनासाच्या** नेत्रांवाटें अश्रुधारा चालल्या होत्या, व अधरोष्ट थरथर कांपत होता, आणि श्वासोच्छ्वासही जोरानें चालला होता. तेव्हां त्याच्या क्रोधरूपी पूरास बाहेर निघण्यास मार्ग नसल्यामुळें तो फुटूनच बाहेर निघतो आहे काय असें दिसलें!

याप्रमाणें त्याची अवस्था पाहून **तारापीड** त्यास म्हणाला. "**शुकनासा,** तुम्हांस बोध करणें, म्हणजे पेटलेल्या अग्नीस दीपानें प्रदीप्त करणें, सूर्याला दिवसाच्या तेजानें प्रकाशित करणें, चंद्राला हिमकणानें शीतल करणें, समुद्राला जलबिंदूनें भरती आणणें, किंवा पंख्यानें वायूला वाढविणें, या सारखेंच होय! विद्वान्, बहुश्रुत, विचारशील, धैर्यवान् असा जरी मनुष्य आहे, तरी त्याचें मानस, वृष्टीच्या पूरानें सरोवर जसें गढूळ होतें, तसें दुःखभरानें बिघडून जातें. तें स्वच्छ नसल्यावर काय दिसणार आहे? विचार व बुद्धि यांचें तरी काय चालणार आहे? ही गोष्ट मिथ्या आहे असें नाहीं सर्व जगांतील व्यवहार तुम्हांस माहीतच आहे. तारुण्य प्राप्त

झाल्यावर काम विकार उत्पन्न झाले नाहींत, असा कोणी तरी आहे काय? तारुण्यभरांत वडिलांविषयीं स्नेह कमी होतो, नवीन गोष्टीविषयीं प्रीति उत्पन्न होतें, शास्त्रादिकांवरची निष्ठा कमी होते, विनय कमी होतो, गर्व वाढतो, असे अनेक मनोविकार उत्पन्न होतात. डोळ्यांना नीट दिसेनासें होतें, गुरुजनांचा उपदेश कानांत शिरेनासा होतो, हृदय स्त्रीसक्त होतें, मग तेथें ज्ञानाचें कांहीं चालत नाहीं. काम विकारांनीं चंचल झालेल्या हृदयांत स्थैर्य राहत नाहीं, दुर्व्यसनांचें ठायीं आसक्ति राहते, तशीच, कामवासना पूर्ण करण्याविषयीं ही हौस वाटतें. असें होत गेलें ह्मणजे सर्व सद्गुणांवर पाणी पडतें! दुर्गुणांची वृद्धि होते, चित्त नादिष्ट होतें व लज्जाही नाहींशी होते. लज्जारूप तट नाहींसा झाल्यावर दुर्निवार असा मदन अंतःकरणांत प्रवेश करून यथेच्छ क्रीडा करितो, व त्यामुळें हजारों प्रमाद घडतात, आणि सर्व इंद्रियें पराधीन राहून कर्तव्याकर्तव्य ज्ञान नष्ट होतें. असे पुण्यपुरुष थोडेच कीं, जे मनोविकारांस लिप्त न राहतां अखेरपर्यंत सत्कीर्तीनें सुशोभित राहतात. मोहविषयुक्त सर्पच, मदन विकाररूप मत्त हस्तीच, स्वच्छंदपणानें वागण्याचें राज्यच, रतीचें विलास गृहच, दुर्विलासांचा राजाच असा तारुण्याचा अवतार झाला असतां प्रायः सर्वांच्या हातून प्रमाद घडतात. तुह्मी क्रोधाधीन होऊन लालनपालन करण्यास योग्य अशा बालकावर मोठीच आग पाखडिली! अपत्य स्नेहास अगदीं अयोग्य असें भलतेंच बोलला! वडील माणसांच्या तोंडांवाटें शुभाशुभ भाषणें स्वप्नांतही निघालीं तरी देखील तीं फळास येतात! कारण वडील माणसेंच बालकांचीं दैवतें होत. त्यांचे चांगले आशीर्वाद फळास येतात, तशेच शापही येतात. तेव्हां बालकाला तुह्मी भलतें बोलल्यामुळें माझ्या मनांत मोठीच काळजी उत्पन्न झाली आहे. आपल्या हातानें झाड लाविलें तर त्यावर देखील आपला जीव लागतो, व त्याच्या काडीसही धक्का लागूं नये असें वाटतें; मग आपल्यापासूनच उत्पन्न झालेल्या बालकाविषयीं तर काय सांगावें? याकरितां **वैशंपायना** वरचा

कोप कमी करावा. त्यानें असें कांहीं मोठें दुष्कर्म केलें आहे, असें नाहीं. सर्व संगपरित्याग करून अरण्यांत राहिला, एवढेंच काय तें. त्यांत असें करण्याचें कारणही आपणांस समजलें नाहीं. तेव्हां त्या पूर्वींच त्यास दोष देणें योग्य नाहीं. असें करण्यास त्यास कांहीं योग्य कारण असेल, किंवा कदाचित् नसेल! पण तसें कांहीं असलेंच, तर त्यास आणण्याची अगोदर तजवीज करावी. ह्मणजे असलें अनुचित वैराग्य धारण करण्याचें कारण काय हें अपोआप आपणांस समजेल. मग पुढें काय तें पाहतां येईल." **शुकनास** ह्मणाला, "उदार स्वभावामुळें व दयाळूपणामुळें महाराज असें ह्मणतात, ही गोष्ट निराळी, परंतु **चंद्रापीडास** सोडून क्षणभर देखील दुसरीकडे राहणें त्यास योग्य नव्हतें."

इकडे बापानें दिलेल्या दोषानें **चंद्रापीड** अंतःकरणांत चाबकाचे तडाके लागल्यासारखाच होऊन तो दुःखानें अश्रु ढाळीत **शुकनासा**जवळ जाऊन ह्मणाला, "आर्य! माझ्या दोषामुळें ह्मणजे **वैशंपायन** आला नाहीं असें कांहीं नाहीं, हें मला पक्कें माहीत आहे. तथापि पित्यानेंच जर मला दोष दिला तर इतर लोक देतील ह्मणून काय नवल आहे! आतां तो मिथ्या जरी आहे, तरी लोकांना खराच वाटणार. आपल्या हातून तसें कांहीं घडलें तर आपण दोषास पात्र, पण घडलेंच नसलें तर काय आहे? आतां सत्याचें फळ परलोकीं मिळणारच, परंतु त्याचा येथें काय उपयोग? या दोषाचें प्रायश्चित घेण्याकरितां **वैशंपायनाला** आणण्यास पित्याकडून मला आज्ञा देववावी. त्या खेरीज दोष जाणार नाहीं. तो आल्याशिवाय पित्याच्या मनांतली शंका नाहींशी होणार नाहीं. मी गेलों नाहीं तर कांहीं **वैशंपायन** येणार नाहीं. दुसऱ्या कोणाच्यानें जर तो येण्यासारखा असता तर पित्यास देखील ज्यांचें वचन मान्य अशा ह्या राजांनीं त्यास आणिलें असतेंच. तेव्हां मला जाण्याची आज्ञा द्यावी. घोड्यावरून पूर्वीं पाहिलेल्या स्थळाकडे जाण्यास मला वाटेचे श्रम वाटणार नाहींत. मीं गेलों कीं त्याला घेऊन आलोंच समजा. बाहेरच्या दुःखा पेक्षां त्याच्या

विरहाचें मनांतलें दुःख असह्य वाटतें. आपलें पत्र लवकर लिहून येण्याविषयीं आल्यावरून मी पुढें आलों. माझा बंधु **वैशंपायन** सैन्य घेऊन माझ्या मागोमाग येईलच असें मला वाटलें. जन्मापासून त्याच्या वांचून कधीं तरी मी एकटा राहिलों? का खेळलों? का कोठें गेलों? का प्यालों? का जेवलों? का निजलों? कांहीं तरी त्याच्या वांचून मी केलें आहे काय? **वैशंपायनाचें** वर्तमान समजल्या बरोबर परभारेंच त्याजकडे जाण्याचें माझें मनांत आलें होतें, परंतु तसें केलें तर **वैशंपायना** सारखेंच मींही केलें असें होणार; ह्मणून तसें केलें नाहीं. तर आतां मला आज्ञा देऊन दोषांतून मुक्त करावें." असें त्याचें भाषण ऐकून, दुःखरूप ग्रहणानें ज्याचें तोंड रक्त कमलाप्रमाणें लाल झालें आहे, अशा **तारापीडाच्या** मुखाकडे पाहून, "युवराज तिकडे जाण्याची आज्ञा मागतो आहे" अशी **शुकनासानें** विनंति केल्यावर **तारापीड** किंचित् चिंताक्रांत बसून म्हणाला, "**शुकनासा**, माझ्या मनांत होतें कीं, पूर्ण चंद्र जसा चंद्रिकेनें शोभतो, त्याप्रमाणें त्या दिवसांतच **चंद्रापीडाचा** विवाह करून त्याची वधू पहावी. परंतु ह्या वेळेसच वर्षाऋतूप्रमाणें सर्व आशा मलीन करणारा **वैशंपायनाचा** वृत्तांत माझ्या दुर्दैवानें त्यास आड आला! **चंद्रापीडानें** आतां ह्मटलेंच आहे कीं, 'दुसऱ्या कोणाच्यानें तो येणार नाहीं; त्याजवांचून मलाही येथें राहववणार नाहीं.' यासाठीं हा दुःखसमुद्र यालाच निस्तरला पाहिजे! **वैशंपायनाला** आणण्याकरितां देवीही याला पाठविण्यास अनमान करणार नाहीं, अशी माझी खात्री आहे. बालकास फार दूर जावयाचें आहे, याकरितां जोतिष्याकडून चांगला मुहूर्त पाहून याची तयारी करून द्यावी." असें **शुकनासास** सांगितल्यावर फार वेळ **चंद्रापीडाकडे** पाहून व त्यास जवळ बोलावून त्यानें याचे सर्व अंगावरून हात फिरविला आणि म्हणाला, "बाळा, **मनोरमेसहित** तुझी माता आंत आहे, तिजकडे जा आणि आपला

---

१ दिशा, इच्छा.

जाण्याचा वृत्तांत तिला सांग." असें बोलून **तारापीड शुकनासा**सह आपल्या मंदिरांत गेला.

इकडे **चंद्रापीड** तर ती बापाची गमनाज्ञा कादंबरीला वरण्याची माळच मिळाली असें समजला, तथापि त्याचा चेहरा उतरून गेला होता. मग तो आंत गेला आणि नमस्कार करून आईजवळ बसला. त्यास पाहिल्याबरोबर जिचा शोक दुप्पट झाला आहे अशा **मनोरमेचें** शांतवन करून **चंद्रापीड** ह्मणाला "आई, शोक करूं नको. **वैशंपायनाला** आणण्याकरितां मला पित्याची आज्ञा झाली आहे, व मलाही त्याच्या भेटीची फारच उत्कंठा वाटत आहे; तर मला जाण्याची तूंही आज्ञा दे. तें ऐकून **मनोरमा** ह्मणाली, "**चंद्रापीडा**, जाण्याच्या गोष्टीनें माझें समाधान करितोस कायरे? तुजमध्यें आणि **वैशंपायना**मध्यें कांहीं अंतर आहे काय? तो पाषाणहृदयी सोडून गेल्यामुळें त्याचें तर दर्शन नाहींच, पण आमच्या जीवाला आधार असा तूंही जातों ह्मणतोस; मग आमचे जीव कसे रहावे? यासाठीं तूं जाण्याचें करूं नकोस. एका पुत्रानेंच आह्मी दोघी पुत्रवती राहूं." असें तिचें भाषण ऐकून **विलासवती** ह्मणाली, "प्रिय सखी, तूं ह्मणतेस तसेंच तुझें आणि माझें आहे खरें. अगदीं परकीयपणा नाहीं. परंतु **वैशंपायना**वांचून याला तरी कसें राहवेल? तर याला जाण्याचा मोडा घालूं नकोस. यानें ही या कामांत कोणाचें ऐकूं नये. याच्या बापानें तरी हेंच मनांत आणून यास जाण्याचें अनुमोदन दिलें. कांहीं दिवस याच्या विरहाचें दुःख सोसणें देखील पुरवेल. परंतु **वैशंपायनाच्या** दुःखानें उतरलेलें असें याचें तोंड दररोज पाहवणार नाहीं. तर चल, ऊठ आतां; आपण बाळाच्या निघण्याची तयारी करण्यास लागूं." असें बोलून **मनोरमेस** हातानें उठवून ती आपल्या मंदिरीं घेऊन गेली. **चंद्रापीडही** आईच्या मागोमाग गेला. मग थोडा वेळ तिजबरोबर जाण्याच्या गोष्टी बोलून तो आपल्या मंदिरांत गेला. मग आपला पोषाक उतरून तो फार उतावळा झाल्यामुळें ज्योतिष्यास एकांतीं बोलावून आणून ह्मणाला, "जसें मला येथून

लवकर निघतां येईल, असा मुहूर्त तुह्माला विचारिला असतां आर्य **शुकनास** किंवा माझा पिता यांस सांगा." अशी आज्ञा ऐकून त्यांनीं विनंती केली, "आतां जसे सर्व ग्रह आहेत त्यांवरून पाहतां आमच्या मतें तूर्त महाराजांचें गमनच प्रशस्त नाहीं. परंतु तसेंच जरूरीचें काम असल्यास महाराजांच्या इच्छेस येईल, तोच मुहूर्त. दुसरा मुहूर्तच पाहण्याचें करूं नये. कारण, "राजा कालस्य कारणं." राजा जसें काळाचें माहात्म्य ठेवील तसें राहतें." **चंद्रापीड** ह्मणाला," पित्याची आज्ञा मुहूर्त पाहण्याविषयीं असल्यामुळें तुह्मांस सांगितलें, नाहीं तर उद्योगी पुरुषांना क्षणोक्षणीं कितीएक कामें करायाचीं असतात, तेव्हां त्यांनीं मुहूर्त कोठवर पहावे? तर उद्यांच जाणें होईल असा मुहूर्त सांगा. "आज्ञा" ह्मणून ते गेल्यावर **चंद्रापीड** भोजनास गेला. जेवण झाल्या नंतर जोशी येऊन ह्मणाले, "पुत्र विरहानें देहभानावर नसलेल्या **शुकनासास** आज्ञेप्रमाणें मुहूर्त सांगितला, तर उद्यांचा दिवस गेला कीं, रात्रींच येथून निघण्याचें करावें." मग **चंद्रापीडानें** त्या जोश्यांचा गौरव करून त्यांस निरोप दिला. नंतर **कादंबरी** व **वैशंपायन** हे आपल्या जवळच आहेत, असें मानून **पत्रलेखा** पोहोंचली नाहीं तोंच मी अगोदर जाईन, असें पुढें धांवत गेलेल्या मनानें मानिलें. मग इंद्रायुधासारखे ज्यांचे चपल अश्व आहेत, व मार्गश्रमास न मोजणारे आणि गमनाचा उत्साह धारण करणारे अशा राजे लोकांस निघण्याचा बेत सांगून दुसरें कांहीं एक काम न करतां मोठ्या उत्कंठेनें त्यानें तो दिवस व एक रात्र कशी तरी घालविली.

सूर्यास्त होऊन संध्याकाळ झाला. आपला पति सूर्य याचें पतन झालें ह्मणून संध्याकालीं रागरूप चिता तयार करून तींत पश्चिमदिशा प्रवेशच करीत आहेसें दिसलें. चिताग्नीच्या उडालेल्या ठिणग्याच काय अशा तारा आकाशांत दिसूं लागल्या. दिवस विरहानें आलेली मूर्छाच काय अशा अंधारीनें दिशांचीं तोंडें काळीं पडलीं. आकाश विरहा मुळेंच काय दुखानें पक्षी एकसारखा शब्द

करीत आपआपल्या घरट्यांकडे जाऊं लागले. अंधकार पडल्यामुळें पुनः गर्भांतच शिरले आहेत काय असे सर्व प्राणी त्यांत गडप झाले. नंतर पूर्वदिशेचें मुख प्रफुल्लित करणारा, पुनर्जन्म घेऊनच आला काय, व आपल्या प्रकाशभरानें निष्कलंकपणा भासविणारा असा चंद्रउदय पर्वतावर येऊन तारकासमागमाचें सुख भोगूं लागला, व जिकडे तिकडे स्वच्छ प्रकाश पडला. **चंद्रापीडाची** प्रयाण वेळा झाल्यामुळें तो आपल्या आईचा निरोप घेण्याकरितां आला.त्यास पाहून दुःखानें व्याकूळ झालेली,जिच्या नेत्रावाटें अश्रुधारा चालल्या आहेत, परंतु त्यांस अमंगल समजून ती आपल्याकडून त्यांचें निवारण करीत आहे. तथापि हुंदका भरून आल्यामुळें जिचा शब्द उमटत नाहीं व आंतल्या आंत फारच दुःखित झालेली **विलासवती चंद्रापीडास** ह्मणाली," बाळा, तुला गर्भांत वागविलें व मांडीवर खेळविलें. यामुळें पहिल्यानें तूं गेलास तेव्हां देखील दुःख वाटलेंच, परंतु आतां फारच वाटत आहे, हृदय जसें काय फुटतच आहे! मर्मस्थानें जशीं काय उपटूनच टाकलीं आहेत, शरीराला कढ येत आहेत! मन तर जसें कां उडूनच गेलें आहे! शरीराचे संधि जसे तुटतच आहेत! प्राण जसे काय निवूनच जात आहेत! जिकडे तिकडे ओसाड भासत आहे! माझें हृदय स्थिर होत नाहीं! कितीही आवरते तरी रडें आवरत नाहीं! का मला असें होतें आहे, व काय माझ्या दृष्टीस पडावयाचें आहे, कोण जाणे! फार दिवसांनीं माझा बाळ परत आला, आणि फिरून लवकर चालला, ह्मणून असें होतें, किंवा **वैशंपायनाच्या** विरहानें दुःखी तूं एकटा जाणार, ह्मणून असें वाटतें, किंवा **वैशंपायनाच्या** वृत्तांतानें मी दुःखी झालें ह्मणून? कशानें कोण जाणें! **वैशंपायनाला** आणण्याकरितां तूं चालला आहेस, तेव्हां तुझें निवारण वाणीनें करवत नाहीं, परंतु मनांस तर जाऊं द्यावेंसें वाटत नाहीं! ही माझी अवस्था मनांत आणून, पूर्वीं जसा कशाच्या तरी नादीं लागून फार दिवस राहिला होतास, तसा आतां राहूं नको. मी तुला हात जोडितें बरें! " असें आईचें भाषण ऐकून तो नमस्कार करून ह्मणाला, " आई! त्या वेळीं

दिग्विजयाकरितां गेलों होतों, ह्मणून फार दिवस लागले. आतां काय तें एवढेंच काम. त्या ठिकाणापर्यंत गेलों कीं झालें, वैशंपायनाला घेऊन यावयाचें. मी फार दिवस लावीन, अशी कांहीं मनांत काळजी बाळगूं नको. " असें त्याचें भाषण ऐकल्यावर मोठ्या कष्टानें शोक आवरून विलासवतीनें त्याचें प्रयाण मंगल केलें. नंतर तिनें आपल्या अश्रुधारांनीं त्याचें अंग भिजविलें व मस्तक हुंगून आणि त्यास आलिंगून मोठ्या कष्टानें त्यास, आपल्या प्राणासच काय, जाण्याची आज्ञा दिली. नंतर तो आपल्या बापाकडे गेला. " युवराज आले आहेत " असें द्वारपालानें सांगितल्यावर चंद्रापीडानें दुरूनच मस्तक भूमीस लावून, शयनावर आपला पिता निजला होता त्यास नमस्कार केला. तेव्हां थोडा पूर्वदेह उचलून तारापीडानें त्यास जवळ बोलाविलें, व डोळ्यांनीं पितोच आहे काय असें फार वेळ त्याचेकडे पाहून त्यास दृढालिंगन दिलें. मग दुःखानें फारच व्याकूळ होऊन तो त्यास ह्मणाला, " बाळा, पित्यानें दोषारोप केला ह्मणून मनांत दुःख बाळगूं नको. तुझ्या गुणांची परीक्षा आह्मी पूर्वींच केली आहे. पुत्रस्नेहानें तुला एवढें राज्य दिलें आहे असें नाहीं, तर तुझ्या गुणांमुळेंच दिलें आहे. अति विस्तीर्ण असल्यामुळें व्यवस्था करण्यास कठीण, अनेक राजे लोक असल्यामुळें पालन करण्यास अशक्य, हजारों कामेंकाजें असल्यामुळें दुर्गम्य, शेंकडों शत्रूंचें निवारण करावयाचें असल्यामुळें दुर्धर, अशा राज्यांत समबुद्धीनें न्याय करावा लागतो, सैन्याची तयारी चांगली ठेवावी लागते, प्रजेचें योग्य रीतीनें पालन करावें लागतें, इत्यादि अनेक भानगडी आहेत. पराक्रम, स्थैर्य, दातृत्व, उत्साह, प्रियभाषण, सत्यनीति, विद्वत्ता, विचार, कृतज्ञता, धूर्तता, औदार्य, धार्मिकता, शस्त्रविद्या, कृपालुता, मित्रप्रेम, इंद्रियनिग्रह इत्यादि गुणांनीं चंचल लक्ष्मीस जो बद्ध करतो, त्याचेच ठायीं राज्य लक्ष्मी राहते. हे सर्व विचार लक्ष्यांत आणून गुरुजन तरी अशा गुणवानावरच राज्य सोंपवितात व निश्चिंत होतात. यावरूनच काय तें बाळकानें लक्षांत आणावें. आतां सर्व

प्रजेचें मनोरंजन करण्यास तुलाच झटलें पाहिजे. आमचा काळ गेला. आम्हीं कधींही इकडे तिकडे पाऊल न टाकतां चिरकाळ राज्य केलें. प्रजेला पीडा दिली नाहीं. वडील माणसांचा संताप केला नाहीं. इंद्रियांस वश होऊन आपला उपहास करून घेतला नाहीं. अधिकार मदानें पाहिजे तें करून परलोक बुडविला नाहीं. स्वधर्म संभाळून इच्छा पूर्ण केल्या. वृद्धजनांची सेवा केली. अतिथि अभ्यागत यांना कधींच विमुख लाविलें नाहीं. सत्पुरुषांचें मनापासून सेवन केलें, इंद्रियांचें केलें नाहीं. धनुष्यास चढविलें, मनास चढविलें नाहीं. कीर्तीस जपलों, शरिरास नाहीं. दोषांला भ्यालों, मृत्यूला नाहीं. देवलोकींही दुर्लभ अशीं सर्व सुखें सुद्धां भोगिलीं. तूं जन्मास आल्यामुळें कृतार्थही झालों. मनांत आतां इतकेंच होतें कीं, तुझा विवाह समारंभ करावा, आणि सर्व राज्यभार तुजवर सोंपवून पूर्व राजर्षींनीं सेवित अशा वानप्रस्थ धर्मास अनुसरावें. परंतु एकाएकींच या गोष्टीस **वैशंपायनाचा** वृत्तांत प्रतिबंधक झाला. तेव्हां इच्छा पूर्ण होते कीं, नाहीं कोण जाणें! नाहीं तर, **वैशंपायनास** कां अशी बुद्धि सुचावी? असो, तर बाळकाला सांगणें इतकेंच कीं, तिकडे फार दिवस न राहतां, माझा मनोरथ जागच्या जागींच नाहींसा होईल असें करून ये." असें बोलून एके ठिकाणीं एक वटून आळेलें हृदयच, असा तांबूल त्याच्या तोंडांत घालून त्यानें त्यास निरोप दिला.

पित्याच्या भाषणानें संतुष्ट होऊन व फिरून फार नम्रतेनें त्यास नमस्कार करून तो निघाला, व **शुकनासाच्या** घरीं गेला. तेथें पुत्रशोकानें शुद्धीवर नसलेल्या **शुकनासास** व जिच्या डोळ्यांचें पाणी तुटत नाहीं, अशा **मनोरमेस** त्यानें नमस्कार केला. त्यांनींही त्यास आशीर्वाद दिले व त्याला जपून जाण्यास सांगून थोड्या अंतरावर पोहोंचविण्यासही गेले. मग **चंद्रापीडानें** त्यांस परत जाण्यास सांगितलें, व त्यांची आज्ञा घेऊन तो बाहेर पडला. तेथें सज्ज केलेला **इंद्रायुध** त्याचे दृष्टीस पडला. तो मागें मागें सरत होता, त्याचे कान उभारलेले नव्हते, रडक्या स्वरानें तो खि-

खाळत होता, व त्याच्या चर्येवर कांहींच उत्साह दिसत नव्हता. असें त्यानें पाहिलें, तरी **वैशंपायनाच्या** व **कादंबरीच्या** भेटीची अत्युत्कंठा असल्यामुळें, कोण जाणे, हें दुश्चिन्ह समजून कोणी जाण्यास निवारण करील, असें वाटून तो इंद्रायुधावर बसून वेगानें नगरा बाहेर गेला.

पुढें शिप्रानदीच्या तीरावर प्रस्थान मंगल करण्याकरितां विश्रांतिस्थान तयार केलें होतें, तिकडे न जातां परभारेंच तो निघून गेला. युवराजाची स्वारी गेली, व ते या वेळेस इकडे न येतां परस्पर जातीलसें वाटत नव्हतें, असा त्या मंगलगृहांत गलबलाच गलबला झाला. मग राजपुत्र व सेवक मोठ्या गडबडीनें **चंद्रापीडाच्या** मागून धांवत गेले. **चंद्रापीड** सहा कोसांवर जाऊन जेथें पाणी व तृण विपुल होतें अशा ठिकाणीं उतरला. केव्हां एकदाच तेथें जाईन अशी त्याच्या मनास घाई असल्यामुळें उजेडण्याच्या पूर्वींच तो तेथून निघून चालता झाला. वाटेनें चालला असतां, हजारों कल्पना त्याच्या मनांत आल्या. "तेथें गेल्यावर मी एकाएकींच **वैशंपायनाच्या** पाठी मागून जाऊन त्यास घट्ट धरीन, व तो लज्जेनें एकीकडे जाऊं लागला, तर त्याच्या मागोमाग जाऊन त्याची गचांडी धरून 'आतां कोठें पळतोस?' असें ह्मणून त्याच्या मनांत शिरलेलें वेड काढून टाकीन. पुढें एकाएकीं मला पाहून सानंद झालेल्या अशा परमपवित्र **महाश्वेतेला** पहिल्यानें भेटेन. तिच्या आश्रमाजवळच सर्व सैन्य ठेवीन. मग तिज बरोबर हेमकूटपर्वतावर जाईन. मला पाहिल्याबरोबर **कादंबरीचे** सेवक मला नमस्कार करितील, व त्यांची एकच धांदल उडून जाईल. मला पाहतां क्षणींच हर्षित झालेल्या तिच्या सख्या, "बाई साहेब, बक्षीस आणा अगोदर!" असें ह्मणून प्रियेपासून बक्षिसें घेतील! "तो कोठें आहे! कोठें आहे! कोण म्हणते? किती दूर आहे?" असें घाईघाईनें ती विचारीत आहे, तों मी तिच्या दृष्टीस पडेन, मग काय विचारावें!! मला पाहिल्यामुळें तिचा मदनताप नाहींसा होऊन ती सलज्ज होईल व स्तनावर ठेविलेलें

पद्मपत्र झटदिशीं काढून टाकून त्यांना पदरानें झांकून टाकील! कमलतंतूचीं भूषणेंही काढून टाकील! तापामुळें सर्व भूषणांचा त्याग केल्या कारणानें फक्त एक हार मात्र तिच्या अंगावर असेल. नुसत्या सौंदर्यानेंच अलंकारशोभेपेक्षांही अधिक रमणीय ती दिसेल. अंगास चंदनाची उटी असल्यामुळें आच्छादित झालेलें लावण्य, व्यक्त होण्याकरितां उटीस हातानें काढून टाकीत असल्यामुळें तिची देहकांती फारच रमणीय दिसेल! तिचे शरिरास चिकटलेलीं कमल तंतूचीं शकलें, मला पाहिल्या बरोबर थरारून रोमांच उभे राहिल्यामुळें पडून जातील! गालावर अस्ताव्यस्त पसरलेले केंस, आरशांत पाहून त्यांना हातानें मागें सारूं लागेल! नेत्रावाटें आनंदाश्रु चालू लागल्यामुळें मदनाग्नीला शेवटली जलांजलीच देत आहेशी दिसेल! अंगाला चंदनाची उटी अवशिष्ट असल्यामुळें हें मदनाचें भस्मच झालें आहे, असें तिला वाटेल! मला पाहतांच पुष्पशय्येवरून ती झटकन उठून उभी राहील! अशा त्या **कादंबरीस** पाहून दर्शनीय वस्तूंची परमावधि पाहिल्यामुळें मी आपल्या नेत्रांचें साफल्य मानीन! **मदलेखेला** हात जोडून व तिचा सत्कार करून कंठालिंगन देत असतां पायावर पडलेल्या **पत्रलेखेस** उठवून **केयूरकाचा** सन्मान करून त्यास आलिंगन देईन! **महाश्वेता** मग आह्मा उभयतांचा विवाह समारंभ करील! तिच्या सख्या तिला थाटानें न्हाऊं धुऊं घालतील; मग आनंदानें वर्षासिक्त भूमीचेपरी तिचें करग्रहण[१] मी करीन! नंतर पुष्पें, केशर, कस्तूरी इत्यादि अनेक सुगंधी द्रव्यांमुळें जेथें घमघमाट सुटला आहे, अशा शयन मंदिरांत मंचकाजवळ **मदलेखा** थोडा वेळ बसून विनोद करून गेल्यावर, लज्जेनें खालीं तोंड घालून बसलेल्या व जशी कांहीं मनांत इच्छा नाहीं असें दाखविणाऱ्या प्रियेस शय्येवर नेऊन देवांना देखील दुर्लभ असें तिचें अधरामृत फिरून फिरून पिऊन जीवितांचें साफल्य करीन! आणि तिची अतिकोमल तनु, दृढ आलिंगून मुखामृतानें मदनाग्नीनें दग्ध केलेलें हें शरीर जिवंत करीन!

---

१ करभार, हात.

आणि अनुभविलें तरी नवेंच! उघड कळणारे असून ज्याचें स्वरूप सांगतां येत नाहीं! अनुपम, अनिर्वचनीय, परमप्रीतिकर, ध्यानगम्य असे मोक्षसुखच, असें तिच्याशीं सहवर्तमान सुरतसुख भोगीन! मग क्षणभर देखील तिज खेरीज नराहतां अनेक रमणीय स्थळांचे ठायीं रममाण होऊन तारुण्याचें सार्थक्य करीन! देवीचा मजवर पक्का भरंवसा बसून ती बोलू लागली ह्मणजे तिची प्रार्थना करून मदन-लेखे बरोबर वैशंपायनाच्या लग्नाचाही घाट जमवीन." याप्रमाणें मनोराज्य करीत भूक, ताहान, दगदग, आणि जागरण यांस न जुमानतां दिवसांस व रात्रीं मार्गक्रमीत तो चालला.

दूर जाण्याचें असल्यामुळें अर्ध्या रस्त्यांतच पर्जन्यकाळानें त्यास गांठलें. मार्गक्रमण करणारांस कालसर्पच, ग्रीष्मऋतूचा चिखल कर-णारा, सूर्याला काळोख आणणारा, चंद्राला राहूसारखा, विद्युल्लता-रूप अग्नीचा पूर्व धूम्रच, मदनरूपी मत्त हत्तीचा मदस्रावच, कामीरूप हरणांना केवळ जाळेंच, विरहीजनाला मरणदायक असा अंधतम नरकच, हत्ती, घोडे इत्यादिकांच्या पायांतील लवकर न तुटणारा सांखळदंडच, अनेक रंगी इंद्रधनुष्याची विद्युल्लतारूप दोरी ओढून टणत्कार करणारा, धारारूप बाणांच्या वर्षावानें प्रहार करणारा, शत्रूप्रमाणें मार्ग रोधून राहणारा, शीघ्रगमन करणारास विघ्न करणारा, असा वर्षाकाल येऊन ठेपला.

प्रथमतः चंद्रापीडाच्या चित्ताना हरण करणाऱ्या मूर्च्छांनीं दश-दिशा धुंद केल्या, नंतर मेघांनीं अंध केल्या. प्रथम स्थान सोडून त्याचें चित्त उडालें, नंतर हंस उडाले. अगोदर त्याचे श्वासवायु चालू झाले, नंतर वर्षावायु वाहूं लागले. पहिल्यानें नील कमळां-प्रमाणें त्याचे नेत्र जल सोडूं लागले, नंतर मेघ सोडूं लागले. अगोदर तरंगांनीं त्याचें अंतरंग भरलें, नंतर जल तरंगांनीं नद्यांची पात्रें भरलीं. पाण्याचे पूराबरोबर त्याचा कामही वाढला. वृष्टि-जलानें कमलिनी बरोबर कादंबरी समागमाची आशाही बुडाली, जलधारेच्या वेगाला सहन न करणाऱ्या अंकुराबरोबर त्याचेंही हृदय पडलें. नवीन पल्लवाबरोबर त्याचे डोळे लाल झाले. वृष्टी

वायूनें कंदबकलिकेबरोबर त्याची तनु रोमांचित होऊन थरथर कांपूं लागली, पूरानें खणलेल्या तीराबरोबर त्याचें शरीर पडूं लागलें. मालती पुष्पाबरोबर त्याच्या उत्कंठा विकास पावल्या. केतकी प्रफुल्लित होऊन त्यांच्या तीक्ष्ण अग्रानीं त्याचीं मर्में भेदूं लागलीं. मोरांच्या ओरडण्यानें त्याचे अवयव गळून गेले. दशदिशा मेघांनीं अंध केल्यामुळें त्याचा मोहांधकार वाढला. विजांच्या लकलकाटानें त्याचा संताप थडकला. मेघांनीं दशदिशा व्याप्त झाल्या. जिकडे तिकडे अंधारून आलें. विजा चमकूं लागल्या. जोरानें वारा वाहूं लागला. वृष्टि सुरू झाली. तळीं तुडुंब भरलीं. तीराजवळचे तरु पूरानें मुळां सकट उपटून पडून वाहत जाऊं लागले. नद्या जोरानें वाहूं लागल्या. चातक पक्षी ओरडूं लागले. मेघगर्जनेनें सानंद होऊन मयूर ओरडूं लागले. बेडूक डरांव डरांव शब्द करूं लागले. झंजावाताचे सूं, सूं, शब्द होऊं लागले. उंच पर्वतांवरून तुटलेल्या कड्यांवर उदकप्रवाह पडूं लागल्यामुळें त्यांचे धो, धो, असे शब्द चालू झाले. नद्यांच्या लाटा खडकांवर अपटूं लागल्यामुळें त्यांचे मोठे अवाज होऊं लागले. वृक्ष, पाषाण, सांचलेलें पाणी व पानें इत्यादिकांवर अनेक प्रकारें होणाऱ्या पर्जन्याच्या शब्दांनीं **चंद्रापीड** त्रस्त झाला. त्याला रात्रीं दिवसास ग्रामांत, अरण्यांत, वनांत व उपवनांत चालतांना, उठतांना, बसतांना कोठेंही चैन पडेनासें झालें. **वैशंपायनाच्या** आठवणीनें व **कादंबरी** समागमाच्या ध्यासानें, किंवा दुसऱ्या कोणत्याही प्रकारानें त्याला सुख वाटेनासें झालें. जिकडे तिकडे भिजून चिंब झालें असतांही त्याच्या अंगाचा संताप झाला. त्याचें तर्जनच करीत आहेत काय अशा विजांचा चकचकाट सुरू असतां, तो मोहांधकारांत पडला. आनंद देणारे असे शीतलवायु चालू असतां त्याच्या अंगाची आग झाली. मेघ पुष्ट झाले पण तो कृश झाला! जिकडे पहावें तिकडे हिरवेंगार तृण फुटून त्यावर तांबडे किडे पसरल्यामुळें तें लाल झालें परंतु तो फिका पडला! कुड्याची झाडें फुलून पांढरी झालीं, परंतु तो रागानें लाल झाला! सर्वांना जीवन देणारा

असाजरी तो पर्जन्य काळ होता तरी त्याला तो मृत्यु देणारा भासला. पूर आलेल्या नदींत व दुर्दैवाच्या लीलेंत तो गटांगळ्या खाऊं लागला. तो चिखलानें व मूर्छेनें पडूं लागला. कादंबरीच्या चिंतेनें व फुलांच्या परागानें त्याचे डोळे भरून गेले! गमनाला विघ्नें आल्यानें व मेघांच्या गर्जनेनें तो मोहित झाला. दुर्लंघ्य अशा उत्कंठा व नद्या तो तरून जाऊं लागला. कादंबरी समागमाच्या मनोरथानें व उदकपूरानें तो वाहत चालला! ज्याना जीविताची आशा नाहीं अशा लोकांना व घोड्यांना तो सोडून चालला. विजा त्याची निर्भर्त्सनाच करताहेत काय, मेघ अड्थळाच करताहेत काय! खड्ग-धारांप्रमाणें पर्जन्याच्या धारा त्याचे तुकडेच करताहेत काय! असा तो दिसत होता. पर्जन्यानें गमनाला विघ्न करणाऱ्या अशा जरी आशा (दिशा) रोधून टाकल्या होत्या तरी कादंबरीच्या समागमाची आशा बंद झाली नाहीं. त्या आशेनें, सर्व प्राणी जरी जागचे जागीं जखडून टाकल्यासारखें झाले होते तरी, त्याचा चालण्याचा झपाटा चालला होता. पावसाच्या सरीनें डोळे बाजूला करीत, तोंडें खालीं वांकवीत, भिजल्यामुळें मानांवरील केसांतून पाणी गळत आहे असे चिखलांतून एक पाय काढीत व एक पाय घालीत, एक सारख्या पर्जन्यानें उंच सखल जमीन ज्यांना दिसत नाहीं यामुळें ठेचाळत आहेत असे, ज्यांच्या वोझ्यावरचीं खोगरें सैल झालीं आहेत असे, वारंवार नद्या उतरण्याच्या त्रासानें ज्यांचें बल, वेग व उत्साह हीं नष्ट झालीं आहेत अशी स्वारांसहित चंद्रापीड पावसांतून व चिकलांतून चालला होता. जीवित धारण करण्या पुरतें मात्र त्यानें वाटेनें खाणें, पिणें ठेविलें होतें. बरोबरचे राजे लोक त्यास आग्रह करीत असतांही त्यानें सर्व राजोपचार वर्ज केले. 'केव्हां तेथें जाईन?' या ध्यासामुळें केवळ चालण्याकडेच कायर्ते त्याचें लक्ष्य होतें.

सुमारें तृतीयांश मार्ग राहिलातों परत येणारा मेघ नाद त्याच्या दृष्टीस पडला. तो लांबून नमस्कार करतो आहे तों चंद्रापीड ह्मणाला, "पत्रलेखेचा वृतांत सध्यां राहूं दे. मी वैशंपायनाचें

वर्तमान तुला अगोदर विचारितों. अच्छोदसरोवराच्या कांठीं **वैशंपायन** कां राहिला? त्याचें कारण काय? आह्मांस सोडून राहिल्याबद्दल त्याला पश्चात्ताप वाटतो कीं नाहीं? तुमचें दोघांचें याबद्दल कांहीं बोलणें झालें किंवा नाहीं? असें करण्याचा त्याचा हेतु कोणता असावा हें तुझ्या लक्षांत आलें कीं नाहीं? तूं त्याला चालण्याकरितां बोध केला कीं नाहीं? तेथून येण्याचा त्याचा विचार आहे कीं नाहीं? व आह्मांला तो भेटेल कीं नाहीं? तेथें त्याला दिवसभर कोणती कर्मणूक आहे? हें सर्व प्रथम सांग." असें भाषण ऐकून तो ह्मणाला, "महाराज, **वैशंपायनाला** भेटून तुझ्या मागोमाग आलोंच, असें सांगून आपण मला धाडल्यावर आच्छोदसरोवराकडे **वैशंपायन** परत केव्हां गेला हें मला मुळींच समजलें नाहीं. वर्षाकाळ जवळ आला आहे, याकरितां महाराज **तारापीड** देवी **विलासवती** व आर्य **शुकनास** हें महाराजांस इकडे येऊं देणार नाहींत, यासाठीं तूं येथें एकटा राहूं नको, आह्मी पोहचल्या सारखेच आहोंत. तर तूं येथूनच परत जा, असें आच्छोदसरोवराच्या अलीकडे, तीन चार मजला **पत्रलेखा** व **केयूरक** यांनीं परत जाण्यास मला आग्रह केला. ह्मणून मी तेथून परतलो" इतकें बोलून तो उगीच बसला. मग **चंद्रापीड** ह्मणाला, "**केयुरकासह पत्रलेखा** पोहोंचली असेलना पण?" तो ह्मणाला, "महाराज, वाटेंत कांहीं हरकत झाली नसल्यास तीं निःसंशय पोहोंचलीं असावीं." असें त्याचें भाषण ऐकल्यावर विरहतापानें **चंद्रापीड** फारच घाबरा झाला. त्याला सर्व विपरीत दिसूं लागलें. मेघ हे काळपुरुष; विद्युल्लता ह्या मदनाग्नीच्या ज्वाळा; विजांचें कडकडणें, हा काळाच्या चौघड्यांचा आवाज; जलधारा ही बाणांची वृष्टि; मेघांचें गडगडणें, हा मधून मधून होणारा मदन धनुष्याचा टणत्कार; मोरांचें ओरडणें हे यमदूतांचें हांका मारणें; केतकीचा सुगंध हा विषारी पदार्थांचा वासच; काजवे ह्या प्रलयाग्नीच्या ठिणग्याच, भ्रमरपंक्ति, हीं काळाचीं जाळींच; बगळ्यांच्या पंक्ति ह्या यमाच्या पताकाच, नद्या प्रळयकाळचे पूरच, मेघांचा काळोख ह्या काल रात्रीच; याप्रमाणें त्यास भासूं लागलें. सात्विकपणा, बळ, तजेला,

बुद्धि, धैर्य, हास्य इत्यादिकांनीं सोडलेला असा **चंद्रापीड** मोठ्या कष्टानें चालतां चालतां एकदाचा अच्छोदसरोवराजवळ येऊन पोंहोचला.

त्या ठिकाणीं पर्जन्यामुळें जिकडे तिकडे भिजून चिंब झालें होतें. सभोंवतीं हिरव्या गार गवतावरून पाणीच पाणी झालें होतें. तीरावरील लतामंडप पर्जन्यानें अस्ताव्यस्त झाले होतें. सरोवराचीं तटें कोसळल्यामुळें त्यांतील उदक गढूळ झालें होतें. फुललेल्या कमळांच्या पांकळ्या गळून जिकडे तिकडे पाकळ्याच पाकळ्या तरंगत होत्या. कमळें पाण्यांत बुडून गेलीं होतीं. कमळांतील मृणाळें व पानाचे तुकडे वर तरंगत होतें; त्यामुळें भ्रमर वेड्यासारखे होऊन वर फिरत होते! हंस पक्षी तेथून उडून दुसरीकडे जात होते. सारस पक्ष्यांस राहण्यास जागा नसल्यामुळें ते दीन स्वरानें ओरडत होते. जलपक्षी थंडीनें कांपत तीरावरील देव नळाच्या झाडांत लपून बसले होते, तसेच चिमण्या, मोर, व बगळे, हे तटाजवळच्या झाडांवर पाऊस काढीत तटस्थ बसले होते. तेंच आच्छोदसरोवर पूर्वी पाहिलेलें असून हीन पाहिल्यासारखें दृष्टीला व मनाला सुख न देणारे, व भयाण दिसूं लागलें, आणि त्यापासून त्याला दुप्पट दुःख वाटलें.

तेथें पोहोंचल्यावर तो आपल्या लोकांस ह्मणाला, "**वैशंपायनाचा** विलक्षण स्वभाव झाल्यामुळें आपणांस पाहून कदाचित् तो दुसरीकडे निघून जाईल. ह्या करितां चारी बाजूंकडे सावधगिरीनें पाहात असा. असें सांगून आपणही घोड्यावरच बसलेला राहून मोठ्या आशेनें शोध करीत हिंडूं लागला. त्यानें सर्व लतागृहें देवळें व इतर ठिकाणें पाहिलीं. परंतु कोठेंही तो असल्याचें एकही चिन्ह दृष्टीस पडलें नाहीं. त्यावेळीं त्याला वाटलें कीं, मी येणार असें **पत्रलेखे**पासून त्याला समजल्यामुळें तो येथून कोठें तरी निघून गेला असावा, असें दिसतें. हर हर!!! आतां काय करावें? हें तोंड आतां कसें दाखवावें? आतां तर माझे पाय अगदीं मोडल्यासारखे झाले! एक पाऊलही पुढें टाकवत नाहीं. मदनबाणानें

उडविलेले माझे प्राण कादंबरी दर्शनाच्या आधारानें मात्र राहिले होते, ते आतां जाऊं पाहात आहेत. शिव शिव !!! मित्रदर्शन नाहीं व प्रियादर्शनही नाहीं! मी सर्वस्वी बुडालों." मनुष्यास एका एकीं आशा सुटत नसते, यामुळें त्याच्या मनांत आलें, कीं, **महाश्वेता**जवळच राहते, तर याबद्दल तिला कांहीं माहित असेल तर पहावें, असा विचार करून व सैन्यास जवळच तळ देण्यास सांगून त्यानें आपल्या अंगावरचा वाटेचा पोशाक काढून टाकिला. नंतर शुभ्रवस्त्रें धारण करून इंद्रायुधावरचें खोगीर न काढतां तसाच त्यावर बसून **महाश्वेतेच्या** आश्रमाजवळ गेला. तिला केव्हां पाहीन अशी त्यास घाई झाल्यामुळें आश्रमीं येण्या पूर्वींच तो घोड्यावरून उतरून तेथें चालत गेला. त्याच्या मागून इंद्रायुधा-सह राजपुत्रही गेले. तेथें गेल्यावर पहातो तों गुहा द्वाराच्या जवळच्या शिळेवर **महाश्वेता** खालीं तोंड घालून बसली आहे, क्रोधानें तिचे सर्व अवयव थरथर कांपत आहेत, प्रचंडवृष्टिवायूनें पीडिलेली लता जशी दिसते, तशी दीन झालेली व **तरलिकेनें** धरलेली **महाश्वेता** त्याच्या दृष्टीस पडली. तिला पाहून त्याला वाटलें कीं, देवी **कादंबरी** खुशाल असेलना पण? नाहीं तर मला पाहिल्याबरोबर हर्षित होणारी ही, अशी खिन्न बसणार नाहीं. अशी शंका त्याच्या मनांत येऊन तो फारच घाबरला त्याच्या डोळ्या पुढें अंधारी आली, प्राण जातातसें वाटलें. मग ते खिन्न होऊन त्याच शिळेच्या एका बाजूवर जाऊन बसला. मग "ही अशी कां बसली आहे" असें त्यानें **तरलिकेस** विचारल्यावर ती **महाश्वेतेच्या** तोंडाकडे टक लावून पहात बसली.

मग दुःखानें सद्गदित होऊन **महाश्वेता** ह्मणाली, "भाग्यवंता, ही चांडाळीण काय काय कळविणार नाहीं! दुःखाचे घाव सोसतां सोसतां घटलेल्या ऱ्यां दुःख श्रवणास अयोग्य अशा महाराजांस पूर्वीं आपलें दुःख ऐकविलेंच आहे, आतां महाराजाच्या जीवितास अपाय करणारी निर्लज्ज, व निर्दय अशी मी फिरून दुःखकारक वर्तमान सांगण्यास सिद्धच आहे.

**केयूरकाच्या** मुखावाटें महाराज गेल्याचें ऐकून माझें हृदय दुःखानें व्याकूळ झालें. मला वाटलें कीं, मीं आईबापांचे मनोरथ पूर्ण केले नाहींत व प्रियसमागमानें सुखी अशी **कादंबरीही** डोळ्यांनीं पाहिली नाहीं! तेव्हां असली मी जन्मास तरी कशाला आलें! अशा कारणांनीं मला फारच वैराग्य उत्पन्न होऊन **कादंबरीचे** स्नेहपाश तोडून टाकून पुनः तपश्चर्या करण्याकरितां येथें आलें. येथें आल्यावर वयानें महाराजा इतका, व रूपानेंही असाच, शुद्धीवर नसलेला, आणि चंचल दृष्टीनें कांहीं हरवलेली वस्तुच पहात आहे, असा एक तरुण पुरुष माझ्या दृष्टीस पडला. कधीं पूर्वीं पाहिलेला नसून ओळखीत आहेसा, कधीं ज्याचा संबंध नसून परिचितासारखा, दुःखित असून सुखावलेल्यासारखा, उगीच उभा असून कांहीं प्रार्थना करीत आहे असा, विचारपूस केल्यावांचून आपली अवस्थाच सांगत आहे असा, क्षणांत आनंद, क्षणांत शोक व क्षणांत दुःख मानणारा, उन्मत्तासारखा, भूताविष्टासारखा, अश्रूंनीं भरलेल्या नेत्रांनीं मला हृदयांत सांठवितच आहे काय! किंवा मला आपला देहच अर्पण करतो आहे काय असा एक तरुण ब्राम्हण फार वेळ मला पाहून म्हणाला, हे सुतनु! या जगांत सर्व प्राणी आपलें जन्म, आकृति आणि वय यांस अनुरूप अशीं कर्मं करून सार्थक्य करितात. तूं तर आपल्या रूपास व वयास अयोग्य असें भलतेंच कर्म करतेस! सुकुमार पुष्पमालेप्रमाणें कंठालिंगनास योग्य अशी आपली तनु तपश्चर्येच्या क्लेशानें सुकवितेस! हें काय? मनोहरलतेप्रमाणें रसिक समागमानें सुंदर तनूचें साफल्य कां करीत नाहींस? रूप व गुण यांनीं विहीन असतात ते देखील या लोकचीं सुखें भोगून धन्य होतात! मेल्यावर दृष्टीस पडणाऱ्या परलोकच्या सुखाकरितां अशा शरीराचे तूं हाल करतेस हें पाहून माझा जीव तीळतीळ तुटतो! ही तुझी सकुमार तनु कोणीकडे आणि कष्टकारक तपश्चर्या कोणीकडे? अशी सुंदरी इहलोक सुखापासून पराङ्मुख होऊन जर खुशाल आपलें शरीर कष्टवितें, तर मदन हातांत सज्ज धनुष्यबाण कशाला धारण

करितो कोण जाणें! चंद्रही उदयाला कशाला येतो कोण जाणे! वसंतऋतूचा अविर्भावही व्यर्थच समजला पाहिजे! अनेक प्रकारचीं कमलें प्रफुल्लित होतात तींही व्यर्थच! वर्षाऋतूचें अवडंबरही व्यर्थच! प्रफुल्लित सरोवरें, व सुगंध वायु हेंही व्यर्थच! या सर्वांचा कांहीं एक उपयोग नाहीं!

प्रिय पुंडरिकाच्या वियोग दुःखानें मला कशाचेंच कौतुक वाटत नाहीं! मग त्याच्या बोलण्यापासूनच कोठून होणार? त्या पुरुषाला तूं कोण? कोठून आलास? कशाकरितां आलास? मला असें कां बोलतोस? वगैरे न विचारितां मी तेथून उठून दुसरीकडे निघून गेलें. आणि देवपूजेकरितां फुलें तोडीत बसलें. मग तरलिकेस बोलावून ह्मणालें, तरलिके, हा तरुण ब्राम्हण कोण आहेग! बोलण्या चालण्यांत याचा कांहीं निराळाच भाव दिसतो! याकरितां फिरून तो येथें येणार नाहीं, असें कर. निवारण केल्यावरही जर तो येथें येईल, तर त्याचा नाश होईल. मग येथून त्यास घालवून दिलें असतां ही दुष्ट मदनाच्या दुर्निवार वर्तनानें, किंवा होणार गोष्टी चुकत नसल्यानें त्यानें आपला हेकडपणा सोडला नाहीं. पुढें कांहीं दिवस गेल्यावर, एके दिवशीं बरीच रात्र झाली होती. मदनाग्नीचा वर्षावच करीत आहेत असे चंद्रकिरण पसरले होते. तरलिकेला झोंप लागली होती. संतापामुळें माझा डोळा लागेनासा होऊन मी याच शिलातळावर येऊन पडलें होतें. अच्छोदसरोवरांतील कमळावरून सुगंधयुक्त वायु वाहत होता. चंद्रिका स्वच्छ पडली होती. अमृतकिरणांच्या वर्षावानें आनंद देणारा चंद्र, आपल्या किरणाबरोबर माझ्या वल्लभासही सोडील काय! अशा आशेनें प्रियपुंडरीकाकडे लक्ष लावून बसलें होतें. या पापिणीच्या हतभाग्यानें आकाशांतून उतरलेल्या दिव्यपुरुषाचेंही भाषण कसें खोटें झालें? त्याला माझी दया येऊन 'कशी तरी ही वांचो' म्हणूनच तो असें बोलला असावा, असें वाटलें. प्रियपुंडरीकाकडे या गोष्टीचा काय बोल आहे! त्याला मरणानंतर उचलून नेलें. कापिंजल तर जीवंत वर गेला असून मेल्यासारखाच झाला. त्या नि-

दैयानें इतका काळ गेला तरी मला कांहीं एक कळविलें नाहीं. असें चिंतन करीत 'व्यर्थ माझें जिणें' ह्मणून जागीच होतें.

अशा वेळेस तो तरुण ब्राह्मण हळूच पावलें टाकीत येत आहे, असा माझ्या दृष्टीस पडला. त्याच्या सर्व अंगावर रोमांच उभे राहिल्यामुळें मदनबाणांनीं खचलाच आहे काय, केवड्यांतील परागानें याचें सर्व अंग भरल्यामुळें मदनाग्नीनें पहिल्यानेंच भस्म केला काय, मृणालाचें कडे हातांत घातल्यामुळें ज्याचा कोठें आज्ञाभंग होत नाहीं अशा मदनाची मरणाकरितां मूर्तिमंत आज्ञाच हातीं घेतली आहे काय, कानावर किरण पडल्यामुळें मदनाचा मित्रचंद्र त्याचा धिःकारच करितो आहे काय! अश्रुधारा चालल्यामुळें आपल्याला शेवटली जलांजलिच देत आहे काय! घर्मानें भिजल्यामुळें आपल्याच इच्छेनें स्नान करून माझें पाणिग्रहण करण्या करतांच आला आहे काय! दुसऱ्याचें मन जाणल्याशिवाय जाणें युक्त नाहीं, ह्मणून जड झालेल्या त्याच्या मांड्या त्याचें निवारण करीत असल्यामुळेंच हळूं हळूं येत आहे काय! माझ्या आलिंगनाच्या व्यर्थ आशेनें हात पसरून येत असल्यामुळें तो उत्कंठालहरींनीं विस्तीर्ण अशा अनुरागसमुद्रांत तरतच आहे काय! आणि श्वास वायूंनीं ओढीतच चालविलेला, लज्जेनें व धैर्यानें सोडलेला, कामुकपणानें वेडावलेला, योग्यायोग्य विचार न करणारा, मदनाच्या स्वाधीन झालेला, असा तो पुरुष स्वच्छ प्रकाशामुळें दुरून मजकडे येत आहेसें दिसलें.

त्यास पाहिल्यावर, माझ्या जिवाची मला कांहीं पर्वा वाटत नव्हती, तरी मनांत असें भय उत्पन्न झालें कीं, हें एक मोठें संकटच प्राप्त होत आहे कीं काय कोण जाणें? हा बेफामपणानें जर मला स्पर्श करील तर ह्या पातकी शरिराचा मला त्यागच करावा लागेल. प्रियपुंडरीकाच्या आशेनें आजपर्यंत दुःख सोसून हें शरीरधारण केलें, तें व्यर्थ होणार. असा मी विचार करीत आहें तो मजजवळ येऊन ठेपला आणि ह्मणाला, "हे चंद्रमुखि! मदनाचा सखा हा चंद्र मला मारण्याकरितां तयार झाला आहे. ह्मणून मी तुला शरण आलों आहें. तर माझें रक्षण कर. मला शरण जाण्यास

दुसरें ठिकाण नाहीं. मी अनाथ आहें. फार गांजलों आहें, निरुपाय झालों आहें. तुझ्या स्वाधीनच कायतें माझें जीवित आहें; शरणागताचें रक्षण करावें, हा तपस्व्याचा धर्म ही आहे. तूं जर मजवर दया करणार नाहींस, तर हा चंद्र व मदन हे दोघे मला ठार केल्याखेरीज सोडणार नाहींत." असें त्याचें भाषण ऐकून माझ्या मस्तकांतून जशा काय भडभड ज्वाळाच बाहेर पडल्या. क्रोधाग्नि पेटवून जाळण्यास तयार झाला. नेत्रांतून अश्रुबिंदु पडत होते, त्या ठिणग्याच उडत आहेतसें वाटलें, सर्वांगाचा थरकांप झाला, अंगांत संचार झाल्यासारखें होऊन माझें देहभांव नाहींसें झालें. मग मीं त्यास कठोरपणानें ह्मणालें, "हत् तुझें कपाळ फुटलें मेल्या! तुझ्या डोक्यावर वीज पडून तें भग्न कां झालें नाहीं! जीभ तुटून तिचें शेंकडो तुकडे कां झालें नाहींत? तुझी वाचा कां एकदम बसली नाहीं! मला वाटतें तुझ्या देहांत शुभाशुभकर्माचीं साक्षी भूत अशी पंचमहाभूतेंच नाहींत, ह्मणून असें बोलत असतां ही, अग्नीनें तुझें भस्म केलें नाहीं, वायूनें तुला उडवून नेलें नाहीं, उदकानें तुला बुडविलें नाहीं, पृथ्वीनें तुला रसातलांत नेऊन गडप केलें नाहीं, आणि आकाशानें ही तुला आपल्यासारखें शून्य केलें नाहीं!! पशु पक्ष्यांप्रमाणें कामुकपणा मात्र तूं जाणतोस, दुसरें कांहीं जाणत नाहींस! ज्या दुष्ट दैवानें रावूप्रमाणें तुला बोलण्यास मात्र शिकविलें, त्यानेंच तुला शुकयोनींत कां जन्मास घातलें नाहीं? तसें झालें असतें तर तुझ्या बोलण्याचा राग न येतां उलटा विनोद वाटला असता. आतां तुझ्या वर्तनाचें व दुष्टपणाचें फळ तुला भोगावयास लाविलें, ह्मणजे त्या जातींत तूं गेल्यावर मजसारख्या स्त्रियांविषयीं तूं कामुक होणार नाहींस! असें बोलून चंद्रास हात जोडून ह्मणालें, हे भगवन् लोकपाला, पुंडरीका खेरीज माझें मन दुसरीकडे कधींही गेलें नाहीं, हें जर खरें असेल, तर हा पापी मी ह्मटलेल्या जातींत जावो.. असें मी ह्मणत आहें तोंच तो छिन्नमूळ वृक्षासारिखा धाडकन् पृथ्वीतलावर निश्चेष्ट पडला. मग तो का मदनज्वराच्या आवेशानें, का आपल्या दुष्कर्मानें, का माझ्याच ह्मण-

ण्यानें कशानें असेल तें असो! त्याची अशी गति झाली. ते गतप्राण होतांच त्याचे सेवक मोठ्यानें रडूं लागले. तेव्हां त्यांच्या बोलण्यावरून समजलें कीं, तो महाराजांचाच मित्र होता." असें बोलून तोंड खालीं घालून ती मोठ्यानें रडत बसली.

हें ऐकतांच **चंद्रापीडानें** आपले डोळे फाडिले आणि त्याची बोबडी वळली. अशा स्थितींत ही तो ह्मणाला **महाश्वेते**, 'तूं आपल्याकडून प्रयत्न केला तरी या पातक्यास देवीचें सेवा सुख मिळालें नाहीं, तर आतां जन्मांतरीं तरी तें मला मिळेल असें करावें' असें बोलत आहे तोंच तिच्या वाग्बाणांनींच कीं काय त्याचें हृदय विदीर्ण झालें. तें पाहून **तरलिकेनें महाश्वेतेस** सोडून धांवत जाऊन **चंद्रापीडास** धरिलें, आणि ह्मटलें; देवी, खालीं तोंड घालून काय बसली आहेस? इकडे बघ. **चंद्रापीड** महाराजांची अवस्था कांहीं निराळीच दिसते आहे! यानें मान टाकून दिली! याला हालविलें तरी हा हालत नाहीं! याच्या डोळ्यांच्या बाहुल्या आंत गेल्या! हा अगदींच अंग धरीत नाहीं! श्वासोश्वासही टाकीत नाहीं! हा देवा! **चंद्रापीडा, चंद्रसुंदरा, कादंबरीप्रिया,** तिला सोडून तूं कोठें चाललास? असें बोलत ती मोठ्यानें रडूं ओरडूं लागली. **महाश्वेताही चंद्रापीडाच्या** तोंडाकडे टक लावून पाहतां पाहतांच अगदीं निश्चेष्ट झाल्यासारखी झाली!

"अगे दुष्ट तापसी, काय हें तूं केलें! सर्व जगताची पीडा ज्यानें दूर केली, अशा **तारापीडाचा** वंश बुडविला. सर्व प्रजेला अनाथ केलें. सर्व गुण नाहींसें केले. पति नाहींसा झाल्यामुळें लक्ष्मीनें व पृथ्वीनें आतां कोणाच्या आश्रयानें रहावें? आम्हीं कोणाची सेवा करावी? हे देवा, **चंद्रापीडा!** सर्वांचा सांभाळणारा तूं आह्मांस टाकून गेलास आतां आम्हीं काय करावें? सेवकांचा आदरसत्कार आतां लयास गेला! गोडगोड भाषणें दूर गेलीं! दानधर्माची गोष्ट आतां संपली! देवा, एकाएकीच कसा आह्मास सोडून गेलास! प्रजेनें आतां कोणाकडे जावें! साधूंनीं कोणाकडे पाहून समाधान पावावें? राज्य

धुरंधर तूं गेला असतां महाराज **तारापीडानें** आतां कोणावर राज्य-भार टाकावा? एवढा धैर्यवान् तूं असतां भित्र्यासारखें तुझें हृदय कसें फुटलें? तूं दयाळु असतां आम्हांविषयीं इतका निष्ठुर कसा झालास? देवा, कृपा कर, एक वार तरी आम्हांला आज्ञा कर. आमच्या प्रार्थनेचा अव्हेर करूं नको. तुजवांचून पुत्रवत्सल महाराज **तारापीड, देवीविलासवती, आर्यशुकनास, मनोरमाबाई, मांडलिकराजे** आणि **प्रजा** यांनीं कोणाकडे पाहून जीवधारण करावा? सर्वांचाच त्याग करून तूं एकटा कसा चाललास? एका-एकींच असा निष्ठुर कसा झालास! वडिलांवरची तुझी भक्ति कोठें गेली? याप्रमाणें शोक करीत पृथ्वीवर अंग टाकून राजे व सेवक मोठ्यानें रडूं ओरडूं लागले, व भ्रमिष्टासारखे झाले. इंद्रायुधही **चंद्रापीडाच्या** तोंडाकडे एकसारखी दृष्टी देऊन दीनवाणीनें ओरडूं लागला, जमिनीवर आपले खुर आपटूं लागला, व लगामास हिसके देऊन तो तोडूं लागला. त्यावेळीं अश्वशरीर सोडूनच जावेसें त्याला वाटत आहेसें दिसलें!

इकडे **चंद्रापीड** आल्याची बातमी **पत्रलेखेच्या** मुखानें **कादंबरीस** कळली. तेव्हां चंद्रोदयीं समुद्रवेलेची जशी लाटांनीं गडबड होते, तशी तिच्या जिवाची धांदल उडाली! कामाविर्भावानें ती अगदीं वेडी झाली. 'मी **महाश्वेतेच्या** भेटीस जाते' असें, आई-बापांस निमित्त सांगून मोठ्या थाटानें शृंगार वेष करून ती निघाली. तिनें आपल्याबरोबर थोडक्याच दासी घेतल्या होत्या. चालतांना त्यांच्या पायांतील भूषणांचा झुणझुण आवाज चालू होता. कमरपट्टयाच्या घागऱ्यांचा छुमछुम शब्द चालला होता. त्यांचा पोशाकही रमणीय दिसत होता. त्यांनीं आपल्या हातांत सुवासिक पुष्पें, उटीचें साहित्य, अत्तरें, अष्टगंध वगैरे सुगंधी पदार्थांनीं तबकें भरून घेतलीं होतीं. **केयूरक** पुढें होऊन तिला रस्ता दाखवीत चालला होता. **पत्रलेखेचा** हात धरून **मदलेखे**बरोबर ती बोलत चालली होती. ती म्हणाली, "**मदलेखे! पत्रलेखा**, तो आला असेल म्हणून सांगते, परंतु तो निर्दय व शठ आला असेलसें वाटत नाहीं. हिम-

गृहांत इतकी माझी अवस्था झालेली त्यानें पाहिली असतां त्यानें कसें वक्र भाषण केलें, व त्यावर तूंही हंसत हंसत उत्तर दिलेंस, त्याची तुला आठवण नाहीं काय?" आणखी "हिच्या प्राण धारणास आपण हेतु आहां" इत्यादि संशययुक्त तूं ह्मटलें असतां त्यानें मनावर घेतलें तरी का! मी मेलें तरी देखील त्याला खरें वाटणार नाहीं, मग दुसरें तर काय? माझ्याकरितां ही इतकी दुःख भोगीत आहे, असें त्याला वाटतें तर तो निर्दय त्या वेळीं येथून जाताचना! आतां तो जर खरोखरीच पुनः आला असेल, तरी त्याजबरोबर तूंच कांहीं तरी बोल. माझ्या दृष्टीस पडला तरी मी त्याजकडे पाहाःयाची नाहीं! बोलायाची नाहीं! असें कसें केलें, ह्मणून त्याची निंदा करायाची नाहीं! कांहीं एक करायाची नाहीं!!! त्यानें माझ्या पायांवर नमस्कार घालून प्रार्थना केली, तरी देखील मी त्याचें ऐकणार नाहीं. तूं देखील माझी समजूत करायाला येऊं नको बरें बाई!! असें बोलण्याच्या नादांत तिला वाटेचे श्रमही बिलकूल कळले नाहींत. **चंद्रापीडास** केव्हां पाहीन असें तीस झाल्यामुळें ती मोठ्या घाईनें त्या ठिकाणीं आली.

तेथें पाहते तों अमृत काढलेला जसा समुद्र, चंद्रानें विरहित जशी रात्र, नक्षत्रांनीं रहित जसें आकाश, फलें पुष्पें तोडल्यामुळें जसा बाग, कमलदंड काढून टाकल्यामुळें जसें कमळ, मध्य मणी काढून टाकल्यामुळें जसा हार दिसतो, त्याप्रमाणें गतप्राण **चंद्रापीड** तिच्या दृष्टीस पडला. तेव्हां, "हे काय." ह्मणून दुःखावेशानें पृथ्वीवर पडणाऱ्या **कादंबरीस मदलेखेनें** मोठ्यानें आक्रोश करीत धरून ठेविलें. **कादंबरीचा** हात सुटून **पत्रलेखा** तर निश्चेष्ट होऊन भूतलावर पडली. पुढें **कादंबरी** थोड्याच वेळानें शुद्धीवर आली असतां भूतसंचार झाल्यासारखी होऊन श्वासोश्वास सोडण्यास देखील विसरली. आणि ती वेड्यासारखी होऊन पाहूं लागली. अंतःकरणांत दुःख भार फार झाल्यामुळेंच तिच्यानें हालवेना कीं काय अशी **कादंबरी चंद्रापीडाच्या** तोंडाकडे एकसारखी टक लावून तटस्थ बसली. त्यावेळीं तिच्या मुखावर दुःखानें व संतापानें

कांहीं काळवटी व लाली दिसत होती. ग्रहण सुटल्यावर जसें चंद्रबिंब दिसतें, व जलद कुऱ्हाडीच्या प्रहारानें थरथर कांपणारी जशी लता दिसते, तशीं थरथर अधरोष्ठ कांपत असल्यामुळें ती दिसली. त्यावेळीं स्त्री स्वभावाहून निराळेंच तिचें हृदय दिसलें. तिची उग्र व दीन मूर्ति पाहून मोठ्यानें रडत **मदलेखा** पायां पडून ह्मणाली, प्रिय सखी, प्रसन्न हो, तूं जरी मोठ्यानें रडत ओरडत नाहींस, तरी तुझ्या अंतःकरणांत संताप व दुःख फार दिसतें आहे. त्यामुळें तुझें कोमल हृदय, अतिशय पाणी भरल्यामुळें जसें सरोवर शेवटीं फुटतें, तसें फुटलेसें दिसतें. **देवीमंदिरा** व **देवचित्ररथ** यांजवर दृष्टी दे, तुजवांचून दोन्ही मातृपितृकुळें नष्ट होतील, हें लक्ष्यांत आण. असें तिचें भाषण ऐकून **कादंबरी** किंचित् हांसून म्हणाली, वेडे, **चंद्रापीडाला** असा पाहिल्याबरोबर ज्याचे हजारों तुकडे झाले नाहींत असें मेलें हें वज्रापेक्षांही कठीण माझें हृदय, कोठूनग फुटणार !! वांचण्याची आशा जिला असेल तिला आई-बाप, बहीणभाऊ, आप्तमित्र, दासदासी वगैरे गणगोत होय, मी तर आतां मरायाला टेंकलें, तेव्हां मला आतां त्यांचा काय उपयोग आहे! माझा जीव कीं प्राण असें प्रियतमाचें शरीर माझ्या हातीं लागलें, आणखी काय पाहिजे? जें जिवंत असतांना समागमानें सर्व दुःखांचा नाश करितें व मरणा नंतर ही सहगमनानें सर्व दुःखांचा शेवट करितें! आणखी यापेक्षां दुसरा लाभ कोणता पाहिजे! मजकरितां इतक्या लांब येऊन प्राण सोडले, इतका त्यानें माझा गौरव केला असतां मी रडत बसून आपल्या जिवाला हलके-पणा कशाला आणूं? स्वर्गास चाललेल्या प्रियतमाला रडून अपशकुन तरी कशाला करूं? पाद धुलीप्रमाणें त्याच्या मागोमाग जाण्याची अशी आनंदाची वेळ आली असतां मग कशाला मी रडत बसूं बरें? आतां तर माझीं सर्व दुःखें नाहींतशीं झालीं, तेव्हां रडून काय करायाचें आहे? ज्या करितां कुलक्रम गणिला नाहीं. वडील माणसांस विचारलें नाहीं, धर्माकडे दृष्टी दिली नाहीं, लोकापवादाचें भय बाळगलें नाहीं, लज्जेचा त्याग केला, मदनपीडा

शांत होण्याकरितां उपचार करतां करतां सख्यांना कष्टविलें. माझी प्रियसखी महाश्वेता दुःखित झाली. तिजकरितां मी प्रतिज्ञा केली होती तीही मोडली. या सर्व गोष्टीकडे लक्ष दिलें नाहीं, इतकें ज्या करितां केलें, त्या प्राणेश्वरानें मजकरितां जीवित सोडिलें असतां मी प्राणधारण करावें? तूं ह्मणतेस पण तुला तरी असें बोलणें बरें दिसतें का? या वेळीं तर मरणच चांगलें बाई! वांचणें नलगे! मी जिवंत राहिलें तर त्या फटफजितीला पारावार नाहीं? तुझा मजवर जर स्नेह आहे, माझें हित करावें असें जर तुला वाटत आहे तर मजकरितां माझ्या आईबापांवर मजप्रमाणेंच प्रेम ठेव; माझ्या वियोगानें ते प्राणत्याग करणार नाहींत, अशी त्यांची समजूत कर. माझे जागीं तूंच त्यांना हो! मला पुत्र व्हावा अशी त्यांची इच्छा होती ती आतां तुझे ठिकाणीं तरी पुरी होवो! ह्मणजे मी परलोकीं गेलें असतां मला तो जलांजली देईल! माझ्या सख्या व सेवक यांस माझी आठवण होणार नाहीं, मजवांचून शून्यगृह पाहून उदासपणानें ते दशदिशांकडे जाणार नाहींत, असें कर. माझ्या आंगणांत पुत्राप्रमाणें पाळलेला आंब्याचा रोपा व मालतीलता आहेत, तर त्या उभयतांचे तूंच कौतुकानें विवाहमंगलकर! माझ्या पादप्रहारानें पोसलेल्या अशा अशोकवृक्षाचा पल्लव कर्णभूषण करण्याकरितां देखील कोणास तोडूं देऊं नको! मी वाढविलेल्या मालतीचीं फुलें देवपूजेकरितां मात्र तोडीत जा. माझ्या निजण्याच्या मंदिरांत उशाकडे कामदेवपट आहे तो फाडून टाक! मी लावलेलें आंब्यांचे रोपें चांगलें बाळगून फळास येतील असें कर! पिंजऱ्यांत दुःखी असलेली कालिंदी सारिका, व परिहास शुक, यांस पिंजऱ्यांतून सोडून दे! माझ्या मांडीवर निजणारी व कलिका तूं आपल्या मांडीवर निजवीत जा! मी पुत्रासारखा मानलेला बाळहरिण तरलक, एखाद्या तपोवनांत नेऊन सोडून दे! मी आपल्या हातानें वाढविलेला चकोरपक्ष्यांचा जोडा क्रीडापर्वतावर सुरक्षित राहिल, असें जप. मजबरोबर चालणाऱ्या बालहंसास कोणी मारणार नाहीं, अशी काळजी घे! वरांत राहण्याचें जिला माहीत नाहीं अशी वळेंच धरून

आणलेली वनमानुषी वनांत नेऊन सोडून दे ! माझ्या क्रीडापर्वतावर कोण्या तपस्व्याला राहण्याकरितां जागा दे ! माझी सर्व वस्त्रभूषणें ब्राह्मणांला देऊन टाक ! माझी वीणा तूं आपल्या मांडीवरच ठेवीत जा ! फार काय? तुला जें जें बरें वाटेल तें तें तूं कर ! मी तर आतां चंद्रकिरण अंगावर घेतां घेतां, आर्द्रचंदनाची उटी अंगास लावतां लावतां, जलमंदिरांतील कारंज्याच्या तुषारांनीं अंग थंड करतां करतां, चंद्रमण्यांचे हारास स्पर्श करतां करतां, चंदनरसानें भिजलेल्या अशा कमलशय्येवर पडतां पडतां, जळून शेष राहिलेली ही तनू मोठमोठ्या प्रचंड ज्वालांनीं युक्त अशा प्रदीप्त केलेल्या चिताग्नींत प्रियतमाच्या गळ्यास मिठी मारून शांत करीतें ! याप्रमाणें मरणाविषयीं निश्चय केलेल्या **कादंबरीस मदलेखेनें** बळकट धरिलें होतें, तरी तिचे हात हिसकून देऊन **कादंबरी महाश्वेतेजवळ** गेली, आणि तिच्या गळ्यास मिठी मारून शांतपणानें ह्मणाली, प्रियसखि, तुला कांहीं तरी प्रिय समागमाची आशा आहे, तिच्या‑योगानें मरणापेक्षां ही अधिक दुःख तुला सोसवतें, व त्या मुळेंच जीवित लज्जास्पद, शोचनीय व उपहासास पात्र असें वाटत नाहीं. मला पापिणीला तर तें कांहींच नाहीं, याकरितां जन्मांतरीं तरी प्रियसखीचा समागम व्हावा असें मी मागतें. असें बोलल्या नंतर तिच्या अंगावर रोमांच उभे राहून शरीरास कंप सुटला. अंगांतून घर्मबिंदु पडूं लागले. चंद्रविकासिनी कमलिनीप्रमाणें **चंद्रापीड**‑विरहानें विव्हल झालेली व तशा स्थितींत असलेल्या प्राणवल्लभाशीं समागमसुखाचा अनुभवच घेत आहे काय? अशी **कादंबरी** गडबडीनें **चंद्रापीडा**जवळ गेली, आणि तिनें त्याच्या पायांवर आप‑लें मस्तक ठेविलें. त्यावेळीं विस्खलित झालेल्या वेणींतून त्याच्या पायांवर पुष्पें गळल्यामुळें ती पूजाच करिते आहे काय अशी दि‑सली ! मग आपल्या घर्मयुक्त नव्हें तर अमृतयुक्तच अशा हातांनीं त्याचे पाय घेऊन तिनें आपल्या मांडीवर ठेविले.

तिचा हस्त स्पर्श होतांच **चंद्रापीडाचा** देह टवटवीत होऊन त्यापासून चंद्रासारखें तेज निघून तें, तो सर्व प्रदेश बर्फासारखा थंड

व शुभ्र करीत वर निघून गेलें. इतक्यांत आकाशांतून अमृतामृत स्रवणारी अशी वाणी ऐकूं आली. "हे वत्से महाश्वेते ! फिरून मी तुला आश्वासन देतों. पुंडरीकाचें अविनाशी शरीर माझ्या लोकीं माझ्या तेजानें वृद्धिंगत होत आहे ! याचा व तुझा फिरून समागम होईल. हें दुसरें चंद्रापीडाचें शरीर ही माझेंच तेजोरूपी व अविनाशी आहे. कादंबरीच्या हस्तस्पर्शानें हें तेजस्वी होईल. याकरितां शापमुक्ति होईपर्यंत तुह्मी त्याचें नीट रक्षण करावें. याला अग्नि संस्कार करूं नका, किंवा उदकांत किंवा कोठें टाकूं नका ! याचें नीट रक्षण करा. कादंबरीचा व याचा फिरून समागम होईल.

अशी आकाशवाणी ऐकून पत्रलेखेवांचून सर्व चकित झाले. आणि चित्राप्रमाणें होऊन वर पाहत बसले ! पत्रलेखा तर त्या तेजाच्या आनंदकारक शितल स्पर्शानें सावध होऊन भूतसंचार झाल्यासारखी वेगानें धांवत गेली आणि परिवर्धक नांवाच्या घोडेवाल्यापासून इंद्रायुधास हिसकून घेऊन म्हणाली, महाराज दूर गेले असतां तुला क्षणभरही येथें राहणें योग्य नाहीं. असें बोलत इंद्रायुधासह अच्छोदसरोवरांत तिनें उडी टाकिली. त्याच वेळेस त्यांतून एक तपस्विकुमार निघाला त्याच्या मस्तकावर शेवाळाचा भारच आहे काय अशा जटा दिसत होत्या, त्यांतून जलबिंदु गळत होते. फार दिवस स्वच्छ करण्याचा संस्कार नसल्यामुळें त्या अगदीं चिकटून गेल्या होत्या. त्याच्या भिजलेल्या शरिरावर जसें काय कमलतंतूंनींच निर्मिलें आहे असें यज्ञोपवीत शोभायमान दिसत होतें. कल्पवृक्षाच्या जीर्ण वल्कलानें त्यानें आपली कमर बांधिली होती. तोंडावर पसरलेल्या जटा तो एके हातानें मागें सारीत होता. अश्रुजलाच्या मिषानें सरोवरांतील डोळ्यांत गेलेलें उदक काढूनच टाकतो आहे काय असा तो दिसत होता; व त्यामुळें त्याचे डोळे लाल दिसत होते. याची आकृति उद्विग्न दिसत होती. असा तो ऋषिकुमार, अश्रुजलाचा निरोध केल्यामुळें ओढलेल्या नेत्रांनीं आपल्याकडे एकसारखी पाहत आहे अशा महाश्वेतेजवळ जाऊन सद्गदित

कंठानें ह्मणाला, "गंधर्व राजपुत्री! जन्मांतराहूनच आलेल्या अशा या मनुष्याची कांहीं ओळख आहे का?" असें त्यानें म्हटल्यावर शोक व आनंद यांच्यामध्यें राहून ती गडबडीनें उठली आणि त्यास नमस्कार करून ह्मणाली, "भगवन् कपिंजला! तुह्माला देखील मी ओळखणार नाहीं, इतकी मी पापिणी आहे ना? माझ्याविषयीं आपला असा ग्रह झाला तोही ठीकच! मी अज्ञानी मोहानें गोंधळून प्रिय पुंडरीक स्वर्गास गेला असतां खुशाल जिवंत राहिलें. तेव्हां मी पापिणी खरीच! बरें कपिंजला, प्रिय पुंडरीक ज्यानें उचलून नेला तो कोण? त्यानें त्याला कशाकरितां नेलें? पुढें त्याचें काय झालें? तो आतां कोठें आहे? आपलें काय वर्तमान आहे? इतके दिवस गेलें असतां आपण मला कांहींच कळविलें नाहीं, हें कसें? पुंडरीकावांचून आपण एकटे कसे आला!" याप्रमाणें महाश्वेता विचारीत असतां कादंबरीचे व चंद्रापीडाचे सेवक आश्चर्यभरित होऊन हा आतां काय सांगतो म्हणून त्याकडे पाहात तटस्थ राहिले.

तो ह्मणाला, "सर्व वृत्तांत सांगतो ऐक. तूं दीनस्वरानें रडत असतां ही तुला एकटीला टाकून देऊन माझ्या प्रियमित्रास घेऊन कोठें चाललासरे! ह्मणून कमर बांधून वेगानें त्याच्या मागें मी उडालों. तो तर मला कांहीं एक उत्तर न देतां आकाशमार्गानें चालला. त्यावेळीं आश्चर्यानें ज्यांचे नेत्र प्रफुल्लित झाले आहेत, असे देव त्याजकडे पहात राहिले. लज्जेनें तोंडावरून पदर घेऊन देवांगना एक्या बाजूस होऊन रस्ता सोडूं लागल्या. पुढें तारागण हाच ज्यांतील कमल समुदाय अशा आकाशसरोवरास उल्लंघून तो चंद्रलोकीं गेला. तेथें गेल्यावर महोदयाख्य सभेंत चंद्रकांत पर्यंकावर तें पुंडरीकाचें शरीर ठेवून मला म्हणाला, 'कपिंजला, मी चंद्र आहें समजलास? मी उदय पावून सर्व जगावर अनुग्रह करण्याकरितां नेहेमीप्रमाणें प्रकाशलों असतां मदनपीडानें व्याकूळ होऊन यानें प्राण सोडला. आपण कामाधीन होऊन आपल्या अपराधाबद्दल यानें विनाकारण मला असा शाप दिला कीं, 'अरे दुरा-

त्या दुष्ट चंद्रा ! ज्या अर्थीं तूं मला आपल्या किरणांनीं संताप दिला, आणि ज्या प्राणप्रियेवर माझी प्रीति बसली होती तिचा समागम होण्यापूर्वीच तूं माझा प्राण हरण केला, त्या अर्थीं या मनुष्यलोकीं तूं उत्पन्न होऊन जन्मोजन्मीं याप्रमाणेंच तूं आपल्या प्रियेविषयीं अनुराग धरशील आणि तिचें समागम सुख मिळण्यापूर्वींच हृदयवेदनेनें पीडित होऊन जीवित सोडशील.' अशा त्याच्या शापाग्नीनें मी जसा काय प्रदीप्त झालों. आणि मी निरपराध असतां आपल्या दोषाबद्दल या अविचाऱ्यानें विनाकारण मला शापिलें, म्हणून मी फारच रागावलों आणि 'तूंही मजबरोबरच समदुःखी होशील !' ह्मणून त्याला उलट शाप दिला. पुढें राग गेल्यावर विचार करून पाहिलें, तों **महाश्वेतेचा** आणि याचा संबंध जडला आहेसें लक्षांत आलें. वत्सा, **महाश्वेता** तर माझ्या किरणांपासून उत्पन्न झालेल्या अप्सरांचे कुलांत गौरीपासून उत्पन्न झाली. तिनें हा स्वतः भर्ता वरिला. तेव्हां आतां मलाही याजबरोबरच मनुष्यलोकीं यानें 'जन्मोजन्मीं' ह्मटल्यावरून दोन वेळ उत्पन्न झालें पाहिजे, याकरितां शाप दोष दूर होईपर्यंत याच्या निर्जीव शरिराचा नाश न व्हावा ह्मणून मी याला उचलून आणिलें आणि **महाश्वेतेलाही** आश्वासन दिलें. शाप संपेपर्यंत माझ्या अमृतकिरणांनीं पोसलेलें त्याचें शरीर येथेंच राहील. तूं आतां **श्वेतकेतूकडे** जाऊन त्यांसही सर्व हकीगत कळीव, कदाचित् ते महासमर्थ असल्यामुळें याविषयीं कांहीं प्रतिक्रियाही करतील.' असें बोलून मला जाण्यास सांगितलें.

तेथून निघाल्यावर मी जात असतां मित्राच्या विरहशोकानें माझें देहभान ठिकाणीं नव्हतें. यामुळें देवमार्गानें मी धांवत चाललों असतां एका देवास ओलांडून गेलों. तेव्हां त्यानें भुवया वर चढवून मजकडे इतकें रागावून पाहिलें कीं, हा मला आतां जाळूनच टाकतो कीं काय कोण जाणे, असें वाटलें. मग तो रागानें मला ह्मणाला, "दुष्टा, तूं तपोबलानें फार गर्विष्ट झालासा दिसतोस ! एवढा विस्तीर्ण आकाशमार्ग असतां दांडग्या घोड्यासारखा पाहिजे

तसा उडत माझें उल्लंघन करून चाललास काय! त्या अर्थी तूं मनुष्यलोकीं अश्व होशील." तें ऐकून दुःखानें रडत मी हात जोडून प्रार्थना केली, "भगवन्, मित्र शोकानें अंध होऊन मजकडून आपलें उल्लंघन झालें, अपमान करावा ह्मणून केलें नाहीं, याकरितां कृपा करून हा शाप मला लागणार नाहीं असें करावें. तो म्हणाला, मी शाप दिला तो दिला. तो भोगल्यावांचून सुटावयाचा नाहीं. परंतु तुझ्या विनंतीवरून मी इतकें करतों कीं, कांहीं कालपर्यंत ज्याचे वाहन तूं होशील त्याच्याच अंतकालीं स्नान केलें कीं शाप मुक्त होशील." फिरून मी ह्मणालों, "भगवान्, असेंच जर आहे तर इतकें तरी करावें कीं, शापदोषानें चंद्रावरोबर माझ्या मित्राचें जन्म मनुष्यलोकीं होणार आहे, यासाठीं अश्वजन्मांतही त्याच्याच सहवासानें माझा काळ जावा, एवढी तरी मजवर कृपा करावी. तेव्हां तो दोन घटका ध्यानस्थ होऊन ह्मणाला, "तुझें मित्राविषयीं प्रेम पाहून माझें हृदय सद्गदित झालें आहे. मीं दिव्य दृष्टीनें सर्व पाहिलें. उज्जयनींत पुत्राकरितां **तारापीड** राजा दानधर्म व अनुष्टानें करीत आहे, त्याच्या पोटीं लोकपाळ चंद्र उत्पन्न होईल, त्या राजाचाच प्रधान **शुकनास** ह्मणून आहे, त्याच्या पोटीं तुझा मित्र **पुंडरीक** जन्म येईल, आणि तूं त्या परोपकारी **चंद्रापीडाचें** वाहन होशील. असें त्याचें बोलणें संपल्याबरोबर आकाशांतून मी खालीं समुद्रांत पडलों. आणि अश्व होऊन बाहेर निघालों. अश्व योनींत ही माझें ज्ञान नष्ट झालें नव्हतें. ह्मणूनच मी किन्नरयुगुलाच्या नादीं लागून **चंद्रापीडास** या भूमीवर आणिलें. हा चंद्रापीड चंद्राचाच आवतार होय. पूर्वप्रेमामुळें अनुराग धारण करून तुजजवळ आला असतां न समजून तूं त्यास शाप दिला तो माझ्या प्रियमित्र पुंडरीकाचा अवतार होय!"

तें दुःख रूपी पुंडरीकाचें वर्तमान ऐकून **महाश्वेता** फारच शोकाकुल झाली. ती ह्मणाली, "हा प्रिया पुंडरीका! जन्मांतरीं देखील तुला माझा विसरपडला नाहीं! मजवरच तूं सारा जीव ठेवला! व शेवटीं मला शरण आलास! आणि माझ्याच तोंडाकडे पहात

असलास ना, असें असतां राक्षसीसारखी फिरून मीच तुझ्या नाशास कारण झालें ! हाय ! हाय ! जळो मला तो ब्रह्मदेव ! मला उत्पन्न करण्याचा व पुष्कळ दिवस वांचविण्याचा त्याचा हाच हेतु दिसतो कीं, फिरून फिरून मी तुला मारावें ! मी पापीण आपल्या हातानेंच हत्या करितें, तेव्हां या कामांत दुसरे कोणाला दोष देऊं ? हें दुःख मी कोणाला सांगूं व किती तरी रडूं ! कोणाला शरण जाऊं ! कोण मजवर दया करील ? हे प्रिया ! तुजवांचून मला दुसरें कोणी नाही ! प्रिय पुंडरीका ! मी सर्वस्वी अपराधी आहे ! मी आतां मागणें मागतें कीं प्रसन्न हो, आणि मजवर दया कर ! मजशीं, थोडे तरी बोल. मजकडून घातककर्म झाल्यामुळें मला बोलायाला देखील शरम वाटते ! या चांडाळणीचें पुन्हा तोंड पाहणें नको, असें मजविषयीं तुला वैराग्य उत्पन्न झालेंसें वाटतें ! ह्मणून कांहीं उत्तर देत नाहींस ! हाय हाय ! मोठें पाप घडलें !" याप्रमाणें बोलून उर बडवून तिनें पृथ्वीतलावर धाडकन आंग टाकलें.

अशी तिची अवस्था पाहून कपिंजल दयाळू होऊन म्हणाला, "गंधर्वराजपुत्री, तुझा या कामांत काय दोष आहे ? विनाकारण उगीच कां तूं आपली निंदा करतेस. सुख प्राप्तीची वेळ जवळ आली असतां प्राणत्याग करण्यास तयार झालीस हें काय ? आजपर्यंत मन घट्ट करून असह्य दुःख सोसलें, आणि आतां असें करण्याचें काय कारण ? शापदोषानें जशा गोष्टी घडून आल्या, तशा मीं सांगितल्या. चंद्राची वाणीही तुह्मीं स्वतः ऐकिलीच, तर आतां शोक करण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं. तुला व तुझ्या हृदय वल्लभाला दोघालाही अनिष्टकारक असा शोक सोडून दे. पुण्यकर्माचा जो त्वां मार्ग धरिला आहे, तोच चालू ठेव. त्यांतच कल्याण आहे. तपश्चर्येच्या योगानें काय साध्य होणार नाहीं ? देवीपार्वतीनें तपःसामर्थ्यानें दुर्लभ असें शिवाचें अर्धांग देखील मिळविलें. त्याप्रमाणेंच तूंही तपश्चर्येच्या सामर्थ्यानें लवकरच माझ्या प्रियमित्राच्या अंकावर स्थान मिळविशील !"

अशा कपिंजलाच्या बोधानें महाश्वेताचा संताप कांहीं कमी

झाला. मग **कादंबरी** फार दीन होऊन **कपिंजलास** म्हणाली, "भगवन् **कपिंजला!** आपण व **पत्रलेखेनें** या सरोवरांत बरोबरच प्रवेश केला, तर तिचें काय झालें? हें सांगण्याची कृपा करावी. तो म्हणाला, पाण्यांत पडल्यावर पुढें काय झालें, तें मला माहीत नाहीं. चंद्रावतार **चंद्रापीड** कोठें जन्मला आहे? व पुंडरीकावतार **वैशंपायन** कोठें जन्मला आहे? व **पत्रलेखेची** काय वाट झाली? हें सर्व कळण्याकरितां, त्रैलोक्यांतील सर्व वृत्तांत ज्याला प्रत्यक्ष दिसत आहे, अशा तातश्वेतकेतूच्या पायाजवळ जातों." असें बोलून तो आकाशांत गेला.

तो गेल्यावर **चंद्रापीडाकडे** पाहून दुःखामुळें ज्यांच्या डोळ्या वाटे पुष्कळ पाणी गळत आहे, असे सेवकांसह राजपुत्र तटस्थ बसले असतां **कादंबरी महाश्वेतेस** ह्मणाली, "प्रियसखी! देवानें तुझ्यासारखें मला समदुःखी केलें, ही चांगली गोष्ट झाली. आज माझा माथा उजळ झाला, आज तुला तोंड दाखवायाला व 'प्रियसखी' म्हणायालाही लाज वाटत नाहीं. तुझी मी आजच खरोखरी प्रियसखी झालें! आतां मरण्याबद्दल व जिवंत राहण्याबद्दल मला कांहीं दुःख वाटत नाहीं. तेव्हां पुढें कसें करावें? काय केलें असतां कल्याण होईल? हें मला समजत नाहीं, तर तूंच आतां काय तें सांग. तुजवांचून दुसरें कोणाला विचारावें? मला कांहींच सुचत नाहीं, मी वेड्यासारखी झालें आहे." ती म्हणाली, "यांत काय विचारायाचें आहे, आणि सांगायाचें आहे? प्रियसमागमाची आशा सुटणें कठीण आहे, तर ती जें करवील तें करावें! **पुंडरीकाचा** वृत्तांत आजच काय तो मला **कपिंजलाच्या** तोंडानें कळला. पूर्वीं काय तें आकाशवाणीकडून नुस्तें आश्वासन मात्र मिळालें होतें, तरी देखील मला काय करावें तें सुचेना, तें तर मग कसें करूं ह्मणून तूं काय विचारतेस? विश्वासस्थान असें **चंद्रापीडाचें** शरीर पडधडीत तुझ्या मांडीवरच आहे. तर आतां चिंता कशाला पाहिजे? आतां हें जोंपर्यंत अविनाशी आहे, तोंपर्यंत याची सेवा सोडून दुसरें काय करायाचें? प्रत्यक्ष दिसत नाहींत अशा मृतिका-

दिकांच्या देवाच्या प्रतिमा पूजल्या असतां जर कल्याण होतें, तर हा प्रत्यक्ष देव चंद्र याचें आराधन केलें तर हा प्रसन्न होणार नाहीं, असें कसें होईल ?"

असे महाश्वेतेचें भाषण ऐकून **कादंबरी** मुकाट्यानें तेथून उठली, आणि **तरलिका** व **मदलेखा** यांच्या सहाय्यानें **चंद्रापीडाचें** शरीर तेथून उचलून जेथें थंडी, वारा, ऊन व पाऊस लागत नव्हता, अशा शिलातलावर नेऊन ठेविलें. आणि अंगावरील शृंगार वेष काढून मंगलसूचक रत्नजडित कंकण मात्र हातांत ठेवलें. नंतर विड्यानें तोंड रंगलें होतें तें वारंवार स्वच्छ धुऊन टाकिलें आणि स्नान करून तिनें धौतवस्त्रें धारण केलीं, जो कधीं मनांत आला नाहीं, ज्याची कल्पना झाली नाहीं, असा अपूर्व प्रकार दुर्दैवानें घडवून आणिला ! योजलें होतें काय, आणि झालें काय ! ह्मणून तिच्या नेत्रावाटें अश्रुधारा चालल्या. जीं सुगंधि पुष्पें, सुगंधि द्रव्यें, चंदन, इत्यादि द्रव्यें तिनें संभोग सुखाकरितां आणिलीं होतीं, तीं अशा स्थितींत **चंद्रापीडाच्या** पूजेकरितां त्यानें तिजकडून लाविलीं ! तेव्हां तिला फारच दुःख झालें ! प्रत्यक्ष शोकमूर्तिच अशी **कादंबरी चंद्रापीडाच्या** मुखाकडे पाहत तटस्थ बसली. तिनें आपला शोक आवरून धरिला. तेव्हां ती स्थिति तिला मरणापेक्षां देखील अधिक दुःखकारक वाटली. मग **चंद्रापीडाचे** पाय आपल्या मांडीवर घेऊन त्या दिवशीं कांहीं एक न खातां तशीच बसली. दुरून आल्यामुळें थकलेले राजपुत्र व सेवकही जेवणखाण वगैरे कांहीं एक न करितां सर्व दिवसभर तसेच उपाशीं राहिले.

रात्र झाली तेव्हां अंगास शहरे उत्पन्न करणाऱ्या अशा गंभीर मेघगर्जना होऊं लागल्या. त्या ऐकून मयूरांनींही शब्द करून तें ठिकाण दणाणून दिलें. बेडुकांच्या डरांव डरांव शब्दांनीं कान बहिरे केले. विद्युल्लता इतक्या चमकूं लागल्या कीं, त्यांकडे पाहवेनासें झालें. विजा कडकडत पडूं लागल्यामुळें सर्व भुवन भयभीत झालें. देदीप्यमान असे काजवे अंधकारांत चमकत होते यामुळें व अतिशय काळोख पडल्यामुळें रात्र फारच भयंकर दिसत होती, स्त्री

स्वभावास फारच भिति करणारी अशी जरी ती रात्र होती तरी कादंबरीनें चंद्रापीडाचे चरण सोडीले नाहींत, व क्लेशासही जुमानले नाहीं. सर्व रात्रभर ती जागतच बसली.

प्रातःकाळ झाल्यावर कादंबरी चंद्रापीडाकडे पाहूं लागली, तों एखाद्या रंगवलेल्या सुंदर चित्राप्रमाणें त्याचें शरीर तिच्या दृष्टीस पडलें. मग त्यावरून हात फिरवून, मदलेखाजवळ बसली होती तीस हाक मारून ती ह्मणाली, ही तनु इतकी सुंदर तेजस्वी दिसते, ही कां माझी प्रीति हीवर असल्यामुळें दिसते? कांहीं अविकारी असल्यामुळें अशी दिसते कोण जाणे! तर तूं तरी नीट लक्ष्य देऊन पहा बरें. ती ह्मणाली, प्रियसखी, काय पाहायाचें आहे? आत्म्याचा वियोग असल्यामुळें इंद्रिय व्यापार मात्र बंद आहे. बाकी सर्व जसेंचें तसेंच कायम आहे. तोंडावरील तजेला थोडा देखील कमी झालेला दिसत नाहीं. शरिराची कळाही कमी झाली नाहीं. वाऱ्यानें हालणारा केशकलापही तसाच दिसतो आहे. अर्धचंद्रासारख्या ललाटाची कांतिही जशीची तशीच दिसते आहे. नीलकमलाची कांति हरण करणारे, थोडे मिटलेले मात्र, बाकी जसेचे तसेच, डोळे दिसताहेत. मुखही तसेंच हंसरें दिसतें आहे. अधरोष्ठ कसा पल्लवासारखा लाल दिसतो आहे. हातपायही कसे पोवळ्यासारखे तांबडे लाल दिसत आहेत. सर्व शरिराचें सौकुमार्य व सौंदर्य कांहींएक कमी झालेलें दिसत नाहीं. तेव्हां आपण आकाशवाणी ऐकिली ती खरीच होय. कपिंजलानें सांगितलेला शापवृत्तांत सर्व खराच आहे. असें मदलेखेचें भाषण ऐकून कादंबरीला फार आनंद झाला. मग तिनें महाश्वेतेला चंद्रापीडाचें शरीर दाखविलें, व त्याच्या चरणकमळाकडे पाहून ज्यांनीं जीवित धारण केलें होतें अशा राजपुत्रांसही दाखविलें.

तें पाहून त्या राजे लोकांना मोठें आश्चर्य वाटलें. मग सर्वांनीं आपलें मस्तक भूईला लावून चंद्रापीडाला नमस्कार केले, आणि पृथ्वीवर गुडघे टेकून हात जोडून ते कादंबरीस ह्मणाले, "देवी, हा सर्व देवीचा महिमा होय. आम्हां पातक्यांला सोडून देव दूर गेला

असतां चंद्रासारखें तेजस्वी त्याचें मुख दिसतें आहे! प्रफुल्ल कमलांसारखे चरणही तसेच दिसत आहेत. हृदयही जसें काय प्रसन्नच दिसतें आहे! ह्या जगांत कोणाचें असें कोणी कधीं तरी पाहिलें आहे का? किंवा ऐकिलें आहे का? कोठें तरी असा अनुभव आहे का?" असें राजेलोकांचें भाषण ऐकून आपल्या परिवारासह **कादंबरी** उठली आणि देवपूजेकरितां स्वतः पुष्पें तोडून आणून तिनें स्नान केलें. नंतर **चंद्रापीडाची** पूजा करून तिनें सर्व राजेलोकांस स्नान व भोजन करण्यास सांगितलें. पुढें **महाश्वेतेनें** फळें आणिलीं तीं तिच्यासहित व सर्व परिवारासहित **कादंबरीनें** भक्षण केलीं. फळाहार झाल्यावर फिरून **चंद्रापीडाचे** पाय मांडीवर घेऊन तोही दिवस तिनें घालविला. तिसरे दिवशीं **चंद्रापीडाच्या** शरीराचा नाश न होण्याविषयीं तिची पक्की खातरी होऊन **मदलेखेस** म्हणाली, "महाराजाच्या शरीराची सेवा करीत शाप संपेपर्यंत येथें आम्हांस अवश्य बसलें पाहिजे, तर तूं आतां हा अद्भुत वृतांत माझ्या आईबापांस जाऊन सांग, म्हणजे त्यांच्या मनांत मजविषयीं भलतीच कल्पना घेऊन ते दुःखी होणार नाहींत. अणखी जसे ते येथें येणार नाहींत व दुःख भोगणाऱ्या मला पाहणार नाहींत असें कर. आईबापांला पाहिल्यावर मला शोक आवरणार नाहीं. याकरितां हृदयवल्लभ गतप्राण झाला तेव्हां देखील मी रडलें नाहीं, तर मग ज्याच्या जीवितप्राप्तीविषयीं संशयच राहिला नाहीं, त्याच्याकरितां आतां रडण्याचा प्रसंग कशाला पाहिजे? असें बोलून तिनें तिला पाठविलें.

**मदलेखा** तिकडे जाऊन परत आल्यावर **कादंबरीस** म्हणाली, प्रियसखी, तुझ्या मनाप्रमाणें सर्व झालें. तुझा पिता चित्ररथ व माता मदिरा यांनीं तुला आशीर्वाद सांगून असें म्हटलें कीं, ही गोष्ट आम्हांला माहीत नव्हती. जावयासह तूं आमच्या दृष्टीस पडशील, असें आम्हास वाटलें नव्हतें. प्रियकन्येनें स्वतः प्रियपति वरला, हें पाहून आम्हांस फार आनंद झाला; आणि तोही असा तसा नव्हे तर प्रत्यक्ष भगवान् लोकपाल जो चंद्र त्याचा अवतार! मग काय

पाहिजे? कांहीं दिवसांनीं शाप संपला ह्मणजे जांवयासहित तुझें सानंद मुखकमल पाहण्यास आह्मी येऊं. असें तिचें भाषण ऐकून कादंबरीस बरें वाटलें. मग देवाप्रमाणें चंद्रापीडाची सेवा करीत ती बसली.

पुढें वर्षाकाळ संपला. मेघडंबर गेल्यामुळें बंधनांतूनच काय सर्व प्राणी मोकळे झाले. सर्व दशदिशा प्रफुल्लित दिसूं लागल्या. शेतांतील साळी वगैरे धान्यें कणसांच्या भारानें वांकून त्यावर फुलवरा आल्यामुळें ग्रामसीमा पिंगट रंगाच्या दिसूं लागल्या, तृणपुष्पें फुलल्यामुळें अरण्यें पांढरीं शुभ्र दिसूं लागलीं. झाडांखालच्या जागा सुकल्यामुळें त्या बसण्यासारख्या झाल्या. स्थलकमलें प्रफुल्लित होऊं लागल्यामुळें रानांतील डबकीं मनोहर दिसूं लागलीं. पुष्पसुगंधानें भरलेल्या व शीतल अशा रात्रीं प्राप्त झाल्या. निर्गुंडी वगैरे रानांतील पुष्पांचा सुवास ग्रहण करून वायु वाहूं लागले. अति रमणीय चंद्रप्रकाश पडूं लागला. प्रफुल्लित कमलांचे पराग पडूं लागल्यामुळें सरोवरें सुगंधयुक्त झालीं. पाणी उतरत चालल्यामुळें बारीक व स्वच्छ रेती पसरत जाऊन नद्यांचीं तीरें पांढरीं व चकचकीत दिसूं लागलीं. अनायासानें तरून जाण्यासारखे नद्यांना उतार झाले. रस्त्यावरील चिखल सुकून गेले. जागजागीं मोठमोठालीं गवतें वाढलीं होतीं, त्या मधून वांकड्या तिकड्या बारीक बारीक पाऊल वाटा पडूं लागल्या. मोठमोठ्या रस्त्यानें लोकांची रहदारी सुरू झाली. जमीनी सुकल्यामुळें घोड्यांनाही चांगले चालतां येऊं लागलें.

असा काल प्राप्त झाल्यावर एके दिवशीं मेघनाद येऊन कादंबरीस ह्मणाला, देवी, युवराजाला फार दिवस लागले ह्मणून घाबरून तारापीडमहाराजांनीं दूत पाठविले, ते आले आहेत. ते जवळ आले असतां देवीस आणखी शोक होईल, तो नव्हावा ह्मणून, आह्मीं त्यांस झालेलें सर्व वर्तमान सांगून ह्मटलें, देव चंद्रापीड किंवा देवी कादंबरी यांना कांहीं तुमच्यापाशीं निरोप सांगायाचा आहे असें कांहीं नाहीं, तर तुह्मी आपले परत जाऊन हें वर्तमान तारा-

पीड महाराजांस सांगावें. तेव्हां ते रागावून ह्मणाले, तुह्मी जें ह्मणतां तें ठीकच, परंतु आज आमचें किती दिवसांचें प्रेम, भक्ति व देवाला पाहण्याविषयीं उत्कंठा हीं आम्हास दर्शन घेतल्याखेरीज जाऊं देत नाहींत. नुसती बातमी घेऊन जायाचें, एवढेंच आमचें काम असतें तर तुह्मी ह्मणतां तें ठीक होतें. मग तुह्मीं जो निरोप सांगितला, तो घेऊनच आह्मी परत गेलों असतों. परंतु तसा प्रकार नाहीं. देवाच्या दर्शनास अयोग्य इतके पातकी आम्ही नाहीं. देवाची चरणसेवा करून आम्ही पवित्र झालेलों आहों. देवाचें, पाद वंदन केल्यावांचूनच जा ह्मणतां, असें आम्ही आजच महापातक केलें आहे काय? आह्मी देवाच्या चरणाचे रजःकण आहों. याक-रितां देवीस आमची विनंति सांगावी कीं, देवदर्शन घेण्याची आह्मांस परवानगी मिळाली असतां इतक्या लांब येण्याच्या श्रमाचें सार्थक्य होईल. नाहीं तर इतके दूर येऊन देवाचें शरीर पाहिल्यावांचून तसेच गेलों तर तारापीड महाराज तरी आम्हांला काय ह्मणतील. व आह्मी तरी त्यांना काय विनंति करावी? इतक्यावर देवीची मर्जी! असें बोलून मेघनाद उगीच बसल्यावर कादंबरीनें आलेल्या लोकांस अश्वासन दिलें आणि आपल्या सासरच्या माणसांची भक्ति पाहून ती आपल्या ठिकाणीं फारच कष्टी झाली आणि कंठ दाटून आल्यामुळें फार वेळ एक शब्दही तिच्या तोंडांतून निघेनासा झाला. मग ती ह्मणाली, 'त्यांचें ह्मणणें खरेंच आहे. ते गेले ना-हींत हें ठीक झाले. ते इतक्या लांब येऊन देवदर्शन घेतल्यावांचून गेले असते, तर त्यांनीं काय सांगितलें असते बरें? हा अलौकीक वृत्तांत प्रत्यक्ष पाहिला तरी देखील खरा वाटत नाहीं, तर सांगो-सांगी कोठून खरा वाटणार? वरपंगी प्रीति करणारे, असे आपण जर दर्शनाचा लाभ घेतों, तर मग देवापेक्षां ज्यांना आपला जीव देखील प्रिय नाहीं, व देवाला जीव कीं प्राण समजणारे अशा लोकांना भक्तीनें देवदर्शन घेऊं देऊं नये, हा चमत्कारच नव्हे का? तर त्यांना लौकर घेऊन यावें. दर्शन घेऊन ते आपल्या इतक्या लांब येण्याच्या श्रमाचें व नेत्रांचें साफल्य करोत, आणि नंतर

जावोत.' अशी आज्ञा होतांच मेघनाद त्यांस घेऊन आला. चंद्रापीडास पाहतांच अश्रुपातासह त्यांनीं भूतलावर नमस्कार घातले; आणि त्याच्या पादकमलाकडे एकसारखी दृष्टि देऊन भक्तिपूर्वक पाहत बसले. कादंबरी ही त्यांच्या भक्तिभावाकडे लक्ष देऊन एकसारखी पहात होती. मग ती त्यांस ह्मणाली, "सज्जनहो, अति स्नेहामुळें तुम्हांस शोक झाला तो ठीकच; परंतु आतां त्याचा त्याग करा. ज्याचा परिणामही दुःखरूपीच अशाबद्दल शोक केला तर असो, परंतु हा प्रकार कांहीं तसा नाहीं. याचा शेवट गोड होणार असल्यामुळें त्याबद्दल इतकें वाईट वाटूं देऊं नका. हा इतका विलक्षण प्रकार घडून आला आहे कीं, केवळ शोक करण्याला जागा नाहीं इतकेंच नाहीं, तर उलटें आश्चर्याला कारण झालें आहे. तुम्हांस याविषयीं विशेष फोड करून सांगायाला पाहिजे असें नाहीं. सर्व प्रत्यक्ष दिसतेंच आहे. मनुष्यामध्यें अशी गोष्ट घडलेली तुह्मीं कधीं पाहिली आहे काय? हें पूर्वींप्रमाणेंच तेजःपुंज देवाचें मुख तुह्मीं पाहतच आहां, तर ही जी टवटवी दिसत आहे ती जीवांशा वांचून उगीच दिसेल, असें तुम्हास वाटतें का? तर आतां इकडील वार्ता ऐकण्याविषयीं उत्कंठित झालेल्या अशा तारापीड महाराजांच्या पायांजवळ तुह्मीं जावें. देव जीवित रहित झाला आहे; तथापि फिरून सजीव होणार आहे, असें कांहीं तुह्मीं त्यांना सांगूं नये. आमची व त्यांची भेट झाली व ते अच्छोदसरोवराजवळ आहेत. इतकें सांगा ह्मणजे झालें. कारण, मेलेला प्राणी फिरून जिवंत होणार ही गोष्ट कोणालाही खरी वाटणार नाहीं. याकरितां दूर राहिलेल्या वडील माणसांस मरणसंशयांत सोडून देण्याचें प्रयोजन नाहीं. प्राणेश्वर जीवंत झाल्यावर वडील माणसांस व सर्व लोकांस हा वृत्तांत कळेलच." त्यांनीं विनंति केली कीं, "आम्ही परत गेलों नाहीं, किंवा गेल्यावर मुके बसलों, तरच ही गोष्ट गुप्त राहील, परंतु हीं दोन्हीं आमच्या हातून होणार नाहींत. कारण, युवराज व वैशंपायन यांचें कांहींच वर्तमान समजत नाहीं, ह्मणून ज्यांनीं आह्मांस बुध्या पाठविलें अशा तारापीड

महाराजास, देवीविलासवतीस, आर्यशुकनासास व मनोरमाबाईस हें वर्तमान कळविल्यावांचून आमच्यानें राहवणार नाहीं. व आमच्या देहांत प्राण आहेत तोपर्यंत आह्मांला गेल्यावांचूनही राहवणार नाहीं. बरें गेल्यावर प्रियपुत्रांचें वर्तमान ऐकण्याविषयीं आतुर झालेल्या त्या सर्वांचीं नेत्रोदकांनीं भरलेलीं मुखें पाहिल्यावर सानंदवृत्ति दाखविणें आमच्यानें कोठून होणार" अशी त्यांची विनंती ऐकून कादंबरी मेघनादास ह्मणाली, "मेघनादा, मायेच्या माणसांकडून हें होणें नाहीं खरें. वडिलांस दुःख होऊं नये ह्मणून मीं तसें ह्मटलें. त्यांना साधारण दुःख असलें तरी मोठें वाटतें; मग हें वज्रपातासारखें दुःख कसें सोसेल तें सोसो. असो; याला उपाय नाहीं. ज्यानें हा सर्व वृतांत पाहिला आहे, व ज्याच्या बोलण्याचा भरंवसा वाटेल, असा एखादा विश्वासाचा मनुष्य यांच्या बरोबर पाठवावा, ह्मणजे वडील माणसांस कांहीं भरंवसा वाटला तर वाटेल." तो ह्मणाला, राजेलोक तर देवचरण सोडून जात नाहींतच. परंतु सर्व सेवकांनींही असाच निश्चय केला आहे कीं, कंदमूलफळें खाऊन येथें रहायाचें; देवचरण सोडून हालायाचें नाहीं. यालाच ह्मणावें सेवक. संपत्ति किंवा विपत्ति प्राप्त झाली असतां जे समान राहतात, कितीही वैभवास चढविलें असतां नम्रपणानें वागतात, कांहीं ह्मटलें तरी तोंडाला तोंड देत नाहींत; स्तुति केली असतां चढत नाहींत; कांहीं करायाला सांगितलें असतां मागें पुढें पाहत नाहींत; विचारिलें असतां, हिताच्या गोष्टी सांगतात; सांगण्याच्या पूर्वींच काम करण्यास तयार असतात, काम केलें असतां प्रौढी मिरवीत नाहींत, पराक्रम केलें असतां आत्मप्रशंसा करीत नाहींत; स्तुतिकेली असतां सलज्ज होतात; युद्धांत ध्वजासारखे पुढें होतात; बक्षिसें देण्याच्या वेळेस मागें राहतात. आपल्यावरच स्नेह असावा असें मनांत आणित नाहींत; स्वामिकार्यासाठीं मरणाला देखील भीत नाहींत; स्वगृहापेक्षां स्वामिच्या पायांजवळ सुख मानितात. मनास वाटेल तसें करीत नाहींत; स्वामिसेवेचेंच त्यांना व्यसन असतें फार काय? ज्याची इंद्रियें सुद्धां त्याच्या स्वाधीन नसतात, तर स्वामीच्या

स्वाधीन ठेवितात; डोळस असून अंधळ्यासारखे राहतात; ऐकूं येत असून बहिऱ्यासारखे, बोलके असून मुक्यासारखे, आणि जाणते असून अज्ञानासारखे वागतात. पुरुष असून नपुंसकासारखे राहतात, आपल्या मनानें कांहीं एक करीत नाहींत; यजमानाच्या चित्ताच्या अनुरोधानेंच वागतात; असे असतील तेच सेवक. तर हे सर्व सेवकजन तसेच आहेत. युवराजाप्रमाणेंच देवींची आज्ञा आह्मांस मान्य आहे, व आज्ञेप्रमाणें करण्यास आह्मी सिद्ध आहों. असें बोलून **मेघनादानें त्वरितक** नांवाचा सेवक बोलावून आणून त्यास त्यांजबरोबर पाठविलें.

इकडे फार दिवस झाले तरी कांहींएक वर्तमान समजलें नाहीं; ह्मणून घाबरी होऊन,**चंद्रापीडानें** लवकर यावें; ह्मणून देवी **विलासवती** अवंतीनगरीच्या देवतांची पूजा करण्याकरितां गेली. तों इतक्यांत सेवक लोक गडबडीनें धांवत आले व ह्मणाले, राणी साहेब! आपण थोर नशिबाच्या आहां. अवंती देवी आपणाला प्रसन्न झाली; **युवराजाच्या** समाचाराकरितां गेलेले लोक परत आले! हे शब्द एकाएकीं कानीं पडल्याबरोबर तिच्या नेत्रांतून आनंदाश्रु चालले आणि पाडस नाहींसें झालें म्हणजे जशी मृगी घाबरते तशी चंचलदृष्टीनें इकडेतिकडे ती पाहूं लागली, आणि ह्मणाली, "वाणीच्या मिषानें कोणी मजवर अमृतवृष्टि केली हो? कोणीं ही दया केली? कोणीं त्यांना पाहिलें? ते किती लांब आहेत? माझा बाळ खुशाल आहे ह्मणून त्यांनी सांगितलेंना? असें ह्मणून ती इकडेतिकडे पाहूं लागली तों उज्जयिनींतून पुष्कळ लोकांचे थवे बाहेर पडले. सर्व शहरच बाहेर लोटलेंसें दिसलें. कित्येक विचारूं लागले, **युवराजाची** स्वारी आलीकां? त्याला कोणत्या ठिकाणीं तुह्मी मागें टाकलें? तो किती दूर आहे? इतके दिवस तो कोठें होता? कोणत्या ठिकाणीं तुह्मीं त्याला पाहिलें? एवढा वर्षाकाल नुसत्या घोड्याच्या पाठीवर त्यानें कोठें घालविला? पर्जन्यकाळांत त्याचे फारच हाल झाले असतील, नाहीं बरें? हें सर्व **त्वरितकाला** माहित असेल. कोणी ह्मटलें, हें समजून तरी काय करायाचें आहे? कायहो! ज्या करतां

**युवराजानें** इतके क्लेश भोगिले तो **वैशंपायन** तरी भेटला का पण? त्याला परत आणिलें तरी का? **पत्रलेखे**सहित मेघनादाची आणि त्याची भेट झाली का? कोणी विचारितो, देववर्धनानें मला कांहीं निरोप पाठविला आहे का? तो तर माझा परममित्र! बळेंच हट्टानें गेलेल्या बालधर्माचें वर्तमान विचारण्यास तर मला भयच वाटतें! त्याला युवराजानें प्रसन्न होऊन दिलेला घोडा बरा आहे ना? सर्व स्वारांचा मुख्य अशा आमच्या पृथुवर्मामामाचें कृपा करून कोणी कुशल वर्तमान सांगा बरें? पर्जन्यकाळामुळें घोडेस्वारांना फारच क्लेश भोगावे लागलेसें दिसतें. घोडेस्वारांचा मुख्य नायक अशा अश्वसेनाचें कुशल आहेना? तो आमचा सासरा आहे. आमच्या बापानें तुमच्या हातीं पत्र किंवा निरोप धाडिला नाहीं याचें मोठें आश्चर्य वाटतें! माझा बंधु **भरतसेन युवराजा**जवळ असतो, तो तुह्मी कोणी पाहिला का? सेवकांसहित **भद्रसेन** सेनापति खुशाल आहेना? त्याला स्वामीची सेवा करण्याचेंच व्यसन आहे असा माझा पुत्र **कुमारवर्मा** तेथें आहेना? सेनापतीच्या जाग्याकरितां **युवराजाच्या** पाठीस लागलेल्या अनंतसेनाचें कसें काय आहे? हल्लीं **युवराजाची** परमप्रीति कोणावर आहे? **वर्द्धमानाची** पूर्वीप्रमाणें मानमान्यता आहेना? इतके दिवस तुम्ही गेलां होतां, तर काय प्राप्ति झाली? **सर्वसेनाख्या** मुलाचें **वीरसेनाचें** काय वर्तमान आहे? बाप मेल्यामुळें पहिल्यानेंच तो घर सोडून बाहेर पडला, नुकताच पति वारल्यामुळें दुःखित अशा त्याच्या आईनें तर खाणेंपिणेंही सोडून दिलें, ती वांचती का नाहीं कोण जाणें? असें अनेक प्रकारें लोक विचारीत होते तथापि कोणास कांहीं एक उत्तर न देतां परत आलेले लोक दीनमुद्रेनें समोर पहात मुकाट्यानें चालले होते. मार्गश्रमानें थकल्यामुळें ते मोठ्या कष्टानें चालत होते. त्यांच्या अंगावर मलिन वस्त्रें होतीं. स्नानादि संस्कार नसल्यामुळें त्यांचे देह मळकट दिसत होते. रस्त्यांतील धूळ उडाल्यामुळें त्यांचे केश चिकटून गेले होते; त्यांची चर्या दुःखानें खिन्न दिसत होती. असे त्वरितकासहित सर्व सेवक चालले आहेत,

असें विलासवतीच्या दृष्टीस पडलें. मग तिनें देवालयाच्या पटांगणांतच त्या आलेल्या लोकांना बोलावून आणण्यास सांगितलें.

एकाएकी विलासवती दृष्टीस पडल्यामुळें त्या लोकांचें दुःख दुणावल्यासारखें झालें. मग लुटलेल्यासारिखे, देहभानावर नसल्यासारखे, काष्ठासारिखे, निर्जीवासारिखे असे ते लोक येऊं लागले. त्यांस पाहून अश्रुधारा चालल्यामुळें जिला कांहीं दिसेनासें झालें आहे, अशी विलासवती पडतझडत त्यांच्यासमोर जाऊन त्यांनीं नमस्कार करण्या पूर्वींच सद्गदित वाणीनें म्हणाली, अहो बाबांनो, माझ्या बाळाचें वर्तमान मला अगोदर सांगा बरें! माझें मेलें मन तर भलतेंच चिंतितें आहे! माझा बाळ खुशाल आहेना पण? तुम्हीं त्याला पाहिलें ना? असें विचारिल्यावर त्यांनीं नमस्काराच्या मिषानें खालीं तोंडें घातलीं, आणि ते अश्रु ढाळीत बसले. मग मोठ्या कष्टानें वर तोंडें करून त्यांनीं विनंति केली. राणी साहेब! अच्छोदसरोवराच्या तीरावर युवराजाला आम्हीं पाहिलें. बाकीचें सर्व वर्तमान हा त्वरितक सांगेल. तें ऐकून विलासवतीच्या पोटांत धस्स झालें, आणि शोकानें व्याकूळ होऊन म्हणाली, पुढें हा दीन बापडा काय सांगणार आहे, तें दिसतच आहे! कांहीं एक आनंदाचें चिन्ह नाहीं. उलटलेख आणल्याची कांहीं खूण नाहीं. तोंडें उतरून गेलीं आहेत, व बळेंच अश्रु दाबून धरिलेले आहेत इत्यादि चिन्हांवरूनच जें सांगायाचें तें तुम्हीं सांगितलेंच, आतां सांगायाचें काय राहिलें आहे? हा बाळा! चंद्रापीडा! चंद्रसुंदरा! चंद्रशीतला! नयनानंदा! चंद्रासारखा आनंद देणारा असा तूं कोठें गेलास? असें काय तुला झालें! कशाकरितां तूं आला नाहींस? बाळा! चंद्रापीडा मी तुला रागानें बोलते असें नाहीं! तर दुःखानें तुला असें ह्मणतें! 'मी लवकर येईन, फार दिवस लावणार नाहीं,' अशी तूं मजजवळ प्रतिज्ञा केलीसना? तेव्हां क्षणभर ही तुला दुसरीकडे राहणें योग्य नव्हतें. तूं जाऊं लागलास तेव्हांच या मेल्या मनानें शंका घेतली कीं, बालकाचें मुख फिरून दृष्टीस पडणें कठीण! माझ्या मनांत नव्हतें, परंतु तुझाच जाण्याचा आग्रह

दिसला! त्याला मी काय करूं? बाळा! यांत तुजकडे काय दोष आहे? या हतभागिणीच्या पातकाचे हे सर्व खेळ आहेत. या जगांत पापिणी ही पुष्कळ असतील. पण मजसारिखी एकही नसेल! जिला एकटा बाळक होता तोही दुर्दैवानें हिरावून नेला! मेल्या दैवानें मला सर्वस्वी नागविलें! बाळा! तुझ्या मी येथूनच पायां पडतें! मजकरितां एक वेळ माघारीं ये! आईग! ह्मणून हाक मारीत असतां तुझ्या तोंडाकडे पाहण्याची मला मोठी हौस वाटते! ती पुरी कर! बाळा! आतां तूं मला दुर्लभ झालास! आतां जन्मापासून कशा कशाची आठवण करून मी शोक करूं? कां बालपणाचें कौतुक आठवून हाका मारूं? कां तरुणपणामुळें सुंदर दिसणारी तुझी रूपशोभा मनांत आणून शोक करूं? किंवा तूं राज्य पदारूढ होणार त्या वेळचें ऐश्वर्य लक्ष्यांत आणून शोक करूं? काय करूं तरी काय? हृदयांत राहणाऱ्या बाळा, तुजवांचून आई खुशाल आहे, असें समजूं नको? तुजवांचून आजपर्यंत जिवंत राहून तुझ्या बापाला मीं आपलें तोंड कसें दाखविलें? याचें मोठें नवल वाटतें! हें कां तुझ्या प्रीतीमुळें, का तुझी ती आकृति मूर्तिमंत डोळ्यापुढें दिसते ह्मणून, का स्त्रियांच्या स्वभावांत स्वाभाविक मूर्खपणा असतो ह्मणून? कशानें असेल तें असो. अझून देखील तुझें असें विपरीत झालें असेलसें माझ्या मनाला वाटत नाहीं. नाहीं तर केव्हांच हृदय फुटून त्याचे हजारों तुकडे झाले असतें! त्वरितक काय सांगेल कोण जाणें! त्याजपासून वर्तमान ऐकणें मला नकोसें वाटतें! जें ऐकवणार नाहीं तें न ऐकिलें तेंच बरें! त्वरितका! काय ह्मणतोस? पुत्र स्नेहाला अयोग्य व लज्जाकारक असला शोक काय कामाचा? बरें तर ठीक आहे! ही पहा मी तुझ्या पुढें येऊन बसलें! मी कांहीं रडत नाहीं! तर सांग बाबा आतां बालकाचें काय वर्तमान आहे तें! असें बोलत असतां तिला मूर्छा आली. तेव्हां जवळच्या सख्यांनीं तिला सांवरून धरिलें.

पुढें विलासवतीचे कित्येक सेवक धांवत जाऊन त्यांनीं तें वर्तमान तारापीडास सांगितलें. तेव्हां मंथनकाळीं मंदरपर्वताच्या हिस-

क्यांनीं समुद्र जसा खवळला, तशी राजाची स्थिति झाली. मग तो मोठ्या घाबरेपणानें व गडबडीनें उठून शुकनास प्रधानासहित त्यावेळीं तयार असलेल्या चपल हत्तीणीवर बसून वेगानें राजमार्गाचें आक्रमण करीत चालला. तें पाहून 'हें काय आहे?' म्हणून सर्व नगरभर गलबला होऊन राजाच्या मागोमाग सर्व लोक धांवत गेले. तो अवंतीमातृकांच्या देवळाजवळ उतरून जेथें विलासवती होती, तेथें गेला. त्या ठिकाणीं तोंड खालीं घालून विलासवती बसली होती. तिच्या डोळ्यांवाटें अश्रुधारा चालल्या होत्या, अंगावर सख्या चंदनाचा रस शिंपडीत होत्या, केळीच्या पानानें तिला वारा घालीत होत्या, व पाण्यानें हस्तपल्लव गार करून तिचें अंग रगडीत होत्या. अशा उपायांनीं मोठ्या कष्टानें ती थोडीशी सावध होऊन तिनें किंचित डोळे उघडले होते. उष्णकाळांतल्या कमळिनीप्रमाणें ती अगदीं सुकून गेल्यासारखी दिसत होती. तिला पाहून राजाच्या डोळ्यांवाटें अश्रुबिंदु पडले. तेव्हां विलासवतीची पुरती मूर्च्छा जावी म्हणून तो तिजवर नेत्रोदकच शिंपडतो आहे काय! असें वाटलें. मग तो तिजजवळ बसून स्पर्शामृताचा वर्षाव करणाऱ्या अशा आपल्या हातानें तिच्या सर्व अंगावरून हात फिरवून सद्गदित होऊन म्हणाला, "देवी, चंद्रापीडाचें भलतेंच वर्तमान असेल, तर आपल्याला प्राण ठेवायाचे नाहींत. मग बाळाकरितां इतरांप्रमाणें आपल्या जिवाला कां उगीच कष्टवितेस? सुख जितकें लागावयाचें होतें, तितकें लागलें. यापेक्षां अधिक सुख कोठून मिळणार? कितीही आपण ऊर बडवून घेतला म्हणून जें मिळायाचें नाहीं तें सुख कोठून मिळणार! प्राक्तन म्हणून जें आहे त्याला जसें आवडतें तसें तें करितें! तें कोणाच्या स्वाधीन नाहीं; सर्व त्याच्या स्वाधीन आहेत. तथापि कोणतें सुख आपल्याला मिळालें नाहीं? बाळकाचा अति दुर्लभ जन्मोत्सव पाहिला, त्याला मांडीवर घेऊन त्याचें मुखकमल पाहिलें, तो उताणा निजला असतां त्याचें मुके घेऊन त्यास डोक्यावर घेतलें! गुडघ्यांनीं रांगतांना धुळीनें अंग भरवून मांडीवर येऊन बसला असतां त्याच्या अंगाचें स्पर्शसुख घेतलें! त्याचें मनोहर बोबडे

बोबडे बोल कानांनीं ऐकिले. त्याची बाळलीला पाहिली. त्यानें विद्या संपादन केल्यामुळें हृदय आनंदयुक्त झालें. तरुणपणांत आल्यामुळें अमानुष अशी त्याची शोभा व शक्ति दृष्टीस पडली. यौवराज्यपदीं अभिषेक झाला त्यावेळीं त्याच्या मस्तकाचें अवघ्राण केलें. दिग्विजय करून आल्यावर नमस्कार करीत असतां बाळाचें आलिंगन केलें. आतां एवढीच काय ती गोष्ट राहिली कीं, त्याला स्त्रीयुक्त पाहून व राज्यपदीं स्थापन करून आपण तपोवनांत जाऊन राहावें. परंतु सर्व गोष्टी मनाप्रमाणें होणें, हें मोठ्या पुण्याचें काम आहे तर तें आपल्याजवळ कोठें आहे? बरें, बालकाचें काय वर्तमान आहे, ते तरी आपल्याला अजून कोठें पुरतें समजलें आहे? सेवकाच्या तोंडावाटें असें कळलें कीं, आह्मी इकडून जासूद पाठविले होते यांजबराबर **चंद्रापीडाचा** बालसेवक **त्वरितक** आला आहे; त्याला सर्व वृत्तांत माहीत आहे. त्यालाही तूं अजून विचारिलें नाहीं. याकरितां त्याला आपण आधीं विचारूं. नंतर जीवित ठेवायाचें किंवा सोडायाचें तें करूं." याप्रमाणें राजाचें भाषण झाल्यावर, द्वारपालानें सेवकाच्या आड **त्वरितक** होता त्यास जवळीनें बोलावून आणिलें. तो राजाला लवून प्रणाम करित आहे तों "हा **त्वरितक** आला, महाराज," असें द्वारपालानें सांगितलें.

त्यास पाहून **चंद्रापीडाचा** हा प्रियसेवक म्हणून राजानें 'बाबा असा जवळ ये!' असें बोलून त्याच्या मस्तकाला स्पर्श केला आणि म्हणाला, "**त्वरितका**, सांग बरें बालकाचें काय वर्तमान आहे तें. मीं, त्याच्या आईनें, व प्रधानानें त्याला लवकर येण्याविषयीं लिहिलें असतां तो कां आला नाहीं? न येण्याचें कारणही त्यानें कांहींच लिहिलें नाहीं." मग **त्वरितकानें** पहिल्यापासून सर्व घडलेलें वर्तमान सांगण्यास आरंभ केला. सांगतां सांगतां '**चंद्रापीडाचें** हृदय विदीर्ण झालें,' येथपर्यंत वर्तमान येतांच दुःखानें राजा फार घाबरा झाला, आणि हात पुढें करून दीनस्वरानें म्हणाला, पुरेकर बाबा, आतां बस्स झालें! जें सांगायाचें तें सांगितलें! ऐकायाचें तेंही ऐकिलें! मला तुला विचारण्याची हौस पुरली!

ऐकण्याचेंही कौतुक पुरलें! कर्णांची सार्थकता झाली! हृदयाला आनंद झाला! ठीक झालें! हाय हाय!!! बाळा! हृदय फुटण्याचें दुःख तूं एकट्यानेंच अनुभविलेंना? **वैशंपायनावरची** प्रीति त्वां पुरी केली. आह्मी दुःख भोगणारे पाषाणहृदयी! चांडाळ! आहोंत. ह्मणून तुझें हृदय भग्न झालेलें ऐकूनही आमचें हें हृदय जसेंचें तसेंच आहे! त्याला भंग नाहीं! देवी, वज्रापेक्षां देखील आपलें हृदय कठिण आहे, ह्मणून असें वर्तमान ऐकून देखील त्यांचे हजारों तुकडे होत नाहींत! मरण दुःखाला भिणारे असे आपले प्राण त्याच्या मागून अजूनही जात नाहींत! तर ऊठ ऊठ लवकर, जोंपर्यंत एकटा बाळ फार दूर गेला नाहीं, तोंपर्यंत त्याच्या मागून जाण्याचा प्रयत्न करूं!! अहो! **शुकनास**, काय अजून बसला आहां! खऱ्या प्रेमाची आतांच वेळ आहे! महाकालाच्या देवळाजवळ चिता रचण्याविषयीं सेवकांना आज्ञा द्या! काष्ठ वाहणारांनो, न्या लवकर काष्टें! बसलां कां? सेवकांनो, जा लवकर अग्नींत प्रवेश करण्याच्या वेळचें सर्व साहित्य बाहेर काढा? विनाकारण रडत बसून काय करायाचें आहे? देवी, उशीर न लावतां ब्राम्हणांना जामदारखान्यांतील सर्व द्रव्य देऊन टाकायाचें म्हणून उपाध्यायाला सांग. आजपर्यंत जी संपत्ति राखून ठेविली, तिचें पालन करण्याची आतां या पातक्याला काय गरज राहिली आहे? राजेहो, तुम्ही आपआपल्या ठिकाणीं जा. आणि आपण अनाथ झालों, असें लोकांना वाटूं देऊं नका. माझ्या बालकाच्या आतां गोष्टी मात्र सांगायाच्याना? आतां कोण मला उरलें आहे! याप्रमाणें दीनस्वरानें विलाप करणाऱ्या राजास आपलें दुःख एकीकडे ठेवून **विलासवतीनें** धरून ठेविलें. तें पाहून बावरलेला **त्वरितक** म्हणाला, "महाराज, हा काय आपण अकांत मांडला आहे? हृदय फुटलें तरी **युवराज** शरीरानें चांगलें आहेत. शापदोषानें असें झालें. **वैशंपायनाचें** जन्मशापदोषामुळें झालें, वगैरे सर्व वृत्तांत सांगतो तो श्रवण करा." असें ह्मणून तो पुढील वृत्तांत सांगूं लागला, त्या वेळेस **तारापीडास** विलक्षण चमत्कार वाटला. त्या आश्चर्याखालीं

त्याचा शोक देखील कमी झाला. पापणीस पापणी न लावितां त्याच्या सांगण्याकडे राजानें एकाग्र चित्त लाविलें होतें. **चरितकानें** जसें घडलें होतें तसें सर्व सांगितलें. तें ऐकून अनेक कारणांवरून राजाला खरें वाटे, तरी श्रद्धा बसेना. शोक उत्पन्न करणारें असून आश्चर्य करणारें, ऐकतांना दुःख देणारें असून कौतुक उत्पन्न करणारें, असें **चंद्रापीड** व **वैशंपायन** यांचें चरित्र ऐकिल्यावर आपल्यासारखीच ज्यांची अवस्था झाली आहे, अशा **शुकनासाकडे** राजानें तोंड फिरवून पाहिलें.

खरे मित्र असतात ते स्वतः दुखी असले तरी आपलें दुःख एकीकडे ठेवून मित्राचें दुःख दूर करण्याविषयीं झटतात. पहा, **शुकनास** स्वतः अति दुःखित असतां ही शांतपणानें राजास म्हणाला. "महाराज, या विचित्र संसारात देव, मनुष्य व इतर जीवजंतु हे सुख दुःख व मोह यांस भोगित संचार करितात. ईश्वराच्या इच्छेनें, किंवा धर्माधर्माला साधन अशा इष्ट व अनिष्ट फल देणाऱ्या कर्मांच्या कारणानें, किंवा सृष्टीचा स्वाभाविक नियमच असा असल्यामुळें, परमाणूपासून ब्रम्हांडापर्यंत उत्पन्न होणाऱ्या व नाश पावणाऱ्या अशा स्थावर जंगमाला कोणत्याही अवस्थेचा संभव नाहीं असें नाहीं. याबद्दल महाराजांना काय गूढ वाटतें आहे? युक्तीचा विचार केला तर युक्तीवांचून मंत्रादिकांनीं घडणाऱ्या गोष्टी किती आहेत? मुद्रा ध्यान यापासून निराळेच प्रकार अनुभवास येतात. विषानें मूर्च्छित प्राणी औषधादिकांनीं उठणें, व लोहचुंबकानें लोखंडाचें चलन होणें, यास कोणती युक्ति म्हणावी? अनेक द्रव्यांचा संभोग केला असतां मरण, सुस्ती, वशीकरण इत्यादि प्रकार होण्याची शक्ति त्यांत येते. असे युक्तीवांचून अनेक प्रकार घडतात. भारत व रामायण यामध्यें शापामुळें घडलेल्या अनेक गोष्टी आहेत. जसें इंद्रपदी असलेल्या **नहुष** राजास अगस्त्य ऋषीच्या शापानें अजगरत्व, शुक्रशापानें ययातीला तारुण्यांतच जराप्राप्ति, त्रिशंकूला पितृशापानें चांडाळजन्म या खेरीज आणखीही पुष्कळ गोष्टी आहेत. भगवान् विष्णु अजन्म

असून जमदग्नि ऋषीचा पुत्र झाला. तोच दशरथाच्या उदरीं चार रूपांनीं अवतरला. मथुरेंत वसुदेवालाही तोच कृष्णरूपानें झाला. तर मनुष्यांचे ठायीं देवतांच्या उत्पत्तीचा संभव नाहीं, असें नाहीं. पूर्वींच्या मनुष्यापेक्षां महाराज गुणांनीं कमी आहेत असें ही नाहीं. विष्णुपेक्षां चंद्र अधिक आहे, असें ही पण नाहीं. तेव्हां यांत असंभवनीय तें कोणतें? आणखी गर्भधारणाच्या वेळेस देवीच्या मुखांत चंद्राचा प्रवेश झालेला महाराजांनीं स्वप्नांत पाहिलाच. मला ही स्वप्नांत **पुंडरीकाचें** दर्शन झालें होतें. त्याप्रमाणें त्या उभयतांची उत्पत्ति आपले दोघांचे ठिकाणीं झाली, तर आतां या गोष्टींत कांहींच संशय राहिला नाहीं. ते दोघे निर्जीव झाले असून त्यांच्या शरीरांचा नाश न होणें, पुनरुज्जीवन होणें, याला चंद्राचे ठायीं अमृत आहे, तेंच कारण होय. त्याचा महिमा सर्वत्र माहितच आहे. यासाठीं हें सर्व खरेंच असेल, असें महाराजांनीं समजावें. दुसरें, सर्वांला आनंद देणाऱ्या अशा आकाराचा व सौंदर्याचा संभव देवांशावांचून इतर ठिकाणीं कोठेंही दृष्टीस पडावयाचा नाहीं. आपल्या सुदैवानें लवकरच शापक्षय झाल्या बरोबर गंधर्व राजकन्येशीं विवाह करून स्त्रीसहित नमस्कार करणाऱ्या चंद्रावतारी **चंद्रापीडाच्या** दर्शनानें महाराजांचा सर्व संताप दूर होईल. हा त्याचा शाप आह्मी वरच समजतो; कारण त्यापासून त्याचें खरें स्वरूप आपणांस कळलें. यासाठीं महाराजांनीं व देवीनें अगदीं शोक करूं नये. देवाचीं अनुष्ठानें करावीं, दानधर्म करावा, उपवास व व्रतें करावीं, आणखी जीं कल्याणकारक कर्में असतील, तीं करावीं. धर्मकर्म केलें असतां कोणतेंही असाध्य नाहीं. पुष्कळ देवधर्म करतां करतांच त्या दोघांची प्राप्ति आपणास झाली."

असें **शुकनासाचें** भाषण ऐकून राजा शोकानें ह्मणाला, "तुम्ही ह्मणतां तें सर्व खरें आहे. असें पोक्तपणानें सांगणारा तरी कोण आहे? कोण आम्हाला असा उपदेश करणार आहे? आह्मी तरी दुसरे कोणाचें भाषण ऐकावें? परंतु **वैशंपायनाच्या** दुःखानें बाल-

काचें हृदय फुटलें, हें जसें काय माझ्या डोळ्यासमोर दिसतेंच आहे. त्यावांचून मला दुसरें कांहीं एक दिसत नाहीं. बालकाचें मुखकमल दृष्टीस पडल्याखेरीज प्राण राहतीलसें वाटत नाहीं. माझी जर अशी अवस्था झाली आहे, तर मग देवीची काय विचारावी? याकरितां तेथें गेल्याखेरीज जीव वांचण्याला दुसरा उपायच दिसत नाहीं. असें पतीचें भाषण ऐकल्यावर पुत्रदुःखानें लज्जा सोडून **विलासवती** हात जोडून म्हणाली, "महाराज, असें जर आहे तर उशीर कशाला पाहिजे? आपण बाहेर पडलोंच आहों, करितां प्रयाण करण्यास सांगावें. बालकास केव्हां पाहीन असें मला झालें आहे. मला क्षणभरही धीर धरवत नाहीं. दुःख दूर होण्याकरितां माझें हृदय फुटेल तर बरें, असें मला वाटत होतें, परंतु आतां त्याच्या दर्शनाकरितां तसें व्हावेंसें वाटत नाहीं, त्याचें मुख दृष्टीस पडलें तर पुष्कळ दिवस मला दुःख सोसणें बरें वाटेल, परंतु मरणें वाटणार नाहीं."

अशा प्रकारें **विलासवती** बोलत आहे, तों **शुकनासा**सारखाच एक वृद्ध ब्राह्मण येऊन आशीर्वाद करून ह्मणाला, देवी, स्पष्ट न समजणारें असें हें वर्तमान जिकडे तिकडे पसरल्यामुळें मनोरमाबाई फार घाबरून एथें आली आहे. ती देवळाच्या मागें उभी आहे. महाराजांची स्वारी येथें असल्यामुळें ती लज्जेनें आली नाहीं. ती देवीला विचारते आहे कीं, "तिकडून आलेल्या जासुदांनीं काय सांगितलें? माझा बाळ **वैशंपायन** खुशाल आहेना? तो **युवराजाला** भेटला कां? तसाच **युवराजाही** सुरक्षित आहेना? तो कोठें आहे? ते दोघे किती दिवसांनीं येणार आहेत?" तें भाषण ऐकून राजा दुःखानें व्याकूळ झाला. आणि जिचा शोक शत गुणित वाढला आहे अशा **विलासवतीस** ह्मणाला, "देवी, दोन्ही बालकांचें वर्तमान अजून मनोरमेस समजलें नाहीं. नाहीं तर तिनें जीव देखील ठेवला नसता. तर आतां ऊठ, धैर्यानें आपला शोक आवरून धर, आणि सर्व वर्तमान तिला सांगून तिचें शांतवन कर, **शुकनासा**समागमें तीही आपल्या बरोबरच येईल. तिला याप्रमाणें

आश्वासन देऊन तिचें शांतवन कर." असें सांगून तिला पाठविलें, आणि आपण **शुकनासास** बरोबर घेऊन जाण्याची तयारी करण्यास गेला.

सर्व तयारी होऊन राजा निघाला, तेव्हां त्याच्या प्रीतिमुळें, **चंद्रापीडावर** स्नेह असल्यामुळें, अद्भुत चमत्कार पाहण्याच्या इच्छेमुळें, आणि पहिल्यानेंच **चंद्रापीडा**बरोबर कोणाचा बाप, कोणाचा मुलगा, कोणाचा भाऊ, व कोणाचे आप्त गेले होते त्यांची भेट होईल ह्मणून, वर राखण्यास एकएक मनुष्य ठेवून उज्जयिनींतील सर्व लोक राजाबरोबर निघाले. इतकीं मनुष्यें बरोबर असलीं तर जलदीनें जाण्यास हरकत होईल,ह्मणून, राजानें त्यांस घरीं राहण्यास सांगून आपल्याबरोबर थोडकाच परिवार घेऊन मोठ्या तातडीनें तो चालला. एका दिवसांतच उडून जावें कीं काय, असें त्यास झालें. थोडा गेला नाहीं तोंच 'अजून किती लांब जावयाचें आहे. किती दिवसांनीं आपण जाऊं,' असें **त्वरितकास** तो वारंवार उतावळीनें विचारूं लागला. थोड्याच दिवसांनीं राजा सर्व मंडळीसह आच्छोदसरोवराजवळ येऊन पोंहोचला. तेथे आल्यावर अनेक विकल्प मनांत आल्यावरून राजानें दूर राहूनच **त्वरितका**बरोबर आपले आप्तलोक देऊन त्यांस शोध करण्या करितां पाठविलें.

नंतर पाठविलेल्या लोकांसह येत असलेले **चंद्रापीडा**बरोबरचे राजेलोक त्याच्या **दृष्टीस** पडले. अंगांस स्वच्छ करण्याचा संस्कार नसल्यामुळें त्यांचीं शरीरें मलिन दिसत होतीं. राजाला तोंड कसें दाखवावें? या लज्जेनें ते पृथ्वीतळांतच शिरत आहेत काय, असे दिसत होते. 'पहिल्यानें तूंच पुढें हो, माझ्यानें तोंड दाखववत नाहीं' असें ह्मणून लज्जेनें एकमेकांच्या आड तोंडें लपवीत होते. ते जिवंत असून निर्जीवासारखे दिसत होते. गडबडीनें येत होते तरी त्यांचे पाय मागें ओढ घेत होते. त्यांच्या चेहऱ्यावर अगदीं उत्साह दिसत नव्हता. नेत्रांवाटें अश्रु चालले होते. त्यांचीं तोंडें अगदीं सुकून गेलीं होतीं. **चंद्रापीडाच्या** चरणाकडे लक्ष देऊनच काय तें त्यांनीं जीवित धारण केलें होतें. अशा

मेघनाद प्रमुख लोकांस पाहून राजाचा शोक खवळला ! ! तथापि त्याच्या मुखचर्येवरून त्याला निराशा वाटली नाहीं. मग तो जिच्या चाऱ्ही बाजूंकडे पडदे होते अशा पालखींत बसलेल्या **विलासवतीस** ह्मणाला, 'देवी, तूं भाग्यवती आहेस. बालकाला तसा कांहीं धोका दिसत नाहीं, ह्मणून हे सर्व राजे आपल्या भेटीस येत आहेत.' तें ऐकून तिनें पडदा एकीकडे करून पाणणीस पापणी न लावितां पुत्रासारख्या राजे लोकांस फार वेळ पाहिलें. आणि धैर्य सोडून ती मोठ्यानें रडूं लागली. आणि ह्मणाली, 'बाळा **चंद्रापीडा'** लहानपणीं ज्यांच्या बरोबर तूं धुळींत खेळलास अशा ह्या राजे लोकांत तूंच एकटा कसारे दिसत नाहींस !' याप्रमाणें ती विलाप करूं लागली असतां राजानें तिचें शांतवन करून राजे लोकांसह नमस्कार करणाऱ्या मेघनादास तो ह्मणाला. मेघनादा, असा इकडे ये. सांग बरें आतां माझ्या बालकाचें काय वर्तमान आहे तें. तो ह्मणाला, 'महाराज, चेतना नसल्यामुळें इंद्रियांचा व्यापार मात्र नाहीं, परंतु दिवसें दिवस शरीराची कांति अधिक दिसते आहे.' तें ऐकून जीवप्राप्तीविषयीं राजास आशा वाटून **विलासवतीस** ह्मणाला, '**मेघनाद** काय ह्मणाला, तें ऐकिलें का ? चल आतां लवकर, फार दिवसांनीं बालकाचें मुखकमल पाहून कृतार्थ होऊं.' असें ह्मणून हत्तिणीस वेगानें चालवून तो **महाश्वेतेच्या** आश्रमास गेला.

**चंद्रापीडाचे** गुरुजन आले आहेत, असें एकाएकीं ऐकतांच **महाश्वेतेचे** डोळे पाण्यानें भरून आले, आणि ती ह्मणाली, हायहाय ! दुःख भोगणारी मी पापीण सर्वस्वी बुडालें ! अजून मेलें मला मरण कसें येत नाहीं. तेव्हां हें मेलें दैव किती जाळजाळूं घेणार आहे कोण जाणे ! असें ह्मणत लज्जेनें मठाच्या आंत जाऊन बसली त्यावेळीं **कादंबरीस** तर दुःखानें मूर्छाच आली. तेव्हां तिच्या सख्याजवळ होत्या त्यांनीं तीस धरून ठेविलें. इतक्यांत **शुकनासाचा** हात धरून येणारा असा राजा जेथें **चंद्रापीडाचें** शरीर होतें तेथें आला; व **मनोरमेनें** धरलेली अशी विलासवती, 'माझा

बालक कोठें आहे?' असें उत्कंठेनें ह्मणत व नेत्रांतून अश्रु ढाळीत, पुढें पहात पहात आंत आली. पुत्र वत्सल अशा **तारापीडानें** पुढें जाऊन पाहिलें तो **चंद्रापीडाच्या** शरीराची कांति आहे तशीच आहे, इंद्रियांचें मात्र चलनवलन बंद आहे, केवळ निजलल्यासारखा तो दिसत आहे, असें त्याच्या नजरेस आले. याप्रमाणें त्यास तो पाहत आहे तोंच **विलासवतीनें मनोरमेस** पलिकडे केलें आणि पुत्रास आलिंगन करण्याकरितां दोनी हात पसरून त्याजवळ गेली, व धायीं धायीं रडत ह्मणाली, "बाळा! फार दिवसांनीं दृष्टीस पडलास, याकरितां मजबरोबर एक शब्द तरी बोल! मजकडे एकवार तरी पहा! असें मुकाट्यानें राहणें तुला योग्य नाहीं. बाळा, उठून मांडीवर बैस आणि खरा पुत्रस्नेह दाखीव! ल्हानपणीं देखील माझें ह्मणणें तूं कधीं मोडलें नाहीं! आज मी इतकी बडबड करतें आहे, तरी कसें तुला ऐकूं येत नाहीं! बाळा, तुला कशाचा राग आला आहे रे! मी तुझ्या पायां पडून तुला समजावितें बरें! बाळा, **चंद्रापीडा**! तुझ्या स्नेहानें इतक्या दूर आलेल्या आपल्या पित्याच्यासमोर जाऊन त्यास नमस्कार कर. तुझी वडील माणसांवरची भक्ति आतां कोठें गेली? तुझे सद्गुण, तुझास्नेह, तुझी धर्मज्ञता, तुझी पितृभक्ति, तुझी बंधुप्रीति, हे सर्व गुण कोठें गेले? एकाएकींच सर्वांचा त्यागकरून कसा उदासीन झालास? बाळा! जसें तुला सुखास येईल तसें कर, परंतु आमचा साराजीव तुजवरच आहे, बरें!" असें दीन स्वरानें बोलत ती **चंद्रापीडाजवळ** गेली, आणि त्यास दृढ आलिंगून त्याच्या मुखाचें तिनें चुंबन केले. मग त्याचे पाय आपल्या डोक्यावर घेऊन ती अतोनात रडूं लागली. तीस पाहून **तारापीडानें** आपला शोक आवरला, आणि **चंद्रापीडास** आलिंगन न करितां सर्व प्रजेची पीडा दूर करणाऱ्या अशा आपल्या हातांनीं तिला आवरून धरून ह्मणाला, "देवी, जरी आपल्या पुण्यानें **चंद्रापीड** आपल्याला पुत्र झाला, तथापि तो देव आहे याकरितां शोक करण्याचें सोडून दे. मनुष्याप्रमाणें त्यास समजूं नकोस. अशा शोकापासून कांहीं एक उपयोग नाहीं.

केवळ घसा मात्र फुटणार आहे. आपलें कठोर हृदय कांहीं फुटणार नाहीं. तोंडावाटें दीन शब्द मात्र बाहेर पडतील परंतु प्राण बाहेर येणार नाहींत! डोळ्यांतील पाणी मात्र खालीं पडेल परंतु शरीर पडणार नाहीं. दुसरें, बालकाचें मुख दृष्टीस पडलें नसतें, तर त्या दुःखास पारावार नव्हता. परंतु आतां तें आपल्या दृष्टीस पडत आहे तेव्हां शोकाचें काय कारण आहे! आणखी अशा स्थितींतही आपले शोक आवरून **मनोरमा** व **शुकनास** यांची आपणास समजूत केली पाहिजे. कारण, त्यांचा पुत्र **वैशंपायन** परलोकास गेला आहे. बरें हें सर्व असो. परंतु जिच्या सामर्थ्यानें आपल्या बालकाला जीवित प्राप्ती होऊन पुत्र जिवंत झाल्याबद्दलच्या महोत्सवाचा लाभ मिळणार अशी ही गंधर्व राजाची कन्या व तुझी सून आपल्या येण्यामुळें दुःखित होऊन मूर्च्छित पडली आहे; तिच्या सख्या रडत तिला मोठ्यानें हाका मारीत आहेत, तरी ती सावध होत नाहीं. याकरितां तिला आपल्या मांडीवर घे, आणि सावध होईल असें कर. नंतर पाहिजे तितकी रडत बैस.

तें ऐकून **विलासवती** गडबडीनें **चंद्रापीडाचे** पाय सोडून, "आमच्या जिवाला आधार अशी माझी सून कोठें गेली आहे?" असें ह्मणून घाईनें **कादंबरी**जवळ गेली, आणि तिला आपल्या मांडीवर घेऊन तिच्या तोंडाकडे पाहत बसली, नंतर अश्रुधारा चालल्यामुळें थंड असे आपले गाल तिच्या गालास, कपाळास कपाळ, व डोळ्यांस डोळे लावून, आणि **चंद्रापीडास** स्पर्श केल्यामुळें शीतळ असा आपला हात तिच्या हृदयावर ठेवून; "माझे आई, सावध हो! तुजवांचून माझ्या **चंद्रापीडाचे** शरीर दुसरें कोण रक्षण करण्यास समर्थ आहे? तूं अमृतसंजिविनी आहेस, ह्मणून बालकाचें मुख दृष्टीस पडलें." **चंद्रापीडाचें** नांव ऐकल्यानें व त्या सारख्याच **विलासवतीच्या** स्पर्शानें, ती शुद्धीवर आली. मग **कादंबरीनें** लज्जेनें खालीं तोंड घातलें, आणि काय करावें, आणि काय न करावें, हें तीस सुचेनासें झालें तरी तिनें **मदलेखे**कडून **विलासवती**च्या मांडीवरून आपणास उतरवून धरून ठेवण्यास सांगितल्यावर

कादंबरीनें आपल्या सासूसासऱ्यांस नमस्कार केले. त्यांनींही तिला "चिरकाळ सौभाग्यवती हो!" असे आशीर्वाद दिले. पुढें मदलेखेनें कादंबरीस विलासवतीच्या मागें बसवून धरून ठेविलें.

ती सावध झाली, असें पाहून चंद्रापीडास जिवंत झाला, असें राजास वाटलें. मग चंद्रापीडास आलिंगन करून व त्याच्या अंगावरून हात फिरवून फार वेळ पाहिल्यावर राजा मदलेखेला ह्मणाला, आह्मांस दर्शन सुख घ्यावयाचें होतें तें घेतलें. आतां जसें इतके दिवस बालकाची प्रिया त्याचें उपचार करित होती, तसेच तिनें पुढें चालवावे. आमच्या प्रतिबंधामुळें किंवा लज्येमुळें त्यांत अंतर करूं नये. आह्मी नुस्ते रिकामे पाहणार आहोंत. आह्मी येथें असलों काय आणि नसलों काय सारखेच. जिच्या हस्तस्पर्शानें बालकाचें शरीर सतेज होत आहे, तीच त्याच्याजवळ असावी; असें सांगून तो तेथून उठला; व आपल्याला राहण्या-करितां जागा तयार केली होती तेथें न जातां, तपस्व्यास राहण्यास योग्य अशा एका लतामंडपांतील शिलातलावर जाऊन बसला, आणि समदुःखी अशा राजांस बहुमानानें बोलावून ह्मणाला, "राजेहो मी शोकावेशानें तप करण्यास प्रवृत्त होतों आहे, असें नाहीं. पूर्वींच माझा बेत होता कीं, चंद्रापीडाचा विवाह करून द्यावा, सर्व राज्यभार त्यावर सोंपवावा, आणि आपण वनवासांत राहून उत्तरवय सत्कर्मांत चालवावें तो हेतु माझ्या प्राक्तनानें किंवा दुष्कर्मानें अशा तऱ्हेनें सिद्धीस नेला! असो, त्याला काय करावें! दैव हें दुर्लंघ्य आहे. बालकानें स्वतः राज्य पालन करावें व आपण पाहावें, हें दृष्टीस पडायाचें नव्हतें. असो; मी आतां फार दिवस मनांत असलेला मनोरथ पूर्ण करण्यास इच्छितों. वृद्धावस्था प्राप्त झाली असतां पुत्रावर सर्व राज्यभार टाकून जे मोकळे होतात, व परलोक साधन करितात ते धन्य होत. ते जरी असें करणार नाहींत, तरी त्याची इच्छा नसतांही काळ गळ्यावर पाय ठेवून त्यांना बलत्कारानें ओढून नेण्यास मागें पुढें पाहणार नाहीं.

याकरितां सत्पात्राचे ठायीं राज्यस्थापन करून जरेनें खाऊन उरले-ल्या निरुपयोगी सुखानें रहित, मांसाचा गोळा अशाशरीरानें ही जर परलोक साधतां येईल तर आतां यापेक्षां दुसरा लाभ कोणता पाहिजे? ह्मणून तुमची प्रार्थना केली आहे."

असें बोलून राज्यसुख सोडून तपोवनांतील दुःखाचा त्यानें अंगी-कार केला. राजवाड्यावरची प्रीति वृक्षातलावर, स्त्रियावरची प्रीति लतांवर, आप्त मित्रांवरचा स्नेह हरिणांवर, व वस्त्रावरची प्रीति वल्कलांवर, केशरचनेवरची प्रीति जटेवर, पक्वान्नावरची प्रीति कंद मुळांवर, शस्त्रधारणाची प्रीति रुद्राक्ष माळेवर, आणि प्रजापालना-ची प्रीति समिधा व दर्भ, यांवर त्यानें ठेविली. विनोद भाषणाच्या जागीं धर्मकथाचा स्वीकार केला. शत्रुजयाची इच्छा इंद्रियजया-विषयीं धरिली. द्रव्यसंग्रहाचे जागीं तपोधनाचा संग्रह करण्याचें योजिलें. आज्ञेचे ठिकाणीं मौन धरलें. सर्व सुखोपभोगाचें जागीं वैराग्य धरलें. पुत्राप्रमाणें वृक्षावर स्नेह ठेविला. याप्रमाणें वैराग्य धारण करून तपस्व्याला योग्य अशी कर्मे तो करूं लागला. **कादंबरीनें** व **महाश्वेतेनें**, मोठ्या प्रयासानें लज्जा आवरून, गंध-र्वास उचित असे उपचार केले. तरी राजानें त्यांचा स्वीकार केला नाहीं. सकाळ संध्याकाळीं **चंद्रापीडाचे** दर्शन घेऊन वनवास दुःखास न जुमानतां आपल्या परिवारासह तो तेथें राहिला.

---

ह्याप्रमाणें **जाबाली** ऋषि हें कथानक सांगून हास्यकरून हा-रीतक प्रमुख ऋषींस ह्मणाले अंतःकरणास हरण करणारें हें कथानक कसें तें पाहिलेंना? सांगायाचें तेवढेंच न सांगतां कथारसाच्या भ-रानें मी सर्वच सांगत बसलों. असो, तेव्हां हा कामलुब्ध पुंडरीक स्वतःच्या अविचारानें देवलोकापासून भ्रष्ट होऊन मनुष्य लोकीं **शुकनासाचा** पुत्र झाला. येथेंहि फिरून अविचार केल्यामुळें पित्याच्या कोप वचनानें व **महाश्वेतेच्या** शापानें शुकयोनींत उत्पन्न झाला.

याप्रमाणें जाबाली ऋषि सांगत असतां मी जागा झाल्याप्रमाणें

होऊन पूर्वजन्मींच्या सर्व विद्या माझ्या जिव्हाग्रावर स्फुरण पावूं लागल्या. सर्वकलांविषयीं कौशल्य सूचून मनुष्याप्रमाणें वाणीही फुटली. मागील सर्व गोष्टींचे स्मरण झालें. मनुष्यशरीरच काय तें कमती होतें. पूर्वींसारखा **चंद्रापीडावर** स्नेह, तसाच **महाश्वेतेवर** अनुराग, तशीच तिच्या प्राप्तीची उत्कंठाही उत्पन्न झाली. मला पंख फुटले नसल्यामुळें इंद्रिय व्यापार मात्र बंद होता. तथापि पूर्वींच्या स्मरणानें उत्कंठित होऊन आईबाप, तात **तारापीड**, माता **विलासवती**, प्रियमित्र **चंद्रापीड**, प्रथममित्र **कपिंजल** व **महाश्वेता** यां सर्वांच्या काय काय गोष्टी मनांत आल्या, त्यांची आतां आठवण होत नाहीं. **जाबाली** ऋषीच्या पुढें स्वतःच्या कामुकपणा बद्दल मला लज्जा वाटून मी आपल्या ठिकाणीं चोरल्या-सारखा झालों, व पाताळांत शिरून दडून बसूं, कीं काय, करूं तरी काय, असें मला झालें. मग तसाच जाबाली ऋषीला नमस्कार करून हळू हळू विनंती केली. "भगवान्, आपल्या कृपें करून मला ज्ञान प्राप्त झालें. सर्व पूर्वींच्या बांधवांची आठवण झाली. मी भ्रांत होतों तेव्हां मला त्याचें स्मरणही नव्हतें व विरहाची पीडा-ही वाटत नव्हती. आतां त्यांच्या विरहानें माझें हृदय फार व्याकुळ झाले आहे. त्यांत माझें मरण ऐकून ज्याचें हृदय फुटलें अशा **चंद्रापीडाच्या** स्मरणानें तर माझेंही हृदय फुटतेंच कीं काय, असें वाटतें. याकरितां त्या **चंद्रापीडाचें** जन्म कोठें झालें आहे, हें सांगण्याची कृपा करावी. तें समजलें ह्मणजे त्या पक्षि जातीं-तील आयुष्य त्याच्या सहवासानें सुखांत घालवीन."

अशी मीं विनंति केली असतां मजकडे धिःकारयुक्त पाहून स्नेह व कोप यांनीं युक्त अशा वाणीनें भगवान्जाबाली ह्मणाले, "मूर्खा, जिच्यामुळें तुझी इतकी दुर्दशा झाली ती उतावळी अजून तुजमध्यें आहेच! तुला अजून पंख देखील फुटले नाहींत. हिंडू फिरूं लागायासारखा तर हो. मग विचार काय तें." असें भाषण झाल्यावर **हारीतक** आश्चर्यानें आपल्या पित्यास पुसूं लागला, "बाबा, मला मोठें आश्चर्य वाटतें कीं, हा मुनि असतां इतका का-

भाधीन कसा झाला, कीं ज्याला आपलें जीवित देखील धरवेना-सें झालें ! आणि हा देवलोकीं उत्पन्न झाला असतां याला अल्पायुष्य तरी कसें आलें ? असें मुलाचें भाषण ऐकून जाबालीऋषि बोलूं लागले, त्यावेळीं ते आपल्या दंतकांतींनीं माझें पाप धुऊनच टाकताहेत काय असें वाटलें. ते ह्मणाले, "वत्सा हारिता, याचें कारण उघड आहे. हा काम मोहित अशा स्त्रीच्या अल्पसारवीर्यापासूनच उत्पन्न झाला ह्मणून अल्पायुषी झाला. 'ज्यापासून प्राणी उत्पन्न होतो त्यासारखा तो होतो' अशा अर्थाचें वेदवचन आहे. 'जसें कारण असेल तसें कार्य उत्पन्न होतें.' हा न्याय तर लोक प्रसिद्ध आहे. आयुर्वेदांतही असें सांगितलें आहे कीं, केवळ स्त्रीवीर्यापासून झालेल्या प्राण्यांत शक्तियुक्त असें पुरुषवीर्य नसल्यामुळें तो प्राणी गर्भांतच नष्ट होतो, किंवा मृत झालेला उत्पन्न होतो, अथवा उत्पन्न झाला तरी फार दिवस वांचत नाहीं. तर अशा प्रकारेंच हा उत्पन्न झालेला आहे. कामज्वरबाधा यास होऊन ती सहन न झाल्यामुळें हा मृत होऊन ह्या पक्षिजातींत उत्पन्न झाला. ह्या योनींतही ह्याचें आयुष्य थोडेंच आहे. शाप क्षय झाल्या नंतर मात्र हा दीर्घायुषी होईल." असें त्यांचें बोलणें झाल्या नंतर पुनः मी भूमीस मस्तक लावून नमस्कार केला. आणि विनंति केली, "भगवन्, मी पापी या पक्षियोनींत असल्यामुळें कांहीं एक करण्यास समर्थ नाहीं. मलाही वाणी तरी आतांच आपल्या कृपेनें प्राप्त झाली. तसेंच पूर्वजन्माचें ज्ञानही उत्पन्न झालें. आतां पुढल्या जन्मीं तरी माझें शरीर कोणत्या उपायानें दीर्घायुषी होईल, तें मला सांगावें." अशी मीं विनंती केल्यावर सर्व दिशांकडे पाहून जाबाली, मला ह्मणाले, "हें ही जसें होईल, तसें तुला कळेल." पुरे आतां ही कथा. गोष्टीच्या नादानें पाहांट झाली तरी आम्हाला रात्र कळली नाहीं. पश्चिम दिशेकडे गेलेलें तें चंद्रबिंब निस्तेज झाल्यामुळें स्वच्छ रुपेरी आरशाप्रमाणें दिसतें आहे ! ! पूर्वदिशेच्या अंधकाररूप केशांचा भांगच करीत आहे काय असा अरुणोदय दिसत आहे. प्रकाशामुळें तारे सूक्ष्म होऊन लो-

पत चालले आहेत. पंपासरोवरांतले पक्षी जागे होऊन मधुर शब्दांनीं सर्वांस जागृतच करीत आहेत. शीतलवायु वनांतील प्रफुल्लित पुष्पांचा सुगंध घेत येत असल्यामुळें प्रातःकाळ झाला़सें सुचवीत आहे. होमाची वेळ जवळ आली, असें बोलून गोष्ट सोडून जाबालीऋषि उठले.

त्या वेळीं वैराग्य संपन्न, कौतुक रहित, मुमुक्षु अशी जरी ती ऋषी मंडळी होती, तरी कथारसास इतकी मोहीत झाली होती कीं, गुरुचें उत्थापनादि आदरातिथ्य करण्याचें ही तिला भान राहिलें नाहीं. असे ते ऋषि थक्क होऊन राहिले. ते रोमांचित होऊन अजून जसे काय ती कथा ऐकतच आहेत काय! असे तटस्थ दिसत होते. आश्चर्य, शोक आणि आनंद हे सर्व विकार त्यांच्या मुद्रेवर मूर्तिमंत दिसत होते. मग काय चमत्कार हा! असें बोलत सर्व ऋषि आपापल्या ठिकाणीं गेले. नंतर दुसरे ऋषिकुमार जवळ असतांही हारीतानें स्वतः मला तेथून उचलून आपल्या पर्णशालेंत नेऊन ठेविलें, आणि आपण स्नान संध्या करण्यास गेला. तो गेल्यावर कोणत्याही कामाच्या उपयोगीं नाहीं अशा पक्षियोनींत आपण येऊन पडलों, आतां काय करावें! अनेक जन्मीं पुण्य करावें तेव्हां कोठें दुर्लभ मनुष्य जन्म प्राप्त होतो. त्यांत ब्राह्मणजन्म दुर्लभ! त्यांत मोक्षपद जवळ करणारे मुनित्व दुर्लभ; त्यांत देव लोकीं वास तर फारच दुर्लभ!! इतकें मिळालें होतें तरी मीं आपल्या दोषानें सर्व गमावलें!! आतां निरुपयोगीं अशा पक्षिजातिपासून आपण कसें मुक्त होऊं? पूर्वजन्मींच्या स्नेह्याशीं समागम कसा व्हावा व तें सुख कसें मिळावें? जर तें मिळणार नाहीं, तर माझ्या जीविताचा काय उपयोग? याचें रक्षण करून तरी काय करायाचें आहे? हें कोठें पडो, कोठें जावो, कांहीं होवो, या शरीरास सुख जर प्राप्त व्हावयाचें नाहीं, तर हें ठेवून तरी काय करायाचें आहे! ह्याचा मी त्यागच करतों, म्हणजे मला दुःख देण्याची काळजी वाहणाऱ्या दुर्दैवाचे मनोरथ तरी पूर्ण होतील! जीव देण्याच्या विचारांत मी होतों तों मला पुनः जिवंतच करीत आहे काय, असा

हारीतक हांसत हांसत येऊन ह्मणाला, वैशंपायना, तूं नशिबाचा थोर आहेस! भगवान् श्वेतकेतूकडून कपिंजल तुझा शोध करीत येथें आला आहे. तें ऐकून मला पंख फुटल्यासारखें वाटून, जसा काय मी त्याजवळ उडूनच जात आहे काय असें होऊन वर मान करून, 'तो कोठें आहे?' असें त्याला विचारिलें. तो ह्मणाला, 'ताताच्या पादकमला जवळ आहे.' मी ह्मटलें, 'तरमग मला कृपा करून त्याच्यां जवळन्या. त्याच्या दर्शनाकरितां माझें हृदय फार उतावळें झालें आहे.' असें मी बोलत आहें तों तो माझ्या दृष्टीस पडला. आकाशांतून झपाट्यानें आल्यामुळें त्याच्या जटा अस्ताव्यस्त झाल्या होत्या, वायूच्या योगानें त्याचें उत्तरीय वस्त्र हालत होतें, त्यानें अंगावरील वल्कलानें कमर बांधिली होती. हाडांचा पिंजराच अशा त्याच्या वक्षस्थलावर तुटलेलें यज्ञोपवित लोंबत होतें. आकाशमार्गानें आल्यामुळें त्याला श्रम होऊन तो धापा टाकीत आहे असें दिसत होतें. वाऱ्यानें झोडझोडूं घेतलें होतें, तरी घामानें तो निथळला होता. ! तो मुमुक्षु होता तरी माझ्या स्नेहानें बद्ध होता. ! निःसंग असून माझ्या संगती विषयीं उत्कंठित, नियम असून मजवर माया करणारा, सर्व दुःखांचा त्याग करणारा असून मज विषयीं दुःख बाळगणारा, आणि कृतज्ञ, प्रेमळ, पुण्यवान्, दयाळू, स्नेही, आज्ञेंत राहणारा, महात्मा, अशा कपिंजलाला कृतघ्न प्रीतिरहित, पापी, निर्दय, वैरी, न ऐकणारा, व दुरात्मा अशास म्यां पाहिलें. तो दृष्टीस पडल्याबरोबर माझ्या डोळ्यांवाटें घळघळा पाणी गळूं लागलें. आणि तशा स्थितींत मी सामोरें जाण्याचा प्रयत्न केला, आणि मोठ्यानें श्वास सोडून ह्मणालों, "सख्या, कपिंजला, दोन्ही जन्मांत तुझी भेट मला अंतरल्यामुळें, तुला पाहून, का गडबडीनें उठून हात पसरून तुझ्या दृढ आलिंगनाचें सुख घेऊं! का हातानें तुला धरून आसनावर बसवूं! का स्वस्थ बसल्यावर अंगरगडून श्रम दूर करूं! काय, करूं तरी काय? असें मला झालें आहे. याप्रमाणें मी शोक करीत बसलों असतां कपिंजलानें मला दोन्ही हातांनीं उचलिलें, आणि माझ्या विरहानें

व्याकुळ अशा आपल्या उराशीं घट्ट धरिलें. तेव्हां जणें काय मला हृदयाचे आंत घालीतच आहे काय ! असें फार वेळ त्यानें आलिंगन सुख घेतलें. नंतर तो अज्ञानासारखा माझे पाय आपल्या डोक्यावर घेऊन मोठ्यानें रडत बसला.

असें त्याला पाहून नुसतें बोलणें मात्र स्वाधीन होतें, अशास मी त्यासम्हणालों, " सख्या कपिंजला ! हें तूं काय आरंभिलें आहेस ? मजसारख्या पाप्यानें असा शोक करावा, तुला हें योग्य नाहीं. तूं लहान असून तुला राग, लोभ इत्यादिकांचा संपर्कसुद्धां नाहीं. हे दोष संसारांत बद्ध करणारे व मोक्षमार्गाचे घातक होत. यासाठीं मूर्खजनाच्या मार्गास तूं कशाला अनुसरतोस ? असा जवळ बैस, आणि सर्व कुशल सांग. माझा बाप खुशाल आहेना ? माझी आठवण त्याला कधीं होते कां ? माझ्या दुःखानें तो कधीं दुःखित होतो कां ? माझा वृत्तांत ऐकून तो काय म्हणाला ? तो मजवर रागावला आहे कीं काय ?" असें भाषण ऐकिल्यावर हारीताच्या शिष्यानें पल्लवाचें आसन आणिलें त्यावर तो बसला, आणि मला मांडीवर घेऊन हारीतानें आणलेल्या पाण्यानें हातपाय व तोंड धुऊन मला म्हणाला, " सख्या, तात श्वेतकेतु खुशाल आहेत, त्यांनीं हा आपला सर्व वृत्तांत पहिल्यानेंच दिव्यदृष्टीनें जाणला, आणि या पातकाचें निराकरण करण्याकरितां त्यांनीं अनुष्ठान आरंभिलें. तें चाललें असतांच मी अश्व-जातींतून मुक्त झालों. पुढें मी तातचरणाजवळ गेलों, आणि खिन्न होऊन भयानें दूर उभा राहिलों. मला पाहूनाच ताताच्या नेत्रावाटे अश्रुधारा चालूं झाल्या. मग ते मला म्हणाले, "बाळा कपिंजला, आपल्या हातून दोष घडल्याबद्दल तूं मनांत अगदीं भीति बाळगूं नको. हा सर्व माझाच दोष आहे. मला माहीत असून बालकाच्या उत्पत्ति कालीं मी आयुष्य वाढविणारें असें कर्म करायाचें तें केलें नाहीं. आतां भोक्तुत्व भोगल्यावांचून सुटायाचें नाहीं. या करितां त्याबद्दल दुःख करून उपयोग नाहीं. तूं आतां मजजवळ स्वस्थ ऐस." असें यांचें भाषण ऐकल्यावर मी निर्भय पणानें विनंति केली कीं, ' जेथें पुंडरीक

उत्पन्न झाला असेल तेथें जाण्याची मला आज्ञा द्यावी.' ते ह्मणाले ? 'वत्सा, सांप्रत तो शुक योनींत उत्पन्न झाला आहे. यासाठीं तुला तो ओळखितां येणार नाहीं, व तोही तुला ओळखणार नाहीं, तर कांहीं दिवस तूं स्वस्थ बैस,' आज प्रातः काळींच तातानीं मला बोलावून आज्ञा केली कीं, 'वत्सा, कपिंजला, जाबाली ऋषीच्या, आश्रमीं तुझा मित्र आहे. पूर्व जन्मींचें स्मरण ही त्याला झालें आहे. या करितां तूं त्याच्या भेटीसजा, आणि माझा आशीर्वाद सांगून त्याला सांग कीं, मी आरंभलेलें कर्म समाप्त होईपर्यंत तूं जाबालीच्या आश्रमींच राहा. तुझ्या दुःखानें पीडित झालेली अशी तुझी माता लक्ष्मी देखील या कर्मांत गुंतली आहे, तिचेंही तुला हेंच सांगणें आहे. असें बोलून शिरिषपुष्पाप्रमाणें मृदु व ज्यावर बारीक बारीक पर फुटले होते, अशा माझ्या सर्व अंगास वारंवार कुरवाळीत तो कष्टी होऊन बसला. मी त्यास ह्मटलें, "सख्या कपिंजला, कां उगींच दुःखी होतोस, तुला देखील मज हतभाग्याकरितां अश्वाच्या जन्मास जावें लागलें; पराधीनपणानें रहावे लागून दुःखें भोगावीं लागलीं; सोमपान करण्यास योग्य असें तुझें मुख असून त्यांत तीक्ष्ण लोखंडी लगाम बसला! त्याच्या हिसक्यांनीं तोंडांत क्षतें पडलीं, फेंस व रक्त निघालें; अशीं दुःसह दुःखें सोसावीं लागलीं. पल्लवशय्येवर सुखानें राहणारा तुझा पृष्ट भाग असतां त्यावर खोगीर बसलें! व त्यामुळें फारच कष्ट भोगावे लागले. पुष्पें व कोमललता यांचा स्पर्शही ज्यांस सहन होत नसे अशा शरीरास चाबकाचे तडाके सोसावे लागले! यज्ञोपवीत धारण करण्यास योग्य अशा शरीरावर वादीचे वळ उठले! या प्रमाणें आणखी कांहीं पूर्वींच्या गोष्टी बोलत बसलों असतां, मला आपल्या पक्षिजातीचे भान देखील राहिलें नाहीं.

सूर्य आकाशाच्या मध्यभागावर येऊन दोन प्रहर भरले असतां, हारीतानें कपिंजला बरोबर मजकडून उपाहार करविला. फलाहार झाल्यावर कपिंजल क्षणभर बसून मला ह्मणाला, "आह्मी आरंभिलेलें कर्म समाप्त होईपर्यंत त्वां जाबालीऋषीचे चरण सोडून कोठें

ही जाऊं नये. असें सांगण्या करितां तातांनीं मला पाठविलें आहे. त्यांनीं मजकडेही कांहीं कर्म सोंपविलें आहे, या करितां तें करण्या-करितां मी आतां जातों. " तें ऐकून खिन्न होऊन मी ह्मणालों, " सख्या, कपींजला, तूं आतां जातोस तेव्हां काय मी बोलूं? तात व माता यांस कोणत्या तोंडानें निरोप सांगूं? सर्व तूं जाणतोच आहेस. " याप्रमाणें मी बोलल्यावर त्यानें वारंवार तेथेंच राहण्या विषयीं मला पुनः पुनः सांगून, हारीतऋषीलाही मला तेथें ठेवण्यास सांगितलें. नंतर त्यानें मला व हारीताला दृढ आलिंगन दिलें. मग मोठ्या आश्चर्यानें मुनिकुमार पाहत असतां, तो आकाशात उडाला आणि अदृश्य झाला. तो गेल्यावर हारीतानें " तूं कांहीं चिंता करूं नको " असें मला आश्वासन दिलें, आणि मजजवळ एक ऋषीकुमार ठेवून तो स्नानादि कर्मे करण्यास गेला. त्याचीं नित्य कर्मे, आटोपल्यावर तो माझ्याजवळ फिरत आला. आणि मजकडून त्यानें अपराण्हींही आहार करविला.

या प्रमाणें हारीतऋषीनें मला जीवलावून वाढविलें असतां कांहीं दिवसांनीं मला पंख फुटलें, व मला चांगलें उडतां येऊं लागलें, तेव्हां माझ्या मनांत आलेंकीं, चंद्रापीडतर त्याच ठिकाणीं फिरून जिवंत होणार, असें समजलेंच आहे, व महाश्वेता तर तीच आहे. मला सर्व ज्ञान प्राप्त झालें असून तिच्या दर्शन सुखावांचून येथें आतां दुःखांत तरी कां राहावें? महाश्वेतेच्याजवळच जाऊन राहावें ह्मणजे बरें वाटेल. असा निश्चय करून एके दिवशीं प्रातःकालीं सहल करण्या करितां बाहेर निघालों असतां उत्तर दिशेकडे उड्डाण करीत चाललों. फार दिवसांचा उडण्याचा अभ्यास नसल्यामुळें थोडक्या अंतरावर गेलों तोंच अवयव गळल्या सारखे झाले. श्रमानें तहान लागून घशाला कोरड पडली. मोठ्यानें श्वासोच्छ्वास चालला. पंख निर्बल झाले. आतां येथें उतरेन! असें करीत चाललों असतां, जसा काय एके ठिकाणीं सांचलेला अंधकाराचा समुदायच! व अतिशय हिरव्यागार पल्लवांच्या भारानें वांकलेली अशी सरोवरांच्या कांठीं मनोहर वृक्षांची दाटराई

माझ्या दृष्टीस पडली; तेव्हां मीं आपलें अंग त्यावर सोडून दिलें. फारवेळानें मार्गश्रम दूर झाल्यावर खालीं उतरून वृक्षांच्या छाये खालीं बसलों. झाडांची दाट सावली असल्यामुळें त्या ठिकाणचें उदक फारच थंड होतें. कमळांतील पराग पडल्यामुळें तें फार सुवासिक झालेलें होतें. असें तें मधुर जल वारंवार यथेच्छ पिऊन व कोंवळीं कोंवळीं कमळ बीजें, तीरावरील वृक्षांचें कोंवळे कोंवळे पल्लव, आणि अनेक प्रकारचीं फळें खाऊन, मीं आपली क्षुधा शांत केली. मग दोन प्रहर उलटल्यावर आणखी कांहीं मार्ग चालून जावें असा विचार करून, मार्गश्रमानें ठणकत असलेल्या अंगास विश्रांति देण्याकरितां एक्या वृक्षाच्या जवळच्या फांदीवर चढून स्वस्थ बसलों. त्या ठिकाणीं फारच गर्द छाया होती. विश्रांती घेत असतां मार्ग श्रमामुळें मला गाढ झोंप लागली. पुष्कळ वेळानें जागा झालों, आणि पाहूं लागलों तों, ज्यांतून सुटण्याची आशा नाहीं अशा जाळ्यांत मी अडकलों आहें, असें दृष्टीस पडलें. व माझ्यापुढें एक भयंकर पुरुष ही दृष्टीस पडला. तो जसा काय साक्षात् काळच आहे काय. असे ज्याचें शरीर फारच कठीण व काळें भोर असल्यामुळें जसा काय तो लोखंडाचाच पुतळा आहे काय! दुसरा प्रेतांचा राजा यमच आहे काय! पापांचा केवळ मूर्तिमंत राशीच आहे काय! क्रोधानें भिंवया चढविल्यामुळें व डोळे लाल असल्यामुळें यमास देखील भेडावतोच आहे काय! असा तो दिसला. त्याचें अंतःकरण व केश हे दोन्ही ही स्निग्ध[1] नव्हते. त्याचें मुख व ज्ञान ह्या दोन्हींवर ही काळोखी होती. त्याचें अंग, वस्त्र, व चरित्र हीं काळींच दिसत होतीं. त्याचें शरीर व वचन दोन्हीही कठोर होतीं. पूर्वीं कधीं न पाहिलेलें व ऐकिलेलें असें असें त्याचें भयंकर स्वरूप असून त्याच्या आकारावरूनच क्रूरतादि-दोष त्याचे ठिकाणीं ढळढळीत दिसत होतें. याप्रमाणें त्याला पाहि-ल्यावर जीविताविषयीं निराश होऊन मीं त्यास विचारिलें, " बाबा तूं कोण? तूं कशाकरितां मला धरिलें? मला मारून मांस ध्यावें

१ तैलयुक्त (पक्षीं) स्नेहयुक्त.

अशा इच्छेनें असेल, तर मी निद्रिस्त असतांच कां तूं मला मारिलें नाहींस? मीं तुझा कांहीं अपराध केला नसतां, कां तूं मला जखडून टाकिलेंस? मौजेकरितां असेल तर तुझें कौतुक पुरलें! या करितां मला सोडून दे. प्रियजनाच्या भेटी करितां मला फार दूर जावयाचें आहे. मला भेटीची इतकी उत्कंठा आहे कीं, पळभर उशीर देखील नकोसा वाटतो; इतकी घाई झाली आहे. तूंही प्राणी आहेसच, तेव्हां प्राण्यांचे धर्म तुलाही माहीतच आहेत!" असें मीं त्यास ह्मटल्यावर तो मला ह्मणाला, दादा, मी जातीचा निर्दय चांडाल आहे. मी तुला मांसाच्या आशेनें किंवा गमतीनें धरिलें नाहीं, माझा धनी सर्व चांडाळांचा स्वामी येथून जवळच चांडालवस्ती आहे, तेथें राहतो, त्याला एक सुंदर तरुण मुलगी आहे. ती पूर्व वयांत असल्यामुळें अर्थातच तिला चमत्कारिक वस्तुचें मोठें कौतुक वाटतें. तिला कोणी दुष्टानें अशी बात मी सांगितली, कीं, जाबालीऋषींच्या आश्रमीं एक उत्तम गुणवान् राघा आहे, तें ऐकून तिला मोठी मौज वाटली, आणि तुला धरण्या करितां तिनें माझ्या सारिखे पुष्कळ लोक पाठविले. माझें पुण्य थोर ह्मणून तूं मला आज सांपडलास, तर मी तुला आतां तिच्याजवळ नेतो. मग ती तुला सोडो किंवा ठेवो!

तें ऐकून वज्रानें मस्तकाचें ठायीं प्रहार केल्यासारखा होऊन व फार उद्विग्न होऊन मनांत ह्मटलें, "कायहो, मंदभाग्याच्या कर्माचा हा भयंकर परिणाम!! देव, दैत्य व मानव जिला वंदन करितात, अशा लक्ष्मीपासून माझें जन्म झालें! त्रैलोक्य वंद्य अशा महामुनि श्वेतकेतूनीं मला वाढविलें! देव लोकीं राहण्यास ठिकाण मिळालें! असें असून यवन लोक देखील जेथें जात नाहींत, अशा चांडाल वस्तींत मीं जावें!! चांडाललोकांबरोबर रहावें! चांडाल स्त्रीनें आणलेले अन्नाचें घास खाऊन शरीर पोसावें! त्यांच्या मुलांचें खेळणें व्हावें! अरेरे!! दुरात्म्या पुंडरीका! तुझ्या जन्माला धिःकार असो! तुझ्या कर्माचा असा हा परिणामना! गर्भांत असतांच तुझे हजारों तुकडे कां झाले नाहींत? माते लक्ष्मी! ज्यांना शरण,

जाण्यास ठिकाण नाहीं, ते, देखील तुझ्या चरणास शरण येतात' आणि मी तुझा पुत्र असून या महानरकांत पडत आहें, तेव्हां माझें रक्षण कर. ताता, त्रिभुवनाचें पालन करण्यास देखील तुह्मी समर्थ आहां. यासाठीं माझें रक्षण करा; तुह्मींच लालनपालन करून मला वाढविलें आहे. सख्या, कपिंजला ! या दुःखापासून जर तूं मला सोडविलें नाहीं, तर जन्मांतरीं ही माझ्या समागमाची आशा सोड !" याप्रमाणें शोक करून दीनवाणीनें पुनः त्यास ह्मटलें, "बाबा ! मी पूर्वजन्मींचा मुनि आहें, याकरितां या संकटापासून माझी सुटका कर, ह्मणजे तुला मोठें पुण्य घडेल. व याचें फळ तुला पुढें चांगलें मिळेल. तूंच काय तें मला पाहिलें; तुला दुसरे कोणीं पाहिलें नाहीं. तेव्हां मला सोडण्यास काय हरकत आहे ! तर कसें ही करून माझी सुटका कर." असें ह्मणून मी त्याच्या पायां पडलों. तेव्हां तो हांसून ह्मणाला, "अरे मूर्खा, चांगल्या किंवा वाईट कर्मास पाहणारे असे पांच लोकपाळ तुझ्याच शरीरांत आहेत, ते पहात नाहींत काय ? तथापि मी अकार्य करण्यास भीत नाहीं. माझ्या स्वामीची आज्ञा मला प्रमाण आहे, याकरितां तुला नेल्यावांचून मी सोडतों काय ?" असें बोलून तो मला चांडाल वस्तीकडे घेऊन चालला.

अशा त्याच्या भाषणानें कपाळावर वज्रप्रहार झाल्याप्रमाणें होऊन मुकाट्यानें बसलों, आणि असें कोणतें माझें कर्म असावें, कीं ज्याचें असलें फळ मला प्राप्त झालें, याचा विचार करीत राहिलों. शेवटीं प्राणत्याग करावा असा मीं मनांत निश्चय केला. तो मला घेऊन चालला असतां सोडील कीं काय, अशा आशेनें पुढें पाहात होतों, तें चांडालाचें स्थान माझ्या दृष्टीस पडलें त्याच्याजवळ त्या चांडालाचीं मुलें अनेक कर्में करीत होतीं, कित्येक भूतसंचार झाल्यासारखीं, भयंकर वेषधारण केलेलीं, परत येत असलेलीं, कित्येक पाण्यांत जाळीं टाकून मासे धरीत असलेलीं, कित्येक हरिणांनीं तोडलेलीं, जुनीं जाळीं नीट करण्यांत गुंतून गेलेलीं, कोणी तुटलेले फांस गुंफीत बसलेलीं, कोणी हातांत तीरकमटे, कोणी भाले, कोणी

छोखंडी सोटे हातांत घेऊन हिंडणारीं, कोणी दुसऱ्या पक्ष्यांस धरणारे ससागे वगैरे पक्षी सोडून त्यांजकडून कलकलाट शब्द करविणारीं, कोणी कुत्र्यांना पळविण्याविषयीं हुशार, अशी पारध करीत फिरणारीं अशीं चांडालाचीं मुलें सभोंवतीं दृष्टीस पडलीं. ह्यांवरून दुरून ही हेंच तें स्थान असें कळून आलें. त्या ठिकाणीं घाणेरडा धूर जिकडे तिकडे चालला होता, त्यामुळें व कळकीचीं बेटें असल्यामुळें त्यांचीं झोंपडीं नीट दिसत नव्हती त्या ठिकाणीं रस्त्यांत जिकडे तिकडे हाडांचे ढीग पडले होते प्राण्यांच्या अंगांतील मांस काढीत असल्यामुळें, राहण्याच्या झोंपड्यां पुढील अंगणांत रक्त व मेंदु यांचा चीखल झाला होता मृगयेवरच ज्यांचा निर्वाह, मांसच काय तें खाणें, प्राण्यांची चरबीच काय तें तूप तेल? झाडांच्या सालींचीच कायतीं वस्त्रें, ज्यांना आंथरण्याकरितां व पांवरण्याकरितां काय तीं कातडीं, ज्यांच्या भोंवतालीं परिवार ह्मटला तर कुत्रीं, ज्यांचीं वाहनें ह्मटलीं ह्मणजे बैल, स्त्रीसेवन व मद्यसेवन हेच काय ते पुरुषार्थ. ज्यांची देवपूजा ह्मटली, तर रक्तस्राव, पशूंना बळी देणें, हाच काय तो धर्म. सर्व नरकांची केवळ खाणच, सर्व अकल्याणाचें मूळच, सर्व स्मशानांचा एके ठिकाणीं असलेला समूहच, सर्व पापांचें नगरच, सर्व दुःखांचें स्थानच, असें तें ठिकाण होतें. ज्याचें स्मरण झालें असतां भय उत्पन्न होतें, ऐकिलें असतां अंगावर कांटा उभा राहतो. जेथील घाणेरड्या कर्मांपेक्षांही लोक अधिक मलिन होते; लोकांपेक्षां त्यांचें हृदय अमंगळ होतें; त्यापेक्षांही त्यांचा व्यवहार फारच कठोर होता. जेथील वृद्ध, तरुण, व बालक, यांच्यांत नात्याचा विचार नसून आचारविचारांत कांहीं एक फरक नव्हता. गम्य व अगम्य अशा स्त्रियांविषयीं तेथें कांहीं विचारच नव्हता. पापकर्मांचा केवळ बाजारच, असें तें ठिकाण माझ्या दृष्टीस पडलें.

तें पाहून माझ्या मनांत दैन्य उत्पन्न होऊन, असें आलें कीं, आपल्या जातीसारखें आचरण न करितां, ती चांडालकन्या मला पाहिल्याबरोबर दया करून मला सोडून देईल काय! असें माझें पुण्य उदयास येईल काय? असें होईल तर मी पळभर देखील

येथें राहणार नाहीं! असें मी मनांत मनोराज्य करीत होतों, तों त्या चांडाळानें मला तिजपाशीं नेलें, आणि दुरून तिला नमस्कार करून 'हा मला सांपडला पहा;' असें बोलून मला तीस दाखविलें. मी दृष्टीस पडतांच त्या चांडालकन्येस फारच आनंद झाला, आणि "शाबास! फार चांगलें केलें," असें ती त्यास ह्मणाली. मग मला आपल्या हातांत घेऊन, "अरे कारट्या! बरा सांपडलास; आतां कोठें जातोस? तुझा सर्व स्वछंदपणा मी काढून टाकतें." असें ती मला म्हणत आहे, तोंच चांडालाची मुलें पिंजरा घेऊन तेथें धांवत आलीं. तो पिंजरा गोचर्माच्या ओलसर व केसळ वादीनें विणलेला होता. तिचा दुर्गंध फारच चालला होता. त्या पिंजऱ्याच्या आंत अन्नाची एक आणि पाण्याची एक अशा दोन लांकडी वाट्या होत्या. मग त्या पिंजऱ्याचें थोडेंसें दार उघडून त्यांत महाश्वेतेस पाहण्याच्या माझ्या मनोरथासह मला घालून, त्याचें दार बंद केलें. आणि "आतां येथें खुशाल राहा!" असें मला ह्मणून उगीच बसली. याप्रमाणें पिंजऱ्यांत अडकविल्यावर मी मोठ्याच संकटांत पडलों. तेव्हां माझ्या मनांत आलें कीं, हिला जर मी आपली सर्व हकीकत सांगितली, आणि सोडून देण्याविषयीं पायां पडून विनंति केली, तर जो माझा मधुर भाषणाचा गुण दोषरूप होऊन माझ्या बंधनास कारण झाला, तोच अधिक व्यक्त केल्यासारखा होईल. कारण, मी चांगलें बोलतों, ह्मणून हिनें मला धरण्याचा प्रयत्न केला. मी बंदींत पडून दुःख भोगीत असल्याबद्दल हिला काय वाटणार आहे? मी कोणी हिचा पुत्र, बंधु, किंवा आप्त थोडाच आहे, ह्मणून ही मला सोडून देईल! बरें, मौन धरून जर उगीच बसावें; तर रागावून अधिक हाल करील कीं काय, कोण जाणें! कारण, जात पडली बोलून चालून निर्दय. आतां काय होईल तें होवो; परंतु चांडाळा बरोबर ह्मणून भाषण करायाचें नाहीं. पुष्कळ दिवस मुकाच राहिल्यावर कदाचित् कंटाळून ही मला सोडून देईल, परंतु बोलूं लागल्यावर तर कधींही सोडणार नाहींच! काय पहा! देव लोकांपासून भ्रष्ट झालों! मनुष्यलोकीं ब्राम्हणजन्म प्राप्त झालें! त्यास ही मुकून

पक्ष्याच्या जातींत जन्मलों, हल्लीं तर चांडालाच्या हातीं पडलों. आणि त्यांत ही पिंजऱ्यांत अडकून राहिलों! हा सर्व इंद्रियें स्वाधीन न ठेवण्याचा परिणाम होय. तर आतां एक्या वागींद्रियेंचसें काय सर्व इंद्रियांचें मी नियमन करितों. असें म्हणून मौन धरून राहिलों. मला बोलविलें, निर्भर्त्सना केली, ताडन केले, टोंचलें, तरी देखील मी कांहींएक बोललों नाहीं. फक्त कायतें मोठ्यानें 'चीं' 'चीं' मात्र करीत होतों. तिने खाण्यापिण्याला आणलें, तरी त्या दिवशीं कांहीं एक न घेतां उपाशींच राहिलों. दुसरे दिवशीं ही माझी खाण्याची वेळ टळल्यावर त्या चांडालकन्येच्या मनाला वाईट वाटलें, आणि आपल्या हातानें हिरवीं पिकलीं अशी अनेक प्रकारचीं फळें आणि सुवासिक व थंडगार असें जल मजकरितां ती घेऊन आली. मज पुढें ठेवल्यावर मी त्यास शिवत नाहीं, असें पाहून ती ममतेनें मजकडे पाहून ह्मणाली, "क्षुधा व तृषा यांनीं पीडीत व ज्यांना कशाचाच प्रतिबंध नाहीं, असे पशु व पक्षी,. जवळ जो आहार आणिला तो ते खातात. तूं जर कोणी भक्ष्या भक्ष्याचा विचार करणारा व पूर्व जातीस स्मरणारा असा असशील व आमच्या हातचें अन्न कसें खावें असें तुला वाटत असेल, तर पक्षि जातींत असतां, भक्ष्य काय व अभक्ष्य काय, याचा विचार करण्याचें कारणच नाहीं. उत्तम जात प्राप्त होऊन असें कर्म केलें कीं, ज्याच्या योगानें तूं हीन जातींत उत्पन्न झालास, तेव्हां आतां कसला विचार करतोस! पहिल्यानेंच तूं आपलें मन स्वाधीन ठेविलें नाहीं, आणि आतां आपल्या कर्मानें प्राप्त झालेल्या जातीस योग्य, असें आचरण करण्यास काय दोष आहे? भक्ष्याभक्ष्याविषयीं ज्यांचा नियम आहे, त्यांना देखील विपत्ति कालीं प्राण धारणास अभक्ष्य चालतें; मग तुला काय झालें बरें? त्यांतून चांडालाच्या हातचे म्हणून खातां येत नाहींत असें ही कांहीं पदार्थ मीं आणले नाहींत. त्यांच्या हातचीं फळें तर सर्वांना चालतात. चांडालाच्या भांड्यांतून पाणी जमिनीवर पडलें कीं, त्यास दोष नाहीं, असें लोक ह्मणतात. तर तूं का उगीच भूक व तहान यांनीं आपल्या जिवास आयास देतोस?" चांडाल जातीस अनुचित

असें तिचें भाषण ऐकल्यावर विचार करून मीं निग्रह सोडून दिला, आणि जीवित वाचावें म्हणून तिनें आणलेलीं फळें खाल्लीं. परंतु मौन तर सोडलें नाहींच. याप्रमाणें कांहीं दिवस गेल्या नंतर मी तरुण वयांत आल्यावर, एके दिवशीं प्रातःकालीं डोळे उघडून पाहूं लागलों. तों, सुवर्णाच्या पिंजऱ्यांत मी आपल्याला पाहिलें, व अशा प्रकारची चांडाळकन्या माझ्या दृष्टीस पडली. आणि ती मला घेऊन महाराजाकडे आली. तीच ही चांडाळकन्या महाराजांनीं पाहिलीच आहे. ती चांडाळवस्तीही देवनगरीसारखी दृष्टीस पडली. तेव्हां चांडालसहवासाबद्दल मला वाईट वाटत होतें, तें जाऊन फारच आश्चर्य वाटलें. नंतर हा काय चमत्कार, हें तिला विचारावें ह्मणून जों मौन सोडण्याचा विचार करीत होतों, तों तिनें मला महाराजांच्या पायांजवळ आणिलें. तर ही कोण? हिनें चांडालत्व कशाकरितां स्वीकारलें? मला पिंजऱ्यांत कशाकरितां घालून ठेविलें? आणि येथें कशाकरितां आणिलें? ह्या गोष्टी समजण्याकरितां महाराजाप्रमाणें मलाही मोठें कौतुक वाटत आहे.

---

तें ऐकून शूद्रक राजाला अधिकच चमत्कार वाटला, आणि त्यानें चांडाळकन्येला बोलावून आणण्यास द्वारपालिकेस सांगितलें; तिनें जाऊन तीस बोलावून आणिलें. त्यावेळीं ती आपल्या तेजानें व गंभीरपणानें राजाला देखील निस्तेज करीत आहे काय, अशी दिसली. ती जवळ येऊन ह्मणाली, "हे भुवन भूषणा, तारकांमध्यें रममाण होणाऱ्या, कादंबरीच्या नेत्रास आनंद देणाऱ्या राजा, ह्या दुर्बुद्धीचा व तूं आपला पूर्वजन्मींचा सर्व वृत्तांत याच्या मुखानें ऐकिलाच. या पक्षिजातींत असतांही कामांध होऊन व आपल्या बापाच्या आज्ञेचें उल्लंघन करून, हा आपल्या प्रियेकडे चालला होता; हेही त्यानें स्वतः सांगितलेंच. तर ह्या दुरात्म्याची जननी मी लक्ष्मी होय. हा जाऊं लागला हें त्याच्या पित्यानें दिव्यदृष्टीनें पाहून मला बोलावून सांगितलें, दुराचरणास प्रवृत्त झालेला प्राणी पश्चातापावांचून शुद्धीवर येत नाहीं, याकरितां, तुझा

पुत्र पक्षिजातीपेक्षां आणखी नीच योनींत जाण्याचा प्रयत्न करीत आहे. यासाठीं, हें आरंभलेलें कर्म सिद्धीस जाईपर्यंत, याला मनुष्यलोकीं धरून ठेव आणि जसा याला कृतकर्माचा पश्चाताप होईल, असें कर. हा नीट वाटे वर यावा म्हणून मी हा सर्व प्रकार केला. हल्लीं तें कर्म समाप्त झालें. तुमचा शाप नाहींसा होऊन तुमची दोघांची बरोबरच सुखांत राहण्याची वेळ आली. म्हणून मी याला तुझ्याजवळ आणिलें. मी आपली चांडालजाती प्रसिद्ध केली, याचें कारण हेंच कीं, कोणाचा संपर्क लागूंनये व यास चांगला पश्चाताप व्हावा. असो, तर आतां तुम्ही दोघेही, जन्म, जरा, व्याधि, व मरण इत्यादि दुःखांनीं युक्त अशा ह्या शरीरांचा त्याग करून इष्ट जन समागमानें सुखाचा अनुभव घ्याल. असें बोलून ती आकाशांत गेली. त्यावेळीं तिच्या भूषणांचा झुणुझुणु असा आवाज होत होता, व सर्व लोक तिजकडे वर मान करून पाहत होते.

याप्रमाणें शूद्रक राजानें लक्ष्मीचें भाषण ऐकतांच त्याला पूर्व जन्मींचें सर्व वृत्त आठवलें व 'वैशंपायनरूपी पुंडरीका, तुझ्या व माझ्या शापाचा शेवट एकदम झाला हें चांगलें झालें' असें म्हणत आहे तोंच मदनानें धनुष्य ओढून कादंबरीरूप शस्त्रपुढें केलें. आणि शत्रूप्रमाणें सर्व आशा रुद्ध करून व जीवित हरण करण्याविषयीं तयार होऊन अंतःकरणांत अधिष्ठान केलें. तेव्हां मदनाग्नीनें स्वस्थानापासून वालवून दिलेलें त्याचें अंतःकरण **कादंबरीस** शरण गेलें. मदनबाणांनीं ताडित झाल्यामुळेंच भीतीनें देह सोडून श्वासवायु जलदीनें बाहेर पडले. मदनबाणांच्या पिसाऱ्यांच्या वाऱ्यानेंच त्याचें शरीर कांपूं लागलें. शरीरावर रोमांच उभे राहिल्यामुळें बाणाग्रानीं तें खचलेंच काय असें वाटलें. त्याच्या पुष्पबाणांचे पराग डोळ्यांत गेल्यामुळेंच नेत्रांवाटे अश्रुधारा चालल्या. मुखावर पांढुरकी दिसूं लागली. अंतःकरणांत मदनाग्नि पेटल्यामुळें ओष्ठ पल्लव शुष्क होऊन हालूं लागले, व त्यामुळेंच नीरस झालेला तांबूल त्याच्या तोंडांतून पडला. तेव्हां सरागअसा प्राणच खालीं पडलासें वाटलें!

१ पक्षी, टिगा.

असें ओलें लांकूड पेटलें म्हणजे त्यांतून रस बाहेर निवतो, त्याप्रमाणें मदनदाहानें त्याच्या शरीरांतून घाम गळूं लागला. मदनबाणांच्या टोंकांनीं खिळून टाकल्यामुळें सर्व अवयव पराधीन झाले. कादंबरीस पुढें करून मदनपीडा देत असतां तिच्या अवयवांच्या सौंदर्यानें तापहरणाचीं सर्व साधनें जिंकल्यामुळेंच तीं निरुपयोगी झालीं. हातांनीं कमळें, पायांनीं पल्लव, दृष्टीनें कमळमाला, स्तनांनीं गुच्छ, गालांनीं मणिमय आदर्श, बाहुलतांनीं कमलतंतु, नखकिरणांनीं चंद्रकांति, हास्यानें कर्पूर, दंतकिरणांनीं मौक्तिकहार, मुखानें चंद्रबिंब, लावण्यानें चंद्रिका, याप्रमाणें तिच्या अवयवांनीं उपमान भूत सर्व वस्तु जिंकून टाकिल्या. अंतःकरणास कादंबरीवांचून दुसरे विनोदस्थानच दिसेनासें झालें. तिचेंच ध्यान, तिच्या मूर्तीचेंच अवलोकन, तिचेंच चित्र काढणें, तिच्याशीं बोलणें, तिला आलिंगन करणें, तिला राग आणणें, तिची समजूत करणें, तिच्या पायां पडणें, तिजबरोबर क्रीडा करणें व रममाण होणें, यांमध्येंच तो सर्व वेळ घालवूं लागला. इतर सर्व क्रिया त्यानें सोडून दिल्या. दिवसा देखील डोळे उघडीनासा झाला. रात्रीं डोळ्यास डोळा लावीनासा झाला. मित्राबरोबर बोलेना, गुरूना नमस्कार करीना, धर्म करीना, सुखदुःखाकडे लक्ष देईना, मरणाची भीति बाळगीना, वडील माणसांची लज्जा धरीना, आपल्या जीवाकडे पाहीना. फार काय, अखेरीस कादंबरीच्या समागमाविषयीं हा कांहीं प्रयत्न करीना. वारंवार मूर्छेच्या योगानें आपलें जीवित सोडतोच काय अशी त्याची अवस्था झाली. तेव्हां त्याचे आप्तसेवक एकसारखे सीतोपचार करीत होते त्यांचीं इंद्रियें अगदीं गळून गेलीं. तरी ते अनेक उपचार करीत होते, त्यांच्यापैकीं कोणाच्या नेत्रांवाटे जलधारा चालल्या होत्या तरी तोंडाला कोरड पडली होती. दुसरें कांहींएक बोलत नव्हते; तरी वैशंपायनाविषयीं शोक करीत राजाच्या सर्वांगास चंदनाची उटी लाविली होती. कित्येक त्याच्या पायांखा-लीं कमलिनीचीं ओलीं पानें ठेवीत, कित्येक त्याच्या हातांत काप-राचे व बर्फाचे तुकडे ठेवीत. कित्येक त्याच्या हृदयावर पाणी

शिंपडलेला फुलांचा हार घालीत, कित्येक गालाखालीं स्फटिक-मण्याचे आरसे ठेवीत, कोणी ललाटास चंद्रकांतमण्याचा स्पर्श करीत, कोणी खांद्यावर मृणालतंतु ठेवीत, कित्येक केळीच्या-पानानीं व भिजविलेल्या ताडाच्यापंख्यानीं वारा घालीत, कोणी पुष्पशय्या करण्यांत गुंतलेले, कोणी जलमंदिरांतील कारंजाचे फवारे उडवीत, कोणी चंद्रकांतमण्यांच्या भूमी धुऊन टाकीत, कित्येक कमळांनीं उपचार करीत, कोणी अंधकारयुक्त थंडगार भूयारें नीट करीत, गृहाचे मध्यभाग बगीचे, सरोवरांचीं तटें;, लतांचे दाट मंडप; चंदनाची वारंवार उटी लावणें. इत्यादिक अनेक उपचार ते एक-सारखे करीत होते तरी राजाचा देहकाष्टासारखा झाला. कांहींएक उपाय लागू पडेना. राजाच्या शरीरांत कादंबरीच्या उत्कंठेनें व वैशंपायनाच्या शरीरांत महाश्वेतेच्या उत्कंठेनें दाहकारक असा पराकाष्टेचा मदनाग्नि वाढला.

त्याच समयास वसंतऋतु प्रकट झाला. तेव्हां मदनाग्नीला पेटविण्याकरितां पल्लवयुक्त लतांस नृत्य शिकवून त्यांजकडून प्रदी-प्तच करीत आहे काय; असा दक्षिणवायू वाहूं लागला. अशोक वृक्षांस कोमल असे लाल पल्लव फुटले. आंब्यास अतिशय मोहोर आल्यामुळें ते भूतलापर्यंत वांकले. अशोक; कुरबक; बकुलक; तिलक; कदंबक; चंपक इत्यादि वृक्ष प्रफुल्लित झाले जिकडे तिकडे घमघमाट सुटला. पळस फुलून जिकडे तिकडे लालच लाल दिसूं लागलें. मदनराज्याच्या ध्वजाचे लाल झेंडेच; असे पळस जिकडे तिकडे फडकूं लागले. चोहींकडे सुवर्णमय, रागमय, उत्सवमय, रतिमय, क्रीडामय, व उत्कंठामय! असें दिसूं लागलें. वनांत, उपवनांत; बगिच्यांत; सर्वत्र नवीन सुंदर पालवी फुटली. झाडांना फुलांचे बार आल्यामुळें व आंब्यास मोहोर आल्यामुळें दशदिशां-कडे सुगंधचसुगंध वाहूं लागला. कोकिलादिपक्षी मदोन्मत्त होऊन मधुरशब्द करूं लागले, यांमुळें, व पुष्पावरून भ्रमरांचे थवे गुंजारव करूं लागले यांमुळें मार्गस्थ लोकांचीं मनें विरह दुःखानें पीडीत झालीं.

इकडे पुष्पास्त्र जो मदन याचें अमोघशस्त्रच अशा वसंतानें कादंबरीचे हृदय व्याकुळ केलें. कामदेवाचा उत्सावकाल प्राप्त झाला. तेव्हां तिनें मोठ्या कष्टानें दिवस घालविला. दशदिशांकडे अंधकार पडूं लागला. अशा संध्याकाळच्या वेळीं कादंबरीनें स्नान करून कामदेवाचें पूजन केले; नंतर चंद्रापीडासही अति सुवासिक व शीतळ उदकानें स्नान घातलें. कस्तुरीनें फारच सुवासिक अशा चंदनानें पायां पासून मस्तकापर्यंत उटी दिली. त्याच्या मस्तकावरील केशांत पुष्पमाळा घातल्या. कर्णावर किसलय युक्त असे अशोकवृक्षाचे गुच्छ ठेवले, आणि शुभ्र व सुवासिक अशीं पुष्पें वाहून त्याचें शरीर भूषित केलें. नंतर मोठ्या प्रेमानें पापणीस पापणी न लावितां त्याचे प्राशनच करीत आहे काय, अशी फार वेळ त्यांजकडे पाहत बसली. शेवटीं मदनोत्कंठेनें ती फारच व्याकुळ झाली. व मोठ्यानें श्वासोच्छ्वास सोडूं लागली. ती घाबरी होऊन थरथर कांपूं लागली. व घामानें भिजून चिंब झाली. तिच्या अंगावर रोमांच उभे राहिले. तोंड कोरडें पडलें. महाश्वेता पाहील ह्मणून कावरी बावरी होऊन चोहींकडे पाहूं लागली. चंद्रापीडास भेटावें ह्मणून वारंवार त्याजवळ जाऊन बसूं लागली. सर्व जगास उन्मत्त करणाऱ्या मदनानें तीस अगदीं पराधीन करून तिजकडून स्त्रियांना स्वाभाविक असणारी लज्जा व भीति यांचा त्याग करविला. ती आपला जीव धारण करण्यास असमर्थ झाली. शेवटीं मदनताप सहन न होऊन डोळे झांकून ती जीवंताप्रमाणें चंद्रापीडाच्या कंठास मिठी घालून बसली.

अमृताच्या वृष्टीप्रमाणें आनंद देणाऱ्या अशा कादंबरीच्या आलिंगनानें चंद्रापीडाचें जीवित नाहींसें झालें होतें, तें तत्काळ पुनः कंठांत आलें. दिवसाच्या तापानें मिटलेलें कमळ जसें चंद्रिकेच्या स्पर्शानें प्रफुल्लित होतें, त्याप्रमाणें त्याचें हृदय टवटवीत झालें. प्रातःकाळच्या नीलकमलाप्रमाणें त्याचे विस्तीर्ण नेत्र सुशोभित झाले. मुखही तसेंच हास्यानें रमणीय दिसूं लागलें.

जसा एखादा निजलेला मनुष्य जागा होतो त्याप्रमाणें चंद्रापीडा-च्या सर्व अवयवांचे ठिकाणीं सर्व व्यापार सुरू झाले व तो सावध झाला. आपल्या हृदयाचे ठायीं संलग्न झालेली, भयानें थरथर कांपणारी, आपले डोळे गच्च मिटून वक्षस्थळाच्या आंतच प्रवेश करीत आहे काय, धरण्यास व सोडण्यास जिला अवसान राहिलें नाहीं, अशा **कादंबरीच्या** कंठास आलिंगन करून चिरकाल विरहानें दुर्बल अशा नेत्रांनीं फार वेळ तिला अंतःकरणांत साठवितोच आहे काय, असा **चंद्रापीड कादंबरीचे** कर्ण व हृदय यांस माहीत असलेल्या आपल्या शब्दानें आनंद देत बोलूं लागला. हे भीरु! भय सोड. तुझ्या आलिंगनानेंच मी जीवंत झालों. तूं अप्सरांच्या अमृतापासून उत्पन्न झालेल्या अशा कुळांत उत्पन्न झाली आहेस, याची तुला आठवण नाहीं काय? "हें तेजोमय शरीर अविनाशी आहे. विशेषेंकरून **कादंबरीच्या** हस्त स्पर्शानें पुष्ट होणारें आहे" ह्या माझ्या भाषणाचें तुला स्मरण नाहीं काय? आतां इतके दिवस तुझ्या हस्तस्पर्शानें जीवंत झालों नाहीं, याचें कारण शाप दोष होय. आज माझा शाप दूर झाला. तो तुझ्या करतां मदनपीडा सोसतां सोसतां आतां संपला. तुझ्या विरहानें दुख देणाऱ्या अशा शूद्रक देहाचा मीं आतांच त्याग केला. तुझी या तनूवर अत्यंत प्रीति जडली म्हणून ही ठेवली. आतां हा लोक व चंद्रलोक ह्या दोन्हीं ची ही तूंच स्वामिणी आहेस. आणखी तुझी प्रियसखी जी **महाश्वेता** तिच्या प्रिय वल्लभाचाही शाप मज बरोबरच संपला आहे." या-प्रमाणें **चंद्रापीडरूपी चंद्र** बोलत आहे तोंच चंद्रलोक संबंधी अमृताच्या सुगंधानें आनंद देणारा असा, **महाश्वेता** ज्या रूपाला व ज्या वेषाला पाहून मोहित झाली होती, त्याचरूपानें व वेषानें गळ्यांत तोच मोत्याचा हार घालून कामातुर झालेला तोच **पुंडरीक कपिंजलाच्या** हातांत हात घातलेला, शुकशरीर सोडून तेथें प्राप्त झाला. व त्याला पाहतांच **चंद्रापीडाचे** वक्षस्थळ सोडून **कादंबरी महाश्वेतेकडे** धांवत गेली आणि तीस आलिंगन देऊन **पुंडरीक** आल्याचें आनंदकारक वर्तमान सांगितलें--ते ऐकून तिला आनंद

होत आहे तों पुंडरीक आकाशांतून उतरून चंद्रमूर्ति चंद्रापीडाज. वळ येऊन पोहचला. त्यास पाहतांच चंद्रापीड आलिंगन करून ह्मणाला, "सख्या पुंडरीका! पूर्व संबंधानें पाहिलें तर तूं माझा जांवाई आहेस, तथापि ह्या जन्मीं तुझें माझें मित्राचें नातें जमलें आहे याकरितां त्याच नात्यानें त्वां मजशीं वागावें." याप्रमाणें चंद्रापीडाचें बोलणें चाललें होतें, इतक्यांत चित्ररथ आणि हंसगंधर्व यांसही आनंदाची बातमी कळविण्याकरितां केयूरक हेमकूट पर्वतावर गेला. इकडे मदलेखा हर्षानें धांवत गेली, आणि मृत्युंजय जप करीत बसलेला तारापीड व विलासवती. यांच्यापायांवर नमस्कार करून ह्मणाली, महाराज, आपण व देवी विलासवती असे दोघेही भाग्यवान् आहां! वैशंपायनासह युवराज जिवंत झाले! हें ऐकतांच तारापीडानें मोठ्या आनंदानें मदलेखेस भेट दिली. नंतर आनंदानें विलावतीस आलिंगन करून व शुकनासासही आलिंगन देऊन तो कोठें आहे, तो कोठें आहे. असे मदलेखस विचारीत आनंदानें नाचतोच आहे काय, असा तो शेंकडों राजांसह जेथें चंद्रापीड होता, त्या. ठिकाणीं आला. पुंडरीकाच्या गळ्यांत हात घालून बसलेल्या चंद्रापीडास पाहून तारापीड शुकनासास ह्मणाला, सुदैवानें पुत्राच्या पुनर्जन्माचें सुख मला एकट्यालाच मिळालें असें नाहीं, हें फार चांगलें झालें. असा पित्याचा हर्ष पाहून चंद्रापीडानें पुंडरीकाचें शरीर सोडून आपल्या पित्यास साष्टांग नमस्कार घातला. तें पाहून तारापीड गडबडीनें त्याच्या जवळ गेला आणि त्याला ह्मणाला, पुत्रा, शापदोषानें किंवा पूर्वपुण्यानें मी तुझा पिता झालों, तथापि तूं लोकपाल असल्यामुळें जगद्वंद्य आहेस. माझे ठायीं जो वंद्य राजाश होता, तोही मी तुझ्या ठिकाणींच स्थापन केला आहे. यासाठीं दोन्हीं करून पाहिलें असतां तूंच नमस्कारास योग्य आहेस. असें ह्मणून सर्व राजांसह वर्तमान त्यानें त्यास नमस्कार केला. तें पाहून जिला फारच आनंद झाला आहे, अशा विलासवतीनें चंद्रापीडाच्या मस्तकाचें वगैरे अवघ्राण व चुंबन करून फार वेळ त्यास पोटाशीं धरून आलिंगन

सुख घेतलें. नंतर **चंद्रापीडानें** सर्वांस नमस्कार केले; त्यानींहि त्यस आशीर्वाद दिले. मग त्यानें आईबाप **शुकनास** व **मनोरमा** या सर्वांस, लज्जेनें तोंडखालीं घालून बसलेल्या **पुंडरीकास** दाखवून "या पहा, **वैशंपायन**" ! असें सांगितलें.

इतक्यांत **कपिंजल** येऊन **शुकनासास** ह्मणाला, "भाग्यवान् **श्वेतकेतु** यांनीं असा निरोप सांगितला आहे कीं या **पुंडरीकास** जरी मीं वाढविलें आहे, तरी हा तुझा पुत्र **वैशंपायनच** आहे" असें समजून याला सुमार्गास लावावें. परकीय समजून याची उपेक्षा करूं नये. शापमुक्त झाल्यावर मी आपल्या जवळ आणिलें नाहीं, याचें कारण हा तुझाच आहे ह्मणून. आतां यामध्यें यावच्चंद्र आयुष्य स्थापन करून माझें तेज देवलोकाच्याही वर जाण्यास उत्सुक झालें आहे."

तेव्हां नम्र झालेल्या पुंडरीकाच्या खांद्यावर हात टेवून **शुकनास** ह्मणाला "**कपिंजला**, सकल जगाचा चित्ताभिप्राय भगवान् **श्वेतकेतु** यांना माहित असतां त्यांनीं असा निरोप कशाकरितां पाठविला ? स्नेहाला हें कांहीं योग्य नव्हतें." अशा प्रकारच्या व त्यांच्या पूर्व जन्मींच्या अनेक आनंदकारक गोष्टी सांगत असतां व एकमेकाकडे आनंदानें पहात असतां सर्व रात्र संपली.

प्रातःकाळ होतांच सर्व गंधर्वां सहित चित्ररथ आणि हंस हे मदिरा व गौरी या सहवर्तमान तेथें आले. त्याठिकाणीं, लज्जित झालेल्या कन्यांस व जावयांस पाहून त्यांना फार आनंद वाटला. मग **तारापीड** व **शुकनास** यांजबरोबर आनंदानें गोष्टी सांगत त्यांनीं त्याठिकाणीं मोठा उत्सव केला.

नंतर **चित्ररथ तारापीडास** ह्मणाला, "आपलें घर जवळ असतां आतां अरण्यांत कां उत्सव ? कन्यांनीं आपल्या मनाप्रमाणें धर्मास अनुसरूनच स्वयंवर केले खरें; तथापि लोक व्यवहारास अनुसरलें पाहिजे. याकरितां घरीं चलावें. नंतर आपल्या देशाला किंवा चंद्रलोकीं जेथें पाहिजे तेथें जावें." **तारापीड** म्हणाला, "गंधर्वराज, ज्या ठिकाणीं अतिशय सुख आहे, तें वन

असलें तरी वरच होय. याप्रमाणें मला दुसऱ्या कोणत्या ठिकाणीं सुख मिळालें असतें ? मी आतां सर्व सुखें तुमच्या जांवयांवर सोपविलीं आहेत; याकरितां प्रपंचसुखाचा अनुभव घेण्यासाठीं कन्येसहित जांवयास घेऊन जावें ह्मणजे झालें" असें तारापीडाचें भाषण ऐकून "जशी आपली आज्ञा असेल तसें" असें ह्मणून चंद्रापीडास घेऊन तो हेमकूट पर्वतांवर गेला. मग विवाह समारंभ करून चित्ररथानें कादंबरीसह आपलें राज्य चंद्रापीडास दिलें. व हंसानेंही महाश्वेतेसह आपलें राज्य पुंडरीकास दिलें. आपआपल्या मनाप्रमाणें आपणास सुंदर स्त्रिया मिळाल्या, यामुळें चंद्रापीडास व पुंडरीक यांनीं आपणास कृतार्थ मानिलें.

मनास आवडलेला पति मिळाल्यामुळें आणि आपल्या आप्तमित्रांमध्यें विवाह झाल्यामुळें कादंबरी फारच संतुष्ट झाली. नंतर चंद्रापीड मंदिरांत एकांतीं बसला असतां, त्यास ती फार खिन्न होऊन म्हणाली, "महाराज ! सर्व पुनः जीवंत होऊन एकमेकास भेटले, परंतु ती गरीब विचारी पत्रलेखाच तेवढी कशी आपणांत दिसत नाहीं ? तिचे एकटीचेंच काय झालें ? तें कळत नाहीं." असें तिचें भाषण ऐकून चंद्रापीड दुःखित होऊन ह्मणाला, प्रिये ! ती येथें कोठली ? मला शाप झालेला ऐकून माझी प्रिया रोहिणी घाबरी झाली, आणि मी निवारण केलें असतांही तुह्मी एकटेच कसे मनुष्यलोकीं दुःख सोसाल, असें ह्मणून तिनें पूर्वींच माझी सेवा करण्याकरितां मनुष्यलोकीं जन्म घेतलें. पुढें मी गतप्राण होऊन जन्मांतरी जाऊं लागलों त्यावेळींही आणखी ती जन्म घेऊं लागली. तेव्हां बळेंच मी रागें भरून तिला चंद्रलोकीं पाठविलें, तेथें ती तुझ्या दृष्टीस पडेल. तें ऐकून रोहिणीचें औदार्य, पातिव्रत्य, स्नेह व भक्ति पाहून कादंबरीस मोठें आश्चर्य वाटलें, व ती सलज्ज होऊन जागच्याजागीं मुकाट्यानें बसली.

इतक्यांत चंद्ररूपी चंद्रापीडास दोन्ही जन्मीं इच्छिलेलें असें कादंबरीच्या समागमाचें सुख मिळावें, ह्मणूनच काय तो दिवस दुसरीकडे निघून गेला. चंद्रोदय होऊन जिकडे तिकडे मनोहर

दिसूं लागलें. रात्र बरीच झाल्यांवर चंद्रापीड चिरकांक्षित असें कादंबरीचें समागम सुख घेण्यांत निमग्न झाला. नंतर तो त्या ठिकाणीं दाहा रात्र राहिला, तरी एक रात्र राहिल्यासारखें त्यांस वाटलें. नंतर सासुसासऱ्यांचा निरोप घेऊन तो आपल्या बापाजवळ गेला.

तेथें आल्या बरोबर ज्यांनीं क्लेश भोगिले अशा राज लोकांस संतुष्ट करून सर्व राज्यव्यवस्था पाहण्याचें काम पुंडरीकावर सोंपविलें आणि तो आपल्या पित्याची सेवा करूं लागला, नंतर आप्तमित्रांच्या प्रेमानें कधीं उज्जयनींत, गंधर्व राजाच्या आग्रहा वरून कधीं अति रमणीय अशा हेमकूट पर्वतावर रोहिणीचें मन न मोडावें म्हणून, कधीं अमृतानें सुवासिक व शीतल अशा चंद्रलोकीं, कधीं पुंडरीकाच्या संतोषासाठीं रात्रंदिवस प्रफुल्लित लक्ष्मीचें वसतिस्थान, अशा सहस्त्र पत्रकमलांनीं सुशोभित सरोवराचे काठीं; कधीं कधीं सुंदर बगीचे, उपवनें इत्यादि त्या त्या रमणीय ठिकाणीं, कादंबरीसह राहून चंद्ररूपी चंद्रापीड सुखांत गर्क राहिला. पुंडरीकही महाश्वेतेशीं रममाण झाला. कादंबरी महाश्वेतेसह, आणि पुंडरीक चंद्रापीडासह आनंदांत राहिले. असे ते सर्व फिरून वियुक्त न होतां चिरकाळ अत्यानंदाचा उपभोग घेत राहिले.

---

उत्तरार्ध समाप्त.

